टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

# **"मावळ तालुक्यातील दुर्ग आणि त्यांची वैशिष्ट्ये"**


संशोधक

प्रमोद सोमनाथ बोराडे

मार्गदर्शक

श्रध्दा कुंभोजकर


**मार्च, 2015**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी प्रमोद सोमनाथ बोराडे यांनी, “मावळ तालुक्यातील दुर्ग आणि त्यांची वैशिष्टये” या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. हे संशोधन पूर्णपणे नवीन असून प्रस्तुत प्रबंध यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण ः पुणे

मार्गदर्शक

दिनांक ः मार्च, **2015**

श्रध्दा कुंभोजकर

# प्रतिज्ञापत्र

मी प्रमोद सोमनाथ बोराडे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) या पदवीसाठी सादर केलेला "मावळ तालुक्यातील दुर्ग आणि त्यांची वैशिष्टये" हा माझा शोधप्रबंध असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे

संशोधक

दिनांक : मार्च, **2015**

प्रमोद सोमनाथ बोराडे

# प्रकरण पहिले

## प्रस्तावना

प्राचीन कालखंडापासून मावळ प्रदेशात लोकसमूह लेणी व किल्ले यांच्या आश्रयाने राहिल्याचे दिसून येत असून यातून मावळ तालुक्यातील सामाजिक जीवन व इतिहास याची ओळख प्राचीन काळापर्यंत मागे गेली आहे. मावळ तालुक्यातील लेणी व किल्ले यांचे विशिष्ट परस्पर संबंध होते. ज्या पर्वतांच्या कातळकडयात लेणी निर्माण केल्या गेल्या त्याच पर्वतांच्या माथ्यावर नंतरच्या काळात गिरीदुर्गांची निर्मिती केली गेली असल्याचे आढळून येते. कारण घाटवाटांवर लेणी खोदण्याची प्राचीन परंपरा व सोयीचे समिकरण होते. या लेणींच्या पर्वतांवर नंतरच्या काळात गिरीदुर्ग वसविणे आक्रमकांपासून संरक्षण मिळविण्यासाठी सोयीचे ठरले. म्हणून लेणी व किल्ले यांचा विशेष समन्वय आढळून येतो. उपलब्ध संशोधनातून मावळ तालुक्यातील लेणी व किल्ले यांतील संबंध तसेच त्यांचा इतिहास व भौगोलिक महत्व दर्शविण्यात आले आहे. मावळ तालुक्यातील 'लोहगड, विसापूर, तुंग, तिकोणा, राजमाची' हे गिरीदुर्ग असून इंदोरी हा भुईकोट किल्ला आहे. गिरीदुर्ग प्रकारात गणले जाणारे लोहगड व विसापूर हे वनदुर्ग प्रकारातीलही किल्ले दिसतात कारण दोन्ही किल्ल्यांभोवती घनदाट जंगल तसेच वन्यप्राणी आहेत. हे किल्ले गिरीदुर्ग व वनदुर्ग अशा दोन्ही प्रकारात गणले जातात म्हणून या किल्ल्यांस 'मिश्रदुर्ग' असे संबोधले जाते. लोहगड, विसापूर, तुंग, तिकोणा व इंदोरी या किल्ल्यांची इतिहास चिकित्सा व भौगोलीक महत्व या संशोधनातून मांडलेले आहे. मावळ तालुक्यातील पाच किल्ल्यांची प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक माहिती संकलित केली आहे. किल्ल्यांच्या स्थळांचा संशोधनात्मक अभ्यास करून मोजमापे घेतलेली आहेत. तसेच किल्ल्यांविषयीच्या तिन्ही कालखंडांचा इतिहास अंतर्भूत करण्याचा प्रयत्न या प्रबंधात केलेला आहे.

मावळ तालुक्यातील किल्ल्यांवर इतिहास संशोधकांकडून संशोधन व लेखन फारसे झाले नसल्याचे आढळते. मावळ तालुक्याचा इतिहास तपासतांना सर्वप्रथम मध्ययुगातील शिवाजी महाराजांची बारामावळं हे भौगोलीक क्षेत्र तपासले आहे. यात 'आंदर मावळ, पवन मावळ, नाने मावळ, कोरबारसे मावळ, गुंजन मावळ, हिरडस मावळ' असून यात सहा खोरी आढळतात ती पुढीलप्रमाणे 'पौड खोरे, मुसे खोरे, मुठे खोरे, वेळवंड खोरे,

कानद खोरे, रोहीड खोरे'[1] मध्ययुगात बारामावळ या भौगोलीक क्षेत्रात 'मावळ' असे शब्दशः टिकून असलेला मावळ तालुका आहे. शिवकाळातील तीन मावळांचा समावेश मावळ तालुक्यात होतो. यात 'आंदर मावळ, पवन मावळ, नाने मावळ' अशी तिन मावळे येतात. मध्ययुगीन तिन्ही मावळांत एकूण सहा किल्ले असून त्यातील सर्वात प्रमुख लोहगड किल्ला गणला गेला असे दिसून येते.[2] राजकीय दृष्टया महत्वपूर्ण किल्ला असल्याचे अनेकदा उल्लेख मध्ययुगीन बखरी, शिवकालीन पत्रसार संग्रह व कविंद्र परमानंद लिखीत शिवभारत या ग्रंथात आलेला आढळतो. परंतु मावळ तालुक्यातील किल्ल्यांची प्राचीन व मध्ययुगीन ओळख फारशी समोर आलेली नाही ती या संशोधनातून मांडण्यात आलेली आहे.

किल्ल्यांच्या बांधणीत तटबंदी व बुरूज यांत नेहमी कालानुरूप बदल होत गेलेले आढळतात. प्राचीन कालखंडातील किल्ल्यांचे उल्लेख व पाटलीपुत्र येथील मौर्यांचा लाकडी किल्ला यांवरून किल्ल्यांची तटबंदी व रचना ही जसजशी समकालीन युध्दतंत्र बदलले तसतशी बदलत गेल्याचे निदर्शनास येते. अर्थशास्त्र ग्रंथात "राज्याच्या सिमेवर चारी दिशांना नैसर्गिक भूरचनेचा फायदा घेऊन युध्दाला उपयोगी पडतील अशी किल्ल्यांची रचना केली पाहिजे. आठ प्रकारचे किल्ले तयार केले पाहिजे."[3] असा किल्ल्यांच्या वैविध्यपुर्ण रचनेविषयी व आवश्यकते विषयी उल्लेख आलेला असून मानसोल्लास अर्थात अभिलषितार्थचिंतामणी या ग्रंथात सोमेश्वर यानेही किल्ल्यांचे निरनिराळे प्रकार आवश्यक असल्याचे दर्शविले आहे."जलदुर्ग, गिरीदुर्ग, अश्मदुर्ग, इष्टिकादुर्ग, मृत्तीकादुर्ग, वनदुर्ग, मरूदुर्ग, दारूदुर्ग, नरदुर्ग"[4] असे किल्ल्यांचे नऊ प्रकार मानसोल्लास ग्रंथात आलेले असून कालपरत्वे यातील बदल अपरिहार्य असल्याने त्याचे निरनिराळे प्रकार करून शत्रुसैन्याविषयी उपाययोजना केलेली दिसून येते. औरंगाबादमधील दौलताबाद किल्लात प्राचीन काळात किल्ल्यातून शत्रूवर तोफा डागण्यासाठी बुरूजांस खिडक्या ठेवलेल्या नव्हत्या व बुरूजांची रचनाही साधारण असल्याचे दिसून येते. परंतु मुघलांतील बाबराने युध्दपद्धती वैशिष्टयपुर्ण बनवून शत्रूचा पराजय करण्याच्या अनेक कल्पना शोधल्या. इराणी लोकांपासून बाबराने तोफा व दारूगोळयांचा उपयोग शिकून भारतात आल्यावर त्याने तोफांच्या जोरावर किल्ले

---

[1] अ.रा.कुलकर्णी, *अशी होती शिवशाही*, राजहंस प्रकाशन, पुणे 2009, पृ.22.

[2] Gazetteer of the Bombay Presidency, Poona, Vomume XVIII, part III, P.252.

[3] ह.अ.भावे, *कौटिलीय अर्थशास्त्र*, वरदा प्रकाशन प्रा.लि.पुणे, 2012, (कौ.अ.,अ.2, अ.24)

[4] सतिश अक्कलकोट, *दुर्ग*, सहयाद्री दुर्गभ्रमण मंडळ सांगली, 2009, पृ.35.

हस्तगत करण्याचा प्रयत्न केला.[5] बाबराच्या आक्रमणामुळे उत्तर हिंदुस्थानात तोफखाना खऱ्या अर्थाने प्रचारात आला.[6] दरम्यान अल्प कालावधीत दौलताबाद किल्ल्याच्या बुरूजांस तोफांसाठी मोठया आकाराच्या खिडक्या बनविण्यात आलेल्या दिसून येतात.

तोफांची निर्मिती झाल्यानंतर किल्ल्याचे संरक्षण करण्यासाठी अधिक भक्कम तटबंदीची निर्मिती करण्याची गरज भासू लागली. यामुळे तटबंदीची जाडी वाढविण्यास व किल्ला अभेद्य बांधण्यास प्राधान्य देण्यात आलेले दिसून येते. दरम्यान किल्ला राखण्यासाठी स्थानिक लोकांनी तोफांचे तत्कालीन आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केले आणि तटबंदीतून गोलाकारात मोठया आकाराचे बुरूज बाहेर काढून तटबंदी निर्माण करण्यात आली व बुरूजांवरील तोफा फिरविण्यासाठी चक्री गोलाकार जागा ठेवण्यात आल्या. तोफा डागण्यासाठी बुरूजांस मोठया खिडक्या ठेवल्या गेल्या. दरम्यान फक्त तोफा व मंजनीक नावाचे किल्ल्यात दगड फेकणारे यंत्र कामी येवू लागले असे आढळते.[7] किल्ल्यावरील तोफा चांगल्या दर्जाच्या असल्या तर शत्रुसैन्यापासून किल्ल्याचे संरक्षण करता येत असे. मध्ययुगात दर्जेदार व लांब पल्ल्याच्या तोफा बनविण्यात पोर्तुगीज आणि इंग्रजांचा हातखंडा होता. हलक्या तोफांमुळे इंग्रजांनी भारतीयांवर वर्चस्व मिळविले. इंग्रजांचा घोडतोफखाना नेहमीच वरचढ ठरला.[8] त्यामुळे स्थानिक राज्यकर्त्यांकडून तोफा खरेदी करतांना ब्रिटीश व पोर्तुगीजांकडून केल्या जात.[9] शिवाजी महाराजांने पोर्तुगीज व इंग्रजांकडून तोफा विकत घेतल्याचेही आढळून येते.[10] सारांश पुर्व मध्ययुगात तोफांच्या माऱ्यासमोर तटबंदीने टिकाव धरावा यासाठी तटबंदीच्या चिऱ्यांमध्ये वितळविलेले धातू ओतण्याची प्रथा पडली.[11] प्राचीन काळापासून आधुनिक युगापर्यंत किल्ल्यांच्या तटबंदी व बुरूजांच्या रचनेत प्रभावी युध्दपद्धतीसाठी वारंवार कलात्मक व रचनात्मक बदल करण्यात आलेले आढळतात.

---

[5] धनंजय आचार्य, *मध्ययुगीन भारत*, साईनाथ प्रकाशन नागपूर, 2008, पृ.186.

[6] मराठी विश्वकोश खंड 7, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, 1977, पृ.513.

[7] एन.डी.गायकवाड, *मध्ययुगीन भारत भाग 2*, विना प्रकाशन नाशिक, 2007, पृ.111.

[8] मराठी विश्वकोश खंड 7, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, 1977, पृ.513.

[9] प्रविण भोसले, *दुर्गरचना*, नरसिंह प्रकाशन सांगली, 2006, पृ.26.

[10] मराठी विश्वकोश खंड 7, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, 1977, पृ.513.

[11] महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, मध्ययुगीन कालखंड, 2014, पृ.514.

'किल्ला' हा फारशी शब्द असून त्यास मराठीत 'दुर्ग' असे संबोधले गेले आहे. दुर्ग या शब्दाची व्युत्पत्ती दुर्गम किंवा दुर्घट या अभेद्यता दर्शविणाऱ्या शब्दांवरून झाली असण्याचा संभव आहे. किल्ल्यांचे प्रकार व त्यांचे श्रेष्ठत्व यांचा उल्लेख प्राचीन व मध्ययुगीन अनेक ग्रंथामधून आढळला आहे. उदाहरणार्थ प्राचीन कालखंडात कौटिल्याने 'अर्थशास्त्र' ग्रंथात किल्ल्यांचे आठ प्रकार सांगितले आहेत. "1 - जलवेष्टित, 2 □खंदकाने वेष्टिलेले, 3 □डोंगरांमधील दगडात रचलेले किंवा 4 □खोदलेले, 5 □निर्जल व 6 □निर्वृक्ष अशा दलदलीने भरलेल्या ओसाड प्रदेशात वसविलेले 7 □कुसळाचे गवताने वेढलेले, 8 □काटेरी झाडांनी घेरलेले. यापैकी जलदुर्ग व पर्वतदुर्ग यामुळे देशाचे रक्षण होते. धान्वन म्हणजेच ओसाड प्रदेशांतील व अरण्यातील किल्ल्यांमुळे अरण्याचे व त्या ओसाड प्रदेशाचे रक्षण होते किंवा संकट आले असता अशा वनातील दुर्गात आश्रय घेता येतो."[12] प्राचीन कालखंडातील किल्ल्यांचे महत्व अर्थशास्त्रातून दिसून येत असून मध्ययुगात रामचंद्रपंत अमात्य यांनी 'आज्ञापत्र' ग्रंथातून किल्ले व त्यांचे मध्ययुगीन शासन याचा आढावा घेतलेला आहे. आज्ञापत्र ग्रंथातून मध्ययुगातील किल्ले व त्यांचे नियम, शासन प्रकार, बंधने, पथ्य, किल्लेदार, पहारेकरी व त्यांच्या शिक्षा त्यांची कर्तव्ये, रोजची कामे, प्रसंगावधान त्यांचे वेतन यांसंबंधी महत्वाची माहिती दिलेली आहे. तसेच किल्ल्यांचे महत्व पुढील लेखणातून अधोरेखित केले आहे."संपुर्ण राज्याचे सार ते दुर्गे. दुर्गे नसतां मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उध्वस होतो. देश उध्वस झाल्यावरी राज्य यैसे कोणास म्हणावें? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्यें दुर्ग बांधुन तो तो देश शाश्वत करून घेतला, आलें परचक्र संकट दुर्गाश्रयीं परिहार केलें"[13] रामचंद्रपंत अमात्य यांनी शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात अमात्य या पदावर काम केले असल्याने त्यांना मराठयांच्या स्वराज्यातील किल्ले व किल्ल्यांच्या कठोर नियमांची पुर्ण माहिती होती. त्यामुळे 'आज्ञापत्र' ग्रंथ मध्ययुगातील किल्ल्यांचा अभ्यास करण्यासाठी महत्वपूर्ण मानला जातो.

मागील काळात अनेक घडून गेलेल्या घटनांचा सविस्तर व निष्ठेने केलेला उहापोह म्हणजे इतिहास असून ई.एच.कार यांनी इतिहासाची व्याख्या "वर्तमान आणि भुतकाळ यांच्यातील न संपणारा संवाद म्हणजे इतिहास होय" या प्रकारे केलेली आहे. तसेच डी.डी.कोसंबी यांनी इतिहासाची व्याख्या "इतिहास म्हणजे साधन व

---

[12] ह.अ.भावे, पुर्वोक्त, (कौ.अ.,अ.2,अ.24)

[13] रामचंद्रपंत अमात्य, *आज्ञापत्र*, मुळ मोडी प्रत ऊपलब्ध - राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, पृ.23.

उत्पादन यांच्या परस्पर संबंधातील एक अनुक्रमवार आधारित अशी घटना होय"[14] या प्रकारे केली आहे. घटना घडण्याआधीची पार्श्वभूमी - घटना कशी घडली - घटना घडल्यानंतर घटनेचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय झालेले परिणाम यावर घडलेल्या घटनेचा अन्वयार्थ लावणे म्हणजे इतिहास लेखन असून जगाच्या इतिहासाची मांडणी याच स्वरूपात झालेली आढळून येते.

जगाच्या इतिहासात युध्द व किल्ले यांचा परस्पर संबंध दिसून येतो. कोणत्याही स्थानिक सत्तेस युध्दास तोंड देण्यासाठी किल्ला आवश्यक घटक होता हे आढळून येते. किल्ल्याखेरीज शत्रूसैन्याशी युध्द लढणे अशक्य गोष्ट होती. गुप्तसत्तेच्या ऱ्हासानंतर इस्लाम आक्रमणात अरब, तुर्क, मोगल यांच्या उपद्रवामुळे किल्ल्यांना विशेष असे महत्व वायव्य आणि उत्तर भारतात आलेले निदर्शनास येते. सुलतानशाही व मोगलांचा इतिहास, राजपुतांचे कडवे संघर्ष 'असिरगढ, मांडू, चंदेरी, ग्वाल्हेर, कालींजर, जयपूर, जोधपूर, विकानेर, आग्रा, फत्तेपूर सिक्री, दिल्ली, अजमेर, लाहोर, बुंदी' इत्यादी किल्ल्यांशी संबंधीत आहेत. दिल्लीचा सिरीचा किल्ला अलाउद्दीन खिलजीने इसवी सन **1308** ला, तुघलकाबादचा किल्ला गयासुद्दीनने इसवी सन **1325** ला, अदिलाबादचा किल्ला इसवी सन **1340** ला मुहम्मद तुघलकाने तर शेरशहा सुरीने जुना किल्ला बांधला. किल्ल्यांच्या निर्माणामागे राजसत्तेचे संरक्षण व युध्द करण्यासाठी केलेली योजना हाच उद्देश आढळून येतो.

देवगिरीच्या यादवांचा प्रसिध्द किल्ला दौलताबाद होता. बहामनींची सत्ता स्थापना इसवी सन **1347** ला अफगान इस्माइल मखनने दौलताबाद येथे केली. दक्षिणेत होयसळ - यादव - पाण्डय यांनी उत्तरेतील इस्लाम आक्रमणाच्या स्वारांच्या भितीमुळे किल्ले बांधले. अदिलशहा (विजापूर), कुतुबशहा (गोवळकोंडा), निजामशहा (अहमदनगर), बरिदशहा (बिदर), इमादशहा (अचलपूर) यांच्या ताब्यातील आणि बांधलेले किल्ले प्रसिध्द होते. या सर्व राजवटी अनेक वर्षे किल्ल्यांच्या योगे कार्यरत राहिल्या असल्याचे दिसून येते. बहमनीच्या विघटनानंतर निर्माण झालेल्या पाच शाहयांचा कल बव्हंशी भुईकोट किल्ल्यांचा आणि क्वचित प्रसंगी डोंगरी किल्ल्यांचा उपयोग त्यांच्या आपापसातील संघर्ष करण्याकडे होता.[15] सारांश स्थानिक सत्ताधिशांना अनेकदा

---

[14] सुहास राजदेरकर, *इतिहास लेखनशास्त्र*, विद्या प्रकाशन, **1998**, पृ. **117**.

[15] महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, मध्ययुगीन कालखंड, **2014**, पृ. **517**.

युध्दास तोंड द्यावे लागत असल्याने या राजवटींनी मोठे किल्ले बांधून राजधानीतून युध्दजन्य स्थिती हाताळली असल्याचे आढळते. त्यामुळे किल्ले व युध्द यांचा विशेष घनिष्ट संबंध असल्याचे निदर्शनास येते.

भारतीय इतिहासात किल्ल्यांचे स्थान युध्दात महत्वपुर्ण होते त्याचप्रकारे स्थानिक शांतता टिकविण्यासाठीही किल्ले आवश्यक असल्याचे आढळून येते. स्थानिक बंडखोरी किंवा परकीय आक्रमण आल्यानंतर मुलखात शांतता प्रस्थापित करण्यासाठी किल्ले आवश्यक गोष्ट होती. स्थानिक राजसत्ता शेती, पशुपालन, व्यापार यांसारख्या गोष्टिंमधून महसुल वसुली करीत असत. यांसारख्या गोष्टींना राज्यात बळ धरण्यासाठी शांतता ही महत्वपुर्ण बाब होती. शांततेविना व्यापार व शेती होणे कठीण होते. त्यासाठी राज्यात किल्ल्यांचा उपयोग शांतता प्रस्थापित करण्यासाठी केला गेला असल्याचे दिसून येते. शांततेसाठी हडप्पाच्या नागरीकरणा भोवती तटबंदी उभारली गेली. या तटबंदीचा उद्देशही शांतता प्रस्थापित करणे हाच होता. तसेच भारत हा खेडयांचा देश असल्याची एक ओळख भारताची आहे. बहुतांशी गावांना ‘कुस’ घालण्याची पद्धत होती. आजही अनेक गावे व शहरांभोवती दगडी कुस दिसून येते. त्याचा उद्देश गावात शांतता प्रस्थापि

पत करणे हा होता. हडप्पा किल्ल्याच्या तटबंदीवरून शांतता टिकविण्यात किल्ल्यांचे असलेले योगदान निदर्शनास येते. प्राचिन कालखंडात कौटिल्याने राजसत्तेचे नियम व कायदे यांविषयी अर्थशास्त्रात सविस्तर लिहिलेले असून सर्वांनी कायद्याचा सन्मान करून वर्तन केले पाहिजे असा आग्रह लेखनातून दिसून येतो. त्यात राजाची कर्तव्य व त्याने निवास करण्याची ठिकाणे ही दुर्गम असावित असे लिहीले आहे. कठोर कायदे व कायद्याचे पालन करण्यासाठी निर्माण केलेली नियमावली व कायद्याचे उल्लंघन केले की ठरवून दिलेला दंड या सर्व बाबी शांतता प्रस्थापीत झाल्यानंतर घडून आलेल्या आढळतात. शांतता प्रस्थापित करण्यासाठी किल्ले आवश्यक असल्याचे दिसून येते. मध्ययुगात मुघलांच्या प्रभावाखाली संपुर्ण भारत असतांना शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली व धामधुमीच्या काळात अनेक किल्ले हस्तगत केले तसेच काही नव्याने बांधून काढले. या सर्व गोष्टींच्या पार्श्वभुमीला रयतेस शांतता व सुबत्ता देणे हा उद्देश होता. सारांश मध्ययुगात किल्ल्यांच्या योगे युध्द लढली जात होती तसेच किल्ल्यांच्या योगे मुलखावर शांतता प्रस्थापित करण्याचे काम योग्यरित्या होत होते. म्हणून भारतीय इतिहासात किल्ल्यांचे स्थान युध्दात व शांततेत दोन्ही ठिकाणी महत्वपुर्ण होते असे निदर्श नास येते.

महाराष्ट्राच्या इतिहासाशी किल्ल्यांचा विशेष संबंध आहे. महाराष्ट्राला लाभलेली सहयाद्रीची पर्वतरांग किल्ल्यांसाठी उपयुक्त ठरली. गिरीदुर्ग बांधण्यासाठी उंच पर्वत आवश्यक असतात. सहयाद्रीच्या पर्वतरांगेत मोठया उंचीचे अनेक पर्वत असल्याने त्यांचा उपयोग करून गिरीदुर्ग स्थानिक सत्तेमार्फत वसविले गेले. तळ कोकणातून देशावर येतांना असलेल्या घाट वाटांवर जकातीसाठी व परकीय आक्रमकांवर अंकुश रहावा यासाठी किल्ले वसविले गेले. घाट वाटांवर उंच पर्वतांस लेणी कोरण्याची पद्धत प्राचिन काळात होतीच. याच पर्वतांवर नंतरच्या काळात गिरीदुर्ग बांधले गेले. म्हणून महाराष्ट्राचा इतिहास अभ्यासतांना प्राचिन कालखंडापासून तो अभ्यासावा लागतो. मावळ तालुक्यातील किल्ल्यांचा अभ्यास करतांना त्यांच्या कातळकडयात खोदल्या गेलेली अनेक लेणी अभ्यासावी लागते. तसेच मावळ तालुक्यातील विसापूर किल्ल्यावर व इतर किल्ल्यांच्या परिघात सापडलेल्या शिलालेखात ब्राह्मी लिपी असल्यामुळे किल्ल्यांचा फक्त मध्ययुगीन अभ्यास न करता प्राचीन कालखंडाचाही अभ्यास करावा लागतो. सारांश इतिहासाची रचना करतांना किल्ले हे प्राथमिक साहित्य म्हणून महत्वाचे गणले जातात व जागतिक बदलत्या युध्दतंत्राचे प्रतिबिंब स्थानिक किल्ल्यांच्या बदलत्या रचनेतून स्पष्ट दिसून येते.

मध्ययुगात अनेक संहारक शस्त्रास्त्रांचा नव्याने शोध लागला. तोफा या शत्रूसैन्याचे मोठे नुकसान करण्यासाठी निर्माण केला गेलेला एक शोध होता. मात्र दरम्यानच्या काळात तोफांपासून किल्ल्यांचे संरक्षण व्हावे व मोठया प्रमाणावर किल्ल्यास इजा होवू नये अशी रचना किल्ल्यांच्या निर्माणावेळी प्राधान्याने केल्या गेली. जागतिक युध्दतंत्र स्थानिक किल्ल्यांवर व त्यांच्या रचनेवर परिणाम करत होते. तोफेच्या माऱ्यामुळे प्रवेशद्वारे फुटण्याचा मोठा संभव होता म्हणून दरम्यान लपविलेली गोमुखी पद्धतीची प्रवेशद्वारे निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात आलेले निदर्शनास येते.

स्थानिक इतिहासात मावळ तालुक्यातील किल्ल्यांना मध्ययुगीन महत्व दिले जाते परंतु त्यांचे प्राचीन काळातील अस्तित्व आजपर्यंत लक्षात घेतले गेलेले नाही. मावळ तालुक्यातील इंदोरी किल्ला वगळता सर्व किल्ले प्राचीन इतिहासाशी संबंध दर्शवितात. विसापूर किल्ल्यावर प्रस्तुत संशोधनात नव्याने आढळलेला ब्राह्मी शिलालेख व पोढी तसेच गुंफा, लोहगड किल्ल्यावरील कोठारे व कातळकडयातील पुर्वाभिमुख लेणी तसेच उत्तर बाजुच्या कातळयातील प्रस्तुत संशोधनातून नव्याने समोर आलेल्या पोढी, तुंग किल्ल्यावरील पोढी व त्यावर

कोरलेली लिंगविरहित शाळुंखा तसेच प्रस्तुत संशोधनातून नव्याने उजेडात आलेली **147** फुट लांबी असलेली गुंफा, तिकोणा किल्ल्यावरील पोढी व लेणी या गोष्टींतून मावळ तालुक्यातील किल्ल्यांना प्राचीन अस्तित्व होते हे प्रकाशात येते आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासासंदर्भात किल्ल्यांचे सामरिक महत्व अभ्यासले गेले. परंतु त्यांचा सांस्कृतीक व आर्थिक जिवनाशीही संबंध येत होता ही महत्वाची गोष्ट दुर्लक्षित राहीलेली आढळते. किल्ल्यांच्या परिघातील गावे व वाडया वस्त्यांमध्ये सांस्कृतीक विकास झालेला दिसून येतो. गावांतील जत्रा व उत्सव मोठया स्वरूपात भरविले जात होते. तसेच मनोरंजनाचे खेळ व गायन, वादन, भारूड, भजने, तमाशे यांसारख्या लोककलांची संस्कृती मोठया प्रमाणावर आढळून आली आहे. किल्ल्यांचा सांस्कृतीक जिवनाशी संबंध येत होता हे यातून स्पष्ट होते. तसेच आर्थिक जिवनाशीही किल्ल्यांचा संबंध होता हे दिसून येते. किल्ल्यासाठी त्याच्या परिघातील गावांचा महसूल लावून देण्याची मध्ययुगीन पद्धत होती तशीच पद्धत मठ व मंदिरांना लागू होती. गावांमार्फत किल्ल्याला मिळणाऱ्या महसूलातून गावांचे रक्षण करण्याचीही महत्वपुर्ण जबाबदारी किल्ल्यांनी पत्परतेने केली असल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच किल्ल्यांचा आर्थिक भार सावरण्यासाठी गावांतील शेती व व्यापार हा महत्वपुर्ण भाग होता. काही गावांमध्ये बाजारपेठा वसवून त्याचे संरक्षण सरकारातून केले जात असे. याचा महसूल व उत्पन्नाचा काही भाग किल्ल्यासाठी होता. तसेच शेती व पशुधनाचे संरक्षण आक्रमकांपासून किल्ल्यामार्फत होत असे. सारांश महाराष्ट्राच्या इतिहासात किल्ल्यांचे सामरिक महत्व अभ्यासले गेले मात्र त्यांचा सांस्कृतीक व आर्थिक जिवनाशी आलेला संबंध फारसा उजेडात आलेला नाही तो प्रस्तुत प्रबंधात अंतर्भुत केलेला आहे.

भारतीय इतिहासात कौटिल्यीय अर्थशास्त्र जरी मगधाशी संबंधित असले तरी त्यातील संकल्पना दख्खन पर्यंत प्रचलित होत्या हे आढळून आले आहे. अनेक व्यापारी आपल्या चिजवस्तू व जिवनापयोगी वस्तू विक्रीसाठी दख्खनेत आणत होते. आजही प्राचीन कालखंडात घाटवाटांवर वसविलेल्या अनेक लेणी दिसून येतात. याशिवाय व्यापारी वर्गाकडून गोळा केल्या जाणाऱ्या महसूलातून लेणींचा विकास अनेक टप्प्यांत केला गेलेला आढळून येतो. जुन्नर तालुक्यातील नाणेघाट हा प्राचीन व्यापारी मार्ग म्हणून प्रसिद्ध पावलेला होता. या मार्गावरून जाणाऱ्या व्यापारी लोकांकडून स्थानिक लेणी निर्मीतीसाठी प्रोत्साहनपर दान दिल्या गेल्याचे दिसून

येते. याशिवाय व्यापाऱ्यांना राहण्यासाठी लेणी व विहार योग्य असल्याकारणाने जुन्नर परिसरात नाणेघाटाच्या मार्गावर अनेक पर्वतांस मोठया संख्येने लेणी निर्माण केल्या गेलेल्या निदर्शनास येतात. व्यापारी वर्गाकडून लेणी खोदण्यास आर्थिक प्रोत्साहन मिळाल्यामुळे दरम्यानच्या काळात लेणींची निर्मिती अनेक टप्प्यांत मोठया संख्येने वाढलेली दिसून येते. लेणीचे खोदकाम पुर्ण झाल्यानंतर बहुतांशी लेणींमद्ध्ये कोरलेल्या शिलालेखांत लेणीस दिलेल्या दानांविषयी माहिती येते. व्यापारी वर्गाच्या माध्यमातून मिळालेल्या दानावर लेणी कोरत असल्याचे शिलालेखात नमूद केलेले अनेक लेखांत आढळते. उदाहरण कान्हेरीच्या लेणीत गुंफा क्रमांक **73** मध्ये वऱ्हांडयात दोन खिडक्यांच्या मधील जागेत इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात कोरलेल्या शिलालेखावर "कल्याणचा व्यापारी गोलणक याचा पुत्र इसिपाल याची त्याच्या कुटुंबियांसह त्याच्या मात्यापित्यांच्या सन्मानार्थ दिलेली लेणी व कुंड यांची देणगी"[16] तसेच मावळ तालुक्यातील कार्लेलेणीमध्ये मुख्य स्तुपाच्या चैत्यगृहात उजवीकडील खांबांच्या रांगेतील **11** व्या स्तंभावर ब्राह्मी लिपीत प्राकृत भाषेत इसवी सनाच्या पाहिल्या शतकातील शिलालेखावर "हा स्तंभ धेनुकाकटच्या व्यापारी संघाने दान दिला आहे" अशी माहिती आलेली आहे. तसेच याच चैत्यगृहातील डावीकडील रांगेतील **8** व्या स्थंभावरील शिलालेखातही "धेनुकाकटच्या गोल नामक व्यापाऱ्याच्या इसलक नामक पुत्राची स्तंभासाठी देणगी" अशा व्यापारी देणगीचा उल्लेख आलेला आढळतो. व्यापारी वर्गात शेतकरी, माळी, सोनार, कापडविक्रेता यांसारख्या वर्गाचा उल्लेख मोठया प्रमाणावर आलेला दिसून येतो. जुन्नर तालुक्यातील लेण्याद्री लेणीसाठी धान्यविक्रेत्यांने दान दिल्याचा शिलालेख वऱ्हांडयातील दरवाजाच्या उजवीकडे छताखाली कोरला आहे. ब्राह्मी लिपीमध्ये प्राकृत भाषेत इसवी सनाच्या पहिल्या व दुसऱ्या शतकात "धान्यविक्रेत्या श्रेणीची सात खोल्यांचे लेणे व पाण्याचे टाके यांची पुण्यकारक देणगी"[17] असा उल्लेख आलेला आहे. व्यापार, देश पर्यटन, धर्म प्रसार यांमाध्यमातून प्राचीन कालखंडापासून दख्खन व उत्तर दोन्ही प्रदेश विशेष संबंधाने जोडल्या गेलेले निदर्शनास येतात. मुंबई बाजुस असणारी कित्येक बंदरे ही व्यापारी बंदरे म्हणून लोकप्रिय होती. येथून येणारे व्यापारी घाटमाथ्यावर येतांना अनेक घाटांतून येत होते. यात लोहगड जवळील बोरघाट व कुरवंडयाचा घाट असून याच प्रकारचे अनेक घाट होते. यात बोरघाट, नाणेघाट, कुरवंडयाचा घाट, सवास्नीचा घाट, तैलबैलाचा घाट, गाढवलोटीचा घाट, आंबेनळीचा घाट यांसारखे घाट होते.

---

[16] मंजीरी भालेराव, *महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षिदार*, डायमंड प्रकाशन, **2009**, पृ. **138**.

[17] तत्रैव, पृ. **154** ते **179**.

या सर्व घाटमाथ्यावरील उंच पर्वतांच्या कातळकडयात लेणी खोदण्याचे कार्य प्राचीन कालखंडात केले गेले. नंतरच्या कालखंडात स्थानिक राजवटींकडून याच पर्वतांवर किल्ले वसविले गेले. किल्ले वसविण्याचे कारण फक्त घाटवाटांतून व्यापाऱ्यांकडून महसूल वसूल करणे हे नसून आक्रमकांना घाटवाटांमार्गे रोखणे हे एक होते. आक्रमकांना मोक्याच्या जागी रोखण्यासाठी प्रत्येक घाटाच्या परिसरात किल्ल्यांची केलेली बांधणी ही तत्कालीन राज्यकर्ते व त्यांचे कुशल कारागीर यांच्या दुरदृष्टिपणाची साक्ष देते. कसूर घाटावर भिवगड आणि ढाकगड, पिंपरी घाटावर सुधागड, कावळया घाटावर मानगड, शेवत्या घाटावर लिंगाणा व रायगड, कामथा घाटावर कांगोरी, आंबानळीच्या घाटावर रसाळगड, कुंभार्ली घाटावर जंगली जयगड, माला घाटावर भवानगड, कुंडी घाटावर मैमतगड, विशाळगड घाटावर विशाळगड व माचळ, रडतोंडी घाटावर प्रतापगड अशी घाटांच्या रक्षणार्थ किल्ल्यांची योजना करण्यात आली.[18] त्याचप्रकारे बोरघाटाच्या मुखाशी लोहगड व विसापूर या किल्ल्यांची निर्मि ती केली गेलेली आढळते.[19]

घाटमार्गातून येणाऱ्या स्वकीय व परकीय वर्गाकडून वस्तूंची जशी देवाण घेवाण होत होती तशीच वेशभुषा, केशभुषा, ज्ञानाचीही देवाण घेवाण होत होती. दरम्यान मंगोलीया, पोर्तुगाल, युरोप यांतील नवनवीन बांधकामाच्या शोधांचा तसेच तत्कालीन आधुनिक गणल्या जाणाऱ्या तंत्राचा थेट संबंध भारताशी व पर्यायाने दख्खनेशी आलेला दिसून येतो. शत्रुसैन्यास पराजित करण्यासाठी स्थानिक राजवटींकडून अनेकविध शस्त्रास्त्रे वापरली जात होती. तसेच बलाढय शत्रुकडून किल्ल्याचे संरक्षण करण्यासाठी बांधकाम रचनेत कालानुरूप बदल करण्यात येत होते. सातत्याने बहुतांशी बदलत्या रचना व युद्धतंत्र परकीय आक्रमकांच्या विरोधात विजय मिळविण्यासाठी दख्खनेत होत असल्याचे निदर्शनास येते. सारांश ज्ञानाची देवाण घेवाण ही महत्वपुर्ण गोष्ट प्राचीन काळात घडून आली होती. त्यामुळे भारत व दख्खनेत महाराष्ट्र दरम्यानच्या काळात स्थितीशील नसून गतिशील अवस्थेत होता हे स्पष्ट होते आहे.

वासाहतिक काळात "Myth of the Unchanging East" असे मिथक राज्यकर्त्यांनी बनविले. परंतु त्यांच्या इतिहास लेखनात राजकीय वर्चस्व अबाधित ठेवण्याचा छुपा हेतू होता असे आढळते. स्थानिक राज्यकर्ते

---

[18] महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, मध्ययुगीन कालखंड, 2014, पृ. 516.

[19] मराठी विश्वकोश खंड 15, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, 1977, पृ. 837.

स्थितिशील असल्याचे भासविणे वासाहतिकांच्या दृष्टिने सोयीचे समिकरण होते. या मिथकातून त्यांचा हेतू साध्य होणार होता. त्यामुळे त्यांनी ज्ञानाची रचना करतांना स्थानिक राज्यकर्ते आणि माणसे ही गतिशील नसून स्थितिशील आहेत असे दर्शविणारी केली. परंतु महाराष्ट्रातील किल्ल्यांचे सर्वेक्षण करतांना किल्ल्यांच्या रचनेत झालेल्या तत्कालीन बदलातील आधुनिकीकरणावरून व सातत्याने किल्ल्यांच्या रचनेत अभेद्यता राज्यकर्त्यांच्या मार्फत आणली जात असल्यावरून स्थानिक राज्यकर्ते आणि समाज हा स्थितिशील नसून गतिशील होता हे दिसून येते आहे. सारांश जागतिक इतिहासातही वासाहतिक राज्यकर्त्यांनी त्यांच्या सोयीची ज्ञान रचना केलेली असली तरीही स्थानिक इतिहासाच्या अभ्यासातून वासाहतिक ज्ञानरचनेचा खोटेपणा दाखवून देता येतो.

- प्रबंधाची संक्षिप्त रूपरेषा ः

संशोधन विषयाच्या संदर्भात तत्कालीन वास्तव, प्रेरणा, प्रवृत्ती, मूल्ये, विचारप्रवाह, समस्या, स्थितीबदल या सर्वांच्या आकलनासाठी विविध प्रकारच्या प्राथमिक साधनांचा तसेच दुय्यम साधनांचा अभ्यास केलेला आहे. प्रकरणांच्या शेवटी दिलेल्या संदर्भ साहित्यसूची मध्ये तपासलेल्या संदर्भांची वर्गिकरणात्मक सूची दिलेली आहे. प्रबंधाच्या आरंभीचे म्हणजे प्रस्तुत प्रकरण प्रास्ताविक स्वरूपाचे लिहीलेले आहे. या प्रकरणात प्रबंधाची संक्षिप्त रूपरेषा मांडून किल्ले व त्यांचे समकाळातील कार्य याची संकल्पना स्पष्ट केलेली आहे. दुसऱ्या प्रकरणात मावळ तालुक्यातील किल्ल्यांचा इतिहास, निर्मिती व रचना यांची मांडणी केलेली आहे. तिसऱ्या प्रकरणात लोहगड किल्ल्याच्या प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहासाची मांडणी केली आहे. चौथ्या प्रकरणात विसापूर किल्ल्याचा प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहास तपासलेला आहे. पाचव्या प्रकरणात तुंग, तिकोणा, इंदोरी या तिन किल्ल्यांपैकी तुंग व तिकोणा किल्ल्यांचा प्राचीन व मध्ययुग तसेच अर्वाचीन युग व इंदोरी किल्ल्याचा मध्ययुग व अर्वाचीन युगाचा इतिहास अंतर्भुत केलेला आहे. उपसंहाराच्या सहाव्या प्रकरणात संशोधनाच्या निष्कर्षांची मांडणी करून प्रबंधाचा समारोप केलेला आहे. प्रस्तुत संशोधन करतांना संशोधनाच्या व्याप्ती आणि मर्यादांमुळे राजमाची किल्ला प्रबंधातून वगळला असून संशोधनाच्या मर्यादेमुळे राजमाची किल्ला वगळण्याचा निर्णय घ्यावा लागलेला आहे.

प्रबंधातील प्रकरणांची रचना करताना पाच किल्ल्यांची तीन प्रकरणे बनविली असून किल्ल्यांच्या प्रकरणाची सुरूवात होण्याआधी पार्श्वभूमी म्हणून दोन प्रकरणांची रचना केलेली आहे. याचा उद्देश किल्ल्याची ऐतिहासिक व भौगोलिक माहिती स्पष्ट व्हावी तसेच प्राचिन ते मध्ययुगीन काळापर्यंत किल्ले बांधण्याची आवश्यकता काय होती व त्याचा कसा प्रभाव सामाजिक, सांस्कृतीक व आर्थिक जिवनावर पडला हा आहे.

प्रबंध विषयाचे स्थळ मावळ तालुका असून त्याचा कालखंड प्राचीन, मध्य व अर्वाचीन युग आहे. प्राचीन कालखंडात मावळ तालुक्यास 'मामड आहार' असे संबोधले जात होते.[20] पुणे जिल्हयात मावळ तालुका हा दुर्गम व अनेक पर्वतांनी युक्त असल्याने प्राचीन काळापासून या ठिकाणास महत्व प्राप्त झाले. सातवाहन राजवंशाने मावळ तालुक्यात लेणी खोदण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन दिलेले आढळते. बौध्द समूहांस सातवाहनांकडून अनेक दाने दिली गेलेली आढळतात.[21] या दरम्यान मावळ तालुक्यातील कातळकडयांस इसवी सन पूर्व **200** ते **100** मध्ये भाजे व बेडसे लेणी खोदल्या गेल्या.[22] मावळ तालुक्यातील लेणी प्राचीन कालखंडात उदयास येवून प्रसिध्द पावल्या. प्राचीन कालखंडात मावळ तालुक्यातील बहुतांशी पर्वतांवर लेणी खोदलेल्या आढळतात व त्या ठिकाणी दाने देणाऱ्या व्यक्तींची नावे कोरलेली दिसून येतात. भाजे व बेडसे लेणींतील शिलालेखांत "आरणकान गोभूती, भतासालमितेन, महाभोय, आपदेवणक, महादेवी महारथिनी सामदिनिका, आनदस सेठीस इत्यादी व्यक्तिनावे असून बेडसा लेणीत व बाधया, धमभागस, श्रीधरसे, वेड, नादसयस नायस, कोसिकीपुतस विण्हुदतस, अंपिकिण, धंमगिरिनां इत्यादी व्यक्तिनावे भाजे लेणीत आढळतात"[23] प्राचीन काळापासून या भागास राजकीय महत्व प्राप्त होण्याचे प्रमुख कारण मावळ तालुक्याच्या डोंगराळ प्रदेशात असणाऱ्या घाटवाटा व घाटवाटांमधील उंच पर्वतांवर खोदल्या गेलेल्या लेणी होय. नंतरच्या काळात याच पर्वतांवर किल्ले बांधले गेले. लोहगड, विसापूर, तुंग, तिकोणा, राजमाची हे बोरघाट व कुरवंडयाचा घाट यांचे संरक्षक किल्ले म्हणुन ओळखले जातात. **1793 – 94** मध्ये मावळ तालुक्यास 'तालुके लोहगड' असा उल्लेख आलेला आढळतो.[24] मावळ तालुक्यातील इतर

---

[20] मंजिरी भालेराव, पुर्वोक्त, पृ. **149**.

[21] तत्रैव, पृ. **20**.

[22] तत्रैव, पृ. **206** व **207**.

[23] तत्रैव, पृ. **206** व **209**.

[24] काशीनाथ मराठे (संपा.), *सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी*, **1908**, पृ. **122**.

किल्ल्यांच्या तुलनेत सर्वात महत्वाचा व कायम राजकीय सत्तेंस महत्वाचा वाटणारा लोहगड किल्ला असल्याचे दिसून येते. लोहगड किल्ल्याच्या प्रभावळीत संरक्षक किल्ले विसापूर, तुंग, तिकोणा, राजमाची यांची नावे अनेकदा येतात मात्र शिवकालात इंदोरी किल्ल्याचा उल्लेख आलेला नाही कारण इंदोरी किल्ला नंतर वसविला गेला आहे.[25] लोहगड किल्ला हस्तगत करण्यासाठी मुघल, अदिलशाही यांसारख्या राज्यकर्त्यांने अनेकदा प्रयत्न केलेले आढळतात. सारांश मध्ययुगात ज्या राजसत्तेकडे लोहगड किल्ला असेल त्याच राजसत्तेकडे प्रभावळीतील इतर किल्ले कायम असल्याचे आढळते. उदाहरणार्थ ज्यावेळी लोहगड किल्ला मराठयांकडे होता तेव्हा प्रभावळीतील सर्व किल्ले मराठयांकडे होते व **1665** साली पुरंदर तहावेळी मुघल मनसबदार मिर्झा जयसिंगाला लोहगड किल्ला तहात दिल्यावर प्रभावळीतील सर्व किल्ले त्यास द्यावे लागलेले दिसून येते. **1670** साली पुन्हा मराठयांकडे लोहगड आला त्यावेळी प्रभावळीतील सर्व किल्ले मुघलांकडून मराठयांना मिळालेले आढळतात. **1818** साली ब्रिटीश अधिकारी कर्नल प्रॉथरने लोहगड मिळविला त्यावेळी प्रभावळीतील सर्व किल्ले ब्रिटीशांच्या अंकित झाले होते. प्रभावळीतील किल्ल्यांमध्ये असलेल्या 'तुंग - तिकोणा - विसापूर - राजमाची' यापैकी विसापूर हा मावळ तालुक्यातील सर्वात जास्त विस्तीर्ण माथा लाभलेला किल्ला असून देखील राजकीयदृष्टया नेहमी लोहगड किल्ल्यासच महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

मावळ तालुक्यातील किल्ल्यांची बांधणी कोणत्या शतकात व कोणाच्या कारकीर्दीत झाली याची समकालीन नोंद कुठल्याही कागदपत्रातून किंवा शिलालेखातून आढळलेली नाही. परंतु लोहगड किल्ल्यावर केलेल्या पुनर्बांधणीचे उल्लेख पेशवाईतील नाना फडणवीस याच्या कारकीर्दीत झाले असल्याचा शिलालेख लोहगड किल्ल्यावर प्रथम दरवाजात आहे. या शिलालेखात पुनर्बांधणीचे काम करत असल्याचे लेखन असल्यामुळे हे किल्ले नेमके कोणत्या शतकात बांधले गेले व निर्माणकर्ता कोण होता तसेच किल्ल्यांचा बांधणी खर्च किती झाला यासंबंधी कोणतीही माहिती कागदपत्र व शिलालेख यांतून उपलब्ध होत नाही. हे किल्ले सय्यद अलि तबातबाई लिखित 'बुरहान ए मासिरी' या ग्रंथातील सर्वात पहिल्यांदा आलेल्या नोंदीप्रमाणे **1480 - 81** साली विकसित असल्याचे दिसून येते.[26] इसवी सन पूर्व **200** ते इ.स.पू. **100** या दरम्यान भाजे लेणी कोरलेली असून बेडसे, लोहगड

---

[25] कृ.रा.दाभाडे, *सरसेनापती खंडेराव दाभाडे भाग 1*, सरसेनापती उमाबाई दाभाडे स्मृती प्रतिष्ठाण प्रकाशीत, पृ. **140 – 141**.

[26] महेश तेंडुलकर, *लोहगड विसापूर तुंग तिकोणा*, स्नेहल प्रकाशन, **2010**, पृ. **54**.

व विसापूरची लेणी, कार्ले या लेणी इसवी सनाच्या पहिल्या व दुसऱ्या शतकात खोदल्या गेल्याचे निदर्शनास येते. मावळ तालुक्यात लेणीची निर्मीती किल्ल्याश्रयाने केली असल्याचे प्र.के.घाणेकर म्हणतात.[27] परंतु ते सयुक्तिक नाही. विसापूर किल्ल्याच्या पर्वतास एका टप्प्यावरील घसाऱ्याच्या कातळकडयात खोदलेली भाजे लेणी व किल्ल्यावर खोदल्या गेलेल्या गुंफा आणि पोढी तसेच ब्राम्ही शिलालेख, तिकोणा किल्ल्याच्या दक्षिण कातळकडयातील गडदलेणी व माथ्यावरील तळजाई लेणी तसेच तुंग किल्ल्याच्या दक्षिण कातळकडयातील **147** फुट लांबीची लेणी व लोहगड आणि विसापूर या दोन्हींच्या पर्वतास करूंज गाव शेजारी गणली जाणारी बेडसे लेणी व राजमाची किल्ल्याच्या पर्वतास खोदलेली कोंढाणे लेणी या सर्व लेणी प्राचीन कालखंडात खोदल्या गेल्या होत्या. यावरून असे अनुमान करता येते की प्राचीन काळात घाटमार्गावर पर्वतांच्या कातळकडयात लेणींची निर्मीती केली गेली व नंतरच्या काळात या लेणींच्या पर्वतावर किल्ल्यांची निर्मिती केली गेली.

- विषय निवडीची कारणे ः

इतिहास हा सातत्य आणि बदल यांचा वेध घेत असतो. मावळ तालुक्यातील किल्ल्यांच्या माध्यमातून भारतीय इतिहासातील प्राचीन ते मध्ययुगीन ते आधुनिक काळांतील होणाऱ्या स्थित्यंतराचा अभ्यास करणे हे या विषयाचा अभ्यास करण्याचे प्रमुख कारण आहे.

किल्ल्यांच्या बाबतीत इतिहास संशोधकांची दृष्टी एकतर पूर्वगौरवाची असते किंवा सद्यस्थितीतील दुःस्थितीचे व दुःखदाची चित्रव करणारी असते. इतिहासाच्या अभ्यासकाला तटस्थपणे अभ्यास विषयात कालानुरूप होणारे बदल नोंदवायचे असतात आणि त्यातून काही प्रवाहांचा वा प्रकियांचा शोध घेणे अपेक्षित असते. त्यानुसार स्मरणरंजन किंवा पूर्वगौरव न करता मावळ तालुक्यातील किल्ल्यांच्या अभ्यासाने जागतिक व भारतीय इतिहासातील काही प्रवाहांचा निर्देश करण्याचा उद्देश या प्रबंधामागे आहे. याशिवाय स्थानिक पातळीवर काही अपरिचित साधने शोधने व त्यांचा अन्वयार्थ लावणे हाही उद्देश आहे.

---

[27] प्र.के.घाणेकर, *साद सहयाद्रीची भटकंती किल्ल्यांची,* स्नेहल प्रकाशन, **1985**, पृ.**183**.

मध्ययुगात महत्व प्राप्त झालेल्या किल्ल्यांमध्ये रायगड, सिंहगड, राजगड, लोहगड, दौलताबाद हे किल्ले दिसून येतात. लोहगड किल्ल्यास रायगड किल्ल्यासारखी सभोवती किल्ल्यांची प्रभावळ निर्माण करण्यात आलेली आढळते. मावळ तालुक्यातील किल्ल्यांचा अभ्यास करतांना या आधी संशोधन केलेल्या संशोधकांनी मावळ तालुक्यातील किल्ल्यांवरील ब्राह्मी शिलालेख, भुयारे, पाण्याच्या टाक्या, कातळकडयांस असलेल्या गुंफा, विहिरीतील पाण्याचा साठा वाढविण्यासाठी तळाशी खोली सदृश्य निर्माण केलेली पोकळी, कातळकडयांतील पोढी व पाण्याचा साठा मोठा साठविण्यासाठी पोढीतील आतमधील खोल्या, दोन किल्ल्यांचा परस्पर संबंध तसेच तत्कालीन किल्ले बांधणीतील अद्ययावत तंत्रज्ञान तसेच किल्ल्यांच्या अभ्यासासाठी महत्वपुर्ण असणारे प्राथमिक साहित्य या गोष्टींच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष दिलेले दिसून येत नाही. तसेच योग्य तो अन्वयार्थ लावलेला दिसून येत नाही.

प्रमोद मांडे लिखीत 'गडकोट महाराष्ट्राचे' या पुस्तकात मावळ तालुक्यातील किल्ल्यांची फक्त ठिकाणे दिलेली असून त्याबद्दलचा कोणताही इतिहास त्यांनी नमुद केलेला नाही. तसेच सतिश अक्कलकोट लिखीत 'दुर्ग' पुस्तकात लोहगड किल्ल्याच्या भुयारांची चुकीची माहिती आल्याने इतिहास अभ्यासकांत संभ्रम निर्माण झालेला आढळतो परंतु भुयारांच्या सर्वेक्षणातून ते भुयार नसून पाण्याचे टाके असल्याचे प्रस्तुत संशोधनातून समोर आले आहे. प्र.के.घाणेकर यांनी 'साद सहयाद्रीची भटकंती किल्ल्यांची' या ग्रंथातून मांडलेले किल्ले हे अल्पपरिचित असून त्यांनी किल्लेश्रयाने लेणी खोदल्याचे नमुद केले आहे. त्यांचे अनुमान चुकीचे असल्याचे प्रस्तुत प्रबंधात मांडले असून आधी लेणी व मग किल्ले यांची बांधणी केल्याचे अंतर्भुत केलेले आहे. महेश तेंडुलकर यांनी मावळ तालुक्यातील किल्ल्यांवर स्वतंत्र पुस्तक प्रकाशित केले मात्र यात विसापूर किल्ल्याच्या ब्राह्मी शिलालेखांची माहीती दिली नाही तसेच इसवी सनांमध्ये कालविपर्यास झाला असल्याने इतिहास अभ्यासकांत संभ्रम झाल्याचे आढळते. विसापूर किल्ल्यावर एकच तोफ असल्याचे महेश तेंडूलकरांनी नमुद केले मात्र किल्ल्यावर दोन तोफा असल्याचे आढळून आले. मावळ तालुक्यातील किल्ल्यांसंबंधी स्वतंत्र पुस्तक लिहूनही चिकित्सक काम झाले नसल्याचे दिसून येते. संदिप तापकीर लिखीत 'महाराजांच्या जहागीरीतून' या पुस्तकात किल्ल्यांवर जाण्याच्या वाटा, मुक्कामाच्या सोयी, पहावयाची ठिकाणे व किमान इतिहास सोडता किल्ल्यांची वैशिष्टये व ऐतिहासीक घटनांचा अन्वयार्थ लावलेला आढळून येत नाही. तापकीर यांनी लिहीलेले पुस्तक पर्यटनाच्या दृष्टिने सोयीचे ठरते मात्र इतिहासाच्या दृष्टिने त्यात संशोधन केलेले नाही. शोभना गोखले लिखीत 'प्राचीन भारतीय इतिहासाची साधने'

या ग्रंथात सर्वप्रथम विसापूर किल्ल्याच्या शिलालेखांचे वाचन केल्याचे संदर्भ आलेले आहेत ते या किल्ल्याच्या प्राचीनत्वाची साक्ष देतात. मात्र विसापूर किल्ल्याच्या सर्व ब्राह्मी शिलालेखांचा अभ्यास त्यांच्या पुस्तकात केलेला नसून निवडक पायथ्याच्या जवळ असलेले लेख त्यांनी तपासलेले आहेत.

लोहगड व परिघातील किल्ले यांचा अभ्यास प्र.के.घाणेकर, महेश तेंडुलकर, शोभना गोखले, संदीप तापकीर, सतीश अक्कलकोट, भगवान चिले, प्रविण भोसले या संशोधकांनी केलेला असला तरीही विसापूर किल्ल्यावरील सर्व शिलालेखांचा अभ्यास आजपर्यंत झालेला नाही तसेच मावळ तालुक्यातील कोणत्याही किल्ल्याची मोजमापे आजपर्यंत संशोधकांमार्फत घेतली गेलेली नाहीत. किल्ल्यांच्या कातळकडयांतील भुयारे, अपरिचीत खोल्या, पोढी, गुंफा यांच्या आत जावून मोजमापे व त्यांचा कालखंड तसेच अन्वयार्थ लावलेला दिसून येत नाही. कातळकडयांस असलेल्या मेटे, पहारे, चौक्या व परिघातील सैनिकी स्थळे व त्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था आजपर्यंत प्रकाशीत नाहीत. किल्ल्यांवरील पाण्याच्या टाक्यांची संख्या, त्यांची खोली, पाण्याच्या साठयाची क्षमता व कडक उन्हाळयातही दुष्काळ निवारण करण्याची असलेली योजना यांचा अभ्यास आजपर्यंत झालेला आढळत नाही. परिघातील समाधी, कबर, पिराची ठाणी, ऐतिहासिक शिल्पे, मंदिरे, गावांतील परंपरा, किल्ल्याच्या पायथ्यांच्या जत्रा यांची दखल संशोधकांनी घेतलेली दिसून येत नाही. किल्ले पायथ्यास राहणाऱ्या लोकांची आडनावे, आडनावांचा इतिहास, ग्रामस्थांच्या मुलाखती, ग्रामस्थांच्या घरांतील ऐतिहासिक वस्तू तसेच किल्ल्याच्या पायथ्याच्या वाडया व वस्त्यांमधील तोफा व त्यांचे बारकावे तसेच संख्या आणि तोफांचा कालखंड याबद्दल आजवर संशोधन झालेले नाही. या गोष्टींची इतिहासनिष्ठ चिकित्सा करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

- उपलब्ध संदर्भ साधनांचा आढावा ः

मावळ तालुक्यातील किल्ल्यांच्या संशोधन कार्यात अनेकविध संदर्भ साधनांचा अभ्यास करणे अभिप्रेत होते. किल्ल्यांच्या इतिहासाचा अभ्यास व सर्वेक्षणात अनेक प्राथमिक व दुय्यम साधने तपासली आहेत. कोणत्याही संशोधनासाठी ज्यांचा अन्वयार्थ लावायचा ती संदर्भ साधने आवश्यक असतात. मावळ तालुक्यातील किल्ल्यांसंबंधी प्राथमिक म्हणजेच समकालीन व प्रत्यक्षदर्शी साधने अनेक वापरली आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी कौटिल्यीय अर्थशास्त्र, आज्ञापत्र यांसारखी समकालीन व प्रत्यक्षदर्शी साधने वापरली असून आजवर उजेडात न

आलेल्या भौतिक स्वरूपाच्या प्राथमिक साधनांचे संशोधन करून त्यांचा अन्वयार्थ लावला आहे. उदाहरणार्थ लोहगड किल्ल्याच्या उत्तर बाजुच्या कातळयात पहाऱ्यासाठी निर्माण केलेल्या गुंफा, लोहगड किल्ल्याच्या कातळयात कोरलेल्या पोढी व त्याच्या आतमधील खोल्या. विसापूर किल्ल्याच्या कातळयातील गुंफा, तिकोणा किल्ल्यावरील तळजाई लेणीचा प्रदक्षिणा मार्ग, तुंग किल्ल्यावरील दक्षिण कातळकडयातील अनेक गुंफा व 147 फुट लांबीचे भुयार, किल्ल्यांच्या परिघातील अनेक वस्तू व वास्तू याखेरीज अनेक प्रकाशित प्राथमिक साधनांचा विषयाच्या संदर्भात अभ्यास करून अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला असून प्राथमिक साधनांच्या आधाराने लिहिलेल्या अनेक दुय्यम परंतु मौल्यवान अशा संशोधनांचाही वापर केला आहे. यात किल्ले, शिलालेख, लेणी, पाण्याच्या टाक्या, मध्ययुगीन तोफा व वस्तू, मंदिरे, परिघातील गावे व वाडया वस्त्या, स्थानिकांच्या मुलाखती, पुस्तके, दुर्मीळ मध्ययुगीन ग्रंथ, परिघातील वसाहतींमधील उपलब्ध वस्तू यांचा वापर केला आहे.

प्राथमिक व दुय्यम दोन्ही साधने इतिहास लेखनासाठी संदर्भ म्हणुन वापरलेली असून दोहोंतून सत्य व महत्वपुर्ण इतिहासाचे आकलन करून घेवून घडलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावलेला आहे. प्राचीन कालखंडातील प्राथमिक साधनांवरून सुमारे 2000 ते 2200 वर्षे मावळ तालुक्याचा इतिहास समोर आला असून प्राचीन प्राथमीक साधनांत लेणी, स्तुप, चैत्यगृह, किल्ले, शिलालेख, पोढी, परीघातील वाडया वस्त्या, परीघातील गावांतील जत्रा व त्यांच्या परंपरा तसेच श्रध्दा, मुलाखती, मध्ययुगात लिहील्या गेलेल्या बखरी व किल्ल्यांच्या परीघातील तोफा, तोफगोळे तत्सम वस्तू यांचा समावेश होतो. दुय्यम साधनांत इतिहासकार लिखीत अनेक पुस्तकांचा समावेश आहे. इतिहासकारांकडून प्राचीन संस्कृती व इतिहास याबद्दल बहुतांशी लेखन झालेले असून मावळ तालुक्यातील कार्ले, भाजे, बेडसे, घोरावडेश्वर यांसारख्या अनेक लेणींवर विस्तृत लेखन व विवेचन झालेले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रबंधात लेणींबद्दल इतिहास किंवा त्यांची वैशिष्ट्ये यांबद्दल सविस्तर उहापोह केलेला नाही. प्राचीन साहित्याच्या वर्गीकरणाप्रमाणे मध्ययुगातही प्राथमिक व दुय्यम साहित्याचे वर्गीकरण केले असून त्याद्वारे मध्ययुगीन इतिहासाचे आकलन करून घटनांचा अन्वयार्थ लावलेला आहे. मध्ययुगातील प्राथमिक साहित्यात रामचंद्रपंत अमात्य लिखीत आज्ञापत्र हा ग्रंथ असून शिवकालीन पत्रसंग्रहांचा समावेश होतो तसेच महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, मराठी विश्वकोष, किल्ले, प्रकाशित पुस्तके, छायाचित्र फिती, इतिहासकारांची प्रकाशीत पुस्तके, नियतकालीके संशोधनपर लेख, किल्ल्यांच्या संबंधी प्रकाशित असलेले दिवाळी अंक, भारत

इतिहास संशोधन मंडळात प्रकाशित असलेली त्रैमासिकातील लेख परीघातील वस्तू, तोफा व किल्ल्यांवरील वस्तू, बखरी, चरित्र, प्राथमिक साहित्यावरून लेखन केलेली पुस्तके, मुलाखती, संग्रहालये यांचा समावेश केला आहे .

प्रस्तुत प्रबंधाचे लेखन प्राथमिक व दुय्यम साहित्याची योग्य चिकीत्सा करून केलेले आहे . ऐतिहासीक घटना घडण्यामागची पार्श्वभूमी, प्रत्यक्ष घडलेली घटना, घटना घडल्यानंतर घटनेचे सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय झालेले परिणाम इत्यादी परीक्षण केलेले असून घटना घडतांनाची ऐतिहासिक व भौगोलीक परिस्थिती काय होती तसेच घटना घडल्यावर मध्ययुगीन समाज व व्यक्तिजिवनावर काय परिणाम घडले या बाबींचा सविस्तर उहापोह प्रस्तुत प्रबंधात केलेला आहे .

- संशोधनाच्या परिकल्पना ः

प्रस्तुत संशोधनात पुढील परिकल्पनांची यथार्थता पडताळली जात आहे .

○ मावळ तालुक्यातील किल्ल्यांना मध्ययुगापूर्वीची म्हणजेच प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे .

○ मावळ तालुक्यातील किल्ल्यांना सामरिक महत्व होतेच, पण त्याचबरोबर ते तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनाच्या माहितीची साधने म्हणूनही महत्वाचे ठरले आहेत .

○ प्राचीन व मध्ययुगातील ज्ञानाच्या देवाण घेवाणीचे पुरावे आपण मावळ तालुक्यातील किल्ल्यांमधील सातत्य व रचनात्मक बदलातून तपासू शकतो .

○ परकीय तत्कालीन आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल स्थानिक राजसत्ता अनभिज्ञ नव्हत्या तसेच स्थानिक राजवटींना मिळणाऱ्या महसुलातून राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेची घडी योग्य बसलेली दिसून येते .

○ प्राचीन व मध्ययुगातील व्यापारी देवाण घेवाणीचे पुरावे आपण मावळ तालुक्यातील किल्ल्यांमधील सातत्य व बदलातून तपासू शकतो .

○ वासाहतिक राज्यकर्त्यांनी केलेल्या भारतीय समाजाच्या स्थितिशील चित्रणाला मावळ तालुक्यातील किल्ल्यांच्या अभ्यासाने छेद देता येतो .

- संशोधनाचे पद्धतिशास्त्र ः

ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर ज्यामध्ये विषयाची निवड, प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा अभ्यास, साधनांची चिकीत्सा करून वर्गीकरण व परिशीलन करून शेवटी घटनांचा अन्वयार्थ काढून तद्नंतर निष्कर्ष काढणे व उपलब्ध सिध्दांतांशी निष्कर्ष पडताळणे अशा पद्धतीने संशोधन प्रक्रिया पूर्ण केलेली आहे .

- प्रकरणांची रचना ः

पहिल्या प्रकरणात प्रस्तावना लिहीलेली असून दुसऱ्या प्रकरणात मावळ तालुक्यातील किल्ल्यांचा इतिहास, निर्मिती व रचना यांसंबंधी माहिती लिहीलेली आहे . तिसऱ्या प्रकरणात लोहगड किल्ल्याचा तिन्ही कालखंडांचा समग्र इतिहास लिहीला असून चौथ्या प्रकरणात विसापूर किल्ल्याचा तिन्ही कालखंडांचा इतिहास लिहीलेला आहे . पाचव्या प्रकरणात तुंग किल्ला, तिकोणा किल्ला या किल्ल्यांच्या तिन्ही कालखंडांचा व इंदोरी किल्ल्याच्या मध्य व अर्वाचीन युगातील कालखंडांचा अभ्यास करून लेखन केलेले आहे . प्रबंधाच्या शेवटी सारांश व निष्कर्ष मांडलेले आहेत .

# प्रकरण दुसरे

## मावळ तालुक्यातील किल्ल्यांचा समग्र इतिहास, निर्मिती व रचना ः

मावळ तालुक्यातील इंदोरी किल्ला वगळता इतर किल्ल्यांचा इतिहास प्राचीन कालखंडापासून सुरू झालेला निदर्शनास येते. किल्ल्यांच्या निर्मितीची कारणे अनेकविध असून त्यांची संरक्षण व आक्रमण करण्यासाठीची रचना अनेक टप्प्यांमध्ये विकसित झाल्याचे दिसून येते. मानवी वसाहतींच्या समृध्दीबरोबर हिंस्त्र पशूंच्या उपद्रवापेक्षा शेजारील शत्रुसंकटाच्या परिहाराची अधिकाधिक आवश्यकता वाढत गेली त्यातुन परिहारार्थ केलेल्या प्रयत्नात नैसर्गिक आणि मानवी शक्तीची वाढ करणे गरजेचे ठरले. शत्रूसैन्याच्या माऱ्यातील विविधता जशी वाढत गेली तशी त्या विविध प्रकारच्या संहारक शक्तीला तोंड देण्याची खबरदारी किल्ल्यांद्वारे घेण्यात आलेली आढळते. दरम्यानच्या कालखंडात संरक्षणार्थ अनेक किल्ले बांधल्या गेले व अनेक टप्प्यांत त्यात अधिक दुर्गमता आणण्यासाठी रचनात्मक बदल केले गेले. यातुन सध्या दिसणाऱ्या किल्ल्यांची रचना मध्ययुगात प्रगतीशिल झालेली दिसून येते.

राज्याच्या रक्षणासाठी किल्ले आवश्यक होते. किल्ल्यांशिवाय राज्याचे रक्षण होणे अशक्य असल्याचे मध्ययुगात स्थानिक राजवटींच्या नजरेत आले. राज्याचे संरक्षण स्थानिक मांडलीक जहागीरदारांवर सोपविले जात असल्याने जहागीरदारांचे लक्ष आपापली जहागीर टिकविण्याकडे जास्त असे. त्यामुळे ते परिस्थितीनुरूप आपली राजसत्ता खांदेपालट करण्यात कचरत नसल्याचे दिसून येते. या कारणामुळे किल्ल्यांचे महत्व वाढीस लागलेले निदर्शनास येते. काही किल्ल्यांच्या आत शहरे वसविण्याची पद्धत मध्ययुगात दिसून येते तसेच शहरांभोवती किल्ला तयार करवून शहराचे रक्षण केले गेलेलेही दिसून येते. उदाहरणार्थ ः दौलताबाद किल्ला. गावकूस म्हणजेच गावाभोवती दगडी कोट घालण्याची पद्धत ही किल्ल्यांचीच नकल केलेली असल्याचे आढळून येते. गावकूस किंवा शहराभोवती किल्ल्याची तटबंदी उभारण्यामागे मुख्यतः स्थानिक संपत्ती व लोकांच्या संरक्षणाचे साधन इतकाच विचार असल्याचे दिसते. राज्याच्या सीमेवरील संरक्षक फळी किंवा तटबंदी म्हणून त्यांच्या बांधकामाची योजना केलेली नव्हती.[1]

---

[1] वा. सी. बेंद्रे, *गड कोट दुर्ग*, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशीत, **1965**, पृ. **5**.

प्राचीन कालखंडातील किल्ले व त्यांची माहिती प्राचीन ग्रंथांतून मिळते. यात ऋग्वेद, मनुस्मृती, अर्थशास्त्र, वराहमिहीर लिखीत बृहत्संहिता, सोमेश्वरदेव लिखीत अभिलाषितार्थचिंतामणी म्हणजेच मानसोल्लास, महाभारत, रामायण हे ग्रंथ येतात. तसेच हडप्पा, मोहोंजोदडो, पाटलीपुत्र (बिहार) येथील किल्ल्यांचे ऊल्लेख तपासल्यावर किल्ल्यांचे प्राचीन महत्व, तत्कालीन दुर्गशास्त्र व रचना याची माहिती मिळते.

- किल्ल्यांबद्दलची लिखित साधने ः

ऋग्वेद ः ऋग्वेदाचा कालखंड अनेक इतिहासकारांनी तार्कीकरित्या लावलेला असून त्यावर एकमत झालेले नाही. ऋग्वेदात प्राचीन कालखंडातील दुर्गासंबंधी महत्वाची माहिती मिळते. ऋग्वेदामध्ये कडेकोट बंदोबस्त असलेल्या दुर्गांचे अनेक उल्लेख आढळतात.[2] चिरेबंदी कोट असलेल्या नगराचा उल्लेखही करण्यात आलेला आढळतो.[3] अशा कोट असलेल्या नगरांना पुर असे संबोधले आहे. शंबर व वेदिकांशी झालेल्या त्यांच्या संघर्षावर ऋग्वेदात अनेक ऋषींच्या ऋचा आहेत. शंबराने पर्वतावर अनेक दुर्ग बांधून हा संघर्ष केल्यावर अखेर तो मारला गेला म्हणजे त्यावेळी गिरीदुर्गांना अधिक महत्व असल्याचे दिसते. तसेच वृंगदाचे शेकडो दुर्ग नष्ट करण्यात ऋजिश्र्वान यशस्वी झाला होता.[4] लोहमय किल्ला म्हणजे बळकट, अभेदय किल्ल्याचे प्रतिक मानले गेलेले दिसून येते. लोखंडी दुर्ग व लोहमय आयुधे यांच्या उल्लेखावरून युध्दात चिलखतांचाही विपुल प्रमाणात उपयोग होत होता हे आढळते.[5] उपलब्ध उल्लेखावरून वेदकाळी युध्दतंत्राच्या दृष्टीने किल्ल्यांना बरेच महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. वेदामध्ये किल्ल्यांचे प्रकार, बांधणी यांची तपशीलवार माहिती मिळत नाही.[6]

---

[2] ऋग्वेद संहिता, **5.34.7** आणि **7.25.2**

[3] तत्रैव, **4.30.2**

[4] तत्रैव, **1.53.8**

[5] तत्रैव, **6.75.1**

[6] विनायक चित्राव□संपा.□, *ऋग्वेद*, भारतीय चरित्रकोश मंडळ पुणे, **1996**, पृ.**9 – 43**.

मनुस्मृती ः मनुस्मृतीमध्ये प्राचीन काळातील किल्ल्यांची माहिती असून तत्कालीन काळात किल्ल्यांचे शासन व माहीती आढळते. मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायात किल्ल्यांबद्दल चर्चा आलेली आहे. पुढीलप्रमाणे ः 'विषम हवमानाच्या, धार्मिक लोक आहेत, धान्य भरपुर पिकते, रोग, त्रास इत्यादींना दूर असलेला, रानटी जाती, भूलोक नम्र आहेत अशा ठिकाणी निवास करावा'[7]

मनुने सांगितलेले किल्ल्यांचे प्रकार पुढीलप्रमाणे ः

धनुदुर्ग ः आजुबाजूच्या वीस कोसांपर्यंत पाणी नसणारा दुर्ग

महिदुर्ग ः ज्याला बारा हातांपेक्षा अधिक उंचीचे, युध्दाचा प्रसंग आल्यास ज्यावरून व्यवस्थित फिरता येईल आणि झरोक्यानी युक्त असलेल्या खिडक्या(जंग्या) ठेवलेल्या आहेत, अशा तटांनी युक्त असलेला दुर्ग

अब्दुर्ग ः सभोवताली भरपूर पाण्यामुळे नैसर्गिक संरक्षण मिळालेला दुर्ग

वार्क्षदुर्ग ः तटाच्या बाहेर चारीबाजूस चार कोसांपर्यंत मोठाले वृक्ष, काटेरी झाडे, कळकीची बेटे आणि वेलीच्या जाळया यांनी वेष्टिलेला दुर्ग

नृदुर्ग ः हत्ती, घोडे, रथ, पायदळ या चतुरंग सेनेने रक्षण केलेला दुर्ग

गिरीदुर्ग ः डोंगरी उंचवटयावर पुरेसा पाणीपुरवठा असणारे, झाडे व धान्य पिकविता येईल असे, परंतु जाण्यासाठी सहसा एखादीच वाट असणारे स्थान व बळकट अवघड वाट असलेला दुर्ग

या किल्ल्यांद्वारे राजाने शहर वसवावे असे मनु लिहितो. सहा दुर्गांचे गुणवैशिष्टये सांगतांना मनु लिहीतो ः "या सर्वांमध्ये प्रयत्न करून गिरीदुर्गाचा निवास पत्करावा, कारण तो विशेष गुणसंपन्न आहे.[8] यातील प्रथमच्या

---

[7] अ.रा.जोशी(संपा.), *मनुस्मृती*, गुरूदेव प्रकाशन पुणे, **1971**, पृ.**146–147**, **7.68**

[8] तत्रैव, अ.**7.70**

तीन दुर्गात हरीण, बिळात रहाणारे प्राणी, सरपटणारे प्राणी इत्यादी रहातात तर दुसऱ्या तीन दुर्गात हरीण वानेर, देव व मानव निवास करतात.''[9]

दुर्गशक्तीबाबत मनु लिहितो ः "एक दुर्गवासी धनुर्धर शंभर शत्रुशी लढू शकतो व शंभर धनुर्धर दहा हजार सैनिकांशी लढा देऊ शकतात म्हणूनच मनु राजांना किल्ला बांधण्याच उपदेश करतात"[10]

किल्ला समृध्द कसा राखावा याबद्दल मनू सांगतो ः "त्या किल्ल्यात सर्व शस्त्रास्त्रे, धन, धान्य, वाहने, कारागीर व त्यांची साधने, गवत, पाणी इत्यादी असावे. असा दुर्ग स्त्रीगृह, देवघर, शस्त्रास्त्रखाना, अग्निशाळा, गुप्त संरक्षण, निर्मळ पाणी, वृक्षांनी युक्त असावा"[11]

अर्थशास्त्र ः अर्थशास्त्र हा ग्रंथ कोणत्याही आर्थिक बाबीशी निगडीत नसून राजनीति, राजधर्म यांच्याशी तो निगडित आहे. कौटील्य याने लिहिलेला हा ग्रंथ असून कौटिल्याला चाणक्य व विष्णुगुप्त असेही संबोधले जाते. अर्थशास्त्र या ग्रंथात अनेकविध विषयांचा उहापोह केलेला आढळतो. हा ग्रंथ **2200** ते **2300** वर्षापूर्वी लिहिला गेला असल्याने तत्कालीन किल्ले व त्यांचे प्रशासन याबद्दल महत्वाची माहिती यात मिळते.

दुर्गरचनेबद्दल कौटील्याचे मत ः "राजाने आपल्या राज्याच्या सिमेवर चारी दिशांना नैसर्गिक भूरचनेचा फायदा घेऊन युध्दाला उपयोगी पडतील अशा किल्ल्यांची रचना केली पाहिजे. किल्ल्यांचे आठ प्रकार आहेत. **1** □जलवेष्टित, **2** □खंदकाने वेष्टिलेले, **3** □डोंगरामधील दगडात रचलेले किंवा **4** □खोदलेले, **5** □निर्जल व **6** □निर्वृक्ष अशा दलदलीने भरलेल्या ओसाड प्रदेशात वसविलेले किंवा सात कुसळाचे गवताने वेढलेले, काटेरी झाडांनी घेरलेले असे हे आठ प्रकार आहेत. यापैकी जलदुर्ग व पर्वतदुर्ग यामुळे देशाचे रक्षण होते. धान्वन म्हणजेच ओसाड प्रदेशांतील व अरण्यातील किल्ल्यांमुळे अरण्याचे व त्या ओसाड प्रदेशाचे रक्षण होते किंवा संकट आले असता अशा वनातील दुर्गात आश्रय घेता येतो."

---

[9] तत्रैव, अ.**7**.**71**

[10] तत्रैव, अ.**7**.**73**

[11] तत्रैव, अ.**7**.**74–75**

राजधानीसाठी जे नगरदुर्ग बांधावे लागतात त्याच्या वास्तुयोजनेबाबत कौटिल्य लिहितो ः "आपल्या देशाच्या मध्यभागी व्यापार वगैरेची देवघेव असलेले शहर वसवले पाहिजे असे ठाणे वस्ती करण्यास योग्य असलेल्या प्रदेशात दोन नदयांच्या संगमावर किंवा कधीच कोरडे न पडणाऱ्या सरोवराच्या किंवा तलावाच्या ठिकाणी वसवावे. तेथील जागेच्या सोयीप्रमाणे हे ठाणे वर्तुळाकार, लांबट किंवा चौकोणी असावे. अशा ठाण्याच्या भोवती सर्व दिशांना पाणी असावे. या ठाण्याच्या शहरामध्ये निरनिराळया मालांच्या वेगवेगळया पेठा असाव्यात आणि त्या पेठांत जमीनीवरून व पाण्यावरून येण्याचे मार्ग आसावेत. मुख्य ठाण्याच्या भोवती चार चार हाताच्या अंतरावर तीन खंदक असावेत. या खंदकांची रूंदी अनुक्रमे चवदा, बारा व दहा दंड असावी व खोली रूंदीच्या तीन चतुर्थांश किंवा अर्धी असावी. खंदकाच्या तळाची रूंदी, खंदकाच्या पाऊणपट असून तळाशी फरशी केलेली असावी. बाजू दगड अथवा पक्क्या विटा यांनी बांधून काढाव्यात. खंदकात जिवंत झऱ्याचे पाणी असावे किंवा बाहेरून पाणी सोडून तो खंदक भरून ठेवावा. त्यातील पाणी बाहेर काढुन दयायलाही एखादी वाट ठेवावी. खंदकात कमळे व मगरी असावेत.

खंदकापासून चार दंडांच्या अंतरावर आतमध्ये सहा दंड उंच व बारा दंड रूंद असा तट बांधावा. हा तट खाली रूंद व वर निमुळता होत गेलेला किंवा खालीवर सारख्याच रूंदीचा किंवा खाली व वर निमुळता व मध्ये फुगीर अशा प्रकारचा असावा. या तटाच्या भिंतीमध्ये मातीची भर घालून ती हत्ती आणि बैल यांच्याकडून तुडवुन घ्यावी, आणि मग त्या तटावर काटेरी झाडे व विषारी वेली लावाव्यात. नवीन माती आणुन तटाला असलेली छिद्रे भरून काढावीत.

तटाच्या वर तटाच्या रूंदीच्या दुप्पट उंचीचे असे विटांचे बुरूज दर बारा हातांवर एक किंवा चोवीस हातांवर दोन असे करावेत. किल्ल्याच्या तटावर रथ चालविता येईल अशी वाट असावी आणि या वाटेच्या कडेला ताल वृक्षाच्या मूळाप्रमाणे किंवा मृदुंगाप्रमाणे किंवा माकडाच्या डोकयाच्या आकाराप्रमाणे दगडांचे कठडे असावेत. या कठडयांसाठी लाकडांचा उपयोग करू नये. कारण लाकडाला अग्नीचे भय असते. तीस दंड अंतरावर तटाची जितकी रूंदी असेल तितक्याच उंचीचा चबुतरा करावा व त्यावर चढायला व उतरायला जिना असावा. तटावरील दोन चबुतऱ्यांच्या मध्ये तटाच्या रूंदीच्या दीडपट लांबीची व दुमजली देवडी बांधावी. बुरूजांच्या व वाडयांच्या मध्यंतरी तीन धनुर्धारी बसतील एवढी पुढे काढलेली खिडकी असावी. त्या खिडकीच्या झडपांना भोके

असून ती वाटेल तेव्हा उघडता किंवा झाकता यावी. तटावरून मध्ये मध्ये दोन हात गुप्त रस्ते तटाच्या अनुरोधाने किंवा तटाच्या कडेपासून आठ हात आतल्याबाजूला असावेत.दोन दंड किंवा चार दंड अंतरावर तटावर चढायला व उतरायला आतील बाजूने जिने बांधावेत त्यात अवघड जागी बाहेर निघून जाण्यासाठी काढता घालता पूल असावा व त्या पुलाचा चोर दरवाजा वाटेजवळ असावा.

तटाच्या बाहेरच्या बाजूस निघुन जाण्यासाठी आतुन गुप्त वाट बांधुन घ्यावी. या गुप्त वाटेमध्ये जानुभज्जिनी म्हणजे हात मोडणारे शुळ, प्रकर, कल्पकूट, वगैरे घातक शस्त्रे, काटे, सापांच्या हाडांचे सांगाडे, तालपत्र, शृंगाष्टक, कुत्रयाचे दात वगैरे असलेले अर्गल वगैरे हत्यारे वांकडी तिकडी ठेवलेली असावीत, या वाटेच्या जवळच रोगट पाण्याची डबकी असावीत आणि ही वाट झाकलेली असावी. या वाटेच्या दाराला दोन्ही बाजूंनी कमानी करून सहा हात रूंदीचा दरवाजा सहा रस्त्यांना एक असा करावा किंवा दरवाज्यामधील अंतर वीस हातांपासून बत्तीस हातांपर्यंत असावे व दरवाजाची उंची आठ हात असावी किंवा रूंदीपेक्षा **1/6** किंवा **1/8** अधिक असावी.

किल्ल्याच्या तटाच्या आत एक वाडा असावा. या वाडयाचे खांब पंधरा हातांपासून अठरा हातांपर्यंत उंच असावेत. त्या खांबांचा परिघ तळाशी उंचीच्या **1/6** असावा व टोकांशी **1/4** असावा व खांबांचा **1/3** भाग जमिनीमध्ये पुरला जावा.

वाडयाचे जेवढे क्षेत्र असेल त्याचे पाच भाग करावेत. त्यात मध्ये विहीर बांधावी, तिच्या दोन्ही बाजूस दीर्घ चौरसाकार असे दोन सोपे बांधावेत आणि त्या दोन्ही सोप्यांच्या दोनही टोकांस एकेक कोठडी बांधावी. प्रत्येक सोप्याच्या बाहेरच्या बाजूस घुमट युक्त असे दोन दोन उंच ओटे बांधावेत. त्या ओटयांच्या दरम्यान जाण्यायेण्याला लहानसा दरवाजा ठेवावा. वरच्या बाजूला दुमजला करावा. त्याची ऊंची तळमजल्याच्या अर्ध्याने असावी व त्याचे खांब फार जाड असू नयेत. तिसऱ्या मजल्याचा विस्तार तळमजल्याच्या क्षेत्रफळाच्या एक द्वितीयांश किंवा एक तृतीयांश एवढा असावा. त्याच्या भिंती विटांच्या असाव्यात. दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर चढण्याकरिता डाव्याबाजूच्या कोपऱ्यात वाटोळा जिना असावा. इतर बाजूंना भिंतीतून काढलेले गुप्त जिने असावेत.

वेशीच्या दरवाज्याच्या वरचे आडवे लाकुड दोन हात जाडीचे असावे. दरवाज्याच्या बाजूचे उभे स्तंभ 3/5 हात जाडीचे असावेत. दरवाजा बंद करण्यासाठी दोन अडसर असावेत. दरवाज्याचे कुसु मुंढा हात लांबीचे असावे. दरवाज्याच्या मधली दांडी पाच हात उंचीची असावी आणि हत्तीला शिरण्याला प्रतिबंध करणारे असे चार अडसर असावेत.

गोपुराजवळ दरवाज्याच्या अर्ध्या रूंदी इतका आणि दरवाज्याच्या उंची इतका मातीचा बुरूज असावा. किल्ल्याच्या सभोवती फेरी घालण्याची वाट मोडता न येण्यासारखी पक्की असावी. जेथे किल्ल्याभोवती पाणी नसेल तेथे ती वाट भुईतून असावी.

तटाला शोभेल असा मुख्य वेशीचा दरवाजा करून त्याशिवाय त्या दरवाज्याच्या 1/3 एवढे सुसरीच्या तोंडासारखे द्वार ठेवलेले असे गोपुर बांधावे. तटाच्या आत बावडी बांधावी व तीत उतरण्याला पुष्करिणी द्वार ठेवावे. वेशीच्या दिंडीच्या दीडपट आकाराचे दरवाजे असलेले आणि चार सोपे असलेले असे कुमारीपूर बांधावे ते दुमजली असावे. त्याचा दरवाजा कमानीच्या आकाराचा असावा व त्याला शिखर किंवा गोपूर असू नये.

जागेचा विस्तार आणि हत्यारे वगैरे सामानाची अनुकुलता असेल त्या बेताने किल्ल्यात लागणारे सामान व शस्त्रे इत्यादी ठेवण्याकरिता गुप्त तळघरे करावीत. ती उंचीच्या मानाने 1/3 अधिक लांबी रूंदीची असावी. त्या तळघरांत गोटे, कुदळी, कुऱ्हाडी, बाण, गजादिकांचे शृंगार, गदा, मुद्गर, दंड, चक्रे, यंत्रे, शेकडो लोकांचा एकदम घात करणारी शतघ्नी नावाची यंत्रे, लोहारांनी बनविलेली किरकोळ हत्यारे, त्रिशूळ, भाले, उंटाच्या मानेसारख्या वाकडया बांबूच्या काठया, आगीचे बाण किंवा कुप्याध्यक्ष प्रकरणात सांगितलेले अनेक पदार्थ यांचा संग्रह करावा"[12]

फक्त कोटांच्या बांधकामाची माहिती न देता कौटील्याने किल्ल्याच्या आतील तत्कालीन रूढ शिल्पाची माहितीही दिली आहे ती पुढीलप्रमाणे ः "तट तयार करून किल्ला बांधल्यानंतर आत जी जागा आहे त्यात पूर्व □ पश्चिम असे तीन आणि दक्षिणोत्तर तीन असे एकूण सहा रस्ते आखून नगराचे एकूण सहा भाग पाडावेत. या नगराला बारा दरवाजे असावेत. त्यातील काही दरवाजांजवळ जमीनीवरून जाता यावे व काहींजवळ पाण्यातून व

---

[12] ह.अ.भावे, *कौटिलीय अर्थशास्त्र*, वरदा प्रकाशन प्रा.लि.पुणे, 2012, (कौ.अ.,अ.2,अ.24)

काहींजवळ भुयारातून जाता येईल असे ते दरवाजे बांधावेत. गावातील सामान्य रस्ते चार दंड रूंदीचे असावेत. त्याचप्रमाणे मुख्य राजमार्ग, द्रोणमुख, ठाणे, जनपद, गायराने, उतारपेठा, छावणी व स्मशान यांच्याकडे जे रस्ते जातील ते आठ दंड रूंदीचे असावेत. त्याचप्रमाणे धरणाकडे किंवा वनात जाणारे रस्ते चार दंड रूंदीचे असावेत. हत्तीच्या रानात जाणारा रस्ता दोन दंड रूंदीचा असावा. गाडीचा रस्ता पांच अरत्नी म्हणजे पाच मुंढा हात असावा, गुरांचा रस्ता चार अरत्नी व शेळया मेंढया जाण्याचा रस्ता दोन अरत्नी असावा.

शहराच्या मध्यापासून उत्तर दिशेला नवव्या भागामध्ये बळकट जागी राजवाडा बांधावा. त्याच्या आसपास चारही वर्णाची वस्ती असावी. राजवाडा उत्तराभिमुख किंवा पुर्वाभिमुख असावा व राजवाडयाची रचना निशान्तप्रणिधी या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे असावी. राजवाडयाच्या ईशान्येला आचार्य, पुरोहीत यांची राहण्याची जागा व यज्ञ करण्याची जागा व जलागार व मंत्रयाच्या राहाण्याची जागा असावी.

राजवाडयाच्या आग्नेय दिशेला पाकशाला, हस्तीशाळा व कोठी असावी. पुर्व बाजुला गंध, माला, धान्य, रस यांचे व्यापारी, प्रमुख कारागीर व क्षत्रिय यांची वस्ती ठेवावी. राजवाडयाच्या दक्षिणेला खजिना, सराफकट्टा व इतर कारखाने असावेत. नैऋत्य भागात वनातुन मिळणाऱ्या वस्तू व शस्त्रास्त्रे यांचे कोठार असावे. वाडयाच्या दक्षिण दिशेला नगराध्यक्ष, धान्याध्यक्ष, व्यापाराध्यक्ष व कारखाण्यांचा अध्यक्ष व सेनाध्यक्ष यांची निवासस्थाने असावीत. तसेच पक्वान्ने, मदय व मांस विकणारे, वैश्या, नट व व्यापारी यांचीही निवासस्थाने तेथेच असावीत.

वाडयात नैऋत्येला गाढवे व उंट यांचे गोठे व त्यांनी काम करण्याची जागा असावी. वायव्य भागामध्ये रथ वगैरे वाहने ठेवण्याची जागा असावी. त्याच्या पलीकडे पश्चिमेला लोकरीची व कापसाची वस्त्रे बनवणारे, बुरूड, चामडे कमावणारे, चिलखते, शस्त्रे, म्याने वगैरेंचे कारागीर आणि शूद्र यांची निवासस्थाने असावीत. नैऋत्य दिशेला दुकान व औषधे तयार करण्याची शाला असावी. ईशान्य भागात कोठार, गोशाला व पागा म्हणजे अश्वशाला असावी. त्याच्या पलीकडे देवालये, लोहार, जवाहिरे आणि ब्राम्हण यांचे निवासस्थान असावे. मध्यंतरी जेथे जागा सापडेल तेथे स्थानिक व्यापारी व परदेशी व्यापारी यांचे जे संघ आहेत त्यांची जागा असावी.

शहराच्या मध्यभागी अपराजिता (लक्ष्मी), अप्रतिहत (विष्णु), जयंत (कार्तिकस्वामी), वैजयंत (इंद्र), शिव, कुबेर, अश्विनीकुमार, मदिरा (चामुंडा) वगैरे देवतांची देवळे, देवालये बांधुन घ्यावीत. या देवालयातून वास्तुदेवतांना त्यांच्या योग्य जागी स्थान दयावे. देवालयाच्या दरवाज्यावर ब्रम्हा, इंद्र, यम व कार्तिकस्वामी यांची

स्थापना करावी. किल्ल्याभोवती जो खंदक आहे त्याच्या बाहेर चारशे हातांच्या पलीकडे चैत्य वृक्षाचे पार, मठ, तीर्थे, सेतु वगैरे बांधुन घ्यावेत. दाही दिशांना त्या त्या दिशेच्या स्वामी असलेल्या देवतांची स्थापना करावी. गावाच्या पुर्वेला व उत्तरेला स्मशान असावे. दक्षिण दिशेला श्रेष्ठ वर्णाच्या लोकांचे स्मशान असावे. हया स्मशानाचा कोणी अतिकम केल्यास अडीचशे 'पण' दंड करावा. पाखंडी व चांडाल यांची वस्ती स्मशानापलीकडे असावी. कामाच्या गरजेप्रमाणे किंवा जागेच्या सोयीप्रमाणे त्यांच्या कुटुंबांना जागा आखून दयावी. व त्यात त्यांनी फुलबाग, फळबाग, राई व मळे करावेत किंवा धान्य व किराणा यांची कोठारे बनवावीत. सर्वत्र दहा दहा घरांच्या समूहाला एक विहीर असावी.

राजाने नेहमी आपल्या कोठारामध्ये तेल, तूप, धान्य, सैंधव, मीठ, औषधे, वाळविलेल्या भाज्या, सातू, वाळविलेले मांस, गवत, लाकडे, धातु, कांतडी, कोळसा, तात, विषे, शिंगे, वेळू, वल्कलांला लागणाऱ्या साली, इमारती लाकडे, हल्ला करावयाची व संरक्षक हत्यारे व शस्त्रे, गोटे यांचा अनेक वर्षे पुरेल इतका साठा करून ठेवला पाहीजे. जेव्हा नवीन संग्रह हाती येईल तेव्हा जुना संग्रह काढून टाकावा म्हणजे अडगळ होणार नाही.

किल्ल्यामध्ये हत्ती, घोडे, रथ व पायदळ यांच्यावर निरनिराळे अधिकारी नेमून त्यांची किल्ल्यात स्थापना करावी. अनेक अधिकारी नेमले म्हणजे एकमेकांच्या भयाने शत्रूला फितूर होत नाहीत. त्याचप्रमाणे सिमेवरील जे किल्ले आहेत त्यांची व्यवस्था ठेवावी. किल्ल्यामध्ये शहर व राज्य यांचे घात करणारे मठ किंवा विहार हे स्थापन करण्याची परवानगी देऊ नयेत. अशा मठांना किंवा विहारांना जनपदात जागा नेमुन द्यावी व त्या सर्वांना योग्य तो कर दयायला लावावे"[13]

किल्ला किंवा पैसा यात कशास महत्व व पैशांची सुरक्षा करण्याच्या संबंधी कौटील्य लिहितो ः "किल्ल्यामध्ये कोष व सैन्य सुरक्षीत राहील. किल्ल्यामधून गुपचुप लढाई चालवता येईल. आपल्या बाजूकडील राजावर दाब ठेवता येईल. सैन्याचा बंदोबस्त करता येईल. मित्राला मदत करता येईल आणि शत्रूचा किंवा रानातील

[13] तत्रैव, (कौ. अ.,अधि. 2,अ. 25)

बंडखोरांचा समाचार घेता येईल. किल्ला नसला तर कोष शत्रूचाच झाला असे समजावे. ज्याला किल्ल्याचे पाठबळ आहे त्यांचा नाश होत नाही हे आपल्याला दिसून येते"[14]

डोंगरी किल्ल्यांबद्दल कौटील्याचे मत गिरीदुर्गाचे महत्व अधोरेखीत करते. "भुईकोट किल्ल्यापेक्षा पाणकोट किल्ला चांगला व पाणकोट किल्ल्यापेक्षा डोंगरी किल्ला चांगला"[15]

सारांश कौटिलीय अर्थशास्त्र या प्राचीन कालखंडातील ग्रंथातून किल्ल्यांबाबत महत्वाची माहिती उपलब्ध होत असून प्राचीन कालखंडात ज्याप्रमाणे गिरीदुर्ग श्रेष्ठ असे गणले त्याचप्रकारे मध्ययुग व अर्वाचीन युगाच्या सुरूवातीपर्यंत गिरीदुर्गाचे महत्व अबाधित राहिल्याचे निदर्शनास येत आहे.

'अभिलषितार्थचिंतामणी' अर्थात 'मानसोल्लास' हा ग्रंथ कल्याणीच्या चालुक्य वंशातील सहाव्या विक्रमदित्याचा पुत्र सत्याश्रयकुलतिलकं भुलोकमल्ल तिसरा सोमेश्वर याने इसवी सन **1129** मध्ये लिहीला त्यात किल्ल्यांचे नऊ प्रकार सांगितलेले आहेत ते पुढीलप्रमाणे ः

**1**. निसर्गसिध्द जलाने वेष्टित तो जलदुर्ग

**2**. दुर्घट चढाच्या व पाण्याच्या सोईने समृध्द अशा शिखरावरील गिरीदुर्ग

**3**. पाषाणात भक्कम बांधून काढलेला तो अश्मदुर्ग

**4**. विटांचुन्याने बांधलेला व खंदकाने वेष्टित तो इष्टिकादुर्ग

**5**. चिखलमातीतच बांधून काढलेला तो मृत्तीकादुर्ग

**6**. दाट काटेरी झाडांच्या कुंपणाने संरक्षित तो वार्क्ष्य किंवा वनदुर्ग

**7**. ओसाड व जलहीन प्रदेशात मध्येच पाण्याच्या आश्रयाने बांधलेला तो मरूदुर्ग

**8**. वेळू किंवा लाकडाचा कूड किंवा भिंती यांचा सभोवार तट असलेला तो दारुदुर्ग

---

[14] तत्रैव, (कौ.अ., अधि.**8**,अ.**117**)

[15] तत्रैव, (कौ.अ., अधि.**7**,अ.**110**)

9. शस्त्रांस्त्रासहित शूर योध्यांनी रक्षण केला जात आहे तो नृ किंवा नरदुर्ग होय[16]

यांतील गिरीदुर्ग व जलदुर्ग उत्तम, दारुदुर्ग व नरदुर्ग कनिष्ठ व इतर मध्यम असे मानले जात. सारांश गडकोटांच्या मुळांतील चार प्रकारानंतरच्या बाराव्या शतकापर्यंतच्या काळात गडकोटांचे नऊ प्रकार प्रसिध्दीस आले होते. या सर्व प्रकारांचा एकत्रित उल्लेख पुढीलप्रमाणे ः

वेद ः 1. जल 2. गिरी 3. वाळवंट 4. जंगल

मनुस्मृती ः 1. धन्वन 2. गिरी 3. आप 4. वार्क्ष 5. मही 6. नर

समरंगण सूत्रधारा ः 1. आप 2. पर्वत 3. ऐरिन 4. वन 5. मही 6. नर

मानसार ः 1. गिरी 2. वन 3. जल 4. पंक 5. रथ 6. दैव 7. मित्र

मयमत ः 1. गिरी 2. वन 3. मित्र 4. दैव 5. पंक 6. जल 7. इरिन

कौटिल्य ः 1. ओदक ः अ.अंतर्द्विप व आ.स्थल 2. पर्वत ः अ.प्रांतर व आ.गुहा 3. धन्वन ः अ.निरूदकस्तंब व आ.इरिन 4. वन ः अ.खज्जनोदक व आ.स्तंबगहन

शिल्पशास्त्रः 1. पर्वत 2. वन्य 3. उदक 4. ऐरिण 5. दैविक 6. धन्वन 7. कृतक.कृत्रीम

कामांदकी ः 1. ओदक 2. पर्वत 3. वार्क्ष्य 4. ऐरिण 5. धन्वन

शुक्रनीतीः 1. एरिण 2. पारका.खंदक 3. परिघ. कुंपण 4. वन 5. धन्वन 6. जल 7. गिरी 8. साहाय्य

अभिलाषितार्थचिंतामणि ः 1. जल 2. गिरी 3. पाषाण 4. इष्टिका 5. मृद्दुर्ग.माती 6. वन 7. मरू. निर्जनप्रदेश 8. दारू निर्मीत 9. णर

महाभारत ः 1. धन्वदुर्ग 2. महीदुर्ग 3. गिरीदुर्ग 4. मनुष्यदुर्ग 5. मृद्दुर्ग 6. वनदुर्ग [17]

---

16 सतिश अक्कलकोट, *दुर्ग*, सहयाद्री दुर्गभ्रमण मंडळ प्रकाशन, 2009, पृ.35.

महाभारत ः महाभारत हा प्राचीन कालखंडातील महत्वपुर्ण ग्रंथ असून या ग्रंथात किल्ला व त्यासंबंधीच्या नोंदी आलेल्या आढळतात त्या पुढीलप्रमाणे ः

श्रीकृष्णाने द्वारका नगरीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले असून त्यातुन किल्ल्यांचे महत्व अधोरेखीत होतांना दिसून येते. "दुर्गाच्या मदतीने येथील बायकासुध्दा लढू शकतील, मग आमचे महारथी लढतील यात नवल ते काय" गड किल्ल्यांचे महत्व महाभारतातील शांतीपर्वात आहे.

शुक्रनितीसारातील चौथ्या अध्यायातही अशाच प्रकारची माहिती दुर्गाचे महत्व अधोरेखीत करते ः

"एकशतं योधयति दुर्गस्थोस्त्रधरो यदि ।

शतं दशसहस्त्राणि तस्माद्दुर्गे समाश्रयेत् ।।"[18]

अर्थ ः किल्ल्याच्या म्हणजे दुर्गाच्या आश्रयाने एक सहस्त्र मनुष्य शंभरांशी लढू शकतो. शंभर माणसे दहा सहस्त्रांशी लढू शकतात. यास्तव राजाने किल्ल्याचा आश्रय करावा.

भीष्मांच्या मते,"पुरूषसंचयासारखा दुसरा कोणताही कोष राजाला श्रेष्ठ नाही, आणि शास्त्रांमध्ये जे सहा दुर्ग सांगितले आहेत त्यांमध्ये नरदुर्ग हा दुर्भेदय म्हणून सांगितला आहे"

या माहितीनंतर युधीष्ठिराने प्रश्न विचारले व त्यांचे निराकरण भिष्मांनी केले आहे. या प्रश्नोत्तरातुन प्राचीन काळात किल्ल्यांचे महत्व दिसून येत आहे.

युधीष्ठिर ः पितामह! पुर्वीपासून असलेल्या नगरांत राजाने वास्तव्य करावें कीं नवें नगर वसवून त्यांत वास्तव्य करावें तें आपण मला सांगा

भीष्म ः "किल्ला कसा बांधावा याविषयी मी तुला विशेष माहिती सांगतो. सहा प्रकारचे किल्ले बांधावेत आणि नंतर त्यांच्या आश्रयानेच मोठी नगरें वसवावीत कारण मोठया शहरांत सर्व प्रकारची संपत्ती असते आणि एकूण

---

[17] वा. सी. बेंद्रे, पूर्वोक्त, पृ. 27- 28.

[18] वा. कृ. भावे, *शिवराज्य व शिवकाल*, केसरी मुद्रणालय, 1957, पृ. 199.

सर्वच गोष्टींची विपुलता असते. धन्वदुर्ग (वळवंटातील किल्ला), महीदुर्ग□भुईकोट किल्ला), गिरीदुर्ग□डोंगरी किल्ला), मनुष्यदुर्ग (चारही दिशांना हत्ती, अश्व, रथ यांचे साहाय्य असलेल्या विपुल पायदळ सैन्याने रक्षिलेला किल्ला), मृद्दुर्ग□मातीचा किल्ला□आणि वनदुर्ग (ज्याच्या सभोवती प्रचंड वृक्ष, काटेरी झुडपे व वेली आहेत असा किल्ला□असे दुर्गाचे सहा प्रकार आहेत. जे नगर हया सहा प्रकारच्या दुर्गांपैकी कोणत्या तरी एका दुर्गाच्या आश्रयाने वसलेले असते, धान्याच्या साठयाने व आयुधांच्या साठयाने युक्त असते, ज्याच्या भोवती मजबुत तटबंदी असते, ज्याच्यामध्ये असंख्य हत्ती व अश्व असतात, ज्याच्यामध्ये कर्तबगार कारागीर आहेत, सर्व प्रकारच्या उपयोगी गोष्टींचा ज्यांत उत्कृष्ट संग्रह केलेला आहे, अतिशय दक्ष असलेल्या धर्मपरायण पुरूषाचे ज्यांत वास्तव्य आहे, उत्साही पुरूषांनी आणि बलाढय हत्तींनी व चपळ अश्वांनी जे गजबजलेले आहे, अनेक चौकांनी व बाजारपेठांनी जे सुशोभित झालेले आहे, ज्यांत सर्व प्रकारचे देवघेवीचे व्यवहार अगदी सरळपणाने व उघडपणाने चाललेले आहेत, ज्यांत कुठेही गोंगाट व गोंधळ नाही असे शांत असलेले ज्यांत कसल्याही प्रकारच्या भीतीचा लेश नाही असे जे मोठे देखणे आहे, ज्यांत सुस्वर ध्वनी कानांवर पडत आहेत, ज्यांतील भवने खुप प्रशस्त आहेत, जे शुर विरांनी व धनाढय पुरूषांनी गजबजलेले आहे, वेदमंत्रांच्या घोषांनी जे दुमदुमलेले आहे, ज्यांत एकत्र जमलेल्या लोकांच्या समाजाची आणि उत्सवांची अगदी रेलचेल आहे, ज्यांत नित्य देवतांची पुजाअर्चा चालु आहे अशा नगरांत अमात्यांवर व सैन्यावर वर्चस्व असणाऱ्या राजाने स्वतः वास्तव्य करावे"

अशा प्रकारच्या गोष्टी युधीष्ठीरास सांगुन भिष्मांनी किल्ल्यात काय वस्तु असाव्यात व कसे पुरूष असावेत तसेच कोणकोणत्या गोष्टींचे जतन करावे यासंबंधी माहिती दिलेली आहे ती पुढीलप्रमाणे ः "किल्ल्यातील नगरांत राजाने द्रव्यभांडार व सैन्य यांची वृध्दी करावी, आपला मित्रपरिवार वाढवावा, सर्व व्यवहारांना उत्तेजन देवुन प्रत्यक्ष नगरांतील□राजधानीतील□आणि नगराच्या उपनगरातील सर्व प्रकारचे दोष नाहीसे करून टाकावेत, भाण्डागाराची□खजिन्याची□व शस्त्रागाराची नित्य प्रयत्नांनी वाढ करावी तसेच यंत्रागारात व शस्त्रागारांत नित्य भर टाकीत रहावे. सरपण, लोखंड, कोळसा करण्यासाठी उपयोगांत येणारी लाकडे, निरनिराळया जनावरांची शिंगे, हाडे, बांबुपासून तयार होणाऱ्या वस्तु, अनेक प्रकारची तेले, चरबी, मध, अनेक प्रकारची औषधे, ताग, राळ, धान्ये, शस्त्रे, बाण, चामडी, तात, वेत, मोळ नावाचे गवत, लव्हाळी, खुप मोठा आवाज करणारी□युध्दोपयोगी□वादये यांचा मोठा संग्रह करावा.

किल्ल्यामध्ये भरपुर पाणी असलेले डोह, विहीरी, ज्यांच्यामधुन चिक पाझरतो असे वृक्ष यांचे राजाने नित्य रक्षण केले पाहिजे. किल्ल्यात (राजधानीत) आचार्य, ऋत्विज, पुरोहित, श्रेष्ठ धनुर्धारी विर, वास्तुशास्त्रज्ञ, ज्योतीषी, वैदय, प्रज्ञावंत, बुध्दीमन्त, आत्मनिग्रही,दक्ष, शुर, बहुश्रुत, कुलीन आणि सत्वसंपन्न पुरूषांची कामावर नेमणुक करावी"[19]

मनुप्रमाणेच महाभारतातही गड कोटांचे सहा प्रकार गणले आहेत. मनुच्या जलदुर्गाऐवजी महाभारतात मृद्‌दुर्ग दिला आहे तसेच महाभारतात नरदुर्गाला अधिक महत्व असल्याचे दिसून येते. भिष्मांच्या राजनितीत गडकोटांचा जो विचार आलेला आहे तो सर्वच नरदुर्गाचा आहे. यात नगराभोवतालीच्या तटाबाहेरील खंदकांना बरेच महत्व दिले गेले आहे. तटांच्या भोकांचा उपयोग हेरण्याखेरीज त्यातून गोळया झाडण्यासाठी करीत होते व तटावर तोफाही डागल्या होत्या असे भाषांतरकारांनी लिहीले आहे. परंतु ते चूक आहे. त्याकाळी तोफा किंवा बंदुका वापरात आल्या नव्हत्या. बाण व शताग्नि म्हणजे चामडयाच्या पिशवीत भरलेली स्फोटक द्रव्ये यांच्या मिश्रणाने केलेले मोठे बाण असाच अर्थ घेतला पाहिजे. सारांश, भारतकाली नरदुर्ग व नगरसंरक्षणार्थ बांधलेल्या गिरीदुर्गानाच फार महत्व होते. त्यावरील अधिकारीही तसेच थोर पुरूष असत. म्हणूनच महत्वाचे राज्याधिकार या दुर्गाधिकाऱ्यांना देण्याचा उपदेश भिष्माने युधिष्ठिराला केलेला आहे.

**रामायण** ः रामायण कालखंडात दुर्ग व त्यांची दुर्गमता यांचे उल्लेख येतात, उल्लेखाचे प्रमाण कमी असले तरीही तत्कालीन किल्ले व त्यांच्या दुर्गमतेसाठी केल्या गेलेले प्रयत्न दिसून येतात. लंकेच्या किल्ल्यासंबंधी माहिती यात मिळते ती पुढीलप्रमाणे ः

रामाचे भाषण श्रवण केल्यावर हनुमान रामाला म्हणाला, "किल्ले वगैरे बांधुन लंका नगरीचा बंदोबस्त कसा केला आहे ते सर्व मी कथन करितो. हर्ष व आनंदाने गजबजलेल्या लंकेला फारच मोठमोठी आणि विशाल अशी चार द्वारे आहेत. त्यांना मोठेमोठे अडसर आहेत आणि त्यांना फळयाही फारच बळकट लाविलेल्या आहेत. बाण व पाषाण फेकण्याची मोठमोठीं बळकट यंत्रे तेथे आहेत आणि त्यांच्या योगानेच तेथे आलेल्या शत्रुसैन्याचे निवारण होत असते. लंकेच्या द्वारांवरून शृंगारिलेल्या व साफसुफ केलेल्या अशा शेकडों भयंकर तोफा राक्षसांच्या शुर

---

[19] रा.श.वाळिंबे (अनु.), *महाभारत खं. 7 शांतीपर्व पूर्वार्ध अ.86*, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी पुणे, 1986, पृ.242 - 245.

समुदायांनी नेऊन ठेविल्या आहेत. त्या लंकेभोवती शत्रुचा हल्ला होण्यास दुर्घट असा एक मोठा सुवर्णाचा तट आहे, आणि त्या तटांत पोवळी, हिरे, वैदुर्य मणी व मोत्ये भरलेली आहेत. सर्व बाजुंनी महाभयंकर, अगाध व अतिच अशुभ खंदक खणलेले आहेत. त्यांतील उदक शीतल असून मासे व मकर त्यांमध्ये आहेत. त्या खंदकांमध्ये चार द्वारे आहेत, आणि त्या चारी द्वारांपासून चार अतिविस्तृत मार्ग वरपर्यंत बांधुन नेलेले आहेत. नाना प्रकारची यंत्रे त्या मार्गातून ठिकठिकाणी ठेविलेली आहेत आणि मोठमोठया घरांच्या रांगाही त्यांच्या भोवती आहेत. शत्रुचे सैन्य आले असता कोटावर ठेविलेल्या त्या तोफा वगैरे यंत्रानी त्या मार्गाचे रक्षन होत असते आणि शत्रुंची सैन्ये त्या खंदकांमध्ये सर्व बाजुंनी फेकिली जात असतात. एक मार्ग तर फारच बळकट व प्रचंड असल्यामुळे त्याला धक्का लागणे शक्यच नाही. लंका तर भयावह असून देवांनाही दुर्गम आहे. कारण तिच्यावर जाण्याला आधारभुत असा काही मार्ग नाही. या कोटांशिवाय नदयांनी परिवेष्टित असा एक कोट आहे, एक पर्वतरूप कोट आहे, आणि दुसरा एक कृत्रिमहि कोट आहे असे चार प्रकारचे कोट लंकेमध्ये आहे. पर्वतांच्या शिखरावर बांधिलेली ती दुर्गम लंका देवनगरीप्रमाणे आहे आणि ती जिंकली जाण्यास अत्यंत दुर्घट असून अश्व व गज हयांनी ती भरलेली आहे. खंदक, तोफा आणि इतरहि नानाप्रकारची यंत्रे त्या दुरात्म्या रावणाची ती लंका नगरी शोभवित आहेत."[20] सर्ग तिसरा–लंकावर्णन

- किल्ल्यांबद्दलची पुरातत्वीय साधने ः

हडप्पा माहोंजोदडो ः सन **1919** ते **1923** मध्ये हडप्पा व मोहोंजोदडो येथे पुरातत्वखात्यातर्फे झालेल्या उत्खननात एक प्रगत सभ्यतेचा शोध लागला. कार्बन चाचणीद्वारे (C-14 Method) या सभ्यतेचा काळ इ.स.पुर्व सुमारे **3100** च्या पुर्वीचा असल्याचे आढळले. सध्यस्थितीत हा भाग पाकीस्तान प्रांतातील असून तत्कालीन कालखंडात हे क्षेत्र अफगानीस्थानापासून जम्मू-काश्मिर मधील मान्ड, पुर्वेस उत्तर प्रदेशातील

---

[20] प्रा.भा.केळकर संपा., *वाल्मीकी रामायण*, वरदा प्रकाशन पुणे, 1986, पृ.4- 6.

आलमगीरपूर, दक्षिणेस दायमाबाद व पुणे जिल्हयातील इनामगाव आणि पश्चिमेस मकरान किनाऱ्यावरील सुक्तगेंदोर असे पसरलेले होते.

हडप्पा ः हडप्पा शहर सध्या हरप्पा खेडेगावच्या शेजारी आहे. रावी नदीच्या तिरावर असलेल्या हडप्पा शहरास लोकांचा उपसर्ग मोठा प्रमाणात लागल्याचे दिसून येते. रेल्वेमार्ग करण्यासाठी येथील अवशेषांची बहुतांशी नासधुस केल्या गेली तद्नंतर गावातील लोकांनी येथील विटांत आपली घर बांधली यामुळे सभ्यतेचे भरून न येणारे नुकसान झालेले आढळते. हरप्पा किल्ल्याचे क्षेत्र फार मोठे होते प्राचीन काळात संपुर्ण वस्तीस तटबंदी बांधून काढली होती. मातीच्या विटांचा वापर येथे मोठया प्रमाणावर केलेला असून या किल्ल्याची गावास वेष्टीनारी भिंत चढास वर हळूहळू निमुळती होत गेलेली आहे व तिच्यावर ठराविक अंतरावर सुरक्षिततेच्या दृष्टिने बुरूज बांधलेले होते.

मोहोंजोदारो ः मोहोंजोदारो हे क्षेत्र सिंधुनदीच्या काठी अरूंद पट्टयावर वसलेले असून एका बेटाप्रमाणे याचा आकार आहे. सिंधमधील लारकाना शहरापासून **40** कि.मी.दूर आहे. येथे झालेल्या उत्खननात दोन भिन्न ऊंचवटे सापडले असून पश्चिमेकडील उंचवटयावर किल्ला व पुर्वेकडील उंचवटयावर शहर पसरलेले होते. किल्ल्यामध्ये स्नानगृह, धान्यागार व विद्यालय अशा दर्जेदार रचना आहेत.

वरीलसारख्या प्राचीन शहरांप्रमाणे गुजरात मधील लोथल सुर्कोतदा म्हणजेच गुजरातमधील कच्छच्या रणातही किल्ल्याचे अवशेष सापडतात. यांवरून प्राचीन कालखंडातही किल्ले व त्याचे तत्कालीन प्रगत स्थापत्य याबद्दल माहिती उपलब्ध होते.

- मध्ययुगीन दुर्गमाहिती ः

मध्ययुगात व विशेषकरून सतराव्या शतकात किल्ल्यांचे महत्व पराकोटीस पोहोचले होते. ज्याच्या हाती किल्ले त्याचीच सत्ता हे ठरलेले समीकरण होते. त्यामुळे दरम्यानच्या काळात प्रत्येक राज्यकर्त्याचा कल किल्ले संपादिण्याकडे असल्याचे दिसून येते. एखाद्या विशिष्ट प्रदेशावरील विजय म्हणजे तेथील किल्ला हस्तगत करणे समजले जाई. सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातले अनेक किल्ले हस्तगत करून स्वराज्याची निर्मिती केली तद्नंतर औरंगजेब बादशहाने दक्षिणेत येवून सर्व किल्ले जिंकण्याचा प्रयत्न केला. तसेच ब्रिटीशांनी

स्थैर्य मिळविण्यासाठी महाराष्ट्रातील किल्ले जिंकून एकछत्री अंमल प्रस्थापीत केला . सारांश प्राचिण व मध्ययुगात किल्ले ही सर्वात महत्वपुर्ण बाब गणली गेली . किल्ल्यांचे प्राचीन उल्लेख अनेक ग्रंथांमधून सविस्तर तपासून प्रस्तुत प्रबंधात मांडले आहेत . प्राचीन व मध्ययुग दोन्ही कालखंडातील राजकीय परिस्थितीत मोठया प्रमाणावर फरक आहे . प्राचीन कालखंडामध्ये तोफा व बंदुकांचा शोध लागलेला नसतांना किल्ल्यांची रचना व मध्ययुगात तोफा व बंदुकांचे अनेक कारखाने निर्माण झाल्यानंतरची किल्ल्यांची संरक्षणात्मक रचना यात मोठया प्रमाणावर फरक दिसून येतो . ब्रिटीश व पोर्तुगीज स्थानिक राजसत्तांना तोफा व दारूगोळा विकत होते . किल्ला हस्तगत करण्यासाठी किंवा किल्ला शत्रुसैन्यापासून लढविण्यासाठी दोन्ही गोष्टिंमध्ये तोफांचे महत्व कायम दिसून येते . तोफांच्या मोठया माऱ्यासमोर किल्ला टिकविणे हे एक आव्हान होते . किल्ल्याचे संरक्षण करण्यासाठी शत्रूसैन्याला तोफांनेच उत्तर देणे भाग होते व तोफांच्या माऱ्यात बुरूज किंवा तटबंदी तसेच द्वार रक्षण होण्यासाठी त्यांची मजबूती वाढविणे द्वार लपविणे तसेच किल्ल्यास नैसर्गिक संरक्षण मोठया प्रमाणावर कशा प्रकारे मिळेल या दृष्टिने प्रयत्न दरम्यानच्या काळात केलेले दिसून येतात .

मध्ययुगात किल्ले व त्यांचे शासन, रचना, महत्व, सैनिकांची शिबंदी, जलव्यवस्थापन, शस्त्रास्त्र, सैन्य, जबाबदा□या सर्व गोष्टी रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्र ग्रंथातून व कृष्णाजी अनंत सभासद यांच्या सभासद बखरेतून संदर्भ आढळून येतो . शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील अमात्य पदावर रामचंद्रपंत यांनी काम केले होते त्यामुळे किल्ल्यांचे व्यवस्थापन आज्ञापत्र ग्रंथातून स्पष्ट होते .

रामचंद्रपंत अमात्य लिखीत आज्ञापत्र या **61** पानी ग्रंथातून किल्ल्यांविषयक महत्वाची माहिती आलेली असून त्याविषयीच्या निवडक नोंदी पुढीलप्रमाणे ः

‘संपुर्ण राज्याचे सार ते दुर्ग . दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उध्वस होतो . देश उध्वस झाल्यावरी राज्य यैसे कोणास म्हणावें□याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्यें दुर्ग बांधुन तो तो देश शाश्वत करून घेतला, आलें परचक्र संकट दुर्गाश्रयीं परिहार केलें’[21]

---

[21] रामचंद्रपंत अमात्य, *आज्ञापत्र*, मुळ मोडी प्रत ऊपलब्ध - राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, पृ . **23** .

'त्या त्या देसी स्थलविशष पाहून गड बांधीले, तैसीच जलदुर्गे बांधिली, त्यावरून आक्रम करित करित सालेरी अहिवंतापासोन कावेरीतीरपर्यंत निष्कंटक राज्य संपादिले'[22]

'राज्यांत किल्ले होते म्हणून अवसिष्ट तरी राज्य राहिले'[23]

'गडकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थीत म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. याकरिता ज्यांस राज्य पाहिजे त्यांणी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूल, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी , गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण, यैसे पूर्ण चित्तांत आणून कोणाचे भरवसीयावर न जाता आहे त्यांचे संरक्षण करणे, व नूतन बांधणेयाचा हव्यास स्वताच करावे, कोणाचा विश्वास मानो नये'[24]

शिवाजी महाराजांचे राजकवी 'कवीन्द्र परमानन्द' यांनी 'शिवभारत' हा संस्कृत ग्रंथ लिहिला. मध्ययुगीन किल्ल्यांचे महत्व या ग्रंथातुन त्यांनी अधोरेखीत केले आहे.

श्लोक व त्याची माहिती पुढीलप्रमाणे ः

"न दुर्गे दुर्गमित्येव दुर्गमं मन्यते जनः

तस्य दुर्गमता सैव यत्प्रभुस्तस्य दुर्गमः"[25]

अर्थ ः दुर्गाला केवळ दुर्ग म्हणुन लोक दुर्गम मानीत नाहीत, तर त्याचा स्वामी दुर्गम असणें हीच त्याची दुर्गमता होय.

"प्रभुणा दुर्गमं दुर्गे प्रभुर्दुर्गेण दुर्गमः

अदुर्गमत्वादुभयोर्विद्विषन्नेव दुर्गमः"[26]

---

[22] तत्रैव, पृ. **23**.

[23] तत्रैव, पृ. **23**.

[24] तत्रैव, पृ. **24**.

[25] स. म. दिवेकर (संपा.), *कवीन्द्र परमानन्दकृत श्रीशिवभारत*, शब्दवेध प्रकाशन पुणे, **1998**, पृ. **163**.

अर्थ ः प्रभुमुळे दुर्ग दुर्गम होतो व दुर्गामुळे प्रभु दुर्गम होतो. दोघांच्याही अभावी शत्रुच दुर्गम होतो.

किल्ल्यांचे मध्ययुगीन महत्व या ग्रंथातुन कवीन्द्र परमानंद यांनी अधोरेखीत करून किल्ला हे राज्याचे मुळ व प्रभु म्हणजेच राजास बलशाली बनविण्यास महत्वपुर्ण गोष्ट असल्याचे मत परमानंदांनी दर्शविले आहे.

सभासदाच्या बखरीमध्ये शिवरायांच्या दुर्गनितीबद्दल कृष्णाजी अनंत सभासदाने लिहिलेल्या गोष्टी ः

"जे जे गड घेतले त्या गडांवर राजियानें कारभारी बंदोबस्ती ऐसी पदधत घातली कीं, गडावरि हवालदार एक व सबनिस एक व सरनोबत एक असे तिघेजण एका प्रतिचे. जो कारभार करणे तो तिघांनी एका प्रतिचा करावा. गडावरि गल्ल्याचे, सामानाचे अंबर करावें. त्यास कारखाननीस म्हणून कारभारी केला. त्याचे विदयमानें सर्व कारखाने यांस जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथें, त्या गडाचा घेरा थोर, त्या जागा सांत पांच तटसरनोबत ठेवावे. त्यास तट वाटून द्यावे. हुशारी खबरदारीस त्यांनी सावध असावें. गडावरि लोक ठेवावे. त्यांस दाहा लोकांस एक नाईक करावा. 'नऊ पाईक दाहावा नाईक', येणेप्रमाणे जातीचे लोक ठेवावे. लोकांत बंदुखी व ईटेकरी तिरंदाज व आडहत्यारी असे लोक मर्दाने चौकशीनें आपण राजियांनी नजरगुजर एक माणूस पाहून ठेवावें. गडावरि लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यांस जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यांपैकी घेवून मग ठेवावे. सबनीस ब्राम्हण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखाननीस परभू ठेवावे. असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे. एक हवालदाराचे हातीं किल्ला नाहीं. हर एक फितवा फांदा यास किल्ला कोणाच्याने देववेना. ये रितीने बंदोबस्तीनें गडकोटाचे मामलें केले. नवी पद्धत घातली"[27]

किल्ल्यांच्या बाबत शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन विशाल व अत्यावश्यक गोष्ट असा असून 'संपुर्ण राज्याचे सार ते दुर्ग' असे शिवाजी महाराज मानत होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या वर्धनावेळी जो प्रदेश हस्तगत करावयाचा त्या ठिकाणच्या किल्ले जिंकण्याला कायम प्राधान्य दिलेले आढळते. तसेच जो प्रदेश हस्तगत करावयाचा आहे परंतु तेथील किल्ला जिंकणे दुर्लभ आहे अशा प्रदेशात नविन किल्ले वसविलेले

---

[26] तत्रैव, पृ. **163**.

[27] का. ना. साने (संपा.), *सभासद बखर*, **1923**, पृ. **25**.

आढळतात. उदाहरणार्थ ः जंजीरा जिंकणे दुर्लभ असल्याने शिवाजी महाराजांने जंजीऱ्याच्या समोरच्या बेटावर कांसा पद्मदुर्ग हा किल्ला उभारला. तसेच इसवी सन **6** ते **9** जानेवारी **1664** साली शिवाजी महाराजांने सुरत लुट केल्यानंतर त्या संपत्तीमधून कुरटे बेटावर सिंधुदुर्ग किल्ला उभारलेला दिसून येते. सारांश रामचंद्रपंताने आज्ञापत्रात 'या राज्यात दुर्ग होते म्हणून अवसिष्ट तरी राज्य राहिले' असे परकीय चक्रातून राज्य बचावण्याचे कारण म्हणजेच किल्ल्यांचे महत्व अधोरेखित केलेले आहे.

ॲबे बार्थलम्यू कॅरे नावाच्या एका फ्रेंच प्रवाशाने लिहीले आहे, "मी शिवाजी महाराजांच्या गव्हर्नरला(रायगड जवळील चौल गावचा अधिकारी) विचारले की तुमच्या राजाला नेमके काय करायचेय? किती प्रदेश जिंकायचेय, नेहमी यश कसे काय संपादीत करतात? त्यावर अधिकारी बोलला, आमच्या राजाला अहत् तंजावर ते तहत् पेशावर राज्य निर्माण करणे आहे, अवघी तीर्थक्षेत्रे मुक्त करणे आहे"[28] शिवाजी महाराजांचे स्वप्न फक्त महाराष्ट्र प्रदेश संपादिन्यापुरते मर्यादित असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे "सालेरी अहिवंतापासोन कावेरीतीरपर्यंत निष्कंटक राज्य संपादिले"[29] असे सभासद म्हणतो. साल्हेर व अहिवंत हे किल्ले बागलान प्रांत म्हणजेच गुजरात राज्याच्या सिमेवर असून तेथपासून राज्य कावेरी पर्यंत संपादिले असे सांगतांना सभासद किल्ल्यांच्या नावाने प्रदेशाच्या सिमांची माहिती देत आहे. बागलान प्रदेश तसेच नाशिक व कावेरी पर्यंत प्रदेश मिळाला म्हणजेच तेथील किल्ले हस्तगत झाले म्हणून तेथला प्रदेश हाती असल्याचे येथे दिसून येते आहे. मध्ययुगात किल्ल्यांची आवश्यकता यातून अधोरेखित होते आहे.

शिवाजी महाराजांनी किल्ल्यांची आवश्यकता असल्याचे अचुक हेरून जेवढे शक्य तेवढे किल्ले त्यांनी जिंकले जे अशक्य त्यांजवळ नविन किल्ले बांधले. जे किल्ले जिंकले त्यांच्या दुर्गमतेसाठी त्यांची पुर्नबांधणी केली म्हणजेच किल्ल्यांची दुर्गमता अधिक पटींनी वाढविली. किल्ल्यांसाठी मुबलक द्रव्य शिवाजी महाराजांनी खर्च केलेले दिसून येते. उदाहरणार्थ ः 1671-72 सालचा एक जावीता ः

---

[28] निनाद बेडेकर, 'शिवाजी द मॅनेजमेंट गुरू', ध्वनिफीत, पानिपत स्मृती समिती, **2010**.

[29] रामचंद्रपंत अमात्य, *आज्ञापत्र;* मुळ मोडी प्रत ऊपलब्ध - राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, पृ.**23**.

“जाबिता तह इमारती करणे. सन इसन्नेकारणें इमारती करावयाचा तह केला असें कीं, गबाळ हुन्नरवंद लावून पैका पावत नाही. हुन्नरवंद गवगवा करितां काम करीत नाहींत. याबद्दल तह केला कीं, नेमस्तच इमारती करावी-होन. **1,75000** माा एक लाख पंचाहत्तर हजार होन रास. **50000** रायगड, **35000** दि|| घरें, **20000** तळीं **2** प्रत्येकी **10000**, गच्ची **5000**;- किल्ले, **15000**; तट **10000** प्रत्येकी-सिंहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, प्रतापगड, पुरंधर, राजगड. **5000** प्रत्येकी प्रचंडगड = तोरणा, प्रसिध्दगड, विशाळगड, महिमतगड, सुधागड, लोहगड, सबळगड, श्रीवर्धन व मनरंजन. **3000** कोरीगड, **2000** सारसगड व महिधरगड, **1000** मनोहरगड, **7000** किरकोळ. एकूण **1,75000**.

येणेप्रमाणे एक लाख पंचाहत्तर हजार होन खर्च करणें. मोर्तब सूद. दस्तुर राजश्रीपंत म्हणून संग्रह केला.(मर्यादेयं विराजते)”[30]

शिवाजी महाराजांच्या निधनावेळी मराठयांकडे शेकडो किल्ले होते. साल्हेर म्हणजे नाशिक पासून जिंजी म्हणजे आजचे तामिळनाडू येथेपर्यंत शेकडो किल्ल्यांची शृंखला मराठयांकडे असल्याचे दिसून येते. संभाजी महाराजांच्या बलीदानानंतर राजाराम महाराजांनी महाराष्ट्रातील युध्दजन्य परिस्थीती निवळण्यासाठी जिंजी किल्ल्याचा आश्रय घेतला व पुढे इतिकादखानास जिंजीचा किल्ला हस्तगत करण्यासाठी अनेक वर्षे झुंजावे लागल्याचे दिसून येते. सारांश मराठेशाहीचे किल्ले दक्षिणेत लांबपर्यंत निर्माण करण्यामागे शिवाजी महाराजांची दुरदृष्टी निदर्शनास येत आहे. औरंगजेब बादशहाचे निधन **7** फेब्रुवारी **1707** रोजी अहमदनगर येथे आलमगीरपुरला येथे झाले. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या किल्ल्यांच्या जोरावर मराठयांनी औरंगजेबासारख्या बलाढय बादशहाशी निकराने लढा दिला त्याचे कारण सहयाद्रीतील किल्ले असल्याचे दिसून येते आहे. मराठे फक्त औरंगजेबाशीच लढले नसून इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी अशा अनेक सत्ताधिशांशी किल्ल्यांच्या योगे लढलेले दिसून येतात. परकीय आक्रमकांविरोधात किल्ल्यांमुळे लढाया लढणे शक्य झाले. मध्ययुगात किल्ले हे सातत्याने रणभुमी राहीले असल्याचे दिसून येते.

ब्रिटिश, पोर्तुगीज, डच हे व्यापारी म्हणून स्वतःची ओळख निर्माण करत असतांना त्यांनी स्थानिक राजसत्तांच्या राजकीय बाबींत ढवळणी सुरू केलेली आढळते. ब्रिटिश राजसत्तेची पाळेमुळे घट्ट रोवतांना त्यांनी

[30] *शिवकालीन पत्रसार संग्रह* खंड : **2**, श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, **2009**, पृ. **413**.

अनेक राजसत्तांशी सोयीच्या वाटाघाटी व तह केले होते. ब्रिटिश अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात जेवढे बलाढय झाले तेवढे ते सतराव्या शतकात याचकाची भुमीका घेवून असल्याचे निदर्शनास येते. ब्रिटीश सत्ताधीश वखारी बांधून त्यांस संरक्षणाच्या नावाखाली किल्ल्याचे स्वरूपच देत असल्याचे सुरतेच्या लुटीवेळी इसवी सन **1664** साली सुरतेत त्यांनी काढलेल्या संचलनावरून दिसून येते आहे. ब्रिटिश राजसत्तेशी स्थानिक राजवटी संलग्नता ठेवून राहत होत्या. युध्दोपयोगी साहित्याची खरेदी त्यांच्याकडून स्थानिक राजवटींमार्फत होत असल्याचेही वर नमुद केले आहे. ब्रिटिशांची स्थानिक राजवटींमधील भुमीका अयोग्य असल्याने त्यांस योग्य व कठोर शासन करणे क्रमप्राप्त होते. त्यांस कठोर शासन करणे किल्ल्यांच्या योगे साधल्याचे आढळते. उदाहरणार्थ ः सुरतेतील ब्रिटीशांनी कंपनी सरकारला **7** डिसेंबर **1661** साली पाठविलेले पत्र , "शिवाजीने रेव्हिंग्टन व आणखी सात इंग्रजांना सहा महिनेपर्यंत अटकेत ठेविले... मोठा दंड मागितला. अनेक विनंतीपत्रांना त्याने दाद दिली नाही. शेवटी रेव्हिंग्टन आजारी पडल्यामुळे बरे होताच परत जाण्याचा करार करून **17** ऑक्टोबरला येथे येऊन पोचला... देश सर्व धामधुमीत आहे. एका बाजूला हा बंडखोर व दुसऱ्याबाजूला सुलतान आणि कित्येक नाखुष झालेले सरदार हे देशाचे वाभाडे काढीत आहेत. काय होईल ते परमेश्वर जाणे!"[31] शिवाजी महाराजांनी ब्रिटीशांच्या गैरवर्तनाबद्दल त्यांना शासन केलेले आढळते. शिवाजी महाराज पन्हाळा किल्ल्यावर वेढयात अडकले असतांना विजापुर दरबारचा सरदार सिद्दी जौहरसोबत ब्रिटीश राजसत्तेतील वरील अधिकाऱ्याने किल्ल्यावर तोफा डागल्या होत्या. या संदर्भातील शिवाजी महाराजांचीच बाजू घेणारे ब्रिटीशांतील प्रेसिडेंट ॲण्ड्रजने रायगडावरील असंतुष्ट कैदयास पाठविलेल्या **10** मार्च **1662** च्या पत्रातून संदर्भ मिळतो तो पुढीलप्रमाणे ः "तुमची **28** डिसेंबर, **16** जानेवारी, आणि **3** मार्च ची सुटकेबद्दल उत्सुकता असणारी पत्रे पोंचली... लबाड शिवाजीला पत्रे पाठविण्यास आम्हाला वेळ नाही... तुम्ही काढलेली हुंडी ताबडतोब भरली आहे... आपल्याला कैद का प्राप्त झाली हे तुम्ही चांगले जाणता. कंपनीच्या मालाचे रक्षण केले म्हणून ही कैद प्राप्त झाली नसून पन्हाळयाच्या वेढयांत जाऊन इंग्रजांचा बावटा फडकावून गोळे उडविल्याबद्दलचे हे प्रायश्चित्त आहे. शिवाजी नसता आणि दुसरा कोणी असता तरी ज्याला म्हणून असल्या अत्याचाराबद्दल सूड उगविण्याचें सामर्थ्य आहे तो तसाच वागला असता. व्यापाऱ्यांनी दारूगोळयासारखा माल विकावयाचा नसतो किंवा शत्रूसैन्यावर उडवावयाचा नसतो. परदेशांत असे उपद्व्याप केल्यास मग त्याचे फळ भोगावे लागते. तुमच्या कैदेचे हेच खरें

---

[31] *शिवकालीन पत्रसार संग्रह* खंड ः **1**, श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, **2009**, पृ. **207**.

कारण आहे. रेव्हिंग्ट्नला स्वतःला शिवाजीची दारूगोळा न विकण्याबद्दलची आज्ञा माहित होतीच... ”[32] परकीय राजसत्तांस स्वराज्यात हस्तक्षेप करू द्यायचा नाही असे धोरण शिवाजी महाराजांचे होते. त्यांनी ब्रिटिशांना कठोर शासन करून किल्ल्यांयोगे जरब बसविली. सारांश मराठयांकडे किल्ले असल्याकारणाने ब्रिटीश सत्तेस कठोर शासन करणे शक्य झाले. किल्ल्यांची आवश्यकता व महत्व यातून प्रतित होत आहे.

किल्ल्यांची आवश्यकता व महत्व दर्शविणारे एक पत्र शिवाजी महाराजांनी **1663** मध्ये मुघल अधिका□ीस पाठविले ते पुढील प्रमाणे ः “आज तीन वर्ष बादशहाचे मोठमोठे सल्लागार व योध्दे आमचा प्रदेश काबीज करणेसाठी चालून येत आहेत. हे तुम्हास सर्वास माहित आहे. बादशहा हुकूम फर्माविता, ‘शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा’ तुम्ही जबाब पाठविला ‘आम्ही लवकरच काबीज करतो’ आमच्या या दुर्गम प्रदेशात कल्पनेचा घोडा नाचविणे सुध्दा कठीण आहे, मग तो प्रदेश काबीज करण्याची भाषा कशाला! भलत्याच खोटया बातम्या लिहून पाठविणेस तुम्हास लाज कशी वाटत नाही□कल्याण व बिदरचे किल्ले उघडया मैदानात होते. ते तुम्ही काबीज केले आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे. नदी नाले उतरून जाणेस वाट नाही, अत्यंत मजबुत असे साठ किल्ले आज माझे तयार आहेत, पैकी काही समुद्र किनाऱ्यावर आहेत. बिचारा अफजलखान जावळीवर फौज घेवून आला आणि नाहक मृत्युमुखी पडला हा सर्व प्रकार आपल्या बादशहास का कळवित नाही□अमिर उल उमराव शाहिस्तेखान आमच्या या गगनचुंबी डोंगराळ व पाताळास पोहचणा□ी खो□ीत सारखा खपत होता, ‘शिवाजीचा पाडाव करून त्याचा प्रदेश काबीज करतो’ असे बादशहाला लिहून लिहून थकला. हया खोडसाळ वर्तनाचा परीणाम त्याला भोवला. तो परिणाम सूर्यासारखा स्वच्छ सर्वांच्या समोर आहे. आपल्या भुमीचे रक्षण करणे हे माझे कर्तव्य आहे आणि तुम्ही बादशहाकडे कितीही खोटया बातम्या लिहून पाठविल्या तरी मी आपले कर्तव्य बजावण्यास कधीही चुकणार नाही”[33]

वरील पत्रावरून शिवाजी महाराज स्वराज्याकडे असलेल्या किल्ल्यांचे व डोंगराळ प्रदेशाचे महत्व अधोरेखित करत असल्याचे आढळते. तसेच किल्ले असल्याकारणाने मराठेशाहीने अदिलशहा, मोघल,

---

[32] तत्रैव, पृ. **210**.

[33] तत्रैव, पृ. **256**.

कुतुबशहा, सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज या सर्व प्रबळ सत्तांशी सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत परिणामकारक संघर्ष दिला.

डेलनच्या **6** जानेवारी **1670** च्या उल्लेखानुसार "मी राजापुर बंदरांत आलो. येथे इंग्रजांची एक वखार होती. पण तेथून मराठयांनी त्यांना काढून लाविले आहे. अलीकडे थोडया वर्षांपासून येथील उन्हाळयापाशी फ्रेंचांनी वखार स्थापिली आहे. शिवाजी मोठा प्रबळ राजा असून सामर्थ्यवान अशा अनेक शत्रूंना न जुमानता त्याने सर्व कारभार इतक्या धोरणाने चालविला आहे की, पोर्तुगीजांची काही थोडी बंदरे सोडली तर सुरत ते गोवा हयांचे दरम्यान सर्व मुलखांत त्याने आपले बस्तान कायमचे बसविले आहे. सुरत गोवा येथील लोकांना त्याची अतिशय भिती वाटते. परंतु युरोपियनांशी वागतांना तो जरा जपून वागतो असे दिसून आले आहे. त्यांच्या पाठीशी असलेल्या राज्यकर्त्याकडून आपल्याला जाब विचारला जाईल अशी भिती वाटत असल्यामुळे कदाचित तो पाश्चात्यांना अनुकूलता दाखवित असावा. नाहीतर इतर हिंदी लोकांच्या प्रमाणेच त्यांच्याही वखारी लुटण्यास त्याला कठीण गेले नसते... त्याचे सर्व किल्ले डोंगरावर बांधलेले आहेत. त्याची प्रजा त्याचे सारखीच मुर्तीपुजक असली तथापि तो सर्व धर्मीना नांदू देतो. हया भागातील अत्यंत धोरणी व राजकारणी पुरूष म्हणून त्याची ख्याती आहे"[34] या उल्लेखावरून सुरतेपासून गोव्यापर्यंतचा प्रदेश व त्यांतील किल्ले मराठयांकडे असल्याचे दिसून येते.

औरंगजेब बादशहा दक्षिणेत मराठयांचे किल्ले हस्तगत करण्यासाठी मोठा प्रयत्न करीत होता. परंतु ज्या वेगाने बादशहा मराठयांचे किल्ले हस्तगत करण्याचा प्रयत्न करित होता त्या वेगाला साजेसे त्याचे अधिकारी व सैन्य कार्य करित नव्हते ते दख्खनेच्या उंच डोंगराळ प्रदेशातील किल्ल्यांच्या विरोधात लढाया करून आळशी झाले असल्याचे आढळते. औरंगजेब आळशी अधिकाऱ्यांस कंटाळला होता, याबद्दलचा संदर्भ पुढीलप्रमाणे ः "रात्री बादशहांनी काजी मुहंमद अक्रम याला आपल्या शय्यागृहात बोलाविले. बादशहा त्याला म्हणाले, 'बसा'. काजी अक्रम एका कोपऱ्यात बसला. बादशहा आपल्या जागेवरून उठून त्याच्यापाशी येऊन बसले आणि म्हणाले, 'रमजानचा महिना आणि ईद ही सोलापुरात पार पाडावी अशी माझी इच्छा होती. पण माझे अधिकारी बादशाही कामगिरी मनःपूर्वक करीत नाहीत (नोकरान दर कारे बादशाही तन नमी देहंद). मी असंख्यवेळा ताकीद करतो (ताकीद ब ताकीद मी फर्मायम), पण त्याचा काहीच परिणाम होत नाही (हेच असर नमी कुनद)' बादशहा दोन

---

[34] तत्रैव, पृ. **357-58**.

घटकांपर्यंत आपल्या अधिकाऱ्यांची गाऱ्हाणी सांगत होते. यानंतर त्यांनी काजी अक्रमला आपल्या तंबूकडे परतण्यास निरोप दिला."[35] दख्खनेतील डोंगराळ प्रदेशातील किल्ले हस्तगत करणे सामान्य गोष्ट नसल्याचे दिसून येते. तसेच उत्तरेत सपाट प्रदेशात लढणारे औरंगजेबाचे सैन्य महाराष्ट्रातील गिरीदुर्गावर शक्तीहीन ठरल्यामुळे ते आळशीपणा करित असल्याचे निदर्शनास येते आहे. महाराष्ट्रातील किल्ले हस्तगत करण्याचा औरंगजेबाचा कायम आग्रह राहिल्याचे निदर्शनास येते. **1689** साली संभाजी महाराजांच्या बलीदानानंतर राजाराम महाराज जिंजीस गेले. मुघलांच्या हातात मराठयांचे काही किल्ले दरम्यान गेलेले दिसतात. सर्वप्रथम नाशीकमधील ऊत्तरबाजूचे बागलाणचे काही किल्ले मोघलांनी हस्तगत केले. तद्नंतर पुढील दहा महिन्यांत मुघलांनी मोठया प्रयत्नाने अनेक मनुष्यबळ गमावून पुरंदर, सिंहगड, लोहगड, माहूली, पन्हाळगड, प्रतापगड, राजगड, तोरणा, रोहीडा, रायगड इत्यादी किल्ले घेतले. दरम्यानच्या काळात मराठयांकडे सातारा (अजिंक्यतारा), परळी, विशाळगड, राजमाची, रांगणा, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, पद्मदुर्ग असे महत्वाचे किल्ले राहीले. परंतु राजाराम महाराजांमुळे जिंजीस मोघल फौजा सरकल्याने महाराष्ट्रात त्यावेळी किल्ले घेण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली व त्याच दरम्यान मराठयांनी मुघलांकडून बरेचसे किल्ले हस्तगत केले यात पन्हाळगड, राजगड, तोरणा, रोहीडा, प्रतापगड, सिंहगड हे किल्ले मराठयांनी मिळविले. संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्या पराक्रमाणे मोघल फौजा जेरीस आल्या. धनाजीने सातारच्या मुघल छावणीवर हल्ले करून बादशाही फौजांस त्रासविले. या दरम्यान बादशहाला छावणीसाठी पाणी आणावयास पाठवावयाच्या लोकांस किंवा लाकुडफाटा आणणाऱ्या लोकांसोबत मोठे लष्कर पाठवावे लागत होते. मराठयांवरील मोहीम ही इतर मोहीमांसारखी सौम्य व तत्काळ संपवू या गैरसमजुतीमध्ये औरंगजेब राहीला असल्याचे दिसून येते. मुघलांची फौज जगात संखेच्या दृष्टीने श्रेष्ठ समजली जात होती त्यांस मराठयांवरील मोहीमेत बलाढय किल्ल्यांमुळे सैन्य कमी पडू लागल्याचे दिसून येते. 'विजापूर व हैदराबाद या सुभ्यांच्या रक्षणासाठी आमच्यापाशी पाच पाच हजार सैन्यही नाही' अशी तक्रार तेथील सुभेदार करीत होते. तसेच शहाजादा बेदारबख्त सेनापती असून 'पुर्वी माझ्याकडे चोवीस हजार सैन्य होते आता माझ्या तैनातीतील अधिकाऱ्यांना बदलल्यामुळे ते चौदा हजारावर आले आहे' अशी तक्रार तो करतो. तसेच भीमसेन सक्सेनाचे मे **1700** चे लेखन असून त्यात "फीरोजाबादच्या लढाईत मराठयांचे सैन्य पस्तीस हजारपेक्षा

---

[35] से. मा. पगडी (संपा.), *मोगल दरवाराची वातमीपत्रे भाग : 1*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशीत, **1978**, पृ. **101**.

कमी नव्हते. मोघलांचे सैन्य तीन हजारपेक्षा अधिक नव्हते" असे भिमसेन सक्सेना लिहीतो.[36] यावरून मुघलांना मराठयांवरील मोहीम महाराष्ट्रातील बलाढय किल्ल्यांमुळे द्रव्यहानी व मनुष्यहानी करणारी ठरली. मुघलांना मराठयांवरील मोहिमेत म्हणावे तसे यश मिळाले नसून याचे प्रमुख कारण की मुघलांना मराठेशाहीशी लढाया करण्याआधी रजपुत, जाट, बुंदेले, शिख यांच्याशी सामना करावा लागला होता परंतु त्यांचा प्रदेश सहयाद्रीसारखा दुर्गम नव्हता. तसेच महाराष्ट्रासारखे उंच किल्ले उत्तरेत नसल्याने मुघल मराठयांवरील मोहीमेत जेरीस आलेले आढळतात.

औरंगजेबाच्या परळी वेढयाच्या वेळी तिव्र पाउस होता. औरंगजेबाचा लेखक साकी मुस्तैदखान याने लिहीलेल्या मासिर आलमगीरी ग्रंथातील याबद्दल संदर्भ आलेला आहे. "पाऊस धोधो पडत होता अणि लष्करात धान्याची व चाऱ्याची कमालीची टंचाई होती. त्या भयंकर परिस्थितीबद्दल मी काय आणि कसे लिहू□ परिस्थीतीच्या चित्रणाची नुसती कल्पना केली तरी माझ्या प्रतिभेचा झरा एकदम आटून जातो... काळे मेघ रात्रंदिवस वर्षत होते. अनाथांच्या नेत्रातून अश्रूंची अखंड धार लागावी तसा रात्रंदिवस पाऊस पडत होता" अशाप्रकारे मुघल फौजा थकलेल्या व हवालदिल झालेल्या निदर्शनास येते.[37]

**1699** ते **1704** अशी सहा वर्षे औरंगजेब बादशहा मराठेशाहीचे किल्ले हस्तगत करण्यात व्यस्त असतांना मराठे गुजरात व माळवा प्रांतात घुसून खंडणी वसूल करीत होते.[38] सारांश मोघलांची युध्दरचना मराठयांनी खिळखिळी केलेली होती. औरंगजेब बादशहाचे वय नव्वदीच्या जवळ आले असतांनाही त्याला स्वतःला किल्ले घेण्यासाठी प्रयत्न करावे लागत होते. सोपवून दिलेल्या कामगीरीनुसार त्याच्या अधिकाऱ्यांचे वर्तन निष्टावान राहिलेले दिसून येत नाही. मुघल सैन्य जो प्रदेश तो हस्तगत करण्यास जात असे तेथील किल्ले जिंकणे सर्वप्रथम कमप्राप्त असल्याने किल्ले जिंकण्यात मोठया प्रमाणात वेळ खर्च होत असे. उदाहरणार्थ ः नाशीक जवळील रामशेजचा किल्ला पाच वर्षे मुघलांविरोधात मराठयांने लढविला. जिंजीच्या किल्लात राजाराम महाराज वेढयात असतांना मुघलांकडून इतिकादखान (जुल्फीकारखान) किल्ल्यास वेढा घालून किल्ला हस्तगत करण्यासाठी

---

[36] तत्रैव, पृ. **23**.

[37] तत्रैव, पृ. **27**.

[38] तत्रैव, पृ. **22**.

प्रयत्न करित होता. मुघल सैन्य व किल्ले हस्तगत करण्यात विशेष प्राविण्य असलेला इतिकादखान सात वर्षे किल्ला हस्तगत करू शकला नाही. अनेक किल्ले जिंकण्यासाठी भरपुर वेळ व द्रव्यहानी तसेच मनुष्यहानी भोगावी लागणार होती त्यानंतर दक्षिणेची मोहीम आटोपून उत्तरेत जाण्याचा विचार औरंगजेबाचा होता. परंतु महाराष्ट्रातील बलाढय किल्ल्यांमुळे बादशहाचा मानस पुर्ण होवू शकला नाही. औरंगजेबाचे निधन महाराष्ट्रात अहमदनगर येथे झाले. औरंगजेबाने अनेक वर्षे खर्च करून किल्ले जिंकण्याचा प्रयत्न केला मात्र त्याला यश मिळाले नाही. अफाट सैन्यानिशी वर्षानुवर्षे लढाया लढून विजय मिळत नव्हता. किल्ले जिंकण्यास वेळ मोठया प्रमाणावर खर्च होतोय तेव्हा किल्ल्यांच्या वाटेस न जाता व निष्कारण मनुष्यहानी करून न घेता देश पादाक्रांत करण्याचे बादशहाने अनेक प्रयत्न केले. परंतु हे धोरण अतिशय चुकीचे अवलंबले गेल्याने कोणताही प्रदेश फार काळ न मिळता सैन्याची पाठ फिरताच किल्ल्यांच्या जोरावर मराठयांनी पुन्हा होती तीच घडी सर्वत्र बसविली. त्यामुळेच मुघल औरंगजेबानंतर हिंदुस्थानच्या राजकारणातही तग धरू शकले नाहीत व औरंगजेबाच्या निधनानंतर काहीच कालावधीत मराठयांनी भारतभर स्वाऱ्या केल्या.

सर्वमान्य वस्तुस्थितीनुसार ज्या मराठयांनी मोघल, अदिलशहा, कुतुबशहा व इतर परकीय राजवटींना किल्ल्यांच्या व शिवाजी महाराजांच्या दरम्यान असलेल्या तत्कालीन आधुनिक शस्त्रास्त्रांवर योगे जेरीस आणले व स्वसामर्थ्याने स्वराज्य संपादिले त्या मराठी राजसत्तेकडून सतराशे शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांनी सहजतेने ब्रिटिश अंमल अखंड भारतभर लागू केलेला दिसून येतो. औरंगजेब बादशहा दक्षिणेत येवून मराठयांचे किल्ले हस्तगत करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत असतांना रामशेज किल्ला व जिंजीच्या किल्ल्यास त्याच्या आधिकाऱ्यांना अनुक्रमे पाच – सात वर्षे झगडावे लागले. मात्र रामशेज किल्ल्यासारख्या टेकडीवजा किल्ल्यास घेण्यासाठी मोघल फौजांना एवढी वर्षे झगडावे लागले असतांना लोहगड व विसापूर किल्ल्यासारखे दोन्ही बलाढय वनगिरीदुर्ग ब्रिटिशांनी एकाच दिवसात हस्तगत केलेले आढळून येतात. मराठयांकडून मोघल फौजांना किल्ले घेण्यासाठी लागलेला वर्षानुवर्षाचा कालावधी व ब्रिटिश फौजांकडून एकेका दिवसांत पडलेले मराठेशाहीचे किल्ले यांत एक विशेष फरक असल्याचे दिसून येते. ब्रिटिश फौजा तत्कालीन आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करणाऱ्या होत्या. तसेच दरम्यानच्या काळातील मराठी फौजा आधुनिकतेकडे हव्या तेवढया सकारात्मक दृष्टिने पाहणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे शिवकाळात ज्या मराठी फौजा लांबवरचा प्रदेश शस्त्रास्त्रांच्या जोरावर हस्तगत करित होत्या, पुढील काळात मराठी फौजांकडून किल्ले एकेका दिवसांत ब्रिटिशांनी अलगद हस्तगत केलेले

आढळून येतात. ब्रिटिशांचा तोफखाना अद्ययावत व ब्रिटिशांच्या तोफा वजनाने हलक्या असल्याकारणाने त्या सहजतेने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविता येत होत्या. तसेच तोफा लांबवर मारा करीत असल्यामुळे एखादा किल्ला तोफखाण्याच्या जोरावर हस्तगत करणे ब्रिटिशांना सहज शक्य होत असल्याचे दिसून येते. दुसऱ्या बाजीरावाकडून रायगड किल्ला लढविण्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती. मुबलक शस्त्रास्त्रांसहित **1000** अरबांची कडवी फौज दुसऱ्या बाजीरावाने रायगडास ठेवली होती. दुसरा बाजीराव ब्रिटिशांविरोधात रायगड लढविण्यासाठी सज्ज झालेला असतांना मेजर हॉलने पोटल्याच्या डोंगरावर अवघड जागा असतांना माऱ्याच्या तोफा चढविल्या.[39] रायगडावर सशस्त्र सैन्य व मुबलक तोफखाना असतांनाही ब्रिटिशांनी लांब पल्ल्याच्या तत्कालीन आधुनिक तोफांतून अग्नीगोळे डागून रायगड संपुर्ण उध्वस्त केला. रायगडावरील सर्व इमारतींची धुळधान झाली. दुसऱ्या बाजीरावाची पत्नी वाराणसीबाईचा राहता वाडाही आगीने भस्म झालेला होता. भस्म इमारतींच्या फुपाटयाशेजारी बसलेली वाराणसीबाई कर्नल प्रॉथरशी बोलने झाल्यावर गड उतरून गेली.[40] यावरून ब्रिटिशांचे तत्कालीन अद्ययावत युध्द साहित्य व मराठेशाहीचा तत्कालीन आधुनिकतेकडे पाठ फिरविण्याचा स्वभाव दिसून येतो. जर **1818** साली महाराष्ट्रातील किल्ल्यांवर तत्कालीन अत्याधुनिक तोफखाना व युध्द सामुग्री असती तर ब्रिटिशांविरोधात किल्ले टिकविणे शक्य झाले असते. परंतु अधुनिकतेचा अंगीकार न करण्याच्या प्रतिगामी विचारसरणीमुळे ब्रिटिशांना त्यांची सत्ता स्थापन करण्यात फारसे अडथळे न येता मार्ग सुकर झाला. सारांश मुघल, राजपुत, मराठे, स्थानिक सर्व राजवटी, पोर्तुगीज, डच या सर्व स्थानिक व परकीय सत्ताधिशांना तत्कालीन अत्याधुनिक अस्त्र शस्त्रास्त्रांच्या अभावाने ब्रिटिशांविरोधात हार पत्करावी लागली. त्यामुळे ब्रिटिश राजसत्ता प्रबळ होवून सर्व स्थानिक व परकीय राजसत्ता पर्यायाने भारत ब्रिटिश अंकित झाला.

इंग्रजांनी भारत मुघलांकडून घेतला नसून तो मराठयांकडून घेतला असल्याचे दिसून येते. भारतात उत्तरेकडील किल्ले सुस्थितीत राहीले कारण रजपुत, जाट, शिख, रोहीले यांसारख्या उत्तरेकडील राजसत्ता ब्रिटिशांच्या बाजुने त्वरित झुकल्या होत्या. इंग्रजांना उत्तरेतील किल्ल्यांवर वकदृष्टी करण्याचे कारण नव्हते. मराठी राज्य संपविण्यासाठी व मराठयांचे उठाव दडपण्यासाठी ब्रिटिशांनी किल्ल्यांस जाणाऱ्या वाटा फोडल्या,

---

[39] शा. वि. आवळसकर, *रायगडची जीवनकथा*, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, **1962**, पृ. **185**.

[40] तत्रैव, पृ. **187**.

पाण्याच्या टाक्या सुरूंग लावून निकामी केल्या, तटबंदी व बुरूज तोफा लावून नामशेष केले. सारांश, महाराष्ट्रातील सहयाद्री व डोंगराळ प्रदेशातील दुर्गम किल्ल्यांमुळे स्वराज्याची निर्मिती शिवाजी महाराज करू शकले. मराठेशाहीची स्थापना झाली व त्याचे वर्धन शक्तीशाली सत्तांसमोर टिकले याचे एक महत्वाचे कारण शिवाजी महाराज व सहयाद्रितील किल्ले असल्याचे निदर्शनास येते. या संदर्भातले मुंबई ते सुरतेस पाठविलेले **11** जुन **1670** चे पत्र, "शिवाजी मोगली फौजेप्रमाणे आळशी रहात नाही. कारण तो, सूर्य प्रकाशात असतांना गवत वळवतो असे नसून(संधी साधने अशा अर्थाची इंग्रजी म्हण) झोड पावसाने सुर्य अच्छादून गेला असतांनाही त्याचे काम चालते (पावसांत देखील त्याचा उद्योग थांबत नाही) मोगली फौज पावसाळयाकरितां टेकडीच्या आश्रयाला निघून गेल्यानंतरसुध्दा शिवाजीच्या हालचाली चालूच आहेत. त्याच्या लोकांनी लोहगड आणि कोज हे किल्ले परत मिळवून आठ दिवसांच्या आंत कुर्डूगड घेवून नुकताच माहुलीवर पुनः हल्ला केला. तेथे किल्ल्याच्या तटावरून दगडांच्या मायेखाली त्याचे दोनशे लोक सांपडले. फिरून एकदां तो आपल्या लोकांकडून माहुलीवर हल्ला चढविल आणि नंतर त्यांना विश्रांती देईल. भिवंडीला आणि माहूलीच्या पायथ्याशी हल्ला करण्यासाठी मिळून त्याने पाच हजार सैन्य जय्यत ठेविले आहे"[41] या पत्रावरून मराठी राज्य निर्माण होण्यामागे शिवाजी महाराज हे व्यक्तीमत्व महत्वपुर्ण असून किल्ल्यांयोगे कायम विजय मिळविणे भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेणे हे परिस्थितीनुरूप शिवाजी महाराजांनी केलेले निदर्शनास येते.

सारांश साधनांची कमतरता असतांनाही स्वतःच्या राज्याच्या संरक्षणासाठी जिवाची पर्वा न करता लढणारे योध्दे किल्ल्यांच्या आश्रयानेच लढत होते. किल्ल्यांचे महत्व प्राचीन काळापासून मध्ययुगाच्या अखेरपर्यंत अबाधित होते ते एकोणिसाव्या शतकात संपुष्टात आलेले दिसून येते. ब्रिटीश राजसत्तेच्या अंमलामध्ये युध्दजन्य परिस्थिती संपुष्टात आल्यानंतर किल्ल्यांवर राहून किल्ले लढविण्याचे कारण उरले नाही व तद्नंतर महाराष्ट्रातील गिरिदुर्ग, जलदुर्ग, भुईकोट किल्ले सर्वच किल्ल्यांचे महत्व संपुष्टात आलेले आढळून येते.

---

[41] *शिवकालीन पत्रसार संग्रह खंड ः 1*, श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, **2009**, पृ.**366**.

# प्रकरण तिसरे

## लोहगड किल्ला

| | | |
|---|---|---|
| भौगोलिक स्थान | ः | **18° 42’** रेखांश उत्तर, **73° 29’** अक्षांश पूर्व[1] |
| तालुका | ः | मावळ |
| जिल्हा | ः | पुणे |
| दुर्ग प्रकार | ः | मिश्रदुर्ग (गिरीदुर्ग व वनदुर्ग) |
| समुद्रसपाटीपासून उंची | ः | **3412** फुट[2] |
| पायथ्यापासून उंची | ः | **100** मीटर |
| दुर्गाच्या माथ्याचा परीघ | ः | **3 .1** कि . मी . (**1 . 8** मैल) |

### दुर्ग चिकित्सा

लोहगड किल्ल्याच्या प्रभावळीत अनेक किल्ले असून ते सर्व गिरीदुर्ग प्रकारात येतात . लोहगड किल्ल्याचा जोडदुर्ग विसापूर किल्ला आहे . तसेच तुंग, तिकोणा, राजमाची, कोरीगड, घनगड हे किल्ले लोहगड किल्ल्याच्या प्रभावळीत आहेत . मावळ तालुक्यातील बहुतांशी किल्ल्यांच्या कातळकडयात व अनेक पर्वतांच्या कातळयास प्राचीन बौध्दगुंफा, विहार, स्तुप, पोढी व लेणी आढळतात . लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख कातळकडयास

---

[1] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, p. 622.

[2] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, p. 622.

मोठया संख्येने लेणी आहेत. मध्ययुगीन इतिहासाबरोबरच लोहगड किल्ल्यास प्राचीन इतिहास आहे. कारण लोहगड किल्ल्याची बांधणी प्राचीन काळात झालेली होती.[3] मध्ययुगात लोहगड किल्ला महाराष्ट्रातील बलशाली किल्ल्यांत गणला गेला. मावळ तालुक्याच्या केंद्रस्थानी असलेला किल्ला म्हणून लोहगड किल्ल्याची विशेष ओळख प्राचीन व मध्ययुगात निर्माण झाल्याचे दिसून येते. कोकण व देश यांमधील बोरघाटावर नजर ठेवण्यासाठी लोहगड व विसापूर या दोन किल्ल्यांची निर्मीती करण्यात आल्याने लष्करी दृष्टया या किल्ल्यांस अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले.[4] लोहगड किल्ल्यास जाण्यासाठी पुणे व मुंबईतून कार्लेमार्गे मळवली भाजे गायमुख खिंड लोहगडवाडी असा एक मार्ग आहे. पुण्यातून सोमाटणे फाटामार्गे पवनानगर दुधिवरेखिंड घेरेवाडी लोहगडवाडी असा दुसरा मार्ग आहे तसेच मुंबईतून लोणावळामार्गे दुधिवरेखिंड घेरेवाडी लोहगडवाडी असा तिसरा मार्ग आहेत. लोहगड किल्ल्याच्या माथ्यावर जाण्यासाठी लोहगडवाडी बाजूने प्राचीन, मध्य व अर्वाचीन काळात एकच पुर्वमुखी मार्ग होता व आजही त्यानेच किल्ल्यात प्रवेशता येते.

- किल्ल्याचा परिघ व त्यातील मध्ययुगात वसलेल्या वाडया व वस्त्या ः

किल्ल्याच्या परिघात वसलेल्या वाडया व वस्त्या यांना मध्ययुगीन वारसा असल्याचे आढळून येते. मध्ययुगीन कालखंडात किल्ल्याचे किल्लेदार व राजवंश यांचे वंशज किल्ला पायथ्यास लहान आकारातील वाडे बांधून राहिलेले आढळून येतात. उदाहरणार्थ ः 1.नाशीक जिल्हयात बागलाण प्रदेशातील मुल्हेर किल्ल्याच्या पायथ्यास मध्ययुगीन बागुलवंशीय राजांचे आजचे वंशज रहावयास आहेत. 2.लोहगड किल्ल्याच्या मध्ययुगीन कागदपत्रांत साबळे आडनावाचा उल्लेख मिळतो. येथील पाटीलकी असलेले घर आजही साबळे यांचे आहे. किल्ला पायथ्यास रहाणाऱ्या अनेक ग्रामस्थांच्या आडनावांना इतिहास असतो असे दिसून आले आहे. अशाच प्रकारे गावांची व तेथील वाडया किंवा वस्त्यांची नावे ऐतिहासिक असल्याचे निदर्शनास आले आहे. उदाहरणार्थ ः 1.विसापूर किल्ल्याच्या पायथ्याच्या गावाचे नाव पाटण असून प्राचीन कालखंडात प्रदेशाची विभागणी

---

[3] महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, मध्ययुगीन कालखंड, 2014, पृ.507.

[4] मराठी विश्वकोश खंड 15, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, 1977, पृ.837.

पूर/पाटण अशी करण्यात येत होती.[5] **2**.लोहगड किल्ल्याच्या मागील गावाचे नाव घेरेवाडी आहे. मध्ययुगात किल्ल्याच्या संरक्षणार्थ अनेक योजना केल्या जात त्यावेळी मेटे-पहारे-चौक्या असे घेरे लावून किल्ल्याचे रक्षण करण्याची जबाबदारी किल्लेदारावर होती. घेरेवाडी असे नाव आजही येथील गावास असून लोहगड किल्ला ते विसापूर किल्ला भातराशीच्या डोंगराच्या बाजुने जातांनाच्या मार्गावर ढालेवाडी आहे. ढाल हे मध्ययुगात स्वसंरक्षण करण्याचे प्रभावी शस्त्र होते. या शस्त्राच्या नावाने ढालेवाडी असे गावाचे नामकरण झालेले दिसून येते. लोहगड किल्ला राजधानीचा किल्ला शोभावा असा बलाढय व दुर्घट किल्ला आहे त्यामुळे त्याच्या परीघात अनेक वाडया व वस्त्या वसल्या गेल्या, कालांतराने त्यांचे नामकरणही किल्ल्याच्या संरक्षणाशी निगडित झाले. येथील वाडया व वस्त्या तसेच गावे कोणत्या साली वसविली गेली याबाबत ठोस माहिती उपलब्ध नाही. मात्र मध्ययुगीन दगडी अवशेष या वाडया वस्त्यांत मोठया प्रमाणावर दिसून येतात. समाधी, शिलालेख, कबर, तोफा, मुर्ती व जुने पाटा-वरवंटा तसेच उखळ इत्यादी अवशेष आढळतात. स्थानिक उपलब्ध साहित्यातून निर्माण केल्या गेलेल्या अनेक वस्तू व वास्तू सुस्थितीत राहिल्याच्या निदर्शनास येतात. स्थानिकरित्या उपलब्ध बांधकाम साहित्याचा वापर केल्यामुळे या वास्तू चांगल्या प्रकारे टिकलेल्या दिसतात. मात्र इतिहासाच्या अज्ञानामुळे काही ठिकाणी दगडी शिल्प नवीन बांधकामाखाली गाडल्या गेल्याचेही दिसून येते. उदाहरणार्थ ः लोहगडवाडीत हनुमान मंदिराच्या जिर्णोध्दारात पाया घेतांना काही समाधी गाडल्या गेल्या. तसेच लहान हनुमान मंदिराच्या समोर बांधलेल्या घराच्या बांधकामात अनेक घडीव व नक्षिदार शिल्प गाडली गेलेली दिसून येते.[6]

- लोहगडवाडीतील मध्ययुगीन अवशेष ः

---

[5] मंजिरी भालेराव, *महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षिदार*, डायमंड पब्लिकेशन, **2009**, पृ.**71**.

[6] क्षेत्रभेट, लोहगडवाडी, मे **2014**.

लोहगडवाडीत अनेक मध्ययुगीन अवशेष आजही मोठया प्रमाणावर आढळतात. यात शिलालेख, दगडी समाधी, विरगळ, मुर्ती, पिंडी, दगडी ऊखळ, दगडी दिवे, मंदिरांचे चौथरे, वाडयांचे जोते, जुन्या मंदिरातील भैरवनाथाच्या व तत्सम मुर्त्या इत्यादी अवशेष लोहगडवाडीत आज सुस्थितीत आढळतात.

## 1) हनुमान मंदिर क्रमांक 1 ः

लोहगडवाडीत शक्तीदेवता उपासनेसाठी मध्ययुगात हनुमान चौथरा बांधण्यात आलेला आढळतो. पाथरवटाने येथेच हनुमान मूर्ती घडविली असल्याचे दिसून येते. मोठया आकारातील हनुमान शिल्प घडवुन एका चौथऱ्यावर मूर्तीची स्थापना करण्यात आली होती. मध्ययुगीन चौथरा आजही सुस्थितीत असून सध्या ग्रामस्थांमार्फत मंदिराचा जिर्णोध्दार करण्यात आला आहे. हनुमान शिल्पाची उंची **3.5** फुट आहे. शिल्पात हनुमानाने पायाखाली 'पणवती' नामक राक्षसीण दाबलेली दर्शविलेले आहे. हनुमानाची शेपटी डोक्याहून पलीकडे वळविलेली असून कमरेस खंजीर सदृश शस्त्र कोरलेले आहे. मूर्तीस मोठया प्रमाणावर शेंदुर फासलेला असल्याने त्यावरील बारीक कोरीव काम व गळयातील कंठा तसेच शेला या सर्व गोष्टी अस्पष्ट झाल्या आहेत. मंदिर, सभामंडप, संपूर्ण मंदीरास तीन फुट ऊंचीची संरक्षक भिंत व समोरील पत्रा हे सध्या ग्रामस्थांनी जिर्णोध्दार केलेल्या मंदिराचे स्वरूप आहे. मंदिरासमोरील घराच्या ओवरीत असलेल्या कट्टयावर **2** फूट ऊंची असलेले **3** दगडी उखळ ठेवलेले आहेत व त्याच्या मागच्या बाजूच्या ओटयावरील पाणी वाहून जाण्यासाठी जे दगडी पन्हाळे ठेवले आहे ती पिंडी सदृश घडविलेले अवशेष असून येथील ऐतिहासिक शिल्पांची दुरवस्था झालेली दिसून येते.

## 2) हनुमान मंदिर क्रमांक 2 ः

हनुमानाचे क्रमांक **2** चे मंदिर क्रमांक **1** च्या हनुमान मंदिराच्या समोरच आहे, हनुमानाची दोन मंदीरे अगदी शेजारी असण्याचे हे दुर्मिळ ऊदाहरण असून महाराष्ट्रात क्वचितच अशी शेजारी - शेजारी असलेली एकाच देवाची मंदिरे आढळतील. वरील क्रमांक एकच्या हनुमानाची मूर्ती अन्य मूर्तीसारखी साधारण असून त्या शैलीतील अनेक मूर्ती आढळतात. परंतु क्रमाक **2** चे मंदिर जिर्णोध्दार करतांना ग्रामस्थांनी उंच कळस घेवून बांधणी केलेली आढळते. या मंदिराचा सभामंडप मोठया आकारात बांधलेला असून यातील हनुमान मूर्ती विशेष शैलीतील असलेली निदर्शनास येते. येथील हनुमान शिल्पात हनुमानाने ऊजव्या हातात गदा व डाव्या हातात द्रोणागिरी पर्व

त ऊचललेला आहे. पाथरवटाने ही मुर्ती घडवितांना दगडी कलाकुसर करून हनुमानाच्या अंगावर लांबसर शेला पांघरलेला दर्शवीला आहे. झेप घेतांनाचे व हातात पर्वत उचललेले हनुमान शिल्प लक्षवेधक आहे. लोहगडवाडीतील सर्वात मोठे मंदिर म्हणून या मंदिराची नोंद घ्यावी लागते.

### 3) मध्ययुगीन कलाकुसरींचे दगडी समाधी शिल्पे ः

हनुमान मंदिराच्या मागील बाजूस अनेक मोठया आकारातील मध्ययुगीन दगडी समाधी शिल्पे आहेत. यांमधील काही समाध्यांस दिवा लावणीचे कोनाडे असून काहींवर मोठया आकारातील कमळपुष्पे कोरलेली आहेत. यातील एका मोठया आकाराच्या समाधीवर नागाने आपला फणा काढून या समाधीस छत्र केले असून संपूर्ण समाधीस विळखा घातलेला दर्शविलेले आहे. पाच फूट ऊंची असलेला दगडी दीपस्तंभ येथे कोरलेला आहे. उपलब्ध समाध्या संख्येने किमान 25 असून प्रत्येक समाधी इतर समाध्यांपेक्षा निराळी आहे. येथील समाध्या अस्ताव्यस्त पडलेल्या असून यातील काही जमीनीखाली गाडल्या गेल्या आहेत.

### 4) लोहगड वाडीतील मशीद/दर्गा व त्यातील शिलालेख ः

लोहगडवाडीत एक दर्गा आहे. दर्ग्याची स्थापना कधी झाली याबाबत माहिती उपलब्ध नाही. दर्ग्याच्या संरक्षक भिंतीच्या आतमध्ये एका चौथऱ्यावर काही मध्ययुगीन कबरी व शिलालेख ठेवलेले आहेत. चौथऱ्याशेजारी आयताकार दगडामध्ये अक्षरे उठावातील व फारशी लिपीमध्ये असलेला कोरीव शिलालेख पहावयास मिळतो. चौथऱ्यावरील कबरेस तारेचे लहान कुंपण घातले आहे. त्यातील बदाम आकारातील एक शिलालेख वैशिष्टयपुर्ण असून पावसाच्या माऱ्यामुळे व हा चौथरा छतरहित असल्यामुळे शिलालेखातील अक्षरे अस्पष्ट झालेली आढळतात. प्रस्तुत शिलालेखातील अक्षरे नाजुक व दाट आहेत. हा अमुल्य ऐतिहासिक ठेवा असून बदामी आकाराच्या शिलालेखावर पवित्र कुराणातील काही मजकूर अंकीत असल्याची माहीती येथील व्यवस्थापकांकडून मिळते.

### 5) शिवमंदिर, पिंडी व मंदिरातील इतर शिल्प ः

मध्ययुगात सैनिकांना व वाडया-वस्त्यांतील लोकांना दर्शनाच्या सोयीसाठी शिवपिंडीची स्थापना करून मंदीर ऊभारणी किल्ल्यामार्फत केलेली आढळते. शिवमंदिराच्या अधिष्टानाची तीन फूट ऊंची घेवून बांधणी केलेली आहे. मंदिर सुस्थितीत नसून मंदिराचे स्तंभ घडीव दगडांत एकसंध घडविलेले दिसून येतात. कदाचित वीज पडून किंवा धरणीकंपनाने मंदिराच्या अधिष्टानास मोठा तडा गेला आहे. अनेक भेगा पडून मंदिराचे स्तंभ ऊघडयावर पडलेले निदर्शनास येतात.

मंदिराच्या समोरचा नंदी घडविणाऱ्या पाथरवटाने दर्जेदार कलाकुसरीत नंदीच्या अंगावर दागीने दर्शवून त्यास अलंकृत केला आहे. नंदीची बैठकशैली वैशिष्टयपुर्ण असून मागचा उजवा पाय अंगाच्या खालुन डाव्याबाजूस बाहेर दर्शविलेला दिसून येतो. शिवमंदिरातच समोरील बाजूस एक गणेशमूर्ती व एक नंदी भग्नावस्थेत दिसतात. शिवमंदीरात तीन गणेशमूर्ती असून एका द्वारपट्टीवरही गणेशमूर्ती कोरलेली आहे. एकूण दोन अलंकृत नंदी येथे दिसून येतात. विठ्ठलाची मूर्ती येथे शेजारीच ठेवलेली आहे. सारांश येथील मंदिरात ग्रामस्थांच्या श्रध्देनुसार अनेक देवांची निरनिराळया काळात प्रतिष्ठापना केलेली आढळून येते.

### 6) विळखा घातलेले फणाधारी दोन नागांचे शिल्प ः

प्रस्तुत शिल्पात दोन्ही नागांनी एकमेकांस विळखा घालून फणा काढलेला दर्शविले आहे. हे शिल्प उंच आयताकार दगडात कोरलेले असून याच्याशी साधर्म्य दर्शविणारी शिल्प कोल्हापूर भागात जास्त प्रमाणात आढळून येतात. पन्हाळा किल्ल्याच्या परीघात मोठया प्रमाणात वरील स्वरूपाच्या नागमूर्ती आढळतात. पुर्वी पन्हाळा किल्ल्यास 'पन्नगालय' असे संबोधत होते.[7] याचा अर्थ नागलोकांचे आलय (घर/निवास) असा होतो. प्राचीन कालखंडात नागलोक पन्हाळा किल्ल्यावर राहत होते मात्र नाग लोक व नाग शिल्प यांचा कुठेही संबंध येत नाही. प्राचीन किंवा मध्ययुगात दोन नागांची एकमेकांस विळखा घातलेली अशी शिल्प बनविण्यामागे उद्देश निराळा होता. वस्तीमध्ये नाग निघाल्यावर नागास मारले जात असे. किंबहुना आजही लोहगडवाडीत कोणत्याही जातीचा साप वस्तीमध्ये निघाल्यावर त्यास मारले जाते. मध्ययुगात व्यक्ती किंवा समुहाकडून मारल्या गेलेल्या नागासाठी त्यांच्या जोडीतील दुसरा नाग किंवा नागीन बदला घेण्यासाठी येते अशी भावना मोठया प्रमाणावर

---

[7] इंद्रजीत सावंत, *पर्नालपर्वत पन्हाळगड*, सहयाद्री इतिहास संशोधन केंद्र प्रकाशन, 2009, पृ. 4.

होती. मारलेल्या सर्पाची प्रतिमा त्याच्या जोडीदारासहीत बनवून त्याची पुजा करून प्रायचित्त घेतले जाई. त्यासाठी अशी विळखा घातलेली नागशिल्पे बनविण्याची पद्धत रूढ झालेली दिसून येते. परंतु प्राचीन किंवा मध्ययुगीन समाज जीवनात नाग व नागीन एकमेकांस विळखा घालत असल्याची भावना दृढ दिसून येते. कदाचित दरम्यानच्या कोरणाऱ्या किंवा शिल्प कोरून घेणाऱ्या वर्गास याबाबतचे अज्ञान असण्याचा संभव आहे. कारण नाग किंवा नागीन किंवा कोणत्याही जातीचा सर्प शेपटीवर उभारून विळखा करून आकाशाकडे उंच होण्याचा प्रयत्न करीत नाहीत तर दोन नर मादीसाठी विळख्यात शेपटीवर उभे राहतात ही वस्तुस्थिती आहे. साधारणपणे दोन नरांची ही कृती चालू असतांना त्यांस सर्पकुळाच्या स्वतःला मानवी दृष्टितून लपविण्याच्या मुलभूत गुणधर्माचा विसर पडतो त्यामुळे चटकन त्यांची ही कृती अनेकांस दिसून येते व त्यातून नाग व नागीन या दोघांचा हा विळखा असल्याचा गैरसमज निर्माण होतो. असाच गैरसमज मध्ययुगीन शिल्प कोरणारे पाथरवट व शिल्प बनवावयास लावणाऱ्या लोकांचा झाल्याने त्यातून दोन सर्पाची विळखा घातलेली नागशिल्प मोठया प्रमाणावर कोरल्या गेली. असेच नागशिल्प जोतीबा मंदिराच्या प्रांगणात कोनाडयात ठेवलेले दिसून येते. कशाळ भोयरे, मावळ तालुका येथील भैरवनाथ मंदिराच्या अधिष्ठानावर दोन नागमुर्ती आढळून येतात. लोहगडवाडीतील विळखा दर्शविलेल्या नागमूर्तीस ग्रामस्थांनी शेंदुर लावलेला आहे.

### 7) शंभूमहादेव मंदिराच्या परिसरातील लक्ष्मीनारायण धर्मशाळा ः

शंभूमहादेव मंदिराच्या परिसरात एक गुंठा जागेत स्वातंत्र्यपूर्व कालखंडात एक धर्मशाळा बांधली गेली. पुर्ण पणे दगडात बांधल्या गेलेली येथील धर्मशाळा ब्रिटीश संस्कारीत असल्याचे तिच्या द्वार व खिडकीच्या आकारावरून आढळून येते. ही धर्मशाळा इ.स.**1939** साली बांधल्या गेली व बांधकामास आलेला एकुण खर्च रू.**856/-** झाला. या खर्चाचा सर्व तपशिल येथील शिलालेखात नमूद केलेला दिसून येतो तो पुढीलप्रमाणे ः

रू.**101/-** नारायण वामन बेंद्रे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या मुलाने विनायक नारायण बेंद्रे याने ही धर्मशाळा बांधण्यासाठी दिले.

रू.**101/-** डॉ.शामराव मुळगावकर यांच्या मातोश्री इंदीराबाई यांच्या स्मरणार्थ दिले.

रू.**101/-** विठ्ठल कृष्ण जोशी यांनी मुलाच्या व्रतबंधनानिमीत्त दिले.

रू. **201/-** खंडेराव विष्णू पिटकर, मुंबई

रू. **201/-** मथुरादास वसनजी खेमजी, मुंबई

रू. **151/-** हंसराज गोकुळदास, मुंबई[8]

या धर्मशाळेच्या द्वाराजवळच एक शिलालेख लावलेला असून अक्षरे अस्पष्ट झालेली आहेत.

## 8) लोहगडवाडीतील मोटेची विहीर व भोवतीचे मध्ययुगीन अवशेष ः

सैनिकांच्या घोडयांना तसेच लोहगडवाडीसाठी पाण्याची सोय म्हणून मध्ययुगात लोहगडवाडीच्या उतारावर शंभूमहादेव मंदिराच्या मागच्याबाजूस विहीरीची व्यवस्था केलेली आढळते. दरम्यान अनेक शिल्प येथे पाथरवटांमार्फत बनविले गेलेले दिसून येतात यात घोडयांच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी एक दगडी भांड मोठया शिळेत कोरलेले असून तीन शिवपिंडी व एक गणेश मुर्ती तसेच अनामीक देवही विहीरीच्या शेजारीच कोरलेले आढळतात. विहीरीच्या शेजारीच कपडे धुवण्यासाठी एक मोठया आकारातील पाटा पाथरवटाने बनविलेला असून याचा एक पाय तुटलेला आहे.

मध्ययुगीन विहीरीच्या शेजारील शेतात उताराच्या ठिकाणी ‘टाटा मोटर्स’ मार्फत ‘सुमंत मुळगावकर डेव्हलपमेंट फाऊंडेशन’ तर्फे एप्रिल **2011** मध्ये एक विहीर बांधून देण्यात आली. येथील विहीरीचा व्यास मोठा घेवुन गोलाकार कठडे उंच केलेले आहेत. सध्या गावकरी पिण्याच्या पाण्यासाठी या विहीरीचे व लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख लेणीतील स्तंभी पोढीतील पाणी वापरतात.[9]

- लोहगडवाडी ते घेरेवाडी मार्गातील विहीर व देवमुर्ती ः

---

[8] क्षेत्रभेट, लोहगडवाडी, जुलै **2014**.

[9] क्षेत्रभेट, लोहगडवाडी, जुलै **2014**.

लोहगडवाडी ते घेरेवाडी मुख्य रस्त्याने न जाता किल्ल्याच्या कातळकडयास स्पर्शुन घेरेवाडीस जातांना प्राचीन तसेच मध्ययुगीन अनेक अवशेष दिसून येतात. मध्ययुगात सैनिकांच्या गस्तीसाठी असणारे पहारे, चौक्या व मेटे यांचेही काही अवशेष दिसून येतात.

### 1) लोहगडवाडी ते घेरेवाडी मार्गावरील विहीर क्रमांक 1 :

लोहगडवाडीहून घेरेवाडीस जातांना मार्गावर मध्ययुगीन कूप (विहीर) दिसते. विहीरीचे पाण्याचे नैसर्गीक स्त्रोत आजही जिवंत आहेत.

### 2) लोहगडवाडी ते घेरेवाडी मार्गावरील गणेश मंदिर :

घेरेवाडीस जातांना गणेश मंदीर रस्त्याच्या डाव्याबाजूस आहे. ओबडधोबड शिळेवर येथे गणेश दर्शविलेला दिसून येतो. शिळेस डाव्याबाजूस किरकोळ उंचवटा होता त्यास सोंड करून त्याशेजारी डोळे बसवून छोटया आकाराची गणेश मुर्ती निर्माण केली गेली तसेच छोटेसे घुमटीचे मंदिर करून त्यास 'स्वयंभू गणेश' असे नामकरण करण्यात आले. लहान आकारातील घुमटीचे मंदिर बनवुन त्यास सभामंडप बांधण्यात आला. पर्यटकांना उन्हाळयात किल्ला प्रदक्षिणेत बसावयासाठी हे मंदिर सुस्थितीत आहे.

### 3) भूस्खलनामुळे अर्धवट बुजलेली विहीर व अनामीक देव (देवस्थान :

स्वयंभू गणेश मंदिर ते घेरेवाडी मार्गावर ऊजव्याबाजूस विहीर असून ग्रामस्थांमार्फत सध्या विहीरीस तट बांधण्याचे काम चालू आहे. ही विहीर डबकेसदृश्य दिसते परंतु मध्ययुगात पाण्याचा मोठा स्त्रोत म्हणून या विहीरीचा वापर होत होता असे विहीरीच्या व्यासावरून आढळते. विहीरीच्या मागच्याबाजूस काही दगडधोंडे असून त्यास शेंदुर फासलेले दिसून येते. कोणतेही घडीवकाम व कोरीवकाम येथे दिसून येत नाही किंवा कोणतीही मुर्ती येथे आढळलेली नाही. मावळ तालुक्यात अनेक ठिकाणी दगडधोंडयांस शेंदुर फासून देव केले गेल्याचे दिसून येते.

### 4) घेरेवाडीच्या मार्गातील पुर्णाकृती शिवपुतळा व अपरीचीत पोढी :

लोहगडवाडी ते घेरेवाडी मार्गावर डाव्याबाजूस प्रथम ‘धनगरवाडी’ लागते. पुढे ‘कोळीवाडी’ लागते. घेरेवाडीत शिरतांना असलेल्या मार्गावर फेब्रुवारी **2012** मध्ये घेरेवाडी ग्रामस्थांनी शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा ऊभारून मेघडंबरीही केलेली आहे. विंचुकाटा माचीच्या कातळयास पावसाळयात जेथे लहान आकारातील धवधवा आहे तेथे प्राचीन कालखंडात पिण्याच्या किंवा तत्सम वापराच्या सोयीसाठी एक मोठया आकारातील टाकं कातळयात कोरले असल्याचे दिसून येते. धवधब्याचे पाणी वरतून पडते तोपर्यंत ही पोढी पाण्याने भरलेली असते आणि जेव्हा पावसाळा संपतो तेव्हा दोन महीन्यांपर्यंत किल्ल्यावरील पाणी झिरपत या पोढीत पडते. पोढीचा उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी करण्यायोग्य आहे. प्रस्तुत संशोधनासाठीच्या क्षेत्रभेटीत ही पोढी सर्वप्रथम निदर्शनास आली. लोहगडवाडी ते घेरेवाडीस मार्गात किल्ल्याच्या कातळकडयास स्पर्शुन जातांना ही पोढी दिसून येते. लोकपरिचीत नसलेली ही पोढी जंगली प्राण्यांचा पाणवठा म्हणून सोय ठरली असल्याचे निदर्शनास येते.

## 5□घेरेवाडी बाजूस विंचूकाटामाचीच्या कातळयास असलेली पोढी ः

घेरेवाडीबाजूने विंचूकाटामाचीच्या कातळयास भुयारसदृष्य तिन पोढी असून कायमस्वरूपी यात पाणी साठावे व उन्हाळयाच्या दिवसांतही पोढीतील पाणी संपु नये अशी योजना येथे केलेली आढळुन येते. प्रस्तुत संशोधनातून प्रथमच येथील पोढी व शेवटच्या खोलीपर्यंतची मोजमापे समोर येत आहेत. येथील तीन्ही पोढींचे मुख लहान आकारात कोरून कातळयास आतपर्यंत खोदकाम केलेले आढळते. पोढींची पाणी साठविण्याची क्षमता वाढविण्यासाठी **20** ते **25** फुट सरळ मोठा पॅसेज करून आत मोठया आकारमानाची खोली कोरलेली आढळते. साधारणतः **15** □**15** फुट आकारात खोदल्या गेलेल्या खोलीला अधिक खोल करण्याचा प्रयत्न केला गेल्याचे दिसून येते. खोलीचा आकार मोठा करून खोल करण्यावर भर देण्यात आलेला असे दिसून येते. तसेच **25** फुट लांबीचा पॅसेज संपल्यानंतर खोलीमध्ये उतरतांना **4** फुट खोल खड्डा असून त्यात उतरून मग खोलीत प्रवेशता येते. पोढी कोरतांना पाण्याचा संचय मोठया प्रमाणात होण्यासाठी व उन्हाळयातही पाण्याची धुप न होण्यासाठी खोल्या कोरल्या गेलेल्या दिसून येतात. तद्नंतर त्यातील फोडलेला खडक लहान आकाराच्या मुखातुन बाहेर काढला गेला. परंतु फक्त पाण्याचा संचय करणे हा एकच उद्देश असल्याकारणाने खोली कोरतांना ओबडधोबडपणा दिसून येतो तसेच खडक फोडल्यानंतर बराचसा खडक बाहेर काढुन काही मोठया आकाराचे दगड आतच ठेवल्या गेलेले आढळले. या खोलीच्या आत दगडधोंडयांचा खच पडलेला दिसून येतो.

6 घेरेवाडी ते लोहगडवाडी किल्ल्याच्या ऊत्तरबाजूने कातळकडयाचे मध्ययुगीन महत्व ः

घेरेवाडी ते लोहगडवाडी किल्ल्याच्या उत्तर बाजूच्या जंगलातून रूळलेली पायवाट सोडून कातळकडयास स्पर्शुन लोहगडवाडीस जातांनाच्या मार्गावर मध्ययुगीन गोष्टी दिसून येतात. या तत्सम अवशेषांची नोंद घेतांना विंचूकाटामाची ते लोहगडवाडी अशी घेतलेली आहे. विंचुकाटा माचीस कातळयास प्रथम तीन पोढी उन्हाळयातही पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू नये याकरिता प्राचीन काळात खोदलेल्या आढळतात. तद्नंतर लोहगडवाडीच्या मार्गावर कातळकडयास नैसर्गिक घळयांचा वापर हा लष्करी उपयोगासाठी केलेला आढळते. नैसर्गिक घळईस चढण्यासाठी खालच्याबाजुने पायऱ्या खोदून वरच्या घळईपर्यंत जाण्यासाठी योग्य तो लहान मार्ग कोरला गेल्याचे दिसून येते. लोहगड किल्ला मावळ तालुक्यातील केंद्रस्थानी गणला गेल्याने तसेच मध्ययुगात महाराष्ट्रातील काही निवडक प्रमुख किल्ल्यांमध्ये लोहगड किल्ल्याचा समावेश होत असल्याने या किल्ल्याच्या संरक्षणाची मोठी जबाबदारी असे. लोहगड किल्ल्याच्या अभेद्यतेत सातत्याने भर घालण्याचा प्रयत्न ज्या राजवटीकडे किल्ला असे त्या करीत असत. यात किल्ल्याच्या भोवताली अनेक किल्ले प्रभावळीत संरक्षक किल्ले म्हणुन वसविले जात, जिंकले जात, पर्वतांस कोंदण घालून त्याची ठाणी केली जात. लोहगड किल्ल्याच्या संरक्षणासाठी पहारे यांची रचना केलेली असे. लोहगड किल्ल्याच्या उत्तर बाजूच्या पहाऱ्यांची जबाबदारी या कातळकडयातील सैनिकांची तुकडी करत असल्याचे दिसून येते. किल्ल्याच्या उत्तर कातळयास नैसर्गीक घळ होती. घळीपर्यंत पोहोचण्यासाठी खोदिव पायऱ्या करून घळीत पोहोचल्यावर तेथील पाया छन्नी हातोडयाने सरळ करून याचा लष्करी उपयोग केला गेला. येथील कातळकडयापर्यंत आक्रमक पोहोचणे कठीण होते कारण पहारे गस्ती यांतुन लपुन किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत पोहोचणे सहज नव्हते. जरी शत्रुसैन्य पायथ्यापर्यंत येवुन कातळकडयांस पोहोचले तरी किल्ल्यावरील सैन्यास या घळीतून आरोळी देवुन, शिळ किंवा वाद्य वाजवून शत्रुसैन्य आल्याचे कळविले जात असण्याचा संभव आहे. याशिवाय येथील घळीपर्यंत शत्रूसैन्यास चढता येवू नये याकरीता कातळयास विशेष उंचीवरची घळ पहाऱ्यासाठी निवडलेली आढळते. स्थानिक राजवटीचे सैन्य घळईत येण्यासाठी वरतून साखळी किंवा चऱ्हाट सोडले जाई व शत्रुसैन्य येण्याआधी साखळी उचलून घेतली जायची. सध्या येथे साखळया किंवा चऱ्हाट नाहीत मात्र ते अडकविण्यासाठी दगडात खोदलेल्या अडकणी दिसून येतात. किल्ल्याच्या उत्तर दिशेच्या कातळयास तीन नैसर्गीक घळी असून तिन्हींचा उपयोग लष्करी योजनेसाठी केलेला आढळून येतो. या घळींमध्ये सैनिकांच्या पाण्याच्या

सोयीसाठी टाके खणलेले असून बसण्यासाठी चौथरे कोरलेले आहेत. कातळकडयास स्पर्शुन लोहगडवाडी मार्गा वर नेढयाच्या खालच्या बाजूस दोन कातळखोदीव पोढी दिसून येतात. दोहोंतील एक पोढी गाळामुळे बुजली गेली आहे.

**7** किल्ल्याच्या ऊत्तरबाजूस जंगलातील मध्ययुगीन भग्नावशेष ः

किल्ल्याच्या ऊत्तर बाजूच्या जंगलात गोमुखखिंडीच्या रस्त्यावरून **100** मीटर झाडीमध्ये मुस्लीम समुदायातील लोकांच्या कबर व हिंदु समुदायातील लोकांच्या समाध्या आहेत. प्रस्तुत संशोधनातून या कबर व समाधी प्रथमच निदर्शनास आलेल्या असून यांबद्दल ग्रामस्थ किंवा पर्यटक अनभिज्ञ होते. परंतु अनेक वैशिष्टयपुर्ण आकाराच्या कबर व समाध्या येथे असून विशेष एका समाधीस झाडाच्या बुंध्याने गिळंकृत केलेले निदर्शनास येते. झाडाच्या कवळीत ही समाधी असून एका लहानशा कोपऱ्यावरून ही समाधी असल्याचे निदर्शनास येत आहे. परंतु सध्या प्रस्तुत समाधी अदृष्य अवस्थेत जाण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येते. गोमुखखिंड ते लोहगडवाडी या मार्गा वर रस्त्याच्या उजव्याबाजुस अनेक छोटया–मोठया आकाराच्या समाध्या आढळतात. काही समाध्यांची ऊंची **4** फुट असून चार  ाच संख्येने दगडी घोडे दुर्लक्षीत अवस्थेत पडलेले आहेत. येथील मध्ययुगीन दगडी समाध्या किंवा भग्नावशेष यांना घुमटी किंवा छत नाही. अनेक वर्षे पावसाच्या माऱ्याखाली ही शिल्प असल्याने यांचे नुकसान झालेले आहे. मध्ययुगात घोडयांवरील प्रेमाची ही स्मारके असून त्यातून दरम्यानच्या काळातील वाहन म्हणून वापरत असलेला घोडा या प्राण्याप्रती संवेदनशिल समाजमन दिसून येते. परंतु येथील काही शिल्प चोरी गेली व काही समाध्या तसेच भग्न ऐतिहासिक शिल्प ग्रामस्थांची घरे व मंदिरे बांधतांना पायाच्या कामी आली असे दिसून येते. किमान उपलब्ध समाध्या व विरगळी तसेच कबर आणि ऐतिहासिक महत्वपुर्ण भग्नावषेश यांचे ग्रामस्थ व पुरातत्वखाते यांमार्फत जतन होत नसल्याचे आढळते.

- लोहगड किल्ल्यावर जाण्याच्या मार्गावरील डाव्याबाजूची घडीव चौकोनी विहीर ः

किल्ल्यावर जाण्याच्या मार्गावरील डाव्याबाजूस चौरस आकारमानाची **30** फुट खोली असलेली विहीर आहे. ही विहीर चौरस असून लोहगड किल्ल्याच्या इतर विहीरींमध्ये निराळया आकाराची म्हणून ओळखली जाते. **3**

फुट ऊंचीचा जाड संरक्षक कठडा चौकोणी आकारात या विहीरीस बांधून घेतलेला असून विहीरीच्या तळाशी दरवाजासारखे बांधकाम दिसत असल्याने अनेकदा लेखकांद्वारे हे भुयार असल्याचे लिहील्या गेले तसेच पर्यटकांत येथील भुयाराबद्दल संभ्रम निर्माण झाला होता. परंतु प्रस्तुत लेखकाच्या सर्वेक्षणात विहीरीतील द्वारसदृष्य भाग तोडी ढासळल्याने झालेला असून येथे भुयार तसेच खोली वगैरे आढळलेले दिसून येत नाही. विहीरीच्या तळाजवळ काही तोडी पडून लहान अकारातील छोटी पोकळी नैसर्गिक येथे झाल्याचे निदर्शनास आले. किल्ल्यांच्या परिघातील गावांमध्ये लोककथांतून भुयारी भ्रामक संकल्पना कायम दिसून येतात. परंतु लोहगड किल्ल्याच्या माथ्यावर निघणारे भुयार येथून असल्याची दंतकथा असल्याचे सर्वेक्षणातून समोर येते आहे.

- किल्ल्याच्या प्रथम पायरीपासून सुरू होणारे मध्ययुगीन अवशेष ः

किल्ल्याच्या प्रथम पायरीपासून मध्ययुगीन अवशेष दिसून येतात. प्रथम पायरीपासून साधारण **50** पायऱ्या चढून डाव्याबाजूच्या जंगलात **10** □ **10** फुट आकाराची एक छोटया आकाराची चौकी दिसते. सध्या या ठिकाणावर चुलीसाठी सरपण गोळा करणारे ग्रामस्थ सोडता कोणी जात नसल्याने येथील चौकी पर्यटकांच्या निदर्शनास येत नाही. किल्ल्याच्या परिघावर लक्ष ठेवण्यासाठी या चौक्या बांधल्या गेल्या होत्या. मध्ययुगात किल्ल्यास प्रथम प्रवेशद्वारापर्यंत चौक्या, मेटे, पहारे यांच्या गस्ती कायम असत. जंगलातील लहान चौक्यांत कोळी, रामोशी व यांसारख्याच शौर्यवान काटक जमातींचे लोक पहाऱ्यास ठेवण्याची मध्ययुगीन रीत होती. परंतु सध्या येथे होणाऱ्या भुस्खलनामुळे वरील दगडगोटे व गाळ येथे वाहून आल्याने चौकी व अनेक अवशेष नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

- पायऱ्यांच्या प्रारंभी कट्टयावरील भग्न बलाढय तोफ ः

किल्ला चढतांना पायऱ्यांच्या प्रारंभी मोठया आकारातील भग्न ओतीव तोफ झाडाच्या कट्टयावर ठेवलेली आहे. भग्न झालेली ही तोफ विसापूर किल्ल्यावरील दोन्ही तोफांशी साधर्म्य दर्शविणारी आहे. या तोफेचा अर्धा

भाग येथे शिल्लक असून बाकीची अर्धी तोफ आजवर प्रकाशात आलेले नाही. लोहगड किल्ल्यावर एवढया मोठया आकारातील एकही तोफ नसल्याचे दिसते. या भग्न तोफेची लांबी **2.10** फुट असून लोखंडी किंवा दगडी तोफगोळा **5** इंच व्यासाचा होता असे तोफेच्या मुखावरून दिसते. प्रस्तुत तोफेस लोहगड किल्ल्यावरून खाली ढकलून दिले असल्याने तोफेचा भंग झालेला आढळतो. सध्या या तोफेस लाल व पिवळया रंगाचे ऑई लपेंट लावलेले आहेत.

- अर्वाचीन काळातील हौद, दोन अखंड तोफा व दोन चुण्याचे घाणे व चर ः

प्रथम प्रवेशद्वार मार्गावर ऊजव्या बाजूच्या कातळयास प्राचीन काळातील लेणी असून प्रवेशद्वाराच्या अलीकडील मोकळया जागेवर मुरूमाच्या कातळयास स्पर्शुन अर्वाचीन काळातील पाण्याचा लहान आकारातील हौद दिसतो. हौद पुर्णपणे भग्न झालेला असून याचे किमान अवशेष शिल्लक राहिलेले दिसून येतात. या हौदाची बांधणी अर्वाचीन काळातील असून एकाच हौदात मधोमध भिंत बांधून दोन विभाग निर्माण केलेले आहेत. या ठिकाणी पाण्याची मुबलक आवश्यकता नसावी परंतु पिण्यासाठी व्यवस्था असावी म्हणून येथे लहान आकारातील कमी उंचीचा हौद निर्माण केलेला दिसून येतो. हौदास आतमधीलबाजुने चुन्याचा गिलावा केलेला होता.

प्रथम प्रवेशद्वाराच्या मार्गावर हौदाशेजारी मोकळी जागा असून येथे चुण्याच्या घाण्याच्या दोन्ही बाजूला दोन तोफा ठेवलेल्या आहेत. चराच्या आत घाणा रूतवून बैलांच्या सहाय्याने घाणा ओढण्याची पद्धत मध्ययुगात रूढ होती. चुण्याच्या घाण्याशेजारी खोदून येथील जागा स्वच्छ केली तर घाण्याचा चर येथे दिसण्याचा संभव आहे. कारण तिकोणा किल्ल्यावर चुण्याचा घाणा दिसत होता परंतु त्याच्या शेजारील माती खणल्यावर घाण्याचा **15** फुट व्यास असलेला चर नव्यानेच समोर आलेला दिसून येतो. तसेच अजिंक्यतारा किल्ल्यावरील चुण्याचा घाणा दृश्य स्वरूपात होता. मात्र किल्ल्याच्या साफसफाई मोहिमेत येथे **20** फुट व्यास असलेला चर समोर आला. लोहगड किल्ल्याच्या येथील घाण्याच्या तळाशी चर असण्याचा संभव आहे. येथील घाण्याची जाडी **1** फुट असून व्यास **4** फुट आहे. घाणा ओढण्यासाठी मधोमध लाकडाचा ओंडका लावलेला असे. येथील घाण्याचा लाकडी

ओंडका **8** इंच व्यासाचा असून घाण्याच्या दोन्हीबाजूंनी दोन ओतिव तोफा पुरातत्वखात्यामार्फत मांडलेल्या आहेत. येथील घाण्याच्या शेजारी **100** फुट अंतरावर गड ऊताराला रस्त्याच्या डाव्याबाजूस समान आकाराचा चुण्याचा घाणा चरात उभा असल्याचे दिसते. मात्र याठिकाणीही चर दिसून येत नाही. या दोन्ही घाण्यांना बैलांनी ओढण्यासाठी भोवतीची जागा मोकळी असणे आवश्यक होते त्यामुळे ज्या ठिकाणी मोकळी जागा होती तेथेच घाणे निर्माण केलेले आढळतात.

दोन अभंग ओतीव तोफा चुण्याच्या घाण्यानजीक दोन्हीबाजुंनी ठेवलेल्या आहेत. या दोन्ही तोफांचा लोखंडी किंवा दगडी गोळा **4** इंच व्यासाचा असल्याचे तोफांच्या मुखावरून आढळते. दोन्ही तोफांवर इंगज्री अक्षरात “P” नमुद आहे. यावरून दोन्ही तोफा ब्रिटीश कालखंडातील असल्याचे दिसून येते. दोन्ही तोफा ओतीव असून घाण्याच्या ऊजव्याबाजूची तोफ **4.6** फुट व डावीकडील तोफ **5.6** फुट लांब आहे. पावसाळयात तोफांच्या मुखातून पाणी आत जावून अनेकदा साचते त्यामुळे येथील तोफा गंज लागुन खराब होण्याच्या मार्गावर असल्याचे आढळते. येथील तोफांचे व लोहगड किल्ल्याच्या परीघातील शेकडो समाध्या, कबरी व मुर्त्यांचे एक संग्रहालय किल्ल्याच्या पायथ्यास होवु शकते इतक्या संख्येने ऐतिहासिक अवशेष किल्ल्याच्या परिघात आहेत. यामुळे येथील सर्व वस्तू अबाधीत राहतील व पर्यायाने इतिहास संशोधकांस व पर्यटकांस एकाच ठिकाणी सर्व वस्तू पहाण्याकरिता मिळतील. या संग्रहालयास नाममात्र शुल्क आकारल्याने पर्यायाने ग्रामपंचायतीस आर्थिक सहाय्य मिळेल. त्याचप्रमाणे गावकर्यांस रोजगार ऊपलब्ध होईल.

<u>तोफांविषयी माहिती</u> ः

“किला संरक्षणाचे कारण ते भांडी व बंदुखा”[10] मध्ययुगात तोफांस अनन्यसाधारण महत्व दुर्गशास्त्रात दिलेले दिसून येते. लोहगड किल्ल्यावर मध्ययुगात भरपुर संख्येने तोफा असल्याचे दिसून येते. तोफांचे अनेक प्रकार आहेत यात बांगडी तोफ, ओतीव तोफ, पीलनाला (हत्तीवरून डागावयाची तोफ), शुतरनाला (ऊंटावरून डागावयाची तोफ) यातील बांगडी तोफ ही ओतीव तोफेपेक्षा जास्त सरस असून कोणत्याही कारणाने तोफेची रंजुकी (वात लावावयाची जागा) निकामी होते त्यावेळी बांगडी तोफेची फक्त रंजुकी असलेली बांगडी काढुन

[10] रामचंद्रपंत अमात्य, *आज्ञापत्र;* मुळ मोडी प्रत ऊपलब्ध - राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, पृ. **32**.

दुसरी लावता येते परंतु जर ओतीव तोफेबद्दल असे घडल्यास संपुर्ण तोफ बाद होते आणि ती पुन्हा तापवून ओतावी लागते.

तोफ डागल्यानंतर तोफेच्या आवाजाने किल्ल्यावर अनेक दुष्परिणाम होतात, यात पाण्याचे टाके निकामी होणे, इमारतीला तडे जाणे, कायमचे बहीरेपण येणे व तोफेचा ऊलटवार दणका बुरूजावर बसून बुरूज कमकुवत होणे किंवा दुभंगणे या गोष्टी टाळण्यासाठी तोफेच्या ठिकाणी तोफेच्या फिरण्याच्या परीघात गोलाकारात **4** फुट खोलीचा सलग खड्डा घेतलेला दिसतो. अशा प्रकारचे बांधकाम विसापूर किल्ल्याच्या ईशान्य बुरूजावरही आढळते, तसेच नळदुर्ग किल्ला□ऊस्मानाबाद जिल्हा□व विजापूर □कर्नाटक□मधील ऊपली बुरूजावरही असे बांधकाम आढळते.

तोफांच्या प्रचंड आवाजाने कान फाटण्याची शक्यता होती त्यामुळे कानात कापसाचे बोळे घालत याहून अजस्त्र तोफा प्रचंड आवाज करीत त्यासाठी तोफांच्या लगत पाण्याचे हौद भरून ठेवत. तोफेस वात दिली की गोलंदाज पटकण हौदात बुडया घेत. एकदा तोफेचे भांडे धडाडले की पुन्हा तोफ डागण्याच्या आधी तोफेस थंड करावे लागे त्यासाठी तोफेवर पाणी ओतणे, गोणपाट ओले करून त्यावर आंथरणे या योजना कराव्या लागत. भट्टीमध्ये धातूंचा रस साच्यात ओतून थंड करून तोफा बनविल्या जात असत. मध्ययुगात लोखंड, पितळ, पंचधातू अशा धातुंमध्ये तोफा बनविल्या जात होत्या. यातील पंचधातूची तोफ जास्त दणकट असल्याने व एकदा डागल्यानंतर इतर तोफांच्या तुलनेत लवकर थंड होणारी असल्याने तसेच ऊन्हाळयाच्या दिवसांत ऊन्हाने तप्त न होणारी अशी दर्जेदार गणली जाते.[11] उदाहरणार्थ ः रूमीखान दख्खनी याने अहमदनगर शहरात गाळलेली 'मेंढातोफ' नंतर देवगीरी किल्ल्यावर नेण्यात आली व सध्या देवगीरी किल्ल्यावरील चिनी महलच्या शेजारच्या बुरूजावरील ती ठेवण्यात आली.

सर्वसाधारण पंचधातूच्या तोफा लहान आकाराच्या आढळतात. मोठया आकारातील तोफा लोखंड या धातुमध्ये आढळून येतात. आकाराने अगदी लहान असणाऱ्या तोफा(जंबुरे) हातात धरून डागल्या जात, लहान तोफा या हत्तीवरून□ऊंटावरून डागल्या जात, मध्यम आकाराच्या तोफा या दोन चाकांच्या गाडयावरून डागल्या जात व अजस्त्र तोफा बुरूजावर एका मोठया जाडजूड खुंटीवर ठेवून त्या गोलाकार **360** अंशात फिरतील अशा

---

[11] प्र.व.भोसले, *दुर्गरचना*, नरसिंह प्रकाशन, **2006**, पृ.**25-26**.

प्रकारे व्यवस्था करून डागल्या जात. तोफेची दारू व बंदुकीची दारू ही वेगवेगळी असे. यातील बंदूकीची दारू ही जास्त स्फोटक व ज्वालाग्रही असून ती लहान आकाराच्या कुप्यांत ठेवण्याची पद्धत होती. या कुप्यांच्या तोंडाशी असलेल्या पोकळ नळीतून दारू बंदूकीत भरली जात असे. दारू भरतांना कुपी थेट बंदुकीच्या नळीत धरून हलवली की बंदुकीत दारू भरली जात असे. लढाईच्या वेळी बंदुकीच्या दारूच्या कुप्या कमरेस अडकविण्याची पद्धत असे. सुरूवातीला ठासणीच्या बंदुकांस ट्रिगर नव्हते व बंदुकांच्या नळया किमान **4** फुट लांबी व कामल **10** फुट लांबीच्या असत. तोफेत दारू भरतांना मारा करण्याच्या अंतराचा अंदाज घेवून दारू भरण्याचे प्रमाण ठरवीले जात असे. तोफेचा गोळा दगडी किंवा ओतिव लोखंडी असे तद्नंतर कुलपी गोळयांची पद्धत आलेली दिसते. बंदुकींच्या गोळया दगडी किंवा बहुतांशी शिश्याच्या तयार करण्याची पद्धत असे. तोफांचे ओतकाम करतांना उठावदारपणे उमटतील अशी चिन्हे, अक्षरे, आकडे, नक्षी, तोफा बनविणाऱ्याचे किंवा राजाचे नाव तसेच अकाळविकाळ प्राण्यांच्या तोंडाचे आकार वठविले जाण्याची पद्धत असे. मध्ययुगात दर्जेदार व लांबपल्ल्याच्या तोफा पोर्तुगीज व इंग्रजांकडून खरेदी करण्याची पद्धत दिसून येते. शिवाजी महाराजांनी ब्रिटीशांकडून तोफा विकत घेतल्या होत्या तसेच ब्रिटीशांनी अनेकदा मुघलांना तोफा व दारूगोळा विकल्याचे मध्ययुगीन कागदपत्रांतुन आढळुन आले आहे. काही किल्ल्यांवर मोठया आकाराच्या लोखंडी तोफा आजही दिसून येतात. लहान आकाराच्या तोफा परिंडयाच्या व देवगिरीच्या किल्ल्यावर भरपूर प्रमाणात असून त्या जतन करून ठेवल्याचे आढळते.

- लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख कातळकडयातील लेणी ः

मावळ तालुक्यात छोटया मोठया एकुण **55** लेणी आढळतात. मावळ तालुक्यात परिचीत लेणी 'कार्ले, बेडसे, भाजे, घोरावडेश्वर' या आहेत. परंतु येथील अनेक पर्वतांस पोढी व खोल्या तसेच स्तुप कोरण्यात आलेले आढळून आले आहे. सातवाहन कालखंडात कोरल्या गेलेल्या लेणीची मावळ तालुक्यात पर्वतांवर श्रृंखला पहावयास मिळते. सातवाहन राजवंशास पुराणांमध्ये 'आंद्रसातवाहन' असे संबोधले आहे. भारतप्रसिध्द सातवाहन वंश मावळ तालुक्यातील 'आंदर मावळातील' असण्याचा संभव आहे असे अनेक इतिहास संशोधकांचे मत आहे. तत्कालीन बौध्दभिक्षूंच्या रहाण्याची व पाण्याची सोय तत्कालीन राजवंशाने केली होती. त्यामुळे

बौध्दभिक्षूंच्या सोयीसाठी मावळ तालुक्यातील सर्वात मोठी गणली जाणारी कार्लेलेणी येथून थेट घोरावडेश्वरच्या लेणीपर्यंत बहुतांशी पर्वतांच्या कातळकडयांस लेणी व पोढी तसेच खोल्या कोरण्यात आल्याचे दिसून येते. कार्ले येथून बौध्दभिक्षू भाजे येथील लेणीस जात असत, तेथून बेडसे येथील लेणीस जातांना विसापूरचा किल्ला चढून जात असत. विसापूरचा डोंगर न चढता बेडसे लेणीस जाणाऱ्या भिक्षूंसाठी लोहगडाच्या पुर्वभिमुख लेणी हे निवासस्थान असण्याचा संभव आहे. तद्नंतर पुर्वेकडे जातांना तुंग किल्ल्याच्या कातळात नव्याने संशोधात सापडलेली **147** फुट लांबी असलेली लेणी होतीच त्यानंतर पुर्वेस घोरावडेश्वरच्या लेणीस जातांना मधल्या टप्प्यात तिकोणा किल्ल्याची गडदलेणी सोडता इतर एकही लेणी आजपर्यंत आढळून आलेली नाही. गडदलेणी तिकोणा किल्ल्याच्या दक्षिण कातळयात खोदली गेली. लोहगड किल्ल्याच्या पुर्वमुखी लेणी दरम्यानच कोरलेल्या असण्याचा संभव आहे. लोहगड किल्ल्याच्या पुर्वमुखी लेणीस पोढी, रहाण्यासाठी खोल्या, बसण्यासाठी व झोपण्यासाठी कट्टे अशा सुवीधा दरम्यान लेणीमध्ये कोरल्या गेल्याचे आढळते.

लोहगड किल्ल्याच्या पुर्वमुखी लेणी मावळ तालुक्यातील इतर लेणींहून रचनेने काहीशा वेगळया प्रकारच्या आहेत. येथील लेणींचे आजवर कमांकवार लेखन झालेले नव्हते. लोहगड किल्ल्याच्या लेणी ‘तिकोणा, विसापूर, तुंग, राजमाची, कोराईगड’ या किल्ल्यांस असलेल्या एकेरी पट्टयातील लेणी सारख्या रचनेच्या नसून दोन टप्प्यांत वर□खाली अशा रचनेत कोरल्या गेलेल्या दिसून येतात. लेण्याद्रीची लेणी व लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख लेणी यांत साम्य असल्याचे दिसून येते. सारांश लोहगड किल्ल्याचा जंगलवाटेने सहज पोहोचता येईल असा पुर्वेचा कातळा लेणींची निर्मिती करण्यासाठी योग्य होता हे हेरून सातवाहन कालखंडात पुर्वाभिमुख लेणी कोरली गेली असे दिसून येते.

लोहगड किल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वाराच्या अलिकडे उजव्याबाजूच्या जंगलातून कातळयापर्यंत जंगलाच्या मार्गाने जावे लागते. दोन टप्प्यात वर व खाली अशी लेणी येथे खोदली गेली. त्यातील वरच्या लेणीस जाण्यासाठी असलेल्या पायऱ्या आकाराने लहान असून कातळकडयास चिकटुन वर चढावे लागते. चढतांना पोढी व वऱ्हांडा असे अवशेष दिसून येतात.

**1**□वरच्या टप्प्यात खोदलेली कमांक **1** ची लेणी ः

वरच्या टप्प्यातील क्रमांक एक असलेल्या लेणीची निर्मिती करतांना प्रथम पायऱ्यांची निर्मिती केलेली आढळते. कातळकडयास अनेक खोल्या व पोढी कोरल्या व तद्नंतर वरच्या बाजुच्या कातळयात पायऱ्या करून खोल्या व पोढी केल्या गेल्याचे दिसून येते. वरती कोरल्या गेलेली लेणी खालच्या लेणींपासून 60 फुट उंच अंतरावर असून येथील खोली व पोढी कोरतांना आधी व्हरांडा ठेवला गेल्याचे दिसून येते व वऱ्हांडयात मोठया आकाराचे ओटे बसण्यासाठी व झोपण्यासाठी खोदलेले निदर्शनास येते. येथील खोलीची रचना इतर खोल्यांपेक्षा जास्त कल्पकतेने केलेली दिसून येते. खोली कोरतांना छन्नीचे डाग ओबडधोबड दिसू नयेत यासाठी खोलीचा मध्य घेवुन छन्नीच्या टाक्यांसही नक्षी कोरण्यात आलेली दिसून येते.

येथील खोलीचा व्हरांडा **23** × **10.6** फुट आहे. संपुर्ण वऱ्हांडयाची ऊंची **6.3** फुट सलग आहे. येथे बसावयासाठी केलेले कट्टे इंग्रजीमधील 'L' एल आकाराचे असून दोन्ही बाजूंस समांतर कोरल्या गेलेले आढळतात. दोन्ही कट्टे **1.5** फुट ऊंचीचे असून व्हरांडयाच्या ऊजव्याबाजूस व्हरांडा संपतो तेथे पोढी निर्माण केलेली आहे. सध्या पोढीची पुर्णपणे पडझड झालेली आढळते. पोढीत मोठया संख्येने दगडं पडलेली दिसून येतात. छत पडल्याने व पोढीस छिद्र पडल्याने पावसाळयातही येथे पाणी साचत नाही. व्हरांडयातून खोलीत जातांनाच्या भिंतीचा दगड कमकुवत झालेला असून दोन्ही बाजूंनी फुटलेला दिसून येतो. प्रवेशद्वार **5.1** × **3.1** फुट आकाराचे असून किल्ल्यावरील पाण्याचा लोंढा कातळकडयावरून येथील वऱ्हांडयात येतो. व्हरांडयातून चौकोनी खोलीत प्रवेशतांनाच्या द्वारास प्राचीन कालखंडात पडदे लावण्याची पद्धत होती त्यासाठी बांबू ठोकल्याचे आढळते. काही वस्तू अडकविण्यासाठी छतास दगडी अडकण्या येथे खोदलेल्या आढळतात. दोन्ही बाजूंच्या भिंतींस दिवा लावणीसाठी कोनाडे केलेले असून व्हरांडयाच्या प्रवेशद्वारातून आत प्रवेशल्यावर **13.2** × **13.2** फुट चौकोनी आकाराची खोली आहे. या खोलीतून पुन्हा दोन खोल्या आतमध्ये खोदल्या गेलेल्या आढळतात. चौकोनी खोलीतून डाव्या बाजूस असलेल्या खोलीत प्रवेशण्यासाठी **5.1** × **3.1** फुट आकाराचे प्रवेशद्वार असून ही खोली लहान आकाराची आहे. समान आकारमान व रचना असलेली खोली चौकोनी खोलीत समोरच्या बाजुच्या कातळयास खोदलेली दिसून येते. व्हरांडयातून संरक्षणासाठी लहानगी भिंत ठेवण्यात आलेली दिसून येते. वरच्या टप्प्यातील लेणी ऊतरतांना पहील्या पायरी जवळ ऊजव्याबाजूच्या कातळयास बसण्यासाठी कट्टा कोरलेला दिसतो. या कट्टयावरून लांबपर्यंतचा प्रदेश दिसतो. बसावयाच्या कट्टयाशेजारी पोढी कोरलेली असून पोढीची विशेषता अशी की पायऱ्या ऊतरतांना यातील पाणी काढता येते तसेच लेणीच्या बाजूनेही जावून

यातील पाणी वरच्या मुखातून काढता येईल अशी व्यवस्था केलेली आढळते. पोढीतून वरच्या मुखातून पाणी काढता यावे यासाठी पोढीच्या 1 फुट जाडी असलेल्या छतास चौकोणी आकाराचे लहान मुख ठेवलेले दिसून येते. ही पोढी भंगली असून पावसाळयाच्या दिवसांतही येथे पाणी साचत नाही. येथील पोढीपासून 15 पायऱ्या उतरून खालच्या लेणीजवळ पोहोचता येते.

**2) क्रमांक 2 ची खोली :**

क्रमांक 2 ही खोली आयत आकाराची आहे. 21.10 × 18.10 फुट याचा आकार असून छत 7 फुट ऊंचीचे आहे. येथील लेणीचे द्वार कातळयास थेट न घेता कातळा 6 फुट आतमध्ये कोरून मग खोली कोरलेली आहे. याचे प्रयोजन पावसाळयाच्या दिवसांत पाण्याचा मोठा लोंढा वरच्या बाजूने सातत्याने वाहतो. खोलीच्या आतमध्ये पाणी येवु नये याकरीता ही योजना केलेली आढळते. येथील खोली कोरतांना संपुर्ण कातळा 6 फुट आत कोरल्या गेला व याची लांबी 15 फुट ठेवलेली आढळते. या 15 फुट कातळयास मधोमध द्वार केल्याने खोलीच्या सौंदर्यात वाढ झालेली दिसून येते. प्रवेशद्वार 5.6 × 3.4 फुट आकाराचे असून पावसाळयात येथे चिखल असतो व ऊन्हाळयात रेतीसारखी माती येथे आढळते. खोलीत ऊजव्याबाजूस दगड झिजून मोठया प्रमाणावर फुटलेला आहे. ही खोली सुस्थितीत असून ऐवढे एकमेव छिद्र येथे पडलेले आढळते. येथील लेणीत ऊजव्याबाजूच्या दोन्ही कोपऱ्यांत दोन पलंग 2 फुट उंचीत कोरलेले असून त्यास उशी (pillow) खोदण्यात आलेली निदर्शनास येते. झोपण्यासाठी कोरलेला कट्टा 7 फुट लांबीचा असून झोपण्याच्या कट्टयांस उशी कोरण्याचे हे दुर्मिळ उदाहरण असल्याचे निदर्शनास येते. येथील खोलीत दिवा लावणीसाठी कोनाडे कोरलेले आहेत.

येथील कक्षातून म्हणजेच क्रमांक 2 च्या लेणीतून क्रमांक 3 च्या लेणीत जाण्यासाठी बाहेर पडून पुन्हा आत शिरण्याची आवश्यकता नसून झोपण्यासाठीच्या दोन्ही आसणांच्या मधोमध क्रमांक 3 च्या खोलीत प्रवेशण्यासाठी द्वार ठेवलेले आहे. क्रमांक दोनच्या लेणीच्या वरच्या कातळयास एक पोढी असून शिडीशिवाय ती पाहता येत नाही.

**3□क्रमांक 3 ची खोली ः**

कमांक **3** च्या खोलीमध्ये कमांक **2** च्या खोलीतून एक पायरी खाली ऊतरून प्रवेशावे लागते. **25 □15** फुट आकाराची ही खोली समोरच्याबाजूने कातळफोडून मोकळी केलेली असून खोलीच्या छतास वस्तू अडकविण्यासाठी दगडात अडकण्या खोदलेल्या आहेत. अशाच प्रकारच्या दगडात खोदीव कडया या खोलीच्या भिंतींसही आहेत. येथील खोलीच्या पश्चिम कातळयास आणिक एक **13.3 □12.6** फुट आकाराची खोली कोरली असल्याचे दिसून येते. क.**3** च्या खोलीच्या कोप□तुन प्रवेश असलेली ही खोली कायम अंधारमय असून तीचे द्वार **6 □3.2** फुट आहे. एक विशेष बाब या खोलीच्या बाबत असून येथील खोलीत प्रवेशतांना डाव्याबाजूच्या कातळयावर खालून **3** फुट ऊंचीवर एक आयताकारात छिद्र आहे. या छिद्राचे प्रयोजन स्पष्ट झालेले नाही. हे आयताकृती छिद्र पोस्टाच्या पेटीच्या मुखाच्या आकाराचे असून **2** फुट **□2** इंच असा याचा आकार आहे. आयत आकाराच्या छिद्रातून काही वस्तूंची देवाणघेवाण करण्यासाठीचे प्रयोजन असण्याचा संभव आहे. येथील आतमधील खोली येथील सर्व खोल्यांच्या तुलनेत ओबडधोबड छत असलेली आहे.

**4□क्रमांक 4 ची खोली ः**

कमांक **4** ची खोली मध्ययुगात बांधलेल्या भिंतीमुळे विभागली गेली असे दिसते कारण **25** फुट लांबी व **1.6** फुट जाडी असलेली भिंत मध्ययुगात बांधली गेली. मध्ययुगातील सैनिकांनी लष्करीदृष्टया सोयीस्कर व्हावे यासाठी येथे भिंत बांधलेली आढळून येते. म्हणून प्राचीन कालखंडातील पडलेल्या कातळयावर मध्ययुगात सैनिकांनी नव्याने जाडजुड भिंत चुना □वाळू व दगडात बांधून घेतली अशाच प्रकाराची एक भिंत क.**4** च्या खोलीत जातांना उजव्याबाजूस बांधून घेवून या खोलीस लहान आकाराचे द्वार तयार केलेले दिसते.

**5□क्रमांक 5 आयताकार खोली ः**

कमांक **5** कातळखोदीव खोली असून येथे पावसाळयात पाण्याचा संचय मोठया प्रमाणावर होतो. उन्हाळयातही येथे पाण्याची ऊपलब्धता थोडया प्रमाणात असते. सध्या या खोलीत गाळ मोठया प्रमाणावर वाहून आल्याने याचा खोलपणा कमी झालेला आढळतो. वस्तू अडकविण्यासाठी या खोलीस दगडात खोदलेल्या कडया एकारांगेत दिसून येतात. मध्ययुगात येथील कातळयाच्या खालच्या बाजूचा काही भाग तुटल्याने दगडाचुण्यात तो बांधून घेतल्याचे दिसून येते. येथे प्राचीन कालखंडातील दोन्ही खोल्यांमधील दगडी कातळ पडल्याने मध्ययुगात त्या पडक्या अर्ध्या भिंतीवर दगड विटांत नव्याने भिंत बांधण्यात आली. त्यामुळे येथील भिंत अर्धी प्राचीन व अर्धी मध्ययुगीन असल्याचे आढळते. येथील खोलीस लहान आकाराचे कवाडं बसविले होते असे येथील दगडी कुसांवरून दिसून येते.

**6□क्रमांक 6 ची दोनखांबी पोढी ः**

कमांक **6** ची पोढी सुस्थितीत असून आजही लोहगडवाडी ग्रामस्थ पिण्यासाठी या पोढीचे पाणी वापरतात. पिण्यासाठी स्वच्छ पाणी हे या पोढीचे वैशिष्टय आहे. प्राचीन कालखंडात निर्माण करण्यात आलेल्या अनेक पोढी व पाण्याचे मोठे तलाव तसेच टाके भंग झालेले अनेक किल्ल्यांवर दिसून येते. परंतु प्राचीन कालखंडात कोरलेली ही स्तंभी पोढी ग्रामस्थांमार्फत पाण्याचा रोज उपसा असूनही स्वच्छ व अक्षय असल्याचे दिसून येते. ही पोढी तुंग किल्ल्याच्या चारखांबी पोढीशी साधर्म्य दर्शविते. **30 □25** फुट आकारमान असलेल्या पोढीचे मुख लहान आकारात असल्याने येथे कचरा कमी प्रमाणात आतमध्ये जातो त्यामुळे या पोढीतील पाणी स्वच्छ राहते. आतमध्ये चौकोणी आकाराचे दोन खांब पोढीच्या छतास आधार देण्यासाठी ठेवलेले असून हे खांब तळाशी जाड असून वरच्या टोकाशी निमुळते कोरलेले आहेत. दोन्ही स्तंभ शेजारी असून फारसे सुबक कोरीव काम न करता

ढोबळमानाने कोरलेले व फक्त आधारापुरते याचे प्रयोजन असल्याचे दिसून येते. पोढीच्या मुखात ऊतरण्यासाठी **2** फुट ऊंची असलेली एक पायरी असून पोढीच्या तोंडाची लांबी **6** फुट तर रूंदी **4** फुटांची आहे. या तोंडात ऊरतल्यावर येथे बसण्यासाठी जागा आहे व येथून पाणी काढता येते. या टाक्याच्या तोंडात एक लिंगविरहीत शिवपिंड(शाळुंखा) कातळयासच कोरलेली आहे. या प्रकारची लिंगविरहीत लहान आकाराची शाळुंखा कातळयात कोरलेली आहे. अशा शाळुंखा मावळ तालुक्यातील अनेक पाण्याच्या टाक्यांवर आढळून आल्या आहेत. येथील शाळुंखा व अन्य किल्ल्यांवरील पाण्याच्या पोढींवर किंवा टाक्यांवर असलेली शाळुंखा नैसर्गी करित्या अस्पष्ट झालेली असून याच प्रकारच्या अनेक शाळुंखा बहुतांशी किल्ल्यांवरील पोढी व पाण्याच्या टाक्यांवर आढळतात. उदाहरण ः लोहगडवाडी बाजूने विसापूर किल्ल्यावर जातांना तटबंदीच्या जवळचे ब्राम्ही लीपी असलेल्या प्राचीन टाक्याशेजारी लहान आकारात लिंगविरहीत पिंडी कोरलेली आहे तसेच तुंग किल्ल्याच्या माथ्यावरील पोढीच्या डाव्याबाजूच्या कातळयावर लिंगविरहीत शिवपिंडी कोरलेली सापडते. नवलाखऊंब्रे गावाच्या मागीलबाजूस असलेल्या व करंजविहीर गावच्या माथ्याच्या डोंगरास असलेल्या चक्रेश्वर देवस्थानातही मोठया पिंडीच्या शेजारी अशा प्रकारची शिवपिंडी कोरलेली आढळते. याशिवाय प्राचीन कालखंडातील बहुतांशी पोढींवर या प्रकारातील शाळुंखा आढळतात. ऊदाहरणार्थ ः भोरगीरीचा किल्ला, ता.खेड, जि.पुणे. पाण्याच्या संचय करण्याच्या अनेक ठिकाणी लिंगविरहीत शिवपिंड कोरल्या गेलेली दिसून येते यावरून ही सर्व पाण्याच्या संचयाची स्थळे सातवाहन कालखंडात कोरल्या गेली असल्याचे आढळते.

**7)** क्रमांक **7** चे टाके ः

क्रमांक **7** हे पाण्यासाठी खोदलेले उघडे टाके होते. येथील टाके पुर्णपणे गाळात व दगडांत बुजल्याने येथील कातळकडयाच्या आकाराहून येथे टाके होते असे दिसून येते. किल्ल्यावरून पावसाळयाच्या दिवसांत धबधब्याचा प्रवाह मोठया प्रमाणात येथे कोसळतो यातुन अनेक दगड गोटे वाहुन येतात व येथील टाक्यांत गाळाचा थर वाढत वाढत गेला असल्याने टाके अदृश्य होवुन सपाट जमीन येथे दिसून येते. पुरातत्व खात्याकडुन येथील टाक्याचे उत्खनन झाल्यास प्राचीन संस्कृती अवशेष दिसून येतील. किल्ल्यावरील प्राचीन ते मध्ययुगीन संस्कृती खापरांच्या व वस्तुंच्या रूपाने टाक्यात जमा झाली असण्याचा संभव आहे.

8क्रमांक 8 ची अर्धवट लेणी ः

क्रमांक 8 ची लेणी प्रथम प्रवेशद्वाराच्या जवळ ऊजव्या कातळयात अर्धवट खोदलेली आढळते. खोदण्याची सुरूवात केल्यानंतर 5 5 फुट आकाराचा चौकोन कातळयास खोदला गेला तद्नंतर आणिक आत खोदतांना मुरूम लागल्याने येथील लेणीचे खोदकाम थांबविलेले दिसून येते. एक लहान आकाराची पायरी ठेवून छोटया आकाराचा 3.2 फुट आकाराचा दरवाजा येथे कोरलेला आढळतो परंतु एक फुट आतपर्यंत कोरल्यानंतर मुरूम लागलेला दिसतो.

9क्रमांक 9 ची पोढी ः

क्रमांक 9 ची पोढी प्रथम प्रवेशद्वाराजवळ आहे. येथील पाण्याची पातळी नेहमीच भरलेली असते. पोढीचे मुख आकाराने लहान असल्याने येथे पाण्याचे बाष्पीभवन होण्यास फारसा वाव नाही. त्यामुळे चौकोणी आकाराच्या पोढीची खोली 3.5 फुट घेतलेली दिसून येते.

- लोहगड किल्ल्याचे गणेश प्रवेशद्वार ः

लोहगड किल्ल्याच्या माथ्यावर जाण्यासाठी एकच मार्ग असून या मार्गावर चार प्रवेशद्वारे आहेत. यात अनुक्रमे गणेश दरवाजा, नारायण दरवाजा, हनुमान दरवाजा, महादरवाजा अशी भक्कम बांधणीतील चार प्रवेशद्वारे आहेत.[12] गणेश प्रवेशद्वार हे प्रथम असून तोफांचा थेट मारा किल्ल्याच्या द्वारावर होवू नये याकरिता हे द्वार बुरूजांमध्ये दडविलेले आढळते. प्रथम प्रवेशद्वारात पोहोचण्यासाठी तिव्र चढणीची नागमोडी वाट असून कातळा खोदून येथील मार्ग बनविला आहे. किल्ल्याचे प्रथम प्रवेशद्वार भव्य बांधणीचे असून यावर सुबक कलाकुसर केलेली आढळते. मावळ तालुक्यातील इतर किल्ल्यांच्या कवाडांप्रमाणे येथील कवाडं कालौघात नष्ट झाली आहेत. मध्ययुगीन कवाडं नष्ट झालेली असल्याने पुरातत्व खात्याकडून 2011 साली येथे मध्ययुगीन

[12] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, p.622.

बांधणीशी साधर्म्य दर्शविणारा दरवाजा बसविला गेला. बाहेरील बाजूने प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूंस आठ पाकाळयांचे पुष्पशिल्प कोरले असून दोन्ही बाजूंस प्रतीमा कोरलेल्या आहेत परंतु त्या अस्पष्ट आहेत. प्रवेशद्वार **10.2** □**6.4** फुट आकाराचे असून **7** इंच आकाराचा मोठा ऊंबरा यास बसविलेला आढळतो. द्वाराच्या आतमधील पाणी बाहेर वाहून जाण्यासाठी येथे इतर किल्ल्यांस असलेल्या पद्धतीप्रमाणे थेट उंब□ास खोदीव मोरी नसून पाणी प्रवेशद्वाराच्या अलीकडेच मोठया दगडी जाळीत पडते आणि तेथून ते प्रवेशद्वाराबाहेर जाते. पाण्याचा निचरा करण्याची अशी व्यवस्था राजस्थान मधील आमेरगड, चित्तोडगड यांस दिसून येते.

गणेश प्रवेशद्वारात दोन्ही बाजुंस दोन दगडी कट्टे सुबक नक्षिकाम करून **3** फुट ऊंचीत बांधलेले आहेत. प्रवेशद्वाराच्या आतमध्ये उजव्याबाजूस अलंगा□देवडी□आहे, बांधकाम शास्त्रातील नियमांत न बसणारी अडचण असल्यास एकाच बाजूस अलंगा केली जाते. उदाहरणार्थ ः तुंग किल्ल्याचे दुसरे प्रवेशद्वार. लोहगड किल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वाराच्या आत उजव्याबाजूस असलेली अलंगा जमीनीपासून **2** फुट ऊंचीवर असून **5** □**5** फुट आकारात केलेली आढळते. डाव्या बाजूच्या अलंगेची ऊंची **6.7** फुट आहे. प्रवेशद्वाराच्या आतमधील बाजूने दरवाजांची ताकद वाढावी म्हणून मध्ययुगात आडसूळ लावले जायचे. येथील प्रवेशद्वाराच्या आतमधील बाजूने एका ऐवजी दोन आडसूळ लावले गेलेले दिसून येतात. त्यामुळे जरी बाहेरील बाजूने एखाद्या हत्तीने धडका दिल्या तरी या दोन्ही अडसूळांनी दरवाजाची कवाडं तुटणे अवघड व्हावे त्यातही या कवाडांवर तिक्ष्ण अणकुचीदार खिळे लावले जायचे. शिवाय गिरीदुर्गावर हत्ती चढविणे अवघड असे. म्हणून दुर्गप्रकारांमध्ये गिरीदुर्ग अव्वल दर्जाचे मानले गेलेले दिसून येतात.

प्रथम प्रवेशद्वाराच्या आत काही अंतरावर डाव्याबाजूस असलेली अलंगा **4** फुट उंचीची आहे. जर शत्रूसैन्य प्रवेशद्वाराच्या आतमध्ये शिरले तर या देवडीवर सहजपणे चढता येवु नये अशी अवघड योजना येथे केलेली आढळते. उदाहरणार्थ ः इंदोरी किल्ल्यात प्रवेशद्वाराच्या आतमध्ये उंच देवडया बांधलेल्या दिसून येतात. देवडया ऊंच ठेवण्यामागचे प्रयोजन शत्रूसैन्याच्या अडचणीत भर घालणे हे असून शत्रुसैन्यावर येथुन जोरात मारा करता येतो. येथील देवडीत एकून तीन स्तंभ नक्षीदार होते परंतु सध्या दोन स्तंभ पडून एक शिल्लक आहे. देवडीत वस्तू ठेवण्यासाठी व दिवा लावण्यासाठी केलेले कोनाडे सुस्थितीत आहेत.

- गणेश प्रवेशद्वाराच्या आतमधील भग्नावशेष, तोफा व शिलालेख ः

गणेश प्रवेशद्वाराच्या आत पुरेशी मोकळी जागा असून मोठा चौक येथे ठेवलेला दिसून येतो. बंदुकींच्या फैरी व पेटत्या बाणांचा मारा करण्यासाठी येथील बुरूजास व तटबंदीस भरपूर जंग्या ठेवलेल्या आढळतात. गणेश प्रवेशद्वाराच्या आतमधील मोकळया जागेचा वापर लष्करी सामर्थ्यासाठी मोठया प्रमाणात केलेला आढळतो. कमी जागेत मोठी लष्करी कारवाई प्रभावीपणे करण्यासाठी बुरूजांची व तटबंदीची बांधणी करतांना दक्षता घेतलेली आढळते. गणेश द्वारातून आत ऊजव्याबाजूस पहारेकऱ्यांस राहण्यासाठी चुना व विटांच्या बांधकामात खोल्या बांधलेल्या आढळुन येतात. येथील खोल्यांमध्ये वस्तू ठेवण्यासाठी अनेक कोनाडे व प्रकाशव्यवस्थेसाठी अनेक झरोके ठेवलेले आढळतात. येथील खोल्यांचे छत चुनागच्चीत केले होते. छताचा आकार पाणी थांबणार नाही असा उतरता केला गेलेला दिसून येतो. कालौघात येथील छत व त्याच्या भिंती पडल्या मात्र उपलब्ध अवशेषांवरून येथे चुनागच्ची व खोल्या असल्याचे दिसून येते. खोल्यांच्या शेजारी एक शौचकूप करून याचे सांडपाणी किल्ल्याच्या तटबंदीच्या बाहेरील बाजूस काढले गेलेले आढळते. सध्या येथील शौचकूपात लोहगड किल्ल्याचा मध्ययुगीन इतिहास सांगणारा शिलालेख ठेवलेला आहे.

प्रवेशद्वाराच्या आत ऊजव्याबाजूच्या मध्ययुगीन भग्न खोल्या पार करून **11.7** फुट व्यासाच्या अर्ध गोलाकार खोलीत प्रवेश करता येतो. ही खोली **10** फुट उंचीची पुर्णपणे बेसॉल्ट दगडात बांधलेली असून सुस्थितीत राहीलेली आहे. खोलीचे बांधकाम करतांना आतमधील बाजूने घुमटाचा आकार देवून बांधकाम केलेले दिसून येते. खोलीच्या आतमधील बाजूने दगडांत केलेल्या नक्षीकामात पाच पाकळया छतास कोरलेल्या आढळतात. या खोलीत दिवा लावणीसाठी एक कोनाडा असून प्रकाश व हवा येण्यासाठी तसेच शत्रूसैन्यावर व किल्ल्याच्या परिघावर लक्ष ठेवण्यासाठी तसेच शत्रुवर मारा करण्यासाठी तीन झरोके ठेवलेले आढळतात. यापैकी दोन झरोके लोहगडवाडीच्या बाजूने असून आतमधील बाजुने यांस कट्टे केलेले आहेत. तिसरा **2.1 □1.3** फुट आयताकार झरोका गडाच्या आतमधील जागेवर चालणाऱ्या हालचालींवर लक्ष देण्यासाठी व

प्रकाशव्यवस्थेसाठी ठेवला गेल्याचे दिसून येते. गोलाकार खोलीच्या वरच्या बाजूस असलेल्या तटबंदीस बुरूज बांधलेला असून खाली ही खोली असूनही वरच्याबाजूस तोफेचा बुरूज बांधलेला आहे. येथील बुरूजास तोफ डागण्यासाठी तीन खिडक्या असून एकच तोफ फिरवून तीन्ही ठिकाणांहून डागता येण्यासाठी अर्धगोलाकार बुरूज करून तोफेची खिडकी केली गेल्याचे दिसून येते.

प्रथम प्रवेशद्वाराच्या वरच्याबाजूस लहान आकाराचा एक दिंडी बुरूज बांधलेला आहे. प्रवेशद्वाराच्या शेजारील दोन्ही बुरूजांवरून शत्रूसैन्यावर मारा करणे ही नेहमीची लढाऊ पद्धत येथे असून त्याहुन जास्त तीव्रतेचा मारा करण्यासाठी तीन पायऱ्या चढून हा दिंडी बुरूज बांधलेला आढळतो. ऊपलब्ध बुरूजासच लहान आकारातील प्रतिबुरूज बांधणे व कमी जागेत याचे बांधकाम करून साधारण फक्त दोन–तिन सैनिक उभे राहू शकतील एवढीच जागा ठेवून पायथ्यापासून प्रथम प्रवेशद्वारापर्यंत मारा करता येईल व लक्षही ठेवता येईल असा बुरूज येथे बांधून घेतला गेला. हे विशिष्ट बांधकाम कौशल्य दुर्मीळ प्रकारातील असून शत्रुसैन्यावर या दिंडी बुरूजामुळे प्रभावी मारा करता येतो. येथील मोकळया जागेत पुरातत्वखात्याने तीन ओतीव तोफा कट्टयावर रचलेल्या असून या आकाराने लहान आहेत. साधारण **4** फुट लांबीच्या या तोफा किल्ल्यावर कुठे होत्या हे निश्चित माहित नाही. परंतु परिघात पडलेल्या तोफा पुरातत्व खात्याने एकत्रित करण्याच्या उद्देशाने येथे आणून रचून ठेवलेल्या आहेत.

**1**□क्रमांक **1** च्या तोफेस सध्या पिवळा ऑईलपेंट दिलेला आढळतो. हा रंग काही प्रमाणात काढल्यावर त्यावर खोदीव ठसे दिसून आले आहेत. तोफेच्या मध्यापासून मागील अधिष्टानापर्यंत काही अक्षरे व आकडे अंकीत आहेत. यात “P” हे इंग्रजी अक्षर असून त्याच्या खालील बाजूस “TD” ही इंग्रजी अक्षरे खोदीव आहे त्याखालील बाजूस “**4 - 1 - 17**” ही तारीख खोदलेली आहे. ही तोफ ब्रिटीश बनावटीची दिसून येते परंतु कोणत्या शतकातील आहे याबाबत ठोस माहिती मिळत नाही. मध्ययुगीन कालखंडातील ही तोफ **4** □**1** □**17** तारखेस गाळली गेली असावी किंवा आधी गाळलेल्या तोफेवर नंतर शिक्के मारण्याचीही पद्धत मध्ययुगात होती. **4** जानेवारी ही तारीख **17** व्या **18** व्या की **19** व्या शतकातील असावी याबद्दल ढोबळ अंदाज करावा लागतो. लोहगड किल्ल्याच्या मध्ययुगीन इतिहासावरून ही तोफ **1717** सालची असावी असा संभव आहे. कारण **1617** साली शिवाजी महाराजांच्या जन्माआधी ब्रिटिशांकडून तोफा विकत घेतल्याचे आढळून येत नाही.

तसेच शिवाजी महाराज किंवा दरम्यानच्या स्थानिक राजवटी तोफांची खरेदी ब्रिटिशांकडून करत होत्या मात्र हा काळ **1650** ते **1685** दरम्यानचा होता. तसेच **1817** साली ब्रिटिश अंमल बहुतांशी किल्ल्यांवर प्रस्थापित झाला होता व दरम्यानच्या काळात कर्नल प्रॉथरने ज्या तोफांवर महाराष्ट्रातले किल्ले हस्तगत केले त्या तोफांची लांबी जास्त होती कारण दुरच्या ठिकाणांवर मारा करण्यासाठी लांब पल्ल्याच्या तोफा आवश्यक होत्या व लोहगड किल्ल्यावरील प्रस्तुत तोफ लांब पल्ल्याची निश्चित नाही. शिवाय या तोफेतून तोफगोळा अर्धा कि.मी. पर्यंत फारतर जावू शकतो. म्हणून प्रस्तुत तोफ **1617** किंवा **1817** सालची नसून **1717** सालची असण्याचा दाट संभव आहे.

**2**तीन्ही तोफांच्या मध्ये ठेवलेली ही तोफ ओतीव प्रकारातील अखंड तोफ असून तोफेवर अंक व अक्षरे अंकीत आहेत ती पुढील प्रमाणे ः "P" त्याखालील बाजूस देवनागरी लिपीमध्ये "आलिमदन" व त्याखालील बाजूस "**3 - 3 - 12**" तारीख खोदीव आहे. मात्र 'आलिमदन' हे नाव या तारखा अंकीत केल्यानंतर काही वर्षांनी खोदले गेले असावे असा संभव आहे. ब्रिटीश बनावटीची ही तोफ आकाराने आखुड व कमी पल्ल्याची असल्याचे दिसून येते. या तोफेचा काळही प्रथम तोफेच्या समिकरणाप्रमाणे **3** मार्च **1712** इसवीसनाचा असण्याचा संभव आहे.

**3**तिसरी डाव्याबाजुची तोफ ओतीव प्रकारातील असून तोफेवर आकडे व अक्षरे असा मजकुर अंकीत नाही. ही तोफ साध्या घडणावळीतील असून तोफेचे मुख व गोळा शेजारील दोन्ही तोफांपेक्षा **1** इंच व्यासाने मोठे आहे. परंतु वरील दोन्ही तोफांपेक्षा या तोफेचा काळ अधिक जुना आहे.

सध्या तिन्ही तोफा गणेश प्रवेशद्वाराच्या आत समोर ठेवलेल्या असून येथे छत किंवा तोफांस पावसापासून कोणतेही संरक्षण नाही. सतत पावसात भिजत असल्याने या तोफा थोडया गंजलेल्या अवस्थेत असल्याचे दिसून येते.

गणेश प्रवेशद्वाराच्या आत शौचकूपात एक मध्ययुगीन शिलालेख ठेवलेला असून त्यावर **10** ओळींचा मजकुर अंकीत केलेला आहे. शिलालेखाच्या शिळेवर मधोमध एक कोनाडा खालच्याबाजूस कोरलेला आहे. सध्या येथील शिलालेख बऱ्यास्थितीत असून किमान अक्षरे वाचता येतात.

शिलालेखातील मजकूर पुढीलप्रमाणे ः

श्री गणेशायनमः गणेश दरवाजा बांधला बा

ळाजी जनार्दन फडणीस विदयमान धों

डो बल्लाळ नीजसुरे प्रारंभ शके **1712**


साधारण नाम संवत्सरे अस्वीन शु

ध **9** नवमी रविवार समाप्त शके

**1716** आनंदनाम संवत्स

रे ज्येष्ठ सुध त्रयोदशी बु

ध वार कत □ति□ व्य जयाजी



धनराम गव □वं□दी त्रिव □त्रिंब□

कजी सुतार[13]

शिलालेखातील मजकुराप्रमाणे येथील दरवाजाचे काम नाना फडणीसने **1** नोव्हेंबर **1790** ते **11** जुन **1794** या कालावधीत केल्याचे दिसून येते.

● गणेश प्रवेशद्वारातील शत्रूसैन्यावर पाठीमागच्या बाजूने हल्ला करण्यासाठी घडविलेला किल्ल्यावरील सर्वात मोठया व्यासाचा बुरूज व त्यावरील वैशिष्टपुर्ण शौचकुपे तसेच चोरदिंडी ः

गणेश प्रवेशद्वारातील शत्रूसैन्यावर पाठीमागील बाजूने हल्ला करण्यासाठी किल्ल्यावरील सर्वात मोठया व्यासाच्या बुरूजाची बांधणी येथे केलेली आढळून येते. येथील बुरूजावरून किल्ला चढणाऱ्या शत्रूसैन्यावर

[13] क्षेत्रभेट, लोहगडवाडी, नोव्हेंबर **2014**.

पायथ्यापासून मारा करता येत असून किल्ल्याच्या पुर्व व दक्षिण दोन्ही बाजुंचे संरक्षण करता येते. येथील बुरूजावर जाण्यासाठी गणेश प्रवेशद्वारातून आत डावीकडे मार्ग आहे. द्वितिय प्रवेशद्वार मार्गावर 10 पायऱ्या खाली उतरून लहान आकारातील प्रवेशद्वारातून प्रस्तुत बुरूजावर प्रवेशता येते. या मोठया आकाराच्या बुरूजावर जाण्यासाठीचे प्रवेशद्वार नक्षीदार असून यास लहान आकारातील बुरूज बांधल्यामुळे द्वाराच्या सौंदर्यात भर पडलेली दिसून येते. येथील प्रवेशद्वारास कवाडं होती परंतु कालौघात ती नष्ट झालेली आढळतात सध्या येथे कवाड अडकविण्यासाठीची दगडी कुसं शिल्लक आहेत. येथील बुरूजावर पावसाळयात वरच्या कातळयाचे पाणी वाहत येते ते वाहून जाण्यासाठी मोठया आकाराची मोरी प्रस्तुत बुरूजास केलेली होती परंतु येथील दारूगोळा कोठार पडले व त्याचे भग्न अवशेष मोरीत पडून ती बुजलेल्या अवस्थेत असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत बुरूजास चक्रीतोफा ठेवण्यासाठी मुख्य तटबंदीतून लांब बाहेर बांधलेले दोन बुरूज असून मध्ययुगात दोहोंवर तोफा ठेवलेल्या होत्या. तोफा जाड लोखंडी खुंटीवर ठेवलेल्या असल्याने त्या फिरविता येत होत्या. येथे तोफा डागण्यासाठी तीन खिडक्या प्रतीबुरूजास आढळतात. पर्यायाने किल्ल्याचे पुर्व व दक्षिण या दोन्ही बाजुंचे संरक्षण येथील बुरूजावरून करणे शक्य होत असे. येथील दोन्ही तोफांच्या मागच्याबाजुस एक दारूगोळा कोठार होते. तसेच पहारेकऱ्यांस रहाण्यासाठी येथे खोल्या बांधलेल्या निदर्शनास येतात. येथील सर्वच अवशेष सध्या भग्न झालेले असल्याने पडलेल्या राडयारोडयामुळे येथील मोरी बंद झालेली आढळते. येथे पडलेल्या दारूगोळा कोठाराचे व पहारेकऱ्यांच्या खोल्यांचे जोते दिसून येत असून पुरातत्व विभागाकडून जर उत्खनन झाले तर येथे तोफगोळे मिळण्याची शक्यता आहे.

येथील बुरूजाच्या पश्चिम बाजूस लहान आकारातील एक चोरदिंडी आहे. चोरदिंडी हा गिरीदुर्गात महत्वाचा भाग गणला जातो. शत्रूसैन्याने किल्ल्यास वेढा दिल्यानंतर चोरदिंडीतून निसटून किल्ल्याच्या परीघाबाहेर पडता यावे यासाठी चोरदिंडया तटबंदी बांधतांना ठेवल्या जात होत्या. मध्ययुगात चोरदिंडया दगडामातीत ओबडधोबड चिनुन ठेवण्याची पद्धत होती व युध्दप्रसंगी चिनलेल्या दिंडया फोडुन किल्ल्यावरून पलायन करता येत होते. सध्या मध्ययुगात चिनलेल्या चोरदिंडया काही ठिकाणी आढळुन येतात. चोरदिंडीचे महत्व रामचंद्रपंत अमात्य लिखीत ‘आज्ञापत्र’ या ग्रंथातुनही आलेले आहे. शिवाजी महाराजांनी पन्हाळगडाच्या वेढयातून मसाई पठारावर निसटून जातांना किल्ल्याच्या चोरदिंडीचा वापर केला होता. लोहगड किल्ल्यास मध्ययुगातील सर्व

आदर्श बांधणी कायम केली गेलेली आढळते. त्यामुळे लोहगड किल्ल्याची प्रस्तुत चोरदिंडी महत्वपुर्ण असल्याचे दिसून येत आहे. येथील चोरदिंडीस पेशवे कालखंडात दगडामातीत न चिनता दोन कवाडं लावलेली दिसून येतात. चोरदिंडीचा आकार **2.10** □**1.10** फुट आहे.

चोरदिंडीच्या मागे एक शौचकूप सुस्थितीत आढळते. शौचकुपाचे द्वार **5** □**1.8** फुट आकाराचे आहे. आतमध्ये **4.8** □**3** फुट आकाराची जागा असून शौचकूपाची ऊंची **6** फुट आहे. शौचकुपाच्या आतमध्ये दिवा ठेवणीसाठी कोनाडा आहे.

वैशिष्टयपुर्ण बांधकाम शैलीचे शौचकूप ः मध्ययुगीन शौचकूपे तटबंदीस किंवा बुरूजांस करण्याची पद्धत होती. काही किल्ल्यांवर शौचकुपांसाठी स्वतंत्र मोठया खोल्या बनविलेल्या दिसून येतात. उदाहरणार्थ ः रायगड किल्ल्यावरील राजवाडयातील शौचकुपे. तसेच विसापूर किल्ल्यावर कमोड असलेली शौचकुपे आढळून आली आहेत. परंतु एखाद्या तळघराची संरचना करून त्याच्या आत शौचकूपे निर्माण करणे ही मध्ययुगीन बांधकाम शैलीमधील तत्कालीन आधुनिक गनली जाणारी गोष्ट होती असे दिसून येते. आजही येथील तळघर सदृष्य शौचकूपे सुस्थितीत असून सतिश अक्कलकोट लिखित दुर्ग पुस्तकातून लोहगड किल्ल्याच्या भुयारांची संकल्पना आल्याने येथील तळघर सदृष्य शौचकूपे भुयार असल्याचा अनेकांचा संभ्रम झाला. परंतु ही शौचकूपे असल्याचे **7** पायऱ्या उतरून **15** फुट लांबीच्या पॅसेज मधून आत गेल्यावर दिसून येते. पॅसेजच्या शेवटी ऊजव्याबाजूस एक मोठया आकाराचे शौचकूप असून दिवा व वस्तू ठेवण्यासाठी येथे कोनाडे आहेत. पॅसेजच्या शेवटच्या टोकास आणिक एक शौचकूप आहे. येथील शौचकुपे निर्माण करण्यासाठी कातळा फोडून येथे आत बांधणी केलेली दिसून येते. तसेच बुरूजावरील जागा फक्त लष्करी उपयोगासाठी वापरून त्याखाली शौचकुपे बांधल्याने बुरूजावरील जागेचा व्यय येथे होवू दिलेला आढळत नाही.

- द्वितीय नारायण प्रवेशद्वार व त्यासमोरील स्थापत्य ः

गणेश प्रवेशद्वारातून द्वितीय नारायण प्रवेशद्वारात जातांना अर्धगोलाकार बुरूज लागतो. येथील बुरूजावरून किल्ल्यावरील पहिल्या प्रवेशद्वारावर तसेच खालच्या बाजूस असलेल्या दोन्ही मोठया आकाराच्या बुरूजांवर लक्ष

ठेवता येते. अर्धगोलाकार बुरूजावरून शत्रूसैन्यावर तोफेचा मारा करण्यासाठी चार खिडक्या ठेवलेल्या दिसून येतात. याशिवाय पहिले प्रवेशद्वार शत्रूसैन्याच्या हाती पडलेच तरी या बुरूजावरून पहिले प्रवेशद्वार जिंकलेल्या शत्रूसैन्यावर बंदुकींचा व पेटत्या बाणांचा मारा करता येईल अशी व्यवस्था ठेवलेली आहे. या बुरूजास आतमधील बाजुने दिवा लावणीसाठी अनेक कोनाडे विशेष रचनेत ठेवलेले आहेत. येथून नारायण प्रवेशद्वारात जातांना तीव्र चढणीच्या **25** पाय□ी आहेत. पाय□ी चढतांना दोन्ही बाजूंनी जाड आकाराची तटबंदी **7 □8** फुट उंचीमध्ये बांधलेली आढळते. येथील पायऱ्या व शेजारची संरक्षक भिंत पुरंदर किल्ल्यावरील केदारेश्वर मंदिराकडे जातांना असलेल्या पायऱ्या व संरक्षक भिंतीशी साम्य दर्शविणारी आहे. पुरंदर किल्ल्यावरील केदारेश्वराची तटबंदी उंचीला त्रोटक असून लोहगड किल्ल्याची **7 □8** फुट उंची असलेली आहे. मात्र दोन्हींची रचना सारखीच असल्याचे आढळते. नारायण प्रवेशद्वार व समोरील तटबंदी तसेच पायऱ्या सुस्थितीत दिसून येतात.

नारायण प्रवेशद्वार लोहगड किल्ल्याच्या एकुण पाच प्रवेशद्वारांपैकी सर्वात भक्कम व संरक्षण आणि आक्रमण या दृष्टीने उत्कृष्ट बांधणीचे दिसून येते. येथील प्रवेशद्वाराची उंची **11 □8** फुट असून एक अडसूळ कवाडांच्या मागीलबाजूस होता. प्रवेशद्वाराच्या वरील दोन्ही बाजूंस दोन शरभ सुस्थितीत आहेत. त्यातील उजव्याबाजूच्या शरभाचे तोंड नैसर्गिकरित्या किंवा मानवी हस्तक्षेपाने पांढऱ्या रंगाचे झालेले निदर्शनास येते. प्रवेशद्वाराच्या वरील बाजूस एक तोफ डागता यावी एवढया आकाराची खिडकी ठेवलेली आढळते. या द्वारावरून बंदुकीच्या गोळया व पेटते बाण मारावयासाठी जंग्या ठेवलेल्या नाहीत. मात्र प्रवेशद्वाराच्या डाव्याबाजूच्या बुरूजावरून शत्रूसैन्यावर मारा करण्यासाठी भरपूर जंग्या ठेवलेल्या होत्या. हा बुरूज जुलै **2011** पर्यंत सुस्थितीत होता परंतु जुलै महिन्यात पाण्याच्या जोरदार लोंढयाने बुरूजाची तटबंदी वाहून जावून ते दगड नारायण प्रवेशद्वाराच्या मुखात पडलेले आढळुन येतात. प्रवेशद्वाराच्या आतमध्ये साचणारे पावसाचे पाणी प्रवेशद्वाराबाहेर पडण्यासाठी उंब□ीस दोन्ही बाजुंस छोटया मो□ी□outlet□ठेवल्या गेलेल्या दिसून येतात. नारायण प्रवेशद्वारास पहारेक□ीस बसण्यासाठी देवडया□अलंगा□ठेवलेल्या नाहीत. त्याऐवजी प्रवेशद्वाराच्या आत डाव्याबाजूस पहारेक□ीस रहाण्यासाठी खोल्या होत्या. येथील खोल्यांमधुन या द्वाराच्या वरच्याबाजुस जाण्यास मार्ग ठेवलेला दिसून येतो. सध्या येथील खोल्या भग्न झालेल्या असून प्रवेशद्वारावर जाण्यासाठी **5** पायऱ्या चढुन मार्ग आहे. येथील पाय□ी चढतांना एक द्वार होते. **4.10 □2.6** फुट आकाराचे द्वार पार करून नारायण द्वारावर जाता येईल अशी रचना होती.

मध्ययुगात येथे कवाडं होती परंतु कालौघात येथील कवाड नष्ट झाली व दगडी कुस शिल्लक राहीलेली आढळतात. येथील माथ्यावर असलेल्या तटबंदीच्या प्रत्येक दगडी तोडी एकमेकांपासून सुटू नये याकरीता लोखंडी सळया प्रत्येक दोन दगडांना धरून ठेवतील अशा रीतीने रूतविलेल्या आहेत. किल्ला जास्तीत जास्त बळकट करण्यासाठी व तोफेचा गोळा जरी जोरदार येथे पडला तरी येथील द्वाराचे व तटबंदीचे फार नुकसान होवू नये याकरिता लोखंडी गज प्रत्येक शेजारील दोन दगडांना धरून ठेवण्याची युक्ती येथे केलेली निदर्शनास येते. किल्ल्यावरील काही ठिकाणच्या तटबंदीस व काही निवडक बुरूजांस दोन शिळा लोखंडी पट्टीने बांधलेल्या दिसून येतात. त्यामुळे लोहगड किल्ला व सर्व प्रवेशद्वारे आजही सुस्थितीत आढळतात. नारायण प्रवेशद्वाराच्या वरच्या माथ्यावर पहारा देणा□ या सैन्यासाठी येथेच शौचकूपाची सोय केलेली दिसून येते. हे शौचकूप चांगल्या अवस्थेत असून याची ऊंची **5** फुट व **3.5** □**2.10** फुट आकार असणाऱ्या शौचकुपात दिवा लावणीचा कोनाडा दिसून येतो. येथील शौचकूपाच्या वरच्याबाजूस असलेला कातळा झुकला होता तसेच पडायला आला असता दरम्यान शौचकूपाच्या वरच्याबाजूने विटांची एक जाड भिंत येथे त्या कातळयास स्पर्शुन त्यास आधार देण्यासाठी मध्ययुगात बांधून घेतलेली दिसून येते. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात दख्खनेतील किल्ल्यांवर अपघात होण्याआधी योग्य ती खबरदारी घेण्याची पद्धत अस्तित्वात होती हे दिसून येते.

- तृतीय प्रवेशद्वार व त्यासमोरील प्राचीन गुंफा ः

दुसऱ्या नारायण प्रवेशद्वारातून तिसऱ्या प्रवेशद्वाराकडे जाण्याची वाट नागमोडी व खडया चढणीची आहे. नारायण द्वारातून तिसऱ्या प्रवेशद्वाराच्या मार्गावर ऊजव्याबाजूस दोन गुंफा असून प्राचीन कालखंडात बौध्द भिक्षुंस राहण्यासाठी त्यांचे खोदकाम केलेले आढळते. मात्र मध्ययुगात लष्करी उपायोगासाठी बहुतांशी किल्ल्यांवर प्राचीन गुंफांचे कोठारांत किंवा पहारेकऱ्यांना रहावयासाठी खोल्यांत त्याचे रूपांतर करण्यात आलेले दिसून येते. या गुंफांचे मुख मोठया आकारात होते परंतु मध्ययुगात यातील डाव्याबाजूच्या कोठाराचे मुख दगडी तोडींत बांधून द्वार करून ते लहान आकाराचे करण्यात आले. उजव्याबाजूच्या कोठारात कोणताही बदल केला गेलेला दिसून येत नाही. प्राचीन कालखंडात गुंफा कोरतांना गुंफेचे आकारमान वाढावे यासाठी छत सलग ठेवुन खालच्या बाजूस खोदकाम जास्त करण्यात आलेले दिसून येते. येथील दोन्ही गुंफा खोदतांना पाया खोल

खोदल्या गेलेला आढळतो. तद्नंतर येथील गुंफांची मध्ययुगात कोठारं केली गेल्याचे निदर्शनास येते. तद्नंतर कोठारांचे रूपांतर पाण्याच्या टाक्यात झाल्याचे सध्या दिसून येत आहे. म्हणजेच प्राचीन काळात या गुंफा राहण्यासाठी तर मध्ययुगात कोठारं म्हणून व अर्वाचीन युगात पाण्याची टाके म्हणून यांचा प्रवास निदर्शनास येतो. डाव्याबाजूच्या टाक्यात ऊतरण्यासाठी **5** पायऱ्या असून हे टाके **12** □ **12** फुट आकाराचे आहे. ऊजव्याबाजूच्या टाक्यात ऊतरण्यासाठी पायऱ्या असून हे टाके आकारमानाने **30** □**30** फुट आहे.

तिसऱ्या प्रवेशद्वारात मध्ययुगात प्रथम व द्वितीय प्रवेशद्वाराप्रमाणे पहारेकऱ्यांस राहण्यासाठी खोल्या केलेल्या होत्या. परंतु कालौघात त्या नष्ट झाल्या मात्र या खोल्यांचे जोते व दिवा लावणीसाठी व वस्तू ठेवण्यासाठीचे कोनाडे येथे दिसून येते आहेत. येथे पहारेकऱ्यांच्या घराच्या समोरील बाजूस प्राचीन कालखंडात बसवयासाठी कट्टे खोदले होते ते कातळ खोदीव असल्याने आज सुस्थितीत आढळतात. प्रवेशद्वारात पहारेकऱ्यांस बसावयास व ऊभे रहावयासाठी नक्षीदार कट्टे केलेले दिसून येतात. तसेच प्रवेशद्वारावरील दोन्हीबाजूंस दोन शरभे कोरलेली आढळतात. येथील प्रवेशद्वारास दोन्ही कवाडांची दगडी कुसं सुस्थितीत असून या प्रवेशद्वारास दोन आडसूळ होते. या प्रवेशद्वाराचा भक्कमपणा वाढविण्यासाठी ही योजना केल्याचे दिसते. येथील देवडया इतर द्वारांप्रमाणे नसून वेगळया धाडणीच्या दिसून येतात. येथे देवडयांत आतमध्ये झोपण्यासाठी जागा असून चुण्याचा गिलावा करून येथे जागा स्वच्छ केलेली आढळते. येथील दोन्ही देवडया आकाराने सारख्या असून **4.6** □**2.3** फुट आकाराचे यांचे द्वार आहे. या प्रवेशद्वाराच्या समोरच विशिष्ट उंचीवर चौथे हनुमान प्रवेशद्वार असून दोन्हींमधील अंतर लष्करी योजनेसाठी कमी ठेवलेले निदर्शनास येते.

- चतुर्थ कमांकाचे हनुमान प्रवेशद्वार व शत्रूसैन्यावर प्रभावी मारा करण्याची जागा ः

तृतिय व चतुर्थ हनुमान प्रवेशद्वार यातील अंतर कमी असून तिसऱ्या प्रवेशद्वारातून आत शिरलेल्या शत्रुसैन्यावर चौथ्या प्रवेशद्वारातून थेट मारा करता येतो. हनुमान प्रवेशद्वारापर्यंत जाणाऱ्या पायऱ्या खडया चढणीच्या असून येथे चढतांना व इथपर्यंत येतांना शत्रूसैन्याचे अवसान घालविण्यासाठी तिव्र चढणिच्या

पायऱ्यांची रचना येथे केलेली आढळते. यातच थकलेल्या शत्रूसैन्यावर हनुमान प्रवेशद्वारातून उंचावरून होणारा मारा अत्यंत प्रभावी ठरावा यासाठी हनुमान द्वार तिसऱ्या द्वाराच्या लगतच बांधलेले आढळून येते.

हनुमान प्रवेशद्वारात शिरतांना दोहोबाजुंस पहारेकऱ्यांस बसण्यासाठी कट्टे नसून प्रवेशद्वाराच्या वरच्या बाजूस कोणत्याच प्रकारचे शरभ व पुष्पशिल्प कोरलेले दिसून येत नाहीत. द्वाराच्या आतील पाणी वाहून जाण्यासाठी डाव्याबाजुस लहान आकारातील पन्हाळे ठेवलेले आढळुन येते. सध्या यात गाळ साचल्याने हे बंद झालेले निदर्शनास येते. हनुमान प्रवेशद्वार **11** □**6 .4** फुट आकाराचे असून आत ऊजव्याबाजूस पहारेकऱ्यांस बसण्यासाठीची देवडी आहे. येथे डाव्याबाजूस देवडी जागेअभावी केलेली आढळत नाही. ऊजव्याबाजूची देवडी आकाराने मोठी असून **8** □**4 .9** फुट आकाराचे तीचे मुख आहे. देवडीमध्ये पहारेकऱ्यांस ऊभे राहता येईल अशा आकारात याची बनावट केलेली आढळून येते.

लोहगड किल्ल्याच्या इतर प्रवेशद्वारांच्या तुलनेत हनुमान प्रवेशद्वार लहान आकाराचे दिसून येते. या प्रवेशद्वाराच्या आधी व नंतर मोठी भक्कम प्रवेशद्वारे आहेतच तसेच पाचव्या कमांकाचे महाद्वार व या प्रवेशद्वारात आणि या प्रवेशद्वारात फक्त **20** फुट अंतर आहे. या द्वाराची विशेष खासीयत अशी की पाचवे महाद्वार बांधण्याआधी किल्ल्याच्या माथ्यावर जाणारे एक लहान आकारातील प्रवेशद्वार हनुमान द्वारातून आत प्रवेशल्यावर उजव्याबाजूस होते मात्र महाद्वाराच्या बांधणीवेळी जुने द्वार चिणले गेले व महाद्वारातून किल्ल्याच्या माथ्यावर जाण्याच्या मार्गाची रचना केली गेली. महाद्वाराच्या पुर्वीचे चिनलेले द्वार बाहेरच्याबाजूने दिसून येत नाही परंतु आतमधील बाजुने निरिक्षण केल्यावर हे चिनलेले द्वार दिसून येते.

- पाचवे महाप्रवेशद्वार व शत्रूसैन्यावर कोंडीत पकडून साधता येणारा निशाणा ः

हनुमान प्रवेशद्वाराच्या आत उजव्याबाजूस लोहगड किल्ल्याचे मुख्य व बळकट महाप्रवेशद्वार लागते. हे प्रवेशद्वार समोर नसून लपविलेले आहे. चौथ्या प्रवेशद्वारातून तोफा डागल्या गेल्या तरीही महाद्वारावर एकही गोळा आदळणार नाही याची खबरदारी येथे घेतलेली दिसून येते.

महाद्वारासमोर काय चालु आहे याची कल्पना शत्रुसैन्यास चौथ्या प्रवेशद्वारातून येवू नये यासाठी जी आडवी भिंत बांधली जाते त्यास राज्यव्यवहार कोषात 'जिभी' संबोधले जाते. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी त्यांच्या सांगण्यावरून धुंडीराज लक्ष्मण व्यास व रघुनाथपंत हनमंते यांनी राज्यव्यवहार हा **1400** शब्दांचा शब्दकोष लिहिला त्यात वरील प्रकारातील तटबंदीस 'जिभी' संबोधले गेले आहे.[14] लोहगड किल्ल्यात महाप्रवेशद्वाराच्या अलीकडील तटबंदीस 'जिभी' म्हणता येते. महाद्वार व हनुमान प्रवेशद्वाराच्या मध्ये असलेल्या शत्रूसैन्यावर महाद्वारातून व शत्रूसैन्यावर मागच्याबाजूने हल्ला करता येईल अशी रचना येथे केलेली आढळते. शत्रूसैन्यास कोंडीत पकडता यावे यासाठी येथे मागच्या बाजुने हल्ला करण्याची रचना केलेली आहे. येथील रचनेमुळे शत्रूसैन्यास मागे पळता येत नाही व येथेच प्रतीकार करण्याशिवाय पर्याय नाही तसेच प्रतिकार करण्यास सैन्य समोर नसून जंग्यांतून गोळया व बाण मारत असल्याने किल्ल्याच्या महाद्वारापर्यंत आलेल्या शत्रुसैन्यास येथे लढण्यास अनेक बंधने यावीत व येथेच तलवारी टाकून शरण यावे यासाठी अशी बांधकाम रचना येथे केलेली दिसून येते. उदाहरणार्थ ः दौलताबाद किल्ल्यावर खंदकाच्या आतमधील बाजुस कातळयात भुयार केले असून येथुन वर जातांना मध्ये शत्रुसैन्यास मारण्यासाठी अनेक योजना केलेल्या दिसून येतात. यात उकळते तेल त्यांवर ओतणे, बाणांचा व बंदुकींचा मारा करण्यासाठी कातळयाच्या आतमध्ये जंग्या ठेवणे, कातळयास मोठा खड्डा ठेवुन त्यातुन शत्रुसैन्य खंदकात पडतील अशा योजना केलेल्या दिसून येतात. अशा प्रकारच्या लष्करी रचना राजधानीच्या किल्ल्यांस मोठया प्रमाणावर केलेल्या निदर्शनास येतात. रायगड व राजगड किल्ल्यावरही शत्रुसैन्यास जेरीस आणण्यासाठी अशा बांधकाम रचना केलेल्या दिसून येतात. दुर्मिळ प्रकारात गणली जाणारी ही बांधकाम रचना लोहगड किल्ल्याच्या महाद्वारात केल्या गेलेली दिसून येते. प्रस्तुत महाद्वार मावळ तालुक्यातील सर्व किल्ल्यांमधील भव्य व नक्षिदार आहे.

महाद्वाराच्या बेसॉल्ट दगडावरील नक्षीकामात फुलदानी व त्यात ऊमललेली फुले दर्शविण्यात आलेली आहेत. कोरलेली नक्षी जास्त काळ टिकावी म्हणून नक्षीच्या वरच्याबाजूस दगडी अच्छादन बसविलेले आढळते. सध्या येथील अच्छादन पडलेले आढळत असले तरी नक्षिकाम सुस्थितीत आहे.

---

[14] महेश तेंडुलकर, *लोहगड विसापुर तुंग तिकोना*, स्नेहल प्रकाशन, 2010, पृ. 50.

महाद्वारास पहारेकऱ्यांस बसण्यासाठीचे उजव्या व डाव्याबाजुचे दोन्ही कट्टे **2.9** फुट उंच असून नक्षीदार केलेले आहेत. महाद्वार पुर्णपणे बेसॉल्ट दगडात बांधले असून मध्ययुगातील लाकडी महीरपींच्या शैलीत येथे दगडी महीरप बनविल्या गेल्याचे दिसून येते. महीरपींची रचना व आकार भव्य दिसण्यासाठी बरेचसे कोरीवकाम येथे केलेले आढळते. महाद्वाराच्या माथ्यावर दोन्हीबाजूंस कमळपुष्प कोरलेले असून द्वाराच्या दोन्हीबाजुंस द्वाररक्षक व शक्तीदेवता म्हणून ऊजव्याबाजूस गरूड सदृश्य व्यक्ती हातात खांडा घेवून उभी दर्शविली आहे व डाव्याबाजूच्या शिल्पात चपेटदान हनुमान म्हणजेच चापटी मारण्याच्या पवित्रा घेतलेला हनुमान याचे शिल्प दर्श विले आहे. येथील शिल्पात हनुमानाने आपल्या डाव्या पायाखाली पणवती नामक राक्षसीण दाबलेली दर्शविले असून दोन्ही शिल्प सध्या सुस्थितीत आहेत. महाद्वाराच्या आत कवाडं अडकविण्यासाठीची दगडी कुसं सुस्थितीत दिसतात. महाद्वाराच्या आत दोन्हीबाजूंस देवडया□अलंगा□केलेल्या नाहीत कारण आतमधीलबाजूस चौकोनी आकारात उंच चौथऱ्यास खोल्या बांधलेल्या होत्या व या खोल्यांस वरच्याबाजूने चुनागच्ची होती. आतमधील डाव्याबाजूचा चौथरा हा इंग्रजीमधील 'L' आकारात असून ऊजव्याबाजूचा ओटा चौकोणी आकारात आहे. उजव्याबाजूच्या चौथऱ्यास आतमध्ये **10** □ **10** फुट आकाराची लहान आकारातील खोली असुन सध्या ही सुस्थितीत आहे व येथील खोलीचे छत तसेच भिंती सुस्थितीत आहेत. पहारेकऱ्यांस रहाण्यासाठी येथे खोल्या केल्या गेल्या होत्या असे आढळते. येथील खोलीत वस्तू ठेवणीसाठी व दिवा लावणीसाठी कोनाडे ऊपलब्ध आहेत. येथील खोलीच्या समोरील बाजुस चौथऱ्यावरील एक मोठया आकाराची खिडकी विशिष्ट रचनेत बांधुन घेतलेली निदर्शनास येते. एवढया खालच्याबाजुस अशी खिडकी ठेवण्यामागचे प्रयोजन लष्करी उपयोगाचे नव्हते असे दिसून येते. पावसाळयात येथील खिडकीचे महत्व दिसून येते. चोरदिंडी सारखी लहान आकाराची खिडकी येथे असण्यामागचे कारण पुढीलप्रमाणे ः तीव्रतेचा पाऊस किल्ल्यावर झाला की संपुर्ण किल्ल्यावरील पाण्याचे टाके भरून वाहायला लागतात. टाक्यांतून वाहणारे पाणी किल्ल्यावरील महाद्वार हा उताराचा भाग असल्याने येथे फार वेगाने वाहते या पाण्यास अटकाव झाला तर ते पाण्याचा लोंढा तटबंदी व बुरूजांस बाधा आणते. त्यामुळे येथे चोरदिंडीसारखी खिडकी ठेवल्या गेली व पाण्याचा तिव्र लोंढा आजही पावसाळयात किल्ल्याच्या ऊतारावर वाहत येतो तो थेट येथील चोरदिंडीवजा खिडकीतून महाप्रवेशद्वारात जावुन चौथ्या प्रवेशद्वारातुन बाहेर पडतो. पाण्याच्या लोंढयास वाट देण्यासाठी तयार केल्या गेलेल्या या खिडकीमुळे महाद्वार व बुरूज तसेच तटबंदी यांचे संरक्षण होत आहे व त्यामुळे आजही येथील ही बांधकामे सुस्थितीत असल्याचे आढळुन येते.

किल्ल्यावर प्रवेशण्याचा मार्ग पुर्वमध्ययुगात आजच्या महाद्वाराच्या शेजारी होता व तद्नंतर उत्तर मध्ययुगात नाना फडणविस याने धोंडो बल्लाळ निजसुरे व जयाजी धनराम मार्फत किल्ल्याची पुर्नबांधणी केली त्यात आज दिसणारे महाप्रवेशद्वार निर्माण केले गेल्याचे आढळते. पुर्वी असलेल्या प्रवेशद्वाराच्या डाव्याबाजूस पहारेक□यांच्या खोल्या होत्या त्या निदर्सनास येतात. सध्या येथील खोल्यांचे छत पडले असून भिंती सुस्थितीत दिसून येतात.

- किल्ल्याच्या माथ्यावरील उंच घुमट एक मध्ययुगीन कबर ः

पाच प्रवेशद्वारानंतर किल्ल्याच्या माथ्यावर महाद्वाराच्या समोरील बाजुस **25** □**30** फुट ऊंच एक कबर आहे. ही कुणाची कबर आहे याबद्दल माहिती मिळत नाही किंवा तशा आशयाचा शिलालेख किंवा कोणताही पुरावा येथे उपलब्ध नाही. किल्ल्याच्या माथ्यावर सर्वात जास्त ऊंचीची इमारत संपुर्ण बेसॉल्ट दगडात घुमटाकार बांधलेली असून हे इराणी शैलीचे बांधकाम आहे. आजपर्यंत या कबरेचा छोटा चिराही भग्न झालेला दिसून येत नाही यावरून कबर बांधतांना उत्कृष्ट दर्जाची पद्धत वापरलेली असल्याचे दिसून येते व तसेच ही कबर मध्ययुगीन नामांकीत व्यक्तीची असावी असा संभव आहे. कबरेची ऊंची **25** □**30** फुट घेतलेली असून पाया ऊंचीवर घातलेला दिसून येते. "महाद्वारातून आत गेल्यावर औरंगजेबाच्या मुलीची कबर लागते. पण तिचे नाव ज्ञात नाही." असा उल्लेख मराठी विश्वकोषात आलेला आहे.[15] परंतु याचा पुरावा मिळालेला नाही.

मध्ययुगीन वास्तुकलेत घुमट व दर्गा हे कलाविष्कार आहेत. 'घुमट' शब्दाची व्युत्पत्ती डोमस(विशिष्ट गर किंवा सभागृह□या लॅटीन शब्दापासून झाली. अर्धकंदुकाकार किंवा पालथ्या कमळाच्या आकाराच्या वास्तूरचनेस 'कुमूद' असे संबोधतात. कुमूद म्हणजेच 'घुमट' होय. भारतामध्ये इ.स.पूर्व **7** व्या शतकापासून स्तुपासारख्या वास्तुमध्ये घुमटाचा वापर करण्यात आला आहे. घुमटाच्या निर्मितीचे सर्वप्रथम तंत्र 'रोमन' लोकांना अवगत होते. रोमन लोकांकडून ते तंत्र 'बॅझंटायीन' नंतर 'इराणी व तुर्की' लोकांनी अवगत केले. भारतामध्ये इ.स. **11** व्या शतकांपर्यंत स्थापत्यकलेमध्ये घुमटाचा फारसा वापर होत नव्हता. भारतात इस्लामी आक्रमकांनी आपणासमवेत घुमट बांधणीचे तंत्रही आणले. मुस्लीम राज्यकर्त्यांनी घुमटांचा वापर 'मशिदी, दर्गे, मदरसा, धर्म

---

[15] मराठी विश्वकोश खंड **15**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, **1977**, पृ.**837**.

शाळा’ इत्यादी वास्तूमध्ये केला. भारतातील घुमटांचे बांधकाम दगडांमध्ये केले आहे. भारतातील घुमट वास्तूशैलीवर इराणीशैलीचा प्रभाव आहे. लोहगडावरील घुमट याच शैलीत आहे.[16]

कबरेच्या मागीलबाजूस पाण्याचे टाके असून शेजारी किल्ल्याची ‘कचेरी व लोहारखाणा’ आहे. कचेरीचे जोते व लोहारखाण्याचे अवशेष निदर्शनास येतात. कचेरी साधारणतः सदरेसारख्या आकारात असल्याचे दिसून येते. कचेरीचे तळखडे □पाय□ □जोते आज सुस्थितीत आहेत. कचेरीच्या समोर एक मोठया आकाराचा चुण्याचा घाणा आडवा पडलेल्या अवस्थेत आहे. येथे घाण्याचा चर असण्याचा संभव आहे. किल्ल्याचा येथील भाग सखोल असल्याने येथे अनेकदा भूस्खलन झालेले निदर्शनास येते. त्यामुळे येथे गाळ व खडेमाती मोठया प्रमाणात साचलेली दिसून येते. त्यात चर बुजला असण्याचा संभव आहे. पुरातत्व विभागामार्फत येथे ऊत्खनन झाल्यास येथील चर समोर येण्याचा संभव आहे. येथील चुण्याचा घाणा आडवा पडला असून त्याच्या सभोवती अनेक नक्षिदार चिरे अस्तव्यस्थ पडलेले आहेत.

कबरेच्या समोरील बाजूस **2009** सालापर्यंत एक ब्रिटीश बनावटीची ओतीव तोफ होती. ही तोफ अधिष्टानाला जाडसर व मुखाशी निमुळती होती. या बनावटीची तोफ बनविण्याचे प्रयोजन लांब पल्ल्याचा मारा करणे हे होते. तोफेच्या अधिष्टानावर “60 A” हा मजकुर अंकीत होता. सध्या किल्ल्यावर ही तोफ आढळत नाही. किल्ल्यावरील इतरत्र पडलेल्या तोफा जमा करून पुरातत्व विभागाने त्या गणेश प्रवेशद्वारासमोर ठेवल्या आहेत परंतु त्यात ही तोफ दिसून येत नाही. ही तोफ कुठे आहे याचा खुलासा होत नाही. तुर्तास किल्ल्यावर उपलब्ध तोफांमध्ये तुलनेत सर्वात दर्जेदार म्हणुन ही ब्रिटीश बनावटीची तोफ गणली जावी अशा बनावटीची होती. किल्ल्यावरील व परीघातील वस्तु व शिल्प अनेकदा गहाळ होत असून हे ऐतिहासिक नुकसान आहे.

- किल्ल्याच्या माथ्यावरील शिवमंदिर व हनुमान घुमटी ः

मध्ययुगात किल्ल्यांवर हनुमान शिल्प व पिंडी मोठया प्रमाणावर घडविल्या जात होत्या असे पुरातत्वीय अवशेषांवरून बहुतांशी किल्ल्यांवर दिसून येते. लोहगड किल्ला यास अपवाद नाही. लोहगड किल्ल्याच्या

[16] ल.क.गायकवाड, *शिवनेरी किल्ल्याचा इतिहास*, पुष्पनंद प्रकाशन, **2011**, पृ.**49**.

सोळाकोणी तलावाकडे जाण्याच्या मार्गावर लहान आकारातील दगडी शिवमंदिर होते. मंदिर मोडकळीस आल्याने त्याचा जिर्नोध्दार 'राजा शिवछत्रपती मंच, तळेगांव दाभाडे' व लोहगडवाडीतील ग्रामस्थ या दोहोंमार्फत **2010** साली झाला. जिर्नोध्दारापुर्वी लहान आकाराच्या मंदिरात वाकून जावे लागत होते. तसेच पावसाळयात पिंडीवर व भोवती पाणी साचत होते मात्र जिर्नोध्दारानंतर मंदीर मोठया आकारात करून येथे नित्य पुजाअर्चा सुरू केली गेली ती आजही ग्रामस्थांमार्फत चालु आहे. महाशिवरात्रीला दरवर्षी मोठया स्वरूपात शिवरात्रोत्सव 'राजे शिवछत्रपती मंच, तळेगांव दाभाडे' व 'लोहगडवाडी ग्रामस्त आणि ग्रामपंचायत' यांच्यामार्फत करण्यात येतो. नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिराचा चौकोणी आकार असून **6.5** फुट ऊंची आहे. या मंदिराच्या ऊभारणीत कोणताही डामडौल नसून कळसही न बांधता कमी ऊंचीमध्ये सिमेंटचे छत केलेले दिसून येते. येथील मंदिरात जातांना तीन पायऱ्या ऊतरून आत जाण्यास मार्ग आहे. अर्थात पुर्वीचे मंदिर हे ऊंचीला त्रोटक होतेच तसेच ते जमीनीत खड्डा करून शिवपींडी बसवून बांधले गेले होते. मंदीर जिर्नोध्दारात येथे मुळ शिवपींडीला धक्का न लावला मंदिराची उभारणी केली आहे. मंदिराचा दरवाजा लोखंडी केला असून तो पुजेच्या वेळी उघडला जातो. पुजेच्या वेळेच्या व्यतीरीक्त कुलुप लावल्यामुळे पर्यटकांस मंदिरात प्रवेशता येत नाही. भोवतीचा परिसर सुशोभित दिसावा याकरिता समोरील बाजूस तंदुर फरसबंदी करण्यात आली आहे.

शिवालयासमोर छोटया घुमटीत हनुमानाची शेंदुर फासलेली मुर्ती असून त्याशेजारी एक शिवपिंडी आहे. येथील शिवपिंडी समोर मध्ययुगीन दगडी नंदी होता **2010** साली तो चोरीस गेला. हे ऐतिहासिक मध्ययुगीन शिल्प आजपर्यंत सापडलेले नाही. या चोरीसंबंधी पोलीसांत तक्रार नोंदविली गेली होती मात्र पुढे काहीही झाले नसल्याचे दिसून येते. ऐतिहासिक वस्तूंबाबत आधुनिक काळात औत्सुक्य निर्माण झालेले दिसून येत असून स्वसंग्रही अशा वस्तू असाव्यात या आग्रही वृत्तीने लोहगड व विसापूर यांच्या परीघात व किल्ल्यांवरील मौलीक व दुर्मीळ शिल्प व वस्तुंची चोरी वाढलेली आढळुन येते.

नंदीचे दुर्मीळ शिल्प गहाळ झाल्यानंतर चोरी झाली असल्याचा संशय घेण्यात आल्याचे दिसून येते परंतु खोडसाळपणाने मंदिरामागील पाण्याच्या टाक्यातही हा नंदी फेकुन दिला असण्याचा संभव आहे. लोहगड परीघात किल्ल्यावरून हौशी पर्यटकांनी या आधी तोफा खाली लोटुन दिल्या असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे

उन्हाळयात येथील टाक्याच्या पाण्याची पातळी खालावली की टाक्यात उतरून किंवा आधुनिक उपकरणांद्वारे नंदीचा शोध येथे घेणे अपेक्षित आहे.

- कातळखोदीव पाण्याचे टाके व सोळाकोनी तलाव ः

लोहगड किल्ला मावळ तालुक्यातील सर्वात प्रबळ व कठीण किल्ला गणला गेल्यामुळे मध्ययुगीन स्थानिक राजवटींस लोहगड किल्ला आपल्या राजवटीकडे असावा ही आवश्यकता वाटू लागली. दरम्यान ज्या राजवटीमार्फत लोहगड किल्ला हस्तगत झाला त्यांनी अनेक टप्प्यांत याची दुर्गमता वाढविण्यास प्राधान्य दिले. गिरिदुर्ग हस्तगत करण्याची मध्ययुगीन प्रचलीत पद्धत म्हणजे किल्ल्यास वेढा देवून त्याची रसद तोडून किल्लेदारामार्फत किल्ला घ्यायचा ही दिसून येते. शत्रुसैन्य गडास घेरा घालुन बसले तरी अनेक दिवस किल्ला अजिंक्य राखता यावा यासाठी किल्ल्यावर पाण्याची सोय मोठया प्रमाणावर करणे आवश्यक होते. सैनिकांस उन्हाळयाच्या दिवसांतही पाण्याचे दुर्भिक्ष जाणवु नये याकरीता मोठे तलाव व पाण्याच्या टाक्या कातळयात खोदलेल्या दिसून येतात.

विंचुकाटा माची मार्गावर पाण्याच्या टाक्यांची श्रृंखला निदर्शनास येते. येथील सोळाकोनी तलाव वगळता इतर कोणत्याही टाक्यांवर शिलालेख नसून या टाक्यांचा कालावधी ढोबळ मानाने पुर्व मध्ययुग असा सांगता येतो. किल्ल्याच्या माथ्यावरील टाक्या मोठया आकारमानाच्या आहेत. प्राचीन पोढी खोदतांना आकाराने लहान असणे सहाजिक होते. कारण प्राचीन काळात किल्ल्याचा उपयोग लष्करी नव्हता. बौध्द भिक्षूंसाठी लहान आकाराच्या पोढी पुरेशा असल्याने माथ्यावर मोठया आकाराचे टाके खोदण्याची आवश्यकता प्राचीन काळात नव्हती. माथ्यावरील सर्व टाके आकाराने मोठे असून या मोठया संख्येने येथे त्याचे खोदकाम करण्यात आलेले आहे. लष्करी उपयोगासाठी या पर्वताचा वापर होवु लागल्यानंतर येथे मध्ययुगात मोठया खोदीव टाक्या करण्यात आल्या असे दिसून येते. शिवालयाच्या मागीलबाजुस प्राचीन कालखंडातील एक पोढी निदर्शनास येते. या पोढीचे मुख लहान आकारात ठेवुन आत उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. पाण्याची जास्त क्षमतेने साठवण व्हावी व उन्हाळयातही थंड पाणी मिळावे यासाठी येथे पोढी 10 × 10 फुट आकारात खोदण्यात आलेली दिसून

येते मात्र येथे वरील छतास आधार देण्यासाठी स्थंभ केलेला नाही. सध्या पर्यटक उन्हाळयात येथील पोढीचे पाणी पिण्यासाठी वापरतात. शिवमंदीराच्या मागच्याबाजूचे टाके साधारणतः आयताकृती असून हे अष्टकोणी आहे. टाक्यात ऊतरण्यासाठी **15** पायऱ्या असून एकाच बाजूने टाक्यात ऊतरता यावे अशी व्यवस्था केलेली आहे. येथील टाक्याची खोली **15** फुट आहे.

लोहगड किल्ल्याच्या मध्यावर लक्षवेधक **16** कोनी घडीव तलाव दिसून येतो. चौकोणी व षटकोनी पाण्याचे टाके व तलाव अनेक किल्ल्यांवर आढळतात. परंतु **16** कोनी घडीव तलाव बांधण्याची शैली दुर्मीळ उदाहरणात असल्याचे निदर्शनास येते. याच्या मोठया आकारमानामुळे जरी बांधीव तट असला तरी या साठयास तलाव संबोधणे सयुक्तीक आहे. अनेक पर्यटक मोठया तलावांस सर्रास 'हत्ती तलाव' किंवा 'हत्ती टाकं' असे संबोधतात. येथील तलावात ऊतरण्यासाठी रूंद पायऱ्यांचा मार्ग असून **25** पायऱ्या ऊतरल्यावर तलावाच्या पाण्याच्या पातळीजवळ पोहोचता येते. ही रूंद वाट सुशोभित करण्यासाठी डाव्या व ऊजव्याबाजूस दिवे लावणीसाठी कोनाडे केलेले आढळून येतात. येथे डाव्या बाजुस कोनाडयाच्या वरच्याबाजूला शिलालेख कोरलेला आढळतो. शिलालेखाची अक्षरे पावसाच्याबाजूस उघडयावर आल्यामुळे अस्पष्ट झालेली आहेत. सध्या हा शिलालेख पूर्ण वाचता येत नाही. परंतु शिलालेखाच्या पाच ओळींतून 'धोंडो बल्लाळ निजसुरे' या ऊत्तर पेशवाईतील आधिकाऱ्यांचे नाव स्पष्ट होते. तसेच शिलालेखाची सुरूवात 'श्री.गणेशाय नम ः' या आराध्य दैवतेच्या नावाने केलेली दिसून येते. तसेच अस्पष्ट अक्षरांत हा तलाव **1789** मध्ये नाना फडणीस याने बांधल्याचा ऊल्लेख आढळतो. सध्या शिलालेखाच्या शिळेस वरच्या ऊजव्याबाजुने खालच्या डाव्याटोकापर्यंत चिर गेलेली असून पुर्ण शिलालेख भंगलेला आहे.

ब्रिटीश कालखंडात तलाव निरूपयोगी व्हावा व नाना फडणवीस याने लोहगड किल्ल्यावरील संपत्ती येथील तलावात लपवून ठेवली असावी या शंकेने ब्रिटीशांनी हा तलाव गोलाकार तटबंदीच्या बाहेरील बाजूने पाणी काढण्याच्या बाजूनी भंग केला.[17] ब्रिटिशांना संपत्ती मिळाली की नाही याबद्दल माहिती मिळत नाही. मात्र त्यामुळे प्रस्तुत तलावात पावसाळयाच्या दिवसांतही पाणी साचत नाही. मोठया तिव्रतेच्या पावसात किल्ल्यावरील

---

[17] प्र.के.घाणेकर, *साद सहयाद्रीची भटकंती किल्ल्यांची,* स्नेहल प्रकाशन, **1985**, पृ.**185**.

पाणी वाहून या तलावात येते तरीही पाणी साचत नसल्याचे आढळते. सध्या तलावात मध्ययुगीन दोन समाध्या पडलेल्या दिसून येतात. या समाध्या लोहगड वाडीतील समाध्यांशी मिळत्या जुळत्या आहेत.

किल्ल्यावरील कातळखोदीव पाण्याचे टाके ः किल्ल्यावरील कबरेच्या पाठीमागच्या बाजूने पाण्याच्या टाक्यांचा समुह चालू होतो. येथील सर्व टाके कातळखोदीव असून माथ्याच्या ऊतारावर पावसाचे पाणी यात वाहून यावे याकरिता बांधलेले आढळुन येतात. येथील टाक्यांची खोली आकाराने कमी असून कातळात उघडया टाक्या येथे कोरल्या गेलेल्या दिसून येतात. पावसाळयात येथील सर्व टाक्या पाण्याने तुडुंब भरलेल्या असतात परंतु ऊन्हाळयाच्या दिवसांतही यांतील बहुतांशी टाके पाण्याने भरलेले असतात. विंचूकाटा माचीवर पाण्याचा एकमेव स्त्रोत असलेले कातळखोदीव छोटया आकाराचे पाण्याचे टाके हे विंचुकाटामाची वरील सैनिकांस पुरेसे असल्याचे दिसून येते. अर्वाचीन काळात विंचुकाटा माचीवर शेवटच्या टोकाला विटा व चुण्यात लहान आकारातील एक हौद बांधला गेला असल्याचे दिसून येते. माचीवरील पाण्याच्या टाक्यापासून माचीचे शेवटचे टोक बऱ्याचशा अंतरावर असल्याने शेवटच्या टोकास हौद अर्वाचीन काळात बांधलेला दिसून येतो. विंचूकाटा माचीपासून विसापूर बाजुने प्रथम प्रवेशद्वार मार्गावर वाटेत पाण्याची काही टाकी दिसून येतात. विसापूर टोकाच्या बाजूस मशीदीशेजारी गोलाकार झालेल्या खड्डयात पाणी साठून एक नैसर्गीक तळे निर्माण झालेले दिसून येते. मशीद ते लक्ष्मीकोठार मार्गावर ऊजव्याबाजूस पाण्याचे खोदीव टाके दिसून येते. येथील टाके इतर टाक्यांहुन वैशिष्ट्यपुर्ण बांधणीतील असून याची खोली **18** फुट आहे. लक्ष्मीकोठार शेजारी पाण्याची पोढी लहान आकारात दिसून येते. लोहगड किल्ल्यावर मोठया संख्येने तलाव व पाण्याचे टाके दिसून येतात. सैनिकांच्या उपयोगासाठी खोदलेल्या एवढया संख्येच्या टाक्यांमुळे किल्ल्यास वेढा पडला तरीही बराचसा काळ किल्ल्यास लढविता यावे यासाठी पाण्याची यथायोग्य योजना येथे केलेली दिसून येते.

- विंचूकाटामाची व माचीवर उतरण्याचा अवघड मार्ग ः

लोहगड किल्ल्याच्या पश्चिमबाजूस लांबसर पसरलेल्या सोंडेस 'विंचूकाटामाची' असे संबोधले जाते.[18] नामकरण विंचुकाटा होण्यामागचे विंचवाचा काटा म्हणजे नांगी असे ऊद्देशले आहे. विंचुकाटामाची लोहगड किल्ल्याचाच एक भाग असून लांबपर्यंत पसरलेली आहे. लोहगड किल्ल्याचे विशेषत्व म्हणुन विंचुकाटामाची गणली जाते. लांबवर पसरलेली ही सोंड संपुर्ण बांधणी करून किल्ल्याचा एक भाग बनविलेली दिसून येते. सोंड बांधुन काढण्याचे कारण 'आज्ञापत्र' या रामचंद्रपंत अमात्य लिखीत मध्ययुगीन ग्रंथात मिळते. यात "दुर्गासमीप दुसरा पर्वत दुर्गासमुदायी असू नये असल्यास तो भग्न करावा भग्न करण्यास असाध्य असल्यास तो बांधून घेवून त्यास दुर्गाचाच एक भाग बनवावा"[19] अशी माहिती मिळते. त्यानुसार लोहगड किल्ल्याची लांबवर पसरलेली सोंड म्हणजेच माची संपुर्णपणे बांधून घेतल्या गेली व किल्ल्याचे आकारमानही वाढले त्याचबरोबर बेलागताही वाढविल्या गेल्याचे दिसून येते.

विंचूकाटा माचीवरील मध्ययुगीन अवशेष माचीची स्वतंत्र ओळख व लोहगड किल्ल्याच्या बेलागतेमध्ये असलेले माचीचे योगदान दर्शवितात. विंचूकाटा माची हा जोडदुर्ग असल्याचे दिसून येते. किल्ला राखण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक असतात त्या सर्व येथील माचीस आढळुन येतात. माचीवर पहारेक□ांस राहण्यासाठी घरे होती तसेच पाण्याची पुरेशी सोय येथे केलेली दिसून येते. माचीवर प्रवेशतांना प्रवेशद्वारे केलेली आढळुन येतात. माचीवर तोफा, शौचकूपे, टाके, हौद, चिलखती बुरूज, ओबडधोबड धोंडे□गडावरून शत्रूसैन्यावर खाली फेकण्यासाठी), पावसाचा जोर वाढल्यावर पाणी वाहून जाण्यासाठी तयार केलेली मोठया आकाराची गटारे, दारूगोळा कोठारे यांसारखे सर्व अवशेष ऊपलब्ध आहेत. मध्ययुगात जोडदुर्ग असे विंचुकाटामाचीचे स्वरूप असल्याचे दिसून येते.

पश्चिम टोकाच्या बुरूजावरून विंचूकाटा माचीवर उतरण्यासाठीचा मध्ययुगीन एकमेव मार्ग होता. याठिकाणी एकामागे एक असे दोन बलाढय बुरूज बांधलेले असून विंचूकाटा माची शत्रूसैन्याने हस्तगत केली किंवा फंद फितूरीने माळा टाकून खालून शत्रूसैन्य चढून येवून माचीवर विजय मिळविला तरी लोहगड किल्ल्यास त्याचा उपसर्ग होवू नये यासाठी माचीच्या मुखाशी दोन बलाढय बुरूज बांधलेले आढळुन येतात. वंचूकाटामाची लोहगड

---

[18] सु. र. देशपांडे, *वाई कला आणि संस्कृती*, 2011, पृ. 88-89.

[19] रामचंद्रपंत अमात्य, पुर्वोक्त, पृ. 25.

किल्ल्यापेक्षा उंचीने लहान आहे. संपुर्ण माची लोहगड किल्ल्याच्या तोफेच्या टप्प्यात रहावी अशी बांधकाम रचना केलेली आढळते. माचीवर उरतण्यासाठी असलेल्या बुरूजास माचीवर बंदुकींच्या गोळया झाडण्यासाठी जंग्या ठेवलेल्या आढळुन येतात. पश्चिमबाजूच्या बुरूजावरून माचीवर उतरतांनाचा मार्ग अवघड असून सहजगत्या कुणासही येथुन उतरता व चढता येवू नये अशीही खबरदारी मध्ययुगात घेतली गेली होती.

विंचूकाटा माचीच्या सुरूवातीस उजव्याबाजूस तटबंदी कोसळल्याने अनेक अपघात येथे घडत आहेत. तटबंदी ज्या कडयावर बांधलेली होती तो कडा निसटल्याने संपुर्ण तटबंदी उत्तर बाजुच्या जंगलात पडल्याचे दिसून येते. माचीच्या शेवटच्या टोकास जातांना मार्गावर प्रथम डाव्याबाजूस एक दारूगोळा कोठार दिसून येते. तद्नंतर माचीच्या मधोमध छोटया टेकडीचा दगड तासून येथील भाग सपाट करून घेतलेला दिसतो. याठिकाणी असलेल्या भग्नावशेषांवरून येथे पहारेकऱ्यांची घरे असण्याचा संभव आहे. येथे काही खोल्या होत्या हे जोत्याहून आढळते. येथील खोल्यांच्या उजव्याबाजूच्या तटबंदीस वर चढण्यासाठी दोन्हीबाजूंनी चढता येईल अशा प्रकारच्या पायऱ्या ठेवलेल्या आहेत. माचीच्या टोकास जातांना माचीच्या मधोमध मोठया आकारमानाचे दारूगोळा कोठार निदर्शनास येते. हे कोठार भग्न झालेले आहे. माचीच्या मधोमध आयताकार कातळखोदीव टाकं आहे. संपुर्ण माचीवर एकच पाण्याचे टाक असून टाक्यात ऊतरण्यासाठी तीन –चार पायऱ्या डाव्या कोपऱ्यात खोदलेल्या आहेत. पावसाळयात टाकं भरून वाहु लागते. वाहणाऱ्या पाण्याचा लोंढा तटबंदीच्या आतमधील बाजूने साठू नये व भविष्यात तटबंदीस धोका पोहोचू नये याकरीता ऊजव्याबाजूच्या तटबंदीस लहान आकारातील नक्षीदार मोरी करून त्यातून पाणी तटबंदीबाहेर काढण्याची व्यवस्था केलेली आढळते. पाणी वाहुन जाण्याची योजना आजही कार्यरत आहे. टाक्याच्या डाव्याबाजूस तटबंदीस एक शौचकूप असून इतर शौचकूपांप्रमाणे हे समोर दिसत नाही. आत प्रवेशल्यावर लहान आकाराचा पॅसेज करून मग शौचकुप ठेवलेले आढळते. येथील शौचकूपाच्या वरच्याबाजूने मोठया आकाराच्या तोडी ठेवुन छत केलेले आढळते. शौचकुपास आतमधील बाजूस वस्तू ठेवणीसाठी व दिवा लावणीसाठी कोनाडे ठेवलेले आहेत. तद्नंतर समोर दारूगोळा कोठार असून त्यामागे सदरेसारखे बांधकाम आढळते. सदरेसारख्या दिसणाऱ्या बांधकामात समोरील व मागच्या बाजुने प्रवेशद्वार होते. उजव्याबाजूस दुहेरी भिंत घालून पाठीमागील द्वारास जाण्यासाठी पॅसेजमधुन जाण्याची व्यवस्था केलेली दिसून येते. पश्चिमबाजूस चालतांनाच्या मार्गावर डाव्या व उजव्या दोन्हीबाजूंस तटबंदीवर चढण्यासाठी दुहेरी पद्धतीच्या पायऱ्या तटबंदीस केल्या होत्या असे दिसून येते. आजही येथील पायऱ्या सुस्थितीत असून तटबंदीवर

चढण्यासाठी याचा वापर होतो. तद्नंतर डाव्याबाजूच्या तटबंदीस स्पर्शुन असलेल्या दारूगोळा कोठाराची दुरावस्था दिसून येते. कोठाराच्या शेजारी उजव्याबाजूच्या तटबंदीस शौचकूप असून याचे छत पडल्याने त्याची दुरावस्था दिसून येते. शौचकूपाच्या शेजारी माचीवर साठणारे पाणी वाहून जाण्याकरीता एक नक्षीदार मोरी असून आजही ही मोरी कार्यरत आहे. तद्नंतर उजव्या तटबंदीस वर चढण्यासाठी पायऱ्या असून येथुन पश्चिमेकडे जातांना माची निमुळती होत गेलेली दिसून येते. येथुन पश्चिमेकडे जातांनाच्या मार्गावर डाव्याबाजुच्या तटबंदीस स्पर्शुन एक खोली असून येथुन पुढील माची स्वतंत्र असल्याचे दिसून येते. पश्चिम टोकास जातांना येथील खोली तपासणीसाठी केली गेली असल्याचे आढळते. ही खोली व उजवी तटबंदी यांतुन पश्चिमेस माचीच्या शेवटच्या टोकास जावावयास एक द्वार होते. येथील द्वारातून तपासणी शिवाय जाता किंवा येता येत नसावे असे दिसून येते. किल्ल्याच्या बेलागतेमध्ये भर घालण्यासाठी माची हा स्वतंत्र भाग केला गेल्याचे दिसून येते तसेच माचीचेही दोन विभाग करून त्या दोहोंचा परस्परसंबंध कमी राहील याची दक्षता घेतल्या गेलेली दिसून येते. त्यामुळे लोहगड अधिक बेलाग झालेला दिसून येतो. या खोलीपासून पुढे ऊजव्याबाजूच्या तटबंदीस दोन्हीबाजूंनी पहारेकऱ्यांस तटबंदीवर चढता यावे याकरीता दोन्हीबाजूंनी पायऱ्या केलेल्या आढळतात. त्यासमोरील बाजुस डावीकडे तटबंदीवर चढण्याकरीता एकेरी पायऱ्या आहेत. एकावेळी एकच पहारेकरी या पायऱ्यांनी तटबंदीवर चढू शकतो. येथील पायऱ्या मोठया तोडी करून तटबंदीत खोचलेल्या आढळुन येतात. तद्नंतर तटबंदीच्या मधोमध दारूगोळा कोठाराचे भग्नावशेष असून तटबंदीवर चढण्यासाठी ऊजव्या व डाव्या दोन्हीबाजूंस एकेरी पायऱ्या निदर्शनास येतात. शत्रूसैन्य जर ‘सुलतानढवा’(सर्व बाजुंनी एकत्रीत चढण्याचा प्रयत्न करावयास लागले त्यावेळी मध्ययुगात तोफा बंदुका व पेटते बाण मारून शत्रुस गारद करण्याची पद्धत होतीच परंतु याहुन योग्य उपाय गोफनगुंडे ठरत असत. कारण गोळया व तोफगोळे बनविण्यास वेळ, श्रम, पैसा जात असे त्यापेक्षा गोफनगुंडे अचुक निशानी साधत व तेवढयाच तिव्रतेने परिणामकारक होई त्यामुळे गोफन गुंडयांचा प्रयोग मध्ययुगातील किल्ले राखण्यासाठी केलेला अनेकदा दिसून येतो. पुरंदर तहावेळी दिलेरखानाचे सैन्य किल्ल्यावर चढावयास लागले असता मध्यावर गेल्यानंतर वरतुन मोठया आकाराच्या धोंडी मराठी सैन्याने लोटुन दिल्या होत्या. शत्रुसैन्यास मारण्यासाठी गोफनगुंडे व वेढा सुलतानढवा करीत असल्यास मोठया आकाराच्या दगडी धोंडी गडावरून खाली लोटुन देणे उत्तम पर्याय होता त्यामुळे मोठा दगड फोडुन त्याच्या गोफनीत बसतील अशा ठिकऱ्या केल्या जात त्याचप्रकारे दगडी मोठया तोडी माचीवर साचविण्याची मध्ययुगीन पद्धत होती. लोहगड

किल्ल्याच्या विंचुकाटा माचीवर शेवटच्या टोकाचा ऊंच खडक सुरूंग लावून फोडून घेतलेला दिसून येतो व गोफनीत बसतील असे लहान आकारातील तुकडेही केल्या गेले. एवढया मोठया प्रमाणात खडक व त्याच्या ठिकऱ्या येथे माचीवर आढळत असून त्यावरून मध्ययुगीन गिरीदुर्ग लढविण्याची विशेष पद्धत समोर येते. येथील दगडांतुन तोफांसाठी दगडी तोफगोळे बनविले जात असण्याचा संभव आहे. यांव्यतिरिक्त तटबंदी बांधण्यासाठी कोठारे व इमारती बांधण्यासाठी येथील प्रचंड शिळांचा उपयोग होत असण्याचा संभव आहे. येथुन शेजारी डाव्या तटबंदीस वरती चढण्यासाठी पायऱ्या ठेवलेल्या असून समोरील बाजूस दारूगोळा कोठार बनविले गेले होते. दारूगोळा कोठारापासून पश्चिमेकडे डाव्याबाजूच्या तटबंदीस वर चढण्यासाठी पायऱ्या ठेवल्या असून या पायऱ्या तटबंदीवर चढण्याच्या पश्चिमबाजुच्या अखेरच्या पायऱ्या आहेत. या ठिकाणापासून ऊजव्याबाजूच्या तटबंदीस छत पडलेले एक भग्न शौचकूप आढळते. विंचुकाटामाचीच्या शेवटच्या टोकावर ब्रिटीश बांधणीतील एक लहान आकाराचा हौद  निदर्शनास येतो. येथील हौद सुस्थितीत असून यास आतमधील बाजूने चुण्याचा गिलावा केलेला दिसून येतो. माचीस पाण्याच्या सोयीसाठी मोठया आकाराचे कातळखोदीव टाकं आहे शिवाय यातील पाणी ऊन्हाळयातही कधी आटत नाही असे आढळते. तरीही येथे हौद करण्यामागे दोन गोष्ट असाव्यात असे दिसते. पहीले कारण माचीच्या शेवटच्या टोकापासून माचीवरील मधोमध असलेले कातळखोदीव टाकं दुर अंतरावर आहे व येथील पहारेकऱ्यांस पिण्याच्या तसेच  वापरण्याच्या कामासाठी लागणारे पाणी आणावयासाठी लांब पायपीट करावी लागु नये यासाठी येथे छोटेखानी हौद केला असण्याचा संभव आहे. दुसरे कारण मध्ययुगात मोठया तोफा डागणारे गोलंदाज बहीरे होण्याचा व त्यांच्या कानाचा पडदा फाटण्याचा संभव असे. त्यामुळे तोफांच्या मागे जवळ अंतरावर हौद करून पाण्याने भरून ठेवत व तोफेस बत्ती दिल्यानंतर गोलंदाज हौदात उडया घेवुन कान झाकत त्यामुळे गोलंदाजांच्या कानांवर मोठया तोफांच्या आवाजाचे फारसे परिणाम होत नसतं. दोन्ही कारणांमधील पहिले कारण सयुक्तीक वाटते कारण येथील हौदास भिंती उंचीवर बांधल्या गेल्या आहेत. मध्ययुगात येथे हौद होता व ब्रिटीश कालखंडात याची पुर्नबांधणी झाली असण्याचा संभव आहे.

विंचुकाटा माचीच्या शेवटच्या बुरूजावरून दुरवरच्या प्रदेशावर लक्ष ठेवता येते. बुरूजावरून समोर किल्ल्याखाली वसलेली घेरेवाडी दिसते. येथील बुरूजाची उंची साधारणतः **150** फुट असून याची वेलागता वाढविण्यासाठी बुरूजास बाहेरील बाजुने प्रतिबुरूज बांधुन चिलखत घातल्याचे दिसून येते.  किल्ल्याचे व त्यावरील बुरूजाचे महत्व लक्षात घेवुन त्यास चिलखत चढविण्याचा दुर्मीळ प्रकार असून या बांधकामाशी साम्य दर्श

विणारे बांधकाम राजमाची किल्ल्यामधील श्रीवर्धन या बालेकिल्ल्याच्या ऊत्तर बुरूजास दिसून येते. येथील चिलखती बुरूजाचे प्रयोजन मुख्य बुरूजाचे संरक्षण असून शत्रूसैन्याकडून येथील बुरूजावर तोफांचा भडीमार झाला आणि येथील बुरूज भग्न पावला तरीही शत्रुसैन्य किल्ल्यात प्रवेशु नये व भंग झालेल्या बुरूजाच्या मागे असलेल्या मुख्य बुरूजावरून लढता यावे यासाठी चिलखती बुरूजाचे प्रयोजन असल्याचे दिसून येते. विंचूकाटयाच्या चिलखती बुरूजास उतरतांना डाव्याबाजूने जावून उजव्याबाजूने वर चढून येता यावे अशी रचना येथे दिसून येते. मात्र येथील दोन्ही द्वारांचा आकार अतीशय लहान ठेवला गेला असून याचे प्रयोजन शत्रूसैन्याकडून जरी चिलखत फोडण्यात आले तरीही शत्रूसैन्य माचीवर प्रवेशीले जावू नये असे होते. शत्रुसैन्याकडुन माचीवर प्रवेशण्याचे प्रयत्न झाले तरी येथे जाडसर आकाराची दोन कवाडं लावलेली असतं. सध्या येथील कवाड नष्ट झाली परंतु त्यांची दगडी कुस सुस्थितीत आहेत. दगडी कुसांच्या आकारावरून कवाडांची जाडी व अभेद्यता बळकट असण्याचा संभव आहे. येथील कवाडं आकाराने लहान मात्र जाडसर द्वारं फोडणे हे कठीण व श्रमदायी कामं होते व वरच्या बुरूजावरून पेटते बाणं, भाले, बंदुकींच्या शिशाच्या गोळया, मोठया आकाराची दगडं येथील शत्रुसैन्यावर फेकण्यास येथे चांगली जागा उंचीवर बांधुन घेतलेली निदर्शनास येते. तदनंतर जरी शत्रुसैन्याने द्वारे फोडली तरी त्यातुन आत शिरतांना लहान आकाराच्या द्वारातुन सरपटत आत जावे लागत असल्याने बाहेरीलबाजूने एकावेळी एकच शत्रुसैन्य आत प्रवेश करू शकते व त्यास सहजगत्या मारणे सोपी गोष्ट व्हावी यासाठी येथील चिलखती बुरूजाची प्रवेशद्वारे आकाराने लहान व जाडसर करून येथील प्रवेशद्वारांस मजबुती दिल्या गेली असे दिसून येते.

चिलखती बुरूजावर जातांना **3** □**4** फुट आकाराच्या लहान आकारातील द्वारातून प्रवेश करावा लागतो. येथील प्रवेशद्वारास दगडाच्या पाच कमानी तयार केलेल्या असून मोठयाकमानी पासून टप्प्या□टप्प्याने लहान कमानी घडविलेल्या निदर्शनास येतात. चिलखती बुरूजात प्रवेशल्यानंतर अर्धगोलाकार वळून उजवीकडे येतांनाच्या मार्गावर डाव्याबाजूच्या तटबंदीवर बंदुकीच्या गोळया व बाण मारण्यासाठी अनेक जंग्या ठेवलेल्या आढळतात. तसेच पहारेकऱ्यांस तटावरून बाहेरील प्रदेशावर लक्ष ठेवण्यासाठी व शत्रूसैन्यावर हल्ला करण्यासाठी एक लहान आकारातील ओटा/चौथरा केलेला असून त्यावर चढुन शत्रूसैन्यावर हल्ला करण्याची व्यवस्था ठेवल्या गेल्याचे दिसून येते. उजव्याबाजूने माचीवर चढतांना असलेल्या लहान आकारातील प्रवेशद्वाराच्या वरच्या उजव्याबाजूस दगडांस असलेली टोकं तासलेली असून ती प्रवेशद्वाराची नक्षी भासावी अशी

केल्या गेली आहे. स्थापत्य शास्त्रात मध्ययुगात बरीचशी प्रगती झाली होती असे येथील रचनेवरून दिसून येते. पाथरवटांची विशेष शैली येथे निदर्शनास येत असून सहा दगडांस त्यांची टोकं तासून नक्षीदार बनविले गेले आहे. येथील नक्षीचे प्रयोजन पहारेकऱ्यांस दगडाची धडक लागली तरी इजा होवु नये असे होते. माचीवर येथील लहान आकारातील द्वारातुन चढता येते. द्वारात आत प्रवेशल्यावर डाव्याबाजूचा एक मोठी तोड चौकोनी आकाराची होती तीला साळून तीक्ष्ण टोक घालवून पहारेकऱ्यांस इजा होणार नाही याची दक्षता घेतली गेल्याचे निदर्शनास येते.

- विंचूकाटा माची ते लक्ष्मीकोठार (किल्ल्याची ऊत्तर बाजू) भग्नावशेष ः

विंचूकाटा माची ते लक्ष्मीकोठार मार्गावर मध्ययुगीन व प्राचीन अवशेष दिसून येतात. विंचूकाटा माचीवरून किल्ल्यावर चढल्यानंतर डाव्याबाजूने किल्ल्याच्या विसापूर टोकाच्या बुरूजास मार्ग जातो. या मार्गावर अनेक दारूगोळा कोठारे व पहारेकऱ्यांच्या खोल्या दिसून येतात. दारूगोळा कोठारे किल्ल्याच्या तटबंदीस स्पर्शुन बांधल्या गेलेली नसल्याचे आढळते कारण युध्दप्रसंगी शत्रूसैन्याकडून एखादा तोफगोळा दारूगोळा कोठारास लागला तर कोठार आगीच्या भक्षस्थानी पडते व त्यायोगे संपुर्ण किल्ल्यासच आग लागुन कोठारे, कचेरी, वाडे आगीत खाक होतात. म्हणून दारूगोळा कोठारांचे बांधकाम तटबंदीस स्पर्शुन न करता ठरावीक अंतरावर केले गेलेले दिसून येते. परंतु तटबंदीपासून फार लांब अंतरावर कोठारे बांधलेली आढळत नाहीत कारण शत्रूसैन्याचे आक्रमण झाल्यास तोफा भरण्यास व त्यातील गोळा उडवून त्या पुसून रिकाम्या करून थंड व्हाव्यात यासाठी त्यावर गोणपाट आंथरण्यास फार वेळ लागत असे हा वेळ कमी लागावा यासाठी दारूगोळा कोठार ठरावीक अंतरावर बांधल्या गेलेले निदर्शनास येते. म्हणजेच दारूगोळा कोठारे ही तटबंदीपासून कायम विशिष्ट अंतरावर बांधलेली आढळतात. दारूगोळा कोठारे ही किल्ल्याची अतिमहत्वपुर्ण गोष्ट म्हणून त्यांची बांधणी व ठिकाणे ही किल्लेदाराकडून ठरवून त्यानुसार होत असत. विंचूकाटा माचीपासून विसापूर किल्ल्याच्या बाजूस बुरूजापर्यंत जातांना दोन दारूगोळा कोठारे बांधलेली आढळतात. एक कोठार तटबंदीच्या थोडे जवळ असून सर्व कोठारांचे भग्नावशेष शिल्लक राहीलेले आहेत. दारूगोळा कोठारे ते विसापूर टोकाचा बुरूज या मार्गावर पावसाळयात मोठा धवधवा वाहतो. येथील धबधब्यात कौलं, रांझनाचे तुकडे, माठाच्या माना व माठाचे तुकडे, मध्ययुगीन

भेंडा विटांचे लहानगे तुकडे, दगडी वरवंटे यांसारख्या अनेक वस्तू आढळतात. धवधवा तटावरून खाली जाण्यास सुटतो येथे एक 10□10 फुट आकाराची कमी उंचीची प्राचीन गुंफा आहे. रोप लावुन येथील गुंफा पहावी लागते. धबधब्याच्या पुढे दोन दारूगोळा कोठारे निदर्शनास येतात. विसापूर बाजुच्या बुरूजावरील दारूगोळा कोठार इतर कोठारांपेक्षा सुस्थितीत आढळते कारण हे कोठार इतर कोठारांहून कमी ऊंचीचे बांधले गेले व शेजारच्या टेकडीमुळे यास वा□ाचा दाब व पाऊस कमी प्रमाणात सहन करावा लागला म्हणून हे सुस्थितीत राहीलेले आढळते. आजही या कोठारात दगडी तोफगोळे आढळतात.

विसापूर बाजूच्या बुरूजापासून पुर्वबाजूने लक्ष्मी कोठाराकडे जाण्याचा मार्ग तटबंदीस समांतर असून उजव्या टेकाडीस पाण्याचे 30□30 फुट आकाराचे टाके व शेजारी लहान आकारातील 20□15 फुट आकाराचे टाकं आहे. दोन्ही टाके कातळखोदीव असून खोल आहेत. पाण्याचे टाके ते लक्ष्मीकोठार जातांनाच्या मार्गावर दोन दारूगोळा कोठारे दिसून येतात. कोठारांच्या मागच्याबाजूस खड्डा तयार झाल्याने पावसाळयात येथे मोठया प्रमाणात पाण्याचा संचय होतो मात्र पावसाळयानंतर दलदल तयार होवून ती ऊन्हाळयापर्यंत कायम राहते व उन्हाळा सुरू होताच येथे लहान आकाराचा खड्डा दिसून येतो. येथील नैसर्गीकरीत्या होणाऱ्या तलावाच्या शेजारी दोन चौथऱ्याची मशीद आहे. मशीदीचे बांधकाम मध्ययुगातील असून मध्ययुगापासून आतापर्यंत येथे अनेक बदल अनेक टप्प्यांत झालेले दिसून येतात. मशिदीमागे किल्ल्यावरील सर्वात ऊंचीची टेकडी असून टेकडीवर मध्ययुगात बांधकाम असल्याचे दिसून येते. टेकडीच्या शेजारी खड्डयात पावसाळयात नैसर्गिक तलाव निर्माण होतो. येथुन पुर्वेला एक दारूगोळा कोठार असून त्याच्या शेजारी एका रांगेत एका पाठोपाठ एक असे तीन दारूगोळा कोठारं आहेत. येथून शेजारी लक्ष्मीकोठार लेणी चालू होते.

- लक्ष्मीकोठार लेणी, विहार, पोढी ः

लक्ष्मीकोठार मोठे आकारमान असलेली लेणी असून सातवाहन कालखंडात ही लेणी कोरल्या गेली असावी असा संभव आहे. कारण भाजे व बेडसे या लोहगड किल्ल्याच्या परिघातील लेणींच्या रचनेशी येथील स्तंभ व त्यांवरील नक्षी मिळतीजुळती आढळते. किल्ल्याचे नाव लोमेश□लोमहर्ष□□ऋषींच्या नावावरून पडले आहे असे

मुलाखतींमधून ग्रामस्थांमार्फत माहीती मिळते. लोमहर्ष ऋषींनी लोहगड किल्ल्यावर तपश्चर्या केली व त्यांच्या नावावरून ‘लोहगड’ असे नामकरण झाले.[20] लोमेश ऋषींनी या पर्वतावर लक्ष्मीकोठारात तपश्चर्या केली तसेच मध्ययुगात शिवाजी महाराजांनी सुरतलुट केल्यावर आणलेली सर्व संपत्ती नेतोजी पालकर सोबत गडावरील लक्ष्मी कोठीत ठेवली अशी माहीती परिघातील मुलाखतींतून ग्रामस्थांमार्फत मिळते. लक्ष्मीकोठीस प्राचीन तसेच मध्ययुगीन इतिहास असल्याचे दिसून येते.

<u>टिप</u> ः लक्ष्मी कोठारास विसापूर बाजूने□ऊत्तर दिशेने□क्रमांक देवून माहिति दिलेली आहे.

लोहगड किल्ल्याच्या कातळकडयातील पुर्वाभिमुख लेणींची निर्मीती सातवाहन कालखंडात झाली असल्याचा संभव आहे. लक्ष्मीकोठार किंवा कातळकडयातील पुर्वाभिमुख लेणी व पोढी मिळुन येथे एकही शिलालेख निदर्शनास आलेला नसून त्यामुळे येथील लेणीचा निश्चित कालावधी समोर आलेला नाही परंतु प्राचीन काळात येथे लेणी खोदल्या गेली असल्याचे दिसून येते.

उत्तर दिशेने लक्ष्मीकोठाराची मोजदाद ः

**1**□क्रमांक **1** ची पाण्याची पोढी असून आयताकार वऱ्हांडयातून आत पोढीचे काम केले असल्याचे दिसून येते. पोढीच्या वरच्या छतास **2 .5** □**2 .5** फुट आकाराच्या स्तंभांने आधार दिला आहे. **30** □**30** फुट आकाराची ही पोढी खोल नसल्याचे आढळते. सध्या येथे मोठया प्रमाणात गाळ वाहून आला असून टाके गाळात भरलेले आढळते.

**2**□क्रमांक **2** ची खोली **20** □**20** फुट चौकोनी आकाराची आहे. येथील खोलीचे छत नक्षीदार करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. परंतु सध्या येथील छत पडक्या अवस्थेत दिसून येते. या खोलीतून कमांक **3** च्या पोढीत ऊतरण्यास द्वार केलेले आहे.

**3**□क्रमांक **3** च्या पोढीत आजही पाणी साठत असून पोढी सुस्थितीत असल्याचे आढळते. पोढीतील पाणी पिण्यासाठी वापरले जाते. पर्यटक व मशीदीत रहाणारे लोक पिण्यासाठी येथील पोढीचा वापर करतात. ही पोढी **3 .5** फुट खोल आहे. पोढीचे पाणी घेण्यासाठी लक्ष्मी कोठाराच्या मुखाशी पुर्ववाजूस एक लहान

---

[20] मुलाखत – बाळासाहेब ढाकोळ, लोहगडवाडी, वेळ – **02ः45** दुपारी.

आकाराची खिडकी प्राचीन काळात कोरलेली आढळते. येथील खिडकीचा दगड कालौघात पडत चालला असून खिडकी आकाराने मोठी होत असल्याचे आढळते. येथील पोढीस क्रमांक **2** च्या खोलीतून एक द्वार व लक्ष्मी कोठीच्या मुखाशी चौकोणी आकाराची **5.2 □4.7** फुटांचे द्वार व **2.4 □2.4** फुट आकाराची खिडकी ठेवलेली दिसून येते.

**4**□क्रमांक **4** ची लेणी लक्ष्मी कोठार असून आज दिसणारे लक्ष्मी कोठार प्राचीन काळात मोठी लेणी म्हणून कोरलेले आढळते. नक्षीदार स्तंभ व मोठया वऱ्हांडयाची ही प्राचीन लेणी मध्ययुगात समोरच्या बाजूने दगडामातीत चिणून स्थंभही चिणले गेल्याचे निदर्शनास येते. मध्ययुगात संपुर्ण वऱ्हांडा चिणल्या गेला व एक लहान आकाराचा प्रवेशमार्ग येथे ठेवला गेला. हा मार्ग आजही वापरला जातो. लेणीचा आज दिसणारा प्रवेशमार्ग लहान आकारातील असून लेणीचा वऱ्हांडा आयताकार आहे. मध्ययुगीन कालखंडात लेणी ते कोठार असा बदल झालेला आढळतो. लक्ष्मीकोठी असे नामकरण मध्ययुगातच केले गेले असण्याचा संभव आहे. मध्ययुगात लक्ष्मीकोठीचा उपयोग पहारेक□्यांस रहाण्यासाठी व चिजवस्तूंचा संचय करण्यासाठी केला गेला होता असे दिसून येते. तिव्रतेच्या पावसामध्येही येथे लेणी सुरक्षित राहते व आतमधील बाजुस ओल देखिल येत नाही. प्राचीन कालखंडातील अनेक लेणींचा उपयोग मध्ययुगात लष्करी उपयोगासाठी केला गेलेला दिसून येतो. लष्करी सोयीसाठी नक्षीदार स्तंभांवर दगड मातीने चिणुन भिंत बांधण्यात आलेली आढळते. लक्ष्मीकोठीच्या प्रवेशद्वारावर डाव्या स्तंभावर दिवा लावणीसाठी कोनाडा केलेला आढळतो. लक्ष्मीकोठी आयताकार असून आतमधील व□्हांडाही आयताकार कोरलेला आढळतो. **51.3 □28.9** फुट आकारात लक्ष्मी कोठी असून यात दोन्ही बाजूंस बसावयासाठी **3.4** फुट ऊंचीचे कट्टे कोरलेले आढळून येतात. लक्ष्मीकोठीची ऊंची **7** फुट असून छत सलग कोरलेले आहे यात कोठेही ओबडधोबडपणा दिसून येत नाही. लक्ष्मी कोठीतून आतमधील आयताकार व□्हांडयात प्रवेशतांना दोन मोठया आकाराच्या कट्टयांच्या मधोमध **3** पाय□्या चढून आतमधील व□्हांडयात जाण्यास मार्ग आहे. लक्ष्मी कोठीत पायऱ्या चढुन वऱ्हांडयात प्रवेशतांना कमानीस एकुण चार स्तंभ दिसून येतात. यातील ऊजव्या स्तंभास दिवा लावणीसाठी कोनाडा आढळतो. कमानीस आतमधीलबाजूने बसावयासाठी कट्टे ठेवलेले निदर्शनास येतात. आयताकार व□्हांडयात एकुण पाच खोल्या रहावयासाठी कोरलेल्या असून त्यातील तीन समोरीलबाजूने व दोन खोल्या ऊजव्या व डाव्याबाजूने असल्याचे निदर्शनास येते. येथील खोल्यांस

अक्षरे दिली असून त्यानुसार माहिती दिलेली आहे. डाव्याबाजूने येथील खोल्यांची मोजदाद केली आहे ती पुढीलप्रमाणे ः

अ□लक्ष्मीकोठारातील डाव्याबाजूच्या असलेल्या पहील्या खोलीस 'अ' अक्षर संबोधले असून ही खोली अंधारमय आहे. **12.11** □**9.9** फुट येथील खोलीचे आकारमान असून आत प्रवेशल्यावर डाव्याबाजूच्या भिंतीस कातळास हनुमान आकार शेंदूरात देवून स्वयंभू हनुमान येथे वसविला आहे. तसेच हनुमान भक्तांकडून रोज दिवाबत्ती येथे होतांना दिसून येते.

ब□व्हरांडयात समोरच्या बाजूस तीनपैकी डाव्याबाजूच्या 'ब' खोलीचा **12.9** □**9.10** फुट आकार आहे. द्वाराशेजारी एक लहान आकारातील खिडकी येथे कोरलेली आढळते.

क□व्हरांडयात शिरल्यावर समोरची 'क' खोली असून येथील खोलीत शिरल्यावर त्याच्या आतमध्ये आणिक एक खोली काहीशी आत कोरल्या गेलेली आढळते. शेवट कोरल्या गेलेली खोली आयताकार असून **7.6** □ **5.3** फुट आकाराची आहे. येथे ओबडधोबड कोरीवकाम आढळते. येथील खोलीतून बाहेर 'क' खोलीत आत ऊजव्याबाजूस लहान आकारात भगदाड पडलेले आढळते. सध्या आकाराने लहान असलेले भगदाड वाढत चालले असून यावर लवकर उपाय झाला नाही तर काही वर्षांत कातळयाची संपुर्ण भिंतच पडण्याचा संभव आहे. येथील खोलीचे आकारमान **17.5** □ **13.5** फुट असून 'क' खोलीत समोरच्या बाजुच्या भिंतीस डाव्याबाजूस **4.6** □**2.8** फुट आकाराची लहान आकारातील खोली कोरण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. मात्र पुढे कोरतांना दगडात कठीणपणा राहीला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे येथील कोरण्याचे काम अर्धवट सोडल्याचे दिसून येते. सध्या येथील जागेसही ऊपलब्ध कातळयास शेंदुर फासून लहान आकारातील घंटी कातळा फोडून त्यास अडकविलेली दिसून येते. परंतु कोणता देव येथे करण्याचा प्रयत्न केला गेला हे कळुन येत नाही.

ड□व्हरांडयात समोरील बाजुस असलेल्या खोल्यांतील तिसरी खोली 'ड' नावाने संबोधली आहे. 'ड' खोलीचे आकारमान **12.6** □**9.5** फुट आहे.

ई□व्हरांडयात प्रवेशल्यावर ऊजव्याबाजूस शेवटी असलेल्या खोलीस 'ई' संबोधले असून येथील खोलीचे आकारमान **12.6** □**9.5** फुट आहे.

लक्ष्मीकोठार ही मोठया आकाराची प्राचीन लेणी असून मोठा वऱ्हांडा येथे छतविरहीत कोरलेला आढळतो तसेच एकुण सहा खोल्या आतमध्ये कोरलेल्या आढळतात. दर्जेदार कोरीवकाम येथे केले गेले असल्याने येथे तिव्रतेच्या पावसाळयातही आतमधील लेणी सुस्थितीत राहते.

**5**□कमांक **5** ही लेणी लक्ष्मीकोठारच्या मागीलबाजुस कातळयात कोरलेली आढळते. मोठया कातळयाचा उपयोग फक्त पोढी न करता लेण्या कोरण्यासाठी येथे केला गेल्याचे निदर्शनास येते. तसेच लक्ष्मीकोठार कोरल्यानंतर त्यामागील कातळयात कमांक **5** ही लेणी कोरल्या गेलेली आढळते. लक्ष्मीकोठीसारखे येथील लेणीस प्राचीन कालखंडात समोरील बाजुने मोकळे ठेवले गेले होते मात्र मध्ययुगात सैनिकांनी लष्करी उपयोगासाठी समोरच्या बाजुने दगडविटांत बांधकाम करून चिणुन काढलेले आढळुन येते. प्राचीन लेणीचे मध्ययुगीन कोठार झालेले येथे आढळुन येते. कमांक **5** ही लेणी आयताकार असून येथे किल्लेदाराचा वाडा शेजारीच आहे. तसेच येथील लेणीत मध्ययुगात दरबार सदृश्य बांधकाम केलेले आढळते. कारण लेणीत प्रवेशल्यानंतर शेवटच्या भिंतीपर्यंतच्या मार्गावर छोटया पायऱ्या विटांत बनविलेल्या असून कमाने येथील पायऱ्यांस चढण असल्याचे आढळते. येथील पायऱ्यांस दोन्हीबाजूंनी कट्टे केले होते असे दिसून येते. तसेच शेवट कातळयाजवळ एक कट्टा असून येथे आसन ठेवण्यासाठी जागा केली गेली होती असे आढळते.

लोहगड किल्ला मावळ तालुक्यातील इतर किल्ल्यांच्या तुलनेत लष्करी उपयोगासाठी उत्तम गणला गेला. अनेक राजवटींनी लोहगड किल्ला जिंकण्याचा व जिंकल्यावर सांभाळण्याचा पुरेपुर प्रयत्न केला गेला असल्याचे दिसून येते. लोहगड किल्ल्यासाठी विशेष खर्च करून त्याची अभेद्यता आणिक वाढविण्याचा प्रयत्न अनेकदा झाला असल्याचे दिसून येते. लोहगड किल्ल्यावर कोणत्याही राजवटीची राजधानी असल्याचा आजपर्यंत पुरावा मिळालेला नाही परंतु शिवकालखंडात नेतोजी पालकर, पेशवाईत बाळाजी जनार्दन भानु उर्फ नाना फडणवीस व ब्रिटीश कालखंडात अनेक ब्रिटीश अधिकारी येथे राहीले असल्याचे आढळुन येते.

**6**□कमांक **6** ची लेणी खोलीसदृश्य कोरलेली असून कमांक **5** च्या लेणीस ही लेणी स्पर्शुन आहे. येथील लेणीच्या वरच्या टेकडीवरील भुस्खलनामुळे गाळ वाहुन येवुन येथील लेणीत शिरलेला दिसून येतो. पावसाळयात ही लेणी गाळ असल्याने पाहता येत नाही मात्र उन्हाळयात ही खोली पाहता येते मात्र बहुतांशी वेळा कोडग्या गाई येथे कळपाने राहत असल्याने आत जातांना बंधने येतात.

**7**□क्रमांक **7** ही पोढी आहे. येथील पोढी उताराच्याबाजुस असल्याने पावसाळयात किल्ल्यावरील वाहुन आलेले मध्ययुगातील कौलं, रांजणाचे व मडक्यांचे तुकडे यांसारख्या महत्वपुर्ण वस्तु येथे आढळुन येतात. येथील पोढीच्या समोर उंच जोते घेतलेला मोठया आकाराचा मध्ययुगीन वाडा होता त्याचे भग्नावशेष येथे आढळतात. जोत्याचे बांधकाम बेसॉल्ट दगडात व वाडयाचे बांधकाम भेंडा विटांत केलेले आढळुन येते. वाडा संपुर्णपणे भग्न झालेला असून उपलब्ध जोत्यावरून येथील बांधकाम प्रशस्त असल्याचे दिसून येते. वाडयाचे मुख्य द्वार पुर्वेस व परसाचे द्वार पश्चिमेस असल्याचे दिसून येते. वाडयात जाण्यासाठी आठ पायऱ्या जोत्यात बांधुन घेतलेल्या आढळतात. हा किल्लेदाराचा वाडा असण्याचा संभव आहे. कारण या वाडयाची बांधणी करतांना किल्ल्याच्या पाचही प्रवेशद्वारावर लक्ष रहावे या सोयीने पुर्व कातळयाजवळ केलेली आढळते. तसेच वाडयाच्या शेजारील लेणीमध्ये दरबार सदृश्य रचना लेणीत आढळते. यावरून हा किल्लेदाराचा वाडा असावा व लक्ष्मी कोठारात चिजवस्तू ठेवल्या जात असाव्यात असा संभव आहे.

- लोहगड किल्ल्याचा प्राचीन इतिहास ः

लोहगड किल्ल्याचा प्राचीन इतिहास शिलालेखाअभावी अस्पष्ट आहे. कातळकडयांस असलेल्या पोढी व कोरल्या गेलेल्या लेणी यांतुन किल्ल्याचे प्राचीनत्व निदर्शनास येते. लोहगड किल्ल्याची प्राचीन माहिती देणारे पुरावे आज उपलब्ध झालेले नसले तरीही विसापूर □कार्ले □भाजे □बेडसे येथील लेणी व सभोवतीच्या प्रदेशास असणारी प्राचीन वहिवाट यांवरून तसेच लक्ष्मीकोठारची लेणी व पुर्वाभिमुख कातळयाची लेणी यांवरून लोहगड किल्ल्याचे प्राचीन महत्व दिसून येते.

मावळ तालुक्यातील बहुतांशी किल्ल्यांना व पर्वतांना प्राचीन कालखंडातील पोढी व विहार खोदलेले आढळतात. सातवाहन राजवंश पुराणांमध्ये ‘आंद्रसातवाहन’ म्हणून ओळखला जातो. सातवाहन राजवंश मावळ तालुक्यातील आंदर मावळ या विभागातील असण्याचा संभव आहे असे काही इतिहासकारांचे मत आहे. बौध्दभिक्षुंस व तत्कालीन कालखंडात लेणी कोरण्याचे काम करणाऱ्या सर्वच पंथांस आर्थिक मदत करण्याचे तसेच पोढी व विश्रामासाठी व्यवस्था करण्याचे काम सातवाहन राजवंशाने केलेले आढळुन येते. किंबहुना त्या आशयाचे

शिलालेखही विसापूर किल्ल्याच्या शिलालेखातुन समोर आलेले आहे. तत्कालीन कालखंडात अनेक कातळकडयांस छोटया मोठया आकारातील गुंफा व पोढी निर्माण केल्या गेल्या असे आढळते. उदाहरण ः तळेगाव दाभाडे M.I.D.C. शेजारी पिराचा डोंगर नावाने ओळखल्या जाणाऱ्या पर्वतावर तीन कातळखोदीव पोढी व एक गुंफा अर्धवट कोरलेली दिसून येते. तसेच कल्हाट गावात पांडवकडयाच्या लेणीत स्त्री चे कोरीव शिल्प व पोढी तसेच खोल्या निर्माण केलेल्या आढळतात. तसेच नाणोलीगाव शेजारील पर्वतात फिरंगाई नावाने ओळखली जाणारी मोठी लेणी प्राचीन काळात कोरलेली आढळते. दरम्यानच्या काळात मावळ तालुक्यातील अनेक पर्वतांवर व विसापूर, लोहगड, तुंग, राजमाची यांसारख्या मोठया किल्ल्यांवर अनेक कातळे कोरल्या गेलेले आढळुन येतात. विसापूर किल्ल्याच्या शिलालेखांत सातवाहन हे नाव आलेले समोर आले आहे. दरम्यान तिकोणा किल्ल्याच्या कातळकडयांत गुंफा खोदलेल्या आढळुन येतात व अनेक पोढी केलेल्या दिसून येतात. लोहगड किल्ल्यासारखे तिकोणा किल्ल्यावरही प्राचीन लेणी व पोढी आढळतात परंतु एकही प्राचीन शिलालेख लोहगड किल्ल्यास व तिकोणा किल्ल्यास आजवर आढळलेला नाही.

कार्ले येथील लेणीत अनेक ब्राह्मी लिपीतील शिलालेख आढळुन आले आहेत येथील शिलालेखांत अनेक स्थळांबद्दल माहिति आलेली दिसून येते ती पुढील प्रमाणे ः 'वालूरक' हे स्थलनाम कार्ले येथे रहाणाऱ्या भिक्खू संघासाठी वापरलेले आहे. तसेच 'करजक□करजिक' हे नाम कार्ले येथून भाजे मार्गे 'बेडसे' लेणीचा पर्वत संपतो त्याच्या पायथ्याच्या गावाचे नाव 'करंजगाव' आहे. येथील गावास करजक संबोधले गेलेले निदर्शनास येते. तसेच 'मामल□मामड आहार' ही नामे मामल म्हणजे 'मावळ' तालुका व 'आहार' म्हणजे 'प्रशासकीय विभाग' या अर्थाने वापरलेली आहेत.

कार्ले लेणीप्रमाणेच बेडसे लेणीतही अनेक ब्राह्मी लिपीतील शिलालेख निदर्शनास आले असून त्यात येथील प्रदेशांची, स्थळांची तेथील तत्कालीन लोकांची नावे समोर येतात. येथील लेणीतील एका शिलालेखात 'गोभूती' नावाच्या भिक्खूचे विशेषण 'मारकूट' येथील 'गोभूती' असे आले आहे. यावरून बेडसे लेणी ज्या डोंगरात आहे या पर्वतास प्राचीन कालखंडात 'मारकूट पर्वत' संबोधले जात असावे असे आढळते. म्हणजेच लोहगड व विसापूर दोन्ही किल्ले ज्या एकाच मोठया पर्वतावर आहेत या पर्वतास मारकूट पर्वत नावाने संबोधत होते हे दिसून येते. तसेच लोहगड किल्ल्याच्या पायथ्यास वसलेली लोहगडवाडी, घेरेवाडी, धनगरवाडी, कोळीवाडी

इत्यादी गावे मध्ययुगात असली तरीही पाटण हे विसापूर पायथ्याचे गाव प्राचीन कालखंडात वसलेले असण्याचा संभव आहे. कारण प्राचीन काळातील क्षेत्राची विभागणी ‘विषय □खंड □वलित □पाटण□नगर□’ अशाप्रकारची होती.[21] क्षेत्र व्यवस्थेत पाटण हे लहान शासनाचा विभाग होते. वस्तीस्थानांच्या आकारमानावरून व रहीवाशांच्या संख्येवरून प्राचीन कालखंडातील शासन व्यवस्था नियोजीत केली जात होती. तत्कालीन शासन व्यवस्थेत पाटण हे विसापूर पायथ्यास असलेले गाव प्राचीन कालखंडातील असल्याचे दिसून येते.

भारतात **1250** लेणी आढळुन आल्या आहेत. यात **1000** लेणी महाराष्ट्रात आहेत. सारांश संपुर्ण भारतातील लेण्यांपैकी **78%** लेणी महाराष्ट्रात असून आजही अनेक लेणी नव्याने प्रकाशात येत आहेत.[22] या लेणींमधील बहुतांशी लेणी अर्धवट अवस्थेत सोडून दिलेल्या आढळुन येतात. लेणी  अर्धवट काम करून सोडून का दिल्या याबद्दल ठोस विधान सर्वलेणीं संबंधी करता येत नाही. परंतु प्रामुख्याने लेणींचे काम अर्धवट सोडण्यामागे दुष्काळ हे कारण असल्याचा संभव आहे. ‘पिण्याच्या पाण्याची अडचण, अन्नाचा तुटवडा, भयंकर दुष्काळ किंवा एखादी रोगराई तसेच दान मिळण्यात पडलेला खंड’ यांसारखी अनेक कारणे असण्याचा संभव आहे. तसेच काही ठिकाणी कातळकडयांस आतमध्ये खोदत असतांना मुरूम किंवा माती लागते हे एक कारण असण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ ः तळेगाव दाभाडे शेजारी नानोलीगाव येथे असलेली फिरंगाईलेणीचे काम अर्धवट अवस्थेत सोडलेले आढळते व येथे मुरूम लागल्याने काम थांबविले असल्याचे आढळुन येते. लोहगड किल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वाराच्या शेजारी एका लेणीचे काम अर्धवट सोडून दिलेले आढळते. लोहगड किल्ल्यास पुर्वाभिमुख लेणी, पोढी, लक्ष्मी कोठी, गडावरील काही मोठया आकाराच्या पोढी, लक्ष्मीकोठीच्या पाठीमागच्या कोठया इत्यादी अवशेष प्राचीन असल्याचे आढळुन येते.

---

[21] शोभना गोखले, *प्राचीन भारतीय इतिहासाची साधने*, टिळक महाराष्ट्र विदयापीठ, **2012**, पृ. **104-107**.

[22] मंजीरी भालेराव, पुर्वोक्त, **2009**, पृ. **15**.

- लोहगड किल्ल्याचा मध्ययुगीन इतिहास ः

लोहगड किल्ला प्राचीन तसेच मध्ययुगीन इतिहासाचा साक्षीदार असून प्राचीन कालखंडातील राजवंशांपासून मध्ययुगापर्यंत अनेक राजवंशांची सत्ता लोहगड किल्ल्यावर होती असे आढळून येते. मध्ययुगात लोहगड किल्ल्याचे महत्व तत्कालीन अनेक किल्ल्यांमधील राजधानीच्या किल्ल्यासारखे असल्याचे आढळून येते. प्र.के.घाणेकरांनी “बुलंद बेलाग नि बळकट किल्ले लोहगड हा शिवछत्रपतींनी निर्मीलेल्या स्वराज्याचा एक पोलादी आधारस्तंभ होता”[23] असे लोहगड किल्ल्याचे वर्णन केले आहे. लोहगड किल्ला मध्ययुगातील ‘पवन, आंदर, नाणे’ या तीन्ही मावळांतील सर्वात महत्वपूर्ण किल्ला गणला गेल्याचे आढळून येते. किल्ल्याचे नाव ‘लोह’ धातूशी जोडले गेले. लोह हा सर्वात कठीण धातू असल्याने लोहगड किल्ल्याची अभेद्यता दर्शविण्यासाठी ‘लोह’ हे विशेषण किल्ल्यास जोडून त्याचे लोहगड असे नामकरण केले गेले असण्याचा संभव आहे.

किल्ल्याच्या परीघात मोठया प्रमाणावर मध्ययुगीन अवशेष आढळतात. उपलब्ध अवशेषांचे सर्वेक्षण प्रस्तुत प्रबंधात सविस्तर केलेले असून किल्ल्याच्या पायथ्याच्या, परीघातल्या गावांची व वाडया वस्त्यांची श्रध्दा, परंपरा, धार्मीक रिवाज, देवस्थाने यांचा अभ्यास अंतर्भूत केलेला आहे. उपलब्ध शिलालेखांचे वाचन करून तसेच मुलाखती व सर्वेक्षण यांतून समोर येणारा इतिहास प्रस्तुत प्रबंधात मांडलेला आहे.

मलीक अहमद याने लोहगड किल्ल्याचा ताबा इसवी सन **1491** ला घेतला. **1636** पर्यंत पवन मावळचा मुलूख निजामशहाच्या ताब्यात होता. निजामशाहीच्या ऱ्हासानंतर लोहगड किल्ला अदिलशाहिच्या अंमलाखाली आला. तदनंतर **1636** ते **1647** पर्यंत लोहगड किल्ला अदिलशहाच्या ताब्यात होता. पुढे लवकरच शिवाजी महाराजांनी लोहगड किल्ला इसवी सन **1648** तो जिंकून स्वराज्यात आणला.[24] शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली त्यावेळी त्यांनी पवन मावळातील लोहगड व विसापूर किल्ले जिंकून घेतले या दरम्यान प्रभावळीतले किल्ले जिंकणे त्यांच्यासाठी हितावह होते म्हणून मावळ तालुक्यातील लोहगड किल्ल्याच्या प्रभावळीतील किल्ले शिवाजी महाराजांनी जिंकुन घेतले.

---

[23] प्र.के.घाणेकर, पुर्वोक्त, पृ.**182**.

[24] मराठी विश्वकोश खंड **15**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, **1977**, पृ.**837**.

शिवाजी महाराजांनी शके **1578** दुर्मुखीनाम संवत्सरे भाद्रपद वदय **11** म्हणजेच **4** सप्टेंबर **1656** रोजी, गुरूवारी स्वराज्यातील बहुतांशी किल्ल्यांची नावे बदलली.[25] त्यात तोरणा किल्ल्याचे प्रचंडगड, कोंढाण्याचे सिंहगड, तिकोण्याचे वितंडगड, तुंगगडाचे कठीणगड अशी नावे ठेवली दरम्यान विसापूरचे संबळगड असे नामकरण त्यांनी केलेले दिसून येते. परंतु शिवाजी महाराजांनी लोहगडाचे नाव बदलले नाही कारण 'लोह' या प्रबळ धातुचे नाव लोहगड सारख्या बळकट किल्ल्यास शोभणारे आहे त्यामुळे 'लोहगड' हे नाव शिवाजी महाराजांने बदलले नसल्याचे दिसून येते.

मिर्झाराजा जयसिंग स्वारीच्या वेळी मिर्झाराजा पुरंदरास वेढा टाकून बसला असतांना त्याने जाळपोळ करण्यासाठी 'दाऊदखान, कुतुबुद्दीन खान, राज रायसिंह व मिर्झाचा नोकर अचलसिंह' या अधिकाऱ्यांस पाठवून 'लोहगड, ईसागड, तुंग, तिकोणा' या दुर्गांच्या पायथ्याशी असणारी गावे जाळून लुटून फस्त करावयास सांगीतले व तसे करून हे सर्व अधिकारी लष्करी तळावर परतले. असा ऊल्लेख 'आलमगीरनाम्यात' आलेला आहे.[26]

सध्या लोहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली 'लोहगडवाडी, घेरेवाडी' मुघल आधिकाऱ्यांनी जाळून लुटून नेली असल्याचे दिसून येते. मध्ययुगात लोहगडाचा पहिला उल्लेख "बुरहाने मासिरी" या 'सय्यद अली तबातबाई ' याच्या फार्सी ग्रंथात सापडतो त्यानंतर **1665** साली मिर्झाच्या स्वारीमुळे आलमगीरनाम्यात दुसरा ऊल्लेख सापडतो.[27] तद्नंतर मात्र मुघल दरबारी लिहील्या जाणाऱ्या अखबारात मध्ये लोहगड किल्ल्याचे ऊल्लेख बऱ्याचदा आलेले आढळतात.

पुरंदर तहाच्यावेळी शिवाजी महाराजांकडे असलेल्या **40** किल्ल्यापैकी **23** किल्ले मुघलांस द्यावे लागले आणि उर्वरित **17** किल्ले मराठयांकडे राहीले. **14** जुन रोजी झालेल्या पुरंदर तहात **23** किल्ले मुघलांना मराठयांकडुन दिले गेले त्यात 'लोहगड किल्ल्याचे' नाव आहे. **4** फेब्रुवारी **1670** रोजी तानाजी मालुसरे यांनी 'सिंहगड किल्ला' जिंकून घेतला यात तानाजी मालुसरे यांचे बलीदान झाले व तद्नंतर शिवाजी महाराजांनी मुघलांशी केलेला तह

---

[25] *शिवकालीन पत्रसार संग्रह भाग ः* **3**, श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, पृ.**177**. आणि स.म.दिवेकर, द.वी.आपटे (संपा.), *शिवचरित्र प्रदीप*, शिवापूर दफ्तरातील यादी, भा.इ.सं.म. प्रकाशीत, **2009**,पृ.**50**.

[26] महेश तेंडुलकर, पुर्वोक्त, पृ.**44**.

[27] तत्रैव, पृ.**44**.

मोडीत काढुन तहात गमाविलेले सर्व किल्ले जिंकून घेण्याची मोहीम आरंभीली. मावळ तालुक्यातील मुघलांस दिलेले 'लोहगड, विसापूर, तुंग, तिकोणा' यांचाही समावेश होता हे सर्व किल्ले शिवाजी महाराजांनी जिंकुन घेतलेले दिसून येते. संभाजी महाराजांच्या कालखंडात हे किल्ले मराठयांकडे असल्याचे आढळते. लोहगड किल्ला **11** जानेवारी **1670** सालच्या इंग्रजी पत्रानुसार शिवाजी महाराजांनी जिंकला व तद्नंतर माहुली **25** जुन रोजी जिंकला असा ऊल्लेख आला आहे.[28]

शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या काळात लोहगड किल्ल्याचे ऊल्लेख फारसे येत नाहीत. परंतु आसपासचा इतर प्रदेश समकाळात मराठयांकडे असल्याने लोहगड मराठयांकडे असण्याचा संभव आहे. संभाजी महाराजांच्या अटकेनंतर व बलीदानानंतर स्वतः औरंगजेब बादशहाने व मुघलांच्या सर्वच फौजेने मराठयांचे किल्ले घेण्याची मोठी मोहीम आरंभीली. जेधे शकावलीमध्ये "ये वर्षी कुल गड मोगले घेतले"[29] असा उल्लेख येतो.

जेधे शकावलीच्या नोंदीवरून मराठयांचे बहुतांशी किल्ले मोगलांनी अंकीत केलेले आढळुन येतात. यात तिकोणा किल्ला एप्रिल **1704** पर्यंत मराठयांकडेच आहे ही विशेष बाब आहे. स्वराज्यातील बलाढय किल्ले मोगलांकडे गेले असतांना लोहगडाच्या प्रभावळीतले मावळातील किल्ले मराठयांनी राखलेले आढळतात. संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांने मुघल सैन्यास जेरीस आणले. यांसोबतच हुकुमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण हे होते. यासर्वांनीच गनीमी काव्याच्या पद्धतीने मुघलांशी लढाई चालू ठेवली. या सर्वांचे नेतृत्व महाराणी ताराबाई यांनी केले. एका स्त्रीने मध्ययुगात मोठा पराक्रम करणे ही बाब मराठयांच्या इतिहासात गौरवशाली व प्रेरणादायक ठरलेली आढळते. या प्रेरणेतून मराठयांनी मुघलांकडून किल्ले जिंकून घेवून पुन्हा मराठी राज्याचा अंमल प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केलेले आढळतात. सारांश मुघल मराठा संघर्षात लोहगड किल्ल्याचा महत्वाचा वाटा होता.

शिवभारतात कविंद्र परमानंद यांनी लोहगड किल्ल्याचे महत्व संस्कृत श्लोकातुन अधोरेखीत केलेले दिसून येते. श्लोक पुढीलप्रमाणे ः

---

[28] *शिवकालीन पत्रसार संग्रह भाग ः 1*, श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, पृ.**366**.

[29] अ.रा.कुलकर्णी, *जेधे शकावली*, डायमंड प्रकाशन पुणे, **2007**, पृ.**133**.

"सिंहं लोहं महांतं च प्रबलं च शिलोच्चयम् ।

पुरंदरं गिरिं तद्वत् पुरीं चक्रावतीमपि ॥

विषयं च तथा नीराभीमरथ्यंतराश्रयम् ।

प्रणिपत्य प्रयच्छाशु दिल्लींद्रायामितौजसे ॥"[30]

श्लोकाचा अर्थ ः "सिंहगड आणि लोहगड हे मोठे आणि प्रबळ किल्ले, त्याचप्रमाणे पुरंदरगड आणि चक्रावतीपुरी (चाकण), नीरा आणि भीमा यांच्या मधला प्रदेश ही सर्व महाबलाढय अशा दिल्लीच्या बादशहास शरण जाऊन लवकर देऊन टाका." महत्वाच्या किल्ल्यांमध्ये लोहगड किल्ला असल्याचे कविंद्र परमानंद यांच्या श्लोकातून सांगण्यात आलेले आहे.

शिवाजी महाराजांनी 6 ते 9 जानेवारी 1664 साली सुरतलुट केली. तद्नंतर राजगडावर जातांना नेतोजी पालकरच्या अधिपत्याखाली लोहगड किल्ल्यावर लुट ठेवली.[31] शिवाजी महाराज पुढे राजगडास गेले. लोहगड किल्ल्यावर लक्ष्मी कोठारात सुरतलुट ठेवली गेली असण्याचा संभव आहे. सुरतलुट लोहगड किल्ल्यावर ठेवल्याचा विश्वसनीय पुरावा 'सखो भिकाजी' याने स्वतः महाराजांच्या समोर ऊभे राहून जो विनंती अर्ज केला यात सापडतो. तो पुढील प्रमाणे, "... तिन्ही जुमले लोहोगडीहून नेतोजीचे सरनोबतीचे वेलेस सुरतेहून आलियावर लोहगडी लस्कर राहिले"[32] ही लुट मोठया स्वरूपात केलेली होती. एवढी लुट लोहगड किल्ल्यावर किती दिवस ठेवली गेली याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध होत नाही परंतु किल्ल्यावर सध्याच्या लक्ष्मी कोठारात ही लुट ठेवली गेली असावी व त्यावरूनच येथील कोठारास 'लक्ष्मी कोठार' हे नाव प्राप्त झाले असावे असा संभव आहे. मावळ तालुक्यातील इतरही किल्ले लोहगड किल्ल्याच्या प्रभावळीत असतांना लोहगड किल्ल्यावर शिवाजी महाराजांनी सर्व संपत्ती ठेवली यावरून लोहगड किल्ल्याचे महत्व दिसून येते.

---

[30] स. म. दिवेकर (संपा.), *कविंद्र परमानंदकृत श्रीशिवभारत*, शब्दवेध प्रकाशन पुणे, 1998, पृ. 182.

[31] मराठी विश्वकोश खंड 15, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, 1977, पृ. 837.

[32] *शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड 3*, श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, पृ. 69. ले. 2590.

स्वराज्यातील किल्ल्यांची दुरूस्ती करून किल्ल्यांची दुर्गमता वाढविण्यासाठी डागडुजीचे अंदाजपत्रक शिवाजी महाराजांनी तयार करवून घेतले. यात लोहगड किल्ल्यासाठी **5000** होनांची तरतूद केली.[33] व लोहगड किल्ल्यास आणिक दुर्गम बनविले गेले असल्याचे आढळते.

दरम्यानच्या काळात लिहील्या गेलेल्या अखबारात मध्ये लोहगड किल्ल्याचे मुघल किल्लेदार यांची नावे येतात ती तारीखेनुसार पुढीलप्रमाणे ः

| तारीख | किल्लेदाराचे नाव |
|---|---|
| **6** नोव्हेंबर **1694** पुर्वी | खानचंद |
| **6** नोव्हेंबर **1694** | ऊग्रसेनचा मुलगा माधोराम[34] |
| **27** एप्रिल **1696** पुर्वी | खानचंद बुंदेला |
| **27** एप्रिल **1696** | रावदलपत बुंदेलाचा मुलगा रामचंद[35] |
| **7** ऑगस्ट **1699** | अटलसिंह |
| **14** डिसेंबर **1704** पुर्वी | सेनापत |
| **14** डिसेंबर **1704** | खानचंद दानगी |
| **30** डिसेंबर **1704** | सेनापत |

किल्लेदाराचे पद मध्ययुगात प्रतिष्ठित गणले जात होते. किल्लेदार पदावर दर्जेदार व अनुभवी व्यक्तीची निवड केली जात असल्याचे दिसून येते. तसेच जरी किल्ला एखाद्या वतनदाराच्या जहागिरीत असला तरी किल्ल्याच्या बाबत कोणतेही निर्णय घेण्याचा अधिकार वतनदारास नसे किंबहुना हवालदार, कारखानीस कोणते

---

[33] *शिवकालीन पत्रसार संग्रह* खंड ः **2**, श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, **2009**, पृ. **413**.

[34] सेतूमाधवराव पगडी (संपा.), *मोगल दरबारची बातमीपत्रे भाग – 1*, महाराष्ट्र राष्ट्र साहित्य आणि सांस्कृतीक मंडळ मुंबई, **1978**, पृ. **86**.

[35] तत्रैव, पृ. **152**.

ठेवावेत याबाबतही जहागीरदाराचे मत विचारात घेतले जात नसे. किल्ल्यावरील ‘हवालदार, सबनीस, कारखानीस, सरनोबत’ ही मुख्य पदं ठरविण्याचा व किल्ल्यासंबंधी कोणताही निर्णय घेण्याचा सर्वोच्च अधिकार किल्ला ज्या राजवटीखाली असे त्या राजवटीतील गादीवरील व्यक्ती निर्णय घेत असे.

उदाहरणार्थ ः 1) शहाजी राजेंच्या जहागीरीत अनेक किल्ले होते परंतु त्यांवर कोणता हवालदार ठेवावा किंवा किल्ल्यासंबंधी कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार त्यांस नव्हता. 2) शाहुंचे सरसेनापती खंडेराव दाभाडे यांच्याकडे 1395 गावांची पाटीलकी होती तसेच जहागीरदारांचे ते मुकुटमनी म्हणुन ओळखले जात होते मात्र मावळ तालुक्यातील त्यांच्या जहागीरीमध्ये येणाऱ्या अनेक दुर्गांपैकी एकाही दुर्गावरील हवालदार नामजाद करण्यासाठी खंडेरावांचे एकही शिफारस पत्र नाही व या किल्ल्यांशी त्यांचा संबंध दिसून येत नाही. सारांश केंद्रीय सत्तेमार्फत हवालदार व किल्ल्यावरील इतर अधिकारी यांची नेमणूक होत असे. यात स्थानिक प्रतिष्ठीत व्यक्ती किंवा कुणाचाही हस्तक्षेप चालत नसे.

6 नोव्हेंबर 1694 रोजी पत्रातील ऊल्लेखाप्रमाणे लोहगड किल्ल्याच्या किल्लेदार पदी खानचंद नंतर उग्रसेनचा मुलगा माधोराम यास पाठविण्यात आले. परंतु त्वरीत मिळालेल्या पुढील ऊल्लेखाप्रमाणे त्यास 10 दिवसांत बदलून आकानेरचा फौजदार नेमण्यात आला व पुढे खानचंद बुंदेला याची नेमणूक किल्लेदारपदावर करण्यात आलेली दिसते. माधोराम यास किल्लेदार पदावरून का बदलण्यात आले यामागची पार्श्वभुमी यातून स्पष्ट होताना दिसत नाही. मात्र लोहगड किल्ल्याच्या किल्लेदारी संदर्भात बादशहाची जागरूकता दिसून येते.

लोहगड किल्ला मुघलांच्या ताब्यात ज्या वेळी गेला त्या वेळी मराठयांनी गड घेण्यासाठी अनेक प्रयत्न केल्याचे दिसून येते. किल्ला हस्तगत करण्याच्या मराठयांच्या मोहीमेत अनेक साहसी कृत्ये अनपेक्षित आलेली आढळतात. लोहगड किल्ल्यास मराठयांनी माळा लावुन किल्ला जिंकल्याचा ऊल्लेख आलेला आहे. 7 ऑगस्ट 1699 साली मराठयांनी लोहगड जिंकण्यासाठी तीनशे सैनिकांसह लोहगडाच्या तटास शिडया लावल्या. या शिडया दोराच्या होत्या. मात्र गडावरील तोफखान्याची माणसे सावध झाल्याने त्यांनी दोर कापून टाकले. त्यावेळी किल्लेदाराकडे सैन्याची पथके नव्हती. तो लिहीतो, “पावसाळयाचा मोसम आहे. किल्ला हातात राहणे कठीण आहे. आपण आज्ञा करावी” औरंगजेबाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी बक्षीउल्मुल्क मुखालिसखान यास

वृत्तांत सादर करण्यास सांगीतले.[36] या दरम्यान मुघलांकडे असणाऱ्या किल्ल्यांच्या लष्करी प्रशासनात त्रुटी आढळतात. तसेच दरम्यानच्या काळात तुंग, तिकोणा व विसापूर किल्ल्यांस माळा लावल्याचा एकही उल्लेख आलेला आढळून येत नाही. यावरून मराठयांना लोहगड किल्ला आपल्याकडे असावा असे कायम वाटत असल्याचे दिसून येते. त्यासाठी कायम लोहगड किल्ल्याच्या परिघात मराठयांनी लढाया केल्याचे दिसून येते. तसेच इतर किल्ल्यांपेक्षा मराठे लोहगड किल्ला हस्तगत करण्यासाठी जास्त प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. तसेच मराठयांनी किल्ले हस्तगत करण्यासाठी जिवापाड प्रयत्न केले असल्याचेही आढळते. औरंगजेब बादशहा जेवढया तळमळीने किल्ले हस्तगत करून त्याची दुर्घट व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करीत होता तेवढेच त्याचे सैन्य सतर्कता दाखवित नसल्याचे आढळून येते. औरंगजेब बादशहाने आपल्या सैन्याबद्दल सातारच्या अजिंक्यतारा किल्ल्याच्या वेढयावेळी स्वतः काढलेले ऊदगार त्याच्या हताश लष्करी मोहीमेबद्दल माहीती देतात. औरंगजेब बादशहा यावेळी अजिंक्यतारा किल्ला मिळविण्याच्या प्रयत्नात होता मात्र हरएक प्रयत्न केले तरी किल्ला काही हस्तगत होईना त्यावेळी त्याने हताश होवून आपली व्यथा काझी आकमपुढे मांडली “रमजानचा महिना आणि ईद ही सोलापुरात पार पाडावी अशी माझी इच्छा होती पण माझे आधिकारी बादशाही कामगीरी मनःपुर्वक करीत नाही मी असंख्यवेळा ताकीद करतो पण त्याचा काहीच परीणाम होत नाही”[37]

किल्ल्यांची चोख व्यवस्था लावून जे किल्ले मुघलांनी घेतले त्यांवर तोफा व शस्त्रसामुग्री चढवूनही औरंगजेबाच्या मनाप्रमाणे लष्करी कामगीरी अपेक्षित वेळेत व निष्ठेने होत नव्हती असे दिसून येते. औरंगजेब बादशहा सैनिकांकडून ठेवत असलेल्या अपेक्षा किमान होत्या हे दिसून येत असले तरीही त्याच्याकडूनही योग्य ते प्रशासकीय काम वेळेत पुर्ण होत नव्हते हे ही दिसून येत आहे. कारण सैनीक लढतांना त्यास योग्य तो मोबदला देणे आवश्यक असते. जर पगार वेळेत दिला नाही तर सैनिक नाराजीने राजवट बदलत असत असे आढळते. दरम्यानच्या काळात सैनिकांच्या पगाराविषयक प्रत्येक राजवट सतर्क असल्याचे दिसून येते. अर्थात पगार पुरेसा नसेल किंवा वेळेत नसेल तर बंड होण्याची चिन्हे बळावत असत. सारांश औरंगजेब बादशहा त्याच्या सैनिकांकडून व किल्लेदारांकडून ज्या अपेक्षा ठेवत होता त्या पुर्ण होण्यासाठी सैनिकांना योग्य ते वेतन व ते ही

---

[36] तत्रैव, पृ.24.

[37] सतिश अक्कलकोट, *दुर्ग*, सहयाद्री दुर्गभ्रमण मंडळ प्रकाशन, 2009, पृ.131.

वेळेत देणे क्रमप्राप्त होते मात्र तसे होत नसल्याने सैन्यात जबाबदारीची मनस्थिती राहीली नसल्याचे आढळते. त्यामुळे औरंगजेब बादशहा हताश होवून काझी अकमला सैन्य चोख काम करत नाही असे सांगतांना आढळते. औरंगजेब बादशहाच्या छावणीत पगाराच्या वेळा चुकल्याचे व उशीर होत असल्याचा संदर्भ मिळतो तो पुढीलप्रमाणे ः

1) दि.23 डिसेंबर 1699 रोजी लोहगडावर तैनात असलेल्या सैनिकांचा पगार थकल्याने तो पाठविण्याचे प्रयोजन केले. मुखलीसखानाने औरंगजेबास विनंती केली की, लोहगडाकडे जाताना पगाराच्या रकमेस(1 लाख 4 हजार रूपयांस)संरक्षणासाठी पथके द्यावीत. ती उपलब्ध नसल्याने पगाराची रक्कम नेणे स्थगीत करण्यात आले.[38]

2)अजिंक्यतारा किल्ल्यास बादशाही छावणीने वेढले असतांना कोणत्याही परीस्थितीत किल्ला त्वरीत ताब्यात घ्यावा असे बादशहाने आपल्या सैन्यास सांगीतले याच दरम्यान 19 जानेवारी रोजी मन्सूरखानाने विनंती केली की, “मावळे सैनिक म्हणत आहेत की, आमचा पगार थकला आहे. आमचे पगार दिले तरच आम्ही सातारागड मिळवून देतो.”

किल्ला निकराने पाच महीने लढविलेला व मोगलांना जेरीस आणणारा किल्लेदार “सुभानजी” हा किल्ला पडल्यावर मोगलांचा चाकर झालेला आढळतो. तसेच अजिंक्यतारा किल्ल्यावर सर्वप्रथम मुघलांचे निशान फडकविणारा सांगलीतील जत येथील बाबाजी डफळे हा होता. यावरून मध्ययुगीन कालखंडात राजवट कुणाचीही असो मात्र लढाया लढतांना किंवा किल्ले मुघलांना जिंकुन देतांना सर्व बावींच्या केंद्रस्थानी संपत्ती ही बाब असल्याचे दिसून येते.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात फितुरी अगदी अल्प प्रमाणात आढळते. याची अनेक कारणे होती. मात्र शिवाजी महाराजांच्या सैन्यास असलेली शिस्त व त्यांवरील शिवाजी महाराजांचा वचक ही महत्वपुर्ण बाब दिसून येते. निष्ठेने प्राणाची काळजी न करता लढुन प्रसंगी स्वतःचे बलीदान देणाऱ्यांची संख्या शिवकाळात मोठया प्रमाणावर दिसून येते. तसेच शिवाजी महाराजांच्या सैन्यात वेतनास उशीर झालेला किंवा वेतन कमी

---

[38] सेतु माधवराव पगडी (संपा.), *मोगल दरबाराची बातमीपत्रे भाग ः 2*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशीत, 1978, पृ.72.

असल्याची एकही तक्रार निदर्शनास आलेली दिसून येत नाही. शिवकालखंडात मराठयांकडे निष्ठेने स्वराज्यसेवा करणारे अनेक लोक दिसून येतात परंतु कालौघात व औरंगजेबाच्या टोळधाडीत अनेक मराठी लोकांच्या वर्तनात मोठया प्रमाणावर बदल दिसून येतात. तसेच वतनाच्या लालसेत वाढ होवून काही मराठयांनी औरंगजेबाच्या बाजूस जाण्यासाठी व त्याचे मनसबदार होण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ ः लोहगड किल्ल्याच्या प्रभावळीतील तुंग आणि तिकोणा दोन्ही किल्ले मराठयांच्या ताब्यात होते. मात्र या दोन्ही किल्ल्यांच्या किल्लेदारांनी मुघलांकडे जाण्यासाठी पालीगड चा किल्लेदार ‘पतसिंग उर्फ सेनापतसिंग’ याजकडे बोलणे लावले. तो औरंगजेबास लिहीतो, “तेथील किल्लेदारांनी आपण किल्ला हवाली करू म्हणून बोली लावली आहे. आज्ञा असेल तर मी लोहगडला जाईन. औरंगजेबाने त्याची विनंती मान्य केली. सेनापतसिंगच्या मुलास **100** स्वार आणि **150** जात अशी मन्सब देण्यात आली”[39]

औरंगजेबाच्या दक्षीण मोहीमेत अनेक स्थानिक लोक संपत्तीच्या लालसेने औरंगजेबास जावून मिळालेले दिसून येतात. तसेच मराठयांकडे असलेले किल्ले किल्लेदार मुघलांस देण्याची तयारी दर्शवुन त्याबदल्यात संपत्ती घेवु लागल्याचे निदर्शनास येते. लोहगडाचा किल्लेदार ‘अटलसिंग’ याने औरंगजेबास **24** जुलै **1702** रोजी ‘गुलालबार’ नावाच्या औरंगजेबाच्या तंबूत जावून त्यास एक ‘ढाल’ भेट म्हणून दिली. बादशहाने ती त्यास परत देऊन दाग तसीह□घोडयांना खुणेसाठी डाग देते तो विभाग□चा दरोगा मीरसईदखान यास दाखविण्यात सांगीतले.[40] यावरून औरंगजेबाची मर्जी संपादन करण्यासाठी किल्लेदार किती प्रयत्नशील असत याचीही कल्पना येते याशिवाय औरंगजेबाचा कुणालाही फारसे जवळ न घेण्याचा एक स्वभाव समोर येतो. या सर्व प्रकरणांत गडावर किल्लेदार□हवालदार दर **3** वर्षांनी बदलावा, कारखानीस दर पाच वर्षांनी बदलावा.[41] या बदली करण्याच्या पद्धतीनुसार कोणत्याही शाहीत अनेकदा किल्लेदार बदलले जात होतेच हे दिसून येते. ‘खानचंद - ऊग्रसेनचा मुलगा माधोराम - खानचंद बुंदेला - राव दलपत बुंदेलाचा मुलगा रामचंद - अटलसिंह’ असे किल्लेदार होते मात्र अटलसिंगाची बदली केल्यानंतर सेनापतसिंग लोहगड किल्ल्याचा किल्लेदार झाला व अटलसिंग **30**

---

[39] तत्रैव, पृ. **49**.

[40] तत्रैव, पृ. **294**.

[41] रामचंद्रपंत अमात्य, पुर्वोक्त, पृ. **24**.

नोव्हेंबर **1702** रोजी लोहगडचा किल्लेदारीहून बदली होवून कुरडेनिमोण गढनमुना व नऊलखा येथील ठाणेदारीवर करण्यात आली.[42]

मुघलांच्या दक्षिण मोहीमेत औरंगजेब बादशहाच्या निधनानंतर दक्षिणेतील मुघल फौज येथील किल्ल्यांची लावता येईल ती व्यवस्था लावून उत्तरेत गेली. तद्नंतर महाराष्ट्रातील युद्धाची परिस्थीती निवळली असल्याचे निदर्शनास येते. मात्र याही काळात किल्ल्यांचे लष्करी महत्व होते असे आढळते. फक्त मोठया लढाया किंवा किल्ल्यांस पडणारे मुघलांचे वेढे संपुष्ठात आलेले होते. तद्नंतर पेशवाईत किल्ल्यांचा उपयोग कैदी ठेवण्यासाठी मोठया प्रमाणावर केला गेलेला दिसून येतो. मावळ तालुक्यातील विसापूर किल्ल्यावर अनेक कैदी दरम्यानच्या काळात ठेवलेले निदर्शनास येतात. त्याचप्रमाणे लोहगड किल्ल्यावर ऊत्तर पेशवाईत कैदखाना केला गेलेला आढळुन येतो. लोहगड व विसापूर दोन्ही किल्ले पेशवाईतील कैदखाने म्हणून प्रसिध्द असल्याचे दिसून येते. **1744** सालच्या एका पत्रावरून याचा संदर्भ मिळतो तो पुढीलप्रमाणे ः "त्रिंबकजी अहिराव हवालदार किल्ले लोहगड यास पत्र की, कोळी मौजे वडवळी यांस राजश्री स्वामींनी जमीन दिली आहे, त्याचा कजिया सांगत आहेत. सोवत कनाजी मायेकर व जावजी सुर्यवंशी खासबारदार दिमत चिमाजी जाधव याजबरोबर पाठविले.

१ कानोजी येगरे

२ धोउजी शिंदा

३ संताजी शिंदा

सदरहू जणांस पाठविले आहेत. यांस किल्ले मजकुरी अटकेत ठेऊन दररोज दर असामीस कैली एक शेर प्रमाणे अडसरी पोटास पैवस्तगिरीपासून देत जाणें म्हणोन लिहीले असे. सनद **1**"[43]

शिवकाळात लोहगड व विसापूर किल्ल्यांचे संदर्भ कमी प्रमाणात आढळतात. मात्र पेशवे काळात लोहगड व विसापूर किल्ल्यांचा ऊल्लेख अनेकदा आलेला दिसून येते. **1746** मध्ये लोहगड किल्ल्यावर व्यापारी आणि वाणी यांची घरे जळाली होती त्यांना घरासाठी जागा देण्यासाठी केलेली तजवीज पुढीलप्रमाणे ः "नारो

---

[42] सेतु माधवराव पगडी (संपा.), पुर्वोक्त, पृ. **349**.

[43] द. बा. पारसनीस (संपा.), *बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनीशी*, **1906**, पृ. **73**.

रामचंद्र याचे साल गुदस्ताचे हिशेबी अजी कलमें बाद घातली आहेत ती मजुरा द्यावयाविशी साल मजकुरी □पेठ किल्ले लोहगड येथील वाणी उदमी यांची घरे साल गुदस्ता जळाली. सबब ज्यांची घरे जळाली त्यांस घरठान व मोहोतर्फा सोड दिल्ही व राहीले कुळांस मोहोतर्फा निमे सोड दिल्ही. त्याची बेरीज रूपये **45** □□पावणें शेचाळीस रूपये तीन आणे साल गुदस्ता सोड देऊन पेठची जमाबंदी केली, त्याप्रमाने करार असे **1**"[44]

वरील उल्लेखावरून किल्ल्यावरील प्रशासनाची विशेष पद्धत दिसून येते. किल्ल्यावर झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याची पद्धत व्यवसायास ऊत्तेजन देणारी असून किल्ल्याविषयक आपुलकी निर्माण करणारी होती असे दिसून येते. कोणत्याही व्यक्तीची जात व धर्म पाहुन त्यानुसार निवाडा केलेला नसून किल्ल्यावर राहणारा प्रत्येक व्यक्ती किल्ल्यासाठी महत्वपूर्ण घटक मानला गेलेला निदर्शनास येतो. त्यामूळे सरकारातून त्यांचे नुकसान भरपाई दिली असल्याचे दिसून येते.

**1751** साली लोहगड किल्ल्याविषयक हिशेबाचे एक पत्र आढळते ते पुढीलप्रमाणे ः "निंब मावळे पैकी सन खमसामध्ये मातुश्री सीऊबाई आजी वारली ते समयी सौभाग्यवती रखमाबाई लोहगडी होती, तेव्हा सरकारचे कमावीसपैकी रायाजी रामाजी याचे गुजारतीने रूपये **246**□दोनशे सवा सेचाळीस दिल्हे ते बाकीस उतरले आहेत. सालेसाल दफ्तरी बाकीस ओढत आहेत, येवीसी आज्ञा केली पाहीजे म्हणून तुम्ही विनंती केली त्यावरून सदरही दोनशे सवा सेचाळीस रूपये खर्च लिहावयाची आज्ञा केली असे. त्यांचे नावे खर्च लिहीणे मजुरा असेत म्हणून सनद"[45]

लोहगड किल्ल्याचे अस्तित्व विसापूर किल्ल्यावर अवलंबून व विसापूर किल्ल्याचे अस्तित्व लोहगड किल्ल्यावर अवलंबून असे कायम समीकरण असल्याचे आढळून येते. दोहोंपैकी एखादा किल्ला शत्रूसैन्याच्या हाती पडला तर दुसरा किल्ला सांभाळणे अशक्य बाब होती. म्हणून **1818** साली ब्रिटीश अधिकारी कर्नल प्रॉथरने पहिला विसापूर किल्ला जिंकल्यावर मराठयांनी लोहगड किल्ला सोडला. पुढे **1845** पर्यंत ब्रिटिशांच्या सैन्याची एक तुकडी लोहगड किल्ल्यावर होती.[46] यावरून दोन्ही किल्ले कायम एकमेकांवर अवलंबून असलेले

---

[44] तत्रैव, पृ. **303**.

[45] तत्रैव, पृ. **112**.

[46] मराठी विश्वकोश खंड **15**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, **1977**, पृ. **837**.

दिसून येते. **1754** सालच्या नोंदीप्रमाणे, "लोहगड किल्ल्याच्या पायथ्याशी सरकारी कोठी आहे. कोठीची भिंत जुनी जाहली होती. त्यामुळे मोठे नुकसान होत असे. ती भिंत पाडून नवी भिंत घालण्यात यावी. भिंत बांधण्यासाठी चुना वापरण्यात यावा. तिच्या शेजारची विहीर दुरूस्त करून पाण्याची व्यवस्था करावी. विहीरीसाठीचे आवश्यक ते साहित्य विसापूरच्या किल्ल्यामधून आणणे"[47] असा आलेला आहे. यावरून लोहगड व विसापूर दोन्ही किल्ले कायमस्वरूपी एकाच राजवटीकडे असल्याचे आढळुन येते. लोहगड किल्ल्यास आवश्यक साहीत्य विसापूर किल्ल्याकडून व विसापूर किल्ल्यास आवश्यक साहित्य लोहगड किल्ल्याकडून घेण्याची पद्धत असल्याचे दिसून येते. वरील पत्र नानासाहेब पेशवे यांनी विसापूर किल्ल्याच्या शिवाजी कृष्ण या किल्लेदारास लिहीलेले असून दोन्ही किल्ले ऐकमेकांवर अवलंबुन असल्याचे यातुन दिसून येते. तसेच **1785** साली चार्लस् मॅलेट हा ब्रिटिश पुण्याकडे जातांना विसापूरचा किल्लेदार भिकाजी गोविंद व लोहगडचा किल्लेदार नाना फडणवीस या दोघांस सरकारातून त्याच्या मुक्कामाची सोय करण्यास सांगीतली यावरूनही कायम एकाच राजवटीकडे दोन्ही किल्ले असल्याचे दिसून येते. तसेच **1803** साली माहुली किल्ल्यावर बंड वाल्यांना साथ दिली म्हणून भगवान शिंदे यास कैदेत पडावे लागले या घटनेत सरकारातून पाठविलेल्या पत्रात विसापूरचा किल्लेदार सदाशिव भास्कर व लोहगडचा किल्लेदार धोंडो निजसुरे या दोहोंस पत्रे पाठविली होती यावरून कायम एकाच राजवटीकडे किल्ला असल्याचे दिसून येते. सारांश लोहगड व विसापूर हे जोडदुर्ग नसूनही या दोहोंतील कमी अंतरामुळे कधीही दोन निराळया राजवटींकडे दोन्ही किल्ले आढळून येत नाहीत. तसेच एकाच राजवटीकडे असलेल्या दोन्ही किल्ल्यांमध्ये आवश्यक वस्तुंचे आदान प्रदान करणे ही सहाजिक बाब असल्याचे दिसून येते.

मावळ तालुक्यास लाभलेल्या भौगोलिक रचनेमुळे व घाटवाटांमुळे लोहगड, विसापूर, तुंग, तिकोणा व राजमाची यांसारखे किल्ले प्राचीन काळापासून मावळ तालुक्यात वसले व दरम्यानच्या काळात प्रस्तुत किल्ल्यांच्या परिघातील अनेक गावांमधील युवक किल्ल्याच्या प्रशासनात व लष्करात सामील होवून राजवटीनी सांगीतलेली कामगीरी बजावित राहीलेला दिसून येतो. मावळ तालुक्यातील अनेक घराणी मध्ययुगात लष्करात असल्याचे समकालीन कागदपत्रांतुन आढळून आले आहे. यात प्रामुख्याने दाभाडे, ढोरे, सातकर, मराठे, पवार, मांडेकर, पडवळ, मावकर, जगताप' ही मंडळी लष्करात चांगल्या पदांवर काम करतांना आढळतात. लष्करात कामगीरी

---

[47] का. ना. साने (संपा.), *बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनीशी*, **1911**, पृ. **198**.

बजावीणारी मावळ तालुक्यातील घराणी आजही उपलब्ध असून या आडनावांचे लोक आजही मोठया संख्येने गावांमध्ये रहिवासी असलेले दिसून येते. याविषयीचे पत्र पुढीलप्रमाणे ः लोहगडावरून सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या मदतीसाठी **1755** साली पुढील सैनिक पाठविण्यात आले.

'कोंडाजी पवार, रेखोजी भीवखोले, फुलाजी मराठे, आप्पाजी मांडेकर, दारकोजी थोरवे, गोंदजी यादव, गोरोजी मावकर, खंडोजी पडवळ, भवानजी अंदेर, अंमद सईद, शेख चांद, बाबाजी जगताप, रघोजी दाभाडा, वुगुनाक आणि वाननाक' इत्यादींचे पगार वाढविण्यात आले तो तीन रूपयांवरून सहा रूपये करण्यात आला.[48] हा ऊल्लेख द.बा.पारसनीस संपादीत बाळाजी बाजीराव पेशवे रोजनीशीत आला असून का.ना.साने संपादीत बाळाजी बाजीराव पेशवे रोजनीशीतील ऊल्लेख पुढीलप्रमाणे ः

नानासाहेब पेशवे यांनी लोहगड किल्ल्यावरून सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या संरक्षणासाठी खालील सैनिकांची तुकडी पाठविली. लोहगड किल्ल्यावर सैन्य व रसदेचा मोठा तळ होता.

सैनिकांची नावे पुढीलप्रमाणे

कोंडाजी पवार

रेखोजी भीवखोले

फुलाजी मराठे

आपाजी मांडेकर

दारकोजी थोरवे

गोंदजी यादव

गोरोजी मावकर

खंडोजी पडवळ

---

[48] द.बा.पारसनीस (संपा.), पुर्वोक्त, पृ.**199**.

भवानजी अंदेर

अमंद सईद

शेख चांद

बाबाजी जगताप

रघोजी दाभाडा

वगुनाक

वाननाक

एकुण साडेशाहात्तर रूपयेपैकी साडेसदसष्ट रूपये कदीम तैनात जाजती इजाफा पंधरा असामीस दरमाहा रूपये नवप्रमाणे छ.1 जिल्हेजपासोन करार केले असेत. किल्ले मजकूरचे शिरस्तेप्रमाणे पावीत जाणे.[49]

मावळ तालुक्यातील अनेक जातीतील घराण्यांनी लष्करी सेवेत आपापली कामगीरी बजाविली. तसेच वरील नावांवरून असे दिसते की पेशव्यांच्या सैन्यात मराठयांसमवेत मुस्लिम तसेच महार जातीचेही सैनिक तैनात होते आणि त्यांच्या हुद्दयानुसार त्यांना समान वेतन दिले जात असे. दरम्यानच्या काळात सैन्यात जातीभेद दिसून येत नसून वेतनातही फरक आढळत नाही. सर्व जातींतील लोकांनी लष्करात सेवा बजाविली असून जातीभेद वंशभेदास कोणताही थारा दरम्यानच्या काळात नव्हता किंवा जातीच्या नावाखाली सैन्य एखाद्या जातीच्या राजवटींकडे काम करत असल्याचे आढळत नाही. उदाहरणार्थ औरंगजेब बादशहाकडून अनेक मराठी सरदार महाराष्ट्रातील किल्ले घेत होती तसेच मराठयांकडून अनेक मुस्लीम सैनीक किल्ले लढवित असल्याचे दिसून येते. अजिंक्यतारा किल्ला घेतांना अनेक मराठा सरदारांनी औरंगजेब बादशहाकडून राजधानी अजिंक्यतारा पाडण्याचा प्रयत्न केलेला आढळतो व किल्ला पडल्यावर अजिंक्यतारा किल्ल्यावर प्रथम मुघलांचा ध्वज लावणारा सरदार डफळे होता. तसेच मराठयांच्या बाजूने अनेक मुस्लीम घराणी महाराष्ट्रातील किल्ले वाचविण्यासाठी औरंगजेब बादशहाच्या विरोधात लढत होती. तद्नंतर ब्रिटिशांविरोधात लढतांनाही **1818** साली अनेक किल्ल्यांवर मुस्लीम

[49] का.ना.साने (संपा.), पुर्वोक्त, पृ.**199-200**.

फौज असलेली निदर्शनास येते. उदाहरणार्थ **1818** साली ब्रिटिशांविरोधी रायगड लढवितांना दुसऱ्या बाजिरावाने अरब पठाणांची **1000** ची फौज किल्ला लढविण्यास ठेवलेली दिसून येते. सारांश मध्ययुगातील लढाई जातींच्या विरोधातील नसून ती राजकिय लढाई होती. तसेच योग्य आर्थिक मोबदला देणाऱ्या राजसत्तेकडून लढाई लढण्यास सैनिक इच्छूक होते असे निदर्शनास येते. सैनीकांनी सत्ता खांदेपालट करण्यामागे व लढायांच्या केंद्रस्थानी आर्थिक बाब असल्याचे दिसून येते.

सुवर्णदुर्ग हा कोकणातील हर्णे बंदराच्या जवळील जलदुर्ग प्रकारातील किल्ला आहे. सुवर्णदुर्ग मोठया बेटावर बांधलेला किल्ला असून या किल्ल्याच्या भुशिरावर कणकदुर्ग व फत्तेदुर्ग हे किल्ले आहेत तसेच सुवर्णदुर्ग किल्ल्याकडे जातांना समुद्रकिनाऱ्याच्या अलीकडे गोवाकिल्ला म्हणुन एक पोर्तुगीज बांधणीचा भुईकोट किल्ला दिसून येतो. हे चारही किल्ले दोन कि.मी.च्या परिघातील असून यांचे एकमेकांतील अंतर फार कमी आहे. लोहगड व विसापूर किल्ल्यांसारखे हे चारही किल्ले कायम एकाच राजसत्तेकडे असण्याचा दाट संभव आहे. चारही किल्ले एकाच राजवटीकडे असूनही तेथे सैनिकी कुमक कमी पडली व बाहेरून सैन्यास तेथे पाठविण्याची आवश्यकता आली यावरून लोहगड किल्ल्यावर विशेष कुमक Special Force ठेवली जात होती व राजसत्तेकडील कोणत्याही किल्ल्याच्या युद्धप्रसंगी लोहगड किल्ल्यावरून सैन्य पाठविले जात होते असे दिसून येते. याशिवाय वरील पत्रातुन सैनिकांस खास मोहीमेवर पाठवितांना त्यांच्या वेतनाकडे विशेष लक्ष दिलेले आढळुन येते. सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या मोहीमेत सैनिकांचे वेतन दुप्पट केल्याचे दिसून येते.

**1755** साली लोहगड किल्ल्याचा कैदखाना म्हणून वापर केल्याचा संदर्भ पुढीलप्रमाणे ः "दुर्गोजी अहिराव हवालदार व कारकून किल्ले लोहगड यांस सनद की, रूस्तुमराव किल्ले मजकूर अटकेत ठेवावयाशी पाठविले आहे. त्यास किल्ल्यावर मोकळे ठेऊन रखवाली करणे, कडयावरून उडी टाकील अथवा वीष खाईल, ब्राम्हणाचा विचार आतताईपणा करू लागेल तर करू न देणे. तजविजीने जतन करणे. दररोज तांदूळ व नागली मिळोन पोटास कैली **1** एक शेरप्रमाणे देऊन ब्राम्हणाकडून पोटास घालवीत जाणे. म्हणोन सनद **1**"[50]

दुर्गोजी अहिराव या हवालदारास एक कैदी लोहगड किल्ल्यास पाठवुन त्याच्याविषयी सुचना दिलेल्या आढळतात तसेच होणाऱ्या शक्यता गृहित धरून त्यावर योजना करा अशा आशयाचे पत्र हवालदारास पाठविलेले

---

[50] द.बा.पारसनीस (संपा.), पुर्वोक्त, पृ.**76**.

आढळते. विशेष बाब म्हणजे रूस्तुमराव हा ब्राम्हण आहे व त्यास कैदेत टाकले आहे तसेच त्यास लागणारा शिधा हा ब्राम्हणाकरवे त्यास द्यावा अशी योजना किल्ल्यावर केली गेल्याचे दिसून येते. सारांश ज्यावेळी युद्ध परिस्थिती आहे त्यावेळी जातीपंथ विसरून एकदिलाने आक्रमकांविरोधी लढलेले लोक दरम्यानच्या काळात दिसून येतात परंतु इतर वेळी कैदखान्यात असतांना देखील खाण्याचे सोवळे पाळलेले आढळतात. सारांश दरम्यानच्या काळात समाजाचे द्विधा लोकवर्तनाचे चित्रण येथे दिसून येते.

मध्ययुगात "संपुर्ण राज्याचे सार ते दुर्ग, दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय होऊन भग्न होतो, देश असा उध्वस्त झाल्यावर राज्य असे नेमके कोणास म्हणावे यासाठी जे जे राजे होऊन गेले त्यांनी गडकोट बांधून देश शाश्वत करून घेतला, गडकोट हेच राज्य, गडकोट हेच सैन्य, गडकोट हीच राज्यलक्ष्मी, गडकोट हेच सुखनिद्रागार, किंबहुणा गडकोट हेच प्राणसंरक्षक"[51] असे असाधारण महत्व गडकिल्ल्यांस शिवाजी महाराजांनी दिलेले दिसून येते. तद्नंतरही काही वर्षे किल्ल्यांचे महत्व असेच टिकून असलेले दिसून येते. त्यांच्या नंतर **1818** सालापर्यंत किल्ल्यांच्या जोरावर राज्य करणा[illegible] स्थानिक राजसत्तांनी किल्ल्यांची दुर्गमता वाढविण्यासाठी मोठया प्रमाणात लक्ष दिलेले दिसून येते. कारण दक्षिणेतील किल्ल्यांच्या जोरावर स्थानिक राजसत्तांनी अनेक वर्षे आपल्या राजसत्ता टिकविल्या होत्या. मावळ तालुक्यातील किल्ल्यांविषयक ज्या राजसत्तेकडे किल्ले होते त्यांनी किल्ल्यांची अभेद्यता वाढविण्यास कायम प्राधान्य दिलेले निदर्शनास येते. **1755** सालच्या एका पत्रातुन लोहगड किल्ल्याची दुर्गमता वाढविण्यासाठी प्रयत्न केलेले दिसून येतात. पत्रातील आशयानुसार नारो त्रिंबक यास राज्यातील सर्व किल्ल्यांची चौकशी करण्यास सांगीतले. किल्ल्यातील साठे, सैनीकांची हजेरीपत्रके, इमारतींची चौकशी, शस्त्रसाठा इत्यादींची चौकशी करावी. लोहगडचा किल्लेदार दुर्गोजी अहीरराव यास नारो त्रिंबक यास सहकार्य करण्यास सांगण्यात आले.[52] या पत्रावरून मध्ययुगात किल्ल्याच्या व्यवस्थेकडे राजसत्तेचे बारकाईने लक्ष होते याची माहीती मिळते. **14** जानेवारी **1761** साली पानिपत युध्द झाले. युध्दाच्या आधी **1** वर्षे नानासाहेब पेशवे यांनी लोहगड किल्ल्यावर कामगारांची नियुक्ती केलेली आढळते.[53] दरम्यानच्या काळात पानीपत युध्दाची नांदी असतांना लोहगड किल्ल्यावर सैन्याचे व्यवस्थापन व

---

[51] रामचंद्रपंत अमात्य, पुर्वोक्त, पृ. **23**.

[52] का. ना. साने (संपा.), पुर्वोक्त, पृ. **200**.

[53] द. वा. पारसनीस, *संशोधनासाठी निवडलेली कागदपत्रे*; द. **6**, पु. **3**, पत्र ः **3346**.

कामगारांची नियुक्ती केली जाणे ही बाब महत्वपुर्ण असल्याचे दिसून येते. तसेच राजसत्तांचे किल्ल्यांच्या सुरक्षेबाबत विशेष लक्ष असल्याचे दिसून येते. प्राचीन कालखंडापासून **1818** सालापर्यंत किल्ल्यांस व त्यावरील सैनिक, शस्त्रसाठा, इमारती या सर्व गोष्टींना महत्व दिलेले आढळते मात्र **1818** नंतर ब्रिटीश अंमल चालु झाल्यानंतर किल्ल्यांची दुरावस्था चालु झाली तसेच ब्रिटीशांनी जाणीवपुर्वक किल्ले पाडण्याचे काम हाती घेवुन दर्जेदार किल्ल्यांची प्रवेशद्वारे व तटबंदी फोडून किल्ल्यांची दुरावस्था केलेली आढळून येते.[54]

लोहगड किल्ल्यास अनेक किल्ल्यांची प्रभावळ असून प्रभावळीत राजमाची, विसापूर, तिकोणा, तुंग, कोराईगड हे किल्ले आहेत. **1760** साली राजमाची या सुभ्यावरून महार समुदायाकडे कर्जपट्टीचा तगादा लावला होता यासंबंधीचे पत्र पुढीलप्रमाणे ः "देशमुख व देशपांडे तर्फ नाणेमावळ यांचे नावे सनद की, तर्फ मजकूरचे महार यांणी हुजूर विदीत केले की, तर्फ मजकूरचे जमीदारास सुभा राजमाचीहून कर्जपट्टीचा तगादा लाविला, त्याकरीता जमीदारांनी आम्हास समस्तांस कर्जपट्टीचे तोष्ट लाविले आहे. ऐशियाशी आम्ही बंदगीचे महार किल्ले लोहगड व राजमाची येथील वतनदार गावगन्नाची चाकरी मुलामाणसांनिशी करतो. चाकरी फारच पडते. त्यास पूर्वीही एक दोन वेळा कर्जपट्टी जाहली, परंतु महारांपासून कोणी कर्जपट्टी घेतली नाही. तरी साहेबी कृपाळू होऊन गरिबावर नजर देऊन कर्जपट्टी माफ केली पाहीजे म्हणोन. त्याजवर हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी महारापासून कर्जपट्टी घेऊ नये असा पेशजीचा करार आहे त्याप्रमाणे कर्जपट्टी घेऊ नये म्हणोन चिटणीसीपत्र देण्यात येत आहे."[55]

मध्ययुगातील जातीव्यवस्थेत व्यक्ती किंवा समुदायास जातीवाचक संबोधले जात होते. महार समुदायाच्या कर्जमाफीसाठी अर्ज केल्याचे दिसून येते परंतु त्यांस या अर्जाआधी दोन वेळा कर्जमाफी झालेली असतांना या अर्जानंतर कर्जमाफी मिळाली की नाही याबाबत कोणतेही पत्र किंवा माहिती मिळालेली नाही. मात्र दरम्यानच्या काळात महार समुदायापासून कर्जपट्टी घेवू नये असा झालेला करार यातून स्पष्ट होतो तसेच मुलामाणसांच्या समवेत मावळ तालुक्यातील किल्ल्याच्या परिघात निष्टेने काबाड कष्ट करणारा महार समुदाय व त्यांची मध्ययुगीन आर्थिक स्थिती दिसून येते.

---

[54] य.न.केळकर यांच्या खाजगी संग्रहातील हेन्री पाटंनरचे **1818** सालचे पत्र.

[55] का.ना.साने (संपा.), पुर्वोक्त, पृ.**351–352**.

**14** जानेवारी **1761** साली पानीपत येथे अहमदशहा अब्दाली विरूध्द मराठयांचे युध्द झाले. मराठा साम्राज्याची मोठी हानी यातून झालेली दिसून येते. **1761** साली लोहगड किल्ल्यावर फंद फितुरीची शक्यता निर्माण झालेली दिसून येते म्हणून किल्लेदार त्रिंबकजी अहीरराव याने बाळाजी बाजीरावास पत्र लिहून काही उपाययोजना करण्याची विनंती केली आहे याविषयीची नोंद पुढीलप्रमाणे ः "लोहगडावर फंदफितुरीची शक्यता वाटत होती. म्हणून फितूरीपासून किल्ल्याचा बचाव करता येईल याविषयी त्रिंबकजी अहिरराव याने पेशवा बाळाजी बाजीरावास पत्र लिहून विचारले व उपाययोजना करण्याची विनंती केली."[56] किल्ल्यांच्या जोरावर राज्य चालते. किल्ला शत्रुसैन्याच्या हाती पडला की भोवतीचे किल्ले व प्रदेश हातचा जातो यासाठी फंदफितुरी हा फार मोठा गुन्हा गणला गेला असे दिसून येते. "जो फंदफितुरी करेल त्याची गर्दन मारून भाल्याच्या टोकावर लावुन गडोगडी फिरवावी"[57] अशी नीती आज्ञापत्र ग्रंथात रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहुन ठेवलेली आहे. तसेच फितुरी बद्दल "एखादा किल्लेदार किंवा किल्ल्यावरील अधिकारी फितुर असल्याचा संशय देखील आला तरी चौकशी न करता त्यास त्वरीत कैद करावे व गुन्हा शाबीत झाल्यास गर्दन मारावी व फितुरी नसल्यास त्यास पुन्हा त्या पदावर नामजाद न करता निराळे काम सांगावे"[58] असे फितुरीबद्दल शिवकालीन शिक्षा असल्याचे दिसून येते. फितूरी हा फार मोठा धोका मध्ययुगात होता. तसेच फितूरांना योग्य ती शिक्षा करण्यात कोणतीही राजसत्ता गहाळ नसल्याचे आढळते. त्यामुळे पेशवाईत झालेली अनेक बंड शमविण्यासाठी सरकारातून त्वरित प्रयत्न केले जात असल्याचेही आढळते व बंड केलेल्या अनेकांस सरकार कडून विसापूर किल्ल्यावर कैदेत ठेवले जात होते तसेच त्यांची संपत्ती व जमिनी जप्त केल्या जात असल्याचेही दिसून येते. उदाहरणार्थ ः **1803** साली भगवान शिंदे याने माहुलीस बंड वाल्यांना साथ दिली म्हणून त्याच्या जमिनी जप्त करून त्यास विसापूर किल्ल्यावर कैदेत टाकले होते. [59]

लोहगड व विसापूर किल्ले कैदेसाठी प्रसिद्ध पावलेले होतेच. **1767** साली लोहगड किल्ल्यावर केदारजी शिंदे यांची बायको व कुणबीणी कैदेत पाठविल्या होत्या. त्याविषयीची नोंद पुढीलप्रमाणे ः "केदारजी शिंदे यांची

---

[56] द. बा. पारसनीस, *संशोधनासाठी निवडलेली कागदपत्रे*; द. **8**, पु. **6**, पत्र ः **4695**.

[57] अमात्य रामचंद्रपंत, पुर्वोक्त, पृष्ठ. **27**.

[58] तत्रैव, पृष्ठ. **27**.

[59] गणेश चि. वाड (संपा.), पुर्वोक्त, पृ. **179**.

बायको व कुणबीणी असामी 2 दोन एकुण तीन असामी किल्ले लोहगड येथे अटकेत ठेवावयास पाठविल्या आहेत, त्यास पोटास दररोज बायकोस शिधा ऊत्तम प्रतीचा व कुणबीणीस अडसेरी देत जाणे व चिरगुट पांघरूणाची बेगमी करीत जाऊन पक्क्या बंदोबस्ताने अटकेत ठेवणे म्हणोन नारो त्रिंबक याचे नावे सनद"[60] पेशवाईच्या ऊत्तरार्धात किल्ल्यांचा सर्रास कैदी ठेवण्यास उपयोग केल्याचे दिसून येते. पुढे इ.स.1768 मध्ये माधवराव पेशवे यांनी नारो त्रिंबकला सनद दिली ती पुढीलप्रमाणे ः "नारो त्रिंबक यांस सनद की, केदारजी शिंदे याची बायको लोहगडावर अटकेत ठेवली आहे, त्यास महादजी शिंदे यांणी विनंती केली त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी महादजी शिंदे यांजकडील कारकून किल्ले मजकूरी येतील त्यांस बायको त्याचे कुणबिणीसुध्दा हवाली करणे"[61]

लोहगड किल्ल्यावर तुळाजी आंग्रे यांची माणसे कैदेत ठेवीली होती. आंग्रे, होळकर, दाभाडे, गायकवाड, पवार या सर्वांशीच पेशवे फटकून वागल्याचे आढळुन येते. 14 जुन 1770 मध्ये पेशवेंच्या राजवटीत प्रत्येक किल्ल्यावर असलेल्या बंदीवानांची यादी माधवराव पेशवे यास तयार करून घ्यावी लागली एवढया संख्येने अनेक किल्ल्यांवर कैदी ठेवले होते हे दिसून येते. दरम्यानच्या काळात लोहगड किल्ल्यावर तुळाजी आंग्रेंची माणसे कैदेत ठेवलेली होती. लोहगड किल्ल्यावर दोन गुलामांना बेडया घालून ठेवल्याचे दिसून येते.[62]

सवाई माधवराव पेशवे यांनी 1773 मध्ये लोहगड किल्ल्याचा किल्लेदार केशवराव बल्लाळ याजकडे कैदी पाठवले. त्यांना पायामध्ये बेडया घालण्यात आल्या. त्यास मध्यमप्रतीचा शिधा देण्यास सांगीतले.[63] पेशवाईत लोहगड किल्ल्यावर अनेक कैदी ठेवल्या गेले होते त्यांत "केशवराव बल्लाळ गोगटे यास पायांत बेडया घालून कैदेत टाकले"[64] अशीही नोंद सापडते.

---

[60] का.ना.साने (संपा.), *थोरले माधवराव पेशवे यांची रोजनीशी*, 1911, पृ.167.

[61] तत्रैव, पृ.171.

[62] बापू जोशी (संपा.), *सवाई माधवराव पेशवे यांची रोजनीशी*, 1911, पृ.227-229.

[63] काशीनाथ मराठे (संपा.), *सवाई माधवराव पेशवे यांची रोजनीशी*, 1908, पृ.46.

[64] तत्रैव, पृ.46.

मध्ययुगात महाराष्ट्रात धार्मिकता मोठया प्रमाणावर होतीच त्याचबरोबर अंधश्रध्दा सर्वत्र पसरलेली आढळते. अंधश्रध्देच्या उदाहरणांत विसापूर किल्ल्यावर येवजी लोहट हवालदार याने पाठविलेले "अदभूत शांत करणे आहे" या आशयाचे पत्र तत्कालीन अंधश्रध्देविषयक उद्‌बोधक आहे. तसेच नवस करून त्याची फेड करण्यासंबंधीचे पत्र उपलब्ध आहे ते पुढीलप्रमाणे ः "लोहगड किल्ला राघोबादादाने सदाशिव रामचंद्र यास दिला होता. मात्र किल्ल्यावरील शेख उमर या पीराची पुजा करणाऱ्यांनी म्हणजेच स्थानीकांनी पीरास नवस केला की, किल्ल्याचा कारभार सदाशिव रामचंद्र याजकडे दिला जाऊ नये. तो पुर्ण झाल्यास पाचशे रूपयाचा नवस फेडीन असे सांगितले होते. हा नवस फेडण्यासाठी सवाई माधवरावाने **500** रूपये पाठविले. धार्मिक कार्यासाठी खर्च दाखवावा असे सांगण्यात आले. रामराव नारायण यांस सनद दिली"[65] लोहगड किल्ल्याच्या भोवतीच्या स्थानिक मुस्लीम समुदायाने सदाशिव रामचंद्र याजकडे किल्ला जावु नये यासाठी केलेला नवस फेडण्यासाठी सवाई माधवरावाने सरकारातुन खर्च करणे हे मध्ययुगातील अंधश्रध्देचे मोठे उदाहरण असल्याचे दिसून येते. सारांश किल्ल्यांवरील अद्‌भुत शांती करण्यासाठी किंवा नवस करून ते फेडण्यासाठी सरकार तिजोरीतुन पैसे खर्च करणे सयुक्तिक नसतांना अंधश्रध्देच्या विळख्यात अडकुन पेशवे कालखंडात अनेकदा धार्मिक कार्यावर मुबलक पैसा खर्च केलेला आढळुन येतो.

मराठी राज्याशी फटकुन वागणारी काही घराणी लोहगड किल्ल्याच्या परीघात व मावळ तालुक्यात होती. त्या घराण्यातील काहींस कैद करून पेशव्यांने लोहगड किल्ल्यावर ठेवले व नंतर त्यांस सोडुन मराठी राज्याच्या प्रवाहात आणण्याचे काम तुकोजी होळकर यांनी केलेले आढळुन येते. लोहगड किल्ल्यावरील कैदींस सोडण्याविषयी नाना फडणविस यास सांगितले गेले त्या विषयी पत्र पुढीलप्रमाणे ः "जावजी बांबळा व त्याच्या पथकातील लोक मराठी राज्याशी फटकून वागत होते. त्यामध्ये प्रामुख्याने खाडे, भांगरे, राजूरमधील पिंचुड, भोई र, वाघ, तलपाड, परदेशी, ढगले, मोरे इत्यादी लोकांचा समावेश होता. त्या सर्वांना मराठी राज्याच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तुकोजी होळकरांनी मध्यस्ती केली. त्यांच्याकडून चांगल्या वर्तनाची हमी घेण्यात आली. त्याप्रकारचा लेखी करार करण्यात आला. लोहगडावर बाळाजी जनार्दन यास कळविले की, **2** बायका, लांघे **2** पोरगे **4** चार असामीविशी यांना सोडण्यात यावे."[66] लोहगड किल्ल्यावर असंख्य कैदी ठेवल्या गेले यात मराठी

[65] तत्रैव, पृ. **129**.

[66] तत्रैव, पृ. **150-151**.

राज्याशी फटकळ वागणारी मंडळीही ठेवल्या गेली. लेखी हमी मिळाल्यानंतर कैदींस नाना फडणवीसाने सोडले. लोहगड किल्ल्याचा राजकीय इतिहास कैद्यांच्या कैदखान्या संबंधीत मोठया प्रमाणावर असल्याचे दिसून येते.

मध्ययुगात अनेक समाज नाराजीने उठाव करीत असत. त्यासाठी राजसत्तेला सतत जागरूक असावे लागे. कोळयांचा उठाव हा फार मोठया प्रमाणावर होवू शकतो याची कल्पना आधी आल्यामुळे इसवी सन **1777** मध्ये सवाई माधवराव पेशवे यांनी त्यावर काही योजना केल्या त्या संबंधीचे उल्लेख पुढीलप्रमाणे ः "कोळयांनी आपणाविरूध्द उठाव करू नये म्हणून सवाई माधवराव पेशव्याने तुकोजी होळकरास मध्यस्थ घेऊन कोळी सरदार जावजी बांबळा याच्याशी करार केला. त्यामध्ये ठरल्यानुसार जावजी बांबळा याच्या कोळी समाजातील जी विविध माणसे विविध किल्ल्यांवर कैदेत होती त्यांना सोडून देण्यास सांगीतले. त्याप्रमाणे सवाई माधवारावाने लोहगड किल्ल्याचा अधिकारी बाळाजी जनार्दन यास सांगितले की, लोहगडावरील कोळयांच्या दोन बायका आणि लांघे दोन मुले यांची सुटका करावी. मात्र यापुर्वी त्यांचा चांगला जामीन घ्यावा. परंतु त्यांच्याकडून कोणताही खंड घेऊ नये. या अटींवर त्यांची सुटका करण्यात आली."[67] राज्यात अराजकता निर्माण झाली की ती शमविणे अवघड होत असे यासाठी कोणताही समाज दुखावला जावु नये तसेच कोणत्याही समाजावर सरकार कडून मोठया प्रमाणात अन्याय होवु नये यासाठी प्रयत्न केले जात असत. कोळयांचा उठाव राजसत्तेस कलाटणी देण्यासही पोषक ठरू शकतो याची जाणीव राजसत्तेस झाल्यामुळे लोहगड किल्ल्यावर कैदेत ठेवलेले लोक सोडण्याचा निर्णय राजसत्तेने घेतला असल्याचे निदर्शनास येते.

किल्ल्यावर सैन्यात रूजू होवून किल्ला शत्रुसैन्याच्या ताब्यात देण्यासाठी प्रयत्न केले जात असत. यासाठी किल्लेदारास फार सतर्क रहावे लागत असे. किल्ल्यावरील हवालदार, सबनीस व कारखानीस या सर्वांवरच समान जबाबदारी राजसत्तेने दिली असल्याने एकास एक मेळ असल्याने फितुरीची शक्यता फार कमी असे. परंतु तरीही तटाधिकारी व लष्कर यांतील कोणीही फितुरी करू नये यासाठी त्यांच्यावरही बारीक लक्ष ठेवण्याचे काम राजसत्तेस व किल्ल्यावरील अधिकाऱ्यांस करावे लागत असे. लोहगड किल्ल्यावर गुप्तपणे कारवाया करून लोहगड शत्रुसैन्याच्या ताब्यात जावा यासाठी तजविज केल्या गेली त्या संदर्भातील **12** सप्टेंबर **1778** मधील पत्रानुसार लोहगडावर वास्तव्य करून मराठी राज्याविरूध्द गुप्तपणे कारवाया करतांना पकडला गेल्याने लक्ष्मण

---

[67] गणेश वाड (संपा.), *सवाई माधवराव पेशवे यांची रोजनीशी*, **1908**, पृ. **150-151**.

खंडेराव यास अटक करावी असे गुप्तपणे लोहगडाचा किल्लेदार नारो त्रिंबक देशमुख याने सवाई माधवरावास कळविले. त्याप्रमाणे त्यास लोहगडावर अटक करण्यात आली.[68] लक्ष्मण खंडेराव यास अटक केल्यानंतर पुढे काय शिक्षा केली यासंबंधी माहीती उपलब्ध होत नाही. परंतु किल्ल्यावर फितुरी केल्यास मध्ययुगात मृत्युदंडाची शिक्षा सर्रास होत असल्याने लोहगड किल्ल्यावर लक्ष्मण खंडेराव यास मृत्युदंड मिळाला असल्याचा संभव आहे.

पानीपत युद्धानंतर मराठयांची शक्ती कमी झाली होती. तसेच मराठी राजसत्ता अब्दालीशी लढून मोठया संख्येने सैन्य गमावून बसली होती. ब्रिटिश राजसत्तेला ही एक सुवर्णसंधी असल्याने ब्रिटिशांनी पानीपत युद्धानंतर भारतावर मोठया प्रमाणावर पकड धरायला सुरूवात केलेली आढळते. **1785** साली ब्रिटीशांचा वाढलेला अंमल मराठी राज्यावर दिसून येतो. किल्ले मराठी राजसत्तेकडे असतांना ब्रिटीश अधिकाऱ्यांची व्यवस्था मोठया प्रमाणावर किल्ल्यांवर ठेवल्या गेल्याचे आढळुन येते. इंग्रज वकील चार्ल्स मॅलेट हा मुंबईहून पुण्याकडे जातांना प्रवासादरम्यान त्याच्या मुक्कामाची सोय विविध किल्ल्यांवर करण्यात आल्याचे दिसून येते. त्यावेळी विसापूर किल्ल्याचा किल्लेदार भिकाजी गोविंद आणि लोहगड किल्ल्याचा किल्लेदार बाळाजी जनार्दन यांना इंग्रज वकिलाच्या मुक्कामाची सोय करण्यास सांगीतले. त्याविषयीचा मजकूर पुढीलप्रमाणे ः

"मेस्त्र मालीट वकील इंग्रजांकडील मुंबईहून पुण्यास येतात, त्यांस वोझ्यास बेगारी व येतांना मुक्कामास राहतील तेथे रहावयास जागा व शाखभाजी, पानपत्रावळ व लाकडे वैरण वगैरे, महादजी त्रिंबक कारकून निसबत नारो महादेव गद्रे यांस पाठविले आहेत. हे कार्यकारण पाहोन सांगतील त्याप्रमाणे साहित्य करीत जाणे म्हणोन"[69] या पत्रावरून इंग्रजांच्या वकीलांची व्यवस्था मराठी राजसत्तेकडुन चांगल्याप्रकारे ठेवली जात असल्याचे आढळते. लोहगड किल्ल्यावर चार्ल्स मॅलेट मुक्कामास राहीला व तो दुसऱ्या दिवशी पुण्यास गेल्याचे दिसून येते.

पेशव्यांविरोधी अनेक उठाव दरम्यान झालेले दिसून येतात. कोळयांची बंड, महारांची बंड तसेच किल्लेदारांची बंड पेशवाईत मोठया प्रमाणावर झालेली आढळतात. इ.स.**1790** मध्ये गुण्या बेरड याने पेशव्यांविरूध्द बंड पुकारले. त्यासाठी त्यास अटक करून लोहगड किल्ल्यावर कैदेत टाकले. त्याला रोजच्या जेवणाचा खर्च व इतर खर्च कसा झाला या खर्च तपशीलाची यादी दिनांक **24** ऑगस्ट **1790** रोजी करण्यात

---

[68] द.वा.पारसनीस, *संशोधनासाठी निवडलेली कागदपत्रे*, द.**19**, पु.**5**, पत्र.**10954**.

[69] काशीनाथ मराठे (संपा.), पुर्वोक्त, पृ.**68-69**.

आली.[70] याच प्रकारचे बंड 1803 साली भगवान शिंदे या माहुली किल्ल्यावरील सरदाराने केले तसेच बंडवाल्यांना साथ दिली. बंडवाल्यांना माहुली किल्ला घेण्यासाठी तो मदत करू लागला म्हणून त्यास धरून आणून विसापूराच्या किल्ल्यामध्ये अटकेत ठेवले. भगवान शिंदे याच्याकडे इनामगांव, मोकासेगांव येथील जमीनी चालत आल्या होत्या त्यांची जप्ती करावयाची आज्ञा विसापूर किल्ल्याचा किल्लेदार सदाशिव भास्कर यास करण्यात आली. त्याचप्रमाणे लोहगडच्या किल्लेदारासही सांगीतले.1.धोंडो बल्लाळ मामलेदार किल्ले लोहगड यास सनद की किल्लेमजकूर येथील सरंजामाचे महालपैकी इनाम जमिनी व मोकासेगांव चालत आहेत. त्यांची जप्ती मशारनिल्हे करतील म्हणोन सनद.[71] गुण्या बेरड व भगवान शिंदे ही सर्व मराठी राज्यातील किल्लेदार पदाची मातब्बर मंडळी असतांना त्यांना त्यांच्यावरील अत्याचाराचा समाचार घेण्यासाठी बंड करणे भाग पडलेले दिसून येते तसेच त्यांनी केलेल्या बंडाची शिक्षा त्यांना कैदेत पडून भोगावी लागल्याचे आढळून येते. मात्र पेशवाईत ज्याप्रमाणे कोळयांची बंड, महारांची बंड तसेच किल्लेदारांची बंड मोठया प्रमाणात झालेली आढळतात तशी बंड शिवकाळात झाल्याचे दिसून येत नाहीत.

प्राचीन काळापासून लोहगड किल्ल्याच्या विकासाचा व दुर्घटतेचा आलेख कायम वाढलेला दिसून येतो. प्राचीन ते मध्ययुग लोहगड किल्ल्यास अनेक राजसत्तांनी बेलाग बनवितांना नवनविन योजना केलेल्या आढळतात. किल्ल्याच्या रचनेत परिस्थितीनुरूप बदल सातत्याने आढळून येतात. शिवकाळात व तद्नंतरही मोठया रचना बदललेल्या आढळतात. परंतू पेशवाईच्या उत्तरार्धात लोहगड किल्ल्यास विशेष महत्व प्राप्त झालेले निदर्शनास येते. लोहगड किल्ला केंद्रस्थानी गणला जावून किल्ल्यास 1790 मध्ये तालुका बनविले गेल्याचे दिसून येते. 'तालुके लोहगड' अशी नोंद 1793 □94 मध्ये आलेली आहे.[72] आज असलेल्या मावळ तालुक्यात शिवकालीन तीन मावळांचा समावेश होतो. यात 'आंदर, पवन, नाणे' अशी तीन मावळं समाविष्ट होतात. आज मावळ नाव असलेल्या तालुक्यास 'तालुके लोहगड' असे नामकरण 1790 मध्ये करण्यात आलेले दिसून येते. संपुर्ण तालुक्याचा फौजदारी व मुलकी कारभार लोहगड किल्ल्यावरून पाहीला जात होता असे आढळते. लोहगड किल्ल्यास तालुक्याचा दर्जा दिल्याने लोहगड किल्ल्याचे तत्कालीन महत्व अधोरेखीत होते आहे.

---

[70] द.बा.पारसनीस, पुर्वोक्त, *द.19*, पु.5, पत्र.11477.

[71] गणेश चि.वाड (संपा.), पुर्वोक्त, पृ.179.

[72] काशीनाथ मराठे (संपा.), पुर्वोक्त, पृ.122.

संबळगड म्हणजेच विसापूर किल्ला व लोहगड किल्ला या दोन्हींच्या शिवेचा□सिमारेषा□तंटा झाला होता यासंबंधी माधवरावाने नाना फडणवीस यास नियुक्त केले. अर्थात दरम्यानच्या काळात सर्व कारभार नाना फडणीस याच्या हाती एकवटलेला दिसून येतो. नाना फडणवीस याने हे काम चिमणाजी रामचंद्र आणि भिवजी नाईक यांच्यावर सोपविले व हा निवाडा योग्य करण्याचा प्रयत्न केलेला दिसते. या प्रकरणावरून नाना फडणवीसचे राजसत्तेत वाढलेले प्राबल्य स्पष्ट होते आहे.[73] यादरम्यान पेशवाईत राज्यकारभार बारभाईच्या हातात एकवटलेला निदर्शनास येतो. या संदर्भातील उल्लेख पुढीलप्रमाणे : "गंगाजल निर्मळ लक्ष्मीबाई शिंदे यांजकडील बारभाई वगैरे लोक कोकणात उतरोन दंगा करीतात. त्यांचे बंदोबस्तास हुजुरून गोविंद बल्लाळ कारकून निसबत नारो शिवराम या समागमे स्वार देऊन पाठविले असेत. तरी तालुके मजकूरपैकी लोक मशारनिल्हेकडे पाठवून ते सांगतील त्याप्रमाणे जागा जागा नाकेबंदी करून बंदोबस्त करणे. त्याजकडील घोडी पाडाव करून वस्तभाव वगैरे जे सापडेल ते गोवींद बल्लाळ यांजकडे जमा करणे म्हणोन मामलेदार तालुकेनिहाय यांचे नावे सनदा. 1. किल्ले लोहगड निसबत राजश्री बाळाजी जनार्दन यास"[74]

नाना फडणवीस याचा लोहगड किल्ल्याशी जवळुन संबंध आलेला आढळतो. त्याने किल्ल्यावर अनेक बांधकामे नव्याने करवुन घेतली हे सध्या लोहगड किल्ल्यावर उपलब्ध शिलालेखांतून दिसून येते. तसेच किल्ल्यासंबंधीच्या तत्कालीन पत्रव्यवहारांतुन नाना फडणवीस नाव अनेकदा आलेले दिसून येते. पेशवाईतला मुत्सद्दीव्यक्ती म्हणून बाळाजी जनार्दन भानू उर्फ नाना फडणवीस परीचीत होता. मात्र त्याचे त्याच्या आयुष्याच्या उत्तरार्धात हालअपेष्टेत जिवन गेलेले आढळते. दुसऱ्या बाजीरावाने अनेक मराठी सरदारांस कैद केले त्याचप्रकारे नाना फडणवीस यासही कैद केले गेले. नानास कैदेत हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. यावेळी बाजीरावचा सल्लागार म्हणून अमृतराव व बाळोजी कुंजर हे दोघे नानाच्या विरोधी विचारसरणीचे होते. नाना फडणवीस यास लोहगड किल्ल्यावर कैदेत ठेवले गेले. या दरम्यान लोहगड किल्ल्याचा किल्लेदार धोंडो बल्लाळ निजसुरे हा होता. लोहगड किल्ल्यावर कैदेत असतांना नानाने **9** एप्रिल **1798** रोजी सरकारांत अर्ज केला की, "येथे काय जिंदगी असेल ती सर्व पाहून ताब्यात घ्या व माझे अबुस धक्का लागणार नाही असा बंदोबस्त करून द्या"

---

[73] द. बा. पारसनीस, पुर्वोक्त, द. **18**, पु. **2**, पत्र. **9402**.

[74] गणेश चि. वाड (संपा.), *सातारकर महाराज व पेशवे यांच्या रोजनिशीतील निवडक उतारे भाग 5*, **1908**, पृ. **89**.

सरकारातून या अर्जावर पुढे काय झाले याची माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु नाना फडणवीसचे धोंडो बल्लाळ निजसुरे याच्याशी संगनमत होवून दोघांचे मैत्रीपुर्ण संबंध झाल्याचे दिसून येते. या दरम्यान नाना व धोंडोच्या मैत्रीची गोष्ट बाजिरावाच्या कानी गेली असावी व त्यावरून दुसऱ्या दुसऱ्या बाजिरावाने किल्ला धोंडो निजसुरे कडे न ठेवता स्वतःच्या विश्वासू सहकाऱ्याकडे ठेवावा असा विचार केलेला दिसून येतो. या दरम्यान बाजीरावाने सर्जेराव नावाच्या व्यक्तिवर विश्वास ठेवून त्याच्याकडे किल्ला सोपवावा असे धोंडोपंतास सांगीतले असावे. मात्र सर्जेरावाचे लोक गेले असता धोंडोपंताने लोहगड सर्जेरावच्या ताब्यात दिला नाही.[75] म्हणजेच दुसऱ्या बाजिरावाच्या विरोधात असलेल्या नाना फडणवीस याच्या बाजूने धोंडो बल्लाळ निजसुरे हा होता हे आढळते. तसेच कायम धोंडो निजसुरे याचे दुसऱ्या बाजिरावाशी वैर असलेले दरम्यानच्या काळात दिसून येते. पुढे या शितयुद्धाचे रूपांतर मोठया वैरभावात होवून दोघेही एकमेकांच्या जिवाचे वैरी झालेले दिसून येतात. नाना फडणवीसच्या मृत्यूनंतर दुसऱ्या बाजीरावाने धोंडो निजसुरे यास लिहीलेल्या **1800** सालच्या पत्रात नानाच्या संपत्ती विषयी त्याचा धोंडो निजसुरे याच्यावर असलेला अविश्वास दिसून येतो. बाजिरावाने पाठविलेल्या पत्रात "बाळाजी जनार्दन यास ज्वर येऊन फाल्गुन वद्य तृतीया गुरूवारी रात्रौ देवाज्ञा झाली. ईश्वच्छेस इलाज नाही. त्यास किल्ल्याचा बंदोबस्त चांगला राखून तेथे यांची वस्तभाव वगैरे जो काय आहे ते अफरा तफरी न होतां इमानें इतबारे बंदोबस्ताने ठेवणे. या कामास सरकारांतून खिजमतगार पाठविले आहेत त्यांस किल्ल्याचे दरवाज्यावर बंदोबस्तास ठेवणे म्हणोन. **1**. धोंडो बल्लाळ किल्ले लोहोगड यांस की, दुलाजी शिंदा व हसोजी झबका खिजमतगार असामी दोन पाठविले आहेत येवीसी"[76] धोंडो निजसुरे हा नानाच्या संपत्तीचा मालक व्हायला नको. तसेच नानाच्या संपत्तीत वाटेकरीही नको म्हणून किल्ल्यावर आपली विश्वासू माणसे दुसऱ्या बाजिरावाने पाठविली व त्यांस किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर नामजाद करावे यासाठी धोंडो निजसुरे यास सनद पत्र पाठविलेले दिसून येते. परंतु धोंडो निजसुरे हा नानाशी एकनिष्ठ राहिलेला आढळतो. याने दुसऱ्या बाजिरावाशी जुळवून न घेता नानाच्या संपत्तीतून नानाने सांगीतलेल्या गोष्टी पुर्ण केलेल्या आढळतात. उदाहरणार्थ ः मृत्युपुर्वी नाना फडणवीस याने स्वतःच्या संपत्तीपैकी रू.**50,000**/- भीमाशंकर मंदीराच्या जिर्नोध्दारासाठी दिले. नानाच्या मृत्युपुर्वी **1801** साली मंदीराच्या शिखराचे सात थर तयार झाले होते. नानातर्फे अंताजी यशवंत व धोंडो बल्लाळ या दोघांवर

---

[75] गो.स.सरदेसाई, *मराठी रीयासत*, खंड ः **8**, **1892**, पृ.**120**.

[76] गणेश चि.वाड (संपा.), *दुसरा बाजीराव पेशवे रोजनीशी*, पृ.**103**.

जबाबदारी दिलेली होती. धोंडो बल्लाळ याने भिमाशंकरच्या मंदीराची जबाबदारी पुर्ण केली.[77] नानाच्या मृत्युनंतर त्याच्या संपत्तीवर आपला हक्क न बजाविता निष्ठेने त्याच्या संपत्तीतून भिमाशंकरचे मंदिर बांधण्याचे काम धोंडो निजसुरे याने केलेले दिसून येते. सध्या असलेले भिमाशंकरचे मंदिर हे नाना फडणविस याने बांधलेले आहे.

दुसऱ्या बाजीरावाने मराठी सरदारांच्या अनेक कुरापती केलेल्या दिसून येतात. मध्ययुगात दुसरा बाजीराव खोडकर व भांडखोर तसेच पराकमहीन म्हणून कुप्रसिध्द आहे. त्याच्या संबंधातील अनेक कागदपत्रे नकारात्मक व्यक्तिमत्व दर्शवीणारी असून त्यामुळे मराठे शाहीचा ऱ्हास मोठया प्रमाणात झालेला दिसून येतो. तसेच अनेक मराठी सरदारांशी त्याने वितुष्ट करून घेतल्याने त्याच्यावर विश्वास ठेवण्यासाठी कुणी तयार होत नसलेले दिसून येते. सतत मराठी राजसत्तेविरोधी व सत्तेच्या लालसेने ब्रिटिशांशी त्याने केलेले संगनमत मराठी राजसत्तेच्या मुळाशी घाव घालणारे ठरलेले दिसून येते. तसेच त्याने ब्रिटिशांशी केलेला तह किंवा स्नेह फारकाळ शाश्वत राहिलेला दिसून येत नाही. त्यामुळे दुसऱ्या बाजिरावाने ब्रिटिशांविरोधीही किल्ले लढविण्याची योजना केलेली दिसून येते. साधारणपणे **1802** सालापासून **1818** पर्यंत किल्ले लढविण्याचा संकल्प त्याने केलेला दिसून येतो. तसेच त्यासाठी त्याने केलेल्या ब्रिटिश विरोधी योजनाही मावळ तालुक्यातील किल्ल्यांवर व परिघात आढळून येतात. उदाहरणार्थ ः दुसऱ्या बाजिरावाने धोंडो निजसुरे याला पाठविलेले **1802** सालच्या पत्रातून ब्रिटिशांस विरोध करण्याची योजना दिसून येत. त्या आशयाचे पत्र पुढीलप्रमाणे ः "फौजा वगैरे कोकणप्रांती उतरावयाचे घाट तुम्हांकडील तालुकेनिहाय येथील हदेत असतील ते झाडून पाडून टाकून त्या घाटाने फौज वगैरे कोणायेकाची सरकारने आज्ञेशिवाय एकंदर उतरू न देणे म्हणोन मामलेदार तालुकेनिहाय यांचे नावे सनदा.1.तालुके लोहगड निसबत धोंडो बल्लाळ"[78] या दरम्यान ब्रिटिशांविरोधी मराठेशाहीची मोहीम दुसऱ्या बाजिरावाने उघडलेली दिसून येते. मात्र त्याच्या खटयाळ स्वभावामुळे या मोहिमेत त्यास यश येण्याची चिन्हे कमी होती हे उघड होते. तरीही त्याने किल्ले लढविण्यासाठी किल्ल्यांवर चांगल्या कडवट फौजा भरणे व दारूगोळयाने किल्ला युद्धासाठी सज्ज ठेवणे या गोष्टी केलेल्या दिसून येतात. तसेच ब्रिटिश ज्या वाटांनी कोकणात उतरतील

---

[77] बापु जोशी (संपा.), *दुसरा बाजीराव पेशवे याची रोजनीशी*, **1908**, पृ.**105-106**.

[78] द.बा.पारसनीस (संपा.), पुर्वोक्त, पु.**03**.

किंवा घाटावर येतील त्या वाटा बंद करण्याचे आदेश देवून ब्रिटिशांचे मार्ग रोखण्याचे पुरेपुर प्रयत्न केलेले दिसून येतात. त्याच्या या योजनांमुळे ब्रिटिशांस फारसा फरक पडलेला दिसून येत नाही. कारण तत्कालीन आधुनिक गणल्या गेलेल्या तंत्रज्ञानासमोर स्थानिक किल्ल्यांचा निभाव लागणे कठीण गोष्ट होती. या दरम्यानच्या काळात असलेले अद्ययावत तंत्रज्ञान मावळ तालुक्यातील किंवा बाजिरावाकडे असलेल्या कोणत्याही किल्ल्यांवर दिसून येत नाही.

ब्रिटीश अधिकाऱ्यांस किल्ले पाहण्याची आवड होती अशी अनेक उदाहरणे इतिहासात दिसून येतात. **1785** साली चार्ल्स मॅलेट हा ब्रिटीश वकील मुंबईहुन पुण्याकडे जातांना लोहगड किल्ल्याच्या मुक्कामी राहीला होता. तसेच ब्रिटीश अधिकारी माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन **1814** साली ऑगस्ट महिन्यात लोहगड पहावयास आला त्यास नरसिंगराव दत्तात्रय याने संपुर्ण किल्ला फिरवून दाखविला. यानंतर **28** ऑगस्ट **1814** रोजी एल्फिन्स्टन विसापूर किल्ला पाहण्यासाठी गेला.[79] राजगड व रायगड किल्ले पाहण्यासाठी ब्रिटीश अधिकारी कायम गेलेले आढळतात. स्केचेस करणे व माहिती संग्रह करून प्रवास वृत्तांत लिहीण्याचे काम ब्रिटीशांनी केलेली आढळते.

नाना फडणवीस पेशवाईचे दिवाणगीरीचे काम पहात असतांना त्याने धोंडो बल्लाळ निजसुरे यास लोहगडाचा कारभार पाहण्यासाठी नेमले. हा नानाच्या अतिशय विश्वासातील असल्याने नानाने आपली सर्व संपत्ती लोहगड किल्ल्यावर नेवून ठेवली. इसवी सन **1800** मध्ये नानाचे पुण्यात निधन झाल्यानंतर त्याची नववी पत्नी जिऊबाई ही **1802** साली लोहगड किल्ल्याच्या आश्रयाला गेली.

दरम्यानच्या काळात धोंडो निजसुरे व दुसरा बाजीराव यांच्यातील वितुष्ट पराकोटीस गेलेले होते. त्या दोघांत भांडणे चालू होती. म्हणून जनरल वेलस्ली याने मध्यस्ती करून ती मिटवीली आणि केलेल्या करारात दुसऱ्या बाजीरावाने लोहगड किल्ला धोंडो निजसुरेकडेच ठेवावा असे ठरले. मात्र कृष्णाकाठच्या एका किल्ल्यावरून (कृष्णा नदिकाठचा किल्ला म्हणजे सरदार आपटे यांचा हत्ती घाटाशेजारील लिंब गावास जातांनाच्या मार्गावरील किल्ला असण्याचा संभव आहे)[80] धोंडोपंतांच्या एका बारगीराने बंदुकधारी दुसऱ्या बाजीरावावर

---

[79] द.बा.पारसनीस, पुर्वोक्त, द.**26**, पु.**2**, पत्र.**13950**.

[80] क्षेत्रभेट : लिंब गाव, सातारा जिल्हा.

गोळी झाडली पण यातून दुसरा बाजीराव बचावला.[81] ही बातमी वेलस्लीला समजताच त्याने लोहगड घेण्याची तयारी केली. मात्र याआधीच धोंडो निजसुरे वेलस्लीस शरण आला. नानाच्या पत्नीस धोंडो निजसुरे याने **1200** रूपयांची नेमणुक करवुन घेतली. आणि स्वतः ठाण्यास जावून राहीला. लोहगड किल्ला वेलस्लीच्या हाती आल्यावर **1803** साली वेलस्लीने पुन्हा दुस□या बाजीरावास लोहगड किल्ला दिला. मात्र दुसऱ्या बाजिरावाची ब्रिटिशांशी असलेली ही जवळीक फार काळ टिकली नाही. त्यामुळे ब्रिटिशांनी **4** मार्च **1818** च्या मोहीमेत कर्नल प्रॉथर सोबत मोठा फौजफाटा देवून लोहगड जिंकून घेण्याच्या मोहीमेवर त्यास नामजाद केले. या मोहीमेत **380** युरोपीयन सैनिक व **800** ऐतद्देशीय सैनिक होते.[82]

लोहगड किल्ला बळकट असल्यामुळे कर्नल प्रॉथर व त्याच्या सैनिकांनी जय्यत तयारी केली होती परंतु लोहगडावर हल्ला न करता त्यांनी आधी सौम्य प्रतिकार घेत विसापूर हस्तगत केला व त्यानंतर कोणत्याही प्रकारचा प्रतिकार न करता लोहगड किल्ल्यावरील सैन्याने किल्ला सोडलेला दिसून येतो.[83] विसापूर किल्ला ब्रिटिशांनी हस्तगत केल्यानंतर त्याच दिवशी लोहगड किल्ला ब्रिटिशांनी मिळविला.[84] पुढे इसवी सन **1845** पर्यंत लोहगड किल्ल्यावर ब्रिटिशांची फौज तैनात होती. तद्नंतर हा किल्ला भारत स्वतंत्र होईपर्यंत भोर संस्थानकडे होता. मात्र किल्ल्यावर **7 □8** माणसेच गडाच्या दिमतीस असल्याचे आढळते.

वरील माहितीवरून असे दिसते की मावळ तालुका हा प्राचिन काळापासून घाटवाटा व किल्ले तसेच लेणी यांच्या दृष्टिने संपन्न होता. प्राचिन काळात कमाकमाने लेणी कोरण्याचे काम अनेक पंथांमार्फत येथे केले गेले. त्यामुळे बौध्द समुदायाचे एक मोठे केंद्र म्हणून कार्ले लेणीस मान्यता मिळाली. तसेच लोहगड व परिघातील किल्ले यांच्या कातळयांत व सभोवतीच्या पर्वतांवर अनेक कातळयांस पोढी व खोल्या निर्माण केल्या गेल्या. मध्ययुगात मावळ तालुक्यातील समृध्दी वर्धिष्णू झाली होती. मुबलक पाणी, धान्य व पशुधनामुळे शेती व व्यापार यांस चालना मिळाली तसेच देशावर जाणारे घाट येथून असल्याने जकातीचे उत्पन्न येथून मोठया प्रमाणावर निर्माण होत

---

[81] Gazetteer of the Bombay Presidency, Poona, Vomume XVIII, part III, P.253.

[82] Gazetteer of the Bombay Presidency, Poona, Vomume XVIII, part III, P.255.

[83] Gazetteer of the Bombay Presidency, Poona, Vomume XVIII, part III, P.254.

[84] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, p. 687.

होते. त्यामुळे मावळ तालुक्यातील किल्ले हस्तगत करण्यासाठी कायम राज्यकर्त्यांचा एकमेकांत झालेला संघर्ष समोर येतो आहे. उंच गिरीदुर्ग व सभोवती घनदाट वन असल्याने या किल्ल्यांच्या योगे राज्य संरक्षित करण्यासाठीचे नियोजन दिसून येते. अर्वाचीन युगात ब्रिटीश सत्तेकडून येथील किल्ले हस्तगत करण्यात आले तसेच किल्ल्यांवरील पाण्याचे स्त्रोत व प्रवेशद्वारे यांस ब्रिटीशांकडून भग्न करण्यात आलेले निदर्शनास येते. लोहगड किल्ला प्राचिन व मध्ययुग तसेच अर्वाचिन युगात कायम मावळ तालुक्याच्या केंद्रस्थानी गणला गेलेला दिसून येतो.

# प्रकरण चौथे

## विसापूर किल्ला

| | |
|---|---|
| भौगोलिक स्थान | ः $18^{0}$ 43’ रेखांश उत्तर, 73 $^{0}$ 39’ अक्षांश पूर्व[1] |
| तालुका | ः मावळ (मध्ययुगातील पवनमावळ) |
| दुर्ग प्रकार | ः गिरीदुर्ग |
| समुद्रसपाटीपासून उंची | ः 1082 मीटर[2] |
| पायथ्यापासून उंची | ः 150 मीटर |
| किल्ल्याच्या माथ्याचा परीघ | ः 4.2 कि.मी. (2.6 मैल) |

## दुर्ग संशोधन

मावळ तालुक्यातील इतर किल्ल्यांपैकी प्राचीन शिलालेख व सर्वात विस्तीर्ण माथा असलेला विसापूर किल्ला आहे. मध्ययुगात विसापूर किल्ल्याचे नाव ईसागड असे आढळते.[3] तसेच संबळगड असेही नाव शिवकालीन पत्रव्यवहारांत दिसून येते.[4] विसापूर किल्ल्यावर येणाऱ्या दोन्ही नाळेच्या वाटा किल्ल्याच्या मध्यापर्यंत येत असल्याने दोन्हीबाजूच्या विस्तीर्ण पठारास या वाटा विभक्त करतात. त्यामुळे दोन्ही पठाराच्या बाजू संबळासारख्या दिसतात म्हणून किल्ल्यास ‘संबळगड’ असे नाव पडले असावे. मध्ययुगीन विभागीय रचनेत विसापूर किल्ला बारा मावळ मधील पवन मावळ या विभागात गणला जातो. लोहगड किल्ल्याच्या ईशान्य बाजूस

---

[1] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, p. 687.

[2] मराठी विश्वकोश, खंड ः 16, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1999, पृ. 955.

[3] मराठी विश्वकोश, खंड ः 16, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1999, पृ. 955.

[4] *शिवकालीन पत्रसार संग्रह* खंड ः 2, श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, 2009, पृ.413.

व भातराशीच्या डोंगराच्या पश्चिमबाजूस विस्तीर्ण माथा असलेला पर्वत लष्करी सेवेसाठी स्थानिक राजसत्तांकडून विकसित करून आज दिसणारा विसापूर किल्ला उदयास आलेला आढळतो .

लोहगडवाडीच्या बाजूने गायमुख खिंडीतून उजवीकडे असलेली नाळेची वाट विसापूर किल्ल्यावर जाते . या वाटेने दक्षिण प्रवेशद्वारात प्रवेश करता येतो . भाजेलेणी समुहावरील डोंगरमार्गेही धनगरवस्तीहून वायव्य बुरूज मार्गे पाटण प्रवेशद्वाराने किल्ल्यात प्रवेशता येते तसेच भातराशी डोंगरबाजुने पश्चिमेकडे सरळ सोंडेने किल्ल्याच्या दक्षिण दरवाज्यात प्रवेशता येते व पाटण गाव मार्गे नाळेच्या किंवा जंगलाच्या मार्गाने किल्ल्याच्या पाटण प्रवेशद्वारात प्रवेशता येते .

- किल्लापायथा पाटणगाव ः

किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या गावांची नावे अनेकदा किल्ल्याची किंवा त्या निगडीत असतात . काही वेळा तालुका किंवा जिल्हाचे नाव किल्ल्याच्या नावावरून असलेले दिसून येते . उदाहरणार्थ ः रायगड जिल्हयाचे नाव रायगड या किल्ल्यावरून पडले असून त्या आधीही कुलाबा असे जिल्हयाचे नाव असतांना आलिबागच्या कुलाबा किल्ल्यावरून जिल्हयाचे नाव कुलाबा पडले असल्याचे दिसून येते . तसेच सिंधुदुर्ग जिल्हयाचे नाव सिंधुदुर्ग या जलदुर्गामुळे पडलेले आढळते . त्यानुसार महाराष्ट्रात अनेक किल्ल्यांच्या पायथ्याच्या गावांना किल्ल्यांची नावे आढळुन येतात . उदाहरणार्थ ः रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील चांभारगड किल्ल्याच्या पायथ्याच्या गावाचे नाव चांभारपाले, पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यातील नारायणगड किल्ल्याच्या पायथ्याच्या गावाचे नाव नारायणगाव तसेच पुणे जिल्हयातील सासवड तालुक्यातील मल्हारगड उर्फ सोनोरीच्या किल्ल्याच्या पायथ्याच्या गावाचे नाव सोनोरीगाव . मावळ तालुक्यातील किल्ल्यांमध्ये लोहगड किल्ल्याच्या पायथ्याच्या गावाचे नाव लोहगडवाडी व तिकोणा किल्ल्याच्या पायथ्याच्या गावाचे नाव तिकोणापेठ असून विसापूर किल्ला यास अपवाद आहे, याच्या पायथ्याच्या गावाचे नाव पाटण आहे .

विसापूर किल्ल्याच्या पायथ्यास पाटणगावात भैरवनाथ मंदिरासमोर बारा मध्ययुगीन दगडी समाध्या ठेवलेल्या आहेत, यातील एका समाधीवर काही मजकूर अंकीत असून तो समाधीच्या दुरावस्थेमूळे अस्पष्ठ झालेला

आहे. त्यावरील अक्षरे वाचता येत नाहीत. पाटणगाव ते विसापूर किल्ल्याचा माथा या मार्गावर नाळेची वाट सोडून डाव्या टेकडीमार्गे किल्ल्यावर चढण करतांना प्राचीन काळातील कातळात खोदलेल्या वीस - बावीस पायऱ्या दोन टप्प्यांत आढळतात, या पायऱ्यांजवळ दरम्यानच्या काळातली पोढी आढळते.

- किल्ल्याचे पाटण प्रवेशद्वार ः

किल्ल्याचे पाटण प्रवेशद्वार पाटणगाव मार्गे किल्ल्याच्या माथ्यावर जाण्याच्या मार्गावर कातळकोरीव हनुमानाच्या उतारावर होते. यास 'कोकण महाद्वार'[5] असे नाव मराठी विश्वकोषात आले असून गॅझेटिअर ऑफ द् बॉम्बे प्रेसिडेन्सी मध्ये यास 'पाटण प्रवेशद्वार' संबोधले गेले आहे.[6] पाटण प्रवेशद्वाराचे भग्नावशेष येथे दिसून येतात. प्रवेशद्वाराच्या पायऱ्या व पाणी वाहून जाण्यासाठीची उंबऱ्याची मोरी पडलेल्या द्वारास निदर्शनास येते. द्वाराच्या आत काही पायऱ्या व देवडयांची जोती दिसून येतात. एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी या भागातील किल्ले (योजनाबद्ध रीतीने) मराठयांना निरूपयोगी ठरावेत यासाठी पाडले.[7] त्याचा हा परिणाम असावा. ब्रिटीश राजसत्तेस पुन्हा मराठी राजवटीने आव्हान द्यावयास नको म्हणुन महाराष्ट्रातील किल्ले पाडण्याचे काम ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केल्याचे दिसून येते.

- पाटण प्रवेशद्वारातील कातळकोरीव हनुमान ः

पाटण प्रवेशद्वारातून आत थोडया चढणीनंतर हनुमानाची कातळकोरीव प्रतीमा कातळयात मोठया आकारात खोदलेली आहे. प्राचीन काळात येथील कातळयास दोन गुंफा कोरलेल्या आढळतात. नंतरच्या काळात या गुंफांच्या समोरील बाजुच्या कट्टयावर हनुमानाची मोठया आकारातील उठाव मुर्ती कोरलेली दिसून येते. खोदलेल्या शिल्पात हनुमान **5** फुट उंच असून संपुर्ण शिल्प **7.6** फुट उंच आहे. या शिल्पाची रूंदी **5** फुट असून संपुर्ण शिल्पास किनारपट्टी केलेली आढळते. येथील शिल्पात हनुमानाचे कपाळ जास्त मोठे दर्शविले

---

[5] मराठी विश्वकोश, खंड ः 16, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1999, पृ. 955.

[6] Gazetteer of the Bombay Presidency, Poona, Vomume XVIII, part III, P.255.

[7] मराठी विश्वकोश, खंड ः 16, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1999, पृ. 955.

असून मागे शेंडी बांधलेली आहे. तसेच शेपुट माथ्यावर वळलेली, हातात भाला घेतलेला, दोन्ही पायांत व दोन्ही हातांत जाड तोडे, कमरपट्टा व पायाखाली पणवती नावाची राक्षसीण दाबलेली दर्शविली आहे. शिल्पाच्या वरच्या माथ्यावर अस्पष्ट झालेले उजव्या बाजुस चंद्र व डाव्या बाजुस सूर्य कोरलेले आहेत. चंद्र व सूर्य अनेक शिल्पांवर कोरण्याची मध्ययुगीन पद्धत असल्याचे दिसून येते. मावळ विभागातील तसेच संपुर्ण महाराष्ट्रातील अनेक विरगळ, सतीगळ, समाधी, शिलालेख, दानपत्रे यांवर चंद्र व सुर्य कोरलेले आढळतात. या प्रतिमा कोरण्यामागचा अर्थ 'यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत् समुज्जृम्भते'[8] असा घेतला जातो. याचा अर्थ चंद्र - सुर्य आकाशात असेपर्यंत या मुर्तीची, शिल्पाची, विराची, सतीची, व्यक्तीची, किल्ल्याची किंवा दिलेल्या दानाची कीर्ती अखंडीत राहो असा होतो. शिल्पात हनुमानाचे मुख पूर्व दिशेस आहे. पावसाळयात पावसाच्या दिशेस हे शिल्प आल्याने चार महीने पावसाच्या माऱ्याखाली हे शिल्प असते. त्यामुळे हनुमानाचे ठळक कोरीव अवयव तसेच शिल्पातील बारकावे अस्पष्ट झालेले आहेत. या शिल्पाची निर्मीती करतेवेळी कातळयात उठावात हनुमान कोरल्या गेला. या दरम्यान कल्पकावर माथ्याच्या बाजूस काहीसे बंधन आलेले दिसून येते. त्यामुळे शिल्पास वरच्या बाजुने अच्छादन ठेवता आले नाही. म्हणून हे हनुमान शिल्प काहीसे अस्पष्ट झालेले निदर्शनास येते.

- प्राचीन काळातील विहाराचे मध्ययुगात कोठारात झालेले रूपांतर :

प्राचीन काळात बौद्ध भिक्षूंसाठी विसापूरच्या पर्वतावर दोन विहार खोदले गेले. यातील एक विहार पाटणगाव मार्गे किल्ल्याच्या माथ्यास येणाऱ्या मार्गावर तर दुसरा विहार लोहगडवाडी मार्गे किल्ल्याच्या माथ्यास येणाऱ्या मार्गावर कोरल्या गेले. दोन्ही विहारांचे मध्ययुगात कोठारांत व सैनिकांच्या राहण्याच्या सोयीसाठी खोल्यांत रूपांतर केले गेले. पाटण प्रवेशद्वाराच्या आत मोठया कातळयास दोन विहार खोदल्या गेले. दोन्ही गुंफा खोदतांना मधोमध असलेला कातळा दोन फुट जाडीच्या आकाराचा ठेवून समोर ओटा व बसण्यास चौथरा कोरलेला दिसून येतो. गुंफांच्या समोरील वऱ्हांडा त्रिकोणी आकाराचा खोदलेला आढळतो. प्राचीन काळाच्या शेवटास व मध्ययुगात पर्वताचा उपयोग लष्करी उपयोगासाठी करतांना येथील गुंफांस दगडी तोडींनी मुख बंदिस्त

[8] श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ, *शिवराय मुद्रा,* **2010**, पृ. **34**.

करण्यात आले. पायरीपासून आत आठ फुट अंतरावर गुंफांचे मुख दगडांत बांधून घेवून बंदिस्त बांधकाम केलेले दिसून येते. तसेच दोन प्रवेशद्वारे येथे बांधलेली आढळतात. मध्ययुगात दोन्ही बंदिस्त केलेल्या गुंफांस धान्य कोठारे बनविण्यात आलेली निदर्शनास येतात. यातील डाव्या द्वाराच्या माथ्याच्या पट्टीवर कमळ कोरलेले असून यास आठ पाकळया आहेत. कमळाचा व्यास **8** इंच ठेवलेला आहे, उजव्या गुंफेच्या द्वारास माथ्यावर गणेशपट्टी कोरलेली आहे. म्हणून स्थानिक भाषेत या कोठारांस कमळ कोठार व गणेश कोठार असे संबोधले जाते. गणेश कोठाराच्या गणेशपट्टीवरील गणेश शिल्प डाव्या सोंडेचे असून हे शिल्प **10** × **7** इंच असे लहान आकारात घडविलेले दिसून येते. धान्य कोठारांत जातांना हनुमान मूर्ती शेजारील **1.2** फुट उंचीच्या वऱ्हांडयातून जाता येते. गणेश कोठारात जमीनीची पातळी सारखी न ठेवता त्याचे आतील आकारमान वाढावे यासाठी मध्ययुगात खाली पाच फुट खोदकाम केलेले निदर्शनास येते. कोठारात उतरण्यासाठी साधारणतः एक फुट उंचीच्या पाच पायऱ्या ठेवलेल्या आहेत. मात्र असे खोदकाम कमळ कोठारात केलेले आढळत नाही. कमळ कोठारात वऱ्हांडयाच्या पातळी प्रमाणे सलग जमीन ठेवलेली दिसून येते. उत्तर मध्ययुगात दोन्ही कोठारांच्या मधील द्वाराच्या बाजूच्या कातळयास भगदाड पडले त्यावेळी विटांचे बांधकाम करून याची डागडुजी करण्यात आली होती. चुना, माती, विटा यांनी ढोबळ बांधकाम करून बंद केल्याचे दिसून येते.

कमळ कोठार **30** × **15** फुट आकाराचे असून याची ऊंची **8.7** फुट आहे. तसेच याचे द्वार **5.5** × **2.5** फुट आकारात आहे. तसेच गणेश कोठार **20** × **15** फुट आकाराचे असून याची ऊंची **13.7** फुट आहे. याचे द्वार **5.3** × **2.5** फुट आकाराचे दगडी तोडींनी बांधून घेण्यात आलेले असल्याचे निदर्शनास येते.[9] कोठाराच्या बाहेरील वऱ्हांडयात दोन्ही बाजूंस दिवा लावण्यासाठी कोनाडे कोरलेले आढळतात. नंतरच्या काळात येथील छतास तत्सम बाबी अडकविण्यासाठी दोन आडकणी कोरलेल्या आढळतात.

- धान्यकोठार ते किल्ल्याच्या माथ्यास जाणाऱ्या पायऱ्या व समोरील स्तंभी पोढी ः

[9] क्षेत्रभेट, विसापूर किल्ला, **8** जुलै **2014**.

एकाच मोठया कातळयात कोठार व पायऱ्या कोरल्या गेलेल्या आढळतात. येथील प्रत्येक पायरी साधारण एक फूट उंचीची असून कोठारापासून किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचण्यास एकूण 42 पायऱ्या आहेत. पायऱ्यांच्या डाव्याबाजूस स्तंभी पोढी दिसून येते. प्राचीन काळात विसापूर किल्ला असलेल्या पर्वतास पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून याच्या कातळकडयांस अनेक पोढी कोरल्या गेलेल्या दिसून येतात. विसापूर किल्ल्याच्या पूर्वबाजूस पायथ्याच्या जवळ पाण्याच्या टाक्यांवर ब्राह्मी लिपीत शिलालेख कोरलेले प्रकाशीत झाले आहे. त्यांचे वाचन शोभना गोखले यांनी केले.[10] ज्या व्यक्तींने पाण्याच्या टाक्यांसाठी दाने दिली त्यांची नावे या टाक्यांवर कोरलेली आढळतात. प्राचीन काळात लेणी खोदतांना साधारणतः दाने घेवून लेणी, विहार, पोढी यांचे खोदकाम करण्याची पद्धत रूढ झालेली निदर्शनास येते. कार्ले, बेडसे, भाजे या लेणींत असलेल्या अनेक पोढींच्या माथ्यावर ब्राह्मी शिलालेख आढळतात. या शिलालेखांत पोढी कोरण्यासाठी ज्या व्यक्तीने दान दिले त्याची नावे लिहीलेली दिसून येतात. विसापूर किल्ल्याच्या पोढींवरील शिलालेख हे पोढीसाठीचे दान लेख असल्याचे दिसून येते. स्थानिक राजसत्ता तसेच व्यापारी लोकांकडून मोठया प्रमाणावर दाने मिळाल्यामुळे या गोष्टिंची निर्मीती शक्य झालेली दिसून येते. त्यामुळे त्या व्यक्तींचे नाव स्मरणात रहावे म्हणून त्यांची नावे अनेक पोढींवर आढळून येतात.

- पाटण प्रवेशद्वारातील व वायव्य बुरूजावरील ओतीव तोफा ः

मावळ तालुक्यातील इतर तोफांपेक्षा मोठया आकाराच्या दोन तोफा विसापूर किल्ल्यावर आढळून येतात. पाटण प्रवेशद्वारातून आत कातळखोदीव पायऱ्या संपतात याठिकाणी 8.2 फुट लांबीची एक ओतीव तोफ ठेवलेली आहे. या तोफेच्या मागच्याबाजुचा अधिष्टानाचा व्यास 1 फुट 4 इंच आहे, तोफेचा गोळा किंवा गोळा आत टाकावयाच्या तोंडाचा व्यास 4.5 इंच आहे. येथील तोफेवर रंजुकीच्या मागील अधिष्टानावर ‘A-1780 N 410. P 2543’ अशी इंग्रजी अक्षरे व आकडे अंकीत आहेत. तोफेचे ओतकाम करत असतांनाच ही अक्षरे तोफेवर उठावदारपणे उमटतील याची दक्षता घेतलेली दिसून येते. येथील तोफ रंजुकीत खिळा ठोकल्याने

[10] शोभना गोखले, *प्राचीन भारतीय इतिहासाची साधने*, टिळक महाराष्ट्र विदयापीठ, 2012, पृ.104-107.

निकामी झालेली आढळून येते. तोफेच्या मागच्याबाजूस असलेल्या अधिष्ठानाच्या मजबूत भागावरचा एक मोठा टवका संशोधनासाठी कापून नेलेला आढळतो. पाटण प्रवेशद्वारातील तोफेसंबंधी इ.स.1896 मध्ये प्रकाशीत झालेल्या 'महाराष्ट्र देशातील किल्ले भाग 1' या पुस्तकात चिंतामण ग.गोगटे यांनी पुढील नोंद केलेली आहे, "सुमारे 10 फुट लांबीच्या तोफेवर इंग्लंडमधील टयुडर नामक राजघराण्याचे राजचिन्ह एक गुलाबाचे फूल, मुकूट Royal Crown व E.R. अशी इंग्रजी मुळाक्षरे आहेत. इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिच्या कारकिर्दित इंग्रजांची जहाजे हिंदुस्थानात व्यापाराकरीता येवू लागली. त्यापैकी एकावर आंग्र्यांनी छापा टाकून ही तोफ हस्तगत केली असावी व आपले यजमान जे पेशवे त्यांस दिली असावी असा अंदाज आहे. सध्या या तोफेच्या कान्यात खिळे मारून ती निकामी करून टाकलेली आहे."[11] चिंतामण गोगटे यांनी केलेल्या तोफेचे वर्णन पाटण प्रवेशद्वारातील तोफेशी मिळतेजुळते नाही. यावरून चिंतामण गोगटे यांनी 1896 साली पुस्तक प्रकाशीत करण्याआधी येथे त्यांनी वर्णन केलेली तोफ होती मात्र ती सध्या चोरीस गेली असे दिसून येते. येथील तोफेचा लोखंडी गोळा 4.100 कि.ग्रॅ.वजनाचा आहे.

वायव्य बुरूजावरील तोफ 9.5 फुट लांब असुन या तोफेच्या अधिष्टानाचा व्यास 1.7 फुट आहे. येथील तोफेचा मागचा टणक भाग जो तोफगोळा सदृष्य होता तो कापून नेलेला निदर्शनास येतो. प्रस्तुत तोफेचा गोळा तसेच गोळा आत घालण्याच्या ठिकाणचा मुखाचा व्यास 5.5 इंच आहे. पाटण प्रवेशद्वाराच्या तोफेवर असलेल्या नोंदीप्रमाणे वायव्य बुरूजावरील तोफेवर कोणतीही नोंद नाही. तसेच अक्षरे आकडे काहीच अंकीत नाही, ही तोफ पाटण प्रवेशद्वारातील तोफेप्रमाणेच ओतीव तोफ आहे. मात्र आकाराने त्या तोफेहून जास्त मोठी व जड आहे. वायव्य बुरूजावर 360 अंशात गोलाकार रीतीने फिरविता येईल व किल्ल्याचे पश्चीम ऊत्तर दिशांचे संरक्षण होईल असे येथील तोफेचे प्रयोजन आहे. म्हणून या तोफेस 'चकी तोफ' असे संबोधले जाते. मध्ययुगात तोफांच्या शोधानंतर तोफांचे अनेक दुष्परिणाम मानवी जिवनावर तसेच स्थापत्यावर दिसून आले. तोफा डागल्यानंतर आवाजाने व हादऱ्याने अनेक दुष्परीणाम झालेले आढळून येतात. यात पाण्याचे टाके निकामी होणे, इमारतीला तडे जाणे, कायमचे बहीरेपण येणे व तोफेचा उलटवार दणका बुरूजावर बसून बुरूज कमकुवत होणे यांसारख्या बाबी टाळण्यासाठी तोफेच्या ठिकाणी तोफेच्या फिरण्याच्या परीघात 8 फुट व्यासाचा

---

[11] मराठी विश्वकोश, खंड : 16, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1999, पृ. 955.

गोलाकारात 4 फुट खोलीचा सलग खड्डा घेतलेला दिसतो. या खड्डयात पाणी सोडून तोफा डागल्या जात असत. त्यामुळे आवाजाची व कंपनांची तीव्रता कमी होत असे. तोफा डागल्यावर होणाऱ्या प्रचंड आवाजाने कान फाटण्याची शक्यता असायची. त्यासाठी कानात कापसाचे बोळे घालुन तोफा डागण्याची पद्धत होती. वायव्य बुरूजाच्या मागेच पाण्याचे लहान आकारातील टाके बनवून घेतलेले निदर्शनास येते. मोठया तोफांसाठी लगतच पाण्याचे हौद आवश्यक असल्याने त्यांची निर्मीती केलेली आढळते. तोफेस वात दिल्यावर गोलंदाज पटकन हौदात बुडया घेत. एकदा तोफेचे भांडे धडाडले की पुन्हा तोफ डागावयाच्या आधी त्यास थंड करावे लागे त्यासाठी तोफेवर पाणी ओतणे गोणपाट ओले करून त्यावर आंथरणे या उपाययोजना कराव्या लागत. या सर्व योजना येथील टाक्यातील पाण्यातूनच केल्या जात असल्याचे दिसून येते. वायव्य बुरूजवरील तोफेचा लोखंडी गोळा 5.100 कि.ग्रॅ.वजनाचा आहे. आजही विसापूर किल्ल्यावर लोखंडी तोफगोळे मोठया संख्येने निदर्शनास येतात. वायव्य बुरूजावरील तोफेस डागण्यासाठी बुरूजास पाच मोठया खिडक्या ठेवलेल्या होत्या. परंतु सद्यस्थितीत वायव्य बुरूज बहुतांशी पडलेला असल्याने येथील स्थापत्य संपुष्ठात आलेले आढळते. बुरूजास मागीलबाजूस लगतच दारूगोळा कोठार होते. विसापूर किल्ल्यावरील उपलब्ध दोन्ही तोफा ओतीव प्रकारातील तोफा आहेत.

- पूर्वेकडील बुरूज, तटबंदी, शरभ, भग्न वीर मूर्ती व शंकराचे मंदिर ः

पाटण प्रवेशद्वाराच्या डाव्याबाजूस 796 मीटर (2613 फुट) अंतरावर पूर्वेकडील भातराशीच्या डोंगराच्या बाजूला किल्ल्यावरील आकाराने सर्वात मोठा व उंची असलेला बुरूज आहे. 14 फूट ऊंची व 40 फूट व्यास असलेला हा बुरूज किल्ल्यावरील सर्व बुरूजांमध्ये उंच व बलाढय असल्याचे दिसून येते. प्रस्तुत बुरूजाची बांधणी कलात्मक केलेली असून बुरूजाचा गोलाकार परीघ भंग करून चार पायऱ्या कोरलेल्या आत बांधलेल्या आहेत. बुरूजाच्या भंग केलेल्या प्रथम पायरीपर्यंत जाण्यासाठी बुरूजाबाहेरील साधारण 10 पायऱ्या ठेवलेल्या आढळतात. परंतु कालौघात बाहेरील दहा पायऱ्या भंग झालेल्या आढळून येतात. प्रस्तुत बुरूज बांधतांना तटबंदीत न बांधता कातळयाच्या टोकास तटबंदी बांधुन घेवुन आतमध्ये 5 फुट अंतरावर मोकळा उंच बुरूज येथे बांधलेला आहे, याचे प्रयोजन परकीय सैन्याकडून भातराशीच्या डोंगरावरून जर तोफांचा मारा मोठया प्रमाणात

केला गेला व त्याबाजूची तटबंदी व बुरूज भंगला तरीही या उंच बुरूजावरून समोर मारा करण्यासाठी जागा असावी तसेच प्रस्तुत बुरूजाच्या संरक्षणाकरीता म्हणून त्यासमोरील तटबंदीचा वापर व्हावा म्हणून हा बुरूज तटबंदी सोडून **5** फुट आत बांधून घेतलेला निदर्शनास येतो. या बुरूजावरून डावीकडे पाटण प्रवेशद्वारापर्यंत व उजवीकडे पुर्वबाजूची संपूर्ण तटबंदी यावर तोफेच्या माराचा टप्पा ठेवता येतो, कोकण प्रवेशद्वारापासून ई शान्येच्या बुरूजापर्यंत येतांना डावीकडे काही ठिकाणी सलग तर काही ठिकाणी खंडीत तटबंदी दिसून येते. या तटबंदीस दोन ठिकाणी सुस्थितीतील **1** □**1** फुट आकाराचे शरभ□दगडांत कोरलेले काल्पनीक प्राणी□आहेत. ई शान्य बुरूजाच्या मार्गावर एका चौथऱ्यावर कोनाडयात हातात ढाल तलवार घेतलेली एक फुटांची भग्नावस्थेतील वीराची मूर्ती ठेवलेली आहे. गैरसमजुतीने किंवा श्रद्धेने ग्रामस्थांकडून यास हनुमान देवता मानले गेलेले दिसून येते परंतु एखाद्या युद्ध प्रसंगी स्वतःचा जिव धोक्यात घालून किल्ल्याचे रक्षण येथील विराकडून झालेले असावे व त्याच्या या निस्वार्थी बलीदानाची आठवण कायम रहावी यासाठी येथे विराची मुर्ती बसविली गेली असण्याचा संभव आहे. या चौथऱ्याच्या शेजारी टेकडीस सुरूवात होते. मध्ययुगात टेकडीच्या प्रारंभीच एका उंचवटयावर जागा सपाट करून शिवमंदीर बांधले गेलेले दिसून येते. येथील पिंडी व शंकराचे मंदिर तसेच दीपमाळ व दगडी भग्नावशेष हे मध्ययुगातील असल्याचे दिसून येते. शिवकाळात मराठयांकडे असलेल्या बहुतांशी किल्ल्यांवर व पायथ्याच्या गावांत शिवमंदीर, हनुमान व गणपती तसेच भैरवनाथाची मंदिरे आढळून येतात. मावळ तालुक्यातील बहुतांशी किल्ल्यांवर प्रामुख्याने शिवमंदिरे असून मध्ययुगाप्रमाणे आजही या सर्व मंदिरांत महाशिवरात्रीस मोठया यात्रांचे आयोजन स्थानिक ग्रामस्थांमार्फत होतांना दिसून येते.

- टेकडीतील दाट झाडीत लपविलेला किल्लेदाराचा वाडा ः

किल्लेदाराच्या वाडयाची इमारत किल्ल्यावरील मधोमध असलेल्या टेकडीत दाट जंगलात लपविल्या सारखी बांधलेली असून येथील वाडा सहज दिसू नये तसेच येथेपर्यंत सहजगत्या पोहोचता येवू नये अशा ठिकाणी वाडयाची बांधणी केलेली आढळून येते. वाडयासमोर पाण्याच्या सोयीसाठी मोठा हौद दगडी तोडींत बांधून घेतलेला दिसून येतो. प्रस्तुत वाडा प्रशस्त बांधणीचा व जमीनीपासून चार फुट उंची घेवून बांधणी केलेला दिसून येते. वाडयाच्या आतमध्ये शौचकुपांची सोय चार ठिकाणी समोरासमोर केलेली होती. मध्ययुगात छतास

चुनागच्ची करण्याची पद्धत होती ती येथे दिसते. वाडयाच्या बांधणीवेळी चहुबाजुंनी संरक्षक भिंत बांधली गेली होती व छत 15 फुट पेक्षा जास्त उंचीचे घेवून दगडी तोडींमध्ये भिंतींचे काम केलेले होते. वाडयाचे बांधकाम करणाऱ्या कल्पकाचे नाव किंवा शिलालेख येथे दिसून येत नाही. परंतु ज्या कल्पकाने हे काम केले होते त्याने राजवाडयाचे आयुर्मान व सौंदर्य वाढविण्यासाठी भविष्यातील संभाव्य धोके टाळण्याचा योग्य तो प्रयत्न केला होता असे दिसून येते. उदाहरणार्थ ः टेकडीच्या उतारावर वाडा असल्याने भुस्खलन होण्याचा येथे धोका होता त्यामुळे वाडयाची टेकडीच्या बाजुची भिंत जाडसर व उंच बांधून हा धोका टाळला गेलेला दिसून येतो. भुकंपाचा धोका लक्षात घेवुन चुनागच्चीस अधांतरी न ठेवता अनेक ठिकाणी मधोमध स्तंभांचा आधार देवून बळकटपणा दिलेला दिसून येतो तसेच शत्रुसैन्यापासून वाडयाचे संरक्षण करण्यासाठी वाडा बांधण्याची जागा विसापूर किल्ल्याच्या मधोमध निवडून शत्रुसैन्याकडून कोणताही उपसर्ग वाडयापर्यंत पोहोचणार नाही याची दक्षता घेतलेली दिसते. विंचु – साप वगैरे प्राण्यांचा शिरकाव वाडयात होवू नये याकरीता पाया उंच घेवून आतमधील बाजूने वाडयास चुन्याचा गिलावा केलेला दिसून येतो. याचबरोबर पिण्याच्या व वापराच्या पाण्याच्या सोयी वाडयाच्या आत व बाहेरीलबाजुने मोठा हौद करून केलेली दिसून येते. वाडयाच्या उपलब्ध जोत्यांवरून मध्ययुगीन खोल्यांचे आकारमान कळून येते. दिवा लावणीसाठी चुण्याच्या गिलाव्यात तयार केलेले नक्षिदार कोनाडे मोठया संख्येने दिसून येतात. आज्ञापत्र या रामचंद्रपंत अमात्य लिखीत ग्रंथात राजाचे निवासाचे स्थान कसे असावे याचे वर्णन आले आहे त्याप्रमाणे विसापूर किल्ल्यावरील वाडयाचे बांधकाम केलेले दिसून येते.

- किल्ल्यावरील पोढी व टाके तसेच तलाव ः

पुर्वेकडील बुरूजाच्या बाजुस वाटेत सैनिकांचे राहण्याचे वाडे व कामकाजाच्या कचेऱ्या तसेच पाण्याचे टाके आणि दोन तलाव आहेत. विसापूर किल्ल्यावर पाण्याचे तीन मोठया आकारातील तलाव आहेत यातील कोकण प्रवेशद्वाराजवळील पहील्या तलावाचा परीघ **218** मीटर(**714** फुट)आहे, तसेच ईशान्य बाजूस असलेल्या बुरूजाजवळील तलावाचा परीघ **287** मीटर(**941** फुट)आहे व अग्नेय बाजूकडील तलावाचा परीघ **171** मीटर(**562** फुट)आहे.

विसापूर किल्ल्यास तटबंदीच्या शेजारी टाक्यांची संख्या मोठया प्रमाणावर दिसते. तसेच किल्ल्याच्या मधोमध असलेल्या मोठया टेकडीस एकही टाके उपलब्ध नाही. मध्ययुगात किल्ल्याचे बांधकाम करतांना काही टन दगड गरजेचा असे व किल्ल्याच्या पायथ्यापासून दगड वर चढविणे त्यावेळच्या काळात तंत्रज्ञानाच्या अभावामुळे अवघड काम होते. तसेच मध्ययुगातील रूढ पद्धतीप्रमाणे किल्ल्यावरच टाके खणून त्यापासून मिळणारा दगड हा तटबंदीसाठी वापरला जात होता. कठीणपणा आवश्यक असल्याने दगडांचा वापर मोठया प्रमाणावर करणे दरम्यानच्या काळात गरजेचे होते. रस्त्यांच्या टिकाऊपणासाठीही दगड वापरण्याची पद्धत होती. दगडात रस्ते तयार केल्याचे आजही अनेक राजसत्तांच्या राजधानी किंवा महत्वाच्या व्यापारी पेठांच्या ठिकाणी निदर्शनास येते. फारच तुरळक किल्ल्यांच्या बाबत पायथ्यापासून दगड वर माथ्यापर्यंत वाहून नेलेला आढळतो. उदाहरणार्थ : बाजी सर्जेराव कान्होजी जेधे याच्या पत्रातून उत्तरेतील रजपूत लोकांस बाजीने धमकी देवून राजगडी नेवून धोंडे वहायला लावील असे सांगीतले आहे. यावरून राजगड किल्ल्यास कैद्यांना धोंडे वाहण्याची शिक्षा असल्याचे समोर येते. राजगड किल्ल्यावरील तीन माची तसेच बालेकिल्ला यांस लागणारा दगड माथ्यावर पुरेसा नसल्याने किल्ल्याच्या पायथ्यापासून वर पर्यंत दगड वहावा लागल्याचे निदर्शनास येते आहे. मात्र विसापूर किल्ल्यावर तटबंदीस लागणारा सर्वच दगड टाके खणून त्यातून मिळविलेला निदर्शनास येतो. त्यात विशेष असे की किल्ल्यावरही दगड वाहण्याचा वेळ व श्रम वाचावा या उद्देशाने प्रत्येक ठिकाणची तटबंदी बांधण्या आधी जवळच कातळ खोदीव टाक्यांची निर्मिती केली गेल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ : पश्चिम तटबंदीला किल्ल्यावरील इतर बांधकामांपेक्षा जास्त प्रमाणात दगड वापरलेला दिसून येतो. पश्चिम तटबंदीस बांधण्याआधी पाया घेतांना खोदकामात मिळालेला दगड पुरेसा नसल्याने तटबंदीच्या समोरील बाजूस दोन टप्प्यांत टाक्यांचा मोठा समूह कोरून दगड मिळविल्याचे दिसून येते.

विसापूर किल्ल्यावर ईशान्य दिशेस **24** टाके असून अग्नेय दिशेस **12** व नैऋत्य दिशेस **19** टाके तसेच वायव्य दिशेस **28** टाके आहेत. विसापूर किल्ल्यावर एकुण **83** टाके प्रस्तुत संशोधनातून आढळले आहेत. किल्ल्यावर मोठया प्रमाणात टाक्यांची संख्या असल्याने उन्हाळयाच्या दिवसांतही किल्ल्यावर पाण्याचे दुर्भिक्ष नसते. पाण्याच्या टाक्यांची संख्या व मोठया आकारातील तीन तलावांमुळे मध्ययुगात विसापूर किल्ल्यावर मोठया संख्येने शिबंदी राहण्यास असावी असे दिसून येते.

- विसापूर किल्ल्यास असलेला बालेकिल्ला एक चुकीचा तर्क ः

विसापूर किल्ल्याच्या मधोमध एक मोठी टेकडी दोन टप्प्यांत दिसून येते. दुर्गशास्त्रात किल्ल्यामधील उपकिल्ला किंवा किल्ल्यामधील टेकडीस केलेल्या तटबंदीस बालेकिल्ला संबोधले जाते. मात्र विसापूर किल्ल्यात मधोमध असलेली ही टेकडी बालेकिल्ला नसून फक्त टेकडी असल्याचे दिसून येते. नाममात्र दगडी व लोखंडी अवशेष येथील टेकडीत आजवर सापडलेले नसून प्राचीन व मध्ययुगीन काळात येथे बालेकिल्ला नव्हता असे दिसून येते. पावसाळयात टेकाडीत पाण्याचा संचय होतो त्यामुळे अनेक फळझाडे व फुलझाडे येथे बारा महिने बहरतात, या टेकडीचा परीघ **1.1** कि.मी. (**0.7** मैल) आहे.[12]

- ईशान्य दिशेचा भातराशी डोंगर ते दक्षिण प्रवेशद्वार ः

ईशान्य बुरूज ते दक्षीण प्रवेशद्वार मार्गावर तटबंदीलगत पाण्याचे अनेक टाके व एक तलाव आहे. ज्याप्रकारे पश्चिम तटबंदीच्या निर्माणासाठी शेजारी अनेक टाके खणले गेले त्याचप्रकारे येथील पुर्व बाजुच्या तटबंदीसाठी शेजारी अनेक टाके कातळात खणले गेलेले निदर्शनास येतात. येथील एका टाक्याशेजारी पाणी साठविण्यासाठी एक दगडी भांडे टाक्याशेजारी ठेवलेले आहे. ईशान्य बुरूज ते दक्षिण प्रवेशद्वार (लोहगडवाडीहून प्रवेश) पर्यंत गरजेनुसार तटबंदी केलेली आढळते. या बाजुने नैसर्गीक उंच कातळकडा असल्याने संरक्षणासाठी सलग तटबंदी न करता गरजेनुसार तटबंदी व बुरूज बांधलेले आढळून येतात. याबाजुने अगदी थोडया प्रमाणात तटबंदी बांधलेली दिसून येते. मात्र दक्षिण द्वाराच्या शेजारी चढ उताराच्या जमीनीवर तटबंदी बांधतांना कल्पकाने एकसलग तटबंदी बांधली त्यामुळे येथील तटबंदीच्या आतमधील जमिनीला काही ठिकाणी खोलगट व काही ठिकाणी चढण मिळालेला भाग दिसून येतो. तटबंदीची सरळ बांधणी करतांना खोली असलेल्या ठिकाणी आतमधील बाजूने तटबंदीचे फार ऊंच निर्माण झालेले दिसून येते. त्यामुळे अशा तटबंदीवरून पहारेकरी सैन्य पडून ईजा होवू नये याकरीता दोन इंच जाडीची पहार दर **10** फुटांवर ठोकून दोहोंमध्ये साखळया लावून

[12] विकीमॅपिया वेबसाईट, सॅटेलाईट द्वारे मेजरमेंट फंक्शन मधून घेतलेले मोजमाप.

तटाधीकार्यांना संरक्षणाची व्यवस्था केलेली दिसून येते, पहारीची जाडी दोन इंच व ऊंची 3 फुट असण्याचा संभव आहे. लोहगडवाडी मार्गे गोमुख खिंडीतून नाळेच्या रस्त्याने दक्षिण प्रवेशद्वारात जाण्याची वाट आहे. येथील प्रवेशद्वार पूर्णपणे पडलेले असूनही उपलब्ध किमान अवशेषांवरून गतकाळातील भव्य प्रवेशद्वाराची रचना दिसून येते. येथील प्रवेशद्वाराच्या 25 फुट पुर्वेस खालच्या एका टप्प्यावर एक पोढी आहे.

- दक्षिण प्रवेशद्वारातील पोढी व प्रस्तुत प्रबंधात प्रथम वाचलेला अप्रकाशीत ब्राह्मी शिलालेख ः

दक्षिण प्रवेशद्वाराचा तटबंदीतून सुटावलेला बुरूज खाली निसटूनही दुभंगलेला नाही. तटबंदीतून निसटुन हा बुरूज खाली एका टप्प्यावर सरळ उभा राहील्याचे दिसून येते. याची ऊंची 12 फुट व व्यास 9 फुट आहे. दक्षिण प्रवेशद्वाराजवळच्या कातळकडयात एक पोढी आहे. 15 × 9 फुट आकार व 3.6 फुट खोल ही पोढी असून माथ्यावर ब्राह्मी लिपीतील दोन ओळींचा शिलालेख कोरलेला निदर्शनास येतो. शिलालेखास वरच्याबाजूस अच्छादन नसल्याने यातील अक्षरे अस्पष्ट झाल्याचे आढळते. शोभना गोखले यांनी पाटण गावच्या जवळील शिलालेख वाचलेले असून किल्ल्याच्या माथ्यावरील प्रस्तुत शिलालेखाचे वाचन झालेले नाही. या शिलालेखात दोन ओळी असून त्यातील दुसरी ओळ जास्त अस्पष्ट झाल्यामुळे वाचता येणे शक्य झालेले नाही. मात्र प्रथम ओळ वाचता येत असून याच आशयाचा एक शिलालेख भाजे येथील लेणीमध्ये गुंफा क्रमांक 19 च्या पोढीवर दोन ओळींत कोरलेला दिसून येतो. भाजेच्या लेणीतील दोन ओळींच्या शिलालेखाचे वाचन झालेले आहे. विसापूर किल्ल्यावरील पोढीच्या माथ्यावर असलेल्या शिलालेखातील प्रथम ओळ भाजेच्या लेणीतील शिलालेखाशी मिळती जुळती आहे. दोन्ही शिलालेखांचा आकार व अक्षरांची शैली एकसारखी असून भाजे लेणीतील व विसापूरच्या पोढीवरील पहिली ओळ ही सारखीच माहिती देत आहे. भाजेच्या शिलालेखातील दुसरी ओळ वाचता येत असून यावरून विसापूरच्या शिलालेखातील दुसऱ्या ओळीचा संदर्भ लागत आहे. सारांश एकाच व्यक्तीने दोन दाने दिल्याने त्याचे नाव दोन्ही पोढींच्या माथ्यावर कोरण्यात आलेले निदर्शनास येते. पोढीसाठी दानं दिल्यावर दान देणाऱ्या व्यक्तीचे नाव पोढीच्या कातळयावर कोरण्याची प्राचीन पद्धत असल्याचे इतर शिलालेखांवरून दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत प्रबंधात विसापूर किल्ल्यावरील पोढीच्या माथ्यावर कोरलेल्या शिलालेखाचे वाचन प्रथमच करण्यात आलेले आहे. या शिलालेखाचा काळ इसवी सन चे 3 रे शतक असून

याची लिपी ब्राह्मी व भाषा प्राकृत आहे. शिलालेखाचे वाचन ः महारठीस कोसिकीपुतस विण्हुदतस देयधम पोढी. भाषांतर ः महारठी कोसिकीपुत विण्हुदत याने धर्मासाठी दिलेलं टाकं. सारांश विण्हुदत याने धर्मासाठी दोन टाक्यांचे दान दिले त्यातील एक भाजेच्या गुंफा क्रमांक 19 मधील पोढीसाठी व दुसरे विसापूर किल्ल्यावरील पोढीसाठी. यातील भाजे लेणीचा मार्ग व्यापारी मार्ग असल्याने भाजे लेणीस दानात दिलेली पोढी व्यापारी वर्गा साठी होती. मात्र विसापूर किल्ल्यावर दिलेले दान हे व्यापारी मार्गावरील नसल्याने किंवा व्यापारी एवढया उंच चढून जाण्याचे कारण नसल्यामुळे विसापूर किल्ल्याच्या माथ्यावरील पोढीसाठी दिलेले दान हे फक्त बौध्दभिक्षूंसाठी दिलेले दान असल्याचे दिसून येते. प्राचीन व्यापारी मार्ग तळकोकणातून पिंपरी घाटातून सुधागड मार्गे भाजे लेणीस व येथून विसापूरच्या पर्वतावरून बेडसे लेणीस किंवा लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख लेणीतून बेडसे लेणीस जात असल्याचे दिसून येते. यातील व्यापारी मार्ग विसापूरचा पर्वत चढून नव्हता त्यामुळे लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख लेणी मार्गे बेडसे येथे जाणारा मार्ग व्यापारी मार्ग म्हणून प्रसिध्द पावला. मात्र भाजेमार्गे वरच्या कातळयाच्या बाजूने विसापूरच्या पर्वतावरून बेडसे येथे जाणारा मार्ग खडतर असून हा बौध्दभिक्षूंसाठीचा मार्ग म्हणून दिसून येतो. या मार्गावर विहार व पोढी खोदल्या गेल्या. यातील एक पोढी विण्हुदत याने दान दिल्याचे प्रस्तुत प्रबंधातून नव्याने समोर येत आहे.

येथील पोढीच्या कातळयावर ऊजव्याबाजुस 6 इंच लांबीची शाळुंखा(लिंगविरहीत शिवपिंडी) कोरलेली आहे. आकाराने लहान असलेली शाळुंखा मावळ तालुक्यातील सर्वच पोढींवर व प्राचीन टाक्यांवर कोरलेली दिसून येते. तसेच महाराष्ट्रातील बहुतांशी किल्ल्यांच्या टाक्यांवर व प्राचीन काळातील बौध्दभिक्षूंसाठी व व्यापाऱ्यांसाठी खोदलेल्या पोढींवर अशा लिंगविरहीत शिवपींडी दिसून येतात. यांचे कोरीव काम ओबड धोबड असल्याने येथील पिंडी अकुशल व्यक्तींकडून कोरलेल्या दिसून येतात. शैव समाजाच्या प्रगतीच्या काळात पाण्याच्या टाक्यांजवळ अशा पिंडी कोरलेल्या आढळतात. पोढी खोदतांना किंवा स्तंभी टाके खोदतांना या पिंडींचे कोरण्याचे काम झालेले नसल्याचे दिसून येते. हे नंतरच्या काळात ओबडधोबड पिंडींचे कोरीव काम केलेले आढळून येते. शंकराचा भक्त म्हणजे शैवपंथी लोक अनेक जाती धर्मात होते. त्यातील गुराखी, धनगर, सैनीक यांतही शैवपंथी लोक होते. त्यांनीही पाण्याच्या ठिकाणी पिंडी कोरण्याचे काम केलेले असण्याचा संभव आहे. बौध्दभिक्षूंच्या नंतर शैवपंथात मोठया प्रमाणात वाढ झाली. यातून शैवपंथ प्रगतीच्या मार्गावर असतांना अनेक ठिकाणी पिंडींचे निर्माण केले गेलेले आढळून आले आहे. दरम्यानच्या काळात शैवपंथीयांकडून बहुतांशी

पोढी व प्राचीन काळातील किल्ल्यांच्या पाण्याच्या टाक्यांवर अशा स्वरूपाच्या शाळुंखा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कोरल्या गेलेल्या दिसून येतात. मावळ तालुक्याच्या बाबत लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख कातळयात असलेल्या लेणीतील उत्तर बाजुच्या शेवटच्या स्तंभी टाक्यावर शाळुंखा कोरल्या गेलेली आढळून येते. तसेच तुंग किल्ल्याच्या माथ्यावरील पोढीवर डाव्याबाजूच्या कातळयास शाळुंखा कोरलेली निदर्शनास आली आहे. नवलाखऊंब्रे गावच्या मागे नवलाख्या डोंगर आहे. या डोंगराच्या पायथ्याशी नवलाखउंब्रेच्या विरूद्ध बाजूस असलेल्या करंजविहीरगाव येथील माथ्याच्या डोंगरास चक्रेश्वर देवस्थान पर्वताच्या कातळयात कोरलेले आहे. यात मोठया पिंडीशेजारी अशीच लिंगविरहीत लहान आकाराची शाळुंखा कोरलेली आढळते. महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांवरील प्राचीन टाके किंवा लहान आकारातील पोढी यांच्या कातळयास अशा लहान आकारातील शाळुंखा आढळून येतात. ऊदाहरणार्थ ः भोरगीरीचा किल्ला, ता.खेड, जि.पुणे. सारांश पोढींची निर्मीती करतांना बौध्द भिक्षूंच्या तसेच व्यापाऱ्यांच्या पाण्याची सोय करणे हा एकमेव उद्देश होता. तसेच मध्ययुगात सैन्याच्या पाण्याची व्यवस्था करणे हा स्तंभी टाक्या कोरण्यामागे उद्देश होता. मात्र नंतरच्या काळात शैवपंथाचे वर्चस्व निर्माण झाल्यानंतर सांप्रदायीकतेचे वर्चस्व दर्शविण्यासाठी अनेक ठिकाणी अशा स्वरूपाची अतिक्रमणे केलेली दिसून येतात. उदाहरणार्थ ः मावळ तालुक्यातील घोरावडेश्वर म्हणजेच शेलारवाडीची लेणी याठिकाणी स्तुप व चैत्यगृह होते. मात्र शैवपंथाच्या वर्चस्वाच्या काळात येथे स्तुप फोडून शिवपिंडी बसविल्या गेलेली निदर्श नास येते. तसेच पोढी व मध्ययुगापर्यंत निर्माण केल्या गेलेल्या पाण्याच्या टाक्यांवरही लिंगविरहीत शिवपिंडी या वर्चस्व सिध्द करण्याच्या म्हणजेच पंथाच्या अतिक्रमणाच्या मानसिकतेतून कोरल्या गेलेल्या दिसून येतात.

गोमुखखिंडीत विसापूर किल्ल्याच्या नैऋत्य बुरूजाच्या बाजुस घोडयाचे एक सुस्थीतील शिल्प होते ते सध्या मालेवाडी येथील मार्गावर गावाच्या जवळ जंगलात नेवून डाव्या टेकाडावर सिमेंटच्या चौथऱ्यावर स्थापिलेले दिसून येते. कल्पकाने हे शिल्प अखंड दगडात कोरलेले असून घोडयाच्या अंगावर झुल व खोगीरही कोरलेले आहे. अश्वशिल्पाचे कोरीवकाम गावातच झालेले असण्याचा संभव आहे. घोडा युध्दात किंवा नैसर्गिकरीत्या मरण पावल्यावर त्याला पुरले जात असे. घोडयाला उभे पुरल्याचेही जोर्वे संस्कृतीत आढळलेले आहे. घोडयाच्या स्मृतीप्रित्यर्थ त्या जागेवर किंवा ग्रामदैवताच्या मंदिरात दगडी घोडा अर्पण करण्याची प्रथा दिसून येते. मध्ययुगात अश्वशिल्प लाकडात किंवा दगडात बनवून खंडोबाला व भैरवनाथाला अर्पण करावयाची प्रथा अनेक ठिकाणी असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ ः तळेगाव दाभाडे मधील डोळसनाथ मंदिर येथे दगडी घोडे वाहिलेले

दिसून येतात. तसेच लोहगडवाडीतील टहाळदेव असे संबोधल्या जाणाऱ्या ठिकाणी दगडी घोडयांच्या भग्न मुर्ती वाहिलेल्या दिसून येतात. यावरून लोहगडवाडी तसेच लोहगड व विसापूर किल्ले यांच्या परिघात लष्कर मोठया प्रमाणावर रहात होते व लष्करातील घोडयांच्या मृत्यूनंतर येथे अश्वशिल्प बनवून ती ग्रामदैवतास व टहाळदेव संबोधल्या जाणाऱ्या चौथऱ्यावर मोठया प्रमाणात अर्पण केली जात होती असे दिसून येतात.

दक्षिण प्रवेशद्वाराजवळ मोठया आकारातील एक लेणी असून मध्ययुगात लेणीचा उपयोग लष्करी सोयीसाठी व सैनिकी विश्रामासाठी दोन प्रवेशद्वारे ठेवुन समोरील भाग बंदिस्त केलेला दिसून येतो. **4.2** × **2.9** फुट आकाराची दोन प्रवेशद्वारे येथील लेणीस दिसून येतात. प्रस्तुत लेणी किंवा मध्ययुगीन सैनिकी विश्रामगृह सध्या गाळाने भरलेली असून आतमधील भाग पाहता येत नाही.

- विसापूर किल्ल्यास वापरलेला दगड व त्याचा दर्जा ः

बाहेरून दगड आयात करून त्या दगडात तटबंदी व बुरूज बांधले तर त्यास कठिणता येणे अवघड असते. प्राचीन काळापासून स्थानिक राजसत्तांनी स्थानिक साधन संपत्तीचा उपयोग करून किल्ले बांधलेले आढळून येतात. त्यामुळे आज शेकडो वर्षानंतरही किल्ले टिकून असलेले दिसून येते. विसापूर किल्ल्याचे बांधकाम स्थानिक साधन संपत्तीमधून केले गेल्याने त्याच्या आयुर्मानाचे वर्धन करण्याची योजना दरम्यानच्या राजसत्तेकडे असल्याचे दिसून येते. विसापूर किल्ल्याची तटबंदी व इतर इमारती बांधतांना टाके खणून दगड बाहेर काढलेला दिसून येतो. तसेच हा कठिण बेसॉल्ट असल्याने यात केलेले बांधकाम चिरकाल टिकणारे ठरले. बेसॉल्ट दगडाची स्पेसीफीक ग्रॅव्हीटी **1.7** आहे, सहयाद्रीतील इतर दगडांच्या प्रकारात बेसॉल्ट कणखर ठरतो. या दगडाची कणखरता मध्ययुगात राजसत्तांस माहिती झालेली असल्याने किल्ल्यांच्या बांधणीत तसेच वाडे व दारूगोळा कोठारे, कचेऱ्या या सर्व वास्तुंच्या बांधणीत बेसॉल्ट दगड मोठया प्रमाणावर वापरलेला दिसून येतो. म्हणून महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांवर आजही प्राचीन व मध्ययुगात बांधलेली तटबंदी बऱ्या स्थितीत दिसून येते. मात्र त्यांवर घातलेली चुनागच्ची बहुतांशी ठिकानी पडलेली आढळून येते.

- किल्ल्याची सलग अखंडीत पश्चीम तटबंदी ः

किल्ल्यावरील नैऋत्येच्या बुरूजापासून बांधण्यास सुरूवात केलेली तटबंदी वायव्य दिशेपर्यंत सरळ रेषेमध्ये दरम्यानच्या कल्पकांनी बांधलेली आढळून येते. सलग तटबंदी फार कमी किल्ल्यांवर शिल्लक राहिलेल्या दिसून येतात. विसापूर किल्ल्याची ही सलग तटबंदी साधारण 1 कि.मी. आहे. येथे तटबंदीची फांजी□प्रहारेकऱ्यांना तटावर फिरण्यासाठीची जागा□8 फुट रूंद घेतलेली दिसून येते. या फांजीवरून एक गाडीबैल सहज फिरविता येतील एवढी जागा ठेवलेली दिसून येते. येथील तटाची चर्या□प्रहारेकऱ्यांना आतमधील बाजुने शत्रुसैन्यावर मारा करता येईल अशा आडोसा देणाऱ्या त्रिकोणी, पाकळी, अंडाकार आकाराच्या संरक्षक भिंती□5 ते 7 फुट ऊंच बांधलेल्या आढळतात. अनेक जंग्या□शत्रुसैन्यावर बाण, बंदुकांचा मारा, जंबुऱ्यांचा मारा करण्यासाठी चर्येस व तटबंदीस ठेवलेले लहान □मोठया आकाराचे आरपार छिद्र□आहेत. विसापूर किल्ल्याच्या पश्चिम तटबंदीचे वैशिष्टय सलगता व अखंडीतपणा हे आहे. मोठया आकाराच्या दगडी तोडींनी सरळ तटबंदी बांधणे शक्य असतांनाही तोफांचा मारा करण्यासाठी व तटबंदीस मजबूती येण्यासाठी कल्पकाने अनेक ठिकाणी बुरूज बांधलेले दिसून येतात. येथील बुरूजांचा व्यास साधारणपणे 16 फुट आहे. पश्चिमेच्या येथील बुरूजावरून लोहगड किल्ल्याच्या ईशान्य बुरूजांपर्यंत तोफेचा मारा करता येतो व लोहगड किल्ल्याच्या उत्तर तटबंदीचे संरक्षण करता येते. तसेच विसापूर किल्ल्याची पश्चिम तटबंदी तोफेच्या माऱ्याच्या टप्प्यात ठेवता येत असल्याने किल्ल्याचे पश्चिम दिशेचे संरक्षण करता येते. किल्ल्यावरील चुण्याच्या घाण्याशेजारी तटबंदीस असलेला बुरूज 16 फुट व्यासाचा असून बुरूजाच्या खाली बांधकाम करतांनाच खोली ठेवलेली आढळते. ही खोली 10 □10 फुट आकाराची असून द्वार 4.7 □2.1 फुट आकाराचे आहे. बुरूज बांधतांना त्याखाली खोली बनविणे ही कल्पकाची विशेष निर्मीती होती असे दिसून येते. तसेच या दुर्मिळ रचनेवरून असेच बुरूजाच्या खाली खोली बनविण्याचे काम सेनापती दाभाडेंच्या इंदोरी किल्ल्यातही केलेले दिसून येते. पश्चिम तटबंदीस 7/8 शौचकुपे बांधलेली दिसून येतात. शौचकुपातील मैलाचा निचरा होण्यासाठी सर्व शौचकुपांची बांधणी किल्ल्यावरील वाहत्या पाण्याच्या उताराच्या ठिकाणी केलेली दिसून येते.

- मध्ययुगातील अद्ययावत शौचकूप ः

भारतात प्राचीन काळापासून अनेक नाविन्यपुर्ण शोध लागले. यात पुरातत्वखात्याच्या उत्खननात हडप्पा संस्कृती समोर आलेली आढळते. शौचकूपाच्या बाबतीतही कमोड शौचकूप परकीय शोध असल्याचा व ब्रिटीशांकडून भारताला माहित झाल्याचा ग्रह आहे. परंतु विसापूर किल्ल्याच्या पश्चिम तटवंदीतील एका शौचकूपाची पाहनी करता हा ग्रह दूर होतो. येथील कमोडच्या शौचकूपाचे द्वार 6.9 □2 फुट असून हे दगडी भांडे 2 □2 फुट आहे. याच्या छिद्राचा व्यास 9 इंच असून मध्ययुगात येथे अद्ययावत शौचकूप असल्याचा हा पुरावा आहे. येथील शौचकूपाच्या वायव्य बाजूस आणिक एक आकाराने मोठे असे शौचकूप आहे. याचे द्वार 6 □ 3.9 फुट असून छिद्राचा व्यास 1 फुट आहे. पश्चीम तटवंदीला असलेल्या सर्वच शौचकूपांच्या मलनिस्सारणासाठी या शौचकुपांची बांधणी पाणी वाहण्याच्या नैसर्गीक स्त्रोतांवर केलेली आढळते.

- विसापूर किल्ल्यावरील वनस्पती व प्राणीशास्त्र ः

विसापूर किल्ल्याच्या परीघात व किल्ल्यावरही दाट जंगल आहे. येथील जंगलात अनेक औषधी वनस्पती आढळून येतात, मावळ तालुक्यातील किंवा किल्ल्याच्या परिघातील दुभती जनावरे कोडगी झाल्यावर त्यांस विसापूर किल्ल्यावर पिटाळून लावल्या जाते व चार ते पाच महिन्यांनी त्यांना पुन्हा आणून गोठयात बांधले जाते. यादरम्यान विसापूर किल्ल्यावरील औषधी वनस्पती खावून ही जनावरे दुभती बनविण्याची पद्धत येथील परिघात अनेक वर्षांपासून असल्याचे आढळते. येथे फळझाडे मोठया प्रमाणावर असून यात आळू, आंबे, जांभळे, करवंदे, तोरणे या निरनिराळया प्रकारची फळे त्या□या हंगामात बहरलेली दिसतात. या किल्ल्यावर आढळणारी विविध फळे मावळ तालुक्यातील इतर एकाही किल्ल्यावर आढळून येत नाही, ही फळझाडे बारमाही सदाहरीत असण्याचे कारण विसापूर किल्ल्यावर मधोमध असलेली टेकडी व या टेकाडीत साठणारे पावसाचे पाणी होय. त्यामुळे येथे फळझाडे बारमाही बहरतात.

विसापूर किल्ल्यावर माकड अपवादाने असून वानरे मोठया प्रमाणावर आहेत मात्र लोहगड किल्ल्यावर माकडांची संख्या मोठया प्रमाणात असून वानरं दिसून येत नाहीत. येथील हा विरोधाभास कायम दिसून येतो.

भेकर प्रजातीचे हरणासारखे प्राणी रात्रीच्या वेळी दिसून येतात. ससे व साळींदर हे प्राणीही परीघातील जंगलात नेहमी आढळून येतात. येथे दारूगोळा कोठाराच्या नजीक खापरखवल्या (shieldtail) नावाचा सर्प आढळतो. खापरखवल्याला स्थानिक भाषेत ‘दुतोंडया’ असे संबोधले जाते. मुख्यतः निशाचर असणारा हा सर्प दिवसाही दिसतो. बिनविषारी जात असून कोठारात झोपतांना दक्षता घ्यावी लागते.[13] विसापूर किल्ल्यावर मधोमध वनराई असून येथे जंगली झाडे मोठया प्रमाणावर आहेत. येथे हिरवा घोणस हा सर्प आढळतो, हा विषारी सर्प असून या प्रकारच्या सर्पाचा दंश परीघातील लोकांस अनेकदा झालेला आढळले आहे. या सर्पास स्थानिक ग्रामस्थ ‘चापडा’ (Bamboo pit viper) असे संबोधतात. वर्धामध्ये या सर्पास ‘हरानाग’, गोवा येथे ‘चापडी’, गडचिरोली येथे ‘कमका बोडाल’ व सर्वसाधारण यास ‘हिरवा घोणस’ या नावाने बहुतांशी ओळखले जाते.[14] किल्ला चढतांना असणाऱ्या जंगलात या प्रजातीचा सर्प आढळतो.

- चुन्याचा घाणा व चर, दगडी जातं व दोन दगडामधील मिश्रण ः

दक्षिण महाद्वार ते वायव्य बुरूज या रांगेत चुन्याचा घाणा व चर तसेच शेजारी दोन्ही तळया असलेले बांधकामाचे जातं सुस्थितीत आढळून येते. किल्ला बांधणीत मिश्रण एकजिव करण्यासाठी आवश्यक असणारा चुण्याचा घाणा व चर तसेच मिश्रण चिवट व्हावे यासाठी चरात दळून किंवा भरडून काही गोष्टी घालणे आवश्यक असतं. यासाठी घाण्याशेजारी जात ठेवले जात. मात्र निवडक किल्ल्यांवर या सर्व म्हणजेच घाणा, चर, जातं या गोष्टी एकत्रित दिसून येतात.

येथील घाण्याचे चाक **5** फुट व्यास व **10** इंच जाड आहे. घाण्याच्या मधील ओंडका लावण्याच्या छिद्राचा व्यास **9** इंच असून हा संपूर्ण घाणा ज्यात चुनखडी, माती व इतर तत्सम बांधकामापयोगी बाबी टाकून घाणा फिरविला जातो याचा परीघ **61.5** फुट आहे. घाण्याचा व्यास **19.6** फुट असून मोठया आकारातील चर बनवुन येथील बांधकाम केलेले दिसून येते. येथील बांधकामाच्या जात्यावर उत्कृष्ट नक्षीकाम केलेले आहे. दोन

---

[13] नि. खैरे, *साप,* ज्योत्स्ना प्रकाशन, **2006**, *पृ. 24.*

[14] तत्रैव, पृ. **81**.

मोठया आकारातील खुंटया लावण्याची व्यवस्था या जात्यास केलेली आढळते. खुंटया वरती आकाराने गोल असल्या तरी जात्यात अडकविण्याचे□ठोकण्याचे ठिकाण चौरस आहे. खुंटी ठोकण्याची जागा **3** □ **3** इंच आकाराची असून जात्याचे वजन साधारण दीड टन□**1500** किलो□असण्याचा संभव आहे. जात्याचा व्यास **3** फुट असून वरची तळई **7.5** इंच व खालची तळई **7.6** इंच जाड आहे. बांधकामापयोगी बाबीं यात घालतांना जात्याच्या मुखाचा व्यास **5** इंच अस मोठा ठेवला गेला आहे. या जात्यासारखे मोठया आकाराचे जातं सरसेनापती खंडेराव दाभाडे यांच्या तळेगांव दाभाडे येथील राजवाडयात ठेवलेले दिसून येते. या प्रकारातील मोठया आकाराच्या जात्यांचा उपयोग बांधकाम करतांना दोन दगडांमधील मिश्रणासाठी लागणा□या चिवट बाबी भरडण्यासाठी होत असे. बांधकामावेळी जात्यात गुळ, डिंक, काथ्याचा कूट, चुना, शंख - शिंपले या बाबी आधी हिरडयाच्या पाण्यात भिजत घालून मग त्या जात्यातून भरडून काढीत असे. या प्रकारच्या पद्धतींमुळे दोन दगडांतील मिश्रण चिवट होवून बांधकामात टिकावूपणा येत असे. उदाहरणार्थ ः दक्षिण दरवाजाचा मोठा बुरूज तटबंदीतुन निसटूनही खाली आहे तसाच उभा राहिलेला दिसून येते. याचे दगड एकमेकांपासून अंशतः सुटलेले नाहीत. मध्ययुगात पीठ दळणाचे जातं कुरूंदाच्या दगडात बनविले जात होते. याचा रंग तपकीरी आढळतो तसेच विसापूर किल्ल्यावरील व सरसेनापती खंडेराव दाभाडे यांच्या राजवाडयातील बांधकामाच्या जात्याचा रंग करडा आढळतो. मध्ययुगात पिठाचे जातं कुरूंदाच्या दगडात व बांधकामाचे जातं बेसॉल्ट दगडात आढळून येते.

- पाण्याच्या टाक्यातील हनुमान ः

चुण्याच्या घाण्याशेजारी टेकडी जवळ **9** टाक्यांचा समुह आहे. दक्षिण बाजूने दुस-या क्रमांकाच्या टाक्यात हनुमानाची **7** फुट ऊंच प्रतिमा कोरलेली आढळून येते. येथील हनुमान कोरतांना हनुमानाचे पाय कायम पाण्यात राहतील अशी प्रतिमा येथे कोरलेली आढळते. उन्हाळयाच्या दिवसांत पाण्याची पातळी खालावली तरी हनुमानाचे पाय पाण्यातच असतात. तसेच पावसाळयाच्या दिवसांत टाके पुर्ण भरलेले असतांना हनुमानाच्या मांडीपर्यंत पाण्याची पातळी येते. मात्र कायमस्वरूपी कातळकोरीव हनुमान प्रतिमा एक चतुर्थांश पाण्यात राहील अशी रचना येथे मुर्ती कोरतांना केलेली आढळून येते. हनुमान प्रतीमा कोरणारा कारागीर उत्तम दर्जाचा कल्पक

असल्याचे आढळते. पाटण प्रवेशद्वारातील व येथील हनुमान शिल्प एकाच व्यक्तीने घडविले असण्याचा संभव आहे. कारण दोन्ही हनुमान कातळयात कोरलेले असून दोहोंमध्ये बरेचसे साम्य आढळते. दोन्ही हनुमान शिल्प आकाराने सारखे असून पाटण व दक्षिण प्रवेशद्वारातील दोन्ही हनुमानशिल्प चापटी मारण्याचा पवित्रा घेतलेले म्हणजेच चपेटदान मारूती आहेत. यास ग्रामस्थ चापटया मारूती किंवा वीर हनुमान असे संबोधतात. तळयातील हनुमान शस्त्रधारी नसून हातात फूल घेतलेला आहे आणि फुलातून हत्तीचे मस्तक आणि सोंड बाहेर आल्याचे दर्शविले आहे. सध्या पाण्याच्या टाक्यातील हनुमानास शेंदुर फासलेला दिसून येतो.

- एकवीस हनुमान व परीघातील गावांची मध्ययुगीन परंपरा ः

लोहगडवाडीच्या परीसरात एकूण **21** हनुमान मूर्ती आहेत. या सर्व हनुमान मूर्तींना परीसरात महत्वाचे स्थान असून यातील बहुतांशी मूर्ती मध्ययुगातील असल्याचे दिसून येते. या परीसरात विवाह सोहळा पार पडल्यावर नवीन जोडपे नातेवाईकांसहीत **21** हनुमानांचे दर्शन घेते, ही येथील लोकांची परंपरा असल्याचे दिसते.[15] **21** हनुमान मूर्तींमध्ये विसापूर किल्ल्यावरील तीन हनुमान मूर्ती आहेत, लोहगडवाडीत व लोहगड किल्ल्यावर हनुमानमुर्ती आहेत तसेच लोहगड व विसापूर या किल्ल्यांच्या परीघात हनुमानाच्या अनेक मूर्ती दिसून येतात. लोहगड किल्ल्याच्या परिघात लोहगडवाडी, धनगरवाडी, घेरेवाडी, मालेवाडी, पाटण यांप्रकारच्या गावांचा समावेश होतो.

- किल्ल्यावरील दारूगोळा कोठार ः

किल्ल्यावरील पश्चिम बाजुस नऊ टाक्यांच्या समुहाच्या शेजारी मध्ययुगीन दोन वास्तुंचे भग्नावशेष दिसून येतात. या दोहोंमधील एक दारूगोळा कोठार व जवळच टेकडीबाजुस उंचवटयावर कचेरी आहे. या दोहोंतील अंतर **81** मीटर□**265** फुट□असून दारूगोळा कोठाराच्या भिंती आजही सुस्थितीत आहेत. दारूगोळा कोठार **21**

---

[15] सर्वेक्षण व मुलाखत – बाळासाहेब तिकोणे, दि. **08. 05. 2012**, स्थळ – पाटणगाव, वेळ – **02ः30** वा.

मीटर□70 फुट□× 9 मीटर□30 फुट□आहे. विसापूर किल्ल्यावर अनेक दारूगोळा कोठारे असून त्यातील सर्वात मोठे व आजही सुस्थितीत असणारे हे एकमेव कोठार आहे. याची बांधणी करतांना कल्पकाने कोठारास दुहेरी संरक्षण मिळावे या हेतूने दुहेरी दगडी भिंत बांधलेली दिसून येते. याचे प्रयोजन शत्रुसैन्याकडून होणाऱ्या तोफांच्या माऱ्यात दारूगोळा कोठारावर तोफगोळा पडला तरीही बाहेरील भिंत मुख्य कोठाराच्या संरक्षणासाठी असावी व मुळ कोठार आगीच्या भक्षस्थानी पडू नये असे होते. म्हणून कोठाराच्या बाहेरील भिंत 1.5 फुट जाड ठेवलेली आढळते. मुख्य कोठाराच्या भिंतीची जाडी 2.6 फुट असून दोन्ही भिंतींमधील अंतर 5.6 फुट ठेवलेले आहे. आतील कोठाराच्या चहुबाजूने फिरता यावे अशी व्यवस्था ठेवलेली दिसून येते. संपुर्ण कोठार विशिष्ठ उंचीवर बांधलेले निदर्शनास येते. दारूगोळा वाहणारा गाडा थेट कोठाराच्या द्वारात जाईल अशी वेगावर नियंत्रण ठेवणारी व्यवस्था पायऱ्या न ठेवता उतार देवून येथे केलेली आढळते. आतील कोठारास दरवाज्याच्या उजव्या बाजूस जमिनीपासून 6 फुट ऊंचीवर एक खिडकी आहे ती आजही सुस्थीतीत आहे तिची ऊंची 3.7 × 2.11 फुट आहे. या कोठाराच्या छतास चुनागच्ची केलेली होती. पावसाळयात पाण्याचा संचय होवू नये व दारूगोळयास आर्दता लागू नये यासाठी उतार देवून चुनागच्ची बांधलेली आढळते. कोठाराची निर्मीती करतांना कोठाराचा पाया खोलवर घेतलेला दिसून येतो. पाया घेतांना बेसॉल्ट दगडांतच पाया घेतलेला आढळून येतो. पाया खोलवर घेवूनही मुळ जमीनीपासून 2 फुट उंचीवर कोठाराचे बांधकाम केलेले दिसून येते. पावसाळयात दारूगोळयास पाण्याचा उपसर्ग होतो तो टाळण्यासाठी जमीनीपासून उंचीवर बांधकाम केलेले दिसून येते. कोठारास 18 लाकडी वासे होते असे सध्या वासे काढून नेलेल्या भिंतीतील पोकळीवरून दिसून येते. मात्र सध्या येथे एकही वासा शिल्लक राहिलेला नाही. यांची उंची 7.11 फुट व रूंदी 10 □10 इंच होती. दर्जेदार सागवान लाकडात येथील वासे कोठाराच्या भक्कमतेसाठी उभारले होते. कोठाराच्या आत 49.6 × 14.6 फुट जागा दारूगोळयाच्या संचयासाठी उपलब्ध होती. कोठाराचा प्रवेशमार्ग 5 फुट रूंद असून द्वार 5 × 3 फुट आकाराचे आहे. द्वारावर उजव्या बाजुस काही अक्षरे व आकडे अंकीत आहेत मात्र कालौघात ती अस्पष्ट झालेली आढळतात. द्वारास माथ्याच्या पट्टीवर प्रतीमा कोरण्यासाठी जागा शिल्लक ठेवली होती परंतु येथे काहीच कोरल्या न गेल्याने येथील काम अपूर्ण राहीलेले दिसते. कोठाराची उंची 13.6 फुट होती. मोठया स्वरूपात दारूगोळयाचा संचय येथे व्हावा यासाठी मोठया आकारात या कोठाराची बांधणी केल्या गेली तसेच याच्या संरक्षणासाठी अनेक भक्कम योजना केल्या गेल्या होत्या.

- कचेरीची उंच इमारत ः

दारूगोळा कोठाराच्या नजिकच उंचवटयावर कचेरी बांधलेली दिसून येते. कचेरी बांधतांना कोठारापासून टेकडीबाजूस बऱ्याचशा उंचीवर कचेरीचे बांधकाम केलेले आढळते. टेकडीच्या उतारावर जागा सपाट करून **26** मीटर (**86** फुट) × **10** मीटर (**32** फुट) आकाराची कचेरी येथे बांधण्यात आलेली आढळते. मुख्यत्वे कचेरीच्या बाहेर समोरील बाजूने चौरस आकाराचे संरक्षक भिंतीसारखे (Safety compound) बांधकाम केलेले दिसते. **29** मीटर (**95** फुट) × **24** मीटर (**80** फुट) असा संरक्षक भिंतीचा आकार घेतलेला निदर्शनास येतो. कचेरीचे बांधकाम करतांना जमिनीपासून छतापर्यंतची ऊंची **19** फुट घेतलेली दिसून येते. संपुर्ण किल्ल्यावर एवढया उंचीचा पाया घालून तयार केलेली ही एकमेव इमारत असून कचेरीस समोरच्या बाजूने दोन प्रवेशमार्ग ठेवलेले दिसून येतात. सहा पायऱ्या चढून गेल्यावर कचेरीचे द्वार आहे, कोठाराप्रमाणेच दुहेरी संरक्षणाच्या हेतूने कचेरीलाही दुहेरी भिंत बांधलेली दिसून येते. बाहेरील भिंत **1.4** फुट व आतील **2.8** फुट जाड भिंत बांधून कचेरीचे बांधकाम केलेले आहे. दोन्ही भिंतींमधील अंतर **6** फुट आहे मात्र दोन्ही भिंतींच्या आतून कचेरीस पुर्ण फेरी घेता येण्याची व्यवस्था ठेवलेली नसल्याचे दिसून येते. कचेरीचा पाया जमीनीपासून **6** फुट ऊंचीवर घेतलेला दिसून येतो. सहा पायऱ्या चढून कचेरीत जाता येते. कचेरीतून भिंतींची ऊंची **13** फुट आढळते. कचेरीचे प्रवेशद्वार **4.8 × 3** फुट आकाराचे आहे. कचेरीस एकूण **21** लाकडी वासे होते यांची जाडी **10 × 10** इंच होती. मात्र आज दारूगोळा कोठाराप्रमाणे एकही लाकडी वासा शिल्लक नाही. कचेरीच्या मधोमध पाच ठिकाणी **3** इंच व्यासाची जाडी असलेला गजाचा (पहारीचा) आधार देवून छताचा भार यांवर दिलेला होता असे दिसून येते. कचेरीच्या मुख्य द्वारातून आत गेल्यावर ऊजव्या बाजुस **2** फुट ऊंचीचा चौथरा बसण्यासाठी केलेला आढळतो. कचेरीस एकूण तीन दरवाजे आहेत त्यापैकी दोन मुख्य प्रवेशद्वारे कोठाराकडे मुख असलेली व एक द्वार मागच्या बाजूने टेकडीकडे निघणारे आहे. लाकडी वासे निखळले की इमारतीचे आयुष्य संपुष्ठात येते. मात्र दारूगोळा कोठार व कचेरी या दोन्ही मध्ययुगीन इमारतीमधील लाकडी वासे आज एकही शिल्लक नसतांनाही आजपर्यंत या दोन्ही इमारती तग धरून उभ्या असलेल्या निदर्शनास येतात.

- वायव्य दिशेचा बुरूज व उत्तरमध्ययुगातली त्याची पुर्नबांधणी ः

कचेरीपासून पुढे वायव्य दिशेच्या मार्गावर चार मोठया टाक्यांचा समुह असून येथून वायव्य बुरूजावर जातांना एक छोटया आकाराच्या टेकडीचा उतार लागतो. टेकडीच्या उतारास **11** टाक्यांचा समूह आहे, वायव्य बुरूजाच्या उजव्या तटबंदीस आतमध्ये खोली करून शौचकूपे केलेली दिसून येतात. वायव्य बुरूजामुळे किल्ल्याच्या पश्चिम आणि उत्तर तटबंदीचे संरक्षण करता येत असल्याचे दिसून येते. मध्ययुगात वायव्य बुरूजाला बाहेरील बाजूने ध्वज लावण्यासाठी दोन दगडी कडया लावलेल्या होत्या परंतु सध्या त्यातील एक कडी शिल्लक दिसून येते. तसेच येथून खाली पाटणगांव, मळवलीगाव, भाजेगाव, भातराशी डोंगर, ताजेगाव, कार्ले लेणीचा डोंगर दिसतो, येथून दुरवरच्या प्रदेशावर नजर ठेवता येते, येथील बुरूजाचे महत्व जाणून राजसत्तेने त्यास दुहेरी तटबंदीने मजबूती दिलेली दिसून येते. म्हणजेच चिलखत घातले आहे. बुरूजास चिलखत घातल्यामुळे बुरूजाची शक्ती वर्धन होते. यामुळे मध्ययुगात महत्वाच्या किल्ल्यांच्या बुरूजांस चिलखत घातले जात असे. उदाहरणार्थ ः अशाच स्वरूपाचे बांधकाम लोहगड किल्ल्याच्या विंचुकाटा माचीच्या शेवटच्या टोकास केलेले आढळते. तसेच राजमाची किल्ल्याच्या श्रीवर्धन या बालेकिल्ल्यावर उत्तर बुरूजास चिलखती बांधकाम दिसून येते. वायव्य बुरूजावरून जंगलाच्या वाटेने एक रस्ता गायमुख खिंडीत जातो. येथील द्वार उत्तर मध्ययुगातच दगडा मातीने चिणून बंद केलेले निदर्शनास येते. येथील बुरूजास चोरदिंडी ठेवलेली नसून मध्ययुगात मोठया आकाराचे प्रवेशद्वार येथे होते असे उपलब्ध अवशेषांवरून दिसून येते.

वायव्य बुरूजाचा बाहेरील भाग नैसर्गीकरित्या पडल्याने तेथील बांधकाम उत्तर मध्ययुगात नव्याने करून घेतल्याचे दिसून येते. दोन्ही बांधकामाच्या दगडांतील फरक स्पष्ट दिसून येतो. नवीन बांधणी अर्वाचीन काळातील असण्याचा संभव आहे. वायव्य बुरूज ते कोकण प्रवेशद्वार मार्गावर पाण्याच्या टाक्याजवळ एक फुट उंची असलेली हनुमान मूर्ती आहे, या मुर्तीत हनुमानाच्या डाव्या हातात एक खंजीर दर्शवीले आहे. हनुमान मुर्तीस शेजारीच दिवा लावण्यासाठी दगडी कोनाडा ठेवलेला आहे येथे चार पाच दगडांस शेंदुर लावून ग्रामस्थांकडून यास 'देवाचं ठाणं' असे संबोधले जात असल्याचे दिसून येते.

* प्राचीन काळातील विसापूर किल्ला ः

विसापूर किल्ल्याच्या इतिहासाची सुरूवात प्राचीन काळापासून होते. प्राचीन कालखंडात लोहगड व विसापूर यांच्या पर्वतास 'मारकूट पर्वत' असे संबोधले जात असल्याचे बेडसे येथील लेणीतील 'मारकुट पर्वतावरील गोभूती' या विशेषणावरून दिसून येते. भाजेलेणी मावळ तालुक्यातील प्रथम कोरल्या गेलेली लेणी आहे.[16] भाजेलेणी विसापूर किल्ल्याच्या पर्वतास एका मोठया कातळकडयात कोरलेली आढळते. लेणीच्या वरच्या बाजूने पर्वतावर चालत गेल्यास विसापूर किल्ल्यावर जाता येते. प्राचीन तसेच मध्ययुगातही या वाटेने अनुक्रमे बौध्द भिक्षू व सैन्य यांची वर्दळ होती. येथील वाटेवर असलेल्या एका धबधब्यास तीन ठिकाणी पाण्याचा संचय व्हावा म्हणून चौकोणी आकाराचे खड्डे घेतलेले आजही आढळतात.

प्राचीन काळात पाटण गाव बाजूने विसापूरच्या पर्वतास खोदलेल्या पाण्याच्या टाक्यांवरील ब्राह्मी लिपीतील शिलालेख व लेणी तसेच प्रस्तुत प्रबंधात नव्याने संशोधनात आलेला विसापूर किल्ल्याच्या माथ्यावरील ब्राह्मी लिपीतील शिलालेख यांद्वारे येथील पर्वताची प्राचीन माहिती मिळते. लोहगड किल्ल्यावर किंवा कातळयास विसापूर किल्ल्यावरील शिलालेखाप्रमाणे एकही प्राचीन शिलालेख आजवर सापडला नसल्याने प्राचीन काळात लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख लेणींत कोणता संघ राहत हे स्पष्ट कळत नाही मात्र विसापूर किल्ल्याच्या कातळयास किंवा कार्ले, भाजे व बेडसे या लेणींवरून लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख लेणीत बौध्द् संघ राहत असावा असा संभव आहे.

भारतातील लेणींपैकी 78% लेणी महाराष्ट्रात आहेत. पश्चिम महाराष्ट्रात आणिक लेणी नव्याने उजेडात येत आहेत.[17] मावळ तालुक्याच्या पंचक्रोशीत असलेल्या बहुतांशी किल्ल्यांना व पर्वतांना प्राचीन कालखंडाचा स्पर्श झालेला आढळतो. प्राचीन काळातील भारतप्रसिध्द सातवाहन वंश पुराणांमध्ये 'आंद्रसातवाहन' म्हणून ओळखला जातो. सातवाहन राजवंश हा मावळ तालुक्यातील 'आंदर मावळ' या विभागातील होते असे काही इतिहास संशोधकांचे मत आहे. बौध्दभिक्षुंस व दरम्यानच्या काळात लेणी कोरण्याचे काम करणा[illegible] सर्वच पंथांस मदत करण्याचे तसेच पोढी व विश्रामासाठी विहार यांची व्यवस्था करण्याचे कार्य दरम्यान सातवाहनांकडून झालेले

---

[16] महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, 2009, पृष्ठ क.7.

[17] तत्रैव, पृ.15.

दिसून येते. सातवाहन राजसत्ता तसेच व्यापाऱ्यांकडून दाने घेवून अनेक विहार, पोढी, स्तुप, चैत्यगृह यांची निर्मीती दरम्यानच्या काळात झालेली दिसून येते.

प्राचीन काळात अनेक कातळयांस व पर्वतांस बहुतांशी गुंफा व पोढी निर्माण झालेल्या दिसून येतात. याच दरम्यान तळेगाव M.I.D.C. शेजारील पिराचा डोंगर येथील तीन कातळखोदीव स्तंभी टाक्या व एक कातळखोदीव गुंफा यांची निर्मीती करण्यात आली. दरम्यानच्या काळात विसापूर, लोहगड, तुंग, तिकोणा, राजमाची यांसारख्या मोठया पर्वतांवर प्राचीन कालखंडात अनेक कोरीव कामे केलेली आढळतात. विसापूर किल्ल्याच्या पायथ्याच्या पाटण गाव शेजारी ब्राह्मी लिपीतील शिलालेख कोरलेला आढळतो. तसेच किल्ल्यावरही पोढीच्या माथ्यावर शिलालेख आढळून येतो. दरम्यानच्या काळात तिकोणा पर्वतावर कातळकडयात विहार व पोढी कोरल्या गेलेली दिसून येते. कार्लेच्या लेणीत असलेल्या शिलालेखातून मावळ तालुक्यातील अनेक ठिकाणांबद्दल माहीती मिळते यात 'वालूरक' हे स्थलनाम कार्ले येथे रहाणा□ भिक्खू संघासाठी वापरलेले आहे. तसेच 'करजक□करजिक' हे नाम कार्ले येथून भाजे मार्गे 'बेडसे' या लेणीस गेल्यावर बेडसे लेणीचा डोंगर जेथे संपतो तेथे असलेले 'करंजगाव' या संबंधी वापरलेले आहे. तसेच 'मामल□मामड आहार' ही नामे मामल म्हणजे 'मावळ' तालुका व 'आहार' म्हणजे 'प्रशासकीय विभाग' या अर्थाने वापरलेली आहेत. कार्ले लेणीप्रमाणेच बेडसे लेणीतही अनेक शिलालेख असून यांवरून या प्रदेशाची व तत्कालीन लोकांची नावे आढळुन येतात. या लेणीतील एका लेखात 'गोभूती' नावाच्या भिक्खूचे विशेषण 'मारकूट' येथील 'गोभूती' असे आले आहे. यावरून बेडसालेणी ज्या पर्वताच्या कातळयात आहे या पर्वतास 'मारकूट पर्वत' असे संबोधत होते हे दिसून येते. तसेच लोहगड व विसापूर हे दोन्ही किल्ले असलेल्या पर्वतास मारकूट पर्वत हेच नाव होते असे दिसून येते. कारण एक मोठया पर्वतावर साधारणतः मधोमध लोहगड व विसापूर अशा दोन किल्ल्यांची निर्मीती झालेली आढळते. तसेच याच पर्वतास पुर्व दिशेने बेडसे लेणी व पश्चिम दिशेने भाजे लेणी खोदल्या गेलेली आढळते. म्हणजेच भाजे, बेडसे, लोहगड, विसापूर हे किल्ले एकाच पर्वतावर असल्याने भाजे ते बेडसे जातांना या मार्गावर व्यापारी वर्गासाठी भाजे येथील विहार व लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख लेणी येथे व्यापारी वर्गाचा मुक्काम अपेक्षीत आहे व तेथून पुढे तिकोणा किल्ल्याची गडद लेणी व शेलारवाडीची लेणी असा मार्ग असल्याचे दिसून येते. तसेच या दरम्यान विसापूर किल्ल्यावर खोदल्या गेलेल्या लेणी व ब्राह्मी शिलालेख हे व्यापारी वर्गासाठी दिसून येत नसून येथे माथ्यावर राहणारा बौध्दभिक्षू वर्ग होता असे निदर्शनास येते. त्यामुळे विसापूर किल्ल्यास प्राचीन इतिहास

लाभलेला दिसून येतो . लोहगड किल्ल्याच्या पायथ्यास असलेले लोहगडवाडी, घेरेवाडी, धनगरवाडी, कोळीवाडी व परिघातील मालेवाडी इत्यादी गावे जरी मध्ययुगात वसलेली असली तरी ‘पाटण’ हे विसापूर पायथ्याचे गाव प्राचीन काळात वसलेले असण्याचा संभव आहे . प्राचीन कालखंडातील क्षेत्राची विभागणी ही ‘विषय □खंड □ वेलित □पाटण□नगर□ अशाप्रकारची होती . या क्षेत्र व्यवस्थेत ‘पाटण’ हे लहान शासनाचा विभाग होते . वस्ती व स्थानांच्या आकारमानावरून व रहीवाशांच्या संख्येवरून प्राचीन कालखंडातील शासन व्यवस्था नियोजीत केली जात होती . या नियोजीत केलेल्या व्यवस्थेत ‘पाटण’ हे विसापूर पायथ्याचे गाव प्राचीन कालखंडातील असल्याचे आढळते .[18] यावरून विसापूर किल्ल्यावर व पायथ्यास प्राचीन संस्कृती मोठया प्रमाणावर आढळून येते .

विसापूर किल्ल्यावर निवडक ठिकाणी प्राचीन काळातील खोदकाम दिसून येते ते पुढीलप्रमाणे ः

**1** . पाटणगाव मधून किल्ल्याच्या माथ्यावर जातांना मधल्या दोन टप्प्यात वीस □पंचवीस पाय□ व एक पोढी आढळते .

**2** . पाटणगावात किल्ल्याच्या कातळयातील पाटणची लेणी, शिलालेख व बौध्द स्तूप व त्रिरत्न आढळते .

**3** . किल्ल्यावरील पाटण प्रवेशद्वाच्या जवळील दोन कोठारे ही प्राचीन काळात दोन बौध्द विहार होते . यास सध्या गणेश व कमळ कोठार अशी नावे आहेत . येथील कोठारांच्या समोर **5** टाक्यांचा समूह आहे .

**4** . दक्षिण प्रवेशद्वार मार्गे किल्ल्याच्या खाली उतरतांना उजव्या कातळयात खोदलेली एक पोढी व त्यावरील ब्राह्मी लिपीतील शिलालेख आहे .

**5** . भाजेलेणीच्या वरच्या बाजूने किल्ल्याच्या माथ्यावर जाणाऱ्या मार्गास तीन ठिकाणी पाण्याचा संचय व्हावा म्हणून चौकोणी आकारात खोदलेले खड्डे दिसून येतात .

**6** . भाजेलेणी ही विसापूर किल्ल्याच्या कातळयातील बौध्दलेणी आहे . मात्र यावर तपशीलवार अभ्यास विद्या दहेजिया, मंजिरी भालेराव यांच्या कडून झालेले असल्याने प्रस्तुत संशोधनात त्याची चर्चा केलेली नाही .

---

[18] शोभना गोखले, पुर्वोक्त, पृ . **104-107** .

**7**. दक्षीण प्रवेशद्वाराच्या शेजारी दोन द्वारे असलेली एक मोठया आकारातील खोली ही प्राचीन गुंफा होती. या खोलीचा मध्ययुगात सैनिकांनी लष्करी उपयोगासाठी वापर केलेला आढळतो. मात्र प्राचीन काळात हा बौध्दविहार होता असे आढळते.

इत्यादी बाबी प्राचीन काळात विसापूर किल्ल्याच्या पर्वतास खोदल्या गेल्या. यांचे प्राचीनत्व स्तुप व प्रसिध्द लेणी यांमुळे जाहीर होते. मात्र पाटण गाव व तेथील त्रिरत्न व शिलालेख यांबद्दल माहीती समोर आलेली नव्हती. धनगर समाजातील मेंढपाळ लोकांनी रमाकांत पाळंदे यांना दिलेल्या माहीतीवरून तिकोनेसर यांच्या सोबत शोभना गोखले गेल्या व त्यांनी येथील शिलालेखांचे वाचन केलेले आहे.[19] पाटणगावच्या लेणीतील वाचन झालेले आढळते. मात्र किल्ल्यावर पोढीच्या मथ्यावरील शिलालेखाचे वाचन त्यांनी केलेले नसल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रबंधात ब्राह्मी लिपीतील येथील शिलालेखाचे वाचन करून त्याचा अन्वयार्थ लावलेला आहे.

विसापूर किल्ल्याच्या पाटणगाव जवळील कातळयात टाक्यांच्या समूहावर शिलालेख व धम्मचक्र आणि त्रिरत्न कोरलेले आहेत. उपलब्ध शिलालेख इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील असल्याचे दिसून येते. त्यातील एका लेखात "सातवाहन राजा वासिष्ठीपुत्र पुळुमावी याच्या कारकीर्दीतील पंचविसाव्या वर्षी"असा उल्लेख आहे. या सर्व लेखांत पुळुमावीच्या महारथी 'विण्हुदत्तचा' उल्लेख असून, एका लेखात 'मुगुदपालित' या लेखकाचा उल्लेखही सापडतो.[20]

कार्ल्याचा स्तूप मावळ तालुक्यातील लेणींमध्ये सर्वात मोठा आहे. मात्र येथील बौध्दभिक्षू भाजेगाव येथील लेणीस येत असावेत असे दिसून येत नाही. कारण प्राचीन काळातील व्यापारी व बौध्दभिक्षूंचे मार्ग कार्ले ते बेडसे असे नसून दोन स्वतंत्र मार्ग असल्याचे दिसून येते. यातील प्रथम मार्ग उल्हास नदीशेजारून कोथळीगड जवळून कोंढाणे लेणीस व तेथून कुसुर घाट मार्गे कार्ले लेणीस येत असे व तेथून पुढे पुर्वेस भंडारा व भामचंद्र डोंगराच्या लेणीस जात असे. तसेच द्वितीय मार्ग सुधागडच्या पिंपरी घाटातून भाजे लेणीस व तेथून लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख लेणीतून किंवा विसापूर किल्ल्यावरून बेडसे लेणीस जात असे. बेडसे लेणी मार्गे शेलारवाडीच्या लेणीस हा मार्ग येवून येथे संपत असे. असे दोन वेगळे मार्ग असल्याने भाजेलेणी ते बेडसेलेणी

---

[19] तत्रैव, पृ. **104-107**.

[20] Indian Archiology 1984-85 A Review, Edited by R.C.Tripathi, 1987, Page.134.

जातांनाच्या विसापूर किल्ल्यावरील मार्गावर पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी सातवाहन राजवंशाकडून तसेच व्यापाऱ्यांकडून दाने दिल्या गेलेली दिसून येतात व त्यातून पोढी व विहार यांची निर्मीती विसापूर किल्ल्याच्या पर्व तावर केलेली दिसून येते. विसापूर किल्ल्याच्या शिलालेखांमूळे सातवाहनराजा 'वासिष्ठीपुत्र पुळुमावी' याचा 'लोकहीतदक्ष महारथी कोसिकीपुत्र विण्हुदत्त' व 'मुगुदपालित' नावाचा लेखक हे ज्ञात झाले. या मुगुदपालित लेखकानेही एका टाक्याचे दान दिले आहे. प्राचीन कालखंडात दगडावर लेख कोरीत त्यावेळी त्याची प्रतीकृती लाकडावर करवून घेत असे. अशा लाकडांच्या फळयांचा संग्रह शासनाच्या 'दफ्तरखाण्यात' असे. त्यास "फलकवार" असा शब्द आहे तो नाशिक येथील शिलालेखात आला आहे. असे फलक कालौघात नष्ट झाले, परंतु 'वासिष्ठीपुत्र पुळुमावी', 'महारथी विण्हुदत्त' व 'मुगुदपालित' या लेखकाचे नाव कायम राहिले.

विसापूर किल्ल्यावरील पोढीवर 'धर्मचक्र' व 'त्रिरत्न' ही वैशिष्टयपूर्ण चिन्हे आहेत. हीनयान पंथामध्ये भगवान बुध्दांची मूर्ती चित्रित न करता धर्मचक्राचा उपयोग करीत. बुध्द, धर्म, संघ यांचे द्योतक असलेले त्रिरत्न या टाक्यावर असल्यामुळे विसापूर किल्ल्याचा म्हणजेच या पर्वताचा इतिहास इसवी सन पूर्वकाळापर्यंत मागे जात असल्याचे दिसून येते.[21]

- मध्ययुगातील विसापूर किल्ला ः

विसापूर किल्ल्याचा इतिहास प्राचीन काळापासून चालू झालेला दिसून येतो. मात्र मध्ययुगात विसापूर किल्ला स्थानिक राजवटींमार्फत मोठया प्रमाणावर शिबंदी राहील अशा योग्यतेचा करून घेतलेला दिसून येतो. तद्नंतर विसापूर किल्ल्याची नावे अनेकदा 'ईसापूर, ईसागड, संबळगड' अशी आढळून येतात. लोहगड किल्ल्याप्रमाणे विसापूर किल्ला कोणी बांधला याबद्दल माहिति उपलब्ध नाही. परंतु मराठी विश्वकोष खंड **16** मध्ये आलेल्या माहिती नुसार बाळाजी विश्वनाथ भट□पेशवे□यांनी किल्ला बांधला असा उल्लेख आहे.[22] परंतु तो चुकिचा आहे. कारण विसापूर किल्ल्याचा उल्लेख **1665** साली 'आलमगीरनाम्यात' आलेला आहे. 'मिर्झाराजा जयसिंह' हा पुरंदर - वज्रगडास वेढा टाकून बसलेला असतांना त्याने आपल्या अधिकाऱ्यांस लोहगड (लोहाद्री), विसापूर (ई

[21] तत्रैव, पृ. **104-107**.

[22] मराठी विश्वकोश, खंड ः **16**, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, **1999**, पृ. **955**.

सागड - संबळगड), तुंग (तपकी - पतकी - कठीणगड - बंकीगड), तिकोणा (वितंडगड - अमनगड) या किल्ल्यांच्या पायथ्याशी असलेल्या गावांना जाळून-लुटून फस्त करावयास सांगीतले आणि त्याच्या अधिकाऱ्यांनी ते काम चोख बजावले या जाळपोळीच्या मोहीमेत 'दाऊदखान', 'कुतुबुद्दीनखान', 'राजा रायसिंह' व राजा जयसिंहाचा नोकर 'अचलसिंह' हे होते. या मोहीमेनंतर हे सर्व अधिकारी लष्करी तळावर परतले असा विसापूरचा "ईसागड" असा पहिला उल्लेख 'आलमगीरनाम्यात' येतो, यातच "जेव्हा पुरंदर गडाचा ताबा मुघल सैन्याने घेतला, त्या दिवशीच शिवाजी महाराजांनी लोहगड, ईसागड, तपकी, तिकोणा, रोहिडा असे आणखी पाच किल्ले मुघलांच्या हाती केले."[23] असाही उल्लेख येतो. तसेच शिवाजी महाराजांचा मिर्झाराजा जयसिंहाच्या सोबत झालेल्या पुरंदर तहात (14 जुन 1665) जे तेवीस किल्ले मुघलांना द्यावे लागले यात 'ईसागड' नाव आलेले आहे.

ईसागड म्हणजेच विसापूरचा किल्ला याचे नाव लिखीत स्वरूपात सर्वप्रथम 1665 मध्ये येत असल्याने बहुतांशी संशोधकांच्या मते या किल्ल्याची निर्मिती शिवाजी महाराजांने केली असे आहे. परंतु हे तर्कशात्र असून यास पुरावा नाही. विसापूर किल्ल्याचा उल्लेख बहमनी राजवटीच्या काळात आलेला नाही. निजामशाहीच्या काळात लोहगड किल्ल्याचा उल्लेख आहे मात्र विसापूर किल्ल्याचा उल्लेख नाही, त्यामुळे काही संशोधकांचे मत विसापूर किल्ल्याची निर्मिती शिवाजी महाराजांनी केली असे आहे.[24] परंतु हे भावनिक विधान असून विसापूर किल्ल्यासारख्या 4.2 कि.मी. (2.6 मैल) परीघ असणाऱ्या विस्तिर्ण माथ्याच्या डोंगरावर अनेक मोठी बांधकामे करून 83 टाक्या खणावयास व पर्वतास दुर्गरूप देण्यासाठी त्यावर लाखो रूपयांचा जाबीता बनविणे व त्याची अंमलबजावणी करणे हे वेळखाऊ व खर्चिक काम होते. शिवाजी महाराजांच्या किल्ले जिंकण्याच्या मोहिमांत एवढा वेळ एखाद्या किल्ल्याच्या बांधणीसाठी घालविणे शक्य नव्हते. शिवाजी महाराजांच्या स्वभाव वैशिष्टयात किल्ले बांधण्यात वेळ दवडणे दिसून येत नाही. किल्ल्यावरील मोठया लांबीची तटबंदी, 83 टाक्या खणण्याचे काम तसेच मोठया इमारती व प्रशस्त वाडा हे वंशपरंपरेने राजगादीवर बसणाऱ्या व्यक्तीकडून होणे स्वभावीक आहे, शिवाजी महाराजांकडे असलेल्या किल्ल्यांपैकी प्रतापगड, राजगड, रायगड व काहीसे सिंधुदुर्ग व खांदेरी

---

[23] महेश तेंडुलकर, *लोहगड विसापूर तुंग तिकोणा*, स्नेहल प्रकाशन, 2010, पृ.44.

[24] संदिप तापकीर व महेश तेंडूलकर यांनी शिवाजी महाराजांनी विसापूर किल्ला बांधला असे विधान केलेले आहे.

सारखे जलदुर्ग यांसारखे निवडक किल्ले वगळता सर्वच किल्ले जिंकून घेणे शिवाजी महाराजांना जास्त सोयीचे वाटले व त्यांनी तसेच केले म्हणून या किल्ल्याची निर्मीती ही बहमणींच्या राज्यात किंवा विजापूरच्या अदिलशाहीने केली असावी व शिवाजी महाराजांनी तो जिंकून घेतला असण्याचा संभव आहे असे केलेल्या प्रस्तुत संशोधनावरून म्हणता येते.

- विसापूर किल्ल्याचे अनुल्लेख ः

मिर्झा जयसिंगाशी झालेल्या तहान्वये मुघलांना जे **23** किल्ले **1665** मध्ये शिवाजी महाराजांनी दिले त्यात विसापूर किल्ला होता. परंतु **4** फेब्रुवारी **1670** ला तानाजी मालुसरे यांनी सिंहगड जिंकून घेतल्यानंतर मराठयांनी मुघलांना दिलेले सर्व किल्ले जिंकुन घेण्यास जोरदार सुरूवात केली. यात मुघलांशी केलेला तह मोडून अनेक किल्ले मराठयांनी जिंकून घेतले. यात विसापूर किल्ल्याच्या प्रभावळीतल्या किल्ल्यांची नावे आहेत. मात्र विसापूर किल्ल्याचे नाव यात आढळत नाही. लोहगड किल्ल्यापेक्षा पाच पटींनी मोठे क्षेत्रफळ व विस्तीर्ण माथा असतांना तसेच लोहगड किल्ल्यापेक्षा पाण्याची व्यवस्था मोठया प्रमाणात असतांनाही लोहगड किल्ल्याएवढे ऐवढे राजकीय महत्व विसापूर किल्ल्यास कधीच प्राप्त झालेले दिसून येत नाही. कारण लोहगड किल्ला विसापूर सारखा विस्तीर्ण माथ्याचा नसला तरी लोहगड किल्ल्यावर चढण्यास फक्त एक वाट होती व आजही ती एकच वाट किल्ल्याच्या माथ्यावर जाण्यासाठी दिसून येते. लोहगड किल्ल्याच्या सर्व बाजुंनी उंच कातळे तासल्यासारखे दिसून येतात. मात्र विसापूर किल्ल्याचे तसे नसून विसापूर किल्ल्याच्या माथ्यावर जाण्याचे चार मार्ग आहेत. म्हणून त्यास लोहगड किल्ल्याएवढे महत्व दिले गेले नसल्याचे दिसून येते.

संभाजी महाराजांच्या बलीदानानंतर राजाराम महाराज यांना महाराष्ट्रातील परीस्थिती किमान सुधारेपर्यंत सात वर्षे जिंजी या तामिळनाडूतील किल्ल्याच्या आश्रयास रहावे लागले, दरम्यानच्या काळात मुघलांनी महाराष्ट्रातील किल्ले घेण्यास जोरदार प्रारंभ केला. थोडयाच काळात मराठयांचे बहुतांशी किल्ले मुघलांनी घेतले, जेधे शकावलीत “ते वर्षी कुंलगड मोगलें घेतले” अशी नोंद आली आहे.[25] याच मोहीमेत मराठयांचे राजगड,

---

[25] अ.रा.कुलकर्णी, *जेधे शकावली*, डायमंड प्रकाशन पुणे, **2007**, पृ.**133**.

रायगड, प्रतापगड, तोरणा, सिंहगड, पुरंदर, लोहगड यांसारखे बलाढय किल्ले मोगलांच्या शहाजादा आज्जम व गाजिउद्दीन यांनी काबीज केलेले दिसून येतात. या मोहीमेत विसापूर किल्ला मुघलांनी घेतला असावा परंतु तसा संदर्भ मिळालेला नाही. पुन्हा विसापूर किल्ला स्वराज्यात कधी व कोणी आणला हे पुराव्याअभावी सांगता येत नाही.

- मध्ययुगात विसापूर किल्ल्यास लोहगड किल्ल्यापेक्षा राजकीयदृष्टया कमी महत्व ः

विसापूर किल्ल्यास लोहगड किल्ल्यापेक्षा राजकीय महत्व कायमच कमी प्राप्त झाल्याचे दिसून येते. याचे कारण लोहगड किल्ल्यावर जाण्या□येण्यास प्राचीन व मध्ययुगात एकच वाट होती तसेच आजही किल्ल्याच्या माथ्यावर जाण्यास एकच वाट आहे मात्र विसापूर किल्ल्यावर चार दिशांनी चार वाटांमार्गे माथ्यावर जाता येते. तसेच लोहगड किल्ला कमी शिबंदी असतांनाही लढविता येतो परंतु विसापूर किल्ला लढविण्यास लोहगड किल्ल्याच्या पाचपट अधिक क्षेत्रफळामुळे पाचपट अधिक शिबंदी आवश्यक असल्याचे दिसून येते. लोहगड किल्ल्याच्या पाचपटींनी जास्त विस्तृत माथा विसापूर किल्ल्याचा असून लोहगड किल्ल्यास एकाच बाजूने माथ्यास जाण्यास मार्ग आहे तसेच द्वार रचनेच्या गोमुखीपद्धतीमुळे चार ते पाच दरवाजांमधून शत्रू सैन्यावर मारा करण्यास संधी आहे तशी विसापूर किल्ल्यास दोहोबाजूंनी नाळेतून येणा□या सैन्यावर मारा करावयास संधी असली तरीही जर शत्रूसैन्य नाळेच्या वाटा सोडून इतर दोन वाटांनी आले तर किल्ल्याच्या तटापर्यंत शत्रूसैन्य पोहोचू शकते व तटापर्यंत पोहोचलेल्या शत्रूसैन्यास एकाच तटाशी किंवा महाद्वाराशी सामना करावा लागणार व एकदा एखाद्या तटावर किंवा तटबंदीमध्ये शत्रूसैन्य शिरले तर किल्ला हातचा गेला असे होते त्यामुळे व लोहगड किल्ल्यावर कमी शिबंदी असतांनाही किल्ला लढविला जावू शकतो मात्र विसापूर किल्ला लढविण्यासाठी लोहगड किल्ल्याच्या पाचपट जास्त शिबंदी आवश्यक असल्याचे दिसून येते. म्हणून कायम विसापूर किल्ल्यास राजकीयदृष्टया कमी महत्व मिळालेले दिसून येते.

- विसापूर किल्ल्याचे ऊल्लेख ः

**1656** ते **1680** पर्यंत विसापूर किल्ला मराठयांकडे होता असे दिसून येते. त्यामुळे विसापूर किल्ल्यावर मराठी राजसत्तेकडून डागडूजी केल्याचे पत्र पुढीलप्रमाणे ः

"सिंहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, प्रतापगड पुरंदर व राजगड यांच्या तटांत पडझड झाली होती त्यांची डागडूजी करण्यास प्रत्येकी **10000** होन, तोरणा, प्रसिध्दगड, विशाळाड, महिमतगड, सुधागड, लोहगड, संबळगड, श्रीवर्धन मनरंजन याकरीता प्रत्येकी **5000** होन, कोरीगडासाठी **3000** होन, सरसगड व महीधरगड यांसाठी **2000** होन, मनोहरगडासाठी **1000** होन व किरकोळ **7000** होन याप्रमाणे खर्चाची वाटणी केली"[26]

महाराष्ट्रात मराठी राजसत्तेकडे असलेल्या किल्ल्यांचे वर्गीकरण करून त्यांवर खर्च केला गेलेला दिसून येतो. यात निवडक किल्ल्यांचा समावेश असल्याने दर्जेदार किल्ले निवडले गेल्याचे दिसून येते. दरम्यानच्या काळात लोहगड व विसापूर या दोन्ही किल्ल्यांस मोठे महत्व प्राप्त झालेले दिसून येते. त्यामुळे दोन्ही किल्ल्यांवर प्रत्येकी **5000** होन एवढा खर्च केला गेला होता. विसापूर किल्ला जरी मावळ तालुक्याच्या केंद्रस्थानी गणला गेला नसला किंवा लोहगड किल्ल्याएवढे राजकीय महत्व त्यास दिसून येत नसले तरीही या किल्ल्याचे महत्व महाराष्ट्रातील निवडक किल्ल्यांवर केलेल्या खर्चावरून दिसून येते. मराठी राजसत्तेकडे असलेल्या किल्ल्यांवर शिवाजी महाराज व दरम्यानच्या स्थानिक राजवटी दुर्गबांधणीस व डागडुजीस मोठे महत्व देत होत्या असे दिसून येते. किल्ल्यावरून राज्य चालविता येते. किल्ला हा राज्याचा आत्मा समजुन कायम किल्ल्यांची देखभाल व त्यावर खर्च अनेक राजसत्तांकडून कायम झाल्याचे दिसून येते.

मुघल अखबारात **18** डिसेंबर **1682** ला विसापूर गावचा संदर्भ मिळतो तो पुढील प्रमाणे ः

शहाबुद्दीन खानाचा विनंती अर्ज आला की, "चालू (जिल्हेज) महिन्याच्या **14** तारखेला (**4** डिसेंबरला) चाकण येथे मला खबर मिळाली की, शत्रूचे लोक लोहगडाकडे आले आहेत. म्हणून मी स्वारी केली. शत्रूच्या जवळ जवळ **60** लोकांना ठार मारले. पुढे खबर मिळाली की, शत्रूचे लोक ईसापूर येथे येऊन चौथ□चौथाई चा कर□वसूल करीत आहेत. म्हणुन मी तीन कोस□1 कोस म्हणजे **3.2** कि.मी.□धावून गेलो. शत्रुपैकी बहुतेकांना मारून व जखमी करून त्यांचा पराभव केला." या ऊल्लेखावरून चाकणच्या मुघलांच्या किल्लेदाराने

[26] *शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड* **- 2**, श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, **2009**, पृ.**413**.

मराठयांचा पराभव करून त्यांच्या चौथाई वसुलीस खोडा घातल्याचे दिसून येते व दरम्यानच्या काळात लोहगड व विसापूर दोन्ही किल्ले मुघल सत्तेकडे असल्याचे आढळते.

औरंगजेब बादशहाच्या निधनापर्यंत मराठयांचे किल्ले मुघल सत्तेमार्फत घेतल्या गेल्याचे आढळते. मात्र **1707** साली औरंगजेबाच्या निधनानंतर **1709** मध्ये विसापूर किल्ला बेवसाऊ बनल्याचा उल्लेख आला आहे. परंतु याच सालात त्याच्या पुढील पत्रात किल्ला वसाऊ बनल्याचेही दिसून येते. "पूर्वी लोहगड, राजमाची दोन किल्ले याचा मसाला रयतेस होता. त्याखालील रयत आजुदा असता हल्ली विसापूर जहाला□वसला□ त्याने तो त्राहे म्हणविले, येसा प्रजेवर ईश्वरशोभ... विसापूरकर वाडेने जातात. त्या पादिलशी नाहक इजत(हुज्जत) घालतात"[27] दरम्यानच्या काळात मराठी राज्यातील महत्वपूर्ण किल्ल्यांमध्ये विसापूर किल्ला गणला जात होता.

औरंगजेबाच्या निधनानंतर महाराष्ट्रातून मुघलांच्या फौजा दिल्लीस गेल्या असल्या तरी महाराष्ट्रातील किल्ल्यांची व्यवस्था लावून त्या फौजा गेलेल्या दिसून येतात. या दरम्यान मुघल व मराठे यांच्यात किल्ले हस्तगत करण्यावरून संघर्ष तयार होत असल्याचे दिसून येते. औरंगजेब बादशहानंतर मुघलांतील राजगादीवर बसणारा प्रवळ बादशहा नसल्यामुळे व मराठयांचे महाराष्ट्र सोडून बाहेर चौथ वसूली करण्याचे धोरण असल्यामुळे मुघल राजवट नाममात्र राहीलेली आढळते. या दरम्यान महाराष्ट्रातील बहुतांशी प्रबळ किल्ले मराठी राजसत्तेकडून हस्तगत केल्या गेलेले दिसून येतात. बाळाजी बाजीराव पेशवे यांच्या रोजनिशीतील **1747** सालच्या उल्लेखावरून लोहगडवाडीच्या व विसापूर किल्ल्याच्या पायथा असलेल्या पाटण गावच्या पाटलांत भांडणे झालेली आढळतात. दसरा या सणाच्या दिवशी विसापूर किल्ल्यावर यात्रा भरवीण्याची मध्ययुगीन पद्धत होती. यात्रा करण्याचा मान लोहगडवाडीच्या पाटलाचा असूनही पाटणच्या पाटलाने येवून जत्रा करवीली त्यामुळे दोघा पाटलांत कलह झालेला दिसून येतो. त्यातून दंड वसूली झालेलीही आढळते. "नारो भगवंत यांस पत्र की, मौजे लोहवाडी येथील शिवेंत किल्ले विसापूर आहे. त्यास लोहवाडीच्या पाटलाने येऊन किल्ल्याची जत्रा करावी येणेप्रमाणे शिरस्ता आहे. त्यास सालमजकूरी दसऱ्याचे जत्रेस पाटण येथील पाटील आणून तुम्ही किल्ल्याची जत्रा करविली म्हणोन लोहवाडीचा पाटील लोहगडास फिर्याद होऊन पाटणच्या पाटलापासून दाहा रूपये मसाला घेतला, त्यावरून तुम्ही लोहगडाच्या पाटलास वीस रूपये मसाला घेतला. पाटणच्या पाटलाचा मसाला लोहगडकर यांनी दिल्हा आणि

---

[27] सं.भा.तापकीर, *महाराजांच्या जहागीरीतून*, गरूडझेप प्रकाशन, **2012**, पृ.**195**.

लोहवाडीच्या पाटलाचा मसाला तुम्ही दिल्हा नाही म्हणून विदीत झाले त्यावरून हल्ली देवविले असेत, तर पाटील मजकूराचा रूपये 20 वीस घेतला आहे. तो फिरोन देणे"[28] यावरून विसापूर किल्ला लोहवाडीच्या शिवेत असे दिसून येते. म्हणजेच दरम्यानच्या काळात विसापूर किल्ल्याचे स्वतंत्र अस्तित्व राहिलेले नसून लोहवाडीच्या शिवेत त्यास गणले गेलेले व लोहवाडी अनुशंगाने लोहगड किल्ल्यास विसापूर किल्ला अंकीत झालेला निदर्शनास येतो. तसेच विसापूर किल्ल्यावर दसऱ्यास मोठी यात्रा भरविण्याची मध्ययुगीन परंपरा समोर येत असून यात्रा भरण्याचे ठिकाण 'टाक्यातील हनुमान' व त्याच्या भोवतीचा परीसर असण्याचा संभव आहे. यात्रेची मध्ययुगीन परंपरा किती दिवस चालत होती याबद्दल पुराव्याअभावी सांगता येत नाही. मात्र विसापूर किल्ल्यावरील 1818 सालच्या कर्नल प्रॉथरच्या कबजानंतर ही परंपरा खंडीत झाली असावी असा संभव आहे.

विसापूर किल्ल्याच्या सुरक्षेप्रमाणेच किल्ल्यातील सैन्यासाठी उत्तम प्रकारच्या पाण्याची व्यवस्था व राहण्यासाठी घरे बांधलेली होती. या सुरक्षाव्यवस्थेत दक्षिण तटबंदीस आतमधीलबाजूने चढ उताराची जमिन होती तेथे उताराच्या ठिकाणी खोलगट भाग निर्माण झाला होता. त्यात पहारेकरी सैन्य पडू नये म्हणून दर 10 फुट अंतरावर लोखंडी पहारी ठोकून त्यास गज किंवा साखळया बांधल्या होत्या असे दिसून येते. भविष्यात अपघात घडू नये याकरीता आधीच केलेली उपाययोजना म्हणजेच अपघातपुर्व नियोजन केलेले दिसून येते. यावरून सैन्याच्या सुरक्षेला किती महत्व दिले जात होते याची माहीती मिळते. किल्ल्याची सुरक्षा व सैन्याच्या जिवाची सुरक्षा यासाठी मध्ययुगात अनेक योजना केल्या जात. यात काही अंधश्रध्दाही होत्या मात्र यामागे सैन्याचे जीवरक्षण ही भुमीका असल्याचे दिसून येते. 1753 –54 मध्ये एक अद्‌भुत बावी विषयक पत्र सरदार दुर्गाजी विसापूर किल्ल्याचा हवालदार त्याने पाठविलेले सापडते ते पुढीलप्रमाणे ः "येवजी लोंबट हवालदार किल्ले विसापूर किल्ल्यावर दुखणेयाची साथी येऊन शेसव्वासे माणूस दुखणाईत पडले. पंचवीस माणूस मेले. उपाय केला, पण गुण येत नाही. सर्वांचे मते अद्‌भुत शांत करावे".[29] विसापूर किल्ल्यावर अदभुत शांत करण्यासाठी परवानगी द्यावी असा दुर्गाजीने सरकारात अर्ज केलेला आढळून येतो तसेच सरकारातून अद्‌भुत शांतीसाठी पैसे खर्च केल्याचेही दिसून येते. म्हणजेच अंधश्रध्देच्या विळख्यातील तत्कालीन समाजाचे चित्रण तसेच सरकारचेही

---

[28] द.वा.पारसनीस (संपा.), *बाळाजी बाजीराव पेशवे रोजनीशी*, निर्णय सागर प्रेस प्रकाशीत, 1908, पृ.78.

[29] सतिश अक्कलकोट, *दुर्ग*, सहयाद्री दुर्गभ्रमण मंडळ प्रकाशन, 2009, पृ.424.

अंधश्रध्देचे चित्रण येथे दिसून येते. तसेच किल्ल्यावरील सैनिकांस कोणी त्रासवित असेल तर त्यासही कठोर शासन करण्याची पात्रता दरम्यानच्या सरकारने ठेवलेली आढळून येते. उदाहरणार्थ ः "विसापूरच्या किल्ल्यातील पाच शिपायांना काही पोर्तुगीज शिपायांनी त्रास दिल्याने त्यांना पोर्तुगीज शिपायांना कैद केले. पोर्तुगीज शिपायांना राजमाची किल्ल्यावर दिपाजीराव येरूणकरांकडे कैदेत ठेवण्यास पाठविले."[30] हे पत्र **1751** सालचे असून यातून सैन्याच्या सुरक्षेविषयी सरकार उदासिन नव्हते असे दिसून येते. तसेच पोर्तुगीज फक्त गोव्यापुरते मर्यादीत न राहता महाराष्ट्रात अनेक ठिकाणी किल्ल्यांच्या परिघापर्यंत पोहोचलेले आढळून येते.

विसापूर किल्ला मावळ तालुक्यात विस्तिर्ण माथा असलेला सर्वात मोठा गणला जाणारा किल्ला आहे. मध्ययुगात लोहगड किल्ल्याच्या नंतर विसापूर किल्ल्याचे महत्व कागदपत्रांमधून अधोरेखित झालेले आढळून येते. तिकोणा व तुंग या किल्ल्यांची नावे विसापूर किल्ल्याच्या आधी कागदपत्रांतून येत असली तरीही तिकोणा व तुंग या दोन्ही किल्ल्यांमधील महत्वाच्या चिजवस्तू(दारूगोळा, तोफा) विसापूर किल्ल्यावर नेण्यात आल्याचे दिसून येतात. दरम्यानच्या काळात विसापूर किल्ला महत्वाचे लष्करी केंद्र मानले गेले असावे असे दिसून येते. तोफा व शस्त्रास्त्रे विसापूर किल्ल्यास हलविण्यात आल्याची नोंद **1750-51** च्या पत्रावरून दिसून येते. "किल्ले तिकोना येथील दारूगोळी, तोफा वगैर जिन्नस किल्ले विसापूरास नेला आहे. त्यांत हरी बल्लाळ दिमत आपाजी बाबुराव यांची बटीक किल्ल्यावर होती. तिजला नेली आहे म्हणून विदित झाले. सदर बटिक व तिचा पोर ऐसी दोघे हरी बल्लाळ यांचे स्वाधीन करणे. बाकी दागिने व जिन्नस राहिला त्यापैकी शिशाच्या विटा मोजदादीशिवाय सांपडल्या आहेत. त्या ठेऊन, बाकी जिन्नस तिकोन्यापैकी राहील तो रा.चिमणाजी पंडित सचीव यांजकडील माणसे येतील त्यांचे पदरी घालणे, पावल्याची पोहोच घेणे म्हणून नारो भगवंत यास सनद"[31]

वरील पत्रातून तिकोणा किल्ल्याचा किमती जीन्नस व किल्ल्याच्या संरक्षणात सर्वात महत्वपुर्ण गणली गेलेली गोष्ट म्हणजे तोफा विसापूर किल्ल्यास हलविल्या गेल्याचे आढळून येते. यावरून विसापूर किल्ल्यावरून एखादी महत्वपुर्ण मोहिम करायची असावी व त्यासाठी विसापूर किल्ल्यावर तोफा वगैरे चढवून किल्ला राबता केला असावा असे दिसून येते.

---

[30] तत्रैव, पृ. **74**.

[31] तत्रैव, पृ. **32**.

संभाजी राजेंचे पुत्र छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या ताब्यात मावळ तालुक्यातील बहुतांशी किल्ले होते. दरम्यान विसापूर किल्ला त्यांच्या ताब्यात होता, छत्रपती शाहू महाराज व कान्होजीराजे आंग्रे यांच्यातील **28** फेब्रुवारी **1714** रोजी झालेल्या तहान्वये विसापूर किल्ला छत्रपती शाहू महाराज यांजकडे देण्यात आला त्यानंतर तो पेशव्यांकडे गेला असण्याची शक्यता आहे.

लोहगड किल्ल्याचे अस्तित्व विसापूर किल्ल्यावर व विसापूर किल्ल्याचे अस्तित्व लोहगड किल्ल्यावर नेहमीच अवलंबून होते असे अनेक कागदपत्रांतून आढळते. यातील एखादा किल्ला शत्रूसैन्याच्या हाती गेला तर दुसऱ्या किल्ल्याचे संरक्षण करणे अशक्य गोष्ट होती असे दिसून येते. म्हणून **1818** साली कर्नल प्रॉथरने पहिला विसापूर किल्ला घेतला व त्वरीत लोहगड किल्ल्यावरील मराठी सैन्य किल्ला सोडून निघून गेले.[32]

लोहगड व विसापूर दोन्ही किल्ले कायम एकाच राजसत्तेकडे असल्याचेही दिसून येते. नानासाहेब पेशवे यांनी विसापूर किल्ल्याच्या किल्लेदारास शिवाजी कृष्ण यास दिलेल्या एका सनदेवरून दोन्ही किल्ल्यांचे अस्तीत्व एकमेकांवर अवलंबून असल्याचे दिसून येते. **1754 □55** सालच्या नोंदीप्रमाणे, "किल्ले लोहगड पायनाळयास सरकारचे कोठीची गडद आहे, तिची भिंत जुनी जाहली आहे, त्यामुळे गल्ला जाया होतो, सबब भिंत जुनी आहे ती पाडून नवी घालून घेणे. भिंत चुनेगच्ची घालणे. किल्ले मजकूरचे माचीस त्रिंबक जोशी याचे परसांत विहीर आहे, तिजला पाणी बहुत आहे. ती विहीर, तुम्ही किल्ले विसापूरपैकी सामान नेऊन, दोन हजार रूपयांमध्ये विहीर तयार करणे. बलकुबलीस विहीरीत पाण्याचा बिंदु न राहे, ऐसी तळी सांड राखून काम चांगले तयार करणे. म्हणून शिवाजी कृष्ण किल्ले विसापूर यांस सनद **1**"[33] यावरून लोहगड व विसापूर हे दोन्ही किल्ले कायमस्वरूपी एकाच शाहीकडे असल्याचे आढळते. तसेच लोहगड किल्ल्यास हवे असलेले साहीत्य विसापूर किल्ल्यावरून व विसापूर किल्ल्यास अपेक्षित साहित्य लोहगड किल्ल्याकडून घेण्याची समकालीन पद्धत दिसून येते.

मध्ययुगात किल्ल्यांवर दसऱ्याचा उत्सव होत असल्याचे आढळले आहे. मात्र विसापूर किल्ल्यावर लग्नसमारंभ उरकलेलाही आढळून येतो तसेच दरम्यानचा जमाखर्च झाल्याचीही माहिती मिळते. किल्ल्यावरील

---

[32] मराठी विश्वकोश, खंड ः **16**, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, **1999**, पृ. **955**.

[33] का. ना. साने (संपा. ), *बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी*, **1911**, पृ. **198**.

हवालदाराच्या मुलीच्या लग्नात त्यास सनद दिली गेली व सनद देतांना सरकारातून न देता तुमच्या कडून येणे बाकी त्यातून वळते करावे असा आशय असल्याचे दिसून येते. “येवजी लोंबट हवालदार किल्ले विसापूर यांस सनद की, तुमचे कन्येचे लग्न आहे, यास्तव काही लग्नाचे बेगमीकरिता अर्जबाब देववावी म्हणून तुम्ही विनंती पत्र लिहीले. त्यावरून तुम्हाकडे किल्ले मजकूरचे शिलकेपैकी ऊसनवार रूपये **200** दोनशे येणे आहेत, ते तुम्ही आपलेबद्दल मुशाहिरा खर्च लिहीणे, जाजती द्यावयास अनुकूल पडत नाही म्हणून सनद” या पत्रात हवालदाराकडून येणारे पैसे ऊसनवार असल्याचे आढळते. वरील पत्रातून **1753** साली येवजी लोंबट हवालदार यांच्या कन्येचे लग्न असल्याचे व त्यांस पैशांची आवश्यकता असल्याचे दिसून येते.

प्राचीन काळापासून मावळ तालुक्यात तांदुळाचे ऊत्पन्न मोठया प्रमाणावर घेतले जाते. सध्याही येथे तांदळाचे उत्पन्न मोठया प्रमाणावर घेतले जाते. मावळ तालुक्यात कायम भातशेती केली गेली व सध्याही चालू आहे. म्हणून विसापूर किल्ल्याच्या ईशान्य दिशेस असलेल्या उंच पर्वतास भातराशी असे संबोधले जाते. मावळ तालुक्यात भातशेती कायम अग्रेसर असून इंद्रायणी नदीमुळे येथील तांदुळ इंद्रायणी तांदुळ म्हणुन ओळखला जातो. इंद्रायणी तांदुळ भारतभर लोकप्रिय असल्याचे दिसून येते. विसापूर किल्ल्याच्या परिघात दर्जेदार तांदुळ असल्याने इसवी सन **1753** □**54** मध्ये विश्वासराव पेशवे यांच्या लग्नाकरीता विसापूर किल्ल्याच्या हवालदाराकडून तांदुळ मागविला गेला असे दिसून येते. “येवजी लोहट हवालदार किल्ले विसापूर यांस पत्र की, चिरंजीव रा.विश्वासराव याचे लग्नास तांदुळ किल्ल्याचे दास्तानपैकी आणावयास नरसापा वाणी याचे बैल सर **123** पाठविले आहेत. तरी दर बैलावर तांदूळ केली **2** □अडीच मण प्रमाणे मोठे असडीक खंडी **1** □□**2** □ सवा पंधरा खंडी अडीच मण पाठविणे म्हणोन सनद”[34]

- पेशवाईत विसापूर किल्लाचा कैदखाना म्हणून झालेला वापर ः

पेशवे काळात विसापूर किल्ल्याचा उपयोग तुरूंग म्हणून मोठया प्रमाणावर झालेला आढळून येतो. दरम्यानच्या काळात बारभाईनी रामचंद्र गोवींदला विसापूर किल्ल्यात कैद ठेवले होते. तुळाजी आंग्रेंचा मुलगा

[34] द.बा.पारसनीस, पुर्वोक्त, पृ.**113**.

काही दिवस विसापूर किल्ल्यावर कैदेत होता पण त्याला तेथून निसटण्यात यश आले. तुळाजी आंग्रेदेखील काही काळ विसापूर किल्ल्यावर कैदेत होते.[35] सारांश पेशवाईत विसापूर किल्ला व महाराष्ट्रातील बहुतांशी किल्ले हे पेशव्यांकरवे कैदखाने म्हणूनच वापरले गेलेले निदर्शनास येतात. रायगड किल्ल्यावरही कैदी ठेवल्याचे दिसून येते.

विसापूर किल्ल्यावर तुळाजी आंग्रे व त्यांचा मुलगा कैदेत होता. त्याचप्रकारे पेशवाईतील शिवराम गिरमाजी यासही सरकार कडून कैदेत टाकले होते याबद्दलचा ऊल्लेख पुढीलप्रमाणे ः "शिवराम गिरमाजी यांस कैदेत टाकले. पायात बेडी घातली. त्याचप्रमाणे सदाशिव रामचंद्र याची मुले, माणसे कैदेत पाठविली"[36]

इसवी सन **1774** □**75** मध्ये जिवाजी पुरूषोत्तम यास दंगा करून ठाणे काबीज करण्याच्या गुन्हयात विसापूर किल्ल्यावर कैद मिळाली. "जिवाजी पुरूषोत्तम, तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडून सनदा घेऊन परगणा लक्ष्मेश्वर येथे येऊन लोक फिताऊन दंगा करून ठाणे घ्यावे या राजकारणांत होता, त्याची बातमी पांडुरंग गोविंद यांस मिळताच कैद करून हुजूर पाठविला तो तुम्हांकडे अटकेत ठेवावयासी पाठविले असे, तरी यांस किल्ले विसापूर येथे पक्के बंदोवस्ताने अटकेत ठेऊन पोटास शेर मध्यम प्रतीचा देत जाणे. म्हणोन तालुके राजमाची निसबत रामराव नारायण यांचे नांवे हस्तकपत्र पुरंधर व परवानगी रूबर छ."[37]

पानीपतच्या युद्धानंतर मराठयांचे वर्चस्व कमी होवून ब्रिटिश राजसत्ता प्रबळ होतांना दिसून येते. **1818** साली ब्रिटिशांनी संपुर्ण भारतात त्यांचा अंमल प्रस्थापित केला. मात्र त्याची सुरूवात अनेक ठिकाणांचे किल्ले ब्रिटिशांनी हस्तगत करून केली असल्याचे दिसून येते. या दरम्यान इसवी सन **1780** साली एका राजकारणात इंग्रजांकरवे एक हेर पेशव्यांच्या लष्करात आला परंतु तो हेर असल्याचे कळताच त्यास कैद केले गेलेले आढळते. त्यास विसापूर किल्ल्यावर कैदेत ठेवण्यात आले. एक इंग्रज अधिकारी आपटीन याच्या सांगण्यावरून तो आल्याचे त्याने कबुली दिली. शिरस्त्याप्रमाणे त्यास ठार न मारता कैदेत ठेवून त्याचेकडून माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न केले गेलेले दिसून येते. मात्र मराठयांच्या हालचाली व किल्ल्यांवरील त्यांच्या

---

[35] सं.भा.तापकीर, पुर्वोक्त, पृ.**195-96**.

[36] गणेश वाड (संपा.), *सवाई माधवराव पेशवे यांची रोजनीशी*, **1909**, पृ.**46-48**.

[37] तत्रैव, पृ.**128**.

शस्त्रसाठयाबद्दल तसेच मोहिमांबद्दल ब्रिटिशांना माहीती पुरविणाऱ्या व्यक्तीला पकडून कैदेत टाकले असल्याचे दिसून येते. "शेख अबदुल खिजमतगार दिल्लीचा राहाणवाला दिमंत आपटीन इंग्रज याजकडून बातमीस लष्करांत आला होता तो सापडला, सबब किल्ले विसापूर येथे अटकेस ठेवावयास पाठविला असे, तरी पोटांस शेर दररोज शिरस्तेप्रमाणे देऊन चौकीपहाऱ्यांत ठेवणे म्हणोन, भिकाजी गोविंद, किल्ले विसापूर यांचे नावे सनद"[38] शेख अबदुल याच्या हेरगीरीची शिक्षा त्यास कैदेत भोगावी लागली. मात्र ब्रिटिश लोकांची मराठी राज्याबद्दलची भुमीका यातून स्पष्ट होते आहे. विसापूर किल्ल्यावरील काही निवडक कैद्यांच्या सुटकेचे ऊल्लेख सोडता इतर कैद्यांस किती दिवस कैद भोगावी लागली याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध होत नाही. मात्र इंग्रजांकडून हेरगीरी करणाऱ्या शेख अबदुल यास एक वर्षात म्हणजेच **1781** साली सोडून दिलेले दिसून येते. "भिकाजी गोविंद किल्ले विसापूर यांस सनद की, इंग्रजांकडील उध्दव ब्राम्हण मालवी व सेख अबदल्ला खिजमतगार एकूण दोन असामी, हरी बल्लाळ यांणी स्वारीतून साल गुदस्ता किल्ले मजकूर येथे अटकेस ठेवावयास पाठविले आहेत, त्यांस सोडून देणे, व तुळाजी आंगरे याची बायको किल्ले मजकूरी अटकेस आहे, तीस पक्का जामीन विशेचा घेऊन किल्ल्याखाली उतरून हुजूर पुणियास पाटऊन देणे व जामीनकतबाही पाठविणे म्हणोन"[39] दरम्यानच्या काळात हेरगीरी करणाऱ्या कोणत्याही जाती धर्मातील व्यक्तीस मृत्युदंड देण्याची पद्धत होती. मात्र ब्रिटिशांकडून हेरगीरी करूनही त्यास कैदेतून मुक्त केलेले दिसून येत असून याचे कारण ब्रिटिश राजवटीचा मराठी राजवटीवर वाढता दबाव असल्याचे दिसून येते. ब्रिटिशांच्या वाढत्या प्रभावाखाली भारतातील अनेक राजसत्ता अंकीत झालेल्या होत्या. तसेच ब्रिटीशांच्या अनेक चुकीच्या धोरणांचेही समर्थन स्थानिक राजसत्ता करायला लागलेल्या दिसून येतात. त्यामुळे मराठी राज्याच्या गुप्त बातम्या पोहोचविणारा शेख यास त्वरीत सोडून देणे मराठी राजसत्तेस भाग पडलेले दिसून येते. वरील पत्रातून कैदी सोडल्याचे दिसून येत असून तुळाजी आंग्रे यांच्या बायकोस कैद केल्याची माहितीही मिळते आहे.

केसो बाबाजी याने विसापूर किल्ल्यावरून **1777 □78** साली सरकारात पाठविलेल्या अर्जात कसबे खालापूर प्रांत कल्याण येथील रयतेस वसविण्यासाठी तेथील तीन वर्षाचा जकात माफ करावा असे पाठविले. या

[38] तत्रैव, पृ. **48**.

[39] तत्रैव, पृ. **52**.

अर्जरूपी पत्रातून महादजी शिंदे यांचा महत्वपूर्ण ऊल्लेख आलेला असून झालेल्या नुकसानाच्या विषयी व त्यावरील योजना करण्यासंबंधी हे पत्र पाठविलेले दिसून येते. "केसो बाबाजी किल्ले विसापूर याणी हुजूर विनंति केली की, कसबे मजकूरी सालगुदस्तां तोतयाचे पारिपत्यास माहादजी शिंदे फौजसुध्दा गेले तेव्हा जळाला त्यामुळे रयत परागंदा झाली. कसब मातबर उदमी खुमाविना बाजारची अमदानी होत नाही. आठा दिवशीं बाजार भरतो, त्यास उदमी खुमाकडे जकातीचा मक्ता सव्वाशे रूपये आहे, तो तीन साले माफ केल्यास पुर्ववतप्रमाणे रयत येऊन वसाहत होईल म्हणोन, त्याजवरून मनास आणिता सालगुदस्ता महादजी शिंदे तोतयाचे पारिपत्यास फौजेसुध्दा गेले, तेव्हा कसबे मजकूर लुटला, त्यामुळे रयत परागंदा जाहली, त्यास आबादीवर नजर देऊन जकातीचा मक्ता उदमी खुमाबद्दल दरसाल रूपये **125** सवाशे आहे, तो सालमजकूर, व पेस्तर सन तिसा सबैन दुसाला माफ केला असे, तरी तुम्ही कसबे मजकुरी येऊन आबादी करणे. माफी दोन साले भरली यांवर मक्त्याप्रमाणे दरसाल वसूल देत जाणे म्हणोन, वाणी उदमी वगैर खुम कसबे खालापूर तर्फ बरेटी प्रांत कल्याण."[40] यावरून रयतेस वसविण्यासाठी व प्रांताचे वर्धन तसेच समृध्दी होण्यासाठी सरकारातून जकात माफी मागीतली असल्याचे दिसून येते. यांस जकात माफ झाला की नाही याबद्दल माहिती उपलब्ध झालेली नाही.

ब्रिटिशांचे वाढते वर्चस्व स्थानिक राजसत्तांस गिळंकृत करणारे होते. त्यासाठी स्थानिक राजसत्ता त्यांच्याशी सतत तह व संलग्नता ठेवण्याच्या प्रयत्नात असल्याचे आढळते. यात ब्रिटिश अधिकाऱ्यांना जेवणाची आमंत्रणे देणे, त्यांना किल्ले फिरविणे अशा गोष्टी केलेल्या दिसून येतात. यातीलच एक गोष्ट म्हणजे ब्रिटिश वकील चार्ल्स मॅलेट हा **1785** साली मुंबईहून पुण्याकडे येत होता. प्रवासादरम्यान त्याच्या मुक्कामाची सोय मराठी राज्यातील विविध किल्ल्यांवर करण्यात आलेली दिसून येते. त्यावेळी विसापूर किल्ल्याचा किल्लेदार भिकाजी गोविंद आणि लोहगड किल्ल्याचा किल्लेदार बाळाजी जनार्दन यांना इंग्रज वकिलाच्या मुक्कामाची सोय करण्यास सांगीतलेले दिसते. "मेस्त्र मालीट वकील इंग्रजांकडील मुंबईहून पुण्यास येतात, त्यांस वोझ्यास बेगारी व येतांना मुक्कामास राहतील तेथे रहावयास जागा व शाखभाजी, पानपत्रावळ व लाकडे वैरण वगैरे, महादजी त्रिंबक कारकून निसबत नारो महादेव गद्रे यांस पाठविले आहेत. हे कार्यकारण पाहोन सांगतील त्याप्रमाणे साहित्य करीत जाणे म्हणोन"[41] प्रस्तुत पत्रावरून ब्रिटिश वकीलांची चांगली व्यवस्था मराठी राज्यात किल्ल्यांवर ठेवली जात होती

---

[40] तत्रैव, पृ. **144**.

[41] तत्रैव, पृ. **68**-**69**.

असे दिसून येते . औरंगजेब बादशहाच्या निधनानंतर दरम्यानच्या काळात ऊपलब्ध प्रादेशिक सत्तांनी आपले वर्च स्व प्रस्थापित करण्यास सुरवात केली होती त्यात सर्वात सरस ठरलेले ब्रिटीश व त्यांच्या अंकीत झालेल्या सर्वच स्थानिक प्रादेशिक सत्ता या परिस्थितीमुळे **1750** नंतर ब्रिटीश अधिकारी व सैन्य यांस विशेष महत्व प्राप्त झालेले कायम दिसून येते .

**1802** साली पेशवे सरकारच्या मदतीसाठी तळेगाव दाभाडे मधील सेनापती दाभाडे घराण्यातील दुसरे यशवंतराव वसई येथे गेले त्यावेळी यशवंतराव दाभाडे यांनी त्यांचा परिवार विसापूर किल्ल्यावर ठेवल्याचे निदर्श नास येते . "यशवंतराव दाभाडे वसईला पेशव्यांच्या मदतीसाठी जात असतांना त्यांचा परिवार□बायको व मुले□ विसापूर किल्ल्यावर सुरक्षित ठेवण्यात आले . त्यासाठी विसापूरचा तत्कालीन किल्लेदार हंसाजी निकम यास लेखी सूचना देण्यात आली"[42] तळेगाव दाभाडे मध्ये सेनापती दाभाडे घराण्याचा वाडा असतांना तसेच इंदोरी गावात इंद्रायणी नदीकाठी इंदोरीचा किल्ला असतांना यशवंतराव दाभाडे यांनी त्यांचा परिवार विसापूर किल्ल्यावर का ठेवला याबद्दल माहिती उपलब्ध होत नाही . मात्र इंदोरी, तळेगाव, चऱ्होली, चांदखेड या सर्व ठिकाणच्या वाडयांहून विसापूर किल्ला सुरक्षेच्या दृष्टीने भक्कम असल्यामुळे त्यांनी परिवार विसापूर किल्ल्यावर ठेवला असावा . वरील उल्लेखामधून विसापूर किल्ल्याचा तत्कालीन किल्लेदार हंसाजी निकम यांचे नाव ज्ञात होत आहे .

इंग्रजांच्या **1818** सालच्या मोहीमेत ज्याप्रकारे **10** मे **1818** रोजी रायगड किल्ला कर्नल प्रॉथर याने हस्तगत केला त्याप्रकारे महाराष्ट्रातील अनेक किल्ले ब्रिटिशांनी स्वाधिन करून घेतले यात खऱ्याअर्थी मराठेशाही **1818** साली संपली असल्याचे निदर्शनास येते . इंग्रज □मराठे युध्दात दुसरा बाजीराव पेशवे व इंग्रज यांच्यातील भांडणामुळे इंग्रजांनी कर्नल प्रॉथर सोबत मोठा फौजफाटा देवून लोहगड व विसापूर जिंकून घेण्याच्या मोहीमेवर त्यास नामजाद केले . या मोहीमेत **380** युरोपीयन सैनिक व **800** ऐतद्देशीय सैनिक होते .[43]

लोहगड किल्ला मजबूत असल्यामुळे कर्नल प्रॉथर व त्याच्या सैनिकांनी जय्यत तयारी केली होती परंतु लोहगड किल्ल्यावर हल्ला न करता त्याने आधी सौम्य प्रतिकार घेत विसापूर हस्तगत केला व त्यानंतर लोहगड

---

[42] बापू जोशी (संपा . ), *दुसरा बाजीराव पेशवे रोजनीशी*, **1902**, पृ . **79** .

[43] Gazetteer of the Bombay Presidency, Poona, Vomume XVIII, part III, P.255.

किल्ला मराठयांनी सोडला. विसापूर किल्ला जिंकल्यानंतर सर्वप्रथम कर्नल प्रॉथरने पाटण व दक्षीण दोन्ही दरवाजे पाडले व विसापूर किल्ल्याचे लष्करी सामर्थ्य संपुष्टात आणले.

प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन काळात अनेक राजवटी विसापूर किल्ल्यावर नांदलेल्या दिसून येतात. मात्र दरम्यानच्या काळातील मराठे अद्ययावत नसल्यामुळे तसेच ब्रिटिशांकडे त्या वेळच्या अद्ययावत तोफा असल्याने मोठया बलाढय किल्ल्यांसही ब्रिटिशांनी सहजगत्या हस्तगत केलेले आढळून येते. यात **4** मार्च **1818** रोजी बलाढय विसापूर किल्ला कर्नल प्रॉथरच्या अधिपत्याखाली अल्प प्रतिकारात ब्रिटीशांच्या अंकीत झाला.[44]

[44] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, p.687.

# प्रकरण पाचवे

# तुंग किल्ला

| | | |
|---|---|---|
| भौगोलिक स्थान | ः | **$18^{o}$ 39'** रेखांश उत्तर, **$73^{o}$ 27'** अक्षांश पूर्व[1] |
| जिल्हा | ः | पुणे |
| दुर्ग प्रकार | ः | गिरीदुर्ग |
| समुद्रसपाटीपासून उंची | ः | **3526** फुट[2] |
| पायथ्यापासून उंची | ः | **200** मीटर |
| दुर्गाच्या माथ्याचा परीघ | ः | **1.1** कि.मी. (**0.7** मैल) |
| गडाची इतर नावे | ः | कठीणगड, बंकीगड, पतकी, तपकी, तुंगी, तुंग |

## दुर्ग चिकीत्सा

तुंग किल्ला तिकोणा किल्ल्यापासून **6.2** कि.मी. (**3.8** मैल) अंतरावर आहे. मध्ययुगात तुंग किल्ल्याच्या परीघास तुंगारण्य असे संबोधले जात होते. तुंग किल्ला शिवाजी महाराजांच्या बारा मावळापैकी (सहा मावळ व सहा खोरी) पवन मावळ विभागात येतो. तिकोणा किल्ल्याच्या त्रिकोणी आकारामुळे त्याचे नाव तिकोणा पडले तसेच तुंग किल्ल्याच्या उत्तुंग उंचीमुळे किल्ल्याचे नाव तुंग झाले असण्याचा संभव आहे. किल्ल्याच्या पायथ्यास जाण्यासाठी तुंगवाडी, वनमाळ, गरमाळ या तीन गावांमधून पायवाटा आहेत. परंतु

---

[1] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, P.586.

[2] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, P.586.

किल्ल्याच्या माथ्यावर जाणारी दक्षिण कातळकडयाची एकमेव पायवाट आहे. तुंगवाडीतील रस्त्याच्या डाव्याबाजूस असलेल्या हनुमानाचे मंदीराच्या समोरील पायवाटेने किल्ल्याच्या माथ्यावर जाता येते.

- किल्ला पायथ्याच्या तुंगवाडीपर्यंत जाण्याचा मार्ग ः

किल्ला पायथ्याच्या तुंगवाडी पर्यंत जाण्यासाठी पुणे, लोणावळा तसेच मुंबई येथून आयनेस शिवाजी व सहारासिटी रोड मार्गे घुसळखांब येथून डाव्याबाजूस तुंगवाडीस जाण्याचा मार्ग आहे. पुणे येथून कामशेत मार्गे पवनाधरण व धरणाच्या डाव्याबाजूने तिकोणा किल्ला मार्गे जवण गावमधून तुंगवाडीस जाण्याचा मार्ग आहे. पौडमार्गे कोळवणहून जवण गावी येवून येथून तुंगवाडीस जाण्याचा मार्ग आहे. सध्या नविन विकसीत करण्यात आलेला मार्ग म्हणजे पवना धरणातून लॉचमार्गे तुंगवाडीस जाता येते.

- किल्लापायथा तुंगवाडी व भैरवनाथ मंदिर ः

तुंगवाडीमध्ये भैरवनाथ मंदिराचा जिर्णोध्दार करून मोठया सभामंडपाचे मंदीर ग्रामस्थांतर्फे **2011 – 12** मध्ये बांधण्यात आले. येथे प्राचीन मूर्ती न बदलता ऐतिहासिक मूर्तीचे जतन करून जिर्णोध्दार झाल्याने मुर्तीचे ऐतिहासिक महत्व अबाधित राहील्याचे दिसून येते. मंदिराच्या परिघात दिपमाळेचे भग्नावशेष आढळतात. तसेच शेंदूर फासलेला वीरगळ मंदिराच्या मागीलबाजूस झाडीत असून त्यास ग्रामस्थांकडून तुळाजीराव असे संबोधले जाते.

गळू या कन्नड शब्दाचा अर्थ दगड अस होतो. पराक्रमी पुरूषाच्या बलीदानानंतर त्याच्या आठवणी प्रितर्थ त्या जागी स्मारक बसविण्याची मध्ययुगीन प्दधत होती. त्यास वीरगळ असे संबोधले जाते. वीरगळांचे अनेक प्रकार महाराष्ट्रात आढळून येतात. साधारणतः वीरगळ तीन फुट उंची व चार रकाणे असलेला आढळतो. यातील पहिल्या रकाण्यात वीर व त्याची पत्नी शिवपिंडीच्या दोन्ही बाजूंनी बसलेले दर्शविले जाते. दुसऱ्या रकाण्यात विर कसा लढला व त्याच्या हातातील शस्त्र कोणते होते याविषयी कोरलेले असते. तिसऱ्या रकाण्यात

विरपुरूष मृत पावल्यानंतर आडवा मृतदेह दर्शविला जातो. चौथ्या रकाण्यात विरास स्वर्गवास मिळालेला दाखवून स्वर्गातील दास – दासी त्याची सेवा करतांना कोरले जाते. यांहूनही वैविध्यपुर्ण विरगळ महाराष्ट्रात आढळतात. बलीदानाच्या प्रकारावर विरगळाची रचना अवलंबून असल्याचे दिसून येते. अंकाई किल्ल्यास (मनमाड शेजारी, नाशिक जिल्हा) पायथ्याशी असलेले विरगळ हे **6 – 7** फुट ऊंच असून यात विराने जंगली हिंस्त्रश्वापदांशी आपली पाळीव जनावरे किंवा कुटूंबकबिला वाचविलेला आढळतो. या संघर्षात त्याचा मृत्यू झाल्यावर त्याचे बलीदान स्मरणात रहावे यासाठी किल्ला पायथ्यास विरगळ बसविला गेल्याचे आढळून येते.[3] ज्या पत्नी पतीच्या चितेवर सती जातात (सहगमन करतात) त्यांच्या पतीप्रेमाच्या त्यागाचा आदर म्हणून स्मारकरूपी शिळा उभारण्याचीही पद्धत मध्ययुगात दिसून येते. या शिळेस सतीशिळा असे संबोधले जाते. सतीचे स्मारक, सतीचे वृंदावन असेही शब्द यास वापरित असल्याचे दिसून येतात. सतिशीळेत विराच्या विरगळीतील रकाण्यांऐवजी खांदयापासून हात दर्शविला जातो. तसेच हातात बांगडया दर्शवून त्यावर चंद्र व सुर्य कोरण्याची पद्धत दिसून येते. याचा अर्थ जोपर्यंत चंद्र सुर्य आकाशात आहेत तोपर्यंत या शिळेवरील स्त्री किंवा पुरूष यांची किर्ती राहील असा होतो. यास 'यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत् समुज्ज्रृम्भते'[4] असे संस्कृत मध्ये म्हटले जाते. अनेकविध आकारातील व वैविध्यपुर्ण शैलीतील विरगळ तसेच सतिगळ महाराष्ट्रात आढळून येतात.

तुंगवाडीत विरगळ हा इतिहासातील तुळाजीराव नामक व्यक्तीचा असून एका युध्दात त्याचे व त्याच्या सैन्याचे बलीदान येथे झालेले असल्याचे पुरातत्वीय पुराव्याने दिसून येते. म्हणून तुळाजीराव व त्याच्या सैन्याचे विरगळ येथे घडवून बसविलेले दिसून येतात. मंदीराच्या समोरही अनेक समाध्या असून मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर असलेल्या समाधीवर पती व पत्नी दोहोंच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. पतीच्या हातात तलवार दर्शवीली असून या स्मारकाच्या मागीलबाजूस एका सरळ रांगेत **15** मध्ययुगीन समाध्या मोठया आकारात कोरून येथे बसविलेल्या आढळतात. उजव्याबाजूने कमांक **10** ची समाधी इतर समाध्यांपेक्षा निराळया आकाराची असून हीस चारही बाजूने दिवा लावण्यासाठी चार कोनाडे कोरलेले आढळतात.

---

[3] क्षेत्रभेट : जि. नाशीक, ता. मनमाड येथे अंकाई किल्ला पायथ्याचा अणकाई गावात सर्वदेव मंदीरासमोर एका चौथऱ्यास टेकून ठेवलेला **6** फुट ऊंचीचा विरगळ.

[4] श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ, *शिवराय मुद्रा,* **2010**, पृ. **34**.

सरळ रांगेत ठेवलेल्या समाध्यांमध्ये ऊजव्या बाजूच्या पहिल्या समाधी शेजारी एक वीरगळ जमीनीत अर्धा गाडला गेलेला आढळून आला आहे. मावळ तालुक्यातील इतर किल्ल्यांच्या तुलनेत सर्वात कमी आकाराचा माथा असलेला किल्ला म्हणून तुंगची ओळख असून सर्वात जास्त मध्ययुगीन समाधी व वीरगळ तुंग किल्ल्याच्या पायथ्यास आढळून आले आहेत. यावरून तुंग किल्ल्याच्या पायथ्यास असलेल्या तुंगवाडी या गावात मध्ययुगात एखादे मोठे युध्द झाले असावे व त्यात अनेक विरांचे बलीदान झाल्यामुळे येथे मोठया संख्येने समाधी व विरगळ तसेच सतिशिळा एकत्रित दिसून येतात.

भैरवनाथ मंदिरासमोरील दिपस्थंभ भंग पावलेला दिसून येतो. दिपस्थंभाचा खालचा भाग मंदिराच्या मागच्या बाजूस पडलेला आहे. येथील दिपस्थंभ 10 × 10 इंच जाड व 5 फुट ऊंच आहे. भैरवनाथ मंदिरासमोरील समाधींमध्ये 15 पैकी तीन समाधी निराळया शैलीतील असून यापैकी उजवीकडून मोजदाद करतांना क्रमांक 2, 5 व 14 या समाधी दुहेरी दगडीमाथ्याच्या आढळतात. येथील सर्व समाधींची ऊंची साधारणतः 2 फुट आढळून येते.

- किल्ला पायथ्याचे हनुमान मंदिर व विहीर ः

तुंगवाडी व किल्ला असे एकुण तीन हनुमान मुर्ती येथे आढळतात. किल्ला पायथ्यास असलेला हनुमान मिशी राखलेला दर्शविला आहे. या हनुमानाच्या कमरेस खंजिर शस्त्र असून ते अडकविण्यासाठी जाड आकाराचा पट्टा गळयात कोरण्यातून दर्शविला आहे. ही हनुमान मुर्ती जान्हवेधारी दर्शविली असून अनेक अलंकारांनी युक्त अशी कोरलेली आढळते. हनुमानाच्या दोन्ही हातांत व पायांत सुवर्णतोडे  दर्शविलेले आहेत. दोन्ही कानांत सुवर्ण कर्णफुले, गळयात कंठा, डोक्यावर अर्ध्या फुट उंच नक्षिदार टोप परिधान केलेला, डाव्या हातात कमळाचे फुल दर्शविले आहे. हनुमानाचे डोळे इतर हनुमान मुर्तीच्या तुलनेत जास्त मोठे असून चापटी मारण्याचा पवित्रा घेतलेला चपेटदान मारूती म्हणून यास ओळखले जाते. हनुमानाची शेपटी माथ्यावरून वळून डाव्या हातापर्यंत लांब व शेवटी गुंढाळलेली दर्शवीली आहे. येथील हनुमान मुर्ती परिघातील अनेक हनुमान मुर्तीपेक्षा निराळया शैलीतील असल्याचे दिसून येते. हनुमानमुर्ती शेजारी मध्ययुगात घडविलेला नक्षीदार दगडी दिवा ठेवलेला आहे.

मंदीराबाहेर खंडीत अस्पष्ट झालेली लक्ष्मीची मुर्ती आढळते. साधारण 200 कीलो वजनाचा गोल ऐतिहासिक गोटा मंदीराबाहेर होता परंतु तो चोरीस गेला. या दगडी गोटयाचे प्रयोजन व्यायाम व विरकला सादरीकरणाचे होते. याची चोरी झाल्यानंतर गावकऱ्यांनी साधारण त्याच आकारात व 200 कि.ग्रॅ.वजानाचा सिमेंटचा गोटा 06/10/2011 रोजी तेथेच बनवून घेतला. त्यावर तारीखही कोरलेली दिसून येते. नविन घडविलेला गोटा हनुमान मंदीराच्या समोर सभामंडपात ठेवलेला आहे.[5]

- किल्ल्याचा दक्षिण कातळकडा व त्याचे प्राचिन वैभव ः

किल्ल्याच्या पुर्व, पश्चिम व उत्तर बाजूस असलेल्या कातळकडयांपर्यंत तिव्र घसाऱ्यामुळे पोहोचता येत नाही. मात्र दक्षिण बाजूचा कातळा विस्तीर्ण असून कातळकडयापर्यंत जातांनाचा घसारा साधारण आहे त्यामुळे येथील कातळयापर्यंत पोहोचता येते. किल्ल्याच्या दक्षिण कातळयास प्राचीन काळातील खोदकाम मोठया प्रमाणावर आढळते. तसेच प्राचीन बौध्दगुंफांचा व विहारांचा मध्ययुगात सैनिकांनी मेटे म्हणून केलेला उपयोग स्पष्ट दिसून येतो. मध्ययुगीन मेटे हे प्राचीन गुफांमध्ये असून त्यास मुखाशी नाममात्र तटबंदी व आडोसा करून किल्ला लष्करी उपयोगात आणलेला दिसून येतो.

○ दक्षिण तटबंदीचे प्राचीन अवशेष व त्यांची ऊजवीकडून मोजदाद ः

1. भैरवनाथ मंदिर येथील शेजारच्या कातळयास असलेली पहिली पोढी प्राचीन काळातील असून कातळखोदीव व लहान मुखी आहे. पोढीपर्यंत पोहोचण्यासाठी साधारण 20 - 25 पायऱ्या टाके निर्मीतीवेळी खोदलेल्या आढळतात. त्यातील सध्या 9 पायऱ्या सुस्थितीत असून बाकी सुरूंग लावून पाडलेल्या दिसून येतात. पाण्याचा साठा येथे राहू नये यासाठी सुरूंग लावून पोढी फोडल्या गेल्याचे निदर्शनास येते. ब्रिटीशांनी ज्याप्रमाणे विसापूर व लोहगड किल्ल्यांवरील बांधकामे व दरवाजे पाडले त्याचप्रमाणे तुंग किल्ल्याची बांधकामे व सैनिकोपयोगी वास्तू

[5] मुलाखत, राजेंद्र कुलकर्णी, दि.22 जुन 2013, वेळ सकाळी 11ः00 वाजता.

फोडल्या असल्याचा संभव आहे. पोढीची खोली **2.5** फुट असून **9** × **3.4** फुट मुख आहे. तसेच पोढीचा आकार आतमधील बाजुने **20** × **15** फुट आहे.

**2**.कातळकडा आतपर्यंत कोरून येथे गुंफा निर्माण केलेली आढळते. बाहेरील बाजूने मोठे नैसर्गिक छिद्र दिसून येते परंतु ही मानवनिर्मित कातळखोदिव बौध्दगुंफा असल्याचे मुखाजवळ गेल्यानंतर निदर्शनास येते. गुंफेच्या वरच्याबाजूचा दगड सपाट न करता ओबडधोबड ठेवलेला आढळतो.खालच्या बाजूचा दगड खोदून आतपर्यंत कातळ गुंफा खोदल्या गेलेल्या आहेत. गुंफेच्या मुखाजवळ मध्ययुगात दगडी बांधकाम करून एक दरवाजा ठेवून गुंफा बंदिस्त केली होती. गुंफेचा आकार शिवपिंडीतील शाळुंखे सारखा असून आतमध्ये बौध्दभिक्षुंचे निवासस्थान असल्याचे येथील बसण्यासाठी असलेल्या कट्टा व स्वयंपाक करण्यासाठी खोदल्या गेलेल्या चुलीवरून निदर्शनास येते. बसण्यासाठीच्या कट्टयाला मध्ययुगात **12** ठिकाणी बांबू ठोकून **6** इंच व्यास जाड असलेला बांबू कातळात गाडता येईल अशी मोठया आकाराची छिद्र खोदलेली निदर्शनास येतात. बसण्यासाठी ठेवण्यात आलेला कट्टा **15** फुट लांबीचा असून याची उंची **1.7** फुट आहे. गुंफेच्या आतमधील बाजूस असलेल्या गोलाकार भागाचा व्यास **32** फुट आहे. मुखातून आतपर्यंत जातांना असलेल्या आयताकृती भागाची रूंदी **16.2** फुट आहे. या गुंफेची ऊंची **12** फुट असून येथे प्राचीनकाळातील मडक्याचे तुकडे व मृदेच्या भांडयांचे अवशेष(pottery) प्रस्तुत लेखकास आढळून आल्या आहेत. आतमध्ये असलेली दगडी कुसं कातळात दोहोबाजूंनी खोदून कोरलेले आढळतात. या कुसांची संख्या **10** असुन येथे कोणताही शिलालेख आढळून आलेला नाही. संशोधना दरम्यान क्षेत्रभेटीत प्रथमच ही गुंफा निदर्शनास आली तसेच प्रस्तुत संशोधनातून या गुंफेची माहीती प्रथमच समोर येत आहे.

**3**. तुंग किल्ल्यास दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या समोरील महार मेटासारखी तीन मेटं किल्ल्याच्या कातळयात डाव्या बाजुस असलेल्या कारवीच्या रानात दिसून येतात. तिन्ही मेटांतील अंतर साधारण **150** फुटांचे आहे. ही मेटं मध्ययुगात लष्करी उपयोगासाठी खोदलेली दिसून येतात. यांतून दरम्यानच्या काळातील किल्ल्याच्या सुरक्षेविषयीची सतर्कता दिसून येते.


**4**. तुंग किल्ल्याच्या दक्षिण कातळकडयास असलेल्या लहानमुखी व आतमध्ये विशाल आकाराच्या चार गुंफा/भुयारे आणि त्याचे प्राचीन महत्व पुढीलप्रमाणे –

किल्ला पायथ्यास असलेल्या हनुमानमंदिराच्या शेजारील बाजुने किल्ल्यावर चढण्याची वाट आहे. किल्ल्याच्या पायऱ्यांची सुरूवात होतांना डाव्याबाजूस कारवीच्या रानातून वाट काढत कातळयापर्यंत जाता येते. कातळयाच्या शेजारी असलेल्या ढोरवाटेवरून पश्चिम दिशेस जातांना **3 × 3** फुट मुखाचा आकार असलेली **4** भुयारे निदर्शनास येतात. प्रस्तुत गुंफा प्राचीन कालखंडात मानवनिर्मीत आहेत. प्राचीन कालखंडात **147** फुट आतपर्यंत खडक खोदून आतमधील अनेक टन वजनाचा दगड लहान आकारात तुकडे करूनच बाहेर आणावा लागला असणार व या गुंफांस आतील खोदलेला दगड बाहेर काढण्यासाठी गुंफेच्या मुखाव्यतिरीक्त पर्याय नाही. अनेक टन वजनाचा दगड **147** फुट लांबी असलेल्या **3.2 × 3.2** फुट पॅसेजमधून व **40 × 15** आकार व **10** फुट उंची असलेल्या दोन खोल्यांमधून बाहेर काढला गेल्याचे निदर्शनास येते. अशाच रचनेची गुंफा पनवेल जवळ प्रबळगड किल्ल्यास आढळते परंतु ती गुंफा ऊंची - लांबी व आकाराने तुंग किल्ल्याच्या गुंफांच्या तुलनेत लहान आहे. तुंग किल्ल्याच्या येथील दक्षिण कातळयाच्या गुंफेत अनेक वर्षात कोणीही आत गेले नसल्याने तेथे अनेक प्राणी आढळून येतात. या गुफामध्ये कोळी, गोम, बेडुक, वटवाघूळ, घोरपड, जाड आकारातील पाली व डुरक्या घोणस हा सर्प इत्यादी प्राणी आढळून आले आहेत. किल्ला परिघात साळींदर प्राणी मोठया प्रमाणावर आढळतो. प्रस्तुत संशोधकाला **13** एप्रिल **2013** रोजी केलेल्या भुयार सर्वेक्षणात **147** फुट लांबीचे भुयार प्रथमतः आढळले. या भुयारातून आत गेल्यावर **50** फुट अंतर सरळ जाता येते पुढे जातांना गाळ व चिखल आहे.

प्राचीन गुंफेचे मुख **3.2 × 3.2** फुट आकाराचे असून शेवटपर्यंत या पॅसेजचे माप हेच राहत असल्याचे दिसून येते. गुंफेच्या मुखापासून **47** फुट अंतर आत ऊजव्याबाजूस पाच पायऱ्या वर कमानीत गेलेल्या दिसून येतात. येथील खोली आकाराने **40 × 15** फुट व **10** फुट उंची असलेली आहे. गुंफेच्या मुखापासून **100** फुट आतपर्यंत ऑक्सीजन मिळतो मात्र त्यापुढे ऑक्सीजनची कमतरता असल्याने ऑक्सीजनचा सिलेंडर आवश्यक आहे. साधारणतः **70** फुट अंतरानंतर पॅसेज आधी डावीकडे व नंतर ऊजवीकडे वळविलेला आढळतो. त्यामुळे येथून दाट अंधार चालू होतो. भुयाराच्या शेवटच्या टोकास अत्यल्प ऑक्सीजन आहे. येथे शेवटच्या टोकास एक खोली खोदलेली दिसून येते. शेवट खोदलेल्या येथील खोलीचे आकारमान **40 × 10** फुट आहे. महत्वाचे हे की येथील खोलीत अत्यल्प प्राणवायू असतांना येथे मोठया आकाराच्या खोल्या निर्माण केलेल्या आढळतात. खोदलेला दगड भुयाराच्या लहान तोंडातून लहान आकाराचे तुकडे करून अनेक टप्प्यांनी बाहेर आणला गेला असावा असे निदर्शनास येते.

भुयार/गुंफांचा उपयोग तपश्चर्या व अघोरी विद्याप्राप्तीसाठी केला गेला असावा असा संभव आहे. कारण यात मध्ययुगीन सैनिकांसाठी संरक्षण व आक्रमणाच्या कोणत्याही सोयी दिसून येत नाहीत. सर्वात प्रमुख या दोन्ही खोल्यांत पाण्याची सोय नाही. तसेच **147** फुट आत ऑक्सीजन नसल्याने येथे सैन्य लपविता येणे कठीण आहे. यावरून येथील गुंफांमध्ये ध्यानधारणा/तपश्चर्या/अघोरी विद्याप्राप्ती अशा बाबी संभाव्य वाटतात. शरीरास क्लेष करण्याच्या भुमीकेतून एवढया आत येथील गुंफा खोदलेल्या आढळतात. बौध्द सांप्रदायात हिनयान, महायान व वज्रयान असे तीन पंथ होते. यातील वज्रयान पंथाशी येथील गुंफा संबंधीत असाव्यात असा संशोधकांचा तर्क आहे.

कातळखोदीव भुयार / गुंफांचा नकाशा



- ब्रिटीशांनी सुरूंग लावून फोडलेल्या पायऱ्या ः

किल्ल्याच्या चढाईस सुरूवात होतांना प्रथम टप्प्यावर **32** पायऱ्या आहेत. तद्नंतर **50** फुट अंतरावर पुन्हा **15** पायऱ्या खोदलेल्या आढळतात. यातील काही पायऱ्या बांधीव व काही खोदीव असल्याचे दिसून येते. कर्न ल प्रॅाथरने जेव्हा तुंग किल्ला हस्तगत केला त्यावेळीच या पायऱ्या सुरूंग लावून फोडल्या असाव्यात. कारण पायऱ्या फोडण्यासाठी जे सुरूंग लावले याचे निशान अनेक ठिकाणी दिसून येते. किल्ला स्थानिक राजसत्तेतील कुणाकडेही असला तरीही कोणत्याही राजसत्तेकडून किल्ल्याची फोडतोड होत नव्हती. किल्ल्याच्या पायऱ्या फोडून किल्ला निरूपयोगी करण्याकडे कोणत्याही स्थानिक राजसत्तेचा कल नसल्याचे इतिहास अभ्यासातून दिसून येते. मुघलांकडून मराठयांकडे किंवा मराठयांकडून मुघलांकडे किल्ला हस्तगत होतांना किल्ल्याच्या रचनेत कोणताही फोडतोडीचा भाग झालेला दिसून येत नाही. मात्र ब्रिटीश सत्तेकडून महाराष्ट्रातील किल्ले निरूपयोगी व्हावेत यासाठी कायम प्रयत्न झालेले दिसून येतात. हेन्री पाटंनरने किल्ले पाडण्यासाठी अनेक मोहीमा काढल्या होत्या. किल्ले पाडून पुन्हा ते राहण्यास निरूपयोगी करण्याचे काम ब्रिटिश राजसत्तेने केलेले आढळते. यावरून तुंग किल्ल्याच्या पायऱ्या ब्रिटिश राजवटीत सुरूंग लावून फोडल्या गेल्या असे दिसून येते.

- किल्ल्याचे प्रथम प्रवेशद्वार ः

तुंग किल्ला गिरीदुर्ग प्रकारातील असून याचे प्रथम प्रवेशद्वार माथ्याजवळ गेल्यावर बांधलेले दिसून येते. प्रथम प्रवेशद्वार पुर्णपणे भग्न झालेले असून मध्ययुगातील पद्धतीवरून शक्तीदेवता हनुमानाची स्थापना प्रथम द्वारात केलेली दिसून येते. प्रथम द्वाराच्या आत डाव्याबाजूच्या कातळखोदीव देवडीत हनुमान मुर्ती ठेवलेली आहे. येथे पुर्वी प्रथम द्वार नसून याच्या वरती सध्या असलेल्या द्वारास प्रथम द्वार गणले जात होते. मात्र असा समज पाटणगाव मार्गे विसापूर किल्ल्यावर जातांना ज्याप्रकारे प्रथम प्रवेशद्वार पुर्ण भग्न झाले आहे तसेच येथील प्रवेशद्वार पुर्णपणे भग्न झालेले होते. मात्र तुंग किल्ल्याच्या येथील कातळखोदीव देवडीवरून व उजव्याबाजूच्या पायाच्या बांधकामावरून येथे प्रथम द्वार होते असे दिसून येते. तसेच आज ज्यास प्रथम द्वार गणले जाते ते द्वितीय असल्याचे प्रस्तुत प्रबंधात प्रथमच मांडलेले आहे.

प्रथम प्रवेशद्वाराच्या आत डाव्या कातळखोदीव देवडीत वीर हनुमानाची चपेटदान मुद्रा असलेली मुर्ती ठेवलेली आहे. शेपटीची रचना ऊजव्या हातापासून डाव्या हातापर्यंत डोक्यावर वळलेली असून शेपटीच्या शेवटी गोंडयाने दोन वेढे दिलेले दर्शविले आहेत. मुर्तीकाराने हनुमानाला मीशी व कमरेस खंजीर दर्शविला आहे. हनुमानाच्या शेजारी एक अस्पष्ट झालेली मुर्ती असून ही गणेशमुर्ती असावी असे याच्या किमान राहीलेल्या रचनेवरून दिसून येते. तुंगवाडीतील व प्रथम प्रवेशद्वारातील हनुमान मुर्ती यांत बरेचसे साम्य असल्याने तसेच इतरत्र न आढळणारी मिशीधारी हनुमानाची दुर्मीळ प्रतिमा कोरल्याने या दोन्ही मुर्तीचे कोरण्याचे काम एकाच मुर्तीकाराने केले असावे असा संभव आहे. सध्या प्रथम प्रवेशद्वारातील मुर्ती किल्ल्याच्या खाली तुंगवाडीतच कोरली गेली असावी व तीला सैनिकांनी वर आणून देवडीत शक्तीदेवता म्हणून पुजन केले असावे असे दिसून येते. मावळ तालुक्यातील लोहगड, विसापूर, राजमाची, तिकोणा व तुंग या सर्व किल्ल्यांवर हनुमान प्रतिमा निरनिराळया शैलीत कोरल्या गेलेल्या आढळतात. यावरून मध्ययुगात शक्तीदेवतेची पुजा किल्ल्यावर मोठया प्रमाणात केली जात होती असे दिसून येते.

- महार मेट व महार टाकं एक प्राचीन पोढी ः

मध्ययुगात जातीवाचक संबोधण्याची पद्धत होती तसेच मध्ययुगीन कागदपत्रांतून येणारे सर्व उल्लेख जातीच्या नावाने होते. म्हणून येथील दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या समोर कातळयास महार मेट व महार टाकं असे संबोधलेले आहे. येथील मेटं आयताकार असून **12.4 × 9** फुट आकाराचे आहे. याची उंची **5** फुट असल्याने येथे वाकून आत जावे लागते. येथील मेटाचे प्रयोजन किल्ल्याच्या संरक्षणाचे व पहारेकऱ्यांना विश्रांती घेण्यासाठी होते. मेटाच्या वरच्यावाजूस कातळयात पोढी साधारणतः **10** फुट ऊंचीवर खोदलेली आढळते. पोढीतील पाणी घेण्यासाठी कातळयात वर चढावे लागते. हात रूतविण्यासाठी चार ठिकाणी कातळ खोदलेला आढळतो. येथील पोढी **14 × 10.7** फुट आकाराची असून **3.7** फुट खोल खोदलेली आहे. ही पोढी महारमेटाच्या वरच्या बाजूस असल्याने महारमेटास सतत म्हणजे ऊन्हाळयातही ओल आलेली दिसून येते. यास महार टाकं असे संबोधले जात होते मात्र या पोढीचा काळ मध्ययुगातील नसून प्राचीन युगातील असल्याचे

पोढीच्या रचनेवरून दिसून येते. प्राचीन काळातील पोढीस मध्ययुगातही वापरले गेले तसेच आजही येथील पोढी पिण्याच्या पाण्याच्या वापरासाठी योग्य असल्याचे दिसून येते.

- किल्ल्याचे द्वितीय प्रवेशद्वार ः

किल्ल्याचे द्वितीय प्रवेशद्वार सुस्थितीत असून जुजबी स्वरूपात याची ऊभारणी दरम्यानच्या काळात झाल्याचे दिसून येते. प्रवेशद्वारास डाव्या बाजूस देवडी(अलंगा) असून ऊजव्या बाजूस जागेअभावी देवडी ठेवलेली नाही. द्वितीय प्रवेशद्वार **8.1 × 4.1** फुट असून पाण्याचा निचरा करण्याचे पन्हाळे **3 × 3** इंच आकारात यास ठेवलेले आहे. प्रवेशद्वाराचा ऊंबरा **9** इंच ऊंच असा भक्कम ठेवलेला असून लाकडी द्वार अडकविण्यासाठीची दगडी कुसं आजही सुस्थितीत आढळतात. ही कुसं **8** इंच उंचीच्या दगडात बनवून येथे बसविलेली दिसून येतात. लाकडीद्वार अडकविण्याचा कुसाचा व्यास **5** इंच जाड आहे. प्रवेशद्वाराची दोन्ही कवाडं लावल्यानंतर आतमधील बाजूचा लाकडी मोठा ओंडका यास आडसूळ असे संबोधले जाते. तो एका बाजूने ओढून दुसऱ्या बाजुस सरकवत अडकवून देण्याची पद्धत होती. शत्रूसैन्याकडुन प्रवेशद्वारावर मोठा आघात झाला तरीही आडसुळ असल्याने द्वार सुस्थितीत रहावे ते भग्न होवू नये यासाठी अडसूळाची योजना केलेली दिसून येते. प्रवेशद्वाराच्या अभंगतेसाठी आडसुळाची कल्पना होती. महाराष्ट्रातील गिरीदुर्ग, भुईकोट किल्ले व जलदुर्ग या सर्वांस प्रवेशद्वारांमागे आडसुळ लावण्याची पद्धत मध्ययुगात रूढ असल्याचे दिसून येते. परंतु तरीही हत्तीसारख्या अजस्त्र प्राण्याच्या धडकेने द्वार भंग होण्याची शक्यता असे. मात्र गिरीदुर्गांवर हत्ती - घोडे यांसारखे प्राणी चढविणे कठीण होते. त्यामुळे एकच अडसुळ प्रवेशद्वारामागील बाजुस ठेवलेला आढळून येतो. प्रवेशद्वार मोठे असेल व भुईकोट किल्ला असेल तर काही ठिकाणी दोन अडसूळही लावण्याची पद्धत दिसून येते. उदाहरणार्थ ः साप गावचा कदम सरदारांचा वाडा यास मुख्य द्वारास दोन आडसूळ निदर्शनास येतात. तुंग किल्ल्याच्या दुसऱ्या प्रवेशद्वाराचा अडसुळ **8** फुट लांब व **8.8** इंच जाडीचा होता असे त्याच्या रिकाम्या रकान्यावरून दिसून येते. सध्या येथे द्वाराप्रमाणे आडसुळ उपलब्ध नाही. दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या आत डाव्याबाजुस देवडी पडलेली दिसते. तिला स्पर्शिलेल्या **15** फुट व्यासाच्या बुरूजाला दिवे लावण्यासाठीचे तीन कोनाडे दिसून येतात. त्यातील दोन **1 × 1** फुट व एक **6 × 6** इंच आकाराचा कोनाडा आहे. या बुरूजास

फक्त **5** जंग्या (बाण व बंदुकीतून गोळया मारण्यासाठी बुरूजास ठेविलेली योजना) शिल्लक राहील्या असून त्या सर्व समान आकारात म्हणजेच **1** फुट लांबी व **4** इंच रूंदीच्या ठेवलेल्या आढळतात.

- द्वितीय प्रवेशद्वारासमोरचे चारखांबी टाकं ः

द्वितीय प्रवेशद्वाराच्या समोर ढोरवाटेने किल्ल्याच्या पुर्व बाजुस कातळयास मोठया आकारात खोदलेले स्तंभी टाके आढळते. येथील पर्वताचा लष्करी वापर चालू केल्यावर येथे मोठया प्रमाणात पाण्याची आवश्यकता होती. म्हणून संपुर्ण किल्ल्यावर मोठया आकारातील चार स्तंभी टाक्या खोदण्यात आलेल्या दिसून येतात. द्वितीय प्रवेशद्वाराच्या समोरील टाक्याच्या आत शेवटच्या भिंतीपर्यंत जाता यावे अशी सोय टाके खोदतांना केलेली आढळते. येथे पाण्याच्या टाक्याची दोन प्रमुख दालने केलेली आढळतात. बाहेरच्या दालनातील पाण्याहून आतल्या दालनातील पाणी हे जास्त स्वच्छ दिसते व उन्हाळयात जरी बाहेरच्या दालनातील पाणी बाष्पीभवनामुळे संपले किंवा पातळी खालावली तरीही आतील दालनातील पाणी शिल्लक असते. येथील चारही स्थंभ **3 × 3** फुट चौरस आकारात आहेत. यातील तीन स्तंभ सरळ एका रेषेत व एकमेव स्तंभ हा बाहेरील कातळकडयास आधार म्हणुन ठेवलेला दिसून येतो. यातील तीन सरळ रेषेत असणाऱ्या स्थंभापैकी मधल्या स्थंभास वरच्या बाजूस भारवाहू यक्षांच्या जागी किरकोळ नक्षीकाम केलेले आढळते.

टाक्याचे खोदकाम करतांना प्रथम येथे बाहेरील स्थंभाच्या समोर एक हौद कोरलेला आढळून येतो. हौदाचा दक्षिण बाजूचा कातळा किल्ल्याखाली निसटलेला असून इतर तीन काठ शिल्लक राहिलेले दिसून येतात. टाक्याचे खोदकाम करतांना आधी थोडे पाणी येथे आवश्यक होते. यासाठी खोदकामाच्या आधी कातळयास हा **8 × 4** फुट आकाराचा हौद कोरण्यात आलेला दिसून येतो व तद्नंतर टाक्याचे खोदकाम चालू केलेले निदर्शनास येते. टाक्याच्या शेवटच्या भिंतीपर्यंत जाण्यासाठी उजव्या बाजूच्या कातळयास एक ऊंच ओटा ठेवलेला दिसून येतो. उंचवटा असलेल्या भागावर चढून त्यावरून वाकून आतमध्ये प्रवेशावे लागते व कमरेत वाकून आतपर्यंत जाता यावे अशी सुविधा टाकं निर्माण करतांना ठेवलेली दिसते. टाक्याची ऊंची सर्वठिकाणी **10** फुट समान ठेवलेली आढळते. मधोमध असलेले तीनही खांब एकमेकांना समांतर रेषेत कोरलेले आढळतात. तसेच खालच्यावाजूने

पाण्याचे वर्गीकरण करण्यासाठी तीन फुट रूंदीच्या एक मोठा कातळा येथे तसाच ठेवलेला आढळतो. हा कातळा येथीळा स्तंभांना समांतर रेषेतच ठेवलेला दिसून येतो. प्रस्तुत टाकं **62** × **23** फुट आकारात खोदलेले आढळते. सध्या या टाक्यातील पाणी तुंगवाडीतील ग्रामस्थ रबरी नळीद्वारे तुंगवाडीत पिण्यासाठी वापरतात.

- जिभी बांधणीचे तृतीय प्रवेशद्वार ः

द्वितीय प्रवेशद्वारापासून **40** फुट ऊंचीवर तृतीय प्रवेशद्वार आहे. द्वितीय प्रवेशद्वारातून तृतीय प्रवेशद्वारात जाणारा मार्ग तिव्र चढणीचा असून द्वितीय प्रवेशद्वारातून तृतीय प्रवेशद्वार दिसून येत नाही कारण तृतीय प्रवेशद्वाराच्या समोर बुरूजाचीच भिंत लांबवर खेचून हे प्रवेशद्वार लपविलेले दिसून येते. त्यामुळे तृतीय प्रवेशद्वारातील लष्करी हलचाली द्वितीय प्रवेशद्वारातून दिसून येत नाहीत. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून रघुनाथपंत हनमंते व धुंडीराज लक्ष्मण व्यास यांनी लिहीलेल्या राज्यव्यवहार कोषात आडव्या बांधलेल्या अशा भिंतींस 'जिभी' असे संबोधले आहे.[6] तुंग किल्ल्याच्या तृतीय प्रवेशद्वाराच्या समोर जिभी असलेले बांधकाम दिसून येते. जिभीचा उपलब्ध भाग कल्पकाने कुशलतेने बांधलेला आढळतो. जिभी म्हणून बांधलेल्या या तटबंदिवर चपेटदान हनुमान एखाद्या अकुशल व्यक्तीने कोरलेला आढळतो. हे हनुमान शिल्प **1.5** × **1.1** फुट आकाराचे आहे. उपलब्ध शिल्प पावसाच्या माऱ्याने अस्पष्ट झालेले आढळते. येथील प्रवेशद्वारास हनुमानाच्या वरच्याबाजूस बुरूजावर साचलेले पाणी बुरूजाबाहेर पडावे यासाठी दगडी पन्हाळे ठेवलेले आहे. पावसाळयाच्या दिवसांत तिव्रतेच्या पावसात येथील बांधकामाचे नुकसान होवू नये यासाठी पाण्यास वाट करून देण्याची ही योजना आजही चालू आहे. त्यामुळे येथील बुरूज व तटबंदी आजही सुस्थितीत असल्याचे दिसून येते. तृतीय प्रवेशद्वाराचे बुरूज व जीभीची ऊंची **14** फुट असून प्रवेशद्वाराची ऊंची **7.5** फुट आहे. येथील प्रवेशद्वारास ऊंबरा ठेवलेला आढळत नाही कारण यावरील माचीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा लोंढा तिव्रतेने उताराच्या बाजूस म्हणजेच प्रवेशद्वारात येतो. लहान पन्हाळे किंवा जाळीची मोरी वगैरे लावून पाण्याचा लोंढा आटोक्यात येणारा नसल्याने येथे उंबरा न लावण्याची योजना केलेली

---

[6] महेश तेंडुलकर, *लोहगड विसापुर तुंग तिकोना*, स्नेहल प्रकाशन, **2010**, पृ.**50**.

आढळते. त्यामुळे पाणी कितीही तिव्रतेने वाहीले तरीही तटबंदी व बुरूज यांचे नुकसान होत नाही. अशा अपघातपुर्व नियोजन योजना तुंग किल्ल्याच्या बाबत बऱ्याच ठिकाणी आढळून येतात. तृतीय प्रवेशद्वारास दोन्ही बाजूंस दगडी कुसांच्या शेजारी लोखंडाचा वापर द्वार मजबूतीसाठी केल्याचे निदर्शनास येते. येथील लोखंडाच्या पट्टया व द्वारपाल सैनिकांच्या दोन्ही देवडया आजही सुस्थितीत आहेत. येथील देवडया **6.5 × 5.5** फुट आहे. डाव्या देवडीचा दिवा लावणीचा कोनाडा **9 × 9** इंच असून उजव्या देवडीचा दिवा लावणीचा कोनाडा आयताकार **9 × 8** इंच आकारात आहे. येथील द्वारातून उजव्या बाजूस किल्ल्याच्या माचीत प्रवेशता येते. या प्रवेशद्वाराच्या बुरूजास शत्रूसैन्यावर मारा करण्यासाठी अनेक जंग्या ठेवलेल्या दिसून येतात.

- गणपती मंदिर, कातळखोदीव टाकं व कचेरीचे जोतं ः

गणपती मंदिर, कातळखोदीव टाकं व कचेरीचे जोतं हा किल्ल्याच्या माचीचा भाग आहे. पुर्वी येथील भागास कोळयांचे मेटं म्हणत होते. येथील गणेशमुर्ती ऊजव्या सोंडेची असून मंदिराचे बांधकाम नव्याने केलेले आढळते. येथील गणेशमुर्ती मध्ययुगात घडविलेली असून मंदीर न करता येथे एखाद्या देवडीत किंवा तळयाकाठी गणेशमुर्ती ची स्थापना केली असण्याचा संभव आहे. मात्र सध्या एक दगडावर ही मुर्ती तळयाकाठी बसवून लहान आकारातील मंदीर येथे उभारलेले दिसून येते.

कातळा सुरूंगाने फोडून मोठया आकाराचे पाण्याचे उघडे टाकं येथे खोदल्या गेलेले आढळते. खोदीव टाक्यास उतरण्यासाठी **13** पायऱ्या ठेवलेल्या असून प्रत्येक पायरी ही **10** इंच उंची असलेली आहे. येथील सर्व पायऱ्या **6.5** फुट लांबीच्या ठेवलेल्या होत्या. त्यामुळे एकावेळी एकच व्यक्ती पाणी काढू शकेल ही सर्वसाधारण अनेक किल्ल्यांवरची रचना येथे दिसत नाही. एवढया मोठया मार्गावरून अनेक व्यक्ती एकावेळी पाणी काढू शकतील असा मोठा मार्ग टाक्यात उतरण्यासाठी निर्माण केला गेल्याचे दिसून येते. पावसाळयाच्या दिवसांत येथील टाकं तुडुंब भरलेले दिसून येते. मात्र ऊन्हाळयाच्या दिवसांतही येथे सदैव पाणी असते. येथील टाक्याची खोली **16** फुट असून गणेश मंदिराशेजारी कचेरीचे जोते शिल्लक राहिलेले दिसून येते. मध्ययुगात किल्ल्याचा कारभार येथील कचेरीतून चालत असे. कालौघात येथील छत व भिंती पडल्या मात्र जोते शिल्लक राहीलेले

आढळते. कचेरीत जाण्यासाठीचा मार्ग जोत्याच्या पायऱ्यांवरून निदर्शनास येतो. माचीवरील पश्चिम बाजूचा बुरूज सुस्थितीत राहिलेला आढळतो. येथील बुरूजाच्या शेजारी एक जोते असून याचे छत व भिंतीं पडल्या मात्र त्यांच्या अवशेषांवरून येथील इमारत दुमजली असावी असे निदर्शनास येते. किल्ल्याच्या माथ्यावर ऊजव्या बाजूस एक लहान व त्यामागे त्याहून मोठी अशा दोन टेकडया आहेत. कातळयाच्या डाव्याबाजुने किल्ल्यावर जाणारी वाट तिव्र चढणीची असून कडयाच्या उजव्या बाजूने जाणारी लहान आकाराची पायवाट ही पाण्याच्या मोठया आकारातील खांबी टाक्यांकडे जाते. येथील तिन्ही कातळखोदीव खांबी टाक्या किल्ल्यावरील सर्वात मोठे पाण्याचे स्त्रोत गणले जातात.

- माचीवरील बालेकिल्ल्याच्या उजव्या कातळयातील तीन टाके ः

किल्ल्याच्या माथ्यावर जाण्याच्या मार्गावर बालेकिल्ल्याच्या ऊजव्या बाजूने जाणारा लहान मार्ग कातळयातील तीन प्राचीन काळातील खांबी टाक्यांकडे जाते. येथील पाण्याचे टाके मोठया आकारात खोदल्या गेलेले असून त्यांस खांब ठेवलेले दिसून येतात. ही मोठया टाक्यांची व्यवस्था बौध्दभिक्षूंसाठी पाण्याची सोय म्हणुन केलेली आढळत नाही. किल्ल्यावरील सैन्यासाठी मोठया प्रमाणात पाणी लागते. यासाठी मोठा साठा करण्यास टाक्या आवश्यक असतात. त्यामुळे बौध्दभिक्षूंसाठी लहान आकारातील पोढी पाण्याची गरज भागविण्यासाठी पुरेशी असते जी द्वितीय प्रवेशद्वाराच्या समोर खोदलेली आढळते. मात्र लष्करासाठी पाण्याचा मोठा स्त्रोत आवश्यक असून त्यासाठी किल्ल्यावर मोठा कातळा खोदून स्तंभी टाक्या खोदलेल्या आढळतात. पुर्वबाजूस असलेले कमांक **1** चे टाकं आजही पिण्याच्या पाण्यासाठी योग्य असल्याचे दिसून येते. येथील टाक्यातून पाणी बाहेर काढण्यासाठी आयताकृती चौथरा केलेला आढळतो. या चौथऱ्यातून पाणी काढतांना डोक्यास वरचा कातळा लागणार नाही याची दक्षता येथे घेतलेली आढळते. टाक्याच्या मुखाचा आयत **10.1** × **4** फुट आकाराचा असून टाकं **20** × **15** फुट आकारात साधारणतः आयताकृती खोदलेले दिसून येते. हे टाके **4.4** फुट खोल खोदलेले असून लहान आकाराच्या मुखामुळे यात वरतून पडणारा कातळा किंवा माती व येथील राडारोडा फारसा गेलेला नाही. तसेच टाकं फार मोठया आकाराचे नसून आटोकेवाज असल्यामुळे कुठेही भंग पावलेले आढळून येत नाही.

दुसऱ्या कमांकाचे टाकं पहिल्या टाक्याहून साधारण दुप्पट आकाराचे दिसून येते. या टाक्याचे आकारमान मोजता येत नाही कारण या टाक्याच्या आत जाता येत नाही किंवा आत डोकविता येत नाही. वरच्याबाजुच्या कातळयातील मोठया शिळा येथील टाक्याच्या मुखात पडल्याने आतमधील भिंतीं, स्तंभ व आकारमान याचे मोजमाप घेता येत नाही.

तिसऱ्या कमांकाचे टाकं पहिल्या व दुसऱ्या टाक्यांच्या आकारापेक्षा तसेच दुसऱ्या प्रवेशद्वारातील समोरच्या चारखांबी टाक्यापेक्षा मोठया आकाराचे आहे. टाक्याच्या मुखात पडलेल्या शिळेंमुळे व गाळामुळे याची दुरावस्था झाल्याचे दिसून येते. येथील टाक्यांत स्तंभ दिसून येतात. **3** × **3** फुट जाडीचे स्तंभ दुरूनही व्यवस्थीत दिसून येतात. डावीकडील एक स्तंभ बदामी आकाराचा दिसतो. टाक्यातील स्तंभावर एखादा शिलालेख असण्याचा संभव आहे. कारण तुंग किल्ल्यावर प्राचीन काळातील अनेक गुंफा व पोढी तसेच अनेवविध अवशेष दिसून येतात. मात्र सध्या तरी सर्वेक्षणातून किल्ल्यावर एकही शिलालेख निदर्शनास आलेला नाही. प्राचीन कालखंडात पाण्याच्या टाक्यासाठी दानं देण्याची पद्धत होती. दान मिळाल्यावर दानं दिलेल्या व्यक्तीचे नाव टाक्यावर कोरले जात असे. मात्र येथील टाक्याच्या आत जाता येत नसून दुरून त्यातील कातळे तपासणे शक्य होत नाही.

- किल्ल्याचा माथा ः

किल्ल्याच्या माथ्यावरील बालेकिल्ल्यावर जाणाऱ्या मार्गावर टेकडीस उजवीकडे वळण घेवून माथ्यावर जावे लागते. माथ्यावर साधारणतः **2** गुंठे जागा दिसून येते, महाराष्ट्रातील सर्वात कमी आकारमान असलेला माथा म्हणून तुंग किल्ल्याची विशेष ओळख आहे. लोहगड व विसापूर किल्ल्यांसारखा विस्तीर्ण माथा यास नाही मात्र तुंग किल्ला या दोन्ही किल्ल्यांपेक्षा उंच आहे. तुंग किल्ल्याच्या माथ्यावरून लोहगड, विसापूर, तिकोना, कोरीगड, घनगड इत्यादी किल्ले दिसतात. त्याचप्रमाणे परिघातील अनेक गावे व वाडया वस्त्या दिसून येतात. दुरवरच्या प्रदेशावर लक्ष ठेवता यावे यासाठी येथील पर्वतावर किल्ल्याची बांधणी येथे झालेली दिसून येते.

तुंग किल्ल्याच्या डोंगराचे ज्यावेळी किल्ल्यात रूपांतर झाले त्यावेळी माथ्यावर पहारेकऱ्यांना रहाण्यासाठी एक खोली बांधण्यात आलेली आढळते. माथ्यावर पाण्याची एक पोढी प्राचीन काळात बौध्दभिक्षूंसाठी खोदलेली

होतीच. माथा भरपूर उंच असल्याने येथे वारा जोरात असतो. त्यामुळे येथील कोणतेही बांधकाम फारकाळ शाश्वत रहाणे शक्य नाही. येथील खोलीचीही पडझड झाली व छत कोसळले भिंतीही अर्धवट पडलेल्या आढळतात. तद्नंतर उपलब्ध खोलीत तुंगाई देवीचे मंदीर बनविण्यात आले परंतु मुर्ती न बसविता उपलब्ध शिळेसच शेंदुर लावून देवीची स्थापना करण्यात आलेली आढळते. तुंगाईदेवी मंदीरासमोरील पोढी विशेष कलाकृती असल्याचे दिसून येते. दक्षिण बाजूस मुख असलेल्या पोढीत पिण्याचे पाणी ठेवत असावेत व पखालजींद्वारे खालच्या माचीवरील टाक्यातून पाणी आणून वरील पोढीत ओतले जात असावे असे दिसून येते. कारण येथील पोढीचे मुख लहान आकारात असल्याने तिव्र पावसातही पोढीत फारसे पाणी साठणार नाही असे आढळते. सध्या येथील पोढीत पाण्याचा संचय होत नाही कारण तुंगाईदेवीच्या बाजुने पडलेल्या छिद्रामुळे येथील पोढी रिकामीच राहत असल्याचे दिसून येते. माथ्यावरील मोठा कातळा खोदून येथे पोढी निर्माण केल्या गेलेली दिसून येते. पोढीचे मुख **6** × **2.5** फुट आयताकारात आहे. पोढीची खोली **6** फुट असून आतमधील बाजुने **15** × **10** फुट आकारमान आहे. माथ्यावर पोढी कोरण्यामागे पहारेकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था जागेवर व्हावी व माथा ऊतरून खाली जायला लागू नये असे कारण असावे.

पाण्याच्या टाक्यावरील लिंगविरहीत शाळुंखा ः विसापूर किल्ल्यावर माथ्याजवळील पोढीच्या कातळयास लहान आकारातील लिंगविरहीत पिंडी कोरलेली आहे. याच प्रकारची लिंगविरहीत पिंडी लोहगड किल्ल्याच्या कातळकडयात कोरलेल्या पाण्याच्या टाक्यांतील ऊत्तर बाजूच्या शेवटच्या प्राचीन टाक्याच्या मुखाजवळ कोरलेली आढळली आहे. तुंग किल्ल्याच्या माथ्यावरील पोढीच्या डाव्याबाजूच्या कातळयावर याच प्रकारची लिंगविरहीत शिवपिंडी कोरलेली आढळून आली आहे. आकाराने लहान असलेली शाळुंखा मावळ तालुक्यातील सर्वच पोढींवर व प्राचीन टाक्यांवर कोरलेली दिसून येते. तसेच महाराष्ट्रातील बहुतांशी किल्ल्यांच्या टाक्यांवर व प्राचीन काळातील बौध्दभिक्षूंसाठी व व्यापाऱ्यांसाठी खोदलेल्या पोढींवर अशा लिंगविरहीत शिवपींडी दिसून येतात. यांचे कोरीव काम ओबड धोबड असल्याने येथील पिंडी अकुशल व्यक्तींकडून कोरलेल्या दिसून येतात. शैव समाजाच्या प्रगतीच्या काळात पाण्याच्या टाक्यांजवळ अशा पिंडी कोरलेल्या आढळतात. पोढी खोदतांना किंवा स्तंभी टाके खोदतांना या पिंडींचे कोरण्याचे काम झालेले नसल्याचे दिसून येते. हे नंतरच्या काळात ओबडधोबड पिंडींचे कोरीव काम केलेले आढळून येते. शंकराचा भक्त म्हणजे शैवपंथी लोक अनेक जाती धर्मात होते. त्यातील गुराखी, धनगर, सैनीक यांतही शैवपंथी लोक होते. त्यांनीही पाण्याच्या ठिकाणी पिंडी कोरण्याचे काम

केलेले असण्याचा संभव आहे. बौध्दभिक्षूंच्या नंतर शैवपंथात मोठया प्रमाणात वाढ झाली. यातून शैवपंथ प्रगतीच्या मार्गावर असतांना अनेक ठिकाणी पिंडींचे निर्माण केले गेलेले आढळून आले आहे. दरम्यानच्या काळात शैवपंथीयांकडून बहुतांशी पोढी व प्राचीन काळातील किल्ल्यांच्या पाण्याच्या टाक्यांवर अशा स्वरूपाच्या शाळुंखा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कोरल्या गेलेल्या दिसून येतात.

तुंग किल्ल्याच्या माथ्यावरील अपुऱ्या जागेचा वापर फारसा होणे शक्य नसल्याने लहान जागेवरून दुरवरच्या प्रदेशावर लक्ष ठेवता यावे म्हणुन तुंग किल्ल्याची निर्मीती झालेली दिसून येते. मध्ययुगात पहारेकरी सैन्य माथ्यावरून घसरून खाली पडू नये याकरीता माथ्याच्या भोवती पहारेकऱ्यांच्या सुरक्षेच्या योजना केलेल्या आढळून येतात. संपुर्ण माथ्याला कडेच्या बाजूने पहारी लावून साखळयांद्वारे संरक्षण दिलेले आढळून येते. पहारेकऱ्यांच्या सुरक्षेस विशेष महत्व कायम दिल्या गेल्याचे दिसून येते. किल्ल्यास विस्तीर्ण माथा नसल्यामुळे येथे फारशी सैनिकी शिबंदी रहात नसावी असे दिसून येते.

- मध्ययुगात किल्ल्यावरील सैनिकांस केलेल्या पाण्याच्या योजना ः

1) किल्ल्याच्या पायथ्यास हनुमान मंदिर शेजारी एक मोठया आकाराची विहीर खोदलेली आहे.

2) दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या समोर कातळकडयास चारखांबी टाकं खोदलेले आहे.

3) दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या लगत कातळयास महार टाकं असे संबोधले जाणारे टाकं खोदलेले आहे.

4) माचीवर गणेशमंदिराच्या शेजारी खडकखोदून पाण्याचे मोठया आकाराचे टाके खोदलेले आहे.

5) बालेकिल्ल्याच्या कातळयास तीन मोठया स्तंभी टाक्यांचा समूह खोदलेला आहे.

6) किल्ल्याच्या माथ्यावर प्राचीन काळात बौध्दभिक्षूंच्या सोयीसाठी पोढी खोदलेली आहे.

7) तुंगवाडीतील भैरवनाथ मंदिराच्या जवळील कातळयात बौध्दभिक्षूंसाठी पोढी खोदलेली आहे.

वरील सात पाण्याचे स्त्रोत प्राचीन व मध्ययुगात तुंग किल्ल्यावर होते. यातील काही स्त्रोत आजही सुस्थितीत असून पर्यटकांना व ग्रामस्थांना सध्या या स्त्रोतांचा उपयोग होतांना दिसून येते.

## ः तुंग किल्ल्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास ः

तुंग किल्ल्याची निर्मीती प्राचीन कालखंडात झालेली आढळते. इंदोरी किल्ला वगळता मावळ तालुक्यात असलेले सर्वच किल्ले प्राचीन कालखंडातील असल्याचे पुरातत्वशास्त्रीय दृष्टिकोनातून दिसून येते. तुंग किल्ल्याच्या माथ्यावरील पोढीवर कोरलेली लहान आकारातील लिंगविरहीत शिवपिंडी म्हणजेच शाळुंखा विसापूर किल्ल्यावरील पोढीच्या कातळयास कोरलेल्या शाळुंखेसारखी आढळून आली आहे. अशा पद्धतीने पाण्याच्या टाक्यांवर कोरलेल्या शाळुंखा लोहगड किल्ल्याच्या टाक्यावर, करंजविहीरच्या चक्रेश्वर लेणीत, भोरगीरी किल्ल्याच्या पाण्याच्या टाक्यांवर तसेच महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांच्या पाण्याच्या टाक्यांवर कोरलेली आढळून आली आहे. तसेच दक्षिण कातळयास खोदलेल्या अनेक पोढी, विहार व नव्याने उजेडात आलेली **147** फुट लांबीची गुंफा व खोल्या यातून तुंग किल्ल्याच्या प्राचीन इतिहासाची माहिती निदर्शनास येते.

ज्याप्रमाणे तुंग किल्ला प्राचीन युगात अस्तीत्वात आला व येथे अनेकविध खोदकाम बौध्दभिक्षूंच्या सोयीसाठी केले गेले व तुंग किल्ल्याच्या पर्वतास प्राचीन इतिहास लाभलेला आहे. त्याचप्रमाणे मध्ययुगातही तुंग किल्ल्याचा सहभाग स्थानिक राजसत्तांच्या राजकीय घटनांत दिसून येतो. तुंग किल्ल्याचा पहिला उल्लेख बुरहाने मासिरी या सय्यद अली तबातबाई याच्या फार्सी ग्रंथात आलेला आहे. त्यातील नोंदीप्रमाणे ‘मलीक नायबचा मुलगा अहमद याने **1482 – 83** मध्ये जुन्नर व कोकण प्रांतावर मोहीम काढली. शिवनेरी, चावंड, जीवधन, लोहगड हे गिरीदुर्ग जिंकले. त्यानंतर त्याने तिकोना व तुंग गडांकडे मोर्चा वळविला असता शत्रूसैन्य गडाजवळ येण्याआधी त्यांच्या इतर दुर्ग विजयाची बातमी आली होती तेव्हा कोणताही प्रतीकार न करता या तुंगवरील सैन्याने शरणागती पत्करली. अहमदने त्यांस जिवदान देवून कोणताही त्रास त्यांस होवू दिला नाही. विजयी सैन्याने दोन्ही गडांमधून भरपूर द्रव्य(संपत्ती) जमा केले व आपल्याच एका सरदारावर याचा ताबा सोपवून अहमद

कोंढाण्याकडे चाल करावयास निघून गेला.'[7] यावरून तुंग किल्ल्याच्या मध्ययुगीन राजकीय इतिहासाची सुरूवात झालेली दिसून येते. **1482** मध्ये तुंग किल्ल्याच्या आलेल्या उल्लेखावरून हा किल्ला निजामशहाच्या उदयाच्या आधीपासून लष्करीस्थळ म्हणुन कार्यरत होता हे आढळून येते. यावरून तुंग किल्ला बहमनी राजवटींच्या आधीपासून प्राचीन काळातील असण्याचे दिसून येते. पुढे **1636** पर्यंत पवन मावळचा मुलूख निजामशहाच्या ताब्यात होता. सहाजीकच तुंग किल्ला दरम्यान निजामशहाकडे होता. तद्नंतर **1636** ते **1647** पर्यंत तुंग किल्ला अदिलशहाच्या ताब्यात होता. दरम्यानच्या काळात मावळ तालुक्यातील सर्व किल्ले अदिलशाहीकडे असल्याचे आढळते. शिवाजी महाराजांनी मराठी राज्याची स्थापना केली त्यावेळी त्यांनी पवन मावळातील लोहगड किल्ला **1656 – 57** मध्ये जिंकून घेतला याचदरम्यान प्रभावळीतले किल्ले जिंकणे मराठी राजसत्तेसाठी फायद्याचे होते म्हणून त्यांनी मावळ तालुक्यातील किल्ले जिंकण्याची मोहिम आरंभीली व या मोहीमेत तुंग आणि तिकोणा हे दोन्ही किल्ले मराठे शाहीत आले.

शिवाजी महाराजांनी शके **1578** दुर्मुखीनाम संवत्सरे भाद्रपद वद्य **11** म्हणजेच **4** सप्टेंबर **1656,** गुरूवारी स्वराज्यातील बहुतांशी गडांची नावे बदलली. [8] त्यात तोरण्याचे प्रचंडगड, कोंढाण्याचे सिंहगड, विसापूरचे संबळगड, तिकोण्याचे वितंडगड नावे केली दरम्यानच तुंगगडाचे कठीणगड असे नामकरण शिवाजी महाराजांनी केलेले आढळते.

मिर्झा जयसिंगाच्या स्वारीवेळी मिर्झाने पुरंदर किल्ल्यास वेढा दिला असतांना त्याने जाळपोळ करण्यासाठी 'दाऊदखान, कुतुबुद्दीन खान, राज रायसिंह व मिर्झाचा नोकर अचलसिंह' या अधिकाऱ्यांस पाठवून 'लोहगड, ईसागड, तुंग, तिकोणा' या दुर्गांच्या पायथ्याशी असणारी गावे जाळून लुटून फस्त करावयास सांगीतले व तसे करून हे सर्व अधिकारी लष्करी तळावर परतले असा ऊल्लेख आलमगीरनाम्यात सापडतो. सध्या किल्लापायथा असलेली तुंगवाडी मुघल आधिकाऱ्यांनी या काळात जाळून लुटून नेली असल्याचे समोर येते.

---

[7] तत्रैव, पृ. **54**.

[8] शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड **3**, पृ. **177**. आणि स. म. दिवेकर, द. वी. आपटे (संपा.), *शिवचरित्र प्रदीप*, शिवापूर दफ्तरातील यादी, भा. इ. सं. म. प्रकाशीत, **2009**,पृ. **50**.

पुरंदर तहाच्यावेळी शिवाजी महाराजांकडे असलेल्या **40** किल्ल्यांपैकी **23** किल्ले मुघलांस द्यावे लागले आणि उर्वरित **17** किल्ले स्वताःकडे ठेवावे लागले होते. **14** जुन रोजी झालेल्या तहात जे **23** किल्ले मुघलांना दिलेत त्यात तुंग किल्ल्याचे नाव आहे.[9] मुघलांकडे तुंग किल्ल्याचे ऊल्लेख 'तपकी', 'पतकी' या नावाने सापडतात.[10]

शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्याकाळात तुंग किल्ल्याचे उल्लेख फारसे येत नाहीत कारण दरम्यान तुंग किल्ला हा एक टेहळणीचे ठाणे बनविलेले दिसून येते. परंतु इतर आसपासचा प्रदेश समकाळात मराठयांकडे असल्याकारणाने तुंग किल्ला मराठयांकडे होता असे दिसून येते. परंतु संभाजी महाराजांच्या निधनानंतर औरंगजेब बादशहाने व मुघल फौजेने मराठयांचे किल्ले घेण्याचा जोरदार सपाटा लावला. जेधे शकावलीच्या नोंदीप्रमाणे "ये वर्षी कुल गड मोगले घेतले" असे येते.[11] यावरून मराठयांचे बहुतांशी किल्ले मुघलांनी अंकीत केलेले आढळतात. या दरम्यान तुंग किल्ला एप्रिल **1704** पर्यंत मराठयांकडेच असल्याचे आढळते. स्वराज्यातील बलाढय किल्ले मुघलांकडे गेले असतांना तुंग व भोवतीचे मावळातील किल्ले हे मराठी राजसत्तेने मुघलांच्या हाती जावू दिलेले दिसत नाहीत. दरम्यान संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी मुघल सैन्यास जेरीस आणले. यांसोबतच हुकुमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण हेही होते. या सर्वांनीच गनिमी काव्याच्या पद्धतीने मुघलांशी लढाई चालू ठेवली. या सर्वांचे नेतृत्व महाराणी ताराबाई यांनी केले. म्हणून तुंग किल्ला मराठी राजसत्तेने निकाराने लढविला व मुघलांपासून किल्ल्याचा व भोवतीच्या प्रदेशाचा बचाव केलेला निदर्शनास येते.

- औरंगजेब बादशहाच्या दरबारात नियमित लिहील्या जाणाऱ्या अखबारात-ए-दरबार-इ-मुअल्ला मध्ये तुंग किल्ल्याचे आलेले उल्लेख पुढील प्रमाणे ः

---

[9] सतिश अक्कलकोट, *दुर्ग*, सहयाद्री दुर्गभ्रमण मंडळ प्रकाशन, **2009**, पृ. **426**.

[10] सं. भा. तापकीर, *महाराजांच्या जहागीरीतून*, गरूडझेप प्रकाशन, **2012**, पृ. **213**.

[11] अ. रा. कुलकर्णी, *जेधे शकावली*, डायमंड प्रकाशन पुणे **2007**, पृ. **133**.

**1. 13 मे 1704 ः** (हरकार्यांचा व डाकचौकीचा दारोगा) यार अली बेग याने पुढील मजकुराचे पत्र पाठविले, "चाकणचा किल्लेदार व फौजदार अमानुल्लहखान आणि इतर मुघल पथके यांनी तुंगच्या किल्ल्याला वेढा घातला होता. बादशहाच्या कृपेने किल्ला ताब्यात आला आहे." पत्र आणून देणाऱ्याला(खान मुहम्मदला) **4** होन आणि हेरांना **4** होन(बक्षिस म्हणून) देण्यात आले.[12]

**2. 14 मे 1704** अमानुल्लाहखान याने तुंग किल्ला जिंकून घेतला होता. त्याच्या किल्ल्या अमानुल्लाहखानाचा बक्षी सैफुल्लाहखान आणि मुहम्मद शफी हे घेऊन आले होते. ते बादशाहांना येऊन भेटले. त्यांनी बादशहांना सांगीतले की, "अमानुल्लाहखाानाने बादशहाच्या कृपेने तुंग किल्ला जिंकून घेतला आहे. आता राजमाची किल्ल्याला वेढा घालावा अशी त्याची इच्छा आहे." यावर बादशहांनी आज्ञा केली. 'राजमाची किल्ला तडजोडीने हाती येण्याची बोलणी चालू आहेत. तूर्त वेढयाचे राहू द्या.'[13]

**3. 16 मे 1704 ः** काल तुंग किल्ल्याच्या फत्तेबाबत किल्ल्या बादशाहांसमोर ठेवण्यात आल्या. त्याबाबत मुहम्मद शफी याच्याकडे खिलतीची वस्त्रे देण्यात आली. बादशहाने आज्ञा केली "ही वस्त्रे अमानुल्लाहखानाला देण्यात यावी."[14]

**4. 20 मे 1704 ः** अमानुल्लाहखान याने तुंग किल्ला जिंकून घेतला होता. त्याला "अलावर्दीखान" अशी पदवी देण्यात आली.बादशाहा म्हणाले, "तुंग किल्ल्याचे नाव बंकीगड ठेवावे." अमानुल्लाहखान हा(बादशाही छावणीत) येऊन बादशहांना भेटला.[15]

**5. 20 मे 1704 ः** अमनगड(तिकोना)चा किल्लेदार आणि करतालदास याचा मुलगा कुंवरमल याला बंकीगडाचा(तुंगचा) किल्लेदार म्हणून नेमण्यात आले.[16]

---

[12] सेतु माधवराव पगडी(संपा.), *मोगल दरबाराची बातमीपत्रे भाग ः 3*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशीत, **1978**, पृ. 347.

[13] तत्रैव, पृ. 351.

[14] तत्रैव, पृ. 351.

[15] तत्रैव, पृ. 353.

[16] तत्रैव, पृ. 354.

**6. 25** मे **1704** ः बंकीगडाच्या किल्ल्यावर कुंवरमल याची नेमणूक करण्यात आली होती. ती रद्द करण्यात आली. आणि त्याच्याजागी अभयराम याची नेमणूक करण्यात आली.[17]

**7. 8** जून **1704** ः चाकणचा किल्लेदार व फौजदार अमानुल्लाहखान याला तुंग किल्ल्याच्या फत्तेनंतर 'अलावर्दीखान' ही पदवी देण्यात आली होती ती पदवी आता काढून घेण्यात आली.[18]

वरील नोंदींमध्ये तुंग किल्ल्याचे मध्ययुगीन महत्व अधोरेखित होते आहे. तुंग किल्ल्याच्या किल्लेदारी बद्दल किंवा त्याच्या सुरक्षेबद्दल औरंगजेब बादशहा स्वतः जातीने लक्ष घालून निर्णय घेत असल्याचे दिसून येते. तसेच तुंग किल्ल्याच्या एवढया मोठया प्रमाणावर अखबारात मध्ये आलेले उल्लेखांवरून मुघलांसाठी तुंग किल्ला एक महत्वपुर्ण असल्याचे निदर्शनास येते. **20** फेब्रुवारी **1707** रोजी औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघलांची दक्षिण मोहीम थंडावली. तद्नंतर मराठी राजसत्तेने गमाविलेले किल्ले जिंकूण घेण्याची सुरूवात केली. यादरम्यान महाराष्ट्रातील अनेक किल्ले मुघलांकडून मराठी राजसत्तेने जिंकून घेतले. यात तुंग किल्ल्याचाही समावेश होता. मराठे शाहीत तुंगकिल्ला कुलाब्याच्या कान्होजी आंग्रे यांचेकडे आला. त्यानंतर तुंग शाहू छत्रपती यांचेकडे बाळाजी विश्वनाथाच्या मध्यस्थिने गेला व नंतर सचिवांकडे आला. यावरून तुंग किल्ला मध्ययुगात एक महत्वपुर्ण किल्ला म्हणून गणला गेला व त्याचे टेहळणीचे ठाणे म्हणून ओळख न राहता लष्करी ठाणे म्हणून त्याची गणना झालेली निदर्शनास येते.

औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेत महाराष्ट्रातील अनेक किल्ले मुघलांनी जिंकले. यात काही किल्ले मुघलांनी लढुन जिंकले तर काही किल्ले मराठी राज्यातील किल्लेदारांनी संपत्तीच्या लालसेने मुघलांस दिलेले आढळतात. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर मराठी राजसत्तेकडून किल्ले हस्तगत करण्याची मोठी मोहीम उघडलेली दिसून येत नाही. कारण चाकण, शिवनेरी सारखे तसेच मावळ तालुक्यातील महत्वपुर्ण किल्ले मुघलांच्या ताब्यातच असल्याचे दिसून येते. रायगड किल्लाही मुघलांकडून मराठी राजसत्तेकडे **44** वर्षे ताब्यात आलेला आढळत नाही. दरम्यान तुंग किल्लाही मुघलांकडे होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघल साम्राज्य खिळखिळे झाले हे निश्चित मात्र तरीही चाकण, शिवनेरी किल्ले मराठी राजसत्तेच्या ताब्यात येण्यास **1748** साल आलेले दिसून

[17] तत्रैव, पृ. 355.

[18] तत्रैव, पृ. 365.

येते. तसेच रायगड किल्ला मराठयांच्या ताब्यात येण्यास 1733 साल आलेले आढळते. 1748 सालाच्या पुढील वर्षी तुंग किल्ला मराठयांच्या ताब्यात आलेला दिसून येतो. त्यासंबंधी सन 1748 मध्ये नानासाहेब पेशवे यांना पाठविलेले पत्र आहे. पत्रावरून तुंग किल्ला मराठयांच्या ताब्यात कसा आला याची माहिती मिळते. पत्र पुढीलप्रमाणे ः "किले तुंग येथील लोक जे समई भेटले ते समई तह येणे प्रमाणे जाला. हैबतराव व आमचे धारकरी निवडक सिरा यैसे पन्नास साठ येणे प्रमाणे समागमे किल्ल्यास चढले व त्याचे माणूस चालीस पन्नास वरती आहे. येकूण त्याचे आमचे माणूस शंभर वरती आहे. बंदोबस्ती किल्यावरती आमची आहे. किल्ल्यावरून जुने लोक उतरावे तरी कबिलदार, वतनदार आहेत. पुढे स्वामीकडे सेवा घेणे, याजकारणे त्याची आमची आण शपथ घेऊन येणेप्रमाणे तह करून घेतला. त्याचेवरते प्राबल्य कोणे गोष्टीचे नाही, ते आमचे जिमे लागते. पुढे उर्जित करणार स्वामी खावंद आहेत." उपलब्ध पत्रावरून तुंग किल्ला हस्तगत करण्यासाठीच्या योजनांची माहीती मिळते. किल्ल्याखालून काही लोकांनी हल्ला करायचा तसेच किल्ल्यावरील फितविलेल्या लोकांना आधीच आपल्यावाजुने घेवुन किल्ला ताब्यात घेण्याचा प्रकार मराठयांकडून केला गेल्याचे आढळते.[19] यावरून शिवाजी महाराजांनी वापरलेली गनिमी काव्याची पद्धत तुंग किल्ला घेण्यापर्यंत मराठी सैन्याने वापरलेली दिसून येते.

कर्नल प्रॉथर याने 1818 साली महाराष्ट्रातील अनेक महत्वपुर्ण किल्ले जिंकून घेतले. यात राजधानी रायगडही ब्रिटिशांनी जिंकला. दरम्यान प्रॉथरने मावळ तालुक्यातील किल्ले जिंकतांना तुंग किल्ला जिंकून घेतला व काहीच दिवसांत किल्ला ब्रिटीशांकडून पुन्हा भोरकरांकडे देण्यात आला. त्यानंतर मात्र भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत किल्ला भोरकरांकडेच राहीला तद्नंतर स्वतंत्र भारतात सर्वच संस्थाने विलीन झाली त्यात भोर संस्थानही विलीन झाले त्यात तुंग किल्लाही स्वतंत्र भारतात विलीन झाला. मात्र प्राचीन काळापासून मध्ययुगापर्यंत तसेच अर्वाचीन युगातही तुंग किल्ला राजकीय दृष्टया महत्वपुर्ण गणला गेलेला दिसून येतो.

[19] सतिश अक्कलकोट, पुर्वोक्त, पृ. 426.

# तिकोणा किल्ला

भौगोलिक स्थान ः **18° 38’** रेखांश उत्तर, **73° 30’** अक्षांश पूर्व[20]

जिल्हा ः पुणे

दुर्ग प्रकार ः गिरीदुर्ग

समुद्रसपाटीपासून उंची ः **3480** फुट[21]

पायथ्यापासून उंची ः **350** मीटर

किल्ल्याच्या माथ्याचा परीघ ः **1 . 2** कि . मी . (**0 . 8** मैल)

---

[20] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, p. 686

[21] Gazetteer of Bombay State, Poona District, volume XVIII, p. 686

किल्ल्याची इतर नावे ः वितंडगड, अमनगड.

तिकोणा किल्ला प्राचीन कालखंडातील असून तो गिरीदुर्ग प्रकारात गणला जातो. तिकोणा किल्ला तुंग किल्ल्यापासून **6.2** की.मी. (**3.8** मैल) अंतरावर आहे. पायथ्यापासून त्रिकोणी आकार दिसून येत असल्याने किल्ल्याचे नाव तिकोणा पडले असण्याचा संभव आहे. शिवाजी महाराजांनी **4** सप्टेंबर **1656** रोजी अनेक किल्ल्यांची नावे बदलली त्यात तिकोणा किल्ल्याचे नाव वितंडगड ठेवले गेले.[22] तिकोणा किल्ल्यास जाण्यासाठी कामशेत मार्गे काळेकॉलनी, पवनाधरण येथे जावून डाव्याबाजूने तिकोणापेठ गावातून तिकोणा किल्ल्यास जाता येते. पौड मार्गे कोळवण गाव व जवण गाव येथून तिकोणापेठ गावमधून किल्ल्यास जाण्याचा मार्ग आहे. मध्ययुगात तिकोणा किल्ला ते तुंग किल्ला जाण्याचा मार्ग वाघेश्वर मंदिराच्या शेजारून होता. तो आज पवना धरणाच्या पाण्याखाली गेलेला आढळतो.

- किल्लापायथा तिकोणापेठ ः

मध्ययुगात किल्ल्याच्या परीघातील गावांना राजकीय व सांस्कृतीक इतिहास लाभल्याचे निदर्शनास येते. तिकोणा किल्ल्याच्या पायथ्यास असलेल्या पेठतिकोणा या गावात अनेक मध्ययुगीन भग्नावशेष आढळतात, येथील अवशेषांच्या सर्वेक्षणात या गावामध्ये मध्ययुगात झालेल्या लढाया व विरांचा इतिहास पुढील पिढिस प्रेरणा देणारा ठरावा म्हणुन तयार करण्यात आलेल्या अनेक विरगळ तसेच विरांच्या चितेवर सती जाणाऱ्या स्त्रीयांच्या त्यागाची आठवण रहावी म्हणून निर्माण केलेल्या सतीगळ दिसून येतात. मध्ययुगातील किल्ल्यांच्या पायथ्याच्या गावांना किल्ल्याचे नाव असल्याचे अनेकदा आढळते. महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांच्याबाबत हे समिकरण आढळते. मावळ तालुक्यातील लोहगड किल्ल्याच्या पायथ्यास लोहगडवाडी तसेच तुंग किल्ल्याच्या पायथ्यास तुंगवाडी असून तिकोणा किल्ल्याच्या पायथ्यास तिकोणापेठ किंवा पेठतिकोणा हे गाव आहे.

तिकोणा किल्ला प्राचीन काळातील असल्याचे किल्ल्याच्या दक्षिण कातळकडयात खोदलेल्या गडदलेणीवरून दिसून येते. गडदलेणी ही तिकोणापेठ गावच्या विरूध्दबाजूस किल्ल्याच्या कातळयात खोदलेली आढळते. ज्याप्रमाणे तिकोणा किल्ला प्राचीन काळात लेणी व पोढी यांसाठी उत्तम सोय बनला तसेच भाजे ते शेलारवाडी

[22] स.म.दिवेकर, द.वी.आपटे (संपा.), *शिवचरित्र प्रदीप*, शिवापूर दफ्तरातील यादी, भा.इ.सं.म. प्रकाशीत, **2009**,पृ.**50**.

लेणीच्या मार्गावरील एक विहार म्हणून प्रसिद्ध पावला तसेच मध्ययुगातही तिकोणा किल्ला राजकीय पार्श्व भुमीमुळे कायम ऐतिहासिक महत्व असलेला ठरलेला दिसून येते. तिकोणापेठ गावात अनेक मध्ययुगीन अवशेष सुस्थितीत असल्याचे आढळून येते. भैरवनाथाच्या दोन मुर्ती, दगडी दिवा, मंदीरा समोरील दिपस्तंभ तसेच त्यावर ठेवलेला एक लहान आकाराचा दिवा (दिपस्तंभाची ऊंची **7.3** फुट असून एकावर दुसरी अशी चार शिळा ठेवून रचना केलेले आहे) आणि नंदी इत्यादी अवशेष तिकोणा किल्ल्याच्या पायथ्याच्या गावात जिर्णोध्दार केलेल्या भैरवनाथ मंदीरासमोर दिसून येतात. भैरवनाथ मंदीराच्या मागच्याबाजूचे गणेश मंदीर व त्यासमोरील **8** दगडी तळखडे यावरून मध्ययुगीन मंदिर मोठया सभामंडपाचे होते असे दिसून येते.

- किल्ल्याची दक्षिणमुखी गडदलेणी ः

किल्ल्याच्या दक्षिण कातळयास गडदलेणी खोदलेली दिसून येते. घसाऱ्यावरून कातळयापर्यंत पोहोचल्यावर लेणीचे द्वार आहे. तुंग किल्ल्याबाबतही प्राचीन खोदकाम दक्षिण कातळयास आढळते. तसेच तिकोणा किल्ल्यासही दक्षिण कातळयास गडद लेणी खोदली गेलेली दिसून येते. यावरून तुंग व तिकोणा दोन्ही किल्ल्यांमधील हे एक दक्षिण कातळयाचे साम्य दिसून येते. मावळ तालुक्यात आकाराने लहान मोठया अनेक लेणी बहुतांशी पर्वतांवर व कातळयांस खोदलेल्या आढळल्या आहेत व नव्याने समोरही येत आहेत. परिचीत लेणींमध्ये कार्ले, बेडसे, भाजे, घोरावडेश्वर म्हणजेच शेलारवाडी लेणी या असून यांव्यतिरीक्तही अनेक पर्वतांस पोढी, विहार व स्तुप खोदण्यात आलेले आढळतात. सातवाहनांच्या राजसत्तेस पुराणांमध्ये आंद्रसातवाहन संबोधले गेले. भारतप्रसिध्द झालेला सातवाहन राजवंश मावळ तालुक्यातील आंदर मावळ विभागातील होता असे काही इतिहास संशोधकांचे मत आहे. तत्कालीन बौध्दभिक्षूंच्या राहण्याची व पाण्याची सोय करणे राजवंशासाठी महत्वाचे वाटणारे कार्य होते. दरम्यानच्या काळात अनेक व्यापारी लोकांकडून दाने मिळाल्याने लेणी खोदण्याचे प्रमाण वाढले व अनेक पर्वतांस पोढी व विहार खोदले गेले. भाजे लेणी ते बेडसे लेणी असा प्राचीन मार्ग होताच बेडसे लेणीहून पुढे शेलारवाडी लेणीस जाण्याच्या मार्गावर तिकोणा लेणी होती. सारांश प्राचीन युगात trade Route म्हणजेच व्यापारी मार्ग म्हणून हा मार्ग प्रसिद्ध पावलेला आढळतो. शेलारवाडी लेणीस बेडसे लेणीतून जातांना गडद लेणी हा स्तुप असलेला एकच विहार दिसून येतो. लेणीचे खोदकाम करतांना आधी मुखाशी एक

15 फुट खोल पोढी खोदलेली आढळते. गडद लेणीस काशिंगची लेणी असेही संबोधले जाते. ही लेणी बौद्ध स्तुप असल्याचे दिसून येते. मात्र येथील स्तुप फोडला गेला आहे. यामुळे येथील प्राचीन बौद्धकलेचे नुकसान झाल्याचे दिसून येते. मावळ तालुक्यातील अनेक बौद्ध स्तुप फोडलेले दिसून येतात. शेलारवाडी म्हणजेच घोरावाडेश्र्वर येथे प्राचीन काळात बौद्ध स्तुप होता तो फोडून तेथे शिवपिंडी बसविली गेल्याचे दिसून येते तसेच येथील लेणीत स्तुप फोडल्या गेल्याचे निदर्शनास येते. यावरून प्राचीन लेणींमध्ये सांप्रदायीकतेची चढाओढ व पंथांचे एकमेकांवरचे अतिक्रमण दिसून येते.

लेणीच्या मुखाशी चौथरा ठेवलेला आहे. याचे दोन स्तंभ वरच्या कातळयास आधासाठी ठेवलेले दिसून येतात. येथील स्तंभ **2.3** × **2.3** फुट जाड असून **7** फुट उंच आहेत. स्तंभांमूळे येथील चौथऱ्यास समोरच्या बाजूने तीन दालने दिसून येतात. लेणीचे मुख **7** × **6** फुट असून यातून आत प्रवेशल्यावर दोन पायऱ्या उतराव्या व पुन्हा दोन पायऱ्या पुढे जातांना चढाव्या अशी रचना ठेवलेली आढळते. मुख ते शेवटचा कातळा हा लांब असा एक पॅसेज आहे. येथील पायऱ्या चढण्याच्या आधी **180** अंशामध्ये मोठी घळई वरच्याबाजूस दिसून येते. येथील घळई म्हणजे कातळा आतमधील बाजुने दुभंगला गेला असल्याचे दिसून येते. ही नैसर्गीक घळई असून हीचा शेवट पायऱ्यांवरून दिसून येत नाही. अशा रचनेतील एक नैसर्गीक घळई खेड तालुक्यातील भामचंद्र डोंगरावरील लेणीतही आढळते. गडदलेणीच्या पॅसेजची रूंदी सलग **7** फुट ठेवलेली असून लेणीत आतमध्ये डाव्या बाजूस एक लहान आकारातील खोली खोदलेली आढळते. येथील खोलीच्या द्वारास प्रभावळ कोरलेली आढळते. ही खोली **6** × **5** फुट आकारात असून याच रचनेची खोली किल्ल्यावरील तळजाई लेणी समुहातील **5** व्या खोलीशी मिळतीजुळती आहे. येथील खोलीत पाण्याची लहान आकारातील धार पडण्यास सुरूवात झाल्यानंतर खोलीतून एक लहान आकाराची मोरी प्राचीन काळातच खोदण्यात आलेली आढळते. खोदलेल्या मोरीतील पाणी खोलीच्या बाहेर वाहून जावे व खोलीत पाण्याचा संचय होवू नये यासाठी ऊजव्याबाजूस द्वार भंग करून पाणी बाहेर जाईल अशी योजना केलेली आढळते. खोलीत गळणाऱ्या पाण्याचा निचरा व्हावा यासाठी निर्मीलेली ही व्यवस्था घळईपर्यंत कोरलेली दिसून येते. ही व्यवस्था केल्यामुळे पावसाळयात लेणी पुर्ण ओली न होता या मोरीतून पाणी वाहून जात असल्याचे आढळते.

गडद लेणी ही लहान आकाराची लेणी असून अनेकविध उत्कृष्ट योजना येथे केलेल्या निदर्शनास येतात. परंतु एकही शिलालेख येथे कोरलेला आढळत नाही. विसापूर किल्ल्यावर ज्याप्रमाणे लेणी कोरणाऱ्या कारागीराने 'मुगुदपालीत' असे स्वतःचे नाव ब्राह्मी लिपीतील शिलालेखात कोरले.[23] तसे गडद लेणीत एकही शिलालेख सापडलेला नसून त्यामुळे तिकोणा किल्ल्याच्या प्राचीन इतिहासाबद्दल महत्वपुर्ण माहिती उपलब्ध होत नाही. गडद लेणी आतमध्ये शेवटच्या कातळयास गोलाकार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याच आकारातील अशाच रचनेची एक लेणी तुंग किल्ल्याच्या पश्चिम कातळयात दिसून येते. गडदलेणीचे काम अर्धवट राहिलेले असून लेणीच्या शेवटच्या कातळयास पायऱ्या कोरलेल्या आहेत. येथे द्वार कोरून आत खोली करण्यासाठी प्रयत्न केलेला आढळतो मात्र पायऱ्या कोरून काम तसेच थांबविले असल्याचे निदर्शनास येते. दान न मिळाल्यामुळे किंवा दुष्काळ तसेच कातळयास मुरूम लागल्यामुळे खोदण्याचे थांबविले असावे असा संभव आहे.

- किल्ल्यावर जाणारा सोंडेचा मार्ग ः

प्राचीन तसेच मध्ययुगात माथ्यावर जाणारा सोंडेचा मार्ग असल्याचे आढळते. किल्ल्याच्या माथ्यावर जाणारा मुख्य प्रवेशमार्ग सोंडेवरून जात असल्याचे दिसून येते. किल्ल्यावरून सोंडेचा मार्ग कायम तोफेच्या टप्प्यात ठेवता यावा अशी किल्ल्याची बांधणी करतांना रचना केलेली दिसून येते. ज्याप्रमाणे लोहगड व विसापूर किल्ले कोणी बांधले याची माहिती उपलब्ध नाही त्याचप्रकारे तिकोणा किल्ला कोणी बांधला याचीही नोंद मिळत नाही. पायथ्यापासून किल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वारापर्यंत सोंडेच्या मार्गास तीन नैसर्गीक उंचवटे असून या तीन्हींवर 10 × 10 फुट आकाराच्या पहारेकऱ्यांच्या खोल्या असल्याचे आढळते. या तीन्ही टप्प्यांतील खोल्या साधारणतः सारखाच असल्याचे निदर्शनास येते. नैसर्गीक उंचवटयावर पाया उंच ठेवून येथील पहाऱ्याच्या चौक्या बांधलेल्या आढळतात. पायथ्यापासून प्रथम प्रवेशद्वारापर्यंत जाणारी वाट लष्करी कामगीरीसाठी नागमोडी निर्माण केलेली आढळते.

---

[23] शोभना गोखले, *प्राचीन भारतीय इतिहासाची साधने*, टिळक महाराष्ट्र विदयापीठ प्रकाशीत, 2012 पृ. 104-107.

- तिकोणाकिल्ल्याचे प्रथम वेताळ प्रवेशद्वार ः

तिकोणा किल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वारास वेताळ प्रवेशद्वार असे संबोधले जाते. जसे जुन्नर तालुक्यातील हडसर किल्ल्यावरील अनेक प्रवेशद्वारे ही बांधीव नसून कातळखोदीव आहेत, साल्हेरचा जोडदुर्ग सालोटा याची काही प्रवेशद्वारे बांधीव नसून कातळकोरीव आहे तसे तिकोणा किल्ल्याचे प्रथम प्रवेशद्वार बांधीव नसून एक मोठया शिळेस खोदुन बनविलेले दिसून येते. प्राचिन काळात येथील पर्वताच्या कातळयास गडदलेणी खोदल्यानंतर माथ्यावर लेणी कोरण्यायोग्य सध्या तळजाई लेणी असलेला कातळा होता. मात्र या कातळयास पोहोचतांना सध्या प्रथम प्रवेशद्वार असलेल्या ठिकाणी मोठी शिळा होती. या शिळेवरून पलीकडे जाणे श्रमाचे असल्याने येथील मोठया शिळेस फोडून लहान आकारातील द्वार बनविले गेले. येथील शिळेस सुरूवातीस लहान आकारातील द्वार होते परंतु ज्यावेळी लष्करी उपयोगासाठी येथील पर्वताचा उपयोग चालू झाला त्यावेळी द्वाराची रूंदी वाढविण्यात आलेली दिसून येते. लष्करी उपयोग चालू झाल्यावर अनेक प्राचीन अवशेषांचे रूपांतर किल्ल्यास आवश्यक लष्करी सोयीनुसार केलेले दिसून येते. रचनात्मक बदल चालू असतांना प्राचीन काळातील मोकळया द्वारास लष्करी सुरक्षेसाठी बंदिस्त केले गेले. प्रथम प्रवेशद्वारास दोन्हीबाजूंनी भिंती बांधून येथे द्वार बसविण्यात आलेले आढळते. प्राचीन काळात प्रथम प्रवेशद्वाराच्या आत डाव्याबाजूस कोरलेली अलंगा तशीच ठेवुन लष्करातील पहारेकऱ्यांची येथे बसण्याची व्यवस्था केलेली निदर्शनास येते. म्हणजेच लष्करी उपयोगात येथील पर्वत आणल्यानंतर प्रथम द्वारास अलंगा बांधली किंवा कोरली नाही असे दिसून येते. या प्रवेशद्वारास ऊजवी देवडी नसून प्रवेशद्वार **7.6 × 6** फुट कातळ खोदीव आहे. प्रथम प्रवेशद्वारास पावसाळयाच्या दिवसांत आतमधील पाण्याचा लोंढा बाहेर वाहून जावा यासाठी मोरी ठेवलेली असून द्वाराच्या आत अडलेले पाणी आजही या मोरीद्वारे बाहेरील बाजूस वाहून जाते. डावीकडील देवडीत दिवा लावणीसाठी एक कोनाडा खोदलेला आहे. डाव्याबाजूच्या देवडीत प्रवेश करण्यासाठी **1.5** फुट ऊंची असलेला एक चौथरा ठेवलेला आहे. तिकोणा किल्ल्याची अर्धत्रिकोनी आकाराची खोदिव देवडी विसापूर किल्ल्यावरील पाटण प्रवेशद्वारातील कोठारांच्या देवडीशी साम्य दर्शविणारी आढळते. येथील देवडीतच आणिक एक छोटी देवडी **3** फुट ऊंचीवर खोदलेली आहे. या उंचीवर खोदलेल्या देवडीचा वापर वस्तू ठेवणीसाठी करत असावे असा संभव आहे. प्रथम प्रवेशद्वाराच्या दुर्गमतेत भर घालण्याच्या उद्देशाने द्वाराच्या बाहेरील बाजूने साधारण दहा फुट रूंदीचा खंदक

मध्ययुगात खणला गेलेला दिसून येतो. कालौघात याचा डावीकडील कातळा फुटल्याने यात पाणी साठेनासे झालेले दिसून येते. जसे भुईकोट किल्ल्यास खंदक असल्याने त्याच्या  दुर्गमतेत वाढ होते. त्याच्या तटापर्यंत शत्रूसैन्य जावू शकत नाही. तसे गिरीदुर्गाच्या प्रथम प्रवेशद्वारात ही रचना केलेली आढळते. येथील खंदक लहान आकारात केलेला आढळतो. मात्र गिरीदुर्गाच्या माथ्यावरील प्रथम द्वारात असा खंदक पहिल्यांदाच तिकोणा किल्ल्यावर आढळून आला आहे व प्रस्तुत संशोधनातून हे नाविन्य प्रथमच येत आहे. पावसाळयात येथील खंदकात आजही पाण्याचा संचय होतो. सध्या येथील खंदकातून द्वाराच्या आत जाण्यासाठी दगड मातीने भराव केलेला दिसून येतो. मावळ तालुक्यातील इतर किल्ल्यांप्रमाणे तिकोणा किल्ल्यास एकही प्रवेशाद्वारास कवाडे उपलब्ध नाहीत. लाकडी कवाडं आडकविण्याची दगडी कुसं येथे दिसून येतात.

- किल्ल्याचे द्वितीय प्रवेशद्वार ः

द्वितीय प्रवेशद्वाराचा मार्ग किल्ल्याच्या डाव्याबाजूच्या कातळयाच्या माऱ्याच्या टप्प्यात ठेवलेला आहे. शत्रुसैन्यावर डाव्याबाजूच्या कातळकडयावरून मोठे दगड धोंडे फेकता यावे अशी रचना येथे केलेली आढळते. किल्ल्यावरील पहारेकऱ्यांचा तोल जावू नये यासाठी उजव्याबाजूचे संरक्षित कठडे उंच रचनेत बांधलेले आढळतात ते आजही सुस्थितीत आहेत. पहारेकऱ्यांच्या संरक्षणाची घेतलेली काळजी येथे दिसून येते. प्रथम द्वार ते द्वितीय द्वार **24** पायऱ्या चढणीच्या असून द्वितीय द्वार डाव्याबाजूस बुरूजांमध्ये लपविलेले आहे. अशी द्वाररचना शत्रूसैन्य पहिल्या प्रवेशद्वारातून आत प्रवेशलेच तर दुसऱ्या प्रवेशद्वाराजवळ ते येईपर्यंत त्यांच्यावर डाव्याबाजूने हल्ला करता यावा व शत्रूसैन्याने जरी जंबुऱ्याच्या लहान मोठया तोफांनी भांडी डागली तरी द्वितीय द्वार सुस्थितीत रहावे या उद्देशाने द्वितीय द्वार लपविलेले दिसून येते. गिरीदुर्गांत तिव्र चढणीच्या पायऱ्यांची रचना करून द्वार लपविले जाते कारण शत्रुसैन्याकडून हत्तींसारखे बलाढय प्राणी वरपर्यंत आणले गेलेच तरी त्या प्राण्यास पळत जावून द्वारावर धडक घेता येवू नये असे होते. याकरीता महाराष्ट्रातील बहुसंख्य किल्ल्यांच्या द्वार रचनेत लपविलेले द्वार दिसून येते. द्वितीय प्रवेशद्वाराच्या आत जाण्यासाठी दोन्ही बुरूजांच्या मधोमध तिव्र चढणीच्या **4 – 5** पायऱ्या ठेवलेल्या दिसून येतात. द्वार हे किल्ल्याचे सामर्थ्य असणे सहाजिक होते. कारण द्वार पडले की किल्ला हस्तगत करणे शत्रूसैन्यासाठी सोपी गोष्ट होत असल्याचे दिसून येते. म्हणून प्रवेशद्वारांवर

हत्तीसारख्या प्राण्याने धडका देवू नये यासाठी अणकुचीदार खिळे लावण्याची पद्धत मध्ययुगात प्रचलीत असल्याचे दिसून येते. तसेच प्रवेशद्वाराच्या दोन्ही कवांडांमागे आतमधील बाजूने लाकडी अडसूळ आडवा ओढून दुसऱ्या बाजूस खोचण्याची एक पद्धत होती. यामुळे द्वारावरील आघात सहन करण्याचे काम आडसूळ करीत असे. द्वितीय प्रवेशद्वाराचे दोन्ही बुरूज 12 □ 10 फुट अशा समान आकारात बांधलेले आहेत. येथील प्रवेशद्वारामागील अडसूळ 1.8 □ 1.5 फुट जाड आकारात होता. येथील प्रवेशद्वारासही लाकडी कवाडं ऊपलव्ध नाहीत.

दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या ऊजव्या बुरूजावर चकीतोफ ठेवण्यासाठी केलेली गोलाकार जागा दिसून येते. येथील तोफेस 360 अंशात फिरवीता येत असल्याचे येथील चरावरून दिसून येते. एका मोठया खुंटीवर चकीतोफ ठेवून ती फिरवीली जात असे. तोफ चक्राकार फिरते म्हणून यास चकीतोफ संबोधले गेलेले दिसून येते. येथील प्रवेशद्वारास पाणी बाहेर वाहून जाण्याची सोय नसून प्रवेशद्वाराची बांधणी करतांनाच ऊंचीवर बांधलेले आढळते. त्यामुळे पावसाचे पाणी प्रवेशद्वारापर्यंत न जाता ऊताराच्या बाजूने तटवंदीतील मोरीतून थेट प्रवेशद्वाराच्या समोरून किल्ल्याच्या खाली पडते. येथील मोरी रायगड किल्ल्यावरील मो□सारखी लांब व रूंदीने मोठी आहे. येथील मोरीची लांबी 30 फुट असून पावसाळयाच्या दिवसांत आजही या मोरीद्वारे पाणी किल्ल्याच्या खाली जावून पडते.

- चकीतोफ, पहारेकऱ्यांच्या खोल्या व दारूगोळा कोठार ः

द्वितीय प्रवेशद्वाराच्या आत अनेक भग्नावशेष आढळून येतात. प्रवेशद्वाराच्या समोरील बाजूस असलेला गोलाकार तीनफुट ऊंच कट्टा लक्षवेधक असून येथे शस्त्र कसरती चालत असाव्यात असा संभव आहे. माचीवर एखादा चौथरा बांधून शस्त्रास्त्रांच्या कसरती केल्या जात असत. शिवनेरी किल्ल्यावरील माचीवर असाच ढालकाठीचा चौथरा असून वरंधा घाट उतरल्यावर कांगोरीगड उर्फ मंगळ गडास जाण्यासाठी असणाऱ्या गावास ढालकाठी असे येथे चालणाऱ्या शस्त्र कसरतीमुळे संबोधत होते.[24] या ठिकाणाहून पुर्वेकडे जसे विसापूर

---

[24] क्षेत्रभेट, मुलाखत – पांडूरंग धुमाळ, ढालकाठी गाव, दि.22 मे 2013.

किल्ल्यावर टेकडीतील काही दगडांना शेंदूर लावून देवाचे स्थान बनविले आहे तसेच येथे अनेक दगडांना शेंदुर लावून देवाचे स्थान निर्माण केले असल्याचे आढळते. येथील स्थानास वेताळ मंदीर संबोधले जाते. पूर्वेकडील बुरूजावर मध्ययुगात मोठया आकाराची तोफ होती. येथील बुरूज इतर बुरूजांपेक्षा निराळा असून याचा चौकोनी आकार आहे. येथील तोफ किल्ल्याचे पुर्व, ऊत्तर व दक्षिण अशा तिन्ही दिशांचे संरक्षण करू शकते. मात्र सध्या संपुर्ण किल्ल्यावर एकही तोफ शिल्लक नसल्यामुळे मध्ययुगात येथे किती तोफा होत्या आणि विशेष प्रस्तुत बुरूजावर कोणत्या आकाराची व किती लांबीची तोफ होती याबद्दल माहिती उपलब्ध होत नाही. मध्ययुगात तिकोणा किल्ल्यावरून तोफा विसापूर किल्ल्यास हलविल्या असल्याचे पत्र आहे. **1750 □51** सालच्या उल्लेखाप्रमाणे तिकोणा किल्ल्याचा किमती जीन्नस व तोफा तेथून हलविल्या असल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रकारे आपाजी बाबुराव यांची बटीक स्त्री येथून हरी बल्लाळ यांच्या स्वाधीन करण्यास सांगीतलेले असून बाकी जिन्नसही चिमणाजी पंडीत सचिव यांच्या माणसांना द्यावावयास सांगीतला आहे व याची पोच घेण्यास सांगीतले आहे. तिकोणा किल्ल्यावरील एवढया महत्वपुर्ण वस्तु व व्यक्ती किल्ल्यावरून इतरत्र का हलविल्या याचे कारण स्पष्ट होत नाही. यासंबंधी नारो भगवंत यास दिलेली सनद पुढीलप्रमाणे ः

"किल्ले तिकोना येथील दारूगोळी, तोफा वगैर जिन्नस किल्ले विसापूरास नेला आहे. त्यांत हरी बल्लाळ दिमत आपाजी बाबुराव यांची बटीक किल्ल्यावर होती. तिजला नेली आहे म्हणून विदित झाले. सदर बटिक व तिचा पोर ऐसी दोघे हरी बल्लाळ यांचे स्वाधीन करणे. बाकी दागिने व जिन्नस राहिला त्यापैकी शिशाच्या विटा मोजदादीशिवाय सांपडल्या आहेत. त्या ठेऊन, बाकी जिन्नस तिकोन्यापैकी राहील तो रा.चिमणाजी पंडित सचीव यांजकडील माणसे येतील त्यांचे पदरी घालणे, पावल्याची पोहोच घेणे म्हणून नारो भगवंत यास सनद"

तळजाई लेणीच्या मार्गावरील दारूगोळा कोठार भग्नावस्थेत असून त्याच्या जोत्यांवरून येथे दारूगोळा कोठार समजते आहे. दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या आतमधील दारूगोळा कोठार **23 □19** फुट आकाराचे असून याचा पाया **3** फुट उंच घेतलेला आढळतो. या ठिकाणी **10 □10** फुट आकाराचे दारूगोळा कोठार शेजारीच आढळते. तळजाई लेणीस जातांना ऊजव्या व डाव्याबाजूस पहारेकऱ्यांच्या खोल्यांची जोती सभोवती दिसून येतात.

- ऊत्तरभिमुख हनुमान व दर्शनाची व्यवस्था ः

प्राचीन काळात येथील ठिकाणी एक अवाढव्य शिळा वरच्या टप्प्यावरून सुटून येथे येवून पडली असावी. **15** फुट ऊंची असलेली ही शिळा समोरच्याबाजूने बऱ्यापैकी सपाट असल्याने यावर एखादी शक्तीदेवता कोरणे मध्ययुगातील सहजमान्य बाब होती. **8** फुट ऊंची असलेली हनुमान मुर्ती या शिळेवर कोरली गेली. ही मुर्ती कोरतांना हनुमानाच्या अंगावर एकही शस्त्र दर्शविलेले नाही. तसेच डोक्यावर टोप दाखवून पायाखाली पनवती नावाची राक्षसीन दाबलेली दर्शविले आहे. हनुमानाने चापटी मारण्याचा पवित्रा घेतला असल्याने यास 'चपेटदान हनुमान' असे संबोधले जाते. मुर्ती कोरून झाल्यावर ती जास्त तिरकी म्हणजेच **45** ते **50** अंशात आकाशाकडे तोंड असलेली दिसत असल्याने मध्ययुगात मागील बाजूने काही धोंडी लावून या शिळेस मागच्याबाजूने टेकू दिलेला आढळतो. हनुमानाच्या दर्शनासाठी किल्ल्यावरील सैनिकांना श्रम होवू नये व जवळ अंतर असावे म्हणून शिळेच्या दोन्ही बाजूंनी वरपासून ते खालीपर्यंत **15** x **15** पायऱ्या बांधून सैनिकांची दर्शन व्यवस्था करण्यात आलेली दिसून येते. या पायऱ्या बांधल्यामुळे किल्ल्यावरील सैनिकांना हनुमानाचे दर्शन घेणे सहज शक्य झाले. पायऱ्यांची निर्मीती करतांना कल्पकाने एक चांगला प्रदक्षिणामार्ग या शिळेभोवती ठेवला व दोन्हीबाजूंस सारख्या आकारात या पायऱ्यांची निर्मिती केल्याने येथील परिसर सुशोभीत करण्याचा प्रयत्न दरम्यान कल्पकाकडून करण्यात आल्याचे दिसून येते. डिसेंबर **2012** दरम्यान शिवाजी ट्रेल संस्थेअंतर्गत किल्ल्यावर झालेल्या संवर्धनाच्या कामांमधून हनुमानाच्या शिळेस दोन्हीबाजूंनी **4** x **4** पायऱ्या बांधून घेतलेल्या आहेत.

- तळजाईलेणी, गोलाकार पोढी व परिसर ः

तळजाई लेणीसमोरील परिसर चांगला मोकळा असून येथे केळीची झाडे मोठया उंचीत असलेली दिसून येतात. केळीच्या झाडांची ऊंची **25** फुट असून याचे खोड कडूलिंबाच्या झाडाच्या खोडाप्रमाणे जाड आकाराचे आहे. तळजाईलेणी परिसरात **3.6** फुट ऊंच तुळशीवृंदावन बांधलेले असून दिवा लावण्यासाठी यास कोनाडा ठेवलेला आहे. हे वृंदावन नव्याने बांधलेले असून याठिकाणी बांधलेल्या तुळशी वृंदावनासारखेच अनेक किल्ल्यांवर नव्याने वसाहत करणारे लोक नवीन बांधकामांची उभारणी करतांना दिसून येतात. त्यामुळे ऐतिहासीक गोष्टीस बाधा उत्पन्न होते मात्र पुरातत्व खाते व ग्रामस्थ यांच्या दुर्लक्षामुळे किल्ल्यांवर ऐतिहासीक

गोष्टींची तोडफोड करणे तसेच लेणींमध्ये राहण्यासाठी समोरील मुख बंद करून लोखंडाच्या जाळीचे दरवाजे बसविणे अशा गोष्टी सध्याच्या काळात किल्ल्यांवर चालू असल्याचे आढळते.

तळजाईलेणी ही प्राचीन कालखंडातील नक्षिदार लेणी आहे. परकीय राष्ट्रांमधुन अनेकदा ही लेणी पहाण्यासाठी पर्यटक येथे मोठया संख्येने येतात. मात्र येथे रहाणाऱ्या साधू मंडळींनी येथील लेणीच्या सौंदर्यास बाधा व्हावी अशा अनेक गोष्टी केलेल्या दिसून येतात. येथे संपुर्ण लेणीस शेंदुर फासून ठेवलेला दिसून येतो. छत व भिंती सर्व शेंदुर लावून रंगविलेल्या असून लेणीपर्यंत जाता येवू नये असा अडसर व सुरक्षा कुंपण लोखंडी गजांमध्ये करून घेवून येथे तेथील कायमस्थित साधूंमार्फत केला गेला आहे. साधू मंडळींनी या लेणीतील दोन खोल्या लोखंडी द्वार लावून कुलूप लावून बंद केलेल्या आढळतात. येथील लेणीस सध्या जाता येत नाही. कारण साधुंमार्फत लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांस मज्जाव करण्यात येत असल्याचे दिसून येते. किल्ल्याच्या परीघातले जंगल वनविभाग खात्याकडे असून किल्ला पुरातत्व खात्याकडे आहे परंतु किल्ल्याचा गाभा असलेले तळजाई लेणी साधूंकडे असल्याचे दिसून येते.

तळजाई लेणीसमोर पहारेकऱ्यांच्या राहण्याच्या खोल्यांचे अवशेष आहेत. संपुर्ण किल्ल्यावर सैनिकांची मोठया संख्येची शिबंदी राहण्यासाठी येथील जागा मध्ययुगात किल्लेदारामार्फत निवडली असल्याचे दिसून येते. येथील विस्तिर्ण जागेमुळे तळजाई लेणीचाही लष्करी उपयोग पहारेकऱ्यांकडून केला गेला होता असे निदर्शनास येते.

तळजाई लेणीचे खोदकाम येथील कातळयात करण्याआधी येथे एक नैसर्गीक घळई कातळयास होती. असे लेणीच्या व्हरांडयातील छतावरून आढळते. नैसर्गीक घळईस लेणी खोदतांना कमी वेळ व श्रम खर्च होतात त्यामुळे येथील कातळा लेणी खोदण्यासाठी दरम्यान निवडला असावा असा संभव आहे. तळजाई लेणीच्या चिकीत्सक सर्वेक्षणासाठी लेणीतील डाव्या क्रमांकाच्या खोलीपासून□ही खोली पोढीस स्पर्शीलेली आहे□सुरूवात केलेली आहे. तळजाई लेणी आयताकृती असून लेणीच्या मार्गावर मुखाजवळ पोढी खोदलेली आहे. तीस वळसा घालून ऊजव्याबाजुने लेणीच्या व्हरांडयात जाता येते. येथील खोल्यांचे क्रमांकवार विवेचन पुढीलप्रमाणे ः

**1**□क्रमांक एक ही खोली येथील लेणी खोदतांना प्रथम खोदल्या गेलेली आढळते. या खोलीचे द्वार खोदतांना जाड आकाराची कमान द्वारास ठेवलेली आढळते. येथील खोलीचे द्वार **5.3** □**4** फुट असून आतमध्ये एक फुट ऊंचीचा चौथरा ठेवलेला आढळतो. खोली **5.4** □**5** फुट आकाराची असून साधारणतः चौकोणी

आकारात खोदलेली आहे. सध्यस्थितीत ओटयावर देव मांडून त्यांची पुजा येथील कायमस्थित साधूंकडून केली जात आहे.

2□कमांक दोन ही खोली नसून कोठार आहे. या कोठारास द्वार नसून लहान आकारातील खिडकी ठेवलेली आहे. **2.8 □3.5** फुट आकाराची खिडकी धान्यासाठी ठेवलेली दिसून येते. हे एक धान्यसंग्रहासाठी खोदलेले कोठार होते असे दिसून येते. प्राचीन व मध्ययुगीन काळात याचा वापर धान्यकोठी म्हणूनच होत असल्याचे आढळते. येथील कोठी **7** फुट खोल असून **8 □8** फुट आकारमानाची आहे. प्राचीन काळात अशा आकारात धान्य कोठार का ठेवले गेले हे स्पष्ट होत नाही. परंतु मध्ययुगात हे धान्यकोठार कायम वापरात राहीलेले दिसून येते. मध्ययुगात सैनिकांनी लष्करी सोयीसाठी अनेक बदल प्राचीन रचनांत केलेले आढळतात. मात्र येथील धान्य साठविण्याच्या प्राचीन योजनेत मध्ययुगात कोणतेच बदल केले नसल्याचे आढळून येते.

प्राचीन कोठीच्या मुखाशेजारी कोपऱ्यात पाण्याची **3** फुट खोल पोढी खोदलेली आढळते. या पोढीच्या मुखाचा **3 □2** फुट आकार असून प्राचीन काळात या पोढीतील पाण्याचा उपयोग पिण्याकरीता व समोरील मोठया पोढीचा उपयोग इतर पाण्याच्या व्यवस्थेकरीता होत असण्याचा संभव आहे. मात्र मध्ययुगात येथील लहान आकाराच्या पोढीस **3** फुट ऊंच भिंत बांधून बंदीस्त केले गेलेले आढळते. लहान हौद मध्ययुगात या पोढीवर बांधलेला दिसून येतो. या हौदाचे वरच्या बाजुने मुख उघडे ठेवून पाणी टिकून रहावे म्हणून आतमधील बाजूच्या भिंतींस चुन्याचा गिलावा देण्यात आल्याचे आढळते. चुन्याचा गिलावा व दगडी भिंत आज सुस्थितीत आहेत. पोढीच्या वरच्या बाजूस कोपऱ्यास दिवा लावणीसाठी एक कोनाडा आहे. प्राचीन व मध्ययुगात येथील पोढीच्या आकारात बदल केले गेले परंतु यातील पाणी पिण्यासाठी वापरत असण्याचा संभव आहे.

3□कमांक **3** ही खोली नसून प्राचीन काळातील प्रदक्षिणामार्ग होता असे प्रस्तुत संशोधनातून नव्याने समोर येत आहे. कमांक **4** या खोलीत तळजाई देवीची स्थापना ही लेणी निर्माणाच्या दरम्यानच केलेली होती. येथे जशी लेण्याद्री लेणीत नव्याने गणपती मुर्ती बसविली गेली तशी नव्याने तळजाई मुर्ती आणून बसविलेली नाही. म्हणून देवीस प्रदक्षिणामार्ग ठेवणे कमप्राप्त होते. यासाठी सर्वेक्षणात गणलेला क.**3** हा प्रदक्षिणा मार्ग होता व यातून प्रदक्षिणा घेवून क.**5** मार्गे बाहेर पडता यावे अशी रचना होती. प्रदक्षिणा मार्ग अंधारात असल्याने आतमधील बाजूने दिवा लावणीसाठी अनेक कोनाडे कातळयात खोदलेले दिसून येतात. म्हणजेच कमांक **4** हा तळजाईचा

मुख्य गाभारा होता व **3** आणि **5** हा प्रदक्षिणा मार्ग होता. मात्र येथील पर्वताचा लष्करी उपयोगासाठी वापर चालू झाल्यानंतर क्र.**3** च्या मार्गात सैनिकांच्या विश्रांतीसाठी **3** फुट ऊंचीचा दगडी कट्टा बांधून घेण्यात आलेला दिसतो. तसेच येथून पुढे ऊजवीकडे जाणारा मार्ग **10** फुट अंतरानंतर दगडा मातीत चिणलेला आढळतो. प्रदक्षीणा मार्ग येथे बंद केला गेला व दोन फुट रूंदीची भक्कम भिंत येथे बांधून येथील मार्ग कायमचा बंद झालेला निदर्शनास येते. क्र.**3** च्या प्रदक्षिणा मार्गास शेवटच्या कातळयास खोदत असतांना कठीण दगड संपला व मुरूम लागला त्यामुळे पुढील लेणी खोदण्याचे येथे थांबविले आणि लागलेला मुरूम न उचलता येथे आहे असाच ठेवलेला निदर्शनास येतो. प्रदक्षिणा मार्गाच्या मुखापासून शेवटच्या मुरूम लागलेल्या कातळयापर्यंत **30** फुट लांबीचे अंतर आहे. मध्ययुगात सैनिकोपयोगी लष्करी व्यवस्थेत येथील प्रदक्षिणा मार्ग बंदिस्त होवून स्वतंत्र खोली निर्मीली गेलेली आढळते.

तुळजाई लेणीच्या शेजारील दोन्ही खोल्या असल्याचा समज आजवर होता. परंतु आतमधील भिंत मध्ययुगात बांधली गेल्याचे समोर आल्याने प्राचीन काळात येथे प्रदक्षिणा मार्ग असल्याचे प्रस्तुत संशोधनातून समोर आले आहे.

**4**. तळजाई मंदीर क्रमांक **4** च्या खोलीत केलेले असून गाभाऱ्यास प्रदक्षिणेसाठी प्राचीन काळात मार्ग ठेवलेला होता. गाभाऱ्यास नक्षीकाम केलेला एक स्तंभ डाव्याबाजूने कोरलेला असून यास भारवाहू यक्ष न कोरता सुबक नक्षीकाम केलेले आढळते. मात्र येथे डाव्या बाजूच्या स्तंभासारखा स्तंभ उजव्याबाजूस ठेवलेला दिसून येत नाही. प्रवेशद्वारात डाव्या कातळयास दिवा लावणीसाठी एक कोनाडा जमीनीपासून **1.9** फुट ऊंचीवर कोरलेला असून गाभाऱ्याच्या बाहेर छताच्या कातळयास नक्षीदार दुहेरी पाकळयांचे कमळपुष्प **1.4** फुट व्यासात कोरलेले आढळते. छतातून सुटावल्यासारखी कलाकुसर या ठिकाणी केलेली असून गाभाऱ्याचे द्वार **5.3 □2.8** फुट आकाराचे आहे. प्रवेशद्वारावर नक्षिदार प्रभावळ नसून माथ्यावर गणेशपट्टी कोरलेली स्पष्ट दिसून येत नाही. प्रभावळीच्या नक्षीत व माथ्यावरील पट्टीवर कोणत्या देवाचे शिल्प कोरले होते ते शेंदुर फासलेला असल्याने दिसून येत नाही. संपुर्ण लेणी शेंदुराने रंगविल्याने येथील कलाकुसर व ऐतिहासीक महत्वपुर्ण बाबीं नामशेष होत असल्याचे निदर्शनास येते आहे. तळजाईचा गाभारा **7.4 □7.4** फुट आकाराचा असून गाभाऱ्यात छताच्या कातळयास एक **5** फुट व्यास व **8** पाकळयांचे कमळपुष्प आतमधील नक्षीचे कोरलेले आढळते. सध्या या

कमळपुष्पास पितळी घंटा अडकविलेली दिसून येते. गाभाऱ्यातील व द्वाराबाहेरील दोन्ही कमळपुष्पांमधील मुख्य फरक हा आतमधील बाजूने व बाहेरील बाजूने केलेल्या नक्षीकामाचा आढळतो. गाभाऱ्यातील तळजाई मुर्तीच्या मागील भिंतीवर चार कळसाचे एक देवालय व त्यात हात जोडून देवाची भक्ती करणारी स्त्री मांडी घालून बसलेली दर्शविली आहे. गाभाऱ्यात ऊजव्या भिंतीस दिवा लावणीसाठी एक नक्षिदार कोनाडा कोरलेला आढळतो. तळजाईच्या कोरीव शिल्पाचा अभिषेक किंवा पुजा झाल्यानंतर त्यावरील पाणी तिर्थ म्हणून गणलेले आढळते. कारण हे पाणी वाहत जावून एका लहान आकारातील कुंडात साचावे अशी रचना येथे कोरलेली आढळते व येथील कुंड भरले की ते तिर्थ बाहेरील मोठया खोदीव टाक्यात जावून पडते. तळजाईचे तीर्थ म्हणुन याकडे पाहीले जाते.

**5**. प्राचीन काळात प्रदक्षिणा मार्ग म्हणून याचा उपयोग होत होता मात्र मध्ययुगात येथील मार्गाचे खोलीत रूपांतर केलेले दिसून येते. प्रस्तुत प्रदक्षिणा मार्गाचे द्वार **4.10 □2.7** फुट आकाराचे असून प्रवेशद्वाराच्या आत गेल्यावर समोरच्या बाजूस अर्धवट चिनलेली भिंत दिसून येते. येथील भिंतीच्या मागे असलेली भिंत ही क.**3** च्या प्रदक्षिणा मार्गातून आत उजव्या बाजूस बांधलेलीच भिंत आहे. क.**5** मधील ही भिंत वरच्याबाजूने मोकळी ठेवलेली आढळते. दोन्ही भिंतींच्या मधील पोकळी **7.5 □4** फुट आकाराची असून येथे खोलाकाराच्या खोलीत मध्ययुगात धान्यकोठार निर्माण केलेले दिसून येते. येथील खोली आजही सुस्थितीत असून सध्या यात साधूमंडळींकडून धान्य साठविलेले दिसून येते. येथील दोन्ही भिंतींस दोन्हीबाजूंनी चुन्याचा गिलावा केलेला आढळतो.

क.**5** हा प्रदक्षीणा मार्ग असला तरी त्याचे मध्ययुगात खोलीत रूपांतर झालेले आहे. संपुर्ण खोली **14.5 □7.5** फुट आयताकारात आहे. द्वारातून खोलीत ऊजव्याबाजूस **4** फुट ऊंची असलेला कट्टा ठेवलेला असून त्यावर चढण्यासाठी पाय रूतविण्यास कातळयास कोनाडे खोदलेले आढळतात. येथील कट्टा **4 × 4** फुट आकाराचा असून कट्ट्यावर लहान आकाराची एक खोली खोदलेली निदर्शनास येते. किल्लाच्या कातळयातील गडद लेणीतील एक खोली या खोलीशी मिळतीजुळती असल्याचे आढळते. यावरून ज्यावेळी गडद लेणीचे खोदकाम चालू होते त्याच दरम्यान तळजाई लेणीचे खोदकाम केलेले आढळते. तसेच एकाच समुहाकडून या दोन्ही लेणी समकाळात खोदलेल्या निदर्शनास येतात. येथील लहान आकारातील खोलीचा आकार **5 □5** फुट

असून येथील खोली इतर खोल्यांच्या तुलनेत जास्त थंडावा असलेली आहे. खोलीच्या आत दिवा लावणीसाठी कोनाडा खोदलेला आहे. सारांश तळजाई लेणीस प्रदक्षिणा करण्यासाठी असलेल्या मार्गाचा उपयोग मध्ययुगात धान्य कोठार व लष्करी उपयोगासाठी सैनिकांकडून केला गेला. मात्र मुळ गाभारा होता तो तसाच ठेवून हा बदल मध्ययुगात केला गेला होता. लेणीच्या बाहेरील वऱ्हांडा **32 . 10** □**15** फुट आकाराचा आयताकार असून त्याची ऊंची **15** फुट आहे. लेणीच्या समोरील पोढी साधारणतः गोल आकाराची असून **30** फुट व्यास आकाराची आहे. पोढीत ऊतरण्यासाठी लेणीच्या विरूध्द बाजूने **6** पायऱ्या असून पोढी साधारणतः **25** फुट खोल असल्याचे निदर्शनास येते. तिकोणा किल्ल्यावरील तळजाई लेणी प्राचीन काळाची साक्ष देत असून किल्ल्याच्या जवळील प्रदेशही प्राचीनतेची साक्ष देत असल्याचे दिसून येते. डेक्कन कॉलेज, पुणे येथील शोभना गोखले, सी.जी.पडवळ, पी.आर.कुलकर्णी यांनी करंजगाव येथे संशोधन करून काही विहार शोधले. येथील विहार कातळयाचा खणलेला दगड (Debris) यात झाकोळला होता. तो त्यांनी संशोधित केला. हे संशोधन तिकोणा किल्ल्याच्या जवळील करंजगाव येथे पार पडले.[25]

- किल्ल्यावरील चुण्याचा घाणा व चर ः

तळजाईलेणी ते बालेकिल्ला मार्गावर बालेकिल्ल्याच्या पायऱ्या चालू होण्याआधी डाव्याबाजूस चुण्याचा घाणा व चर आढळतात. मध्ययुगीन सर्व बांधकामे चुन्याचा घाणा फिरवून त्यातील मिश्रणाद्वारे तयार करण्याची पद्धत होती. महाराष्ट्रातील बहुसंख्य किल्ल्यांवर चुण्याचे घाणे व चर दिसतात. विसापूर किल्ल्यावरील चुण्याचा घाणा तयार करतांना मोठमोठया धोंडी शेजारी शेजारी ठेवून त्यातून घाणा फिरविला जात होता असे दिसते. परंतु तिकोणा किल्ल्यावरील घाणा मोठया आकाराच्या धोंडी जमिनीत गोलाकार खोचून त्याच्या आत घाणा फिरविला जात असल्याचे आढळते. येथील एक वैशिष्टय म्हणजे इतरत्र न आढळणारी पद्धत अशी की एका चरात दोन घाणे फिरविले जात होते. सध्या त्यातील एक घाणा सुस्थितीत असून दुसरा घाणा भंग झालेला आहे. यास चराच्या मधोमध आडवा ठेवलेला आढळतो. चुण्याच्या घाण्याच्या चराचा व्यास **13** फुट असून मध्ययुगात घाणा

---

[25] Indian Archiology 1969-70 a Review, 1973, Edited by B B Lal, Page.25 .

फिरविण्यासाठी बैलांचा वापर करीत असत. येथे दोन घाणे एका चरात फिरविले जात असल्याने दोन बैल एकावेळी घाणे ओढत असल्याचे आढळते.

- बालेकिल्ल्याचे प्रथम प्रवेशद्वार ः

चुण्याच्या घाण्यापासून तिकोणा किल्ल्याचा बालेकिल्ला सुरू होतो. येथून **68** पायऱ्या चढून बालेकिल्ल्याचे प्रथम प्रवेशद्वार आहे. येथील पायऱ्या तीव्र चढणीच्या रचलेल्या व काही ठिकाणी खोदलेल्या आढळतात. सध्या यातील काही पायऱ्या भग्न झाल्या असून एकेरी रांगेत चढता यावे अशी येथील रचना ठेवली गेली होती असे निदर्शनास येते. बालेकिल्ल्याच्या पायऱ्यांची निर्मीती करतांना दोन व्यक्ती एकावेळी येथील पायऱ्यांवरून चढू शकणार नाहीत तसेच एकाही व्यक्तीस वेगात पायऱ्या चढणे शक्य होणार नाही अशी तिव्र चढण येथील पायऱ्यांच्या रचनेत ठेवलेली आढळते. शत्रूसैन्यास बालेकिल्ला चढणे सोपे होवू नये तसेच बालेकिल्ल्याच्या प्रथम द्वारापर्यंत पहिल्या पायरीपासून कोठेही लपण्यास जागा नसावी याची दक्षता किल्ल्याची रचना करणाऱ्या कल्पकाने घेतलेली दिसून येते. प्राचीन काळात माथ्यावर जाण्याचा मार्ग येथेच होता असे खोदलेल्या पायऱ्यांवरून दिसून येते. मध्ययुगात येथील प्राचीन पायऱ्यांवर दगडी तोडी घडवून पायऱ्या बांधल्या गेल्या असे दिसून येते. बालेकिल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वारापर्यंत **68** पायऱ्या तिव्र चढणीच्या असून बालेकिल्ल्याचे प्रथम प्रवेशद्वार **6.2 □ 2.11** फुट आकाराचे आहे. मध्ययुगात येथील द्वारास दोन कवाडं होती. मात्र इतरत्र आढळणाऱ्या दगडी कुसांप्रमाणे येथे पद्धती नसून द्वाराच्या कमानीस व पायास दगडात गोलाकार खड्डे खोदून द्वारे अडकविलेली होती असे दिसून येते. प्रवेशद्वाराच्या आतमधील बाजूने द्वाराची अभेद्यता वाढण्यासाठी येथे अडसूळ ठेवला होता असल्याचे दिसून येते. मावळ तालुक्यातील किल्ल्यांच्या द्वारांप्रमाणे येथेही लाकडी कवाडं नष्ट झालेली आहेत.

- बालेकिल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वारातील लेणी ः

बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वारात ऊजव्याबाजूस प्राचीन काळातील लेणी **20** □**15** फुट आकारात खोदलेली आहे. गडद व तळजाई लेणी खोदतांना येथील लेणीचे खोदकाम झाले असण्याचा संभव आहे. प्राचीन काळात येथील लेणीत जाण्यासाठी डाव्याबाजूने मार्ग होता. परंतु तद्नंतर किल्ल्याच्या बांधकामावेळी किल्ल्यास अभेद्य बनवितांना येथील मार्ग बंद करून मोठया आकारातील ओंडके येथील पोढीवर टाकले गेले. तसेच लेणीचा उपयोग पहारेकऱ्यांच्या खोल्यांसाठी करून खालच्या पोढीस आणिक आतपर्यंत खोदले गेले असण्याचा संभव आहे. येथील पोढी **35** □**8** फुट आकाराची असून **4** फुट खोल आहे. आजही या टाक्यात पाण्याचा संचय मोठया प्रमाणावर होत असून पर्यटकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून या टाक्याची ओळख आहे. येथील टाक्यास आतमधील बाजूने दोन स्तंभ ठेवलेले असून त्याच आकाराचे स्तंभ लेणीस वरच्या बाजूस खोदलेले आढळतात. **1.7** □**1.3** फुट जाड **5** फुट उंच असलेल्या या दोन स्तंभांमूळे वरच्या लेणीस तीन दालने दिसून येतात. अर्थात दोन स्तंभांमुळे येथे तीन दालने तयार झालेली आढळतात. ऊजवीकडील पहीले दालण मध्ययुगात सैनिकांनी दगडामातीत चिनलेले आढळते. डावीकडील दोन दालणे ऊघडी असून ही दालने खालच्याबाजुने विना स्तंभांची कोरल्याचे आढळते. दोनस्थंभांच्या खाली मोठी पोकळी असून पोढी आतपर्यंत कोरलेली आहे. पोढीच्या मापावरून वरील वऱ्हांडा पाण्यावरच खोदलेला दिसून येतो. येथील पोढी पाण्याची उत्तम सोय असून पहारेकऱ्यांना राहण्यासाठी वऱ्हांडयाच्या डावीकडील एक मोठया आकारातील खोली सुस्थितीत असल्याचे आढळते. येथील खोलीचा कातळा मध्ययुगात द्वाराजवळ फुटला म्हणून लाकडी उंबरा लावून फुटलेल्या कातळयास विटा व चुन्यात गिलावा केलेला आढळतो. तसेच फुटलेला सर्व भाग बांधुन घेतलेला निदर्शनास येतो. येथील खोली **15** □**10** फुट आकाराची आहे.

- बालेकिल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वाराची संरक्षण व्यवस्था ः

बालेकिल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वाराचे बुरूज विशेष रचनेचे असून तिकोणा किल्ला शत्रूसैन्याकडून हस्तगत झालाच तरीही बालेकिल्ल्यावरून शत्रुसैन्यास पराजीत करता येईल अशी रचना येथे केलेली आढळते. मध्ययुगीन रचनेत बालेकिल्ला घडविण्यामागचे प्रयोजन किल्ला लढवितांना जर किल्ला शत्रुसैन्याच्या हाती गेला तरी बालेकिल्ल्यावरून शत्रुसैन्यावर जोरदार मारा करता यावा व त्या योगे मुख्य किल्ला हस्तगत करता यावा हे होते.

मावळ तालुक्यातील किल्ल्यांमध्ये सर्वात मोठा रचनात्मक बालेकिल्ला तिकोणा किल्ल्याचा आढळून येतो. येथील द्वाराच्या आत डाव्याबाजूच्या अर्धगोलाकार बुरूजावर चक्रीतोफ होती असे येथील रचनेवरून आढळते. येथुन तोफ डागण्यासाठी तोफेच्या तीन खिडक्या ठेवलेल्या आढळतात. येथील बुरूज आजही सुस्थितीत असून येथुन बालेकिल्ल्यास येणाऱ्या वाटेवर 68 पायऱ्यांवर तोफेचा निशाना ठेवता येत असल्याचे आढळते. येथील बुरूजावरून दक्षिणेच्या बुरूजावर जाता येते. तिव्र चढणीच्या व उंच पायऱ्या येथे बांधलेल्या आढळतात. येथील चौदा पायऱ्या चढून दक्षिणेच्या अर्धगोलाकार बुरूजावर पोहोचता येते. याची बांधणी कातळास स्पर्शुन कोली असून अर्धगोलाकार स्वरूपात रचना आढळते. येथे बुरूज बांधण्यास जागा नसतांना या अर्धगोलाकार बुरूजाची बांधणी केलेली आहे. लहान आकारातील या बुरूजावरून तोफ डागण्यास संधी नाही. परंतु बंदुकीतून होणाऱ्या शिशांच्या गोळयांचा मारा व बाणांचा मारा थेट शत्रूसैन्यावर होईल अशा मोक्याच्या ठिकाणी याची बांधणी केलेली दिसून येते. प्रस्तुत बुरूजाच्या आकाराएवढा बुरूज बालेकिल्ल्याच्या दुसऱ्या प्रवेशद्वारासमोर बांधलेला आढळतो. या लहान आकारातील बुरूजावर जाण्यासाठी 14 पायऱ्या 1.6 फुट ऊंचीच्या बांधलेल्या असून पाय ठेवण्यासाठी फक्त 8 इंच जागा असल्यामुळे सहजरित्या येथे चढता येत नाही. सारांश येथील पायऱ्यांची चढण विशेष अवघड रचनेतील असून शत्रूसैन्यावर मारा करण्यासाठी अनेक योजना येथे केलेल्या आढळतात. येथील ऊजव्या बुरूजास बंदुकांचे बार काढण्यासाठी अनेक जंग्या ठेवलेल्या आढळतात.

एकशतं योधयति दुर्गस्थो स्त्रधरो यदि ।

शतं दशसहस्त्राणि तस्माद्दुर्ग समाश्रयेत् ॥[26]

शुक्रनीति ग्रंथात अध्याय क्रमांक 4 मध्ये किल्ल्याचे महत्व वरील श्लोकातून सांगीतले असून राज्यात किल्ले का असावेत याचे कारण मांडलेले आहे. अर्थ : “गडावरील एक व्यक्ती शंभर शत्रूसैन्यास भारी असतो तसेच शंभर माणसे दहा सहस्त्रांशी लढू शकतात यास्तव राजाने किल्ल्याचा आश्रय करावा” यावरून तिकोणा किल्ला बांधतांना शत्रुसैन्याविरोधी लढण्यासाठी योग्य त्या योजना रचनेत केलेल्या आढळतात. किल्ल्याच्या दुर्गमतेत अधिक भर घालण्याच्या उद्देशाने येथे अनेक क्लुप्त्या लढविलेल्या आढळतात. तिकोणा किल्ला अभेद्य किल्ला बनविण्यासाठी त्याच्या रचनेत अनेकविध योजना केल्याच्या आढळून येतात. ज्या गोष्टी किल्ल्यांत श्रेष्ठ

[26] वा.कृ.भावे, *शिवराज्य व शिवकाळ*, केसरी मुद्रणालय पुणे, 1957, पृ.199.

समजल्या जातात अशा प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथांत आलेल्या आदर्श किल्ल्याच्या गोष्टी तिकोणा किल्ल्याच्या रचनेत दिसून येतात. उदाहरणार्थ ः किल्ल्यास बालेकिल्ला असावा, पाण्याच्या टाक्या व तळे मोठया संग्रहाने किल्ल्यावर असावे, सैनिकांस रहावयासाठी मुबलक जागा असावी, किल्ल्यावर येणारा प्रत्येक मार्ग किल्ल्यावरील सैन्याच्या माऱ्याच्या टप्प्यात असावा. तिकोणा किल्ला या सर्व गोष्टींनी परिपुर्ण असून किल्ल्याच्या पायथ्यापासून बालेकिल्ल्याच्या द्वितीय द्वारापर्यंतचा मार्ग तोफांच्या टप्प्यात राहील अशी रचना येथे ठेवलेली आढळते.

- बालेकिल्ल्याचे द्वितीय प्रवेशद्वार व संरक्षणाची व्यवस्था ः

बालेकिल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वारातून **54** पायऱ्या तिव्र चढणीच्या असून तदनंतर द्वितीय प्रवेशद्वार बांधलेले आढळते. बालेकिल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वारातून द्वितीय प्रवेशद्वारापर्यंत जातांना तिव्र चढणीच्या **54** पायऱ्या असून या पायऱ्यांवरून सहज चालता येणार नाही अशी येथील रचना आहे. येथील पायऱ्या मोठा कातळा खोदून बनविलेल्या आढळतात. येथील पायऱ्यांची तिव्र चढण नाशीक जिल्यातील हर्ष किल्ल्यातील तिव्र चढणीच्या पायऱ्यांशी साम्य दर्शविते.

बालेकिल्ल्याचे द्वितीय प्रवेशद्वार शत्रुसैन्यास जिंकण्यास दुर्घट करण्यासाठी येथे अनेक योजना केलेल्या आढळतात. ऊजवा व डावा दोन्ही **25** फुट ऊंचीचे बुरूज□या दोन्ही बुरूजांना तोफ डागण्यासाठी एकही जागा नाही, पाच जंग्या प्रत्येकी येथील बुरूजास आहेत□प्रवेशद्वारास स्पर्शिलेले असून समोरील बाजूने लांबसर तटबंदी केलेली आहे□दोन्ही बुरूज आकाराने लहान असल्यामुळे येथून फक्त बंदुकींचा व पेटते बाण यांचा मारा शत्रूवर करण्यास जंग्या आढळतात परंतु तोफा ठेवण्यास उपलब्ध  दोन्हीं बुरूजांवर जागा नाही□याप्रकारची किल्ल्याची शत्रूसैन्यासाठी निर्माण केलेली व्युहरचना दुर्गशास्त्रात उत्तम गणली जाते. उपलब्ध प्रवेशद्वार रायगड किल्ल्यावरील महाद्वाराच्या रचनेप्रमाणे लपवीलेले आहे. शत्रूसैन्य दरवाजाच्या समोरील **15** पायऱ्यांपर्यंत येईपर्यंत त्यास प्रवेशद्वार दिसू नये अशी द्वाररचना येथे केलेली आढळते. पहिल्या प्रवेशद्वारातून आत दुसऱ्या प्रवेशद्वारापर्यंत शत्रूसैन्यावर बंदुकीच्या गोळयांचा व पेटत्या बाणांचा मारा करता येईल अशी रचना येथील बुरूजांची केलेली आढळते. येथील द्वितीय प्रवेशद्वारासमोर डाव्याबाजुस लांबसर व अरूंद परंतु ऊंचीला **27.7**

फुट असलेला बुरूज थेट पहिल्या प्रवेशद्वारावर मारा करण्यासाठी बांधलेला दिसून येतो. शत्रूसैन्यावर बंदुकीच्या गोळयांचा व बाणांचा मारा करण्यासाठी या बुरूजास **15** जंग्या ठेवलेल्या आढळतात. या बुरूजासारखा आकाराने लांब परंतु अरूंद बांधलेला बुरूज प्रतापगडच्या माचीवर आढळतो.

प्राचीन काळातील लेणी दुसऱ्या प्रवेशद्वारातून आत ऊजव्या बाजूच्या कातळयास खोदलेली आहे. गडद लेणी, तळजाई लेणी, बालेकिल्ल्याच्या प्रथम द्वारातील लेणी या लेणी खोदतांनाच प्रस्तुत द्वितीय प्रवेशद्वारातील लेणी खोदल्या गेलेली आढळते. मात्र प्राचीन लेणीचा मध्ययुगात सैनिकांनी बुरूज म्हणुन उपयोग केलेला आढळतो. द्वितीय प्रवेशद्वार तिकोणा किल्ल्यावरील सुस्थितीत गणले जाणारे द्वार असून या प्रवेशद्वाराच्या आतमधील पाणी पावसाळयात बाहेर वाहून जावे यासाठी उंबऱ्यास मधोमध मोरी ठेवलेली आहे. पावसाळयाच्या दिवसांत येथील पायऱ्यांवरून पाण्याचा प्रवाह वेगाने वाहतांना दिसतो. प्रवेशद्वाराच्या माथ्यावरील ऊजव्याबाजुचे पुष्पशिल्प सुस्थितीत आहे परंतु डावीकडील पुष्पशिल्प कालौघात पडून गेलेले आढळते. येथील द्वाराचा ऊंबरा **1 × 1** फुट जाडीचा असून **7 × 7** इंच जाड आकाराचा अडसूळ द्वाराच्या मागील बाजूस येथे असल्याचे दिसून येते. प्रवेशद्वार **8.2 × 4.4** फुट आकाराचे होते. सध्या प्रवेशद्वाराची कवाडं मावळ तालुक्यातील इतर किल्ल्यांच्या कवाडांप्रमाणे संपुष्टात आलेली असून द्वार अडकविण्यासाठी दगडी कुस येथे शिल्लक नसल्याचे आढळते.

- दुसऱ्या प्रवेशद्वारातील लेणी व मध्ययुगात बुरूज म्हणून तीचा झालेला वापर ः

प्राचीन काळात गडदलेणी, तळजाईलेणी, बालेकिल्ल्याच्या पहिल्या प्रवेशद्वारातील दोनखांबी लेणी सारखी द्वितीय प्रवेशद्वाराच्या आतमधील ऊजव्या कातळयाची लेणी या तिकोणा किल्ल्याच्या प्राचीनत्वाची साक्ष देतात. येथील लेणीस डावीकडून कमांक दिले असून त्याची माहीती पुढीलप्रमाणे ः

1□क्रमांक 1 या लेणीचा उपयोग जेवण बनविण्यासाठी केला जात असावा असे येथे खोदलेल्या रचनेवरून दिसून येते. येथील खोलीस वरच्याबाजुने चुलीचा धुर जाण्यासाठी कातळा आयताकार खिडकी प्रमाणे फोडलेला आढळतो. प्राचीन काळात लेणी खोदतांना किंवा बौध्दभिक्षूंची संख्या कमी असतांनाही येथे पाकगृह असल्याचे येथील रचनेवरून आढळते. तसेच मध्ययुगात सैनिकांनी येथील खोलीचा जेवण बनविण्यासाठी उपयोग केल्याचे येथील रचनेवरून आढळून येते. येथील खोलीस स्वयंपाकगृह बनविण्याचे कारण की ही खोली निवाऱ्याची जागा असल्याने येथील खोलीत किल्ल्यावरील वेगाचा वारा येत नाही. तसेच सैन्याच्या जेवणाची व्यवस्था करतांना पाण्याची मोठया प्रमाणावर आवश्यकता असते. प्राचीन काळात येथे एक पोढी शेजारी खोदलेली होती व या पोढीतून पाणी शेंदण्यासाठी पोढीच्या मुखापर्यंत जाण्याची आवश्यकता नसून याच स्वयंपाकाच्या खोलीतून पाणी काढण्यासाठी कातळा फोडून पोढीचे पाणी येथून काढता येईल अशी व्यवस्था येथे ठेवलेली होती. तसेच मध्ययुगात येथे दगडी चुल बनविली असल्याचे येथील रचनेवरून दिसून येते. तसेच स्वयंपाक करतांना जे पाणी ओतून द्यायचे आहे त्यासाठी एक मोरी येथून पाणी वाहून जाण्यासाठी येथे खोदलेली आढळते व चुलीचा धुर मोठा होवू नये यासाठी आयताकृती खिडकी येथे कोरली गेल्याचे दिसून येते. प्रस्तुत स्वयंपाकगृहास एक मोठा चौथरा येथे दिसून येतो कारण क्रमांक 2 च्या पोढीचा फुगवटा कायम राखण्यासाठी येथे चौथरा ठेवावा लागल्याचे आढळते. 4 फुट ऊंची असलेला येथील चौथरा ओबडधोबड कोरलेला आढळतो. ही खोली 15 □15 फुट आकाराची असून खोलीत अर्धा भाग ओटा व अर्धा भाग चुलीसाठी राखीव ठेवला असल्याचे दिसून येते.

2□क्रमांक दोन चे टाकं पाण्याचा मोठा साठा साचविण्यासाठी खोदलेले होते. परंतु सध्या पोढीत पाणी साचत नसल्याचे दिसते. तिकोणा किल्ल्याच्या भोवती अनेक मोठी बांधकामे होत असल्याने सुरूंग लावुन खडक फोडण्याचे काम येथील सभोवतीच्या गावांत चालु असते यातुन किल्ल्यास व भोवतीच्या परिसरास हादरे बसतात. त्यामुळे किल्ल्यांवरील पाण्याच्या टाक्यांस तडे जातात. लोहगड किल्ल्याच्या परिसरात ग्रामपंचायतीकडून अशा अनेक बांधकामांस परवानग्या मिळाल्याने लोहगड किल्ल्यावरील अनेक पाण्याचे टाके निरूपयोगी झाल्याचे आढळते. म्हणून तिकोणा किल्ल्याचे येथील टाकं निरूपयोगी झाल्याचे दिसून येते. येथील टाक्यास मुखाच्या डाव्याबाजुस कातळयास 2 □1 फुट आकाराची खिडकी कोरल्याचे आढळते. क.2 व क.3 दिलेल्या टाक्यांस मध्ययुगात मधोमध भिंत बांधली गेली असल्याचे आढळते. येथील टाकं आतमधील बाजूने 15 □10 फुट आकाराची असून द्वार 3 □1.10 फुट आकाराचे आहे. द्वारास प्राचीन काळात लाकडी कवाडं होती कालौघात

ती नष्ट पावलेली आहेत. येथील टाक्यात ऊतरतांना सावधानता घ्यावी लागते. आतील बाजूने डाव्याबाजूस हे टाकं मध्ययुगात भंग झाले होते त्यावेळी त्याची डागडुजी करण्यात आलेली आढळते. वाळू व चुना यांचे मिश्रण करून पातळ चुन्याचा मुलामा आतमधील बाजूने दिलेला दिसून येतो.

**3**□**2.8** □**2.2** फुट मुख असलेले क. **3** चे टाके क. **2** च्या टाक्याशी मिळते जुळते आहे. क. **3** च्या टाक्यात शेवटच्या भिंतींस एक लहान आकारात पोढी खोदलेली शेवटच्या कातळयापर्यंत चालत गेल्यावर दिसून येते. उन्हाळयात पाण्याची पातळी खालावली किंवा दुष्काळजन्य परिस्थिती तसेच कडक उन्हाळयातही मोठया टाक्यातील पाण्याची पातळी खालावली तरी येथील लहान आकारातील पोढीत पाणी शिल्लक असते. क. **3** च्या पोढीचे आकारमान आतमधील बाजूने **15** □**10** फुट आहे. मध्ययुगात क. **2** व क. **3** या दोहोंत दगडी भिंत घालून या दोहोंना स्वतंत्र करण्यात आल्याचे दिसून येते. प्राचीन मोठया आकारातील टाक्याचे दोन भाग मध्ययुगात केले गेले तसेच टाक्याचे मुख आयताकृती होते त्यात विलगता केल्याने ते चौकोनी आकाराचे झाले.

**4**□क.**4** या टाक्याचा खालच्या बाजूचा कातळा मुखाजवळ तुटल्याने त्यास चुना व विटांत बांधकाम करून डागडूजी करण्यात आली होती ते येथील पुरातत्वीय पुराव्यावरून दिसून येते. टाक्याच्या मुखाशी ठेवलेला कातळयातील ऊंबरा कालौघात भग्न झाला होता तोही मध्ययुगात नव्याने रचलेला आढळतो. येथील पोढीत स्वच्छ पिण्याचे पाणी असून प्राचीन, मध्य व आधुनिक कालखंडात येथील पोढीचे पाणी पिण्यासाठी वापरण्यात आल्याचे दिसून येते. कोणत्याही ऋतूमध्ये येथे थंड व स्वच्छ पाणी पिण्यास मिळते. येथील पोढीतुन पाणी काढण्यासाठी आतमध्ये प्रवेश करावा लागतो. तीन पाय◻ ऊतरून येथे खाली बसून पाणी काढावे लागते. **3** फुट खोली असलेली ही पोढी आकाराने **30** □**30** फुट आहे.

लेणीतील बाहेरील व◻डा **28** फुट लांबीचा असून या व◻डयाची जागा सपाट नाही. बसण्यासाठी येथे चौथरा ठेवलेला असून वऱ्हांडयास लहान आकारातील गोलाकार खड्डे खोदलेले दिसून येतात. सध्यस्थितीत येथील लेणीच्या समोरील संरक्षित कठडा **1.7** फुट ऊंची असलेला आहे. चौथ्या क्रमांकाच्या लेणीसमोर ऊंब◻च्या शेजारी प्राचीन काळातील विरंगुळा म्हणुन खेळण्यासाठी द्यूत खेळाचे पाट कोरलेले आहेत. प्राचीन काळातील विरंगुळयासाठी खेळल्या जाणारे खेळ इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचे गणले गेले असून दुर्मीळ खेळांमध्ये

याचा समावेश होतो. येथील व्हरांडयात पोढींच्या मुखावर पडदे लावण्यासाठी **5** इंच व्यासाची गोलाकार लाकडे लावून व्यवस्था केली होती असे येथील कातळयाच्या घेतलेल्या खड्डयांवरून दिसून येते.

लेणीच्या व्हरांडयातुन समोरील **180** अंश परिसर दृष्टीक्षेपात येतो. येथून डाव्याबाजूस प्रथम तुंग किल्ला त्यानंतर लोहगड किल्ला तद्नंतर विसापूर किल्ला तद्नंतर भातराशीचा डोंगर इत्यादी परिसर दिसतो. दृष्टिक्षेपातील किल्ल्यांवर व पर्वतांवर तसेच समोरील दुरवर दिसणाऱ्या परीसरावर लक्ष ठेवता येते. येथील लेणीचा व्हरांडा मध्ययुगात बुरूज म्हणुन वापरला गेल्याचे दिसते. बालेकिल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वारातुन आत शिरणाऱ्या शत्रूसैन्यावर दुसऱ्या द्वारापर्यंत शत्रुसैन्य पोहोचेपर्यंत थेट मारा करण्यासाठी येथून जागा आहे. प्राचीन लेणीचा मध्ययुगात लष्करी उपयोग करून घेतला गेला व काही रचनात्मक बदल करण्यात आलेले निदर्शनास येते.

- तिकोणाकिल्ल्याचा बलाढय बुरूज व त्यावरील दुर्मिळ अवशेष ः

तिकोणा किल्ल्यावर अनेक बुरूज आहेत परंतु आकाराने सर्वात मोठा असलेला हा बालेकिल्ल्याच्या दुसऱ्या प्रवेशद्वाराच्या आतमध्ये डाव्याबाजूस असलेला बुरूज आहे. बालेकिल्ल्याचे द्वितीय प्रवेशद्वार या बुरूजाचाच एक भाग असल्याचे आढळते. पुर्व दिशेस झोकावलेल्या बलाढय बुरूजावरून गडाचे उत्तर, पुर्व व दक्षिण अशा तिन्ही दिशांचे संरक्षण करता येत होते असे दिसून येते. माथ्यावरील वितंडेश्वर□त्रिंबकेश्वर मंदीराकडे चढून जाणारा मार्ग अर्धगोलाकार रितीने बनविलेला दिसून येतो. स्थापत्यशास्त्रात अनेक बदल कालौघात होत गेलेले दिसून येतात परंतु अगदी लहान जागेत वरच्या माथ्यावर जाण्यासाठी दगडी मार्ग करून तो गोलाकार पद्धतीने वळविण्याची पद्धत तत्कालीन स्थापत्य शास्त्रातली महत्वाची गोष्ट गणली गेली असल्याचे आढळते. येथील बलाढय बुरूजास लहान आकाराचा एक बुरूज बांधलेला दिसून येतो. बालेकिल्ल्याच्या दुसऱ्या प्रवेशद्वारातुन आत सर्वप्रथम डाव्याबाजुस पहारेकऱ्यांची चौकी असून तीचे जोते शिल्लक राहीलेले आढळते. चौकीच्या शेजारी तटास **2.5** □**1.5** फुट आकाराची खिडकी आढळते. खिडकीचे प्रयोजन तोफ डागण्यासाठी नव्हते. येथून

तोफ डागली तरीही तोफगोळा किल्ला पायथ्यापर्यंत जाणार नाही एवढे अंतर आहे. परंतु शत्रुसैन्यावर तोफेच्या माराचा टप्पा ठेवलेला नसतानाही येथे तोफ डागण्याच्या आकाराची खिडकी ठेवलेली आढळते. तटबंदीच्या बाहेरील बाजुने खिडकीचे सर्वेक्षण केल्यावर याची उकल होते. बुरूजावर पडणारे पावसाळयातील पाणी वाहून जाण्यासाठी मोठा मार्ग तत्कालीन स्थापत्यशास्त्र विशारदांनी करून ठेवलेला दिसून येतो. सध्या येथील बुरूजावरील पावसाळी पाण्याचा लोंढा याच खिडकीतून बाहेर पडतो. तिव्र क्षमतेच्या पावसात येथून पाणी वेगाने बाहेर पडते. पाणी किल्ल्याबाहेर जाण्यासाठी एवढी मोठया आकाराची व्यवस्था असून देखील खिडकीस बाहेरीलबाजुने असणारे चौकटीचे धोंडे पाण्याच्या प्रवाहाने वाहून गेलेले दिसून येतात. जर या ठिकाणी खिडकी बनविली नसती तर कालौघात पाण्याच्या लोंढयाने तटबंदी वाहून जाण्याचा धोका होता. मात्र येथे फक्त पाणी वाहून जाण्यासाठी केलेली योजना नसून जर पावसाळयात शत्रूसैन्य किल्ल्यावर येईल अशी परिस्थिती झाली की त्या वेळी या खिडकीची लोखंडी पाटी लावण्याची योजना दिसते. तद्नंतर पाण्याचा तिव्र लोंढा बालेकिल्ल्याच्या खाली दोन्ही मुख्य प्रवेशद्वारांतून वाहतो. याप्रकाराने शत्रूसैन्यास पराजित करण्यासाठी शस्त्र न वापरता किल्ला लढविता यावा अशी योजना येथे केलेली निदर्शनास येते. येथील पाण्याचा लोंढा बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वारातून सोडला असता बालेकिल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वाराच्या आतमधील पोढी पाण्याने भरता येत असल्याचे आढळते. येथून नैसर्गीक पडणाऱ्या पाण्याचा लोंढा आपल्या सोयीप्रमाणे उपयोगात आणण्याची दुरदृष्टी मध्ययुगातील कल्पकांत दिसून येते. बलाढय बुरूजास लहान आकारात एक बुरूज बांधलेला असून त्यावर चढण्यास चार पायऱ्या आहेत. तिकोणा किल्ल्यावरील हा सर्वात लहान आकाराचा बुरूज असून याचे प्रयोजन ध्वजस्थंभ लावण्यासाठी होते. महाराष्ट्रातील निवडक किल्ल्यांवर अशाप्रकारचे ध्वजस्थंभ लावण्यासाठी दगडी किंवा लोखंडी कुस आढळतात. त्यातील लोखंडी कुसं दुर्मीळ असून मध्ययुगातील ध्वजस्थंभ कशाप्रकारे अडकवित होते हे यातून दिसून येते. तीन ठिकाणी ध्वजाचा स्थंभ अडकविण्यास आजही येथे सुस्थितीतील लोखंडी कुस आहेत.

पुर्वदिशेस झोकावलेल्या बलाढय बुरूजावरून किल्ल्याचे उत्तर, पुर्व, दक्षिण अशा तिन्ही दिशेंचे संरक्षण होत होते. याठिकाणी मोठया आकाराची चकीतोफ होती. एकच तोफ तिन्ही दिशांस फिरवीता येत असल्याने तीस चकीतोफ असे संबोधले जात असे. चकीतोफ फिरवून वरील तिन्ही दिशांस शत्रूसैन्यावर मारा करता येईल अशी तिची रचना ठेवलेली होती. चकी तोफेच्या भोवती खोल आकारात चर खोदण्याची पद्धत होती. चरात पाणी

सोडून देत असत. यामुळे तोफ डागल्यावर तोफेच्या आवाजाचे व हादरा बसण्याचे प्रमाण कमी होत असे. या बलाढय बुरूजावर तोफेचा चर असल्यावरून येथील तोफ मोठया आकारातील असावी असा निष्कर्ष येतो. सध्या किल्ल्यावर एकही तोफ उपलब्ध नाही. येथील तोफा मध्ययुगात विसापूर किल्ल्यावर हलविल्या होत्या. मध्ययुगात "किल्ल्याचे संरक्षणाचे कारण ते भांडी व बंदुखा" असे आज्ञापत्रात लिहीलेले आहे.[27] तोफांनी किल्ल्याचे रक्षण करणे शक्य होते. किल्ल्याची अतिमहत्वपुर्ण बाब म्हणुन तोफ गणली जाते. मात्र मध्ययुगात येथील तोफा विसापूर किल्ल्यावर हलविल्या गेल्याचे आढळते. ज्या तोफा येथे शिल्लक राहिल्या त्या राजर्षी शाहूंच्या परवानगीने किर्लोस्कर यांच्या कारखाण्यात वितळविल्या गेल्या असण्याचा संभव आहे. कारण महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांवरील तोफा दरम्यान वितळविल्या गेल्या होत्या. किल्ल्यावरील बलाढय बुरूजाच्या मागे असलेले दारूगोळा कोठार **15.7** □ **15.7** फुट आकारात आढळते. उपलब्ध बुरूजास दक्षिणबाजूस तटबंदी बांधलेली आढळत नाही. पहारेकरी सैन्य पहारा देतांना पडू नये याकरीता संरक्षणासाठी पहारी व गज लावून अपघातपुर्व नियोजन केलेले दिसून येते. पहारींची कातळात ठोकलेली छिद्रे दिसून येतात. किल्ल्याच्या माथ्यावर वितंडेश्वर□त्रिंबकेश्वर मंदीर आहे. बलाढय बुरूजावरून **39** फुट उंचीवर माथा असून माथ्याचा बलाढय बुरूजापर्यंतचा कातळा खालच्या बाजूने ओबडधोबड होता. ओबडधोबड दिसणारा तसेच जागेची अडचण करणारा कातळा व्यवस्थित फोडून त्यास अर्धगोल असा आकार देण्यात आलेला आढळतो. या रचनेमुळे बुरूजावर विस्तिर्ण जागा निर्माण झाली तसेच तट व बुरूज बांधणीसाठी दगडी तोडी उपलब्ध झाल्या. त्यामुळे येथील ओबडधोबडपणा जावून दगडी **39** फुट उंचीचा बुरूज बांधून घेतल्याप्रमाणे एक सलगता निर्माण केली असल्याचे आढळते. येथील कातळा फोडून त्याच्या धोंडी बनविण्याचे काम केले असावे व जागा वाढवून येथील कातळयास तासल्याप्रमाणे गोलाकार दिलेला आढळतो. हे काम एखाद्या कुशल कारागीराने केलेले आढळते.

- किल्ल्याचा माथा व माथ्यावर जाण्याची व्यवस्था ः

---

[27] रामचंद्रपंत अमात्य, *आज्ञापत्र*, मुळ मोडी प्रत ऊपलब्ध - राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, पृ.28.

तिकोणा किल्ल्याच्या माथ्यावर वितंडेश्वराचे मंदिर आहे. मंदिरास जातांना बालेकिल्ल्याच्या दुसऱ्या प्रवेशद्वारातून बलाढय बुरूजावर व बुरूजावरून **39** फुट ऊंची असलेल्या वितंडेश्वराच्या समोरील बुरूजाच्या कातळयात अर्धगोलाकार चढणीचा मार्गाने जावे लागते. येथील अर्धगोलाकार पायऱ्यांची सुरूवात ऊत्तर दिशेने होते व वरील बुरूजात प्रवेशण्याचा मार्ग पुर्वमुखी आहे. कातळात खोदलेल्या **29** पायऱ्यांवरून माथ्यावर जाण्याचा मार्ग आहे. वरच्या माथ्यावर जाणारा मार्ग कातळा खोदून बनविलेला आढळतो. सर्व पायऱ्या खोदीव असून प्राचीनेचा वारसा सांगणाऱ्या आहेत. प्राचीन पायऱ्यांवर मध्ययुगात बांधीव पायऱ्या केल्या गेल्या. सध्या किल्ल्याचा विकास स्थानिक संस्थांकडून होत असल्याने येथे दगडांच्या पायऱ्या नव्याने बांधून घेतलेल्या दिसून येतात. मध्ययुगात माथ्यावर जाण्यासाठी केलेल्या पायऱ्यांवर पहारेकऱ्यांच्या संरक्षणासाठी ऊजव्या बाजूस आयत आकाराच्या पाच पहारी ठोकल्या होत्या यांत साखळया अडकविल्या जात असाव्यात. कालौघात पहारी नष्ट झाल्या मात्र त्या कातळखोदीव अडकविल्या असल्याने त्यांची छिद्रे पाच ठिकाणी दिसून येतात.

- वितंडेश्वर-त्रिंबकेश्वर मंदिर व त्याखालील सातखांबी टाकं ः

वितंडेश्वर मंदिराच्या समोर बलाढय बुरूजावरून कातळखोदीव पायऱ्यांने मार्ग आहे. पायऱ्या संपतात येथे माथ्यावर शिरण्यासाठी महाद्वार होते. महाद्वार **9 × 5.2** फुट आकाराचे असल्याचे येथील कमानीवरून दिसून येते. सध्या येथील द्वार पुर्णपणे भग्न झालेले असून याचे किमान अवशेष बाकी आहेत. येथील प्रवेशद्वारास बालेकिल्ल्याच्या द्वाराप्रमाणे आडसुळ होता मात्र सध्या तो इतर द्वार व अडसुळांप्रमाणे नष्ट झालेला आढळतो. माथ्यावर महाद्वारासमोर पाण्याचे मध्ययुगीन टाके समुहाने दिसून येतात. मध्ययुगात तिकोणा किल्ल्यावर मोठया संख्येने सैन्य राहत होते. त्यामुळे पाण्याची सोय मोठया प्रमाणावर आवश्यक होती. अनेक पोढी प्राचीन काळात खोदलेल्या होत्याच त्यांस वाढविण्याचेही काम मध्ययुगात सैनिकांनी केलेले दिसून येते. तसेच स्तंभी टाके अनेक ठिकाणी खणून त्यात पाण्याचा संचय केलेला आढळतो. जेथे पाण्याचा संचय होईल तेथे किल्ल्यांवर टाके खोदण्याची पद्धत होती. आवश्यकतेपेक्षा जास्त टाकेही खोदले जात होते. कारण युध्द प्रसंगी तोफांच्या हादऱ्यात अनेकदा पाण्याची टाकं निकामी होत असत. त्यामुळे आधिच संकटावर मात करण्याच्या योजना म्हणून पाण्याच्या टाक्यांची संख्या मोठया प्रमाणावर दिसून येते. तसेच तटबंदीस लागणारा दगड पायथ्यापासून वर न आणता टाक्यांतून खोदून तटबंदी बांधत असल्याने तटबंदीच्या शेजारी पाण्याच्या टाक्यांची संख्या मोठया

प्रमाणावर आढळते. महाद्वाराच्या समोर मध्ययुगात पाण्याचे टाके खोदले गेलेले आढळतात. टाक्यांस डावीकडून कमांक दिलेले आहेत ते पुढीलप्रमाणे ः

कमांक **1** चे टाके **5** फुट खोल असून **3 .6** □**2** फुट याच्या मुखाचा आकार आहे. पुर्णतः कोरडे पडलेले हे टाके फक्त पावसाळयात भरलेले असते.

कमांक **2** चे टाके कमांक **1** च्या टाक्यापासून **8** फुट अंतरावर ऊजव्याबाजुस आहे. हे टाके शाळुंखेच्या आकाराचे असून याची **5** फुट खोली व आतमधील बाजूने **8** □ **5** फुट आकार असलेले आहे. पुर्णतः सुकलेल्या या टाक्यात फक्त पावसाळयात पाणी साचते.

कमांक **3** चे टाकं वितंडेश्वर मंदिराच्या खालच्या बाजूस असून यात जाण्यासाठी पाच पायऱ्या ऊतराव्या लागतात. येथील पायऱ्या टाक्याच्या समोरील वऱ्हांडयात उतरतात. तिकोणा किल्ल्यावरील सर्वात मोठा पाणीसाठा याच टाक्यात होत होता असे दिसून येते. हे टाकं सातखांबी असून माथ्यावरील मोठा खडक फोडुन याची निर्मीती केली गेली आहे. हे टाकं पुर्णतः गाळात भरलेले असल्याने येथे एवढे मोठी सातखांबी टाकं असावे असे दर्शनी भागावरून दिसून येत नव्हते. मात्र याच्या साफसफाई मोहिमेत स्थानिक संस्थांकडून टाक्याचे मुळ रूप समोर आले. टाक्याचे खोदकाम करतांना वरचा काही टन वजनाचा भार खालच्या टाक्यास सोसता यावा यासाठी टाक्यास सात स्तंभ ठेवल्या गेलेले दिसून येतात. वरच्या कातळयाचा व स्थापत्याचा सर्व भार टाक्यातील सात स्तंभांवर असूनही येथील खांब आजही सुस्थितीत आहेत. टाक्याच्या समोरील वऱ्हांडा **17** □**10** फुट आकाराचा आहे. टाकं आतमधील बाजूने त्रिकोणी आकाराचे असून लांबपर्यंत कातळा खोदलेला आढळतो. खांबांची रूंदी साधारणतः **1 .8** □**1 .8** फुट व ऊंची **5 .6** फुट आहे. येथील कोणत्याच खांबास छत पेलण्यास भारवाहू यक्ष किंवा नक्षीकाम नाही. टाक्यास समोरच्या बाजूने दोन खांब दिसतात. त्यांच्यामागे **1** फुट उंची असलेला एक कट्टा आहे. कट्टा ओलांडल्यावर प्रथम दोन खांब व त्यामागे तीन खांब आहेत. टाक्याच्या डाव्याबाजुने वऱ्हांडयापासून शेवटच्या टोकापर्यंत **36** फुट अंतर असून यात पाणी साठत नाही. टाक्याचा आकार मोठा असल्याने भुगर्भातील हलचालींमुळे एखादा तडा जरी कातळयास गेला तरी संपुर्ण टाकं निकामी होण्याचा संभव असतो. यासाठी लहान आकारात अनेक टाके समुहानी कोरण्याची पद्धत अनेक किल्ल्यांवर दिसून येते. परंतु मोठया टाक्यास गेलेल्या एका भेगेमुळे येथील टाकं निकामी झाल्याचे आढळते. तोफा डागल्यानंतर किल्ल्याला

बसणाऱ्या हादऱ्यामुळे पाण्याच्या टाक्या निकामी होत असत. यावरून कदाचित उपलब्ध टाक्याचा मोठा आकार यात पाणी न साचण्यास कारणीभुत असावा असे वाटते. येथील सातखांबी टाकं मध्ययुगात तिकोणा किल्ल्यावरील पाण्याचा सर्वात मोठा पाण्याचा स्त्रोत होते. तसेच कुशल कारागीरांकडून याचे खोदकाम झालेले याच्या स्तंभ व रचनेवरून निदर्शनास येते. टाक्याच्या आतमधीलबाजूने उन्हाळयात पाण्याची वर्गीकरण व्हावे यासाठीचा प्रयत्न कोरतांना कल्पकांने केलेला आढळतो. यासाठी आतमधील बाजूने टाक्यास पाण्याची पातळी खालावली की काही डबकी तयार होतात. परंतु एका डबक्यातील पाणी दुसऱ्यात जात नाही. कुशल कारागीरांकडून याचे काम झालेले निदर्शनास येते आहे.

वितंडेश्वर मंदिरासमोर मध्ययुगीन एक शिवपिंडी व दोन नंदी आहेत. कोरणाऱ्या मुर्तीकाराने नंदीच्या अंगावर अनेक दागीने दर्शविलेले दिसून येते. येथील अवशेष वितंडेश्वर मंदिराचे असून मंदीराच्या खाली सातखांबी टाके आहे. नंदी व शिवपिंडी मंदीराच्या जिर्णोध्दारावेळी बाहेर काढल्या असण्याचा संभव आहे. येथील मंदिराचा पाया ऊंच घेतला असून मंदिरात प्रवेशण्यासाठी **4** पायऱ्या आहेत. मंदीराच्या समोरील भिंतीस दोन कोनाडे दिवे लावणीसाठी बांधकाम करतांना ठेवलेले असून असेच कोनाडे बाहेरच्या बाजूने सर्व भिंतींवर ठेवलेले आहेत. मंदिराच्या द्वारात दगडी कट्टा बांधून त्यावर नवा तयार केलेला कडप्प्याच्या दगडातील नंदी बसविलेला आढळतो. नव्याने घडवुन घेतलेल्या नंदीच्या अंगावर उत्कृष्ट कोरीवकाम करून त्यात दागिने दर्श विल्याने नंदी अलंकृत दिसून येतो. डाव्या व ऊजव्या दोन्हीबाजूंनी मंदीरात प्रवेश करता यावा अशी दोन्ही बाजुंनी पायऱ्यांची रचना केलेली आहे. गाभाऱ्यात **11** खण केलेले असून जिर्णोध्दाराचे काम नव्याने केलेले असल्याने जुन्या अवशेषांसमोर नविन बांधणी निराळी दिसून येते. गाभाऱ्यात समोरील भिंतींना दिवा लावणीसाठी तीन कोनाडे असून ते नक्षिदार आहेत. यातील डाव्याबाजूच्या कोनाडयात लहान आकारात लाल रंगाची गणेशमुर्ती बसविलेली आहे. येथील शिवपिंडी मध्ययुगातील असून शिवपिंडीतील बाणाचे रंग बदलतात अशी ग्रामस्थांची श्रध्दा आहे. सुर्यकिरणे बाणावर आली की डोळयांना तसा अभास होतो परंतु यात अद्‌भुत असे काही नाही. सुर्यकिरणे गेल्यानंतर याचा रंग आहे तसा काळसर राखाडी दिसतो. पिंडीवर 'तांबं' धातूमध्ये बनवून घेतलेला पंचमुखी नाग मोठया आकाराचा असल्याने लक्षवेधक आहे. ग्रामस्थांमार्फत पिंडीवर रोज जलाभिषेक व दुधाभिषेक केला जातो. जल व दुध पिंडीवरून वाहून शेजारच्या कुंडात साचते. सुस्थितीत असलेल्या शिवमंदिरात महाशिवरात्रीला मोठा ऊत्सव भरतो.

- माथ्यावरील दारूगोळा कोठार, पहारेकऱ्यांच्या देवडया, दक्षीण – पश्चिम बुरूज व पाण्याचे टाकं ः

माथ्यावर प्रवेशद्वारात ऊजव्या व डाव्या बाजूस **10** □**10** फुट आकाराच्या पहारेक□ांच्या देवडया आहेत. भग्नावस्थेतील देवडया जोत्याच्या आकारावरून लक्षात येत असून ऊत्तरबाजुस **15** □**15** फुट आकाराची दोन कोठारे एकामागे एक रचनेची आहेत. कोठारांची फक्त जोती शिल्लक राहिलेली निदर्शनास येतात. मध्ययुगीन छताची कौलं या कोठाराच्या शेजारी मोठया प्रमाणावर आढळतात. किल्ल्याच्या माथ्यावर वा□ाचा व तिव्र पावसाचा मारा येथील इमारतींवर होतो. त्यामुळे माथ्याच्या सर्व इमारतींवर मोठा परिणाम झालेला निदर्शनास येतो. येथील माथ्यावर कोणतीही इमारत फारकाळ शाश्वत राहणे कठिण असल्याचे दिसून येते. त्यामुळे किल्ला व पायथ्यापासून माथ्यापर्यंत असलेल्या बहुतांशी इमारती व इतर बांधकामे सुस्थितीत आढळतात. परंतु माथ्यावरील एकही इमारत व कोणतेच बांधकाम सुस्थितीत राहिलेले आढळून येत नाही. इमारती व कोठारांपेक्षा बुरूज व तटबंदी हे भरीव असल्याने बराचसा काळ सुस्थितीत राहीलेल्या आढळतात. परंतु विशिष्ट मर्यादेनंतर तटबंदी व बुरूजही ढासळलेले निदर्शनास येतात. वारा व पाऊस येथे वेगात असल्याने यांचा मारा सहन करण्यासाठी बुरूज व तटबंदीस अनेक योजना केलेल्या बहुतांशी किल्ल्यांना आढळून आल्या आहेत.

दक्षिण बुरूजाशेजारी वरच्या टेकडावरून पाणी वाहत येत असून पाण्याचा मोठा संचय होतो त्यामुळे येथे कातळखोदिव टाकं निर्माण केलेले दिसून येते. येथील टाक्यात ऊतरण्यासाठी **6** पाय□ा आहेत. प्रस्तुत टाकं आयताकार असून **71.8** □ **30.8** असा याचा आकार आहे. कातळखोदीव व पाण्याचा मोठा संचय करण्याची क्षमता येथील टाक्यात असून मध्ययुगात भुस्खलनाच्या पुर्वनियोजनासाठी वरच्या काठाच्या बाजुने दगडी तोडी लावुन चुन्याचे बांधकाम केलेले आढळते.

दक्षिण बुरूजावरील तोफ चकी तोफ होती. किल्ल्याचे पुर्व, पश्चिम, दक्षिण या तिन्ही दिशांचे रक्षण येथील बुरूजावरून करता येईल असा तोफेचा टप्पा ठेवलेला दिसून येतो. परंतु जवळच्या लहान टेकडीचा गाळ वाहून आल्याने तोफेच्या ठिकाणी बुरूजास असलेल्या खोदिव चराचे अवशेष अस्पष्ट झालेले आढळतात. या ठिकाणाहुन कोराईगड व घनगड दोन किल्ले दिसून येतात. पश्चिम बुरूजाच्या मार्गावर ऊजव्याबाजूस छोटी टेकडी आहे. पश्चिम बुरूजही दक्षिण बुरूजासारखा मुळ तटबंदीतून लांब सुटावलेला आढळतो. पायापासून **6**

फुट ऊंच भराव घालून या बुरूजाची बांधणी केलेली आढळते. येथील बुरूजाशेजारी लहान आकारातील दारूगोळा कोठार भग्नावस्थेत आढळते. या बुरूजावरून किल्ल्याचे दक्षिण, पश्चिम व ऊत्तर बाजुंचे संरक्षण होते. पश्चिम व दक्षिण बुरूजांमधील अंतर **200** फुट आहे. माथ्यावरील बुरूजांवरून सभोवतीच्या प्रदेशावर दुरपर्यंत लक्ष ठेवता येते. तसेच किल्ल्याच्या सर्व बाजूंचे तोफांद्वारे संरक्षण करण्याची योजना येथील रचनेत दिसून येते.

- माथ्यावरील कचेरी, दारूगोळा कोठार ः

माथ्यावर लहान आकारातील दारूगोळा कोठार भग्न अवस्थेत असून जोत्यांवरून कोठार **10** □**10** फुट आकाराचे होते असे आढळते. पडलेल्या अवशेषांवरून व येथील राडारोडयावरून ही सदर दुमजली असण्याचा संभव आहे. तिकोणा किल्ल्याचा लक्ष ठेवण्यासाठीचे ठाणे म्हणुन जास्त प्रमाणात उपयोग केला गेला असल्याने माथ्यावर अधिक उंची देवुन इमारतीचे काम करण्यात आले असल्याचे निदर्शनास येते.[28] सध्या कोठाराच्या ठिकाणी खोदकाम केलेले आढळते.

किल्ल्यावरील कचेरी माथ्यावर आहे. कचेरीचा आयत आकार असून प्रवेशमार्ग व छताचा आधार असणारे तळखडे येथे आढळतात. भग्नावस्थेतील कचेरीच्या जोत्यात डाव्याबाजूस दिवा लावणीसाठी एक कोनाडा ठेवलेला दिसतो. कचेरीच्या जोत्याची **3** फुट ऊंची असलेली भिंत सुस्थितीत आहे.

## ः किल्ल्याचा इतिहास ः

[28] सं.भा.तापकीर, पुर्वोक्त, पृ.**216**.

तिकोणा किल्ला तुंग किल्ल्यासारखा टेहळणी करण्यासाठी घडविलेला टेहळणी दुर्ग होता. परंतु उत्तर मध्ययुगात या किल्ल्याचे नाव मोठया प्रमाणात प्रसिद्ध झाल्याने याची टेहळणी दुर्ग ही ओळख पुसली जावून हा महाराष्ट्रातील नामांकीत किल्ला म्हणून ओळखला जावू लागला असे दिसून येते. तिकोणा हा गिरीदुर्ग प्रकारात गणला जाणारा किल्ला असून मावळ तालुक्यातील किल्ल्यांपैकी तिकोणा किल्ल्यास प्राचीन व मध्ययुगात महत्वाचे स्थान आहे. तिकोणा ते तुंग **6.2** की.मी.□**3.8** मैल□अंतर आहे. प्राचीन □मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहासात तिकोणा किल्ला कायम दिसून येतो. किल्ल्याचा आकार पायथ्यापासून त्रिकोणी दिसतो म्हणून याचे नाव तिकोणा पडले.

## प्राचीन इतिहास

तिकोणा किल्ल्याच्या इतिहासाची सुरूवात प्राचीन काळापासून होते. मावळ तालुक्यात असलेला इंदोरीचा भुईकोट किल्ला वगळता सर्वच किल्ल्यांना व बहुतांशी पर्वतांना प्राचीन काळातील पोढी, गुंफा, स्तुप, शिलालेख आढळुन येतात. महाराष्ट्रातील आद्य राजवंश गणला गेलेला सातवाहन राजवंश होता. पुराणांमध्ये सातवाहनांस आंद्रसातवाहन असा किताब होता. सातवाहन राजे मावळ तालुक्यातील आंदर मावळ या विभागातील होते असे काही इतिहास संशोधकांचे मत आहे. बौध्दभिक्षुंस व तत्कालीन कालखंडात लेणी कोरण्याचे काम करणा□्या सर्व च पंथांस मदत करण्याचे तसेच पोढी व विश्रामासाठी गुंफा कोरण्यासाठी दान सातवाहन राजवंशाने केले. तसेच अनेक व्यापारी व दानशुर व्यक्तींनी मावळ तालुक्याच्या कातळयात गुंफा कोरण्यास प्रोत्साहनपर दाने दिली. यातून दरम्यानच्या काळात बहुतांशी कातळकडयांस व पर्वतांस अनेक गुंफा व पोढी, शिलालेख, स्तुप निर्माण केले गेले. उदाहरण ः तळेगाव M.I.D.C. शेजारी पिराचा डोंगर असुन माथ्यावर तीन पोढी व एक कातळखोदीव गुंफा आहेत. दरम्यानच्या काळात विसापूर, लोहगड, तुंग, राजमाची यांसारख्या उंच किल्ल्यांच्या कातळकडयांत लेणी खोदली गेली, विसापूर किल्ल्यासारख्या विस्तीर्ण माथा लाभलेल्या पर्वतावर शिलालेख कोरले गेले व कातळयात भाजे लेणी कोरली गेली. दरम्यान तिकोणा किल्ल्यावर कातळकडयात गुंफा कोरल्या गेल्या. पाण्याच्या सोयीसाठी पोढी केल्या गेल्या. मावळ तालुक्यातील सर्वेक्षणात प्राचीन किंवा मध्ययुगीन शिलालेख तिकोणा किल्ल्यावर किंवा त्याच्या कातळयातील लेणीत निदर्शनास आलेला नाही.

तळेगाव दाभाडे जवळील M.I.D.C. मध्ये मंगळूर गाव शेजारी असलेल्या पिराच्या डोंगराच्या माथ्यावर प्राचीन कालखंडात खोदलेल्या पाण्याच्या टाक्या दिसून येतात. यात दोनखांबी पोढी व गुंफा आढळते. मात्र येथे लेणी खोदण्याचे काम अर्धवट सोडून दिलेले दिसते. नाणोली शेजारी असलेल्या पर्वतावर कातळकडयास असलेले फिरंगाई लेणी ही अर्धवट काम केलेली आढळुन येते. त्याचप्रमाणे तिकोणा किल्ल्यावरही लेणी आढळतात परंतु लेणीचे कोरीवकाम अर्धवट सोडून दिलेले आढळते. सारांश मावळ तालुक्यातील बहुतांशी ठिकाणी प्राचीन काळात लेणी खोदल्या गेल्या व प्रतिकुल परिस्थितीमध्ये लेणीचे खोदकाम अर्धवट सोडावे लागले असावे असा संभव आहे.

भारतात 1250 लेणी आढळून आल्या आहेत. त्यातील 1000 लेणी महाराष्ट्रात आहेत. संपुर्ण भारतातील लेणींपैकी 78% लेणी महाराष्ट्रात आढळतात.[29] यातील बहुतांशी लेणी अर्धवट सोडून दिलेल्या असल्याचे आढळते. लेणी खोदतांना अर्धवट का सोडल्या याचे निश्चित कारण सांगता येत नाही. परंतु संभाव्य घटकांमध्ये प्रामुख्याने लेणींचे काम अर्धवट सोडण्यामागे प्रमुख कारण हे दुष्काळ असण्याचा संभव आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची अडचण, अन्नाचा तुटवडा, भयंकर दुष्काळ किंवा एखादी रोगराई व मिळत असलेली दाने बंद झाल्याने खोदकामात खंड पडत असावा. यांसारखी अनेक कारणे असण्याचा संभव आहे. तसेच काही ठिकाणी कातळकडयांस आतमध्ये खोदत असतांना मुरूम लागलेला दिसून येतो किंवा माती लागते यामुळेही लेणीचे काम अर्धवट सोडावे लागते. उदाहरणार्थ ः नानोली गावची फिरंगाईलेणी येथे लेणी कोरण्याचे काम अर्ध वट सोडलेले आढळते व मुरूम लागल्यानेच काम थांबलेलेही आढळून येते. तिकोणा किल्ल्याच्या तळजाई लेणींतील क.3 च्या प्रदक्षिणा मार्गाबाबत हेच समीकरण दिसून येते.

- तिकोणा किल्ल्यावरील प्राचीन काळातील अवशेष पुढीलप्रमाणे ः

1. किल्ल्याच्या दक्षिण कातळात असलेली गडद लेणी व त्या समोरील पोढी.

2. किल्ल्याचे प्रथम प्रवेशद्वार व देवडी.

3. तळजाईलेणी व सभोवतीच्या पाच खोल्या तसेच लेणी समोरील पोढी.

---

[29] मंजीरी भालेराव, *महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षिदार*, डायमंड प्रकाशन, 2009, पृ.15.

**4** . बालेकिल्ल्याच्या पहिल्या प्रवेशद्वारात ऊजव्याबाजूस असलेली दोनखांबी लेणी व पोढी .

**5** . बालेकिल्ल्याच्या दुसऱ्या प्रवेशद्वारात ऊजवीकडे असलेल्या पोढी व गुंफा .

**6** . वितंडेश्वरास चढतांनाच्या मार्गावरील अर्धगोलाकार पायऱ्या व कातळयाचा गोलाकार व्यास भग्न करून आतमध्ये कोरलेल्या पायऱ्या .

**7** . वितंडेश्वर मंदीराखाली असलेले सातखांबी सैनिकोपयोगी पाण्याचे टाकं .

इत्यादी सात ठिकाणांच्या व्यतीरीक्त प्राचीन काळातील अवशेष आढळून आलेले नाहीत . मात्र तिकोणा किल्ला प्राचीन इतिहासात महत्वपुर्ण होता हे निश्चित दिसून येते . मध्ययुगीन ओळख मिळण्याआधी तिकोणा किल्ल्याची प्राचीन ओळख होती हे त्यावर कोरलेल्या अनेक लेणी व पोढी यांवरून दिसून येते .

## किल्ल्याचा मध्ययुगीन इतिहास

मध्ययुगात तिकोणा किल्ल्याचा पहिला उल्लेख बुरहाने मासिरी या सय्यद अली तबातबाई याने लिहीलेल्या फार्सी ग्रंथात आलेला आहे . **1482** मध्ये तिकोणा किल्ल्याचा ऊल्लेख आलेला असून निजामशहाच्या उदयाच्या कित्येक आधीपासून तिकोणा किल्ला लष्करी उपयोगासाठी अस्तित्वात होता हे दिसून येते . यावरून तिकोणा किल्ला बहमनी राजवटींच्या काळातील किंवा त्याआधीच्या काळातील असावा असे आढळते . **1636** पर्यंत पवन मावळचा मुलूख निजामशहाच्या ताब्यात होता . तिकोणा दरम्यान निजामशहाकडे असण्याचा संभव आहे . तदनंतर **1636** ते **1647** पर्यंत तिकोणा अदिलशहाच्या ताब्यात होता . शिवाजी महाराजांने स्वराज्याची स्थापना केल्यानंतर पवन मावळातील लोहगड व विसापूर हे किल्ले **1656–57** साली जिंकून घेतले दरम्यान प्रभावळीतले

किल्ले जिंकणे त्यांच्यासाठी फायद्याचे होते म्हणून मावळ तालुक्यातील किल्ले शिवाजी महाराजांने जिंकून घेतले. त्या मोहीमेत तिकोणा किल्ला शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात आला.

शिवाजी महाराजांनी शके **1578** दुर्मुखीनाम संवत्सरे भाद्रपद वदय **11** म्हणजेच **4** सप्टेंबर **1656**, गुरूवारी स्वराज्यातील बहुतांशी किल्ल्यांची नावे बदलली त्यात 'तोरण्याचे प्रचंडगड, कोंढाण्याचे सिंहगड, विसापूरचे संबळगड, तुंगगडाचे कठीणगड' अशी नावे ठेवली दरम्यानच तिकोण्याचे 'वितंडगड' असे नामकरण त्यांनी केले.[30]

मिर्झाराजा जयसिंग स्वारीच्यावेळी मिर्झा पुरंदर किल्ल्यास वेढा टाकून बसला असतांना त्याने जाळपोळ करण्यासाठी दाऊदखान, कुतुबुद्दीन खान, राज रायसिंह व मिर्झाचा नोकर अचलसिंह या अधिकार्‍यांस पाठवून लोहगड, ईसागड, तुंग, तिकोणा या किल्ल्यांच्या पायथ्याशी असणारी गावे जाळून लुटून फस्त करण्यास सांगीतले व तसे करून सर्व अधिकारी लष्करी तळावर परतले. असा ऊल्लेख आलमगीरनाम्यात आलेला आहे. तुंग किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली तुंगवाडी मुघल आधिकार्‍यांनी जाळून लुटून टाकल्याचे आढळते. दरम्यानच्या मोहीमेत पेठ तिकोणा गावामध्येही जाळपोळ झाल्याचा संभव आहे.

मुघल व मराठयांमध्ये घडलेल्या पुरंदर तहावेळी शिवाजी महाराजांकडे असलेल्या **40** किल्ल्यांपैकी **23** किल्ले मुघलांस द्यावे लागले उर्वरित **17** किल्ले स्वराज्यात राहीले. **14** जुन रोजी झालेल्या तहात जे **23** किल्ले मुघलांना दिलेत त्यात तिकोणा किल्ल्याचे नाव आलेले आहे.[31] **4** फेब्रुवारी **1670** रोजी तानाजी मालुसरे यांनी सिंहगड किल्ला जिंकून घेतला व तद्नंतर शिवाजी महाराजांनी मुघलांशी केलेला तह मोडला व तहात गेलेले सर्व किल्ले जिंकून घेण्यास सुरूवात केली. दरम्यान किल्ले जिंकण्याच्या मोहीमेत  मावळ तालुक्यातील मुघलांस तहात दिलेले लोहगड, विसापूर, तुंग, तिकोणा या किल्ल्यांचा समावेश होता. मावळ तालुक्यातील गिरीदुर्ग स्वराज्यवाढीच्या

---

[30] सं.भा.तापकीर, पुर्वोक्त, पृ.**220**. आणि स.म.दिवेकर, द.वी.आपटे (संपा.), *शिवचरित्र प्रदीप*, शिवापूर दफ्तरातील यादी, भा.इ.सं.म. प्रकाशीत, **2009**,पृ.**50**.

[31] तत्रैव, पृ.**65**.

कामात महत्वाचे असल्याने हे किल्ले शिवाजी महाराजांनी जिंकुन घेतले. तसेच संभाजी राजेंच्या कार्यकाळातही मावळ तालुक्यातील किल्ले मराठयांकडे होते.

शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या काळात तिकोणा किल्ल्याचे ऊल्लेख फारसे येत नाही कारण हे एक टेहळणीचे ठाणे होते. परंतु इतर आसपासचा प्रदेश दरम्यानच्या काळात मराठयांकडे असल्याकारणाने तिकोणा किल्ला मराठयांकडे असण्याचा संभव आहे. परंतु संभाजी महाराजांच्या अटकेनंतर व निधनानंतर औरंगजेब बादशहाने व मुघलांच्या सर्वच फौजेने मराठयांचे किल्ले घेण्याची मोहीम वेगात चालु केली. जेधे शकावलीच्या नोंदीप्रमाणे 'ये वर्षी कुल गड मोगले घेतले' अशी नोंद येते.[32] यावरून मराठयांचे बहुतांशी किल्ले मुघलांनी अंकीत केलेले आढळतात. तिकोणा किल्ला एप्रिल **1704** पर्यंत मराठयांकडेच आहे ही महत्वपुर्ण बाब आहे. स्वराज्यातील बलाढय किल्ले मोगलांनी जिंकले असतांना तुंग व सभोवतीच्या प्रभावळीतले मावळातील किल्ले मराठयांनी टिकविलेले आढळून येतात. संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी मुघल सैन्यास जेरीस आणलेले दिसून येते. यांसोबतच हुकुमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण होते. गनिमी काव्याच्या पद्धतीने मुघलांशी लढाई चालू ठेवली. या सर्वांचे नेतृत्व महाराणी ताराबाई यांनी केले. मराठे मुघल संघर्षात तिकोणा किल्ल्याचा महत्वाचा वाटा होता. हे औरंगजेबाच्या पदरी लिहील्या जाणाऱ्या अखबारात वरून दिसून येते.

औरंगजेब बादशहाच्या दरबारात नियमित लिहील्या जाणा□या अखबारांमध्ये तिकोणा किल्ल्याबद्दल अनेक उल्लेख येतात त्यातील 'अखबारात□ए□दरबारी मुअल्ला' मध्ये तिकोणा किल्ल्याचे उल्लेख आले असून तारखेनुसार ते पुढील प्रमाणे ः[33]

**1□2** जानेवारी **1701** ः पालीगडाचा□सरसगड□किल्लेदार□सेना□पतसिंह याने पुढीलप्रमाणे विनंतीअर्ज लिहून पाठविला आहे की, "लोहगडाच्या जवळ मराठयांच तिकोणा आदी दोन किल्ले आहेत येथील किल्लेदारांनी आपण किल्ला हवाली करू म्हणून बोली लावलेली आहे. आज्ञा होत असेल तर मी लोहगडावर जाईन. माझा नायब व

---

[32] अ. रा. कुलकर्णी, पुर्वोक्त, पृ. **133**.

[33] म. तेंडुलकर, पुर्वोक्त, पृ. **67-69**.

फतहसिंह याचा मुलगा कमालसिंह याला पालीगडाच्या किल्लेदारीवर नेमण्यात यावे." (बादशहांनी) विनंती मान्य केली. कमालसिंहला **150** जात व **100** स्वार अशी मनसब आहे.

□बादशहांने परवानगी देवूनही यास दोन्ही किल्ले घेता आले नाही त्यासाठी सप्टेंबर **1703** साल लागले□

**2□ 8** जुलै **1703** ः चाकणचा किल्लेदार व फौजदार□अमानुल्लाहखान□ याला खजिन्यातून काही कामगीरीसाठी□तुंग व तिकोण्याच्या किल्लेदारांस लाच देवून फितूर करण्यासाठी□□म्हणून **1000** अश्रफ्या आणि **30000** रूपये देण्यात यावेत, अशी आज्ञा झाली.

**3□12** सप्टेंबर **1703** ः बादशहांना कळविण्यात आले की "आतिषखान हा तिकोणा किल्ला जिंकून घेण्यासाठी गेला होता. त्याने तो किल्ला जिंकून घेतला आहे." बादशहांनी आज्ञा केली, "बक्षी रूहुल्लाहखान याने तेथील किल्लेदारासाठी नावाची तजवीज करावी."

**4□12** सप्टेंबर **1703** ः बादशहांना कळविण्यात आले की, "नवलाखउंबऱ्याचा ठाणेदार आतिषखान ऊर्फ मुहम्मद काजिम, सुलेमानखान आणि चाकणचा किल्लेदार व फौजदार अमानुल्लाहखान यांनी चोरांच्या (मुघल दरबारी मराठयांचा उल्लेख चोर असा करीत आणि तोही औरंगजेब बादशहाच्या हुकमाने□तिकोणा किल्ल्याला वेढा घातला होता. तो त्यांनी जिंकुन घेतला आहे.

**5□17** सप्टेंबर **1703** ः अमानुल्लाहखान याने तिकोणा फत्ते केला म्हणून सोन्याच्या किल्ल्या मुहम्मद शफीच्या बरोबर□बादशहाकडे□पाठविल्या. त्याच्याबरोबर एक पत्रही पाठविले. ते बादशहांसमोर ठेवण्यात आले. याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली आणि मनसब वाढविण्यात आली.

**6□18** सप्टेंबर **1703** ः चाकणचा किल्लेदार अमानुल्लाहखान हा येऊन बादशहांना भेटला. तिकोणा किल्ला जिंकून घेतल्याबद्दल त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

**7) 19** सप्टेंबर **1703** ः अमानुल्लाहखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली की, "गनीमांच्या (मराठयांच्या) तर्फे तुकोजी हा तिकोणा किल्ल्याचा किल्लेदार होता. तो किल्ला आपल्या ताब्यात आला आहे. हुजुरांची चाकरी

करावी म्हणून मी तुकोजीला घेऊन आलो आहे." बादशाहानी त्याला खिलतीची वस्त्रे दिली. बादशहांनी आज्ञा केली की, "यापुढे तिकोणा किल्ल्याचा ऊल्लेख अमनगड म्हणून करण्यात यावा."

**8□21 सप्टेंबर 1703** ः आज्ञेप्रमाणे सुलेमानखान हा आतिषखानाकडून बादशहांना भेटण्यासाठी आला. किल्ले अमनगड□तिकोणा□ घेतल्याच्या प्रसंगानिमीत्त त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. किशोरसिंह याला अमनगडाचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले.

**9□21 सप्टेंबर 1703** ः सुलेमानखान हा तिकोणा किल्ला जिंकून घेण्यासाठी नवलाखउंब□याचा ठाणेदार आतिषखान याच्याकडे गेला होता. किल्ला जिंकून घेतल्यावर येऊन बादशाहांना भेटला.

**10□22 सप्टेंबर 1703** ः अमनगडाची किल्लेदारी गोपाळसिंह याचा मुलगा किशोरसिंह याला देण्यात आली. त्याची मनसब वाढविण्यात आली.

**11□22 सप्टेंबर 1703** ः अमनगड येथे गोपालदासचा मुलगा कुंवरसिंह याची किल्लेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याची मनसब वाढविण्यात आली.

**12□24 सप्टेंबर 1703** ः अमनगड किल्ल्याचा किल्लेदार किशोरसिंह याला खिलतीची वस्त्रे देऊन किल्ल्याकडे जाण्यास निरोप दिला.

**13□12 ऑक्टोबर 1703** ः तिकोणा किल्ल्याचा राघू देशमुख हा अमानुल्लाहखानाच्या मध्यस्तीने येऊन बादशहांना भेटला. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

**14□31 ऑक्टोबर 1703** ः चाकणचा किल्लेदार व फौजदार अमानुल्लाहखान याने अर्ज करून पुढीलप्रमाणे विनंती केली की, **1**)अमनगड येथील अधिकारी तुकोजी याला मनसब मिळावी. विनंती मान्य करण्यात आली. त्याला **500** जात व **200** स्वार अशी मनसब देण्यात आली. तळगाव व इंदुरी येथील त्याची वतने होती, ती त्याच्या जहागीरीत देण्यात आली. त्यासाठी तेथील पूर्वीचा जहागीरदार श्रीपत याला बदलण्यात आले. **2**□ तुकोजीच्या भाऊबंदांपैकी मलजी याला मनसब मिळावी. विनंती मान्य करण्यात आली. त्याला **200** जात व

**50** स्वार अशी मनसब देण्यात आली. आज्ञा करण्यात आली की, पाबळ परगण्यातील मौजे धाररी येथील रामचंद्र मराठा जहागिरदाराकडून ते गाव काढून घेण्यात येऊन मलजीच्या तनखा जहागीरीत देण्यात यावे.

तिकोणा किल्ल्यास मध्ययुगीन इतिहासात महत्वपुर्ण स्थान होते. हे अखबारात वारंवार आलेल्या नोंदीवरून दिसून येते. तिकोणा किल्ला मुघलांकडून जिंकला गेल्यावर औरंगजेब बादशहाकडून अनेकांस खिल्लती दिल्या गेल्या. तुंग व तिकोणा या दोन्ही किल्ल्यांमध्ये आधी तिकोणा किल्ला मुघलांनी जिंकला तद्नंतर औरंगजेब जेव्हा वाकीनखेडयाच्या नाईकाचा बंदोबस्त करण्यासाठी निघाला तेव्हा त्यास तुंग किल्ला जिंकल्याची बातमी मिळाली. त्याने केलेला हुकुम **20** मे **1704** च्या अखबारात आहे. औरंगजेबाच्या हुकमाप्रमाणे "अमनगडाचा (तिकोणा) किल्लेदार आणि करतालदास याचा मुलगा कुंवरमल यास तुंगचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले."

औरंगजेबाची आगेकूच वाकीनखेडच्या बाजूनेच चालू असतांना अजून एक ऊल्लेख **6** नोव्हेंबर **1704** च्या अखबारात येतो. "मतलबखान याने विनंती केली की, अमनगड (तिकोणा) व बंकीगड □तुंग□यांच्या किल्लेदारीवर सेनापत□पाली गडाचा किल्लेदार□याची नेमणूक करण्यात आली आहे. पण ती त्याला मान्य नाही. जर या दोन्ही किल्ल्यांची किल्लेदारी गुलशनाबाद□नाशिक□चा ठाणेदार जैनुद्दीन अलीखान याला सांगण्यात आली आणि त्याच्यावर जैनुद्दीनचा नायब□उप किंवा डेप्युटी□म्हणून काका नायक याला नेमण्यात आले तर तो किल्ल्यांची ऊत्तम व्यवस्था ठेवील. बादशहांनी विनंती मान्य केली."[34]

मोगल मर्दिनी ताराबाई या ग्रंथात डॉ. रंगुबाई जाधव यांच्या पुस्तकात तिकोणा किल्ल्याबद्दल नोंद आहे. "**29** मे **1750** रोजी महाराणी ताराबाई राजाराम महाराजांच्या सिंहगडावरील समाधीचे दर्शन घेण्याच्या निमित्ताने पुण्यात आल्या. त्यावेळी बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशव्यांनी रामराजे यांना पत्र पाठवून कळविले की, "स्वारी पुण्यास येऊन मातुश्रींचे समाधान करून सातारियास जावे". त्यामुळे ताराबाई रामराजांची प्रतिक्षा करीत पुण्यातच राहील्या. त्या अवधीत पेशव्यांनी चिमणाजी नारायण सचिवाचे पारिपत्य करून पेशव्यांच्याविरूध्द सुरू असलेल्या ताराबाईच्या हालचाली बंद पाडण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी सचिवाचा मुक्काम पुण्यात होता. पेशव्यांनी सचिवांकडून प्रथम सिंहगड आपल्या ताब्यात घेतला आणि त्यानंतर तुंग व

[34] सं. भा. तापकीर, पुर्वोक्त, पृ. **220**.

तिकोणा हे गड आणि त्यांच्या घे[?]त असलेला मुलूख आपल्या ताब्यात घेऊन **14** जून **1750** रोजी सचिव व त्यांचा मुलगा चिटकोपंत यांना अटकेत ठेवले तद्नंतर तिकोणा व तुंग पुन्हा सचिवांकडे आले"

ब्रिटीशांनी मराठयांचे किल्ले जिंकून घेण्यास सुरूवात केली तेव्हा कर्नल प्रॉथर याने **1818** साली तिकोणा किल्ला जिंकून घेतला. काहीच दिवसांत तो पुन्हा भोरकरांकडे देण्यात आला. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत तिकोणा किल्ला भोरकरांकडेच राहीला तदनंतर स्वतंत्र भारतात सर्वच संस्थाने विलीन झाली त्यात भोर संस्थानही विलीन झाले त्यात तिकोणा किल्ला स्वतंत्र भारतात विलीन झाला. भोर संस्थानाकडे तिकोणा किल्ला असतांना **1945** च्या नोंदीनुसार 'तिकोणागडाच्या दिमतीस अवघे सात लोक होते' अशी नोंद सापडते.[35]

## इंदोरी किल्ला

| | | |
|---|---|---|
| जिल्हा | ः | पुणे |
| किल्ल्याचा प्रकार | ः | भुईकोट |
| किल्ल्याचा परीघ | ः | **627** मी. (**2056**फुट) |
| जवळची नदी | ः | इंद्रायणी |
| जवळचे शहर | ः | तळेगाव दाभाडे, ता.मावळ |

मावळ तालुक्यातील इंदोरी गावात इंद्रायणी नदीच्या काठी सरसेनापती खंडेराव दाभाडे यांनी इंदोरी हा **1720 - 21** मध्ये भुईकोट किल्ला बांधला.[36] छत्रपती शिवाजी महाराजांचे दुसरे पुत्र राजाराम महाराज यांनी महाराष्ट्रातील युध्द परिस्थिती कमी व्हावी व जिंजीकडे औरंगजेब बादशहाचे सैन्य झुलते ठेवावे तसेच

[35] सं.भा.तापकीर, पुर्वोक्त, पृ.**221**.

[36] सत्यशिलराजे दाभाडे, *दुर्गांच्या देशातून*, गरूडझेप प्रकाशन, **2012**, पृ.**81**.

स्वराज्यातील रयतेस उभारी यावी म्हणून जिंजीच्या आश्रयास जावून स्वराज्याची राजधानी जिंजीस केली होती, सध्या तामिळनाडू राज्यात असणाऱ्या या जिंजी किल्ल्यास औरंगजेब बादशहाचा वजीर असदखान याचा मुलगा इतिकादखान उर्फ जुल्फीकारखान याने रायगड किल्ल्यास वेढा देवून मराठी राज्याची राजधानी रायगडचा पाडाव केला तद्नंतर तो जिंजीच्या किल्ल्यास गेला व जिंजीच्या किल्ल्यास त्याने वेढा दिला. जिंजीचा वेढा सात वर्षे चालला. या दरम्यान अनेक राजकीय व कौटुंबीक घटना अनुक्रमे महाराष्ट्रात व छत्रपती घराण्यात घडल्या. जिंजीच्या वेढयात असतांनाच छत्रपती राजाराम महाराजांस पुत्र झाला. राजाराम महाराजांने पुत्रोत्सवार्थ स्वराज्यासाठी प्राणपणाने लढलेल्या एकनिष्ठ दाभाडे घराण्यातील येसजी बिन बजाजी दाभाडे यांस शक 1618 पौष वदय 11 (8 जानेवारी 1697) रोजी इंदोरी हा गाव इनाम म्हणून दिला. दरम्यानच्या काळात इंदोरी गाव दाभाडे घराण्याकडे होता. मात्र इंदोरीत वाडयाचे बांधकाम दाभाडेंकडून करण्यात आलेले नव्हते. खंडेराव दाभाडे यांना छत्रपती शाहू महाराज (शिवाजी महाराजांचे नातू) यांनी सरसेनापती पद दिले. दरम्यान अनेक गावे त्यांस वतन म्हणून शाहूंकडून दिली गेली. इंदोरी गावचे वतन राजाराम महाराजांकडून खंडेराव दाभाडेंचे वडील येसाजी यांस आधीच मिळालेले होते. तरीही शाहुंकडून पुन्हा इंदोरी गावचे वतनपत्र खंडेरावांना मिळाले. दोनदा वतनपत्रे मिळण्यामागे महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती कारणीभुत होती. राजाराम महाराजांकडून मिळालेले वतन कोल्हापुर गादीकडून मिळालेले वतन होते. मात्र औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर शाहूची सुटका मध्यप्रदेशात भोपाळ येथे झाली. शाहू महाराष्ट्रात आल्यावर ताराराणी व शाहू यांच्या संघर्षात खंडेराव दाभाडे शाहूंच्या बाजूने होते. त्यामुळे इंदोरी गावच्या वतनाची पत्रे शाहूंकडून खंडेराव दाभाडे यांना देण्यात आली. यात इंदोरी गावात 9 बुरूजांचा भुईकोट किल्ला खंडेराव दाभाडे यांनी नदीकाठी बांधून घेतलेला आढळून येतो.

इंदोरीच्या किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार पुर्व दिशेस असून पश्चिम तटबंदी इंद्रायणी नदीस समांतर रेषेत बांधली असल्याचे आढळते. त्यामुळे किल्ला चौकोणी किंवा एक सलग काटकोनात दिसणाऱ्या शनिवारवाडा किंवा अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्यांसारखा न दिसता थोडया प्रमाणात त्रिकोणी आकारात दिसतो. महाराष्ट्रातील बहुसंख्य किल्ल्यांना अनेकविध वैशिष्टये आहेत. त्यापैकीच एक निसर्गसंपन्न किल्ला म्हणून इंदोरी

किल्ल्याची गणना होते . इंदोरीच्या किल्ल्याचे बांधकाम पाहून पहिले बाजीराव पेशवे यांनी इसवी सन **1730** मध्ये पुण्यात मुठा नदीकाठी शनिवारवाडा बांधुन घेतला .[37]

इंदोरी किल्ला पश्चिम दिशेने जलदुर्ग व पुर्वेदिशेने बलाढय भुईकोट आढळतो . सरसेनापती खंडेराव दाभाडे व ऊमाबाई दाभाडे यांचे काही काळ वास्तव्य इंदोरीच्या किल्ल्यात होते . म्हणून इंदोरी गावास मध्ययुगीन इतिहास मोठया प्रमाणावर लाभलेला दिसून येतो . इंदोरी गाव मध्ययुगात वसलेले असले तरी प्राचीन काळातील एक मार्ग इंदोरी गाव मधून गेला होता . प्राचीन काळातील व्यापारी व बौध्दभिक्षूंचा एक मार्ग उल्हास नदीशेजारून कोथळीगड मार्गे कोंढाणे लेणीस व तेथून कुसुर घाट मार्गे कार्ले लेणीस येत असे . कार्ले लेणीतील चैत्यगृह व त्याच्या भोवतीच्या विहारात बौध्द भिक्षूंच्या राहण्याची व्यवस्था होती . कार्ले लेणी पासून पुर्वेस भंडारा व भामचंद्र डोंगराच्या लेणी पर्यंत प्राचीन मार्ग होता .[38] त्यामुळे इंदोरी गावामध्ये प्राचीन trade Route म्हणजेच व्यापारी मार्ग असल्यामुळे इंदोरी गावचा इतिहास प्राचीन काळापर्यंत मागे जातो .

- प्रवेशद्वार, कवाडं व देवडया (अलंगा) ः

किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर मधोमध गणपती व दोन्ही बाजूंस सिंह कोरलेले आढळतात . या प्रकारातील शिल्पकला सेनापती घराण्याच्या प्रवेशद्वारांवर आढळून येते . सरसेनापती खंडेराव दाभाडेंच्या काळात ज्या वास्तू बांधल्या गेल्या आहेत त्या सर्व वास्तूंवर अशा प्रकारची द्वारशिल्पे आढळून येतात . या प्रवेशद्वारावरून लांबपर्य ंत तोफेचा, बंदुकींचा व पेटतेबाण यांचा मारा करण्यासाठी जंग्या व खिडक्या ठेवलेल्या आढळून येतात .

किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराचे एक वैशिष्टय आढळते . अन्यत्र कुठेही न आढळणारा असा दुहेरी संरक्षणाचा दरवाजा किल्ल्याच्या प्रथम द्वारात निदर्शनास येतो . प्रथम प्रवेशद्वार जरी शत्रुसैन्याने फोडलेच तरी त्याचमागे **26 . 10** फुट अंतरावर असलेले द्वितीय प्रवेशद्वार आतमधील किल्ल्याचे संरक्षण करण्यास घडविलेले होते असे दिसून येते . तसेच द्वितीय प्रवेशद्वार शत्रुसैन्याकडून फोडल्या जाईल असे दिसून आले तरी त्वरीत मागील बाजूने

---

[37] सं . भा . तापकीर, पुर्वोक्त, पृ . **234** .

[38] मुलाखत ः मंजिरी भालेराव, दिनांक – **8** नोव्हेंबर **2014** .

पश्चिम तटबंदीकडून बाहेर पडून राजकुटुंबीयांना व महत्वाच्या व्यक्तींना नदीमार्गे होडीतून निसटता यावे अशी रचना नदिच्या बाजुस पायऱ्या ठेवुन केलेली निदर्शनास येते. मध्ययुगात कोणताही किल्ला हस्तगत करण्यासाठी त्यास वेढा देवून त्याची रसद तोडणे व तद्नंतर किल्ला हस्तगत करण्याची पद्धत होती. मात्र या पद्धतीस इंदोरी किल्ला अपवाद असून वेढा देतांना पश्चिमबाजूस असलेली इंद्रायणी नदी किल्ल्याच्या जवळ खोल डोहाची असल्यामुळे शत्रूसैन्यास माघार घेण्यास पर्याय रहात नसे असे दिसून येते. इंद्रायणी नदीस बारमाही पाणी असल्याने दक्षीणबाजूने शत्रूसैन्य वेढा देणे कठीण गोष्ट असल्याचे आढळून येते. नदिच्या शेजारी किल्ला बांधण्याचा मोठा फायदा म्हणजे सैन्यास लागणारे भरपूर पाणी नदितुन उपलब्ध होत असे. याशिवाय शत्रुसैन्याचा वेढा किल्ल्यास पडत नसे. तसेच पाण्याच्या मोठया विहीरी, हौद, तलाव मोठया प्रमाणावर खर्च करून बांधण्याची आवश्यकता नसे. सारांश नदिशेजारी किल्ला बांधल्यामुळे किल्ला अधिक बळकट व दुर्गम करणे सहज शक्य होत असल्यामुळे नदिशेजारी असलेल्या किल्ल्याचे महत्व अधिक असल्याचे निदर्शनास येते.

किल्ल्यात मुख्य प्रवेशद्वाराचे बांधकाम अतिशय दर्जेदार केलेले आढळून येते. मुख्य प्रवेशद्वारावर मोठा नगारखाना येथे बांधला गेल्याचे आढळते. मुख्य प्रवेशद्वाराची उंची **20** फुट व रूंदी **13** फुट आहे. प्रवेशद्वाराच्या आत दोन्ही कवाडांची दगडी कुसं सुस्थीतीत दिसून येतात. **1970** साली दाभाडे राजघराण्याकडून घेण्यात आलेल्या छायाचित्रात ही कवाडं **1970** साली उपलब्ध होती असे दिसून येते. प्रवेशद्वाराची पहिली कवाडं ऊपलब्ध होती मात्र त्यामागील द्वितीय प्रवेशद्वाराची कवाडं छायाचित्रात स्पष्ट दिसत नाहीत. मुख्य प्रवेशद्वाराच्या चारही कवाडांची ऊंची **20** फुट व रूंदी **6** फुट होती, जाडी **1** फुट असण्याचा संभव आहे असे याच्या दरवाजा अडकविण्यासाठी असलेल्या दगडी कुसांवरून दिसते. प्रवेशद्वाराच्या उजव्या कवाडास एक दिंडी (लहान आकाराचा) दरवाजा होता ज्याचा आकार **2.5** × **3.5** फुट होता. महाद्वाराची कवाडं शिल्लक नसल्यामुळे (मावळ तालुक्यातील एकाही किल्ल्यास कवाडं ऊपलब्ध नाहीत) कवाडांच्या आकार छायाचित्रावरून अंदाजे घेता येतो. दोन्ही कवाडं लावल्यावर शत्रूसैन्याकडून दरवाजा पडू नये याकरीता अडसूळ लावण्याची मध्ययुगीन पद्धत होती. समकालात कवाडं लावून घेतली व अडसूळ ओढला की हत्तीसारख्या मोठया प्राण्यालाही धडका देवून प्रवेशद्वार फोडणे अवघड गोष्ट होत असे. भुईकोट किल्ल्यांच्या प्रवेशद्वारांस सर्व साधारण **1** फुट लांबीचे टोकधार तीक्ष्ण खिळे ठोकुन द्वारं तयार केली जात असे त्यामुळे हत्ती सारख्या प्राण्यालाही धडक देणे शक्य होत नसे. प्रवेशद्वाराच्या भोवती असलेल्या दोन्ही बुरूजांवरून प्रवेशद्वार फोडणाऱ्या

हत्तीवर व शत्रूसैन्यावर पेटते बाण, बंदुकीचा व जंबुऱ्यांचा (लहान तोफा) मारा करण्यासाठी रचना केलेली असे. दोन्ही लाकडी कवाडं लावल्यानंतर आतमधल्या बाजूने त्यांस लावायला कडी ऊपलब्ध असली तरी बाहेरच्या शत्रूसैन्याकडून मोठा आघात दरवाजावर होतो त्यावेळी कडया सहज तुटण्याचा संभव असतो. त्यासाठी दरवाजा मजबुत करण्यावर भर दिल्या गेलेला आढळतो. प्रवेशद्वार शत्रुसैन्याने फोडले की किल्ला शत्रुसैन्यास हस्तगत होतो त्यामुळे मध्ययुगात ऊत्तरोत्तर नवनविन कल्पना लढवुन किल्ल्यांच्या प्रवेशद्वारांची शत्रुसैन्याचा मारा सहन करण्याची क्षमता वाढविण्यात आली. याच कल्पनेतुन आडसूळ ही कल्पना आमलात आणली गेली असण्याचा संभव आहे. प्रवेशद्वार लावल्यावर आतमधील बाजूने मोठा आडसूळ (लाकडी लांबसर ओंडका) एका बाजूने ओढून दुसऱ्या बाजुस सरकवून अडकविला जात असे. जरी प्रवेशद्वार फोडण्याचे प्रयत्न झाले तरी द्वारावरील आघाताने अडसुळामुळे द्वार पडण्याची शक्यता कमी असे. नळदुर्ग (धाराशीव, ऊस्मानाबाद) व नगरचा भुई कोट (अहमदनगर) यांसारख्या काही किल्ल्यांवर एकाच प्रवेशद्वारास दोन अडसूळ प्रवेशद्वाराच्या मागच्याबाजुस लावलेले निदर्शनास येतात. इंदोरी किल्ल्याचा महाद्वाराचा चौकोनी अडसूळ **9** × **9** इंच आकाराचा होता. या प्रवेशद्वाराच्या आत दोन्हीबाजूंस देवडया आहेत. फारशी भाषेत किंवा मध्ययुगातील प्रचलीत बोलीभाषेत देवडयांस 'अलंगा' असे संबोधले जाते. देवडयांचा उपयोग पहारेकऱ्यांना राहण्यासाठी व पहाऱ्याच्या वेळी होत असे. दोन्हीबाजूंच्या अलंगेवर चढण्यासाठी **3.6** फुट उंच ओटा असून ओटयावर चढण्यास एकही पायरी ठेवलेली नाही. अलंगेत चढतांना दमछाक होते. उपलब्ध अलंगा ऊंच ठेवून तिच्यात चढण्यास अडचण यावी व पहारेकऱ्यांसही वर चढतांना कसरत करायला लागावी अशी रचना येथे करण्याचे प्रयोजन शत्रूसैन्यासाठी अडचण निर्माण व्हावी, शत्रुसैन्यास अलंगेत सहजगत्या चढता येवू नये. युध्दप्रसंगी अलंगेतून शत्रुवर प्रभावी मारा करता यावा यासाठी अलंगा उंच बांधलेल्या निदर्शनास येतात. शत्रूसैन्यास अडथळे निर्माण करून विजय मिळविण्यासाठी केलेली ऊपाययोजना म्हणुन उंच अलंगेचे महत्व निदर्शनास येते. किल्ल्याच्या आत प्रवेशल्यावर उजव्या बाजूची देवडी आकाराने भव्य मात्र सर्वसाधारण शैलीतील असून डाव्या बाजूची देवडी मोठया शस्त्रागाराचा वऱ्हांडा असल्याचे आढळून येते. दोन्ही देवडयांस दोन – दोन दालणे दिसतात. वरील छतास आधार देण्यासाठी मधोमध स्तंभ ठेवले आहेत. उपलब्ध स्तंभांमुळे देवडीला चार दालणे प्राप्त झाल्यासारखे निदर्सनास येते. दोन्ही देवडयांस दिवा लावणीसाठी कोनाडे केलेले दिसून येतात. ऊजव्या व डाव्याबाजूच्या दोन्ही देवडयांतील अंतर **13** फुट असून प्रथम व द्वितीय प्रवेशद्वारातील अंतर **26.10** फुट आहे. मध्ययुगात ही

दोन्ही प्रवेशद्वारे सायंकाळी लावून घेतल्यानंतर येथे एक मोठी व ऊंच खोली दिसत असावी. मध्ययुगातील बहुतांशी मंदीरांस जय-विजय यांच्या मूर्ती ठेवण्यासाठी कट्टे करण्याची पद्धत होती. इंदोरी किल्ल्याच्या प्रवेशद्वारांस ऊजव्या व डाव्या दोन्ही बाजूंस नक्षिदार कट्टे अशाच शैलीत घडविलेले निदर्शनास येतात. **2 × 2** फुट आकाराच्या कट्टयांचा द्वारपाल सैनिकांस बसण्यासाठी उपयोग होत असे. समकालात बांधलेल्या सर्व गढया वा किल्ले यांस प्रवेशद्वाराबाहेर दोन्ही बाजुंस असे कट्टे निदर्शनास येतात. (इंदोरी किल्ल्याचे प्रवेशद्वाराच्या बाहेर दोन्ही बाजुंस असलेले कट्टे लोहगड किल्ल्यावरील मुख्य महाद्वाराच्या कट्टयांच्या रचनेशी मिळते जुळते आहेत.)

- शस्त्रागाराची वैशिष्टयपुर्ण बांधकामशैली ः

इंदोरी किल्ल्याच्या प्रथम प्रवेशद्वाराच्या आत डाव्या देवडीत कोपऱ्यातील दरवाजामधून आतमध्ये जाण्याचा मार्ग आहे. येथील प्रवेशद्वार **4.3 × 2.3** फुट आकाराचे असून द्वाराच्या आत मोठी बंदिस्त खोली निदर्शनास येते. उपलब्ध खोलीचे आकारमान **20.2 × 13.6** फुट असून ऊंची **16** फुट आहे. येथील खोली बंदिस्त केलेली असल्यामुळे आतमध्ये प्रकाश व हवा येण्यास जास्त जागा नाही. उपलब्ध आयताकार खोलीत शस्त्रास्त्रे किंवा त्या उपयोगी वस्तू ठेवण्यासाठी **2 × 2** फुट आकाराचे चौकोनी कोनाडे बांधलेले आढळून येतात. मात्र इथे दारूगोळा ठेवत असल्याने दिवा लावणीची सोय उपलब्ध खोलीत दिसून येत नाही. दिवा लावणीसाठी येथे एकही कोनाडा ठेवलेला आढळत नाही. मशाली लावण्याचीही सोय आतमध्ये केलेली नव्हती. पावसाळयात अधिक तीव्रतेच्या पावसातही येथील बंदिस्त खोलीत पाणी तसेच ओलावा देखिल येत नाही. या खोलीस स्पर्शुन असलेली समोरील बाजूची तिजोरीसदृश्य **10 × 6** फुट आकारमान असलेली खोली या ठिकाणाहूनही **2.5** फुट ऊंचीवर बांधुन घेतलेली आढळते. या खोलीचे द्वार **3.10 × 2.8** फुट आकाराचे असुन ऐवढया ऊंचीवर बांधलेल्या लहान आकारातील खोलीचा काय वापर होत असावा? बाहेरील खोली प्रशस्त असतांना आत लहान आकाराची खोली का निर्माण केली? तिजोरीसदृश्य खोलीची ऊंची बाहेरील खोलीतून आतमध्ये जातांना आणिक ऊंचीवर का घेतली? या प्रश्नांची उत्तरे आज्ञापत्र या रामचंद्रपंत अमात्य बावडेकर लिखित ग्रंथात मिळतात. आज्ञापत्रात आलेल्या उल्लेखाप्रमाणे, "बाण, होके, आदिकरून मध्यघरांत ठेवावे. सरदी पावो न द्यावी आठ पंधरा दिवसी हवालदाराने येऊन दारू, बाण, होके आदिकरून बाहेर काढून उष्ण(ऊन्हाला दाखवून) देऊन

मागुती मुद्रा(Seal) करून ठेवीत जावे."[39] उपलब्ध संदर्भावरून लहान आकारातील खोलीत तोफांच्या व बंदुकीच्या दारूंच्या थैल्या ठेवत असावेत. सारांश येथील लहान आकाराच्या खोलीत निवडक शस्त्रास्त्रे ठेवून मोठी शस्त्र या खोलीच्या बाहेरील खोलीत ठेवत असावेत असा संभव आहे. त्यामुळे या खोलीस सर्दी लागू नये, ओलावा येवू नये याकरीता आतमधीलबाजूने चुन्याचा गिलावा लावून बांधणी केलेली आढळते. बंदीस्त खोलीच्या आतमध्ये हवा येवू नये याकरीता खोलीचे द्वार लहान आकारात बांधलेले आढळते. हवेप्रमाणेच प्रकाशही येथे कमी यावा याची दक्षता उपलब्ध खोलीत घेतलेली आढळते. प्रकाश व्यवस्थेसाठी मध्ययुगात बांधकाम करतांना नैसर्गीक प्रकाशासाठी ठेवलेले झरोके, खोल्यांमध्ये प्रकाशासाठी दगडी दिवे, लाकडी व दगडी दिवठाणं तसेच टेंभे व मशाली यांचा समावेश होत असून इंदोरी किल्ल्याच्या या बंदीस्त खोलीत कोणतीही प्रकाशव्यवस्था केलेली आढळून येत नाही.

- बुरूज व तटबंदीची बांधकाम शैली ः

इंदोरी किल्ल्याचे बुरूज व तटबंदीचे बांधकाम करतांना जमिनीपासून 80% ऊंचीचे बांधकाम बेसॉल्ट दगडाच्या तोडींत केले असून त्यावरील 20% बांधकाम कमी जाडी असलेल्या पसरट लांबसर विटांत केलेले आढळते. या विटांचे आकारमान साधारण 12 × 8 असून जाडी 3 इंच आहे. भाजलेल्या भेंडयाच्या विटांत संपुर्ण बांधकाम केलेले निदर्शनास येते. संपुर्ण किल्ल्याच्या तटास वरच्या बाजुस विटांचे बांधकाम असलेल्या तटबंदीस असंख्य जंग्या(गोळया, बाण मारण्यासाठीच्या तटबंदीतील छिद्र) आढळतात यावरून इंदोरी किल्ल्यात सैनिकांची संख्या मोठया प्रमाणावर असण्याचा संभव आहे.

इंदोरी किल्ल्यास नऊ बुरूज असून सर्व बुरूजांवर तोफा डागण्यासाठी मोठया आकाराच्या खिडक्या ठेवलेल्या आढळतात. किल्ला भुईकोट असल्यामुळे किल्ल्याचे संरक्षण करण्यासाठी तोफांशिवाय पर्याय नव्हता. म्हणुन प्रत्येक बुरूजावर तोफ ठेवून त्याद्वारे किल्ल्याचे संरक्षण मध्ययुगात केले जात असावे. मात्र सद्यस्थितीत किल्ल्यात एकही तोफ शिल्लक नसल्याचे आढळते. प्रवेशद्वारातून किल्ल्याच्या आतमध्ये डाव्या बाजूस तटबंदीत एक

---

[39] रा. अमात्य, पुर्वोक्त, पृ. 24.

छोटेखानी बुरूजाची खोली निदर्शनास येते. येथील खोली 11 × 7.5 फुट आकाराची असून 10 फुट ऊंची असलेली आहे. खोलीमध्ये दिवा लावणीसाठी दोन कोनाडे आढळतात. ही खोली सुस्थितीत असून आतमधील बाजूने चुण्याचा गिलावा केला असल्याने पावसाळयातही येथे पाणी साचत नाही. विसापूर किल्ल्याच्या पश्चिम तटबंदीसही अशीच बुरूजाची खोली निर्माण केलेली आढळून येते. सैनिकांस राहण्यासाठी उपलब्ध खोलीचा उपयोग होत असण्याचा संभव आहे. खोलीच्या वरच्या बुरूजावर जाण्यासाठी खोलीपासून आठ पायऱ्या चढून वर जाता येते.

किल्ल्याच्या आतमधील बाजूने तटबंदीवर जाण्यासाठी अनेक ठिकाणी मार्गाची रचना केलेली आढळते. मध्ययुगात इंदोरी किल्ल्याची बांधणी करतांना किती मार्ग तटबंदीवर चढण्यासाठी निर्माण केले होते याबद्दल किल्ल्याची झालेली पडझड दृष्टिक्षेपात ठेवुन सांगता येणे कठीण आहे परंतु या मार्गांच्या पायऱ्या कल्पकतेने बनविण्याची मध्ययुगीन पद्धत होती. तटावर जाणाऱ्या पायऱ्यांवरून एकावेळी एकच व्यक्ती वर चढू किंवा उतरू शकते त्यामुळे दोन सैनिकांनी एकमेकांस पाठ दाखविली की दोन्ही बाजूंनी किल्ल्याच्या तटावर चढता किंवा उतरता यावे अशी मध्ययुगीन पद्धत अनेक ठिकाणी निर्माण केली असल्याचे दिसून येते. अशाप्रकारचे पायऱ्यांचे बांधकाम महाराष्ट्रातील बहुतांशी किल्ल्यांवर आढळते. ऊदाहरणार्थ ः अहमदनगर जिल्हयात कोपरगाव तालुक्यात हिंगणी गावात रघुनाथराव पेशवे यांचा गोदावरी तिरावरील वाडा. लोहगड किल्ल्यावरील विंचूकाटा माचीवर तटबंदीच्या वर चढण्यासाठी ठेवबांधलेल्या पायऱ्या. सध्या इंदोरी किल्ल्यात तटावर चढण्यासाठी सुस्थितीतला मार्ग कडजाई मंदीराच्या शेजारच्या तटबंदीस निदर्शनास येतो.

- नगारखान्याची भव्य इमारत ः

इंदोरीचा किल्ला सेनापती राहणारी वास्तु असल्यामुळे भव्य नगारखाना बांधला गेल्याचे आढळते. इंदोरी गावात प्रवेशतांना दुरूनही नगारखाना दिसावा तसेच नगारखाण्यावरून दुरवरचा प्रदेश दृष्टिक्षेपात यावा यासाठी ऐवढी उंची नगारखाण्यास प्रदान केलेली दिसून येते. मुख्य प्रवेशद्वारातून आत उजव्या बाजूस पहारेकऱ्यांची खोली नगारखाण्यास स्पर्शुन बांधलेली दिसून येते. उपलब्ध खोलीत तिन्ही बाजुच्या भिंतींवर दिवा लावण्यासाठी

व्यवस्था केलेली आढळते. प्रत्येक भिंतीत दोन – दोन असे वस्तू ठेवण्यासाठीचे कोनाडे ठेवलेले दिसून येतात. हे कोनाडे **2** × **2** फुट असे मोठया आकाराचे असून प्रवेशणाऱ्या भिंतीला एकही कोनाडा केलेला आढळत नाही. सध्या उपलब्ध खोली पुर्णपणे मोडकळीस आलेली असून या खोलीचे छत खोलीत पडले आहे. येथुन **20** पायऱ्यांनी वर जाण्याचा मार्ग होता. नगारखाण्यात जाण्याआधी मोठा बुरूज लागतो व त्यावरून नगारखाण्यात प्रवेशता येते. नगारखाण्यात प्रवेश करतांना **41** फुट लांब पॅसेजमध्ये जावे लागते. शत्रूसैन्यावर मारा करण्यासाठी योग्य रचना नगारखान्यातून केलेली निदर्शनास येते. नगारखाण्यात प्रवेशण्याआधी **41** फुट लांब पॅसेज ठेवलेला दिसतो. पॅसेजमधून पेटते बाण, जंबुऱ्यांचा व ठासणीच्या बंदुकीतून शिशाच्या गोळयांचा मारा करण्यासाठी एकूण **23** जंग्या निरनिराळया माऱ्याच्या टप्प्यांवर निर्माण केलेल्या आढळून येतात. प्रभावी मारा करण्यासाठी याच पॅसेजमध्ये तीन ठिकाणी **4.3** × **2.3** फुट आकाराच्या खिडक्या समोरच्या बाजूने ठेवलेल्या आढळतात. मारा करण्याच्या सर्व जागा एका मोठया पॅसेजमध्ये असून त्यामागे नगारखाना निर्माण केलेला आढळतो. मारा करण्याच्या सर्व जंग्या, खिडक्या व जागा मुळच्या नगारखाण्यापासून बाहेर एका पॅसेजमध्ये ठेवलेल्या आढळतात. पॅसेजमध्ये उभे राहुन शत्रुसैन्यावर मारा करता येत असून याचे प्रयोजन विसापूर किल्ल्यावरील ईशान्य बुरूजासारखे आढळते. शत्रुसैन्याकडून एखादा तोफगोळा नगारखाण्यावर आदळला तरी मुळ वास्तूला धक्का न लागता ती सुरक्षित राहील व समोरील संरक्षणाची भिंत नव्याने बांधून घेता येईल असे दिसते. मारा करण्यासाठीचा हा पॅसेज प्रवेशद्वाराच्या दोन्ही बुरूजांस समांतर बांधला असून दोन्ही बुरूजांवर जाण्याचा हा एकच मार्ग ठेवलेला आहे. संपुर्णपणे विटांत तयार केलेली नगारखाण्याची वास्तू आतमधील बाजूने चुन्याचा मुलामा देवून अलंकृत केलेली दिसते. चुण्याच्या गिलाव्यात सुंदर नक्षिकाम केलेले आढळते. नगारखाण्यातील छतास सहा ठिकाणी दिव्याची झुंबरे लावण्यासाठी जागा ठेवलेल्या दिसतात. छतास व सभोवतालच्या भिंतींस चुन्याचा मुलामा देवून त्यावर अनेक प्रकारचे नक्षिकाम केलेले आढळते. भिंतींवरील चुन्याच्या मुलाम्यातच मोर व फुलदानी चित्रीत केलेल्या दिसतात. नगारखान्याच्या आतील बाजूस दिवे लावण्यासाठी **19** कोनाडे केलेले दिसतात. नगारखान्यास आतील बाजूने दोन स्तंभ वरच्या छतास आधार देण्यासाठी बांधलेले आढळतात. या स्तंभांची जाडी **2.6** × **2.6** फुट आहे. आयताकार नगारखान्यात सहा दालणे असली तरी दोन स्तंभांनी ती विभागलेली असून याच स्तंभांवर आधारीत आहेत. मुळ नगारखाण्यात प्रवेश करतांना दरवाजाची रचना खाली ऊतरून जावे लागावे अशी केलेली आढळते. नगारखाणा **34.5** ×

21.5 फुट आयताकार आहे. येथून किल्ल्याच्या आत डोकावण्यासाठी तीन खिडक्या ठेवलेल्या आढळतात. या सर्व खिडक्यांस पुर्वी कवाडं होती ती सर्व कालौघात नष्ट झाली. उपलब्ध खिडक्यांमधील मधोमध असलेल्या खिडकीस दोन्ही बाजुंस देव स्थापलेले निदर्शनास येते. या ठिकाणी कोणत्या देवांच्या मुर्ती होत्या याबद्दल माहिती मिळत नाही. परंतु सात रकाणे एकाबाजुस व सात रकाने दुसऱ्या बाजुस आढळतात. एक मुर्ती मध्ये व इतर सहा रकाने त्याभोवती गोलाकार पद्धतीने दिसून येतात. नगारखाण्यात ऊजव्या कोपऱ्यात लहान आकाराची मोरी होती, मोरीतले पाणी बाहेर जाण्यासाठी खापरी नळी लावलेली बाहेरच्या बाजुने दिसून येते. सैन्याला लागणारे पाणी येथेच उपलब्ध व्हावे असा त्यामागे उद्देश होता. तसेच बंदुकांचे व लहान तोफा (जंबुरे) यांचे बार काढल्यानंतर त्या थंड करण्यासाठी त्यावर गोणपाट ओले करून आंथरावे लागत होते त्यासाठी पाण्याची व्यवस्था नगारखाण्याजवळ करणे अपेक्षित होते. म्हणुन येथे मोरी केलेली निदर्शनास येते.

बुरूजावरून नगारखाण्यात प्रवेशतांना उजव्याबाजुस नगारखाण्याच्या वर चढण्यासाठी 9 तिव्र चढणिच्या पाय[illegible] आहेत. येथील पायऱ्यांने नगारखान्यावरील चुनागच्ची केलेल्या आयताकार बुरूजावर जाता येते. या ठिकाणाहून संपुर्ण किल्ला व भोवतीचा परिसर दिसून येतो. याठिकाणाहून संपुर्ण किल्ला दिसतो व किल्ल्याच्या तटबंदीवर लक्ष ठेवता येवू शकते. हा बुरूज इंदोरी किल्ल्याचा माथा आहे. मध्ययुगात नगारखान्याच्या शेजारी दोन्ही बुरूजांवर दोन मोठया आकाराच्या चकीतोफा होत्या. तोफा ज्या खुंटीवर ठेवल्या जायच्या व फिरविल्या जात होत्या त्या खुंटी मोठया आकाराच्या जाडसर आढळतात. तोफा डागण्यासाठी मोठया आकाराच्या खिडक्या येथे ठेवलेल्या आढळतात. माथ्यावरून किल्ल्यामध्ये जंबु[illegible]चा व बंदुकींचा मारा करण्यासाठी अनेक जंग्या ठेवलेल्या दिसतात. या जंग्या बाहेरील बाजूस शत्रूसैन्यावर मारा करावयास असणे संयुक्तीक आहे परंतु किल्ल्याच्या आतमधील बाजूस मारा करण्यासाठी ठेवल्या गेलेल्या या जंग्याचे प्रयोजन शत्रूसैन्याने महाद्वार फोडले आणि शत्रूसैन्य किल्ल्यात प्रवेशले तर त्यांवर याच नगारखाण्याच्या चुनागच्चीहून मागच्या बाजूने मारा करता यावा हे होते. मध्ययुग हे महाराष्ट्रात धामधुमीचे व सततच्या लढाया तसेच मोठी युध्द यांचे गणले जाते. किल्ले हस्तगत करण्यासाठी शत्रुसैन्य निरनिराळया योजना करणे सहाजिकच गोष्ट होती. एखादा प्रदेश जिंकण्यासाठी त्या त्या प्रदेशातील किल्ला हस्तगत करणे आवश्यक असे. त्यामुळे किल्ला शत्रुसैन्याने दगा करून हस्तगत करू नये याकडे किल्लेदाराचे बारिक लक्ष असे. त्यासाठी जागता पहारा ठेवला जात असे. तसेच किल्ला दुर्गम करण्यासाठी इंदोरीच्या किल्ल्यास किल्ल्याच्या आतमधील बाजुने मारा करण्यासाठी जंग्या ठेवलेल्या निदर्शनास

येते. लोहगड किल्ल्याच्या विंचुकाटा माचीवर किल्ल्यातून तोफा डागण्यासाठी खिडक्या केलेल्या तसेच बंदुकींच्या गोळया व बाण मारण्यासाठी जंग्या ठेवलेल्या आहेत. तसेच इंदोरीच्या किल्ल्यास किल्ल्याच्या आतमध्ये शत्रुसैन्य शिरल्यास त्यांच्यावर पाठीमागच्या बाजुने मारा करण्याची व्यवस्था ठेवलेली निदर्शनास येते. मध्ययुगात किल्ला बांधल्या गेला आहे. नगारखाना संपुर्ण विटांत बांधल्या गेला असल्याचे आढळून येते. कालौघात सध्या नगारखाना नाजुक अवस्थेत असून त्यावर मोठया जाडीचे सहा फुट उंचीचे कट्टे बांधले गेले त्यामुळे नगारखाण्यास तडे गेलेले दिसून येतात.

लोखंडी टाक्यांच्या शेजारी लहान आकाराचा एक चौकोनी बुरूज आहे. यास तीन पायऱ्या चढून वर उभे राहता येते. लहान आकारातील बुरूज असूनही यास बंदुकींचा मारा करण्यासाठी तीन जंग्या ठेवलेल्या आढळतात. या बुरूजावरून लांबपर्यंतच्या हलचालींवर लक्ष ठेवता यावे हे प्रयोजन असल्याचे दिसून येते. अनेकविध संरक्षणात्मक व आक्रमण करण्यासाठीच्या योजना इंदोरी किल्ल्यास असलेल्या आढळतात. यावरून किल्ल्यात दाभाडे सेनापतींचा मोठा लष्करी तळ असण्याचा संभव आहे.

- दाभाडे राजघराण्याची खाजगी मालकीची मंदिरे ः

मध्ययुगात इंदोरी किल्ल्यास पुर्व – पश्चिम असे प्रमुख दरवाजे होते उत्तर बाजुचा लहान आकारातील दरवाजाही होता, यातील पुर्वेचा महादरवाजा आणि पश्चिमेचा दिंडी दरवाजा(आकाराने लहान) होता, दिंडी दरवाजाची वाट पायऱ्यांवरून नदीत उतरती होती. साधारण **50 – 55** पायऱ्या याठिकाणी होत्या ज्या कालौघात नष्ट झाल्या. कोटेश्वर महादेव मंदिर सध्याचे कोटेश्वरवाडी असलेल्या ठिकाणी नदिकिनारी दाभाडे राजघराण्याकडून बांधले गेले ते आजही दिसून येते. कोटेश्वर मंदिरात दर्शनासाठी व अडचणीच्या प्रसंगी किल्ल्यातून निसटून जाण्यासाठी राजघराण्यातील व्यक्तींना किल्ल्याच्या मागच्याबाजूस असलेल्या दिंडी दरवाजाचा उपयोग होत होता असे दिसून येते. किल्ल्यातून कोटेश्वर महादेवास जाण्यासाठी होडयाची तरतुद केलेली होती. किल्ल्यातून दिंडी दरवाजामार्गे नदीत जावून होडीने दक्षिणदिशेस अर्धा मैल अंतरावर तीर ओलांडून कोटेश्वर

महादेवाचे मंदीर राजघराण्याकडून बांधण्यात आलेले निदर्सनास येते. कोटेश्वर मंदिरात महाशिवरात्रीला ग्रामस्थांमार्फत मोठा ऊत्सव केला जातो. दाभाडे राजघराण्याच्या खाजगी मंदीरांमध्ये या मंदिराचा समावेश होतो.

दाभाडे राजघराण्याच्या खाजगी मालकीची तळेगाव दाभाडे येथील काही मंदिरे आहे. खंडोबा मंदिर, राम मंदिर, बनेश्वर मंदिर, विठ्ठल मंदिर, तसेच सबंध भारतात फक्त दोनच असलेल्या(एक दिल्ली व एक तळेगाव दाभाडे येथे) पाचपांडव मंदिरातील एक मंदिर तळेगाव दाभाडे मधील चावडी चौक शेजारी आहे. ऐतिहासिक महत्व असलेली ही मंदिरे तळेगावचे वैभव गणली जातात.

तळेगाव दाभाडे येथील लोकश्रध्देनुसार पाच पांडव मंदिर हे पांडवकालीन असून येथे उपलब्ध असणाऱ्या रथाची पोलादी चाके म्हणजेच धावपट्टया पांडवांच्या रथाच्या आहेत तसेच पुर्वी येथे असलेली द्रौपदीची निद्रावस्थेतील मुर्ती झोपेत कुस बदलायची. या लोकश्रध्दा आजही गावात जेष्ट नागरिकांकडून ऐकावयास मिळतात.

घुमटाची विहीर व त्याशेजारील शिवमंदिर हे सरसेनापती खंडेराव दाभाडेंच्या कारकीर्दीत बांधले गेलेले एक सुंदर शिवालय आहे, या प्रकारच्या नक्षीदार बांधकाम शैलीतील मंदीरे, विहीरी व त्यावरील दगडी महीरप दुर्मीळ असून हे ऐतिहासिक महत्वपुर्ण मंदिर तसेच इतर अवशेष तळेगावात बनेश्वर मंदिराच्या मागीलबाजूस निदर्शनास येतात. घुमटाच्या मंदिराच्या शेजारी असलेल्या दोन विहीरी भरपूर खोल असून कातळखोदिव आहेत. कातळा सुरूंगाने फोडूण त्यात नक्षीदार महिरपी बांधून घेतलेल्या दिसून येतात. मानवी श्रमाने मोठा खडक खोदून आतमध्ये जलव्यवस्था निर्माण करण्याचे काम सेनापती खंडेराव दाभाडे यांनी केले. तळेगावात पाण्याची कमतरता भासू नये याकरीता सेनापती खंडेराव दाभाडे यांनी दोन तळी निर्माण केली व चांगल्या शुध्द पाण्यासाठी विहीरींची निर्मीती केली. बनेश्वर मंदिराच्या मागील बाजुस खंडीत झालेली विष्णुमुर्ती **12** व्या शतकातील असल्याचे निदर्शनास आले आहे. तळेगावच्या स्मशान भुमीस जाणाऱ्या मार्गावर उपलब्ध झालेली विष्णुमुर्ती देवगीरी किल्ल्यावर असलेल्या विष्णुमुर्तीशी साधर्म्य दर्शविणारी असून ही येथे कधी व कोणी आणली किंवा घडविली याबद्दल माहिती मिळत नाही. विष्णुमुर्ती भंग झालेली असून अर्ध अवस्थेत राहिलेली आहे. यादव कालखंडातील विष्णुमूर्ती दाभाडे राजघराण्याने तळेगाव दाभाडे येथील खाजगी वाडयात जतन केली आहे. बनेश्वर मंदीरामागील विहीर बेसॉल्टच्या दगडी तोडींत बनविल्या गेली असून अनेक दालनांमध्ये आतमधील बाजुने

रचना केलेली दिसून येते. येथील विहीरी ते घुमट व घुमटाची विहीत अंतर जातांना मध्ये रेल्वे ट्रॅक गेला आहे. मध्ययुगीन घुमट शैली विशेष कलात्मक असून त्या समोर घुमटाची विहीर आहे. येथील विहीरीवर मध्ययुगात मोट बसविली होती जी बैलांच्यायोगे चालवित असत. मोटेचे पाणी सध्या असलेल्या घोरावाडी स्टेशन व बेगडेवाडी स्टेशन या परीघात असलेल्या शेतीस पुरत असे. सध्या दोन्ही विहीरी पाण्याने भरलेल्या असून उन्हाळयातही येथील पाणी आजपर्यंत पातळीने खालावलेले नाही. घुमटाच्या समोरील विहीरीत मधल्या टप्प्यावर शिलालेख कोरलेला असून या शिलालेखास बसविल्यानंतर दगडी छत्र वरच्याबाजूने बांधलेले आढळते. हा शिलालेख सात ओळींचा असून यात "जेष्टी जन्मला खंडेराव रूढ सेनापती नाव शांडील्यपुर्ण वैभव जया कारणे"[40] असा ऊल्लेख आला आहे. या विहीरीच्या मधोमध असलेल्या टप्प्यावर आणिक एक शंकराची पिंडी व लहानगे खोलीवजा मंदिर आहे. या विहीरीशेजारी पुर्वमुखी घुमट हा अप्रतीम कलेचा नमुना आहे. घुमटाशेजारी मध्ययुगीन समाध्यांचे काही अवशेष असून काही समाध्यांवर वृंदावन व पिंडी असल्याचे आढळते.

मध्ययुगीन वास्तुकलेचा घुमट व दर्गा हे महत्वपुर्ण कलाविष्कार आहेत. अर्धकंदुकाकार किंवा पालथ्या कमळाच्या आकाराच्या वास्तूरचनेस 'कुमूद' असे संबोधतात. कुमूद म्हणजेच घुमट होय. भारतामध्ये इसवी सन पूर्व 7 व्या शतकापासून स्तुपासारख्या वास्तुमध्ये घुमटाचा वापर करण्यात आला आहे. घुमटाच्या निर्मितीचे सर्व प्रथम तंत्र रोमन लोकांना अवगत होते. रोमन लोकांकडून ते तंत्र बॅझंटायीन लोकांकडे आले नंतर हे तंत्र इराणी व तुर्की लोकांनी अवगत केले. भारतामध्ये इसवी सन 11 व्या शतकांपर्यंत स्थापत्यकलेमध्ये घुमटाचा फारसा वापर होत नव्हता. भारतात अरब आक्रमकांनी आपणासमवेत घुमट बांधणीचे तंत्रही आणले. मध्ययुगीन मुस्लिम राज्यकर्त्यांनी घुमटांचा वापर मशिदी, दर्गे, मदरसा, धर्मशाळा इत्यादी वास्तूमध्ये केला. भारतातील घुमटांचे बांधकाम दगडांमध्ये केले आहे. भारतातील घुमट वास्तूशैलीवर इराणीशैलीचा प्रभाव आहे.[41] लोहगड किल्ल्यावरील घुमट व तळेगाव दाभाडेतील दाभाडे राजघराण्याच्या खाजगी मालकीत असलेला घुमट एकाच शैलीत आहे.

---

[40] क्षेत्रभेट, तळेगाव दाभाडे, घुमटासमोरील विहीरीत उपलब्ध असलेला सात ओळींचा शिलालेख.

[41] ल.क.गायकवाड, *शिवनेरी किल्ल्याचा इतिहास*, पुष्पनंद प्रकाशन, 2011, पृ.49.

- विहीर व पाण्याची व्यवस्था ः

इंदोरी किल्ल्यात ज्याठिकाणी कडजाईदेवीचे मंदिर आहे त्याच्या डाव्या बाजूस **25** फुट व्यास असलेली विहीर होती. विहीरीत उतरतांना बाजूने व खालून कोणताही आधार नसतांना पायऱ्या गोलाकाररीत्या खाली उतरत जातात अशी रचना कल्पकाने केलेली आढळते. याच बांधणीतली विहीर सातारा येथील रहिमतपुर येथे दिसून येते, अहमदनगर जिल्हयात कोपरगाव तालुक्यात चांदेकसारे या गावी भैरवनाथ मंदिरासामोर दिसून येते. तसेच सातारा ते औंध मार्गावरील साप येथील किल्ल्याच्या विहीरीस आढळते. इंदोरी किल्ल्यातील येथील विहीरीचे पाणी पिण्यासाठी वापरले जायचे. **2010** साली इंदोरी ग्रामस्थांतर्फे कडजाई देवीचे भव्य मंदिर बांधण्यात आले व मोठा उत्सवही चालू करण्यात आला. मंदिर बांधणीवेळी येथील विहीर बुजविण्यात आली.

इंदोरी किल्ल्यावर इतर भुईकोट किल्ल्यांप्रमाणे पाण्याच्या टाक्या व विहीरी आढळलेल्या नाहीत. कारण इंद्रायणीनदीच्या पाण्याची पातळी ऊन्हाळयातही सहसा खालावत नाही. इंद्रायणी नदिच्या तिरावर किल्ला बांधणी केली असल्याने फक्त पिण्याच्या पाण्यासाठीच विहीरीची आवश्यकता होती. त्यामुळे किल्ल्यात पाण्याच्या सोईसाठी फक्त विहीर आढळून येते.

- इंदोरी किल्ल्यातील कडजाई मंदीर ः

कडजाई देवीची मुर्ती इंदोरी किल्ल्यात राजघराण्याकडून बसविली गेली. यशवंतराव दाभाडे यांच्या दुसऱ्या पत्नी सगुणाबाईसाहेब या शितोळे सरकार(पाटस) यांच्या घराण्यातील होत्या. शितोळे सरकारांचे कुलदैवत रोटमल्हार आहे. शितोळे राजघराण्यातील प्रथेप्रमाणे घराण्यात मुलगा जन्मला की रोटमल्हारसमोर मुलाचे जावळ काढतांना मुलासोबत आईचेही संपुर्ण केस काढले जायचे. यशवंतराव दाभाडे यांच्या दुसऱ्या पत्नी सगुणाबाई साहेबांनी इंदोरीच्या किल्ल्यात कडजाई देवीच्या मुर्तीची प्रतिष्ठापणा केल्यानंतर दाभाडे राजघराण्यातील मुलाचे

जावळ काढतांना नारळ फोडून त्या नारळाच्या एका भागात मुलाचे केस ठेवून देवीसमोर ठेवले जातात आजही ही परंपरा शितोळे व दाभाडे या दोन्ही राजघराण्यांमध्ये पाळल्या जातात.[42]

- इंदोरी किल्ल्यापासून चाकणच्या भुईकोट किल्ल्यापर्यंत व तळेगावच्या वाडयातपर्यंत भुयार ः

मध्ययुगातील भुयाराच्या संकल्पनांबद्दल आजच्या काळात बहुतांशी कपोलकल्पीत कल्पना आहेत. किल्ल्यांबाबतही अनेक दंतकथा जोडलेल्या असतात. तसेच नेहमी भुयारे वगैरे अशा संकल्पना बहुतांशी किल्ल्यांबाबत जोडल्या जातात. मध्ययुगात भुयारे ही गोष्ट जास्त लांबपर्यंत कोरणे शक्य नव्हते तसेच भुयारे नदीखालून वगैरे कोरण्याचा कोणताही संभव नाही. आधुनिक युगात ऐतिहासिक स्थळांबाबत कथा जोडून त्यास अद्भुत दाखविण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो असे दिसून येते. परंतु याचा कोणताही पुरावा किंवा दोन किल्ल्यांमधील जोडलेले भुयार अद्याप सर्वेक्षणात सापडलेले नाही. समकाळात कातळकडे कोरून दौलताबाद सारख्या किल्ल्यास भुयारीमार्ग केले गेलेले आढळतात. परंतु ते फक्त कातळकडयापुरते मर्यादीत होते. इंदोरी ते चाकण किंवा इंदोरी ते तळेगावपर्यंत भुयारीमार्ग ही भ्रामक कल्पना असल्याचे प्रस्तुत लेखकाच्या सर्वेक्षणातून समोर आलेले आहे. भुयार व त्यांची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी निवडक भुयारांची तपासणी प्रस्तुत लेखकाद्वारे केली ती नमुद केली आहे त्यामुळे भुयारे व त्याबद्दलच्या अद्भुत जोडल्या गेलेल्या गोष्टींवर प्रकाश टाकता येतो.

- तळेगाव दाभाडे येथील दाभाडे राजघराण्याच्या वाडयातील इंदोरी किल्ल्यास जाणारे भुयार ः

तळेगाव दाभाडे येथील दाभाडे राजघराण्याच्या खाजगी मिळकतीत असलेला वाडा भव्य बांधणीतील असून यातून भुयार इंदोरी किल्ल्यापर्यंत जाते असे प्रचलीत होते. भुयाराचे मुख वाडयात मागीलबाजूने प्रवेशल्यावर डाव्याबाजूस असून त्याची तपासणी केली असता हे भुयार नसून वाडयातून बाहेरच्या बाजूने असणाऱ्या विहीरीत जाण्याचा मार्ग असल्याचे आढळून आले परंतु भुयारांच्या कपोलकल्पीत कथा या वाडयाच्याबाबत जोडल्या गेल्या. भुयार समज झालेला हा मार्ग वाडयाच्या दुरूस्तीमध्ये बुजविला गेला.

---

[42] सं.भा.तापकीर, पुर्वोक्त, पृ.**233**., मुलाखत ः सत्यशिलराजे दाभाडे, स्थळ – पुणे, दिनांक व वेळ ः **11** नोव्हेंबर **2013**.

- इंदोरी किल्ला ते चाकणच्या संग्रामदुर्ग किल्ल्यापर्यंत व तळेगावच्या दाभाडेंच्या वाडयापर्यंतचे भुयार ः

इंदोरीच्या सेनापती दाभाडेंच्या किल्ल्यापासून चाकणच्या संग्रामदुर्ग व तळेगावच्या दाभाडेंच्या वाडयापर्यंत भुयार असल्याची गोष्ट प्रचलीत होती. संपुर्ण इंदोरी किल्ल्यात कोठेही भुयार किंवा त्यासारखे बांधकाम नसून प्रवेशद्वारात डाव्या देवडीतून आतमध्ये एक खोली आहे या खोलीस आणिक एक उपखोली आहे. या उपखोलीसच भुयार समजले जात होते. येथील बांधकामाची आतपर्यंत सर्वेक्षण केल्या नंतर हे भुयार नसून शस्त्रागार असल्याचे आढळले. मात्र इंदोरी किल्ल्याच्या भुयाराबाबत कोणतेही सर्वेक्षण न करता रंजक कथा येथील भुयाराबाबत जोडल्या गेल्याचे दिसून येते.

- इंदोरी किल्ल्यातील विरगळ – समाधी व भग्नावशेष ः

किल्ल्यात अनेक घडीव दगड व दगडी तोडी आढळतात. मध्ययुगात कडजाई मंदीरासमोर लहान आकाराचा वाडा होता तो कालौघात पडला मात्र त्याची जोती शिल्लक राहिलेली आढळतात. वाडयात दिवे लावण्यासाठीचे कोनाडे, वाडयाच्या आतमधील बाजूने चुण्याचा मुलामा केलेल्या अनेक दगडी तोडी येथे आढळून येतात.

देवीच्या मंदिरासमोर **5** फुट उंच दिपस्थंभ किल्ला बांधणीवेळी निर्माण केला होता तो सुस्थितीत दिसून येतो. नक्षीदार अनेक शिल्प मंदीराच्या सभोवती आढळतात. मंदिरासमोर मध्ययुगातील दगडी समाधीशिल्पे झाडाच्या चौथऱ्यास टेकून ठेवलेली आहेत. या समाध्या कुणाच्या आहेत, समाधीशिल्प निर्माण करणारा कोण पाथरवट होता, ज्या सैनिकांच्या समाध्या आहेत त्यांनी कोणता पराक्रम केला असेल, इंदोरी किल्ल्यावर झालेल्या लढाईची नोंद कागदपत्रांत सापडली नसूनही येथे युध्द झाल्याचा व त्या विरांच्या समाध्या विरगळ रूपाने येथे कायम केलेल्या दिसून येतात. विसापूर किल्ल्याच्या पायथ्यास पाटण गावात भैरवनाथ मंदीरासमोर असलेल्या **12** समाध्यांपैकी एका समाधीवर देवनागरी लिपीमध्ये काही मजकूर अंकीत केला आहे परंतु कालौघात तो अस्पष्ट होवून वाचण्या अयोग्य झाला आहे. तशाप्रकारचा कोणताही मजकूर इंदोरी किल्ल्यांतील समाध्यांवर अंकीत

नाही . त्यामुळे येथे असलेल्या समाधी व विरगळ कुणाच्या आहेत व युध्द कधी झाले होते यांबद्दल माहिती मिळत नाही .

कडजाई देवीच्या मंदिरासमोरील औदुंबराच्या झाडाशेजारी तुळशीवृंदावन व यज्ञकुंड असून याशेजारी अनेक समाधी मांडलेल्या आहेत . यातील डाव्या बाजूने समाधीस कमांक देवून त्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे ः

1) कमांक एकची समाधी ही मध्ययुगातील सर्वसाधारण बनावटीची समाधी असून याप्रकारच्या समाधी बनविण्याची पद्धत मध्ययुगात रूढ होती . अशा समाधी महाराष्ट्रात अनेक किल्ला परिघात व ऐतिहासीक गावांत पहावयास मिळतात .

2) कमांक दोनची समाधी कमांक एक सारखीच सर्वसाधारण बनावटीची समाधी असून याप्रकारच्या समाधी विसापूर किल्ला, तुंग किल्ला यांच्या पायथ्यास बहुसंख्येने पहावयास मिळतात .

3) कमांक तीनची समाधी नसून हे दगडी मुख आहे . शिवमंदिराच्या प्रथम प्रवेशद्वारातील उंबर्‍यात असणारे हे मुख असून कदाचीत येथे मध्ययुगात शिवमंदीर असण्याचा संभव आहे .

4) कमांक चारची समाधी नसून हे एक हत्ती शिल्प आहे . गजांतलक्ष्मी पाथरवटाकडून घडवून घेण्याची पद्धत मध्ययुगात रूढ होती . याच प्रकारच्या बनावटीची गजांतलक्ष्मी तळेगाव दाभाडेतील ग्रामदैवत डोळसनाथ महाराजांच्या मंदीरासमोर आजही दिपमाळेमागील बाजूस दिसते . हत्तीची सोंड जमिनीस टेकलेली आहे असे या कमांक चारच्या शिल्पात दर्शविण्यात आलेले आहे .

5) कमांक पाच असलेली समाधी इतर समाधीच्या तुलनेत वेगळी असून उपलब्ध समाधीच्या चारही बाजुंस आठ पाकळया असलेली फुल आहेत . याशिवाय नक्षीदार कोरीवकाम या समाधीवर आढळून येते .

6) कमांक सहाच्या समाधीत दिवा बत्तीची सोय करण्यात आलेली असून वेगळया धाटणीच्या या समाधीची ऊंची इतर समाध्यांपेक्षा उंच आहे .

या समाधी व दगडी अवषेश मध्ययुगातील वैभवशाली इतिहासाची विरांच्या पराकमाची माहिती देत आहेत . या समाधींमागे दोन कडुलिंबाची मोठी झाडं आहेत . या झाडांमागे एक वडाचे झाड असून यास गोलाकार चौथरा

करवून घेतला आहे. या चौथऱ्यावर वडाच्या झाडास टेकवून एक विरगळ ठेवली आहे. या विरगळला असलेल्या पाच रकाण्यांमधील एकच रकाणा शिल्लक दिसतो. गळू हा कानडी शब्द असून त्याचा अर्थ दगड असा होतो. विराचे दगडी स्मारकशिल्प येथे भग्न अवस्थेत आहे. अशी विरशिल्पे मध्ययुगात योध्दयाच्या पराक्रमी बलीदानावरच घडविली जात होती. विरगळांचेही अनेक प्रकार असून साधारणपणे हा दगड तीन फुट ऊंचीचा असतो. याला चार रकाणे असतात. यातील पहिल्या रकाण्यात नवरा बायको दोन बाजूंनी बसलेले दाखवून मध्ये शंकाराची पिंडी दाखवितात. दुसऱ्या रकान्यात तो विर युध्दप्रसंगी कसा लढला त्याच्या हातातील शस्त्र कोणते होते याविषयी कोरीवकाम केलेले असते. तिसऱ्या रकाण्यात बलीदानी पुरूष मृत पावलेला व आडवा मृतदेह त्यात दर्शविला जातो. चौथ्या रकाण्यात तो स्वर्गात गेलेला दाखवून स्वर्गातले दास दासी त्याची सेवा करतांना दर्शविले जाते. याप्रकारचे निरनिराळे विरगळ महाराष्ट्रात आढळतात. बलीदानाच्या प्रकारावर हा अवलंबून असतो. अंकाई किल्ला(मनमाडच्या शेजारी, नाशिक) पायथ्यास असलेले विरगळ हे **6** ते **7** फुट ऊंचीचेही आढळतात. या विरगळात विरपुरूष हा जंगली श्वापदांशी आपली पाळीव जनावरे वाचविण्यासाठी लढलेला दिसतो. जंगली श्वापदांशी लढतांना झालेल्या त्याच्या बलीदानानंतर हा विरगळ तेथे बसविला गेला.[43] ज्या पत्नी पतीच्या चितेवर सती जातात(सहगमन करतात) त्यांच्या पतीप्रेमाच्या आदराचे स्मारक म्हणून सतीशिळा, सतीचे स्मारक, सतीचे वृंदावन या प्रकारचे विरगळ सारखे परंतु रकान्याऐवजी खांद्यापासून हात दाखवून हातात बांगडया दर्शविल्या जातात. महाराष्ट्रात बहुसंख्य व वैविध्यपुर्ण विरगळ - सतीगळ आढळून आले आहेत.

- इंदोरी किल्ल्याची टंकसाळ ः

इंदोरी गाव व परिघातील गावांमध्ये मागील पिढीकडून पुढील पिढीस किल्ल्याच्या बद्दल जी माहिती उपलब्ध झाली आहे त्याप्रमाणे इंदोरी किल्ल्यात नाणे पाडण्याची टंकसाळ होती असे प्रचलीत आहे. "Maratha Mints and coinage" या पुस्तकातून याबद्दल विश्वासार्ह नोंद आली आहे.[44] इंदोरी किल्ल्याच्या टांकसाळी मधून चांदी व तांब या धातुंची नाणी तयार केली जात होती.

---

[43] क्षेत्रभेट ः जि.नाशिक, ता.मनमाड, अंकाई दुर्ग पायथा असलेले अणकाईगाव येथील सर्वदेव मंदीर समोरील **7** फुट ऊंची असलेला विरगळ

[44] के.के.माहेश्वरी, "*Maratha Mints and coinage*", I. I. R. N. S. Nashik publication, पृ.**95**.

- राजाराम महाराजांनी येसाजी दाभाडे यांना इंदोरीगाव वतनात दिले. त्याबद्दलची नोंद पुढीलप्रमाणे ः

इंदोरी गावचा इतिहासात प्रथम उल्लेख उपलब्ध पत्रातून आलेला आढळतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे दुसरे पुत्र राजाराम महाराज यांनी महाराष्ट्रातील युध्दजन्य परिस्थिती कमी व्हावी व औरंगजेब बादशहाचे स्वराज्यावरील लक्ष हटवून तामीळनाडूत जावे यासाठी राजाराम महाराज जिंजीच्या किल्ल्यास जावून राहीले. मराठयांची राजधानी जिंजीला झाल्याने जिंजी किल्ल्यास औरंगजेबाच्या वजीर असदखानाचा मुलगा इतिकादखान उर्फ जुल्फीकारखान याने जिंजीच्या किल्ल्यास वेढा दिला. किल्ल्यास वेढा असतांना छत्रपती राजाराम महाराजांस पुत्र झाला. पुत्रोत्सवार्थ स्वराज्यासाठी प्राणपणाने लढलेल्या दाभाडे घराण्यास(येसजी बिन बजाजी दाभाडे यांस) त्यांनी शक **1618** पौष वदय **11(8** जानेवारी **1697)** रोजी इंदोरी हा गाव ईनाम म्हणून दिला. पत्र पुढीलप्रमाणे ः

श्री

दामोदरा

त्मज नाराय

ण स्यैषा

मुद्रा

अज सुबा राजश्री नारो दामोदर सुबेदार व कारकून संा जुनर ता मोकदमानी मौजे तलेगाव पां चाकण सु ॥ सबा तिसैन अलफ राजश्री- - - - - स्वामीचे आज्ञापत्र छ **12** जिल्हेजीचे पौ जाले तेथे आज्ञा की येसजी बिन बजाजी दाभाडे मोकदम मौजे माार याणी स्वामीस जेष्ठ बहुळ पंचमी भोमवासरी पुत्रोछव जाला ते समई चंजीचे मुकामी बिनति केली की मौजे माार आपला पाटीलकीचा आहे तो ईनाम देविला पाहिजे. त्यावरून मनास आणितायाणी स्वामीसे(वा) बहुत येकनिष्टपणें केली आ(णि पुढे) ही करीतच आहेत. यांचे चालवणें अगत्य बहुत यास्तव मौजे तलेगाव नजिक इंदोरी हा गाव नूतन ईनाम देह **1** येक रास कुलबाब कुलकान हाली पटी व पेस्तर पटी झाड झाडोरा पडिले पान सहित खेरिज हकदार इनामदार करून इनाम दिल्हा असे यांचे स्वाधीन करून यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सुरक्षित चालवणे म्हणून आज्ञा आज्ञेप्रमाणे मौजे माार कुलबाब कुलकानू हाली पटी पेस्तर पटी पडिले पानसहित खाो हकदार इनामदार इनाम दिल्हा आसे यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे नूतन पत्राचा प्रतिवर्षी आक्षेप न करणे तालीक लेहून घेऊन आसल परतोन देणे छ **24** जमादिलाकर मार्तब सूद मोर्तब सूद

ट्ट वार[45]

- छत्रपती शाहू महाराजांनी सेनापती खंडेराव दाभाडे यांस वतनात दिलेले इंदोरीगाव ः

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके **46** विकारी संवछरे आस्विन शुध चतुर्थी भोमवासरे क्षत्रिये कुलावंतस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी मोकदम मौजे इदुरी पाा चाकण यासी आज्ञा केली यैसी जे मौजे मजकूर राजश्री खंडेराव दाभाडे सेनापति यास देखील इनाम आहे त्याप्रमाणे करार आहे तरी तुम्ही राव मशारनिलेस रूजू होऊन गावीचा यैवज पावीत जाणे ट्टजाणिजेट्टलेखनालंकार मर्या देयं रा जते[46]

---

[45] कृ.रा.दाभाडे, *सरसेनापती खंडेराव दाभाडे भाग ः 1*, सरसेनापती उमावाई दाभाडे स्मृती प्रतीष्ठाण प्रकाशीत, पृ. **140-141**.

[46] शं.ना.जोशी, *सेनापती दाभाडे दफ्तर भाग ः 1*, भा.इ.सं.मं.प्रकाशीत, **1951**, पृ. **28-29**.

वरील पत्र **6** ऑक्टोबर **1719** सालचे असून पत्राच्या सुरूवातीला डाव्या बाजूस दोन शिक्के आहेत तसेच प्रधान व प्रतिनीधी ची कोयरी आहे. पत्राच्या शेवटी छत्रपतींची समाप्तिमुद्रा वठविलेली आहे. या पत्रात इंदोरी गावचा उल्लेख 'इदुरी' असा आला आहे. राजाराम महाराजांनी इंदोरी गाव येसाजी दाभाडे यांस वतन म्हणून दिले ते वतन पुढे चालवून शाहू महाराजांनी इंदोरी गाव खंडेराव दाभाडेंस वतन म्हणून दिले. कोल्हापूरकर छत्रपती व सातारकर छत्रपती या ऊभयतांकडून दाभाडे घराण्यास इंदोरी गाव इनामात दिलेले आढळते. राजाराम महाराजांनी इंदोरी गाव वतनात दिल्यानंतर वतनाची कागदे गहाळ झाल्यामुळे पुन्हा शाहूंकडून इंदोरी वतनात मिळेपर्यंत इंदोरी दाभाडे घराण्याकडे राहीलेले नाही असे मुघल दरबारात नियमीत असलेल्या अखबारातमध्ये दिसून येते.

- दाभाडेंच्या हकीगतीमध्ये इंदोरी गावचा आलेले उल्लेख ः

**1812** ते **1819** मध्ये दाभाडे हकीगत लिहीली गेली. यात दाभाडे घराण्याचा इतिहास लिहीलेला आढळतो. हकीगती मध्ये इंदोरी गावचा ऊल्लेख दोन वेळा आला आहे तो पुढीलप्रमाणे -

**1**."संभाजी महाराजांसोबत लढाई होऊन महाराज बादशहाचे हस्तगत जहाले. त्यास बादशहांनी निधान गतीस पावविले. नंतर बादशहा त्यांचे पुत्र शाहू महाराज यांस घेऊन दिल्लीस गेले. लढाईचे पूर्वी श्रीमंत राजाराम महाराज यांचे बरोबर येस पाटील दाभाडे व खंडोजी दाभाडे व शिवाजी दाभाडे देऊन किल्ले पन्हाळे वगैरे येथील बंदोबस्तास पाठविले होते. मागे श्रीमंत राजाराम महाराज किल्ल्यावर होते. त्यांस पट्टाभिषेक जाहाला ते समयी येसाजी दाभाडे यांस श्री.संभाजी महाराज यांनी श्री.राजाराम महाराज यांचे तैनातीस दिल्हे. पेशजीच होते ते श्रीमंत राजाराम महाराज याजपाशी किल्ल्यावर होते. नंतर बादशाहाचा उपद्रव बहुत जाणून श्री.महाराज कबिले सुध्दां चंदीचंदावर कर्नाटक प्रांती गेले. त्यांचे बरोबर येसाजी दाभाडे व खंडोजी दाभाडे व शिवाजी दाभाडे कबिले सुध्दा होते.तेथे चंदीचे मुक्कामी श्री.राजाराम महाराज यांजला पुत्र जाहला. ते समयीं राजशक **23** धातृनामसंवत्सरे सु || सबांतिसैन(व) आल्लफचे साली श्री. महाराज यांनी पुत्रोत्साह जहाला जाणोन कृपा करून व यांची सेवा पाहून मौजे तळेगांव नजीक इंदुरी तालुके चाकण सरकार जुन्नर हा गांव दरोबस्त पुत्रपौत्रादि

वंशपरंपरेने इनाम करून दिल्हा व मौजे ऊरसे तालुके पवनमावळ त्यांचे पत्नीस (दिला) व मौजे धामणे, प्रांत पुणे दरोबस्त पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम करून दिले."[47]

हकीगतीमधील ऊल्लेखाप्रमाणे दाभाडेंच्या पराकमामुळे इंदोरी गाव इनाम दिल्याचे निदर्शनास येते. जिंजी मुक्कामी असतांना छत्रपती राजाराम महाराजांस झालेल्या पुत्रोत्सवा निमीत्त दाभाडेंस इंदोरी पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनामात आले. इंदोरी गाव हे चाकण तालुक्यात येत होते. तालुके चाकण उल्लेख आल्यामुळे मध्ययुगात चाकणच्या संग्रामदुर्ग किल्ल्यास विशेष महत्व असल्याचे दिसून येते. सध्या चाकणच्या किल्ल्याची मोठया प्रमाणात दुरावस्ता झालेली आढळते. संग्रामदुर्ग किल्ल्याच्या परीघात व किल्ल्याच्या आतमध्ये तसेच तटबंदीवर अतीकमणे झालेली निदर्शनास येत आहेत. किल्ल्याचे खंदक भरून तेथे वसाहत केल्याचे दिसून येते. दाभाडेंच्या हकीगतीमधील उल्लेखाप्रमाणे दाभाडेंच्या विशेष पराकमावर आनंदी होवून त्यांच्या पत्नीसही तालुके पवनमावळ मधील मौजे ऊरसे हे गाव दिलेले आढळते आहे.

**2**."श्रीमंत कैलासवासी राजाराम महाराज यांनी कृपा करून सरपाटीलकीची सनद करून दिल्ही होती ती, श्रीमंत कैलासवासी राजाराम महाराज चंदी कडेस गेले तेथे मोगलांचा वेढा महाराजांचे फौजेस येऊन पडला ते वेळेस सनदा त्या गडबडीत गैरविल्हेस जाहल्या. त्यास स्वामींनी कृपा करून नूतन सनदा करून दिल्या पाहिजेत." यापमाणे विनंती खंडेराव दाभाडे यांणी श्रीमंत शाहूमहाराजांस केली. त्याजवरून महाराजांनी ते वेळेस यांजकडे वतन बाब होती त्या महालाचे कमावीसदारास ताकीदपत्र दिल्हें व पुढें राजशक **46** चे सालीं कसबे इंदुरी ताो चाकण सरकार जुन्नर हा गाव पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने दरोबस्त इनाम करून दिल्हा व चंदीचे मुक्कामी दंग्यांत सनद सरपाटिलकीची गैरविल्हेस जाहली होती ती नूतन करून दिल्ही.[48]

हकीगतीमधील उल्लेखाप्रमाणे सनदा हरविल्याने नविन करून दिल्याचे दिसून येते. मध्ययुगातील मोडी लिपीतील बहुतांशी कागदपत्रांमध्ये सनदा नुतन करून दिल्याचे दिसते. मध्ययुगात अनेकदा सनदांची कागदे गहाळ होत असल्याने वारंवार नविन सनदा तयार केल्या गेल्याचे आढळते आहे. इंदोरी गावाचे नाव इंदुरी व इंदोरी असे आलेले दिसते. ग्रामपंचायतमध्ये असलेल्या कागदपत्रात इंदोरी हे नाव रूढ झाले आहे.

---

[47] कृ.रा.दाभाडे, *पूर्वोक्त*, पृ.**85**.

[48] तत्रैव, पृ.**92**.

- मुघल दरबारात नियमित लिहिल्या जाणाऱ्या अखबारात 'अखबारात - ए - दरबारी मुअल्ला' मध्ये इंदोरीचा ऊल्लेख ः

**31** ऑक्टोबर **1703** रोजी लिहीलेल्या अखबारातमधील ऊल्लेख ः "चाकणचा किल्लेदार व फौजदार अमानुल्लाहखान याने अर्ज करून पुढीलप्रमाणे विनंती केली की, **1)** अमनगड येथील अधिकारी तुकोजी (तिकोन्याचा माजी किल्लेदार) याला मनसब मिळावी." विनंती मान्य करण्यात आली. त्याला **500** जात व **200** स्वार अशी मनसब देण्यात आली. तळगाव (तळेगाव) व इंदुरी येथील त्याची वतने होती, ती त्याच्या जहागिरीत देण्यात आली. त्यासाठी तेथील पूर्वीचा जहागीरदार श्रीपत याला बदलण्यात आले.[49]

वरील अखबारात इंदोरी गावचा ऊल्लेख येत असून गावात गढी किंवा छोटेखानी किल्ल्याचा निसटता ऊल्लेखही **1703** मध्ये येत नाही म्हणुन इंदोरीचा किल्ला खंडेराव दाभाडे यांनी बांधण्याआधी इंदोरी गावात छोटीशी गढीही नसावी असे आढळते. परंतु मध्ययुगात इंदोरीगावात मानवीवस्ती बहुसंख्येने असल्याचा संदर्भ इंदोरी गावच्या हनुमान मंदीरासमोरील मध्ययुगीन समाध्यांवरून तसेच आणि एक उल्लेखानुसार **1881** साली इंदोरी गावची लोकसंख्या **990** होती हे आढळून येते.[50]

तिकोण्याचा किल्लेदार तुकोजी व इंदोरीचा जहागीरदार श्रीपत हे कोण होते याची उकल होत नाही. हे दोघेही मराठी असल्याचे त्यांच्या नावावरून स्पष्ट होते परंतु यांची आडनावे काय होती तसेच या दोघांच्या बद्दल किमान माहिती उपलब्ध होत नाही.

इंदोरीगाव **8** जानेवारी **1698** ला येसाजी दाभाडेंस राजाराम महाराजांकडून वतन दिले होते. येथील जहागीरी **1703** मध्ये बादशहाने श्रीपत नामक व्यक्तीकडून काढून तुकोजीस कशी दिली? दाभाडेंना असलेली जहागीरी दाभाडेंकडून श्रीपतला कोणी व कधी दिली? श्रीपत कोण होता त्याचे आडनाव माहीत नसून दाभाडे

---

[49] महेश तेंडुलकर, पुर्वोक्त, पृ. **69-70**.

[50] Gazetteer of the Bombay Presidency, Poona, Vomume XVIII, part III, P.132.

राजघराण्याच्या वंशावळीत श्रीपत नामक कुणीच व्यक्ती नाही. ही माहिती उपलब्ध होत नाही. शिवकालखंडापुर्वी शाही बदलली तरीही वतनदार तेच असत म्हणून वतनदार हा स्वतःचे सैन्य बाळगुन गढया उभारून राहत असत व प्रबळ होत असत. परंतु औरंगजेबाच्या महाराष्ट्र स्वारीत हे समीकरण बदललेले दिसून येते. त्यामुळेच मराठा राज्याच्या छत्रपती राजाराम महाराजांनी दाभाडेंना दिलेले वतन हे औरंगजेबाकडून तुकोजी नामक तिकोण्याच्या किल्लेदारास देण्यात आले परंतु हे वतन श्रीपतकडून काढून तुकोजीस दिलेले असल्याने दरम्यानच्या काळात इंदोरीचे वतन दाभाडेंकडे नव्हते असे निदर्शनास येते.

तुकोजीस इंदोरी वतनात मिळाली कारण मराठी राज्याच्या विरोधात जावून त्याने मराठयांकडे असलेला तिकोणा किल्ला मुघलांस दिला. तुकोजीसाठी अमानुल्लहाखानाने बादशहास अर्ज करून त्यास मनसब मिळून दिली. तिकोणा किल्ल्याच्या संबंधीत आलेल्या अखबारातील ऊल्लेखावरून हे दिसून येते. मराठा राज्यात औरंगजेब बादशहा किल्ले हस्तगत करत असतांना अनेक मराठी घराणी मुघलांच्या बाजूने लढत होती. तसेच अनेक मराठी राज्याचे किल्लेदार मोबदला घेवून किल्ले मुघलांस देत होते. त्यातीलच एक तिकोणा किल्ल्याचा किल्लेदार तुकोजी असल्याचे स्पष्ट होते आहे. या सर्व बाबींच्या केंद्रस्थानी संपत्ती लालसा असल्याचे दिसून येते.

- मध्ययुगीन पत्रव्यवहारातील इंदोरीचे महत्वपुर्ण ऊल्लेख ः

**1.** पत्रव्यवहारातून इंदोरीचा महत्वपुर्ण इतिहास समोर येतो. **28/01/1751** रोजी आंताजी विश्वंभर याने पेशव्यास पाठविलेल्या पत्रात गोसावी(मध्ययुगातील पत्रव्यवहारात मोठया बंधुस किंवा आदर देण्यासाठी गोसावी असे लिहीले जायचे मात्र इथे ते अभिप्रेत नसून या व्यक्तीचे नाव गोसावी आहे) नामक व्यक्तीकडून घोडी घेतल्याचे लक्षात येते आणि त्या घोडयांतील ऊत्तम - मध्यम - कनिष्ठ असे त्याचे वर्गिकरण केले असून काही घोडी दिमतीस होती ती इंदुरीस नेली असे लेखन केलेले आहे. (हे पत्र अपुर्ण आहे)[51]

---

[51] *पेशवे आणि दाभाडे*, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई, **1931**, पृ. **92-93**.

ही घोडी घेवून त्याचे वर्गीकरण करून ती दाभाडे घराण्याकडे इंदोरीच्या किल्ल्यात ठेवली असल्याचे पत्र तळेगावहून आंताजी विश्वंभरने पेशवेंस पाठविले. सेनापती दाभाडें घराण्याच्या सर्व बारीक हालचाली पेशवेंना(नानासाहेब व भाऊसाहेब) पत्राद्वारे कळत होत्या असे दिसून येते. इंदोरीच्या किल्ल्यामध्ये मोठया प्रमाणात घोडपागा असल्याचे यातुन आढळते.

**2**. आंताजी विश्वंभर याने मे **1751** साली पेशवेंस(नानासाहेब व भाऊसाहेब) पाठविलेल्या पत्रात "आंबीकाबाई, ताकपीर काही तलेगावास आली नाहीत. मातुश्री जाणार इंदुरीस आहेत. त्याहीवर विचार कळेना" असे लिहून पाठविले आहे.[52]

दाभाडेंच्या सर्व बारीक हालचाली पेशवेंस कळविल्या जात होत्या. दाभाडे घराण्यावरील बहुतांशी कागदपत्रे प्रसिध्द आहेत. यात पत्रव्यवहार, हकीकती व इतर समकालीन व्यक्तींनी लिहीलेल्या बातम्या ऊपलब्ध आहेत, परंतु इंदोरी किल्ल्याबद्दल फारच अल्प कागदपत्र असल्याने संशोधनावर बंधने येतात. दाभाडे राजघराण्याविषयी 'तळेगावकर सेनापती' असे बिरूद समकालीनांनी लावलेले दिसते. मराठेशाहीमध्ये लेखनाची पद्धत कमी प्रमाणात असल्याने कित्येक किल्ल्यांच्या किमान नोंदीही ऊपलब्ध होत नाहीत. इंदोरी किल्ला मध्ययुगीन मराठेशाहीचा वारसा असलेल्या महत्वाच्या किल्ल्यांमधील असून याविषयीची माहिती कागदोपत्री अपूरी असली तरी हा बलाढय किल्ला इतिहास सर्वेक्षणास प्राथमिक साधनात गणला जातो.

[52] तत्रैव, पृ. **93-94**.

# प्रकरण सहावे

## निष्कर्ष

मावळ तालुक्यातील किल्ले व त्यांचे प्राचिनत्व तपासतांना मावळ प्रांताचा इतिहास इसवीसन पुर्व पर्यंत मागे जात असल्याचे येथील शिलालेख व लेणी यांवरून आढळून आले आहे. भारतात बेसॉल्ट या दगडास सर्वा धीक कठीण दगड म्हणून ओळखले जाते. सवंध भारतात इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधीक म्हणजेच 78% लेणी आढळून आल्या आहेत. एवढया मोठया प्रमाणावर लेणी खोदण्यामागे महाराष्ट्रातील कठीण दगड व भौगोलिक परिस्थिती कारणीभूत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राचे ढोबळ मानाने देश व कोकण असे दाने भाग आहेत. कोकणातून देशावर येणारे मार्ग घाटांद्वारे येत असल्याने त्यांस घाटवाटा असे संबोधले जाते. व्यापारी व देश पर्यटन तसेच धर्म प्रसार यांसारख्या कारणांसाठी तळ कोकणातून घाटवाटांद्वारे देशावर येणाऱ्या लोकांच्या मुक्कामाची सोय म्हणून घाटवाटांवर लेणी कोरण्याची पद्धत पडली असावी असे दिसून येते. तसेच येणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी वैविध्यपुर्ण लेणी मोठया प्रमाणात निर्माण केली गेलेली निदर्शनास येते.

प्राचीन काळापासून मुंबई बाजुची अनेक बंदरे व्यापारी बंदरे म्हणून प्रसिद्ध होती. येथून येणारे व्यापारी देशावर येतांना घाटवाटांच्या मार्गे येत होते. यात लोहगड किल्ल्याजवळ बोरघाट व कुरवंडयाचा घाट होता. तसेच बोरघाट, नाणेघाट, कुरवंडयाचा घाट, सवास्नीचा घाट, तैलबैलाचा घाट, गाढवलोटीचा घाट, आंबेनळीचा घाट यांसारखे घाट होते. येथील घाटांत माथ्यावरील उंच पर्वतांच्या कातळयात प्राचीन कालखंडात अनेक टप्प्यांत लेणी खोदली गेलेली दिसून येते. नंतरच्या काळात स्थानिक राजसत्तांकडून येथील घाटवाटांवर व उपलब्ध लेणींच्या पर्वतांवर किल्ले वसविले गेल्याचे निदर्शनास येते. किल्ले वसविण्याचे कारण फक्त घाटवाटांतून व्यापाऱ्यांकडून महसूल वसूल करणे हे नसून आक्रमकांना घाटवाटांमार्गे रोखणे हे एक होते. आक्रमकांना मोक्याच्या जागी रोखण्यासाठी प्रत्येक घाटाच्या परिसरात उंच गिरिदुर्गांची केलेली बांधणी ही तत्कालीन राज्यकर्ते व त्यांचे कुशल कारागीर यांच्या दुरदृष्टिपणाची साक्ष देते. कसूर घाटावर भिवगड आणि ढाकगड, पिंपरी घाटावर सुधागड, कावळया घाटावर मानगड, शेवत्या घाटावर लिंगाणा व रायगड, कामथा घाटावर कांगोरी, आंबानळीच्या घाटावर रसाळगड, कुंभार्ली घाटावर जंगली जयगड, माला घाटावर भवानगड, कुंडी घाटावर मैमतगड, विशाळगड घाटावर विशाळगड व माचळ, रडतोंडी घाटावर प्रतापगड अशी घाटांच्या

रक्षणार्थ किल्ल्यांची योजना करण्यात आली.[1] त्याचप्रकारे बोरघाटाच्या मुखाशी लोहगड व विसापूर या किल्ल्यांची निर्मिती केली गेलेली आढळते.[2] घाटमाथ्यावर निर्माण केल्या गेलेल्या अनेक किल्ल्यांमुळे स्थानिक राजसत्तांची महसुल यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असल्याचे दिसून येते. तसेच आक्रमकांना रोखण्यात यश येण्यामागे किल्ले हे प्रमुख कारण असल्याचे दिसून येते. यामुळे महाराष्ट्रातील इतर मोकळया प्रदेशात तुरळक किल्ले दिसून येत असून घाटमाथ्यावर किंवा घाटांच्या जवळच्या प्रदेशात किल्ल्यांची निर्मीती मोठया प्रमाणावर दिसून येते.

मावळ तालुक्यातील इंदोरीचा भुईकोट किल्ला वगळता इतर किल्ले प्राचीन कालखंडातील असून मध्ययुग तसेच अर्वाचीन युगापर्यंत किल्ल्यांचे महत्व कायम असल्याचे आढळून आले आहे. प्राचीन कालखंडात मावळ तालुक्यात बहुतांशी पर्वतांना पोढी, विहार, शिलालेख, स्तुप निर्माण केले गेलेले निदर्शनास येते. सातवाहन राजवंशास 'आंद्रासातवाहन' ही उपाधी होती. काही इतिहासकारांच्या मते सातवाहन राजवंश मावळ तालुक्यातील आंदर मावळ विभागातील होता. म्हणुन सातवाहनांस 'आंद्रा' ही उपाधी होती. विसापूर किल्ल्याच्या शिलालेखात 'सातवाहन राजा वासिष्ठीपुत्र पुळुमावि याच्या कारकीर्दीतील पंचविसाव्या वर्षी' असा उल्लेख असून पुळुमावीच्या महारथी 'विण्हुदत्तचा' उल्लेख आला आहे. 'मुगुदपालित' या लेखकाचाही उल्लेख येथील शिलालेखांतून मिळतो. मावळ तालुक्यात प्राचिन काळात सातवाहनांच्या प्रोत्साहनामुळे अनेक पर्वतांस लेणी खोदलेल्या दिसून येतात. पोढींवर लहान आकारातील लिंगविरहीत शाळुंखा कोरण्याची पद्धत प्राचीन काळापासून सुरू झाली असण्याचा संभव आहे. मावळ तालुक्यातील प्राचीन पोढींवर लिंगविरहीत लहान आकाराच्या शाळुंखा निदर्शनास आल्या आहेत. तसेच नाणेघाटाच्या जवळील अनेक प्राचीन पोढींवर लहान आकाराच्या लिंगविरहीत शाळुंखा दिसून येतात. मावळ तालुक्यातील सर्वच पोढींवर व प्राचीन टाक्यांवर शाळुंखा कोरलेली दिसून येते. तसेच महाराष्ट्रातील बहुतांशी किल्ल्यांच्या टाक्यांवर व प्राचीन काळातील बौध्दभिक्षूंसाठी व व्यापाऱ्यांसाठी खोदलेल्या पोढींवर या लिंगविरहीत शिवपींडी दिसून येतात. यांचे कोरीव काम ओबड धोबड असल्याने येथील पिंडी कौशल्य नसलेल्या व्यक्तींकडून कोरलेल्या दिसून येतात. शैव समाजाच्या प्रगतीच्या

---

[1] महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, मध्ययुगीन कालखंड, **2014**, पृ. **516.**

[2] मराठी विश्वकोश खंड **15**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, **1977**, पृ. **837**.

काळात पाण्याच्या टाक्यांजवळ अशा पिंडी कोरलेल्या आढळतात. पोढी खोदतांना किंवा स्तंभी टाके खोदतांना या पिंडींचे कोरण्याचे काम झालेले नसल्याचे दिसून येते. हे नंतरच्या काळात ओबडधोबड पिंडींचे कोरीव काम केलेले आढळून येते. शंकराचा भक्त म्हणजे शैवपंथी लोक अनेक जाती धर्मात होते. त्यातील गुराखी, धनगर, सैनीक यांतही शैवपंथी लोक होते. त्यांनीही पाण्याच्या ठिकाणी पिंडी कोरण्याचे काम केलेले असण्याचा संभव आहे. बौध्दभिक्षूंच्या नंतर शैवपंथात मोठया प्रमाणात वाढ झाली. यातून शैवपंथ प्रगतीच्या मार्गावर असतांना अनेक ठिकाणी पिंडींचे निर्माण केले गेलेले आढळून आले आहे. दरम्यानच्या काळात शैवपंथीयांकडून बहुतांशी पोढी व प्राचीन काळातील किल्ल्यांच्या पाण्याच्या टाक्यांवर अशा स्वरूपाच्या शाळुंखा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कोरल्या गेलेल्या दिसून येतात. मावळ तालुक्याच्या बाबत लोहगड किल्ल्याच्या पुर्वाभिमुख कातळयात असलेल्या लेणीतील उत्तर बाजुच्या शेवटच्या स्तंभी टाक्यावर शाळुंखा कोरल्या गेलेली आढळून येते. तसेच तुंग किल्ल्याच्या माथ्यावरील पोढीवर डाव्याबाजूच्या कातळयास शाळुंखा कोरलेली निदर्शनास आली आहे. नवलाखऊंब्रे गावच्या मागे नवलाख्या डोंगर आहे. या डोंगराच्या पायथ्याशी नवलाखउंब्रेच्या विरूद्ध बाजूस असलेल्या करंजविहीरगाव येथील माथ्याच्या डोंगरास चक्रेश्वर देवस्थान पर्वताच्या कातळयात कोरलेले आहे. यात मोठया पिंडीशेजारी अशीच लिंगविरहीत लहान आकाराची शाळुंखा कोरलेली आढळते. महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांवरील प्राचीन टाके किंवा लहान आकारातील पोढी यांच्या कातळयास अशा लहान आकारातील शाळुंखा आढळून येतात. ऊदाहरणार्थ ः भोरगीरीचा किल्ला, ता.खेड, जि.पुणे. सारांश पोढींची निर्मीती करतांना बौध्द भिक्षूंच्या तसेच व्यापाऱ्यांच्या पाण्याची सोय करणे हा एकमेव उद्देश होता. तसेच मध्ययुगात सैन्याच्या पाण्याची व्यवस्था करणे हा स्तंभी टाक्या कोरण्यामागे उद्देश होता. मात्र नंतरच्या काळात शैवपंथाचे वर्चस्व निर्माण झाल्यानंतर सांप्रदायीकतेचे वर्चस्व दर्शविण्यासाठी अनेक ठिकाणी अशा स्वरूपाची अतिक्रमणे केलेली दिसून येतात. उदाहरणार्थ ः मावळ तालुक्यातील घोरावडेश्वर म्हणजेच शेलारवाडीची लेणी याठिकाणी स्तुप व चैत्यगृह होते. मात्र शैवपंथाच्या वर्चस्वाच्या काळात येथे स्तुप फोडून शिवपिंडी बसविल्या गेलेली निदर्शनास येते. तसेच पोढी व मध्ययुगापर्यंत निर्माण केल्या गेलेल्या पाण्याच्या टाक्यांवरही लिंगविरहीत शिवपिंडी या वर्चस्व सिध्द करण्याच्या म्हणजेच पंथाच्या अतिक्रमणाच्या मानसिकतेतून कोरल्या गेलेल्या दिसून येतात.

लेणी निर्माण करणे ही एक खर्चीक बाब असल्याचे दरम्यानच्या काळातील शिलालेखांवरून आढळून येते. म्हणजेच लेणी खोदण्यास लागणारा खर्च प्रोत्साहनपर स्वरूपात व्यापारी वर्ग व स्थानिक राजसत्ता देत होत्या असे शिलालेखांतून आढळते. यात शेतकरी, माळी, सोनार, कापडविकेता अशा व्यापारी वर्गाकडून तसेच त्यांच्या संघाकडून दाने मिळाल्याने येथे विहार, स्तुप, पोढी यांचे काम केल्याचे शिलालेखात नमूद केलेले दिसून येते.

घाटवाटांच्या उंच पर्वतांवर प्राचीन ते मध्ययुगापर्यत स्थानिक राजसत्तांकडून किल्ले वसविले गेले. मध्ययुगातील बहमनी राज्याच्या विघटनानंतर निर्माण झालेल्या पाच शाहयांत सत्ता संघर्ष निर्माण झाला. दरम्यानच्या काळात सत्तांचे समिकरण 'ज्याचे किल्ले त्याचे राज्य' असे निर्माण झालेले दिसून येते. याच काळात किल्ले हस्तगत करण्यासाठी सातत्याने राजसत्तांमध्ये लढाया होत होत्या. 'किल्ला हातचा गेला की भोवतीचा प्रदेशही गेला व या देशात किल्ले होते म्हणुन औरंगजेबाच्या दक्षिण मोहीमेनंतर अवशिष्ट तरी राज्य राहीले' असे रामचंद्रपंतांनी आज्ञापत्र या ग्रंथात लिहिले आहे.[3] यावरून मध्ययुगात किल्ल्यांचे महत्व प्राचिन काळापेक्षा जास्त निर्माण झाले असल्याचे निदर्शनास येते. यामुळे घाटवाटांवरील किल्ले हस्तगत करण्यासाठी राजसत्तांमध्ये अनेकदा युदधे होत असत. तसेच नव्याने उंच पर्वतांवर किल्ले बांधण्यासाठी राजसत्ता कायम अग्रेसर असल्याचे दरम्यानचे चित्रण दिसून येते. लोहगड व विसापूर हे किल्ले हस्तगत करण्यासाठी स्थानिक राजसत्तांमध्ये कायम संघर्ष झालेला निदर्शनास येतो. उपलब्ध किल्ले हस्तगत करणे किंवा नव्याने गिरिदुर्ग वसविणे हे मध्ययुगीन राजसत्तांचे प्रमुख कार्य झालेले दिसून येते. दरम्यानच्या काळात किल्ले हे संवेदनशिल क्षेत्र असल्याचे दिसून येते. कारण लोहगड किल्ल्याच्या परिघात मराठयांचे सैन्य फिरकले तरीही याची खबर औरंगजेबाला पत्राद्वारे अमानुल्लाह खानाने कळविली होती. यावरून या किल्ल्यांच्या परिघात होणाऱ्या शत्रूसैन्याच्या हालचालींनाही ज्या राजवटीकडे किल्ले आहेत त्या मोठे महत्व देत होत्या. यावरून लोहगड किल्ल्याच्या संवेदनशिलतेची माहिती मिळते. तसेच किल्ल्याच्या भोवती जमाव जमविला म्हणून स्थानिक राजसत्तेकडून अटकेत जमाव जमविणाऱ्यास अटकेत घातलेले पेशवे काळात दिसून येते. लोहगड किल्ल्यास माळा लावल्या परंतु त्या कापून किल्ला वाचविला

---

[3] रामचंद्रपंत अमात्य, *आज्ञापत्र*, मुळ मोडी प्रत ऊपलब्ध - राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, पृ. **23**.

म्हणुन पावसाळयाच्या दिवसांत सैन्याची अधिक मदत मागणारा किल्लेदारही मुघल राजसत्तेकडून दिसून येतो. यावरून किल्ले हे संवेदनशिल ठिकाणं असल्याचे मध्ययुगात दिसून येते.

मावळ तालुक्यातील किल्ले लष्करी उपयोगासाठी बांधण्यात आले असले तरीही तत्कालीन शांतता व सुव्यवस्था टिकविण्याचे कार्य या किल्ल्यांमार्फत होत असल्याचे दिसून येते. प्राचीन कालखंडात पर्वतांवर किल्ला म्हणुन जास्त संख्येने लष्कर राहत नव्हते. परंतु सैनिकांना राहण्यासाठी कातळयात खोल्या व पाण्याच्या सोयीसाठी स्तंभी टाक्या व लहान आकारातील पोढी खोदलेल्या होत्या. मध्ययुगात येथील खोल्यांचा वापर सैनिकांस राहण्यासाठी व धान्य साठविण्यासाठी केला असल्याचे दिसून येते. पाण्यासाठी मोठया आकाराच्या स्तंभी टाक्यांची निर्मिती मध्ययुगात अनेक किल्ल्यांवर करण्यात आली तसेच संपुर्ण पर्वत तटबंदीने अच्छादित करून किल्ला पुर्णपणे बंदिस्त करण्याची पद्धतही मध्ययुगात निर्माण केलेली आढळून येते. मध्ययुगात किल्ल्यांमध्ये मोठया संख्येने सैन्य राहत असल्यामुळे त्यांना राहण्यासाठी खोल्या, पाण्याच्या सोयी, दारूगोळा कोठार, कचेऱ्या, प्रवेशद्वारे व तत्सम लष्करी रचनांची निर्मीती मध्ययुगात केलेली दिसून येते.

मावळ तालुक्यात प्राचीन व मध्ययुग दोन्ही काळात किल्ल्यांची बांधणी झालेली आढळते. किल्ल्यांची मोठया प्रमाणावर बांधणी होण्यास मावळ तालुक्याची भौगोलिक परिस्थिती कारणीभूत होती. व्यापारी मार्ग तसेच घाटवाटा लोहगड व विसापूर किल्ल्यांच्या जवळून तळकोकणातून देशावर येत होत्या. यात उंबरखंडाची वाट, बोरघाट, तैलबैलाची वाट यांसारखे घाट असल्याने या घाटवाटांवर संपत्ती संरक्षण व टेहळणी तसेच आक्रमकांना रोखण्यासाठी किल्ले निर्माण करणे आवश्यक होते. यांतून मोठया पर्वतरांगा व विस्तीर्ण माथा लाभलेले नैसर्गिक उंचवटयाचे पर्वत किल्ले बनविण्यास अनुकुल आढळल्याने प्रस्तुत किल्ल्यांची निर्मिती प्राचीन काळात झालेली आढळते. निर्मीतीची रचना कायम एकच राहिलेली नसून प्राचीन काळापासून मध्ययुगापर्यंत किल्ल्यांच्या संरचनेत अनेकदा बदल झालेले दिसून येतात.

मावळ तालुक्याच्या इतिहासात किल्ल्यांचे स्थान युध्दात महत्वपुर्ण होते त्याचप्रकारे स्थानिक शांतता टिकविण्यासाठीही आवश्यक असल्याचे आढळून येते. स्थानिक बंडखोरी किंवा परकीय आक्रमण आल्यानंतर मुलखात शांतता प्रस्थापित करण्यासाठी किल्ले आवश्यक गोष्ट होती. स्थानिक राजसत्ता शेती, पशुपालन, व्यापार यांसारख्या गोष्टिंमधून महसुल वसुली करीत असत. यांसारख्या गोष्टींना राज्यात बळ धरण्यासाठी

शांतता ही महत्वपुर्ण बाब होती. शांततेविना व्यापार व शेती होणे कठीण होते. त्यासाठी राज्यात किल्ल्यांचा उपयोग शांतता प्रस्थापित करण्यासाठी केला गेला असल्याचे दिसून येते. शांततेसाठी हडप्पाच्या नागरीकरणा भोवती तटबंदी उभारली गेली. या तटबंदीचा उद्देशही शांतता प्रस्थापित करणे हाच होता. तसेच भारत हा खेडयांचा देश असल्याची एक ओळख भारताची आहे. बहुतांशी गावांना 'कुस' घालण्याची पद्धत होती. आजही अनेक गावे व शहरांभोवती दगडी कुस दिसून येते. त्याचा उद्देश गावात शांतता प्रस्थापित करणे हा होता. हडप्पा किल्ल्याच्या तटबंदीवरून शांतता टिकविण्यात किल्ल्यांचे असलेले योगदान निदर्शनास येते. प्राचिन कालखंडात कौटिल्याने राजसत्तेचे नियम व कायदे यांविषयी अर्थशास्त्रात सविस्तर लिहिलेले असून सर्वांनी कायद्याचा सन्मान करून वर्तन केले पाहिजे असा आग्रह लेखनातून दिसून येतो. त्यात राजाची कर्तव्य व त्याने निवास करण्याची ठिकाणे ही दुर्गम असावित असे लिहीले आहे. कठोर कायदे व कायद्याचे पालन करण्यासाठी निर्माण केलेली नियमावली व कायद्याचे उल्लंघन केले की ठरवून दिलेला दंड या सर्व बाबी शांतता प्रस्थापीत झाल्यानंतर घडून आलेल्या आढळतात. शांतता प्रस्थापित करण्यासाठी किल्ले आवश्यक असल्याचे दिसून येते. मध्ययुगात मुघलांच्या प्रभावाखाली संपुर्ण भारत असतांना शिवाजी महाराजांनी मराठी राज्याची स्थापना केली व धामधुमीच्या काळात अनेक किल्ले हस्तगत केले तसेच काही नव्याने बांधून काढले. या सर्व गोष्टींच्या पार्श्व भुमीला रयतेस शांतता व सुबत्ता देणे हा उद्देश होता. सारांश मध्ययुगात किल्ल्यांच्या योगे युध्द लढली जात होती तसेच किल्ल्यांच्या योगे मुलखावर शांतता प्रस्थापित करण्याचे काम योग्यरित्या होत होते. म्हणून भारतीय इतिहासात किल्ल्यांचे स्थान युध्दात व शांततेत दोन्ही ठिकाणी महत्वपुर्ण होते असे निदर्शनास येते.

मावळ तालुक्यातील किल्ल्यांना सामरिक महत्व होतेच, पण त्याचबरोबर ते तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनाच्या माहितीची साधने म्हणूनही महत्वाचे ठरले आहेत. किल्ल्यांच्या परिघातील गावे व वाडया वस्त्यांमध्ये सांस्कृतीक विकास झालेला दिसून येतो. गावांतील जत्रा व उत्सव मोठया स्वरूपात भरविले जात होते. तसेच मनोरंजनाचे खेळ व गायन, वादन, भारूड, भजने, तमाशे यांसारख्या लोककलांची संस्कृती मोठया प्रमाणावर आढळून आली आहे. किल्ल्यांचा सांस्कृतीक जिवनाशी संबंध येत होता हे यातून स्पष्ट होते. तसेच आर्थिक जिवनाशीही किल्ल्यांचा संबंध होता हे दिसून येते. किल्ल्यासाठी त्याच्या परिघातील गावांचा महसूल लावून देण्याची मध्ययुगीन पद्धत होती तशीच पद्धत मठ व मंदिरांना लागू होती. गावांमार्फत किल्ल्याला मिळणाऱ्या महसूलातून गावांचे रक्षण करण्याचीही महत्वपुर्ण जबाबदारी किल्ल्यांनी पत्परतेने केली

असल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच किल्ल्यांचा आर्थिक भार सावरण्यासाठी गावांतील शेती व व्यापार हा महत्वपुर्ण भाग होता. काही गावांमध्ये बाजारपेठा वसवून त्याचे संरक्षण सरकारातून केले जात असे. याचा महसूल व उत्पन्नाचा काही भाग किल्ल्यासाठी होता. तसेच शेती व पशुधनाचे संरक्षण आक्रमकांपासून किल्ल्यामार्फत होत असे. सारांश महाराष्ट्राच्या इतिहासात किल्ल्यांचे सामरिक महत्व अभ्यासले गेले मात्र त्यांचा सांस्कृतीक व सामाजीक तसेच आर्थिक जिवनाशी आलेला संबंध या संशोधनातून शोधला आहे.

मावळ तालुक्यातील किल्ले प्राचीन व मध्ययुगात महत्वपुर्ण गणले गेलेले आढळून येतात. मावळ तालुक्यातील किल्ल्यांची बांधणी प्राचीन काळात झालेली असली तरी अनेकदा त्यांच्या संरचनेत स्थानिक राजसत्तेकडून बदल केलेला आढळतो. मध्ययुगात महाराष्ट्रातील व पर्यायाने मावळ तालुक्यातील किल्ल्यांचे महत्व पराकोटीस पोहोचलेले दिसून येते. त्यामुळे मध्ययुगात महाराष्ट्रातील महत्वपुर्ण किल्ल्यांमध्ये लोहगड किल्ला गणला गेला. द.बा.पारसनीस संपादीत बाळाजी बाजीराव पेशवे रोजनीशीत तसेच का.ना.साने संपादीत बाळाजी बाजीराव पेशवे रोजनीशीत नानासाहेब पेशवे याने लोहगड किल्ल्यावरील राखीव कुमक युद्धासाठी कोकण प्रांतात सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या रक्षणासाठी **1755** साली पाठविली. यात लोहगड किल्ल्यावर असणाऱ्या फौजेत मावळ तालुक्यातील आजही सापडणाऱ्या आडनावांचा ऊल्लेख आला आहे व लोहगड किल्ल्यावरून कोकणातल्या किल्ल्याच्या रक्षणासाठी फौज पाठवितांना लोहगड किल्ल्यावर मुबलक सैन्य व राखीव कुमक असल्याचेही दिसून येते.

सैनिकांची नावे पुढीलप्रमाणे ः

“कोंडाजी पवार, रेखोजी भीवखोले, फुलाजी मराठे, आपाजी मांडेकर, दारकोजी थोरवे, गोंदजी यादव, गोरोजी मावकर, खंडोजी पडवळ, भवानजी अंदेर, अमंद सईद, शेख चांद, बावाजी जगताप, रघोजी दाभाडा, वगुनाक, वाननाक.

एकुण साडेशाहात्तर रूपयेपैकी साडेसदसष्ट रूपये कदीम तैनात जाजती इजाफा पंधरा असामीस दरमाहा रूपये नवप्रमाणे छ.**1** जिल्हेजपासोन करार केले असेत. किल्ले मजकूरचे शिरस्तेप्रमाणे पावीत जाणे.”[4]

---

[4] का.ना.साने (संपा.), पुर्वोक्त, पृ.199–200.

वरील **1755** च्या पत्रातील सैनिकांच्या नावांवरून असे दिसते की पेशव्यांच्या सैन्यात मराठयांसमवेत मुस्लिम तसेच महार जातीचेही सैनिक तैनात होते. आणि त्यांच्या हुद्दयानुसार त्यांना समान वेतन दिले जात असे. दरम्यानच्या काळात किल्ल्यांच्या सुरक्षेसाठी किंवा स्थानिक राजवटींच्या रक्षणासाठी अनेकविध जातींची शुर सैनिक ठेवले जात होते. यात जातीयता किंवा धर्मांधता यांचा लवलेषही नव्हता. तसेच रायगड किल्ला दरम्यान मराठी राज्याकडे होता मात्र तरीही लोहगड किल्ल्यावरून सैन्य पाठविले म्हणजे लोहगड किल्ल्यास दरम्यान लष्करी हालचालीचे एक वेगवान केंद्र म्हणून पाहिले गेले असे दिसून येते. तसेच लोहगड किल्ल्याचे मध्ययुगीन महत्व अधोरेखीत होते आहे.

मावळ तालुक्यातील लोहगड, विसापूर, तुंग, तिकोणा व राजमाची या किल्ल्यांवर यादव, बहमनी, निजामशाही, अदिलशाही, मुघल, मराठे, ब्रिटीश या राजसत्तांनी राज्य केले. या किल्ल्यांची बांधणी कोणी केली याबाबत पुराव्या अभावी सांगता येत नाही. मराठी विश्वकोष खंड **16** व Gazetteer of Bombay State, Poona Distict मद्ध्ये विसापूर किल्ल्याची बांधणी बाळाजी विश्वनाथ भट याने केली असे आलेले आहे परंतु उपलब्ध पुरातत्व शास्त्रीय पुराव्यांच्या तसेच लिखित साधनांच्या आधारे ही माहिती विसंगत आहे असे सिध्द होते. ब्रिटिश राजसत्तेनंतर मावळ तालुक्यातील किल्ले भारत स्वातंत्र्य झाल्यावर भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांकडे आले. परंतु किल्ल्यांचे प्राचिन तसेच मध्ययुगीन व अर्वाचीन महत्व स्वातंत्र्यानंतर संपुष्टात आलेले आढळते.

वासाहतिक काळात “Myth of the Unchanging East” असे मिथक राज्यकर्त्यांनी बनविले. परंतु त्यांच्या इतिहास लेखनात राजकीय वर्चस्व अबाधित ठेवण्याचा छुपा हेतू होता असे आढळते. स्थानिक राज्यकर्ते स्थितिशील असल्याचे भासविणे वासाहतिकांच्या दृष्टिने सोयीचे समिकरण होते. या मिथकातून त्यांचा हेतू साध्य होणार होता. त्यामुळे त्यांनी ज्ञानाची रचना करतांना स्थानिक राज्यकर्ते आणि माणसे ही गतिशील नसून स्थितिशील आहेत असे दर्शविणारी रचना केली. परंतु प्राचीन व मध्ययुगातील ज्ञानाच्या देवाण घेवाणीचे पुरावे आपण मावळ तालुक्यातील किल्ल्यांमधील सातत्य व रचनात्मक बदलातून तपासू शकतो. मावळ तालुक्यातील किल्ल्यांच्या सर्वेक्षणात किल्ल्यांच्या रचनेत झालेल्या तत्कालीन बदलातील आधुनिकीकरणावरून व सातत्याने

किल्ल्यांच्या रचनेत अभेद्यता राज्यकर्त्यांच्या  मार्फत आणली जात असल्यावरून स्थानिक राज्यकर्ते आणि समाज हा स्थितिशील नसून गतिशील होता हे दिसून येते आहे.

वासाहतिक राज्यकर्त्यांनी केलेल्या भारतीय समाजाच्या स्थितिशील चित्रणाला मावळ तालुक्यातील किल्ल्यांच्या अभ्यासाने छेद देता येतो. परकीय तत्कालीन आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल स्थानिक राजसत्ता पुर्वमध्ययुगात अनभिज्ञ नव्हत्या तसेच स्थानिक राजवटींना मिळणाऱ्या महसुलातून राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेची घडी योग्य बसलेली होती असे आढळून येते. वासाहतिक राज्यकर्त्यांनी महसूल व प्रशासकीय संरचनेबद्दल इतर राष्ट्रांच्या तुलनेत स्वतःस आधुनिक दर्शविण्याचा कायम प्रयत्न केलेला आढळतो. या प्रयत्नांत स्वतःस आधुनिक दर्शविण्याच्या स्पर्धेत त्यांच्याकडून स्थानिक राजवटींस मागास दर्शविण्यात आले. परंतु वासाहतिक राज्यकर्त्यांच्या आधी प्राचीन काळापासून स्थानिक राजवटी आपापली राजसत्ता योग्य महसुल पद्धतीने राबवून राज्याची विविधांगे यथायोग्य सांभाळत असल्याचे दिसून येते. तसेच ज्यावेळी आक्रमकांशी सामना झाला त्यावेळी स्थानिक राजवटींनी त्यांस योग्य प्रकारे तोंड दिल्याच्या अनेक घटना घडलेल्या आढळून येतात. तसेच परकिय आक्रमकांच्या नवनवीन शोधांसमोर स्थानिक राजसत्तांनी राजसत्ता टिकविण्यासाठी किल्ल्यांच्या रचना कायम बदल केलेले आढळतात. यावरून जागतिक बदलत्या युध्दतंत्राचे प्रतिबिंब स्थानिक किल्ल्यांच्या सातत्य व बदलत्या रचनेतून स्पष्ट दिसून येते. परंतु उत्तर मध्ययुगात तसेच अर्वाचीन काळात स्थानिक राजसत्तांच्या आपापसातील भांडणामुळे वासाहतिक राज्यकर्त्यांनी स्वतःचे बस्तान योग्य वेळेत बसविलेले दिसून येते. तसेच ज्या स्थानिक राजवटी प्राचीन काळापासून मध्ययुगापर्यंत लढण्यात कायम अग्रेसर राहिल्या त्याच राजवटींना ब्रिटिशांशी संलग्नता पत्करावी लागलेली आढळते. जी मुघल फौज आशिया खंडातील संख्येने सर्वात बलाढय मानली जात होती ती मुघल फौज औरंगजेब बादशहाच्या काळात महाराष्ट्रातील किल्ले घेण्यासाठी सतत धडपड करूनही रामशेज व जिंजी यांसारखे किल्ले घेण्यास मुघल फौजांना अनुक्रमे **5 – 7** वर्षे लागलेली आढळतात. परंतु **1818** साली कर्नल प्रॉथर व त्याच्या फौजेने विसापूर व लोहगड सारखे मोठे किल्ले एकाच दिवसात एकही प्राण न गमावता घेतलेले आढळतात. रायगड किल्ला किंवा अजिंक्यतारा किल्ला घेतांना मुघल फौजा जेरीस आलेल्या दिसतात परंतु ब्रिटिशांनी हे किल्ले हस्तगत करतांना फारसे श्रम न करता सहज हस्तगत केलेले दिसून येते. यावरून ज्या स्थानिक राजसत्ता पुर्वमध्ययुगापर्यंत स्थितीशील नसून गतिशील होत्या, त्याच राजसत्ता **1818** साली अद्ययावत नसल्याकारणाने स्थितीशील झालेल्या निदर्शनास येतात. कर्नल प्रॉथर याने वापरलेला तोफखाना अद्ययावत

होता. या तोफखाण्याच्या आधारावर प्रॉथरने आधी विसापूर किल्ला हस्तगत केला व त्वरीत त्याच दिवशी लोहगड किल्ला त्यास हस्तगत झाला. यावेळी विसापूर व लोहगड किल्ले मराठयांच्या ताब्यात होते मात्र अद्ययावत तोफा नसल्याने दोन्ही किल्ले मराठयांना सोडावे लागलेले दिसतात. तसेच रायगड किल्ला दुसऱ्या बाजिरावाने लढवायचा असे ठरवून त्याची पत्नी वाराणसीबाई व खजिना रायगडास पाठविला तसेच किल्ल्यावर **1000** कडवट अरबी फौज त्याने किल्ला लढविण्यासाठी ठेवली मात्र पोटल्याच्या डोंगरावरून ब्रिटिशांनी तोफांद्वारे रायगड पोळून काढला.[5] मात्र मराठयांच्या तोफा त्याच्यापर्यंत पोहोचण्याइतपत अद्ययावत नसल्याने मराठयांना रायगड सोडून जावे लागले. सारांश महाराष्ट्राच्या इतिहासात पुर्वमध्ययुगात सर्व स्थानिक राजवटी गतिशील दिसतात. परंतु तद्नंतर ब्रिटिशांविरोधात लढतांना अद्ययावत कोणतीही शस्त्रास्त्र मराठयांनी न वापरल्याने त्यांची ब्रिटिशांकडून वारंवार हार झाल्याचे दिसून येते.

शिवकाळातील मराठी राज्याशी निष्ठावान राहिलेल्यांची संख्या मोठया प्रमाणावर दिसून येते. मात्र औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेत मराठी राज्यांतील मात्तवर किल्ल्यांवरील किल्लेदार संपत्तीच्या लालसेने किल्ले मुघलांस देण्यास तयार झालेले दिसून येते. मुघलांकडून मराठी राज्यातील किल्ले हस्तगत करण्यासाठी अनेक मातब्बर मराठी सरदारांची कुटुंब लढलेली आढळतात. तसेच मराठी राज्याची अजिंक्यतारा राजधानी पाडण्यासाठी औरंगजेब बादशहाकडून अनेक मराठी सरदार संपत्तीसाठी लढलेले निदर्शनास येतात. सारांश किल्लेदार व मराठी सरदार ज्याप्रकारे शिवकाळात मराठी राज्याशी निष्ठेने वर्तणुक केलेले आढळतात त्याप्रमाणे पुढील काळात मुघलांकडून मराठी राज्य संपविण्यासाठी अनेक लढाया लढलेले मराठी मातब्बर सरदार दिसून येतात. या सर्व गोष्टींच्या केंद्रस्थानी संपत्तीची लालसा असलेली निदर्शनास येते. तसेच औरंगजेब बादशहाच्या निधनानंतर मराठी राज्यातील मंडळी एकत्रित येवून न लढल्याने मुघलांकडे असलेले अनेक महाराष्ट्रातील किल्ले तसेच कित्येक वर्षे मुघल सत्तेकडे असल्याचे दिसून येते. शिवनेरी व चाकण चे किल्ले स्वराज्यात येण्यासाठी औरंगजेब बादशहाच्या निधनानंतर चार दशके लागलेले दिसून येतात. राजधानी रायगड मराठी राज्याकडे येण्यास **1733** साल उजाडलेले आढळते. अर्वाचीन काळात मराठी राज्यातील किल्ले अद्ययावत नसल्याने **1818** साली ब्रिटिशांनी सौम्य प्रतिकारात महाराष्ट्रातील महत्वपुर्ण किल्ले अलगत हस्तगत केले. यामागे ब्रिटिशांच्या

---

[5] शां. वि. आवळसकर, *रायगडची जीवनकथा*, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ, **1962**, पृ. **184**.

दरम्यानच्या काळातील अत्याधुनिक तोफखाना व मराठी राज्यातील मागास तोफखाना असल्याचे दिसून येते. प्राचीन व मध्ययुगीन काळात वैभवाच्या शिखरावर असलेले मावळ तालुक्यातील तसेच महाराष्ट्रातील किल्ले भारत स्वातंत्र झाल्यावर नाममात्र झालेले आढळतात.

# संदर्भसूची

- प्राथमिक अप्रकाशित साधने ः

कल्हाट गाव, पांडवकडयाची लेणी, स्त्री चे कोरीव शिल्प, पोढी व खोल्या .

विसापूर किल्ल्याच्या माथ्यावरील पोढीच्या कातळयास कोरलेला ब्राम्ही लिपीतील शिलालेख .

कोटेश्वरवाडी गावातील कोटेश्वर मंदीराशेजारच्या समाधीवरील शिलालेख .

तुंग किल्ल्याच्या दक्षिण कातळयातील **147** फुट लांबीची लेणी .

नाणोलीगाव, फिरंगाई लेणी, खोल्या व पोढी .

मंगळूरगाव, पिराची लेणी व स्तंभी पोढी .

लोहगड किल्ल्याच्या उत्तरबाजुच्या जंगलातील दगडी अपरिचीत समाध्या, कातळयातील पोढी आणि खोल्या .

क्षेत्रभेट व स्थानिकांच्या मुलाखती .

- प्राथमिक प्रकाशित साधने ः


अमात्य रामचंद्रपंत, *आज्ञापत्र*, मुळ मोडी प्रत ऊपलब्ध - राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे .

कुलकर्णी अ . रा ., *जेधे शकावली*, डायमंड प्रकाशन पुणे, **2007** .

केळकर प्रा . भा . (संपा .), *वाल्मीकी रामायण*, वरदा प्रकाशन पुणे, **1986** .

गोखले शोभना, *अभिलषितार्थचिंतामणी अर्थात मानसोल्लास*, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे प्रकाशन, **2010** .

चित्राव विनायक(संपा .), *ऋग्वेद*, भारतीय चरित्रकोश मंडळ पुणे, **1996** .

जोशी अ.रा. (संपा.), *मनुस्मृती*, गुरूदेव प्रकाशन पुणे, 1971.

जोशी बापु (संपा.), *दुसरा बाजीराव पेशवे याची रोजनीशी*, 1908.

जोशी शं.ना., *सेनापती दाभाडे दफ्तर भाग ः 1*, भा.इ.सं.मं.प्रकाशीत, 1951.

दिवेकर स.म. (संपा.), *कवीन्द्र परमानन्दकृत श्रीशिवभारत*, शब्दवेध प्रकाशन पुणे, 1998.

दिवेकर स.म. (संपा.), *शिवचरित्र प्रदीप*, भा.इ.सं.म. प्रकाशीत पुणे, 2009.

पगडी सेतू माधवराव (संपा.), *मोगल दरबाराची बातमीपत्रे भाग ः 1*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशीत, 1978.

पगडी सेतू माधवराव (संपा.), *मोगल दरबाराची बातमीपत्रे भाग ः 2*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशीत, 1978.

पगडी सेतू माधवराव (संपा.), *मोगल दरबाराची बातमीपत्रे भाग ः 3*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशीत, 1978.

पारसनीस द.बा. (संपा.), *बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनीशी*, 1906.

पारसनीस द.बा. (संपा.), *बाळाजी बाजीराव पेशवे रोजनीशी*, निर्णय सागर प्रेस प्रकाशीत, 1908.

पारसनीस द.बा., *संशोधनासाठी निवडलेली कागदपत्रे 6*, पत्र ः 3346.

*पेशवे आणि दाभाडे*, गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस मुंबई, 1931.

भावे ह.अ., *कौटिलीय अर्थशास्त्र*, वरदा प्रकाशन प्रा.लि.पुणे, 2012.

मराठे काशीनाथ (संपा.), *सवाई माधवराव पेशवे यांची रोजनीशी*, 1908.

मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, 1977.

वाड गणेश चि. (संपा.), *दुसरा बाजीराव पेशवे रोजनीशी.*

वाड गणेश चि. (संपा.), *सवाई माधवराव पेशवे यांची रोजनीशी*, **1908**.

वाड गणेश चि. (संपा.), *सातारकर महाराज व पेशवे यांच्या रोजनिशीतील निवडक उतारे भाग 5*, **1908**.

वाळिंबे रा.श. (अनु.), *महाभारत खं. 7*, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी पुणे, **1986**.

*शिवकालीन पत्रसार संग्रह* खंड ः **1**, श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, **2009**.

*शिवकालीन पत्रसार संग्रह* खंड ः **2**, श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, **2009**.

*शिवकालीन पत्रसार संग्रह* खंड ः **3**, श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळ प्रकाशीत, **2009**.

सरदेसाई गो.स., *मराठी रीयासत*, खंड ः **8**, **1892**.

साने का.ना. (संपा.), *थोरले माधवराव पेशवे यांची रोजनीशी*, **1911**.

साने का.ना. (संपा.), *बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनीशी*, **1911**.

साने का.ना. (संपा.), *सभासद बखर*, **1923**.

Gazetteer of the Bombay Presidency Vol. XVIII Part III, Poona.

Gazetteer of  Bombay State, Volume XX, Poona District.

Indian Archaeology 1969 – 70 A Review.

Indian Archaeology 1984 – 85 A Review.

- दुय्यम प्रकाशित साधने ः

अक्कलकोट सतिश, *दुर्ग*, सहयाद्री दुर्गभ्रमण मंडळ सांगली, **2009** .

आचार्य धनंजय, *मध्ययुगीन भारत*, साईनाथ प्रकाशन नागपूर, **2008** .

कुलकर्णी अ . रा ., *अशी होती शिवशाही*, राजहंस प्रकाशन, पुणे **2009** .

खैरे निलमकुमार, *साप, ज्योत्स्ना प्रकाशन,* **2006** .

गायकवाड एन . डी ., *मध्ययुगीन भारत भाग 2*, बिना प्रकाशन नाशिक, **2007** .

गायकवाड ल . क ., *शिवनेरी किल्ल्याचा इतिहास*, पुष्पनंद प्रकाशन, **2011** .

गोखले शोभना, *प्राचीन भारतीय इतिहासाची साधने*, टिळक महाराष्ट्र विदयापीठ, **2012** .

घाणेकर प्र . के ., *साद सहयाद्रीची भटकंती किल्ल्यांची,* स्नेहल प्रकाशन, **1985** .

चिले भगवान, *गडकोट*, शिवस्पर्श प्रकाशन कोल्हापुर, **2011** .

तापकीर सं . भा ., *महाराजांच्या जहागीरीतून*, गरूडझेप प्रकाशन, **2012** .

तेंडुलकर महेश, *लोहगड विसापूर तुंग तिकोणा*, स्नेहल प्रकाशन, **2010** .

दाभाडे कृ . रा ., *सरसेनापती खंडेराव दाभाडे भाग 1*, सरसेनापती उमाबाई दाभाडे स्मृती प्रतिष्ठाण प्रकाशन .

दाभाडे सत्यशिलराजे, *दुर्गांच्या देशातून*, गरूडझेप प्रकाशन, **2012** .

देशपांडे सु . र ., *वाई कला आणि संस्कृती*, **2011** .

पाटणे स ., अजिंक्यताऱ्यावरून, अजिंक्य, **66** वे अखिल भारतीय मराठी साहीत्य सम्मेलन, सातारा **1963** .

पाळंदे आनंद, *डोंगरयात्रा*, गिरीप्रेमी ग्रंथ प्रकाशन, **1994** .

पुरंदरे ब . मो ., *शेलारखिंड*, पुरंदरे प्रकाशन, **2008** .

बेंद्रे वा . सी ., *गड कोट दुर्ग*, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, **1965** .

भालेराव मंजीरी, *महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षिदार*, डायमंड प्रकाशन, 2009 .

भावे वा . कृ ., *शिवराज्य व शिवकाल*, केसरी मुद्रणालय, 1957 .

भोसले प्र . व ., *दुर्गरचना*, नरसिंह प्रकाशन सांगली, 2006 .

भोसले प्र . व ., *मराठयांची धारातीर्थे*, नरसिंह प्रकाशन सांगली, 2009 .

माहेश्वरी के . के ., "*Maratha Mints and coinage*", I.I.R.N.S. Nashik publication.

मांडे प्रमोद, *गड किल्ले महाराष्ट्राचे*, प्रफुल्लता प्रकाशन, 2008 .

शां . वि . आवळसकर, *रायगडची जीवनकथा*, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ, 1962 .


शिवाजी रायगड स्मारक मंडळ, *शिवराय मुद्रा,* 2010 .

सावंत इंद्रजीत, *पर्नालपर्वत पन्हाळगड*, सहयाद्री इतिहास संशोधन केंद्र प्रकाशन, 2009 .

सोवनी अविनाश, *स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान*, पुर्वा प्रकाशन, 1998 .


# परिशिष्टे

- **ब्रिटीशांच्या किल्ले पाडण्याच्या मोहिमेविषयीचे पत्र**




ईजत असार रामराव नरसिंह कमावीसदार त || सिवनेर कर्यात जुन्नर सलामहू अजतर्फ कपतान हन्री पाटंनर साहेब बहादूर कलकटर कीले आमदानगर सलाम आकी तुमचे प्रातात कीले पाडावंयास कपतान ईष्टन्नस साहेब बहादूर आले आहेत त्यांस दुध वगैरे जो हमा जिनस लागेल तो खुष खरेदी मोलास देत जाणे कमती न करणे ताकीद सीक्त जाणीजे ब तेरीख **18** माहे सन **1818** ईसवी

## • आज्ञापत्रातील किल्ल्यांबद्दलचा उल्लेख



संपुर्ण राज्याचे सार ते दुर्गे. दुर्गे नसतां मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उध्वस होतो. देश उध्वस झाल्यावरी राज्य यैसे कोणास म्हणावें? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्यें दुर्ग बांधुन तो तो देश शाश्वत करून घेतला, आलें परचक्र संकट दुर्गाश्रयीं परिहार केलें. हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडांवरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासनवस्य न होय त्या त्या देसी स्थलविशष पाहून गड बांधीले, तैसीच जलदुर्गे बांधिली, त्यावरून आक्रम करित करित सालेरी अहिवंतापासोन कावेरीतीरपर्यंत निष्कंटक राज्य संपादिले. औरंगजवासारीखा महाशत्रु चालोन येऊन विज्यापुर भागानगरासारीखी महासंस्थाने आक्रमिलीं

## • लोहगड किल्ल्याच्या गणेश द्वारातील शिलालेख



श्री गणेशायनमः गणेश दरवाजा बांधला बा

ळाजी जनार्दन फडणीस विद्यमान धों

डो बल्लाळ नीजसुरे प्रारंभ शके **1712**

साधारण नाम संवत्सरे अस्वीन शु

ध **9** नवमी रविवार समाप्त शके


**1716** आनंदनाम संवत्स

रे ज्येष्ठ सुध त्रयोदशी बु

ध वार कत □र्त□ व्य जयाजी

धनराम गव □ं□दी त्रिव □्रिंब□कजी सुतार

• **समाधीवरील अप्रकाशित शिलालेख, कोटेश्वरवाडी**




श्री मारतंड प्रसन्न

शक १६५४ पत्रधावि नाम संवछरे भाद्र

पद सुध प्रतिपदा गु

रूवार – – – – दामाजी


खंडेराव सुत वाडरा

व लिंगर सकुळ काळ मौजे


चऱ्होली जीत – – – याचा धश्र – – –

– – वृंदावन बांधिले आहे


**नकाशे**





भारताचा नकाशा आंतरराष्ट्रीय सिमेसहीत




महाराष्ट्राचा स्थळांसहीत राजकीय नकाशा


PUNE DISTRICT: SELECTED RELIGIOUS AND HISTORICAL PLACES
INDEX
1 Lohgad Fort
2 Visapur Fort
3 Tung Fort
4 Tikona Fort
5 Indori Fort
SCALE
0 10 20 40 Km
N
S
E
W
1
2
3
4
5
73°20'0"E
73°30'0"E
73°40'0"E
73°50'0"E
74°0'0"E
74°10'0"E
74°20'0"E
74°30'0"E
74°40'0"E
74°50'0"E
75°0'0"E
75°10'0"E
19°50'0"N
19°40'0"N
19°30'0"N
19°20'0"N
19°10'0"N
19°0'0"N
18°50'0"N
18°40'0"N
18°30'0"N
18°20'0"N
18°10'0"N
18°0'0"N
17°50'0"N
17°40'0"N
17°30'0"N
17°20'0"N

# तुंग किल्ला नकाशा व क्रमांकवार स्थळे



1) तुंगवाडीतून गडाच्या माथ्यावर जाणारा रस्ता

2) गडाचा माथा व तुंगाई देवीचे मंदीर

3) गडाच्या माचीवरील दारूगोळा कोठारे

4) गडाच्या माचीवरील सैन्याकरीता वापरावयाच्या पाण्याचं टाकं

5) गडाच्या माचीवरील कातळकडयास कातळाखोदून मोठया आकारात बनविलेले स्तंभ असलेले पिण्याचे पाण्याचे प्राचीन कालखंडातील टाकं

6) गणेश मंदीर व शेजारी कातळाखोदून घडीव दगडांत बांधून काढलेले पाण्याचे टाकं

7) गडाचा कारभार पाहणारी कचेरी

8) जिभीचे सुस्थितीत असलेले भव्य प्रवेशद्वार

9) दारूगोळा कोठार व शिबंदीच्या घरटयांची जोती

10) हनुमान मंदीर व त्याशेजारी मध्ययुगातील पण सध्या बुजलेली बावडी व दगडी शिल्पे, भैरवनाथ मंदीर व समोरील रांगेत ठेवलेल्या समाध्या व विरगळ, मंदीराच्या मागीलबाजूस एका झाडाखाली ठेवलेल्या मोठयासंख्येने एकत्रीत सापडणाऱ्या विरगळ व समाध्या


11) पश्चिम कातळकडयास 3×3 फुट तोंडाचे आकारमान असलेल्या 147 फुट लांबीच्या प्राचीन कालखंडातील चार गुंफा

12) गडाच्या दक्षिण कातळकडयास कोरलेल्या पाण्याच्या टाक्या व शाळुंखेच्या आकाराच्या प्राचीन गुंफा

13) किल्ल्याच्या कातळकडयात कोरलेल्या पोढी

14) किल्ल्याच्या कातळकडयात कोरलेल्या पोढी व गुंफा

# तिकोणा किल्ला नकाशा व क्रमांकवार स्थळे



1) तिकोणापेठमधून किल्ल्यावर जाण्याची मध्ययुगीन वाट

2) तिकोणापेठमधून किल्ल्याच्या सोंडेवरून माथ्यावर जाणारा मार्ग

3) किल्ल्याच्या दक्षिण जंगलातून गडद लेणीकडे जाणारा मार्ग

4) किल्ल्याच्या माचीवर असलेले दारूगोळा कोठार

5) किल्ल्याचे सुस्थितीत असलेले प्रथम प्रवेशद्वार

6) तुळजाईलेणी व पाणपोढी

7) दक्षिण कातळकडयाची गडदलेणी व माथ्यावरील वितंडेश्वर मंदीराखालील पाण्याची पोढी


8) किल्ल्याची कचेरी, दारूगोळा कोठार व स्थंभठिकाणाची जागा

9) वितंडेश्वराचे मंदीर व वक्राकार उतरत्या कातळखोदीव पायऱ्या

10) किल्ल्याचा सर्वात मोठा बुरूज व निशानाची जागा

11) बालेकिल्ल्याचे प्रथम प्रवेशद्वार, उजव्या कातळयात कोरलेली स्तंभी पोढी व त्यावरील लेणी

## इंदोरी किल्ला नकाशा व क्रमांकवार स्थळे



1) दुर्गाचे पुर्वाभिमुख व दर्जेदार बांधणीचे भव्य प्रवेशद्वार


2) कडजाई मातेचे मंदीर व भव्य सभामंडप

3) अनामिक देवाचे सुशोभित मंदीर

4) दुर्गाच्या पश्चिमबाजूने नदीमध्ये उतरावयाची पायऱ्यांची वाट

5) इंद्रायणी नदीचे खोल पात्र याठिकाणी असून पश्चिमबाजूने हा जलदुर्ग दिसतो

## विसापूर किल्ला नकाशा व क्रमांकवार स्थळे



1 . पाटणगावमार्गे किल्ल्यावर येणाऱ्या मार्गावरील पहिल्या द्वारातील कातळकोरीव शक्तीदेवता हनुमान

2 . ब्राह्मी लिपीतील शिलालेख असलेले पिण्याच्या पाण्याची पोढी

3 . कोकण प्रवेशद्वारातील ओतीव तोफ

4 . पुर्वाभिमुख शंकराचे मंदिर व समोरील मध्ययुगीन भग्न अवशेष

5 . किल्ल्याची दुसरी कचेरी

6 . किल्ल्यावरील पाण्याचे एकुण 83 टाके

7 . किल्ल्यावरील पाण्याचे एकुण 3 तलाव

8 . मुख्य तटबंदी सोडुन पाच फुट आतमध्ये बांधलेला ईशान्य बुरूज

9 . लोहगडवाडीमार्गे किल्ल्यावर येणाऱ्या मार्गावर ब्राह्मी लीपीतील शिलालेख असलेले प्राचीन टाके

10 . लोहगडाच्याबाजूस लांबपर्यंत पसरलेला विसापूरचा माचीवजा बुरूज

11 . बांधकामासाठी वापरावयाचा चुन्याचा घाणा

12 . बांधकामासाठी लागणारे चिवट पदार्थ भरडण्यासाठी चुण्याच्या घाण्याशेजारचे दगडी जाते .

13 . आधुनिक पदधतीचे शौचकूप(कमोड)

14 . किल्ल्याची प्रमुख कचेरी

15 . दुहेरी तटबंदी घातलेले दारूगोळा कोठार

16 . वायव्येचा किल्ल्याचा सर्वात बलाढय बुरूज


17 . किल्ल्यावरील सर्वात मोठी ओतीव तोफ

18 . किल्ल्यास पश्चिमबाजूची अखंडीत 1 . 2 कि . मी . ची सरळ तटबंदी

19 . लोहगडवाडीमार्गे गायमुखखिंडीतून किल्ल्याचा रस्ता

20 . पाटणगावमार्गे चढण असलेला किल्ल्याचा रस्ता

## लोहगड किल्ला नकाशा व क्रमांकवार स्थळे



1) मध्ययुगात किल्ल्याच्या पायथ्यास वसलेली लोहगडवाडी व किल्ल्यावर जाणारा रस्ता

2) लोहगड किल्ल्याची पाच पोलादी प्रवेशद्वारे, प्रथम प्रवेशद्वारात ठेवलेला शिलालेख व तीन ओतीव तोफा

3) घुमटात असलेली मध्ययुगीन मुस्लीम अनामीकाची समाधी

4) कचेरी व लोहारखाण्याचे उपलब्ध असलेले जोते व किमान अवशेष

5) महाद्वाराशेजारी पुर्वी उपलब्ध असलेली युरोपीयन ओतीव तोफ

6) सभागृहाचे अवशेष व प्राचीन कालखंडातील कातळकोरीव मोठया आकाराच्या लेण्या

7) लक्ष्मीकोठार व त्यासमोरील भंग झालेली तोफ तसेच जवळील प्राचीन लेण्या व पोढी

8) शंकराचे मंदीर, नंदी, हनुमानाची मुर्ती, पाण्याचे कातळखोदीव टाके

9) सोळाकोनी तलाव, पायऱ्या व अस्पष्ट झालेला शिलालेख

10) गडावरील सर्वोच्च उंची असलेली टेकडी व त्यावरील मध्ययुगातील टेहळणी बुरूज परंतु सध्या त्याचे कबरेत झालेले रूपांतर

11) नैसर्गीक विस्तीर्ण तलाव

12) किल्ल्यावरील मुस्लीम समुदायाची मशीद व त्यामागील मध्ययुगीन दगडी समाध्या

13) आयताकारातील दारूगोळा कोठार व विसापूर किल्ल्याच्या बाजूने झेपावलेला बुरूज

14) दारूगोळा कोठारं व वाडयांचे अवशेष तसेच सैनिकांची मध्ययुगीन घरे

15) किल्ल्याच्या माथ्यावरून उत्तर कातळकडयास विशिष्ट टप्प्यावर उतरून कोरलेले लेणी व विंचूकाटा माचीवर उतरावयासाठी असलेला बुरूज व अवघड निसरडी वाट

16) किल्ल्याचे वैशिष्टय गणली गेलेली विंचूकाटामाची व संपुर्ण माचीवर दगडी बांधकाम करून तीस केलेली तटबंदी

17) विंचुकाटा माचीवर मध्ययुगात कातळाखोदलेले एकमेव टाके

18) विंचुकाटा माचीच्या पायथ्यास असलेले दगडी खोदीव पाण्याचे टाके व घेरेवाडी ग्रामस्थांची आजही होणारी पाण्याची सोय

19) विंचुकाटामाचीचा शेवटच्या टोकाचा चिलखती बुरूज

20) प्राचीन कालखंडात घेरेवाडीच्याबाजूने विंचुकाटामाचीच्या कातळकडयास कोरलेल्या चार पोढी

# लोहगड किल्ला




लोहगड किल्ला नारायण प्रवेशद्वार



लोहगड किल्ला महाद्वार



गोमुख प्रवेशद्वार पद्धती



बुरूजाची तोफखिडकी व जंग्या



किल्ल्याच्या मध्यावरील सोळा कोनी तलाव



प्रथम प्रवेशद्वारातील ओतीव तोफा




किल्ल्याच्या कातळकडयातील 50 फुट लांबीच्या प्राचीन पोढी



प्राचीन पोढीच्या आतमध्ये पाण्याचा साठा वाढविण्यासाठी कोरल्या गेलेली खोली



लोहगड किल्ल्याची विंचुकाटा माची




महाप्रवेशद्वारासमोरची कबर

# विसापूर किल्ला



पाण्याच्या टाक्यातील कातळकोरीव हनुमान



प्राचीन गुंफांसमोरील चपेटदान मारूती



लोहगडवाडीतुन दिसणारा विसापूर किल्ला



पोढीवरील अप्रकाशित ब्राह्मी शिलालेख



किल्ल्यावरील कचेरी



**प्राचीन गुंफांचे मध्ययुगात कोठारात केलेले रूपांतर**



चुण्याचा घाणा व चर



तुंग किल्ला





तुंग किल्ला प्रवेशद्वार



किल्ला पायथ्याच्या भैरवनाथ मंदीरासमोरील समाध्या



किल्ला माथ्यावरील तुंगाई देवीचे मंदीर




प्राचीन गुंफेतुन बाहेरील दिसणारे मुख



किल्ल्याच्या कातळयात कोरलेली प्राचीन गुंफा



**किल्ल्याच्या कातळकडयात लहानमुखी 147 फुट लांबीची प्राचीन गुंफा**



आतमधील बाजुने प्राचीन **147** फुट लांबीची गुंफा



**147 फुट लांबीच्या गुंफेमधील पहीली मोठया आकाराची खोली**



**147 फुट अंतर आत गेल्यावर शेवटच्या टोकाशी कोरलेली खोली**


# तिकोणा किल्ला




गडदलेणी मधील खोली



तळजाई लेणीसामोरील चुण्याचे दोन घाणे एका चरात



बालेकिल्ल्याचे प्रथम प्रवेशद्वार व त्यासमोरील तिव्र चढणीच्या पायऱ्या



बालेकिल्ल्याचे द्वितीय प्रवेशद्वार



तुळजाई लेणी व त्यासामोरील पोढी



वितंडेश्वर मंदिर व त्यासमोरील भग्नावशेष



पायाखाली पणवती राक्षसीण दाबलेला चपेटदान मारूती



कातळखोदिव सात स्तंभी टाके



द्वितिय प्रवेशद्वाराच्या शेजारची लेणी व पोढी



कातळखोदिव सात स्तंभी टाके



द्वितीय प्रवेशद्वारासमोरील उंच बुरूज



बालेकिल्ल्याच्या समोरील अरूंद परंतू उंचीचा बुरूज

# इंदोरी किल्ला



इंदोरी किल्ल्याच्या नगारखाण्याची आतमधील बाजु




नगारखाण्यातली शस्त्रागाराची खोली



नगारखाण्याच्या शेजारची वस्तु ठेवणीची खोली



नगारखाण्याच्या आतमधील अलंगा



नगारखाण्याच्या वरच्या बाजुस चुण्याच्या गिलाव्यात केलेले नक्षिकाम



नागारखाण्याच्या आतील पुष्पनक्षी



चुण्याच्या गिलाव्यात नगारखाण्यावरच्या बाजुस छतास केलेली पुष्पनक्षी



किल्ल्याच्या तटबंदीस बुरूजाच्या खाली बांधलेली खोली